# नेहरू आणि नेहरूवाद

(एक चिकित्सक मूल्यांकन)

नी. र. वऱ्हाडपांडे

सुरभ्य प्रकाशन

नागपूर-४४० ०३३

# नेहरू आणि नेहरूवाद
(एक चिकित्सक मूल्यांकन)


- **प्रकाशक**
  सुरभ्य प्रकाशन
  ३८, हिंदुस्तान कॉलनी,
  अमरावती रोड, नागपूर-४४० ०३३


- © नी. र. वऱ्हाडपांडे


- **प्रथम आवृत्ती :** ६ डिसेंबर २००७
- **मुद्रक**
  पूनम प्रिंटर्स
  ओल्ड नंदनवन ले आऊट, नागपूर
  दूरध्वनी : ५६४६९४३
- **अक्षरजुळवणी**
  ऋतुजा ग्राफिक्स, नागपूर
  भ्रमणध्वनी : ९३७०९९६५५९
- **मुखपृष्ठ**
  शैलेश साऊतकर
- **मूल्य : २९०/-**
- **मुख्य विक्रेते**
  निशिगंधा एजन्सी
  मुकुंदराज लेन, महाल, नागपूर
  दूरध्वनी : २७६८८१४


## अनुक्रम


नेहरूंच्या भारतास देणग्या / १
भारताच्या राष्ट्रीयत्वाविरुद्ध १७ वर्षांचे युद्ध / ३
विज्ञानाच्या क्षेत्रात / ९
नेहरूंच्या पंचवार्षिक योजना / २१
हिंदूंचा दु:स्वास / ३२
कोसळणारे आभाळ सावरले / ६७
भारताच्या सुरक्षेचा खेळखंडोबा / ८१
नेहरूंनी ओढवून आणलेले चीनी गंडांतर / ९०
काश्मीरचा वाहता गळू / १०८
संविधानाचे तीन तेरा / ११८
देशद्रोह हा मूलभूत अधिकार! / १३०
समाजसुधारणा की समाजद्रोह? / १३८
देशी भाषाविरुद्ध जिहाद / १४८
नेहरू : व्यक्तित्वमीमांसा / १९६
आत्मनस्तु कामाय / २३९
महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू / २४५
नेहरूनंतरचा नेहरूवाद / २५५

# भूमिका

२००१ साली साहित्यगंगा प्रकाशन, नृपतुग रोड, बंगलोर यांनी माझे The nemesis of Nehru Worship हे पुस्तक प्रकाशित केले. प्रस्तुत पुस्तक हे त्या पुस्तकाचे भाषांतर नाही. त्यात आवश्यक तेथे भर घालून स्वतंत्रपणे लिहिलेले आहे. इंग्रजी पुस्तकाचा प्रसार मुख्यत: दक्षिणेत झाला. महाराष्ट्रातील मराठी व इंग्रजी कालिकांना परीक्षणासाठी पुस्तक पाठविण्यात आले होते पण तरुण भारताशिवाय इतरत्र कोठे परीक्षण आलेले दिसले नाही. नागपूर टाइम्समध्ये एक पत्र आले होते त्यात हे पुस्तक हीन-इंग्रजी शब्द base- असल्याचे मत देऊन त्यात नेहरूंच्या बुद्धिमत्तेबद्दलही शंका घेण्याचा नीचपणा केलेला आहे अशी आपली व्यथा व्यक्त केली होती. अशी टीका मला अनपेक्षित नव्हती पण या शिव्या देणाऱ्याने माझे पुस्तक वाचले असेल की नाही याचा मी विचार करू लागलो कारण वरील शिव्या देण्यास पुस्तक नुसते चाळण्यापलीकडे काही करण्याची जरूर नाही.

प्रस्तुत पुस्तकाच्या नशीबी अशासारखी समीक्षा येणार नाही अशी मी आशा करतो. कारण भारताला एक प्रतिष्ठित राष्ट्र म्हणून जगायचे असेल तर नेहरूवादाचा पूर्णपणे त्याग केला पाहिजे हेच मला मुख्यत: सांगायचे आहे. माझे पुस्तक प्रकाशित व्हायच्या आधी असे मत मांडणारा कोणी आढळात आलाच नाही. पण त्यानंतर असे म्हणणाऱ्या व्यक्ति शोधात बसण्याची जरूर उरलेली नाही असा अनुभव आला. माझ्यासारख्या माणसाला यापेक्षा जास्त काही साधता येईल अशी माझी अपेक्षा नाही.

इंग्रजी पुस्तकाने जो परिणाम केला त्यापेक्षा जास्त परिणाम हे पुस्तक करील अशी मला आशा आहे. कारण एकतर पहिले पुस्तक सुधारून हे पुस्तक लिहिले आहे व दुसरे म्हणजे महाराष्ट्राची चिकित्सकतेबद्दल प्रसिद्धि आहे.

**नी. र. वऱ्हाडपांडे**
३८, हिंदुस्तान कॉलनी,
अमरावती रोड
नागपूर-४४० ०३३

# नेहरूंच्या भारतास देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | नेहरूंच्या कारकीर्दीच्या प्रारंभी : | भारताच्या सैनिक व राजकीय अधिकारक्षेत्रात ५६ लक्ष चौरस कि. मी. प्रदेश होता. |
| | अन्ती : | तो ३२ लक्ष चौरस कि. मी. उरला व चोवीस लक्ष कि. मी. शत्रूच्या घशात गेला. म्हणजे नेहरूंची १७ वर्षांची कारकीर्द भारताचा जवळपास ४३ टक्के भूभाग गमावण्याच्या पराक्रमासाठी इतिहासात नोंदविली पाहिजे. |
| २. | प्रारंभी : | मानवी विकास म्हणजे दरडोई उत्पन्न. सरासरी आयुर्मान व साक्षरतेचे प्रमाण यात भारताचा क्रमांक ३२ वा होता. |
| | अन्ती : | हा क्रमांक १३९ पर्यंत घसरला. भारताच्या वर असलेल्या देशात पाकिस्तानचा समावेश होता. बंगलादेशातील किमती लक्षात घेतल्या तर स्वत:च्या उत्पन्नात बंगलादेशी ज्या स्तरावर जगू शकतो त्या स्तरावर भारतीय माणूस स्वत:च्या उत्पन्नावर जगू शकत नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. श्रीलंकेने भारताच्या मानाने अभूतपूर्व प्रगती केलेली आहे. वैज्ञानिक विकासात भारताचा क्रमांक ७० वा लागतो. |
| ३. | प्रारंभी : | भारतीय सैन्य एशियातले सर्वात बलिष्ठ सैन्य होते. |
| ४. | अन्ती : | भारतीय सैन्याचा चीनी सैन्याने सात दिवसात फडशा पाडला. नेहरूंच्या मृत्यूनंतर अवघ्या दीड वर्षांनी |

पाकिस्तानशी प्रसंग आला. तेव्हा भारतीय सैन्य पाकिस्तानी सैन्याचा पराभव करू शकले नाही आणि खेमकरण व जलानवाला गमावून बसले.

५. नेहरूंच्या हाती सूत्रे आली तेव्हा तिबेटमध्ये भारताचे सैन्य होते व तिबेटची विदेशनीती भारताच्या सल्ल्याने ठरविली जात असे. पण चीनने तिबेटवर हक्क सांगितल्यावर नेहरूंनी याचे प्रमाण न विचारता तो एकदम मान्य करून टाकला व तिबेटमधून भारतीय सैन्य काढून घेतले. तिबेटच्या चालू सीमा तरी चीनकडून मान्य करून घ्या म्हणून विदेशमन्त्रालयाने सल्ला दिला असतानाही नेहरूंनी तो धुडकावून लावला. याच सीमेच्या विवादावरून चीनशी युद्ध उद्‌भवले. २०००० भारतीय जवानांची कत्तल झाली व भारताची ६४००० चौरस कि. मी. भूमी चीनने बळकावली.

६. नागा व कम्युनिस्ट बंडखोरांविरुद्ध यांत्रिक बन्दुका, विमाने वगैरे शस्त्रे वापरू नयेत व त्यांना झालेल्या सजा माफ करण्यासाठी प्रयत्न करावे असे नेहरूंचे धोरण होते. या धोरणामुळेच नक्षलवादी, उल्फा वगैरे आतंकवादी फोफावले.

७. नेहरूंनी लक्षावधी पाकिस्तानी घुसखोर भारतात आणले; आज त्यांची संख्या ३ कोटींवर गेली आहे.

८. काश्मीरच्या महाराजांनी काश्मीर भारतात विलीन केले. या विलीनीकरणाला पाकिस्तान धरून जगातील सर्वांनी मान्यता दिली होती. फक्त नेहरूंनीच हे विलीनीकरण अमान्य केले व त्यांच्या मान्यतेसाठी जनमत घेण्यास यावे असा आग्रह धरला. पुढे ३७० कलम पारित करून काश्मीर भारताशी कधीच एकरूप होणार नाही अशी व्यवस्था करून ठेवली.

९. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत वर्षाला २६ हिन्दू-मुस्लिम दंगे होत असत. उलट नेहरूंच्या कारकीर्दीत वर्षाला ९० दंगे होऊ लागले.

१०. हिन्दूंचे धर्मांतर करण्यास नेहरूंनी मिशनऱ्यांना उत्तेजन दिले. १९४७ मध्ये नागभूमीमध्ये अवघे २०० ख्रिस्ती होते. नेहरूंच्या कारकीर्दीच्या अखेरीस सारी नागभूमीच ख्रिस्ती झाली व या ख्रिस्ती झालेल्या नागांनीच भारताविरुद्ध बंड केले.

११. नेहरूंनी भारतीय भाषांविरुद्ध जिहाद पुकारून त्यांना वन्य जमातीच्या स्तरावर नेऊन सोडण्याचा प्रयत्न केला.





# भारताच्या राष्ट्रीयत्वाविरुद्ध १७ वर्षांचे युद्ध

## नेहरूवाद - पारतंत्र्यपूजा

नेहरू सतत १७ वर्षे भारताचे पंतप्रधान होते. एवढा काळ दुसरा कोणताही पंतप्रधान टिकला नाही. नेहरू नुसते टिकले एवढेच नव्हे, तर सरदार पटेलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कृत्यांना आळा घालू शकेल अशी कोणतीही व्यक्ती व व्यक्तिसमूह भारतात नव्हता. नेहरू जनतेत लोकप्रिय असले तरी काँग्रेस पक्षात पटेलांचे बहुमत होते हे टण्डन यांच्या निवडणुकीच्या व राजगोपालाचारी ऐवजी राजेन्द्रप्रसाद यांना राष्ट्रपती करण्यात आले त्यावेळी सिद्ध झाले. काँग्रेसमध्ये ठराव करून पटेल नेहरूंना पंतप्रधानपदावरून काढू शकले असते. काढल्यावर पुढे लोकप्रियतेच्या बळावर नेहरूंनी पटेलावर मात केली असती असा संभव आहे. पण कोणताही धोका पत्करायचा नाही या तत्त्वावर नेहरू चालत असत व त्यामुळे पटेलांच्या विरुद्ध त्यांचा हेका फार काळ टिकत नसे.

पटेलांच्या मृत्यूनंतर देखील नेहरूंनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला काँग्रेसमध्ये देखील बहुमत मिळण्यासारखे नव्हते. असे असता प्रत्येक बाबतीत स्वत:च्या मताप्रमाणे निर्णय करण्यात त्यांना कोणीही अडवू शकले नाही. कारण नेहरूंना काढावे यावर पटेलांच्या काळी काँग्रेसमध्ये बहुमत मिळण्यासारखे होते, ते पुढे शक्य राहिले नाही. नेहरूंनी देखील स्वत:च्या निर्णयाला काँग्रेसची मंजुरी मिळविण्याचा कधी

प्रयत्न केला नाही. त्यांचा जो निर्णय असेल तो स्वत:सारखेच मत असलेल्या एखाद्या मंत्र्याला विचारून नेहरू मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणून जाहीर करीत. पूर्ण मंत्रिमंडळाच्या बैठकीत बहुधा त्याचा विचार झालेलाच नसे. नेहरूंच्या कार्यशैलीचे वर्णन चिंतामणराव देशमुखांनी मंत्रिपदाचे त्यागपत्र देताना लोकसभेत केले होते. ''मुम्बईबद्दलचा निर्णय मी मंत्री असूनदेखील वर्तमानपत्रात वाचला, मंत्रिमंडळाने असा काही निर्णय घेतलाच नव्हता. मंत्रिमंडळात एक अंतर्गत वर्तुळ आहे व तेच साऱ्या मंत्रिमंडळावर आपले निर्णय लादते.'' असे देशमुखांनी सांगितले. नेहरूंना आपली मते बहुसंख्येला मान्य होण्यासारखी नाहीत हे कळत होते. पण ''ज्यांना माझे निर्णय पसंत नसतील त्यांनी माझ्यावर अविश्वासाचा ठराव आणावा'' असे नेहरू सांगत, नेहरूंचे निर्णय अमान्य करणे सोपे आहे पण नेहरूंवर अविश्वासाचा ठराव आणून तो पारित करून घेणे अशक्य आहे असे बहुतेक राजकारण्यांचे त्यावेळी मत होते.

नेहरूंच्या खालील निर्णयांपैकी कोणत्याही निर्णयाला काँग्रेसची मान्यता नव्हती व जनमत घेतले असते तर बहुमत मिळण्याचा संभव नव्हता.

१. भारताचा सर्व राज्यकारभार व शिक्षण इंग्रजीतून व्हावे. देशी भाषांना कोणत्याच सरकारमान्य क्षेत्रात स्थान असू नये. इंग्रजीच्या ऐवजी देशी भाषा वापरल्या तर आपण १८ व्या शतकातल्यासारखे मागासले होऊ. कोणत्याही देशी भाषेत आधुनिक विज्ञान मांडता येत नाही व येणार नाही. आसेतुहिमाचल भारतीयांना समजणारी व परस्पराशी बोलताना वापरता येण्यासारखी हिंदीसारखी एक भाषा असावी याची आवश्यकता नाही, कारण भारत हे एक राष्ट्रच नाही. इंग्रजी हाच आमच्या एकत्वाचा दुवा आहे.

२. काश्मीर मुस्लिम असल्यामुळे त्याला इतर कोणत्याही प्रान्ताला नसलेली स्वायत्तता असावी. हिंदू/मुसलमानांना एकच कायदा लागू नसावा. मुघल हे राष्ट्रीय राज्यकर्ते होते व त्यांना विरोध करणारे राणाप्रताप व शिवाजी हे लुटारू, निदान बंडखोर तरी होते.

३. तेलंगणात व नागभूमीत भारताविरुद्ध बंड करणाऱ्यांच्या विरुद्ध यांत्रिक बंदुका व विमाने आदी शस्त्रे वापरू नयेत. हे आदर्शवादी लोक आहेत व गरिबांच्या आपत्तींनी कळवळून त्यांच्या कल्याणासाठी क्रांति करू इच्छीत आहेत. त्यांना कायद्याने दिलेल्या सजा माफ कराव्या. त्यांच्याविरुद्ध बलप्रयोग न करता त्यांच्या प्रदेशात अधिक पैसा ओतून त्यांचा विकास करावा.

४. अयोध्या, काशी, मथुरा वगैरे ठिकाणची आक्रमकांनी उद्ध्वस्त केलेली मंदिरे पुन: वसविण्यात येऊ नयेत.



५. हिंदूचे धर्मांतर करण्यास मिशनऱ्यांना पूर्ण मुभा असावी.

६. दारूबंदी व गोवधबंदी हे गांधीसारख्या जुनाट लोकांचे खूळ आहे.

७. हिंदू/मुसलमानांना एकच कायदा लागू नसावा.

वरील सारे निर्णय नेहरूंनी अमलात आणले. यातील कोणताही निर्णय जनमतासमोर टिकणारा नाही. मुस्लिमांना मुस्लिम कायदा लागू करावा हे मत देखील हिंदू तर सोडाच, मुस्लिम स्त्रियांमध्ये इस्लामच्या स्त्रीविषयक कायद्याचे स्वरूप सांगण्यासाठी प्रचार केला तर मुस्लिम समाज देखील मान्य करील असा संभव नाही. हिंदूंची उद्ध्वस्त मंदिरे हिंदूंना परत करण्यात येऊ नयेत कारण हिंदूंची मंदिरे पाडण्याचा मुसलमानांना अधिकार आहे असे बहुसंख्य मुस्लिम म्हणण्यास तयार होतील असे वाटत नाही. गोवधबंदीबद्दल बोलण्याची जरूर नाही. दारूबंदी फार मोठ्या जनसमूहाला मान्य नाही ही समजूत चुकीची आहे. आन्ध्र व तामिळनाडू येथील सरकारे दारूबंदी उठविल्यामुळे पडली आहेत. मुस्लिम विवाह कायद्याप्रमाणेच स्त्रीसमाज एकजात दारूच्याविरुद्ध आहे व दक्षिण भारतातील स्त्रियांनी आंदोलन करून दारूची दुकाने बंद पाडली हे लोकविश्रुत आहे.

असे असून देखील नेहरूंनी वरील सर्व जनविरोधी कृत्ये बिनबोभाट केली. वरील कोणतीही गोष्ट नेहरूंच्या निवडणूक जाहीरनाम्यात सामील नव्हती व निवडणूक प्रचारात नेहरूंनी या मुद्यावर मते मागितली नव्हती. तेव्हा हे सर्व निर्णय जनताप्रिय होते असा युक्तिवाद करता येणार नाही.

नेहरू जिवंत असेपर्यं दुसऱ्या कोणाचे नाव पंतप्रधान म्हणून येण्याचा संभव नव्हता व आपल्या मृत्यूनंतरही कोणी पंतप्रधान व्हावे याची व्यवस्था नेहरूंनी केली नव्हती. असे असता नेहरूनंतर काँग्रेसने निवडलेले सारे पंतप्रधान नेहरूंची धोरणे अमलात आणणारे होते. नेहरूविरोधी समजल्या जाणाऱ्या वाजपेयी सरकारच्या धोरणावर देखील नेहरूवादाची जबरदस्त छाप होती. वाजपेयींच्या मागे भाजपाचे निर्विवाद बहुमत नव्हते हे याचे कारण नाही. खुद्द वाजपेयींना नेहरूंचे आकर्षण होते. ऑर्गनायझरचे संपादक मलकानी यांना मी ''वाजपेयींना माझे नेहरूवरील इंग्रजी पुस्तक वाचायला सांगावे.'' अशी विनंती केली तेव्हा त्यांनी मला हे सांगितले. वाजपेयींनी पंतप्रधान झाल्याबरोबर ''इंग्रजी आता भारतात दृढमूल झाली आहे.'' असे उद्‌गार काढले. त्यांनी पोपला भारतात येण्याचे आमंत्रण दिले. पोपने येथे येऊन ''हिंदूंना ख्रिस्ती करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे.'' असे सर्व देशाला बजावले. लाखो उर्दू शाळा काढण्याचा बेत त्यांनी बोलून दाखविला व गुजराथमध्ये दंगे झाल्यामुळे भाजपा हरली असा नरेंद्र मोदींवर आरोप केला.

भाजपाचे दुसरे मोठे पुढारी नानाजी देशमुख यांना नेहरूंवर टीका केलेली आवडत

नसे. नागपूर टाइम्समधील माझा नेहरूंवरील लेख वाचून त्यांनी नाक मुरडले होते.

नेहरूंनंतर नेहरूंची धोरणे आपोआप इतिहासजमा होतील अशी मला आशा होती. पण तसे काही घडले नाही.

नेहरूंनी काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात आपले विचार नमूद केले नसले तरी आपल्या सतरा वर्षांच्या कारकीर्दीत ते जवळजवळ रोजच लाखो लोकांना उद्देशून भाषणे करीत. ही भाषणे नभोवाणी व वर्तमानपत्रे यात प्रकाशित होत. नेहरूंच्या हाती सरकार व शिक्षणखाते होते. नेहरूकाळात सामाजिक विषयावरील पाठ्यपुस्तकात सर्वत्र नेहरूंचे विचार पेरलेले दिसतील. ब्रिटिश काळात शिक्षण घेतलेल्यांनी जो इतिहास वाचला त्यापेक्षा सर्वथैव वेगळा इतिहास नेहरूकाळात शिकविण्यात येऊ लागला. नभोवाणी व इतर प्रसारमाध्यमे यात नेहरूवादी विचारांचे लोक पेरले गेले. नभोवाणीला स्वायत्तता दिल्यामुळे काँग्रेसविरोधी सरकारे दिल्लीच्या सिंहासनावर बसली तरी प्रसारमाध्यमांवर नेहरूवादी विचारच येत राहिले. हे विचार केवळ चर्चातूनच नव्हे तर नाटके व मालिका यातून देखील मांडले जातात. ''भारत की खोज'' म्हणून नेहरूंच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकावर आधारलेलीशी वाटणारी एक दीर्घ मालिका बरेच वेळा दूरदर्शनवर आली. तिच्यात अकबराला विरोध करणारा राणा प्रताप प्रतिगामी व अकबराची थुकी झेलणारा मानसिंग हा पुरोगामी होता असे चित्र रेखाटले आहे. दूरदर्शनवर शिवाजीवर एक मालिका बरेच दिवस विचाराधीन आहे. तिच्यात ''शिवाजीने मुघलांचे सार्वभौमत्व मान्य केले होते असे दाखवावे नाही तर ती दाखविण्यात येणार नाही.'' असा दूरदर्शन अधिकाऱ्यांचा आग्रह आहे असे मला एका दूरदर्शन अधिकाऱ्याने सांगितले. ''स्वाभिमान'' या मालिकेत पूजा नावाची एक स्त्री इंग्रजी न बोलणारी व साडी कुंकूत राहणारी होती. तिचे बावळट म्हणून चित्रण केले आहे. ती इंग्रजी शिकून झगा घालू लागते तेव्हा ती चुणचुणीत होते असे दाखविले आहे. करिश्मा या मालिकेतील 'अग्नि' देखील आपल्या घरचे अवाढव्य व्यवसाय चालविण्यास नालायक असते. ती इंग्रजी व बालरूम नृत्य शिकते तेव्हा आपले कारखाने चालवू शकते असे दाखविले आहे. नभोवाणीवरील माझ्या एका भाषणात मी इंग्रजीचे उच्चाटन केले पाहिजे असे प्रतिपादन केले होते. नभोवाणीच्या अधिकाऱ्यांनी ''इंग्रजीचा प्रसार करणे हे नभोवाणीचे काम आहे. इंग्रजीला विरोध करणे नव्हे.'' असे मला सांगितले. सुषमा स्वराज प्रसारमंत्री असताना त्यांचा एका प्रसार कर्मचाऱ्याशी हिंदीच्या बाबतीत मतभेद झाला. त्याला काढण्यासाठी सरकारला अध्यादेश काढावा लागला.

जाहीर भाषणातून नेहरू आपले विचार मांडीत पण ते कार्यान्वित कसे करावे याबद्दल सरकारी कर्मचाऱ्यांना जो उपदेश करीत असे तो जाहीर होत नसे. संविधान



उघडपणे न झिडकाऱ्यामुळे संविधानास अनुसरून काही कारवाई करावी लागे. पण हिंदीच्या बाबतीत संविधान पूर्णपणे धुडकावून लावण्याची नेहरूंची प्रतिज्ञा असल्यामुळे त्यांनी भाषेच्या बाबतीतल्या अशा कारवाईची सूत्रे मोलाना आझाद यांच्या हाती सोपविली होती. हिंदी संबंधी शिक्षा मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांच्या सभा होत. त्यात आझाद उघडपणे हिंदी व संस्कृत यांच्याविरुद्ध सूचना देत. या सूचना संविधानविरोधी आहेत असे कुणी म्हटल्यास ते उत्तर देण्याचे टाळीत. एकदा अशाच प्रसंगी संविधानाची आठवण करून देणाऱ्या अधिकाऱ्याला नेहरू म्हणाले. "The Constitution is not sacrosanct." संविधान हा पवित्र ग्रंथ नाही.

नेहरूंच्या स्वत:च्या भाषणाव्यतिरिक्त, त्यांनी जे ग्रंथ लिहविले व ज्यांची भलावण केली त्या ग्रंथात नेहरूंचे पंतप्रधानकाळातील विचार विस्ताराने व्यक्त झाले आहेत.

१९५७ साली भारत सरकारने १८५७ च्या शताब्दीच्या निमित्ताने डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांच्याकडून १८५७ वर एक ग्रंथ लिहविला. त्यात ''मुघल बादशहा बहादूरशहा याच्या नावाने सत्तावनच्या क्रांतिवीरांनी द्वाही फिरविली होती म्हणून १८५७ चा उठाव हे स्वातंत्र्ययुद्ध ठरते असे प्रतिपादन आहे.'' वस्तुत: हा उठाव संपल्यानंतर तत्कालीन सरकारने जी चौकशी समिती नेमली होती तिच्या निष्कर्षानुसार बहुतेक पुरावा नानासाहेब पेशव्यांनी ५७ चा व्यूह रचला होता. बहादूरशहा जफरला शिपायांनी बंदुका रोखून उठावाचे नेतृत्व स्वीकारायला भाग पाडले होते व संधी सापडताच तो इंग्रजांशी संधान बांधायचा प्रयत्न करीत होता. पण नेहरूंच्या मते मुघल हेच भारताचे राष्ट्रीय राज्यकर्ते होते, पेशवे वगैरे त्यांच्या राज्यात लुटालूट करणारे उपटसुम्भ होते. त्यांनी रचलेला व्यूह हे स्वातंत्र्ययुद्ध असू शकत नाही. मुघल बादशहाचा आशीर्वाद असल्याशिवाय इंग्रजांविरुद्धच्या उठावाला स्वातंत्र्ययुद्ध म्हणता येत नाही.

दुसरा ग्रंथ ''संस्कृतिके चार अध्याय'' हा आहे. या ग्रंथात भारत आर्यपूर्व, आर्य, इस्लामी व ब्रिटिश अशा चार अध्यायांचा ग्रंथ आहे. त्यातला आर्यपूर्व हा अध्याय बहुधा अज्ञात स्वरूपाचा आहो. ज्ञात स्वरूपाचे बाकी तीनही अध्याय हे परकीय आहेत. तेव्हा भारतीय संस्कृती व राष्ट्रीयत्व हे रोपटे जातीनेच परकीय आहे व त्यातला ब्रिटिशप्रणीत भाग सर्वात महत्त्वाचा आहे असे या ग्रंथाचे सार आहे.

तिसरा ग्रंथ डॉ. ताराचंद यांच्याकडून लिहविलेला स्वराज्याच्या चळवळीचा इतिहास हा आहे. त्यात इस्लामी राज्यकर्ते हा भारतीय राष्ट्रीयत्वाचा अविभाज्य भाग आहे असं प्रतिपादले आहे.

नेहरूंच्या अशा शिकवणुकीचा परिणाम बराच टिकाऊ ठरला आहो. ज्येष्ठ

अधिकाऱ्यांच्या हाताखाली तयार झालेल्या अधिकाऱ्यांचे विचार नेहरूवादीच होत गेले. याप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांच्या पिढ्या व सुशिक्षितांच्या पिढ्या यात गेली ५० वर्षे नेहरूवाद रुजला आहे व हा विचार स्वातंत्र्याच्या चळवळीने जोपासलेल्या मूल्यांच्या व विचारांच्या दक्षिणोत्तर विरुद्ध आहे. हे वरील मुद्यात जो नेहरूवाद सांगितला आहे त्यावरून स्पष्ट व्हावे. ''इंग्रजीचे एबीसी आमच्या तोंडी येण्यापूर्वी भारत हे राष्ट्रच नव्हते. आता ते राष्ट्र होऊ घातले आहे. (nation in the making) व ते कॅनडा ऑस्ट्रेलिया वगैरे ब्रिटिश वसाहतीप्रमाणे इंग्रजी साम्राज्यांतर्गत राष्ट्र आहे. कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्यापेक्षा भारताचे वेगळेपण यात आहे की माझ्या नेतृत्वाखाली मी भारताला आधुनिक म्हणजे इंग्रजी राष्ट्र बनविणार आहे. त्याचे संवर्धन होण्यासाठी संस्कृतसह सर्व देशी भाषा नष्ट करून सर्व व्यवहार इंग्रजीत केला पाहिजे व भारताची हिंदू ही ओळख समूळ मिटविली पाहिजे. असे करण्यास मिशनऱ्यांना व कॉन्व्हेण्टशिक्षणाला उत्तेजन देणे आवश्यक आहे.'' हे या शिकवणुकीचे सार आहे.

वरील सर्व आरोप कपोलकल्पित आहेत असे ज्यांना म्हणायचे असेल त्यांनी वरील मुद्यात सांगितल्याप्रमाणे भारतीय सरकारांचे वर्तन झाले आहे की नाही हे सत्याला स्मरून सांगावे. पंतप्रधान झाल्यावरची नेहरूंची सर्व भाषणे एका ठिकाणी उपलब्ध नाहीत. पण संविधानसमिती व लोकसभा यात केलेली भाषणे या संस्थांच्या प्रतिवृत्तात उपलब्ध आहेत. तसेच पुस्तकात वर्णिलेल्या घटना घडण्याच्या काळातील कोणतेही वर्तमानपत्र चाळले तर माझ्या विधानांची पुष्टी होईल. गोपाल व अकबर यांनी लिहिलेली नेहरूमाहात्म्ये वाचली तरी माझे प्रतिपादन साधार आहे याची खात्री पटण्यास प्रत्यवाय असू नये.

स्वराज्य मिळाल्यापासून या ओळी लिहिपर्यंत ५७ वर्षांचा काळ लोटलेला आहे. ५७ वर्षे हा राष्ट्राच्या इतिहासातला लहान काळ नाही. अखिल भारतावर इंग्रजांची सत्ता केवळ ९० वर्षांची होती. असे असता इंग्रजी भाषा व इंग्रजी राज्य या व्यतिरिक्त भारताची कल्पना आज बहुव्हंश भारतीयांना करता येत नाही. त्यामुळे ५७ वर्षे ज्या व्यक्तीचा प्रभाव भारतावर राहिलेला आहे व जो पुसून निघण्याची काहीही चिन्हे दिसत नाहीत ते नेहरू आधुनिक भारताचे निर्माते होते हे वर्णन यथार्थ समजण्यास हरकत नाही. अर्थात आधुनिक भारताचे मूल्यमापन हे नेहरूंचे मूल्यमापन आहे. तेव्हा पुढील पृष्ठात आधुनिक भारताचे मूल्यमापन करून ते घडविण्यास नेहरूंनी काय केले याचा मागोवा घेऊ. आधुनिक भारतात अभिमान बाळगण्यासारखे काही आहे काय याचा त्यावरून बोध होईल व नेहरूंच्या कार्याचे मूल्यमापन आपोआपच होईल.

■■■





# विज्ञानाच्या क्षेत्रात

नेहरूंचे स्तुतिकार नेहरूंनी भारतात विज्ञानाचे संवर्धन केले असा दावा सांगतात. पण नेहरूनिर्मित भारताने विज्ञानाच्या क्षेत्रात अभिमानाने सांगता येईल अशी कोणती कामगिरी केली? नेहरूंच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी माहिती तंत्रकारांनी जगातील देशांची विज्ञानाच्या क्षेत्रात क्रमवारी लावली आहे. विज्ञानावर होणारा खर्च व विज्ञानावर उपजीविका करणाऱ्यांची संख्या यात भारताचा क्रमांक जगात चौथा आहे. विज्ञानात झालेल्या कामाचा राशी किती शोधनिबंध लिहिले गेले यावरून लावल्यास भारताचा क्रमांक ११ वा येतो व या कामाची इतर वैज्ञानिकांनी ठरविलेली गुणवत्ता लक्षात घेतली तर भारताचा क्रमांक ७० वा जवळ जवळ शेवटचा ठरतो.

आजकाल माहिती तंत्रज्ञानात भारताने फार प्रगती केली आहे असा दावा रोज ऐकू येतो. पण माहिती तंत्रज्ञानात देखील जगातील ५५ देशाचा क्रमांक लावण्यात आला आहे. त्यात भारताचा क्रमांक ५४ व पाकिस्तानचा ५५ वा आहे. शेवटून दुसरा क्रमांक असणे ही मोठी भूषणावह गोष्ट नाही. आपण पाकिस्तानच्या वर आहोत हे ऐकूनच पुष्कळांची छाती वर येते. एवढ्यावरून भारतीय सुशिक्षितांची केविलवाणी स्थिति लक्षात यावी.

संगणक क्षेत्रात काम करणाऱ्या आमच्या वैज्ञानिकांचे उत्पन्न बरेच आहे. पण अमेरिकेत काम करणाऱ्या वैज्ञानिकांचे उत्पन्न हे भारताचे उत्पन्न समजता येणार नाही.

यातील जो भाग ते भारतात पाठवीत असतील तोच भारताच्या उत्पन्नात समाविष्ट करण्यास येऊ शकतो. शिवाय यापैकी पुष्कळसे उत्पन्न हे वैज्ञानिक कामाचे उत्पन्न नसून कारकुनी कामाचे आहे. अमेरिकेतील डॉक्टर आपल्या व्याधितांशी जे बोलतात ते लेखनिविष्ट असण्याची त्यांना जरूर वाटते. पण अमेरिकेत हे काम महागात पडते कारण तेथे कारकुनी कामाचे वेतन बरेच जास्त आहे. पण संगणकाच्या जमान्यात स्वस्त मजूर बाहेरून आणावे लागत नाहीत. ते ज्या देशात राहतात तेथेच त्यांचे काम त्यांना पाठवता येते व ते झाल्यावर त्यांचे फलित परत देखील आणता येऊ शकते. अमेरिकन डॉक्टर जे बोलतात त्यावर ध्वनिफीत यार करतात व ही ध्वनिफीत भारतात पाठवितात. तिच्यावरून येथले संगणक कारकून ते संगणकात टंकित करतात. संगणकात असलेल्या दूरप्रेषण व्यवस्थेने ते परत अमेरिकेत पाठवले जाते. या पाठवण्यातला एक क्षण देखील पुरतो. जे काम याप्रमाणे क्षणार्धात हजारो मैल दूर असलेल्या देशात पाठविता येत नाही ते करण्यासाठी अमेरिकेसारखा देश आपले कारखानेच भारतात काढतात. कारण येथले माहिती तंत्रज्ञानातील श्रमिक एवढे स्वस्त आहेत की दूर कारखाने काढण्याचा खर्च जमेस धरुन देखील हा व्यवहार फायद्याचाच ठरतो.

पण संगणकक्षेत्रात आपल्या लोकांना रोजी मिळते हे वैज्ञानिक प्रगतीचे लक्षण नाही. देशात रोगोपचार करून उपजीविका करणारे लाखो डॉक्टर आहेत यावरून आयुर्विज्ञानात भारताची फार प्रगती झाली आहे असे अनुमान निघत नाही. कारण हे डॉक्टर जे काम करतात ते दैनंदिन स्वरुपाचे आहे. ते आयुर्विज्ञानात कोणाताही शोध लावीत नसतात. त्याचप्रमाणे संगणक क्षेत्रात काम करणारे भारतीय वैज्ञानिक काम करीत असले तरी ते दैनंदिन स्वरुपाचे आहे. त्याला नवनिर्मिती म्हणता येणार नाही.

भारताने नवा संगणक निर्माण केला असे नेहमी सांगण्यात येते. पण असा संगणक अमेरिकेत नव्हता व नाही अशातला भाग नाही. अमेरिकेने तो देण्यास नकार दिला असताना भारतीय वैज्ञानिकांनी तो स्वतःच्या बळावर निर्माण केला ही यात अभिमानाची गोष्ट आहे. पण ही नवनिर्मिति नाही. आम्ही अमेरिकेचा विरोध असताना अणुगोल व उदजनगोल केले यासारखी ही उपलब्धी आहे. आम्ही हे करण्याच्या ३६ वर्षे आधी चीनने अणुगोल व उदजनगोल केले होते. पाकिस्तानने देखील अणुगोल आमच्या आधीन केला.

संगणकक्षेत्रातील प्रगती मापताना खालील गोष्टींचा विचार केला जातो. १. दूरप्रेक्षा व दूरभाष यांचे जाळे, २. अतिथी संगणक व आतिथेय संगणक. पाहूणचार करणारा संगणक माहितीचा स्रोत असतो. उलट अतिथी संगणक हा माहिती घेण्याचे काम करीत असतो. माहिती देणारे ८७ टक्के संगणक अमेरिकेत आहेत. भारतात बहुधा



माहिती घेणारे संगणक आहेत. म्हणजे बाहेरच्या देशातून येणारे ज्ञान ग्रहण करण्याचे काम मुख्यत्वे: आम्ही करतो. पुरविण्याचे नव्हे. एकूण सर्व ज्ञानाचा स्रोत भारताबाहेर आहे त्याचप्रमाणे संगणकीय माहितीचा स्रोतही भारताबाहेरच आहे. हे प्रगतीचे लक्षण नसून मागासलेपणाचे लक्षण आहे. (Indian Express 17/4/2000)

नेहरूंनी भारतात विज्ञानाची वाढ व्हावी म्हणून प्रयत्न केला पण त्या प्रयत्नांचे स्वरूप पाहता अशा प्रयत्नांनी विज्ञानाची वाढ होऊ शकत नाही हे कोणत्याही राज्यकर्त्याला कळण्यासारखे होते. विज्ञानाचे काम करणाऱ्या संस्थांना एक परिपत्रक काढून "विज्ञानाची वाढ करायची असल्यामुळे तुमच्या खात्यात काय वाढ करायला हवी ते सुचवा." असे विचारण्यात आले. बहुतेक विज्ञानसंस्थांत काम करणाऱ्या वैज्ञानिकांचे नेमून दिलेले काम देखील फारसे वेगात आले नव्हते, अमुक दिशेने काम केल्याने सफलता मिळेल व त्यासाठी अमुक सोयी लागतील एवढे कळायलाही कामाचे स्वरूप पुष्कळच पुढे जाणे आवश्यक असते. तसे असते तर वैज्ञानिकांनी अमुक अमुक सोयी पाहिजे अशी स्वत: मागणी केली असती. तशी मागणी नसताना सुधारलेल्या देशात विज्ञानावर इतका भाग खर्च होतो. त्याच्या जवळपास आपण खर्च केला नाही तर आपण सुधारलेले न ठरता इतर काँग्रेसजनांप्रमाणेच "गोबरसंस्कृतीचे" ठरू ही नेहरूंच्या विचारांची दिशा होती. सुधारलेल्या देशांच्या इतका पैसा विज्ञानावर खर्च करायला भारताचे सारे उत्पन्न देखील पुरे पडले नसते. तरी आहे त्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग विज्ञानावर खर्च करावा म्हणजे भारत विज्ञानात प्रगत होईल असे नेहरूंना वाटत होते.

"विस्ताराच्या योजना द्या" असे परिपत्रक आल्यावर "आतापासूनच काल्पनिक विस्ताराची योजना देण्यापेक्षा काम जसजसे वाढत जाईल तसतशी अधिक सोयींची मागणी करीत जाऊ म्हणजे कोणत्याही सोयी वाया जाणार नाहीत." असे उत्तर देण्याचे काही वैज्ञानिकांनी ठरविले. पण याला ते त्यांच्या कार्यालयातून बाहेर पडण्यापूर्वीच जबरदस्त विरोध झाला. "असे लिहिणे म्हणजे आपले काम अजून सुरूच झाले नाही असे सांगण्यासारखे आहे व असे उत्तर वाचून सरकार ते देणाऱ्याला नालायक समजेल. ही तरुण वैज्ञानिकांना चांगल्या नोकऱ्या मिळण्याची संधी आहे. ती घालवली तर या तरुणांच्या नाराजीस आपण पात्र होऊ, या हुशार तरुणांना आपण नोकऱ्या दिल्या तर देशाचा पैसा वाया थोडाच जाणार आहे? ते काहीतरी करतीलच" असा युक्तिवाद करण्यात आला व तो बहुतेकांना पटला.

झाले विस्ताराच्या मोठमोठ्या योजना मांडण्यात आल्या. त्या सर्वांना सरकारजवळ पैसा नव्हता. पण जेवढा शक्य तेवढा नेहरूंनी उपलब्ध केला. टोलेजंग

प्रयोगशाळांच्या इमारती उभ्या झाल्या. या इमारती जवळपास फिरकणाऱ्या कोणाच्याही नजरेतून सुटण्यासारख्या नव्हत्या. मी दिल्लीची नवीनच बांधलेली राष्ट्रीय भौतिकी प्रयोगशाळा पाहिली. तेव्हा भारताचे वैज्ञानिक भवितव्य उज्ज्वल आहे असे मला वाटले. कारण एवढी मोठी केवळ भोतिकीला वाहिलेली प्रयोगशाळा मी ऑक्स्फर्डमध्ये देखील पाहिली नव्हती. रामन ज्यावेळी ही प्रयोगशाळा पाहण्यास आले तेव्हा म्हणाले, ''तेजातूचा शोध एका झोपडीत लागला होता. या महालात त्यापेक्षाही मोठे शोध लागावेत अशी अपेक्षा आहे.''

वैज्ञानिक कर्मचाऱ्यांची संख्या व विज्ञानावर होणारा खर्च यात भारताचा क्रमांक जगात चौथा कसा आला हे यावरून कळून येईल. अशा प्रयोगशाळा देशभर अनेक ठिकाणी स्थापण्यात आल्या. त्या लक्षावधी भारतीयांनी पाहिल्या व नेहरू हे भारतात विज्ञानाची गंगा आणणारे भगीरथ आहेत याबद्दल सर्वांची खात्री पटली.

पण या महालातून तेजातू निघणे तर दूरच जगातील वैज्ञानिकांना मोलाचे वाटतील असे शोधनिबंधही फारसे निघाले नाहीत. या शोधनिबंधाचा दर्जा आम्हाला ७० वा क्रमांक देण्याच्या लायकीचेच होते.

''सुधारलेल्या देशात विज्ञानावर इतका पैसा खर्च होतो. आपल्या देशात याच्या तुलनेने काहीच नाही.'' असे सांगणाऱ्या वैज्ञानिकांना नेहरूंनी विचारले नाही की ''मी सुधारलेल्या देशांइतका नाही पण इतका पैसा विज्ञानासाठी खर्च करू शकतो. त्याचा विनियोग कसा करावा याची योजना द्या.'' अशी मागणी केली असती व सुचविलेल्या योजनांची मोठमोठ्या वैज्ञानिकांकडून छाननी करविली असती तर काही चांगल्या योजना निश्चितपणेच पुढे आल्या असत्या. पण असे काही केले असते तर एखादी योजना सर्वसम्मत होऊन कार्यान्वित व्हायला निदान दोनतीन वर्षे तरी लागली असती. पण नेहरूंना जागतिक कीर्ती मिळविण्याची हाव होती व जे काम प्रदर्शनीय नाही ते करण्यात स्वारस्य वाटत नव्हते. ''ठिकठिकाणच्या टोलेजंग प्रयोगशाळा केवळ वैज्ञानिकच नव्हेत, प्रवासीदेखील पाहतील व एक ताजमहाल बांधल्याने शहाजहानची जी कीर्ती झाली त्याच्या अनेक पटींनी जास्त आपली जगात कीर्ती होईल.'' असे नेहरूंना वाटत होते. झटपट आंतरराष्ट्रीय कीर्तीची हाव हा नेहरूंच्या चारित्र्याचा एक कच्चा दुवा व राष्ट्रावर त्यांनी आणलेल्या आपत्तींचे प्रमुख कारण होते.

राष्ट्रीय प्रयोगशाळांतील कोणकोणती सामग्री वापरली गेली याची चौकशी झाली तर पुष्कळशी कायमची अलमाऱ्यातच बंद राहिली असे आढळून येईल असे मला ज्या थोड्या खात्यांचा अनुभव आहे त्यावरून वाटते.



साऱ्या स्वराज्यकाळामध्ये या टोलेजंग प्रयोगशाळांतून एक सूर्यचूल तयार झाली होती. अणुभौतिकीचा कार्यक्रम ५० सालाच्या आसपासच सुरू झाला होता. पण प्रत्यक्ष अणुस्फोट १९९९ साली झाला. अणुबॉम्ब आधीच तयार होता पण आंतरराष्ट्रीय दबावाच्या भीतीने आम्ही तो जाहीर केला नाही, असे म्हणता येणार नाही. अणुशक्तीचे शांततामय उपयोग तरी आम्ही एवढ्या सर्व काळात कोणते करून दाखविले? जितका खर्च झाला तितक्या मोलाचा तरी या प्रयोगशाळांचा उपयोग झाला काय? नेहरूंच्या कन्या इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान झाल्यावर एका सायन्स काँग्रेसमध्ये स्पष्टच सांगितले की, ''माझ्या पिताश्रींनी विज्ञानावर जो वारेमाप खर्च केला तो सर्व वाया गेला. यात जे विदेशी चलन खर्च झाले त्याच्या मूल्याइतकेही काम वैज्ञानिकांनी केले नाही.''

अणुविज्ञानाच्या बाबतीत भारत व चीन यांची तुलना उद्‌बोधक होईल. चीनने सुरूवातीला अणुकार्यक्रमाला आपला सहकम्युनिस्ट रशिया याच्याकडून मदत मागितली. पण रशियाने तोंडास पाने पुसली. तेव्हा रशियाच काय कोणत्याच राष्ट्राकडून मदत मागायची नाही या निर्धाराने स्वतःच्या बळावर उभे राहून चीनने १९६३ साली म्हणजे भारताच्या तब्बल ३६ वर्षे पूर्वी अणुगोल व उदजनगोल केले.

या उलट आम्हाला कॅनडाने प्रतिकारक दिला, अमेरिकेने गुरुजल दिले तरी आम्ही आण्विक इंधन करू शकलो नाही. ''१९७२ साली पोखरणमध्ये इंदिरा गांधींनी अणुस्फोट करविला तेव्हाच आमचा अणुबॉम्ब तयार होता.'' अशी शेखी मिरविण्यात येते. पण या स्फोटाबद्दल अमेरिकेने नाराजी दर्शविली तेव्हा अमेरिकन अध्यक्ष कार्टर यांना एका भारतीय पत्रकाराने विचारले. ''चीनने अणुस्फोटच नव्हे तर उदजनस्फोटही केला. तुम्ही त्याबद्दल काही बोलत नाही आणि भारताच्या एका स्फोटावर मात्र आकाशपाताळ एक करता.'' त्यावर कार्टर म्हणाले. ''चीनने आमचे इंधन वापरले नव्हते.'' यानंतर अमेरिकेने गुरुजल देणे बंद केले. त्यामुळे तारापोरचा कारखाना अनेक वर्षे बंद होता.

चीन व भारत ही मानसिक दास्य व मानसिक स्वातंत्र्य यांची स्पष्ट उदाहरणे आहेत हे यावरून दिसत नाही काय?

नेहरूंच्या धोरणांनी विज्ञानाचे व वैज्ञानिक वृत्तीचे संवर्धन होण्याची शक्यताच नव्हती असे प्रतिपादन करणारा एक भाग माझ्या नेहरूविषयक इंग्रजी पुस्तकात होता. त्यात स्वभाषांचा त्याग करणारा देश विज्ञानात काय कोणत्याच क्षेत्रात प्रगती करू शकणार नाही असा मुद्दा मांडला होता. तो त्या पुस्तकाच्या प्रकाशकांना इतका न पटण्यासारखा वाटला की तो त्यांनी मला न विचारता गाळूनच टाकला. तो महत्त्वाचा आहे म्हणून मी खाली तो सादर करीत आहे.

''भाषेचा प्रश्न केवळ भावनात्मक आहे. देशासमोर उपासमारीचा, दहशतवादाचा वगैरे अनेक ज्वलंत प्रश्न असताना भाषेसारखा केवळ भावनात्मक प्रश्न उपस्थित करणे बरोबर नाही.'' असा स्वभाषेच्या समर्थकाविरुद्ध आक्षेप घेतला जातो, यावर माझा प्रतिप्रश्न असा. ''स्वभाषाच्या उपयोगाची मागणी करणे भावनाप्रेरित आहे व इंग्रजीची मागणी करणे भावनाप्रेरित नाही काय? आपल्या भाषांच्या जागी इंग्रजीचा वापर करावा या मताला भावनेशिवाय कोणताही सुबुद्ध आधार नाही. ''आपल्या तोंडी इंग्रजी आल्याने लोक आपल्याला इंग्रज समजतील व जगात आपली प्रतिष्ठा वाढेल. आम्ही गावंढळ, काला आदमी, आई-बाबा नसून डॅडी-मम्मी असलेले साहेब आहोत.'' ही निर्बुद्ध भावना आपल्याला डॅडी-मम्मी म्हटलेले ऐकून उत्पन्न होते हे इंग्रजीच्या आकर्षणाचे मूळ आहे.

विज्ञानावर पैसा खर्च केल्याने व वैज्ञानिकांच्या चांगल्या स्तरावरील उदरनिर्वाहाची सोय केल्याने वैज्ञानिकांची संख्या वाढेल, पण याला वैज्ञानिक प्रगती म्हणत नाहीत. वैज्ञानिकांची संख्या वाढली म्हणजे विज्ञानाच्या उच्चतम पुस्तकात काय लिहिले आहे ते समजून दुसऱ्याला समजावून सांगणाऱ्या लोकांची देशातील संख्या वाढली. हे प्रगत विज्ञान वापरण्याइतकी देशाची प्रगती झाली नसेल तर हे वैज्ञानिक बेकार राहतील व त्यांना पोसण्यासाठी समाजाचे धन अनुत्पादक रीतीने खर्च होईल. देशात संगणकच नसले तर संगणकतज्ज्ञ बेकार राहतील. भारतातील संगणकतज्ज्ञांना भारतात काम मिळत नाही म्हणून ते अमेरिकेत जातात. अमेरिकेने भारतातही आपले कारखाने उघडून भारतीयांना नोकऱ्या देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. पण अशा तऱ्हेने वैज्ञानिकांना काम मिळाले तर त्या कामाचा लाभ मुख्यत: परकीय कंपन्यांना होतो. त्या भारतात काम करोत की अमेरिकेत त्यांचा नफा अमेरिकेलाच मिळतो. अशाने संगणकतज्ज्ञ बेकार राहण्याचे वाचते पण दैनंदिन कामाच्या स्वरूपापेक्षा अधिक महत्त्वाचे त्यांचे काम नसते. ते वैज्ञानिक म्हणवत असले तरी वस्तुत: ते कुशल कारागीर आहेत. वैज्ञानिक प्रगतीचा मुख्य निकष मौलिकता म्हणजे जे जगात कुणालाच माहीत नाही असे काहीतरी शोधून काढणे. असे करता येण्यास पुस्तकात काय लिहिले आहे सांगता येण्यासाठी ज्या पोपटपंचीची जरूर आहे ती पुरेशी नाही. स्वत: नव्या वाटा शोधू शकणारा विचार करता आला पाहिजे. असे करण्यासाठी स्वत:च्या बुद्धीवर विश्वास पाहिजे. स्वत:च्या बुद्धीवर वा इतर कोणत्याही क्षमतेवर विश्वास असण्यासाठी स्वत:च्या क्षमतांची जाणीव करून देणारे शिक्षण असले पाहिजे. लहानपणापासून ''मी काय, माझे आईबाप काय किंवा माझा समाज काय, सारेच नालायक आहेत. सुधारलेल्या देशांचे अनुकरण करण्याइतकीच आमची लायकी आहे.''



असे संस्कार मनावर झाले असतील तर जन्मजात बुद्धी असूनही तिचा उपयोग करता येणार नाही. ''शूरोसि कृतविद्योसि दर्शनीयोसि पुत्रक । यस्मिन्कुले प्रसूतोसि गजस्तत्र न हन्यते''॥ ''हे मुला, तू शूर आहेस, शिकलेला आहेस, देखणा आहे, पण हत्ती मारण्याची महत्त्वाकांक्षा धरू नकोस कारण ज्या कुलात तुझा जन्म झाला आहे त्या कुलातल्या लोकांच्या कुवतीचे हे काम नाही.'' असे एक कोल्हीण आपल्या पिलाला सांगते. स्वराज्यांत्तरच्या कालात आमच्या मुलांना हेच सांगण्यात आले आहे. ''मुलांनो, दुर्दैवाने तुमचा जन्म हिन्दू म्हणून झालेला आहे. सदैव सगळ्यांच्या लाथा खाणे हाच हिन्दूंचा इतिहास आहे. तेव्हा आपण हिंदू आहोत ही लाजिरवाणी बाबा विसरा. जे काही हिंदू आहे ते विसरा. यात भाषा व धर्म ही मुख्य आहेत. अडाण्यासारखे ''अरे देवा'', म्हणू नका, ''ओ ख्राइस्ट'' म्हणा. इंग्रजीच आपली भाषा आहे असे समजू लागा. श्रेष्ठाची भाषा आत्मसात केली तर श्रेष्ठाचे काहीतरी गुण अंगी येतील. इंग्रजी सोडून स्वाभिमान वगैरेंच्या निर्बुद्ध गोष्टी कराल तर हजारो वर्षे जे झाले तेच होईल. आपल्या अडाणी भाषांमध्ये विज्ञानाचे ग्रंथ लिहिणे शक्यच नाही त्यासाठी साहेबाचीच भाषा पाहिजे. ही भाषा वापरल्याने बुद्धी प्रगल्भ होते.''

रोमन साम्राज्यात गुलामांची पद्धत होती. गुलामांच्या गळ्यात एक लाकडी चाक बसवीत. हे चाक गुलामीतून मुक्ती मिळाल्याशिवाय काढले जात नसे. या चाकाची गुलामांना इतकी सवय होई की गुलामीतून मुक्त झाल्यावर देखील ते चाक आपल्या गळ्यातून काढले जाऊ नये, अशी विनंती करीत. ही विनंती अर्थातच ऐकली जात नसे. पण ते गुलाम स्वत: होऊनच तसले चाक आपल्या गळ्यात बसवून घेत. ते चाक गळ्यात नसले तर आपण असहाय होऊ असे त्यांना वाटे. इंग्रजी हे असेच भारतीयांच्या गळ्यात घातलेले गुलामीचे चाक आहे. इंग्रजांनी ते काढले पण ते आम्ही स्वत: पुन: घालून घेतले. कारण हे लोढणे गळ्यात नसेल तर आपण अनाथ होऊ असे संस्कार नेहरूंनी व कॉन्व्हेंट शिक्षणाने आमच्यावर केले आहेत.

Agorophbia म्हणजे उघड्यावर जाण्याची भीती हा एक मनोरुग्णतेचा प्रकार आहे. त्यात व्याधिताला उघड्यावर जाण्याची भीती वाटते व घराबाहेर जायचे तर कुणाच्या तरी साहाय्यानेच जावे लागते. एकटा गेला तर तो गुदमरून बेशुद्ध पडतो. वस्तुत: या रुग्णाच्या पायांना व श्वासयंत्रणेला काहीच झालेले नसते.

ज्या मनावर ''तुम्ही नालायक'', ''तुम्ही गुलाम'' असे संस्कार पिढ्यानपिढ्या झालेले आहेत त्यांच्यात क्षमता असल्या तरी त्या प्रकटच होऊ शकत नाहीत.

नेहरूप्रणीत स्वराज्यात असेच संस्कार भारतीय जनतेवर झालेले नाहीत काय?

''राज्य करणे हे तुमचे काम नव्हे. या देशात चांगली राज्ये जी झाली ती सर्व परकीय आक्रमकांची होती. लढायचे असेल तर परकीय सरकारच्या सैन्यात नोकरी करून त्यांच्या नेतृत्वाखाली लढा. आपली शस्त्रास्त्रे आपलेच सेनापती व आपले शिपाई असे सैन्य उभारून लढाई करू जाल जर मार खाल, हे तुमचे काम नव्हे, ते इंग्रजांचे काम आहे. विज्ञान हे तर आमचे क्षेत्र नव्हेच, आमच्या भाषा विज्ञानाचे शिक्षण देण्यास वा विज्ञानाचे विचार-व्यक्त करण्यास देखील नालायक आहेत व कधीच लायक होणार नाहीत. आपण इंग्रजीलाच आपली भाषा समजून वागलो तर विज्ञानाचे र, ट, फ, तरी आपल्याला येईल नाहीतर वन्य जमातीप्रमाणेच आमची स्थिती होईल. आमच्या भाषा राज्य कारभाराला नालायक आहेत कारण राज्य करणे हे आमचे काम नव्हे, ते मुघल/इंग्रज यासारख्या परकीयांचे काम आहे.'' असे संस्कार ज्या मुलावर लहानपणापासून झालेले आहेत, त्याच्यात विज्ञानात नवीन वाटा शोधण्याचा आत्मविश्वास निर्माण होईलच कसा? आपल्यासमोर आपल्या भाषा उच्चतम विज्ञानाची अभिव्यक्ती करण्यास सक्षम झालेल्या त्याने पाहिल्या व त्या तशा करण्यास हातभार लावला तरच त्याचा आत्मविश्वास वाढेल. आमच्या भाषा नालायक आहेत व कधीच नालायक होऊ शकणार नाहीत, असे जो मानतो तो केवळ आपल्या भाषांनाच नव्हे तर आपले पूर्वज व आपले वंशज या दोघावरही कायमच्या नालायकीचा शिक्का मारीत असतो. आमच्या भाषा नालायक आहेत असे म्हणणे व आम्ही नालायक आहोत असे म्हणणे यात फारसा फरक नाही.

''इंग्रजीची पोपटपंची करून बुद्धी प्रगल्भ झाली नाही, विज्ञानात कोणी दिवे लावले नाहीत एवढेच नव्हे तर स्वभाषात विज्ञानाची पाठ्यपुस्तके लिहिणे हा समुद्रात बादलीभर पाणी टाकण्यासारखा व्यर्थ खटाटोप आहे.'' असे म्हणणाऱ्यांना इंग्रजीत पाठ्यपुस्तक लिहिण्याची अक्कल देखील आली नाही. मराठीत विज्ञान लिहिण्यात परिभाषेच्या संदर्भात जो स्वतंत्र विचार करावा लागला असता तो करण्याची क्षमता येणे तर दूरच. पुढे इंग्रजी प्रकाशकांनी आपल्या ग्रंथांवरील मालकी हक्काची जाणीव करून योग्य तो मोबदला मिळाल्याशिवाय आपल्या ग्रंथांचा भारतात वापर करण्यास मनाई केली तेव्हा ''अशाने आमच्या विज्ञानशिक्षणाची दुर्दशा होईल.'' असे आमच्या शिक्षणतज्ज्ञांनी रडगाणे गाण्यास सुरुवात केली.

भाषा हे समाजाचे अविभाज्य अंग आहे. ''कोणत्याही एका समाजाची भाषा ही दुसऱ्या एखाद्या समाजाची भाषा होऊ शकते.'' असे एकही उदाहरण साऱ्या इतिहासात नाही. अरबस्तान पासून आग्नेय आशियापर्यंत आपला धर्म टाकून राजकीय



सत्तेच्या प्रभावाने नवीन धर्म स्वीकारणारे १०७ कोटी मुसलमान आहेत. पण यापैकी कोणाचीही स्वत:ची भाषा नष्ट होऊन त्याची जागा अरबी भाषेने घेतली नाही. बांगलादेशाला त्याने सोडलेल्या हिंदू धर्माचे प्रेम नाही, एवढेच नव्हे तर त्याबद्दल घृणा आहे. पण त्याची अस्मिता ही बंगालीच राहिली आहे. तिची जागा अरबीला वा इंग्रजीला घेता आली नाही.

आफ्रिकेतील काही लोकांनी आपली भाषा सोडून इंग्रजीला आपली भाषा करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या तोंडी इंग्रजी इतकी बदलली की ती इंग्रजाला कळू शकत नाही. तिचे पिजन इंग्लिश असे वेगळेच नाव पडले. पिजन इंग्लिश वापरणाऱ्यांना इंग्रजांचे इंग्रजी समजणार नाही. तात्पर्य भाषेचे प्रत्यारोपण होऊ शकत नाही. महाराष्ट्रातले काही लोक इंग्लंडमध्येच स्थायिक झाले तर त्यांची भाषा मराठीऐवजी इंग्रजी होईल. पण सारा महाराष्ट्र, महाराष्ट्र सोडून इंग्लंडमध्ये राहू शकत नाही. तसे झाले तर मराठीमाणूस इंग्रजीभाषी होण्याऐवजी इंग्रजी मुलेच मराठी बोलू लागतील. इंग्लंडच्या काही भागात इतके पंजाबी झाले आहेत की इंग्रज मुलेच पंजाबी बोलू लागली आहेत. तात्पर्य कितीही ''कॉन्व्हेन्ट कल्चर'' वाढविले तर मराठीपासून महाराष्ट्राची सुटका नाही व मराठी नालायक असेल तर महाराष्ट्रच नालायक आहे व ही नालायकी कधीच नष्ट होण्यासारखी नाही असे मानावे लागेल.

देशी भाषावरील या नालायकीच्या आरोपात जराही तथ्य असते तर गेल्या ५० वर्षात देशी भाषा नष्ट करण्यासाठी जे नेहरूवादी प्रयास झाले त्यातून काही बरे होण्याचा संभव होता. पण देशी भाषावरील नालायकीच्या आरोपात व इंग्रजी भाषेच्या स्तुतिपाठात काडीचेही सत्य नाही. वस्तुत: विज्ञानाचा भाषेशी काही संबंध नाही. न्यूटनचे भाषांतर जगातील कोणत्याही भाषेत होऊ शकते व इंग्रजी वा लॅटिन आल्याशिवाय न्यूटन कळणार नाही असे कोणत्याही वैज्ञानिकाला वाटत नाही. उलट इंग्रजी न आले तर शेक्सपीअरचे मर्म कळू शकणार नाही हे निर्विवाद आहे. भाषेचे खरे महत्त्व साहित्यात आहे. विज्ञानात नव्हे. जगातील शेकडो भाषात विज्ञान व्यक्त करण्याचे प्रयोग झाले. त्यातल्या अमुक भाषेत विज्ञान व्यक्त होऊ शकले नाही असे ऐकिवांत नाही. रशियामध्ये चौदा भाषा आहेत. त्या सर्वात विज्ञान शिकविले जाते. रशियातील सर्व लोक रशियन भाषेत विज्ञान शिकतात ही समजूत चुकीची आहे. जगातल्या सगळ्याच भाषांना जे साधले ते मराठीला साधणार नाही, असे म्हणणारे लोक गुलामगिरीने अंध झालेले आहेत.

जगातील ४० टक्के वैज्ञानिक वाङमय इंग्रजीत उपलब्ध आहे असे सांगतात. पण ही गोष्ट पहिल्या महायुद्धानंतर घडलेली आहे. त्यापूर्वी फ्रेंच व जर्मन भाषात इंग्रजीपेक्षा

अधिक वैज्ञानिक वाङमय होते. म्हणजे ही प्रत्यही बदलणारी गोष्ट आहे. तिच्यावरून आपण आपल्या शिक्षणाचे स्वरूप ठरवू शकत नाही. हे स्वरूप बदलणारे असल्यामुळे एकट्या इंग्रजीवरच भर न देता जगातली कोणतीही भाषा असो ती जाणणारे निदान हजारदोन हजार तरी लोक भारतात असले पाहिजेत अशा हेतूने भाषांचे शिक्षण आखले पाहिजे.

दुसरी गोष्ट केवळ विज्ञानाच्या ज्ञानासाठीच भाषा शिकण्याची जरूर असते असे नाही. महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्माचा प्रचार करणाऱ्या लोकांना मराठी येणे आवश्यक आहे म्हणून ऑक्स्फर्ड मध्ये मराठी देखील शिकविले जात असे. जिचा आपल्याला उपयोगच नाही अशी भाषाच जगात नाही. आपल्याला आयुष्यात काय करायचे आहे यावर कोणत्या भाषेचा आपल्याला उपयोग आहे हे ठरत असते. यच्चयावत सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकायला लावणे हा पैशाचा व वेळेचा व्यर्थ अपव्यय आहे. सरकारी कामात व शिक्षणात सर्वत्र स्वभाषा वापरल्या गेल्या तर ज्यांना संशोधनात जन्म घालवायचा आहे अशा लोकांखेरीज कुणाला इंग्रजी शिकण्याची जरूर नाही व त्यांना देखील इंग्रजी शिकलेच पाहिजे असे नाही. कोणती तरी एक जागतिक भाषा शिकल्याने काम भागण्यासारखे आहे.

ज्याची उपयोगिता इतकी निम्न दर्जाची आहे त्या इंग्रजी शिक्षणावर गेली पन्नास वर्षे देशाची सारी शैक्षणिक साधने खर्च होत आहेत. पण केवळ अनावश्यक खर्च एवढेच याचे स्वरूप नाही. त्याचा परिणाम भारताचे सारे भविष्य अंधकारमय करण्यात झाला आहे. आपण व आपले राष्ट्र नालायक आहे अशी भावना या शिक्षणाने राष्ट्राच्या नागरिकात रुजली आहे. ही भावना ज्या राष्ट्रात रुजली त्या राष्ट्राला काही भवितव्य असू शकत नाही.

राष्ट्रांच्या उत्कर्षापकर्षाचा इतिहास पाहता असे दिसून येईल की कोणतेही राष्ट्र कायमचे वैभवशाली वा कायमचे दैन्यशाली राहिलेले नाही. १९व्या व विसाव्या शतकात ज्या ब्रिटनची जगाची सम्राज्ञी म्हणून कीर्ती होती त्याच ब्रिटनवर शेकडो वर्षे रोमन व फ्रेंच लोकांनी राज्य केले होते. ब्रिटनच्या भरभराटीचा इतिहास सुमारे ५०० वर्षांचा आहे. ज्या रोमचे जगभर साम्राज्य होते त्या रोमची गेल्या सहस्रकांतील दशा दयनीय होती व रोमचे वारसदार जे इटली ते पारतंत्र्यात रखडत होते.

तुर्कस्तानने काही शतके मोठे साम्राज्य भोगले पण पहिल्या महायुद्धानंतर ते युरोपच्या कोपऱ्यातले एक दुखणाईत राष्ट्र म्हणून ओळखले गेले. ख्रिस्तपूर्व हजार ते ख्रिस्तोत्तर १००० हा दोन हजार वर्षांचा काळ भारतासाठी सर्वच क्षेत्रात वैभवाचा काळ



होता. या काळात आग्नेय व पूर्व आशियात हिंदूंची मोठमोठी साम्राज्ये होती. इस्लामच्या उदयानंतर अरबांनी उत्तर आफ्रिका व दक्षिण युरोप यावर आपले अधिराज्य स्थापन केले व जीवनाच्या सर्व क्षेत्रात आघाडी मारली. पण आज त्यांना इवलेसे इस्राइल लाथा मारीत आहे.

या उत्कर्षापकर्षाच्या इतिहासावरून एखादे राष्ट्र भरभराटते तेव्हा त्याचे नागरिक गुणसंपन्न असतात व जेव्हा त्याचा अध:पात होतो तेव्हा ते आपले गुण हरवून बसलेले असतात. गुण तेच पण विशिष्ट मनोवृत्तीमुळे ते कार्यप्रवण होतात व दुसऱ्या विशिष्ट मनोवृत्तीमुळे त्यांना मरगळ येते. इस्लाम हे अरब व तुर्कांच्या उत्थानाचे कारण सांगता येईल. संस्कृत भाषा व तिच्यावरील वाङ्मय हे भारताच्या उत्थानाचे कारण सांगता येईल. व्यापार व विज्ञान यातील यश हे युरोपच्या उत्थानाचे कारण सांगता येईल. विजिगीषु धर्म, उच्च दर्जाचे कलात्मक व साहित्यिक वातावरण, व्यापार व विज्ञान यातील यश यांनी जीवनात एक प्रकारची ईर्ष्या निर्माण होते व त्यामुळे माणसाचे गुण कसास लागतात. तमिळ लोक मोठे लढवय्ये म्हणून अलीकडच्या इतिहासात प्रसिद्ध नव्हते. पण श्रीलंकेतील अवमानामुळे त्यांचा स्वाभिमान डिवचला गेला व तमिळ महत्तेच्या कल्पनेने भारलेल्या तमिळांनी एका प्रस्थापित सरकारविरुद्ध दशकानुदशके लढा दिला. विजयाची ईर्ष्या निर्मिणारे असे काही असेल तर राष्ट्राचा उत्कर्ष होतो, नाहीतर त्यात असलेले गुण देखील नसल्यासारखेच होतात. ''तुम्ही जातीचेच नालायक आहात व इंग्रजांचे अंकित म्हणून राहण्याशिवाय तुमच्याने काही पराक्रम होणे नाही'' असे ज्या शिक्षणाचे पालुपद आहे त्याने देशाचा वैज्ञानिक विकास होईल अशी आशा करणे व्यर्थ आहे.

भाषा ही इतर साधनासारखी नाही. ती समाजाचे अविभाज्य अंग आहे व म्हणून कोणाच्याही भाषेला नित्यासाठी नालायक ठरविणे म्हणजे ती भाषा बोलणाऱ्यांना नालायक ठरविणे होय.

लोकहितवादी व त्यांचे आधुनिक अवतार नेहरू समजतात त्याप्रमाणे हिंदू खरोखरीच सर्वतोपरी नालायक असतील व इंग्रज सर्वतोपरी आणि कायमचे त्यांच्या शतपट श्रेष्ठ असतील तरी ''तुम्ही सतत विठ्ठल असे नामस्मरण करण्याऐवजी इंग्रज इंग्रज म्हणून स्मरण करा.'' हा लोकहितवादी व नेहरू यांचा उपदेश हिंदूंच्या भल्याचा नाही. हिंदू सर्वतोपरी नालायक असले तरी इंग्रजांचे स्तुतिपाठक व गुलाम होण्याने त्यांचा उद्धार कसा होईल? पारतंत्र्यपूजा हा एखाद्या राष्ट्राच्या अभ्युदयाचा मार्ग असू शकतो काय?

इंग्रजांशी आपण हरलो याचा अर्थ इंग्रजांच्या मानाने आपण कमी पडलो एवढा आहे. पण यावरून आम्ही सर्वस्वी नालायक आहोत असे ठरत नाही. कुस्तीत एक मल्ल

पडणारच. यावरून पडलेला मल्ल हा मल्ल नसून एक अपंग आहे असे ठरत नाही. एखाद्या देशाचा पराभव झाला म्हणजे त्यांच्या भाषा, वाङ्मय, सामाजिक चालीरीती, धर्म वगैरे सर्वच निंद्य व त्याज्य आहे व ते बदलल्याशिवाय त्याचा उद्धार होणे शक्य नाही असे ठरत नाही. भारत सुमारे दोन हजार वर्षे जगातील अग्रगण्य देश म्हणून तळपत होता. याचे कारण त्या काळात त्याचे विज्ञान, कलाकौशल्य तात्त्विक विचार व सामाजिक चालीरीती या भारतीयांना वैभवशाली जीवन जगण्याची ईर्ष्या निर्माण करणाऱ्या होत्या. तसे नसते तर भारतीय धर्मप्रचारकांनी युरोपात हंगेरीपर्यंत व आशियात जपानपर्यंत जाऊन धर्मविजय केला नसता व भारतीय वीरांनी हजारो मैल समुद्रपार जाऊन आग्नेयआशियात मोठमोठी साम्राज्ये स्थापिली नसती. संस्कृतभाषेचे पुनरुज्जीवन, तक्षशिला, नालंदा वगैरे विश्वविद्यालयांची पुनःस्थापना, संस्कृतनिष्ठ अशा शुद्ध देशीभाषांमध्ये अगदी अद्ययावत विज्ञान व साहित्य, जुन्या कलांचे पुनरुज्जीवन व नूतनीकरण या सगळ्यावर स्वतंत्र भारताने लक्ष्य केंद्रित केले असते तर आज निदान चीनइतका तरी तो निश्चितच प्रगत झाला असता. कारण अशा वातावरणातच पूर्वी भारताचा वैभवशाली इतिहास बहरला होता.

वरील सर्व विचाराला नेहरू पुनरुज्जीवनवाद म्हणून हेटाळीत व कोणत्याही देशाचा हमखास अधःपात घडवून आणणारी जी पारतंत्र्यपूजा तिची भलावण करीत.

नेहरूयुगातील भारताच्या अधःपाताची कारणमीमांसा करताना जैविकीतले एक उदाहरण उपयोगी पडण्यासारखे आहे. स्त्रीपुरुषाव्यतिरिक्त तृतीयलिंगी व्यक्तींचा एक वर्ग आहे. ज्याचे जननेंद्रिय धड ना पुरुषाचे असते ना स्त्रीचे त्यांना तृतीयलिंगी म्हणतात. हे लोक सर्वसाधारण स्त्रीपुरुषापेक्षा संभोग करून प्रजोत्पत्ति करू शकत नाहीत हाच फक्त त्यांच्यात एक दोष असतो. पण बाकी कोणत्याही बाबतीत ते अपंग नसतात. ते बुद्धीत व शारीरिक सामर्थ्यात इतर स्त्रीपुरुषांपेक्षा कमी नसतात. ते जर तृतीयलिंगदर्शक पोषाख करून राहिले नाहीत व आपण भिन्नलिंगी आहोत हे दाखविण्यासाठी मुद्दाम तसे हावभाव करणार नाहीत तर कोणाला ते ओळखूही येणार नाहीत. एवढेच नव्हे त्यांच्यातूनही वकील, डॉक्टर, वैज्ञानिक व राजनैत निघू शकतील. पण जन्मल्यापासून त्यांच्यावर तुम्ही कशासाठीच लायक नसलेले लोक आहात असे संस्कार केल्यामुळे त्यांच्या क्षमतांचा उपयोगच होत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात नेहरूवादाने भारताला हेच हिजड्याचे शिक्षण दिले. त्यामुळे सारा देश अंगभूत क्षमता असूनही हिजडाच राहिला.

■■■





# नेहरूंच्या पंचवार्षिक योजना

नेहरूंनी भारताची वैज्ञानिक प्रगती घडवून आणली या दाव्याइतकाच नेहरूंनी भारताचे औद्योगीकरण केले हा दावा प्रसिद्ध आहे. औद्योगीकरणाचा हेतू जीवनमान सुधारणे हा असतो वा असला पाहिजे. त्यामुळे नेहरूंच्या औद्योगीकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी नेहरूंनी भारतात किती उद्योग उभारले याचा हिशेब न करता नेहरूंनी भारताचे जीवनमान किती सुधारले यांचा विचार केला पाहिजे. एखाद्या उद्योगात नफा व्हायला फार उशीर लागतो. पण तो उशीर एका पिढीपेक्षा जास्त असू नये अशी अपेक्षा असते. नेहरूंच्या योजनांनी त्यांच्या सतरा वर्षांच्या कारकीर्दीनंतर देखील भारतीयांचे जीवनमान सुधारण्यास मदत केली नसेल तर त्या योजना नुसत्या निरुपयोगीच नव्हेत तर हानिकारक होत्या असे म्हणावे लागेल. कारण असलेले भांडवल नष्ट करणाऱ्या त्या योजना होत्या असे त्यावरून सिद्ध होते.

जीवनमानाचे मापन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी सम्पत्ती, आयुर्मान व साक्षरता हे निकष वापरले आहेत. हे निकष वापरून जगातील सर्व देशांचे मानवी विकासाच्या बाबतीत क्रमांक ठरविण्यात आले आहेत. त्यात नेहरूंची कारकीर्द सुरू झाली तेव्हा भारताचा क्रमांक ३२ वा होता व ती संपण्याच्या सुमारास ६० च्या खाली गेला होता. (Times of India)

पहिल्या प्रकरणात नेहरूंनंतर आजतागायत तरी नेहरूंच्या धोरणानुसारच भारताचे राज्य चालले आहे असे प्रतिपादन केले आहे. नरसिंहरावांच्या कारकीर्दीत आर्थिक क्षेत्रात नेहरूंच्या समाजवादापासून आंतरराष्ट्रीय दबावामुळे भारताला दूर जावे लागले. पण राजीव गांधींच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत आर्थिक क्षेत्रात नेहरूंच्या विचारांचा प्रभाव होता असे म्हणण्यास हरकत नाही. राजीव गांधींच्यां कारकीर्दीच्या अखेरीस भारताच्या विकासाची तौलनिक दशा खालीलप्रमाणे होती.

| देश | दरडोई राष्ट्रीय उत्पन्न(डॉलरमध्ये) | सरासरी आयुर्मान | साक्षरतेचे शतमान |
|---|---|---|---|
| भारत | २९० | ५८ | ३६ |
| पाकिस्तान | ३७० | ५५ | २६ |
| बांगलादेश | १७० | ५१ | २९ |
| श्रीलंका | ३७० | ७३ | ८७ |
| म्यानमार (ब्रह्मदेश) | २३० | ६० | ७८ |

वरील आकड्यावरून दिसून येईल की भारत उत्पन्नामध्ये श्रीलंका, ब्रह्मदेश व पाकिस्तान यांच्या खाली आहे. आयुर्मानात व साक्षरतेत श्रीलंका व ब्रह्मदेश यांच्या खाली आहे. संयुक्त राष्ट्रांनी वरील तिन्ही मानांक जमेस धरून मानवी विकासाचा एकच मानांक काढला आहे. त्यात भारत पाकिस्तानच्या खाली येतो. बांगलादेशातील किमंती लक्षात घेतल्या तर बंगला देशांतील साधारण नागरिक आपल्या उत्पन्नात ज्या दर्जाने जगू शकतो, त्या दर्जाने भारतीय नागरिक आपल्या उत्पन्नात जगू शकत नाही. एकूण ज्यांच्याबेराबरच भारत स्वतंत्र झाला त्या आपल्या शेजारी राष्ट्रांच्या तुलनेनेही भारताची प्रगती शोचनीय आहे.

इतर देशांशी तुलना न करता केवळ नेहरू अधिकारावर आले तेव्हापेक्षा ते अधिकारावरून गेले तेव्हा भारताची परिस्थिती सुधारली होती की नाही याचा विचार केला तर होकारार्थी उत्तर द्यावे लागते. पण याचे श्रेय नेहरूंना नाही. कारण स्वंराज्य मिळालेल्या सर्व देशातच अशी सुधारणा झाली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर दुसऱ्या एखाद्या देशाचा अंकित असा कोणी देश राहिला नाही. त्यामुळे राष्ट्रांच्या परागतीचे एक प्रमुख कारणच नाहीसे झाले व सर्वच देशांनी प्रगती केली. ''माझा मुलगा ७ वर्षांपूर्वी पहिलीत होता तो आता सातवीत गेला आहे तेव्हा त्याने मोठी प्रगती केली आहे असे कोणी बाप म्हणू लागला तर त्याला कोणीही सांगेल की ''बाबारे, या तुझ्या बाळ्याने कोणताही तीर मारलेला नाही. त्याच्या बरोबरीची बहुतेक सर्वच मुले सातवीत गेली



आहेत. सात वर्षे पहिलीतच राहिलेला एकही मुलगा नाही.''

## गरिबी हटाव की गरीब हटाव?

नागपूर विश्वविद्यालयाचे भूतपूर्व उपकुलगुरू डॉ. बोकरे यांनी मला नेहरूंच्या मृत्यूनंतरच्या दशकातल्या जगातील देशांच्या प्रगतीचे आकडे आणून दिले होते. त्यात भारतापेक्षा सर्वच बाबतीत मागासलेले दोनच देश दिसून आले एक नेपाळ व दुसरा इथियोपिया. बंगलादेशात बालमृत्यूचे प्रमाण कमी असल्यामुळे या बाबतीत तो भारताच्या पुढे आहे.

नेहरूंच्या योजनांनी गरिबी कितपत हटली याचा अभ्यास डॉ. वैद्य व डॉ. कुलकर्णी या अर्थशास्त्रांच्या प्राध्यापकांनी केला आहे. त्यांचे आधारभूत आकडे औस्लर, दत्त आणि अभिजित सेन यांनी मिळविलेले होते. हा अभ्यास १९९४ च्या सुमारास अनेक वृत्तपत्रात प्रकाशित झाला होता. ते आकडे असे-

दारिद्र्यरेषेखालील लोकांचे शतमान

| वर्ष | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| १९५१ | ४७ | ३५ |
| १९५४-५५ | ६४ | ४६ |
| १९५७ | ६२ | ४८ |
| १९६०-६१ | ४५ | ४४ |
| १९७०-७१ | ५४ | ४४ |
| १९८९-९० | ३४ | ३३ |
| १९९०-९१ | ३६ | ३२ |
| १९९२ | ४३ | ३२ |

वरील आकड्यावरून दिसून येईल की पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर गरिबी वाढली. पुढेही ती कमी होण्याचे निदर्शक असे वरील आकड्यात काही नाही. ग्रामीण दारिद्र्य १९९२ मध्ये १९५१ च्याच जवळपास आले. चाळीस वर्षांच्या नेहरूंच्या योजनानंतर ३३ टक्के लोक दारिद्र्यरेषेखालीच होते.

दुसरी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण शहरी दारिद्र्यापेक्षा पुष्कळच मोठे आहे. बहुसंख्य लोक खेड्यात राहतात त्यामुळे खेड्यांचे दारिद्र्य कमी झाले नाही याचा अर्थ एकूणच देशाचे दारिद्र्य कमी झाले नाही असा होतो.

गांधींनी स्वराज्याच्या सुरूवातीलाच नेहरूंना पत्र लिहून सुचविले होते की, योजनांची सुरूवात खेड्यापासून करावी. नेहरू या सूचनेची सहजच टवाळी करू शकले, कारण गांधी आपल्या अत्यंत व्यवहारी विचारांना देखील नैतिक व आध्यात्मिक पेहेराव देण्याचा प्रयत्न करीत. "खेड्यातील लोक शहरातील लोकांपेक्षा अधिक सात्त्विक असतात" वगैरे मुद्दे त्यांनी आपल्या पत्रात मांडले होते. हे मुद्दे कल्पनासृष्टीतले आहेत. खेड्यापासून योजना सुरू करण्यास पुष्कळ ठोस कारणे आहेत. एकतर बहुसंख्य लोक खेड्यात राहत असल्यामुळे आर्थिक योजनात खेड्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे बहुसंख्येकडे दुर्लक्ष करणे होय. केवळ बहुसंख्याच नव्हे तर खेडी हे आमचे मुख्य अर्थोत्पादन केन्द्र आहे. आमचे बहुसंख्य लोक शेतीवर जगतात. शेती खेड्यातच होते. पण आज ती खेड्यात राहणाऱ्या लोकांना सधन करण्यास सक्षम नाही. ती सक्षम करण्यासाठी शेतीशीच संबंधित असलेले व खेड्यातल्या खेड्यात होऊ शकणारे उद्योग खेड्यात सुरू केले तर खेड्यातील लोकांचे राहणीमान सुधारू शकेल व उपजीविकेसाठी त्यांना खेड्याच्या बाहेर धाव घ्यावी लागणार नाही. आज खेड्यातून शहराकडे श्रमिक इतक्या मोठ्या संख्येने धाव घेतात की शहरांना बकाल स्वरूप आले आहे. मुंबई सारख्या शहरात श्रमिकांच्या डोक्यावर छप्परच नाही. त्याची मलमूत्रविसर्जनाचीही सोय नाही. त्यामुळे मुंबईला घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पुलगावसारख्या खेडेगावात देखील मारवाड्यांनी ब्रिटिश काळात गिरणी काढली. तशा गिरण्या व इतर पुष्कळ उद्योग खेड्यात निघू शकले असते. पण नेहरूंच्या डोक्यात काही निर्बुद्ध समीकरणे ठाण मांडून बसली होती.जसे विज्ञान = इंग्रजी या समीकरणाने शिक्षणाचे वाटोळे केले तसेच औद्योगीकरण = शहरीकरण या समीकरणाने आर्थिक क्षेत्रात केले. रुपयात उत्पन्न मोजले तर खेड्यातून मुंबईत आल्यावर मजुरांचे उत्पन्न वाढले पण त्यांना खेड्यात ऐन पावसात उघड्यावर निजावे लागत नव्हते. मलममूत्रविसर्जनाची अधिक चांगली सोय होती व वातावरण स्वास्थ्यास अधिक पोषक होते. हे लक्षात घेतल्यास रुपयात उत्पन्न मोजण्याने भारताच्या प्रगतीचे जे चित्र दिसते ते पुष्कळसे अवास्तव ठरते.

## विदेशी प्रवाशासाठी प्रदर्शने

विज्ञान = इंग्रजी, औद्योगीकरण = शहरीकरण या समीकरणाप्रमाणेच औद्योगीकरण = अवजड उद्योग हे तिसरे समीकरण नेहरूंच्या डोक्यात होते. म्हणून



त्यांनी टाटा वगैरे अनुभवी उद्योजकांचा सल्ला धुडकावून लोहनिर्मितीचे अवाढव्य कारखाने सुरू केले. परिणामतः या कारखान्यात निर्माण झालेले लोखंड सोन्यापेक्षा महाग म्हणून त्याचा उठाव होईनासा झाला असे अनेक वर्षांची लोहप्राधिकरणाची प्रतिवृत्ते सांगतात.

अवजड उद्योगाचा एक दोष हा आहे की त्यात गुंतविलेल्या धनाच्या मानाने रोजगार उपलब्ध करून देण्याची त्याची क्षमता फार कमी आहे. त्यातून अशा कारखान्यात तयार झालेल्या लोखंडाला उठावच नसेल तर त्यात गुंतविलेला पैसा व समुद्रात फेकून दिलेला पैसा यात फारसा फरक नाही.

"लोहनिर्मिती हा औद्योगिकरणाला लागणारा पाया म्हणजे infrastructure आहे. तो अनुत्पादक असल्यामुळे त्यावर खर्च झालेला पैसा समुद्रात फेकून देण्यासारखे आहे असे म्हणणे म्हणजे पायात राहता येत नाही म्हणून पायावर खर्च केलेला पैसा हा फेकून दिलेल्या पैशासारखा आहे असे म्हणण्यासारखे आहे. घरच बांधायचे नसेल तर पायावर खर्च झालेला पैसा हा फेकून दिलेला पैसा ठरेल पण नेहरूंना घर बांधायचे होते हे खरे.

पण नेहरूंनी कोणत्या पायाभूत उद्योगात गुंतविलेला पैसा वाया जाणार नाही यावर विचारच केला नाही. स्टॅलिनने मोठमोठे लोहनिर्मितीचे कारखाने काढले म्हणून नेहरूंनी काढले. पायाभूत उद्योगात खर्च केलेला पैसा उपयोगात येण्यास बराच वेळ लागतो असे काही नाही. रस्ते बांधणे हा पायाभूत उद्योग आहे. पण त्यांत लाखो मजुरांना मजुरी देण्याचे सामर्थ्य आहे. शिवाय रस्ता बांधल्याबरोबर त्यांचा आर्थिक समृद्धीसाठी लगेच उपयोग होऊ शकतो. तसे लोहकारखान्याचे नाही. खेड्यात होणाऱ्या मालाला खेड्यातच उठाव नसतो. पण खेडे जवळच्या शहराशी रस्त्याने जोडले की त्या खेड्यात होणाऱ्या दूध, भाजी, फळ वगैरे विनाशी मालाला लगेच बाजारपेठ उपलब्ध होते व खेड्यांची समृद्धी वाढते. रस्ते या पायाभूत उद्योगाकडे वाजपेयी सरकारने जितके लक्ष्य दिले त्याच्या दशांशही नेहरूंनी दिले नाही. याचे कारणही नेहरूंचा जागतिक कीर्तीचा हव्यास हेच आहे. लोखंडाचे प्रचंड कारखाने पाहायला परदेशातील प्रवासी येतात पण एखाद्या खेड्याला १० मैल दूर असलेल्या शहराशी जोडणारा गिट्टीचा बैलगाडीसाठीच योग्य असणारा रस्ता पाहायला कोणता परदेशी पर्यटक येणार आहे? अशा रस्त्यानी नेहरूंना आंतरराष्ट्रीय कीर्ती कशी मिळणार?

आपल्या कारकीर्दीत झालेली भारताची आर्थिक प्रगती चारचौघात सांगण्यासारखी नाही हे नेहरूंच्या लक्षात आले तेव्हा "माझ्या अचाट योजनांनी निर्माण

झालेली संपत्ती कुठे गेली याचा शोध लावण्यासाठी मी एक समिती नेमणार आहे.'' असे नेहरूंनी जाहीर केले. अशी समिती नेमली गेल्याचे पुढे कधी वाचण्यात आले नाही. निदान अशा समितीचे प्रतिवृत्त कोठेही उपलब्ध नाही.

आपल्या कर्तृत्वहीनतेवर पांघरुण घालण्यासाठी नेहरूंनी दुसरी एक युक्ती योजली. ती म्हणजे भारताच्या प्रगतीला नेहरूंचा वृद्धिदर असे न म्हणता हिंदूंचा वृद्धिदर (Hindu Rate of Growth) असे नाव दिले. ''हिंदू इतके नालायक आहेत की माझ्यासारखा पंतप्रधान मिळून देखील ते यापेक्षा जास्त प्रगती करू शकले नाहीत. माझ्याशिवाय दुसरा कोणी पंतप्रधान असता तर त्यांचे हाल कुत्रा खाताना.'' असे नेहरूंना सुचवायचे होते.

आपल्या योजना आखताना नेहरूंना हिंदुत्वाचा कोणता अडथळा झाला हे नेहरूभक्त सांगू शकणार नाहीत.

भारताच्या आर्थिक दुर्दशेला नेहरूशिवाय दुसरे कुणीही जबाबदार नव्हते हे नेहरू पंतप्रधान झाले त्यावेळी भारताचा क्रमांक ३२ वा होता व तो नेहरूंमुळे ६० च्या खाली गेला यावरून निर्विवादपणे सिद्ध होते. नेहरू पदारूढ झाले तेव्हाही भारत हिंदूंचाच होता व त्याची तौलनिक आर्थिक दशा नेहरूंनी केली त्यापेक्षा पुष्कळच चांगली होती.

## आंग्लशिक्षितासाठी योजना

नेहरूंचा सगळ्यात लाजिरवाणा कार्यभाग शिक्षण क्षेत्रातला आहे. विसाव्या शतकाच्या शेवटी जगातील निरक्षरांच्या ५५ टक्के निरक्षर भारतात राहत होते यावरून हे स्पष्ट व्हावे. भारताचा सारा शैक्षणिक व प्रशासनिक व्यवहार इंग्रजीत व्हावा असे ज्याला वाटत होते त्याला ''तळागाळापासूनच्या सर्व जनतेचे शिक्षण'' ही कल्पनाच अनाकलनीय होती हे स्पष्ट आहे.

देशाच्या विकासाचा एकमात्र निर्देशांक सांगायचा असेल तर तो आयुर्मान हा आहे. यात बाकी सगळ्याचा समावेश होतो. माणूस दारिद्र्य व दुःख यांनी पीडलेला असेल तर तो फार जगू शकत नाही. नेहरूंच्या योजनानंतर भारताचे सरासरी आयुर्मान अवघे ५८ वर्षे व श्रीलंकेतील आयुर्मानापेक्षा बरेच खाली होते. यावरून नेहरूंच्या आर्थिक कर्तृत्वाचे पितळ उघडे पडले.

नेहरूंच्या योजनांमुळे साधारणपणे १० कोटी लोकांचा फायदा झाला.हे दहा कोटी लोक मुख्यतः आंग्लशिक्षित होते. या वर्गाला पूर्वी कधीही नव्हे एवढ्या सवलती



मिळाल्या. भाववाढीबरोबर पगारच नव्हे तर निवृत्तीवेतनातही वाढ, कौटुंबिक निवृत्तिवेतन वगैरे सवलती इंग्रजी राज्यात अकल्पनीय होत्या. नेहरूंच्या कारकीर्दीत नोकरशाहीमध्ये अतोनात वाढ झाली. ही वाढ कामाचा व्याप वाढल्यामुळे झालेली नाही. ब्रिटिश काळापेक्षा नेहरूकाळात आंग्लशिक्षितांच्या वर्गात बेकारी बरीच कमी होती व त्यामुळे या वर्गाची नेहरूंकडे चिकित्सकपणे पाहण्याची शक्तीच नाहीशी झाली. नेहरूंच्या प्रचारामुळे राष्ट्राभिमान वा स्वार्थापलीकडे पाहायला लावील अशा दुसऱ्या कोणत्याही भावनेची जोपासना होण्याचा संभव नव्हता. शिवाय ब्रिटिश काळाप्रमाणे शिस्तीचा बडगाही नव्हता. त्यामुळे कार्यालयात कार्यकाळातच पत्त्यांचे अड्डे मांडणारे व कोणतेही काम सांगितले तर ''हे माझे काम नाही.'' असे सिद्ध करण्यासाठी कोणत्या नियमांचा आधार घेता येईल याचा विचार आधी करणारे सरकारी नोकर प्रत्यही दिसू लागले.

हा दुसरा प्रकार नेहरूंच्या आवडत्या समाजवादाचा महिमा आहे. जो नोकरी देतो तोच आपला शोषक आहे व त्याच्याशी भांडले पाहिजे ही भावना मार्क्सवादाने रुजवली आहे. नेहरूंच्या काळात मार्क्सवाद फारच प्रतिष्ठित होता.

नेहरूंनी आपल्या योजनांच्या बोजवाऱ्याचे खापर हिंदुत्वावर फोडले. पण हिंदुत्वाव्यतिरिक्त काही दुसऱ्याही सबबी सांगण्यात येतात. त्यापैकी नेहमीची भारतातील अतिरिक्त जनसंख्येची आहे. पण जनसंख्येची अतिरिक्तता देशाचे क्षेत्रफळ व इतर नैसर्गिक संपत्ती यांच्या अनुपातात ठरवायची असते. श्रीलंकेच्या लोकसंख्येची घनता दर किलोमीटरला २४९ तर भारताची २४७ इतकी म्हणजे श्रीलंकेपेक्षा कमी आहे असे असता लंकेने जास्त प्रगती केली आहे. केवळ क्षेत्रफळ विचारात न घेता इतर नैसर्गिक संपत्ती विचारात घेतली तर भारताच्या लोकसंख्येला बव्हंश देशापेक्षा अधिक अनुकूल आहे. सुपीक जमिनीचे इतर जमिनीशी प्रमाण भारतात बहुतेक देशापेक्षा व नकाशावर भारतापेक्षा फारच मोठ्या दिसणाऱ्या चीनपेक्षा अधिक आहे. तेव्हा लोकसंख्येचे कारण फुसके आहे.

लहान देशाला प्रगती करणे जास्त सोपे असते म्हणणाऱ्यासमोर चीनचे उदाहरण फेकता येते. अशी कारणे लटकी ठरल्यावर नेहरूभक्त लोकशाहीला दोष देतात. नरसिंहरावांनी अमेरिकेत जाऊन भारताच्या अपयशाचे खापर लोकशाहीवरच फोडले. त्यावेळी लोकशाही श्रीलंका त्यांना आठवली नाही. लोकशाही अमेरिकेत लोकशाही प्रगतिविरोधी आहे असे सांगितल्याने आपले हसे होईल ही कल्पना त्यांना झाली नाही. प्रगतीचे अध्ययन करणाऱ्या सांख्यिकांनी लोकशाही व प्रगती यांचा कार्यकारणभाव

तपासून पाहिला आहे व लोकशाही प्रगतिविरोधी आहे या समजुतीला काही आधार नाराही असे स्पष्ट सांगितले आहे.

नेहरूंना वाचविण्याचे हे सगळे प्रयत्न अंगाशी येतात हे कळल्यावर नेहरूभक्त आपले शेवटचे अस्त्र बाहेर काढतात व ते म्हणजे जातिभेदामुळे भारताची प्रगती होत नाही. हे कारण खरे असेल तर भारताने प्रगतीची आशा कायमची सोडली पाहिजे. कारण जातिभेद नष्ट होण्याचा काहीही संभव नाही.

वस्तुत: ज्या देशात जातिभेद म्हणजे ज्यांच्यात साधारणपणे रोटीबेटीव्यवहार होत नाही व पुष्कळ वेळा व्यवसायाची समानता असते असा जातिभेद सर्वच देशात आहे. शिवाय ज्यू, नीग्रो, रेड इडियन वगैरे पाश्चात्त्य समाजातल्या जातीच आहेत. स्तुत्यह प्रगती करणाऱ्या श्रीलंकेत भारतासारख्याच जाती आहेत. ख्रिस्तपूर्व पहिले व ख्रिस्तोत्तर पहिले या दोन सहस्रकात भारत हा सर्व जगातील अग्रेसर देशात मोडत होता त्यावेळी भारतात आजच्यासारखाच जातिभेद होता.

कितीही आढेवेढे घेतले तरी भारतात आर्थिक प्रगती झाली नाही याचे एकमात्र कारण नेहरू व नेहरूवाद हेच आहे हे नेहरूभक्तांना कबूल करावेच लागेल.

## समाजवादी भ्रम

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ शेनॉय यांनी स्पष्टच म्हटले आहे की योजनाबीजना न करता नेहरू नुसते स्वस्थ बसले असते तरी भारताची प्रगती पुष्कळ झाली असती. नेहरूंच्या काळात तीन वर्षे योजनापासून सुट्टी पाळण्यात आली होती. त्या सुट्ट्यात भारताच्या प्रगतीचा वेग अधिक होता. (International Language Centre Delhi)

नेहरूंचे योजनातज्ज्ञ महालनोबीस म्हणाले होते की, आम्ही आमच्या योजना आमच्या साधनावर अवलंबून न ठेवता आमच्या आवश्यकतांवर अवलंबून ठेवू. वाहवा करण्यासारखेच हे विधान आहे. मी माझ्या मिळकतीचा विचार न करता माझ्या आवश्यकतानुसार खर्च करीन असे म्हणणाऱ्या कुटुंबप्रमुखाच्या कुटुंबाप्रमाणेच नेहरूंच्या योजनांनी भारताचे दिवाळे वाजविले याचे आश्चर्य वाटायला नको.

नवभारत मासिकाच्या योजना विशेषाकांत असे म्हटले आहे की भाक्रा नांगलची योजना आखताना व्यय व लाभ याचे प्रमाण काढण्यातच आले नाही. वस्तुत: या योजनेपासून व्यय एवढा देखील लाभ होणाार नाही. नेहरूंनीच हे पुढे कबूल केले व "आज जर अशी योजना माझ्यापुढे आली तर मी ती स्वीकारणार नाही." असे उद्‌गार काढले. (गोपाल)



विज्ञानाप्रमाणेच आर्थिक योजनांच्या क्षेत्रातही नेहरूंनी योजना विदेशी पत्रकारांना प्रदर्शनीय असाव्यात एवढाच विचार केला कारण त्यांचे लक्ष्य वैयक्तिक आंतरराष्ट्रीय कीर्ती हे होते. देशाचा फायदा हे नव्हते. मोठमोठी धरणे प्रवाशांच्या मनावर परिणाम करतात. गरिबांच्या राहणीत १० वा २० टक्के सुधारणा झाली तरी ही परकीय प्रवाशांच्या चटकन लक्षात येणार नाही.

अज्ञाबरोबरच अर्थशास्त्राचे काही प्रोफेसरदेखील म्हणतात की "फायद्यातोट्याचा विचार करण्यासाठी देशाच्या योजना हे बनियाचे दुकान नाही, बनिया नफ्यासाठी दुकान काढतो आम्हाला देशहितासाठी योजना करायच्या होत्या." आर्थिक योजनात आर्थिक नफा हे लक्ष्य असू नये हे बुद्धीचे दिवाळे वाजल्याचे लक्षण आहे.

समाजवादी अर्थशास्त्राचा मूलभूत भ्रम हा आहे की सध्याच्या समाजात भांडवलशाही शोषण सुरू आहे. ते थांबविले की समाज आपोआप समृद्ध होईल. म्हणजे देशात अतिरिक्त धन आहेच पण ते कुणीतरी म्हणजे भांडवलदारांनी दाबून ठेवले आहे. भांडवलदार हा नागोबा मारला की धनाचे भांडारच मोकळे होणार दुसरे काही करायची जरूर नाही.

कोंबडीने पोटात अंडी दडवून ठेवली आहेत. कोंबडीला मारले की ती दडवून ठेवलेली अंडी आपल्याला आयती मिळतील या सारखाच हा विचार आहे.

नेहरूंच्या योजना कोणासाठी होत्या हे कोणत्या वस्तूंचा खप या योजनांमुळे वाढला हे पाहिले तर कळून येईल. शीतपेट्या, मोटारी, यासारख्या चैनीच्या व विदेशातून आणलेल्या वस्तूंची विक्री वाढली. त्या मानाने अन्नवस्त्राची विक्री बेसुमार लोकसंख्या वाढूनही वाढली नाही. तळागाळातल्या लोकांचे उत्पन्न वाढले असते तर आधी अन्नधान्ये व वस्त्रप्रावरणे ग्रांची विक्री वाढली असती कारण अर्धपोटी व अर्धाच्छादित लोकांना आधी या गोष्टींची पूर्तता करण्याची गरज वाटली असती.

## आयातनिर्यातीचे अर्थशास्त्र

सक्षम अर्थव्यवस्थेचे एक लक्षण आयातीपेक्षा निर्यात जास्त असणे हे आहे. १९९० पर्यंत भारताचे अर्थकारण मुख्यत: नेहरूवादावरच चालले होते. तेव्हा या कालात भारत व इतर तुलनार्ह देश याची निर्यातीच्या बाबतीतील स्थिती खालीलप्रमाणे होती.

| देश | निर्यातीचा आयातीशी अनुपात | |
|---|---|---|
| भारत | अमेरिकेत ६८ | ब्रिटनमध्ये ७३ |
| पाकिस्तान | --''-- ८७ | --''-- ६५ |
| श्रीलंका | --''-- ५३ | --''--६० |
| बांगलादेश | एकूण ४१ | |
| म्यानमार (ब्रह्मदेश) | -५६ | |
| चीन | अमेरिकेत १.०२ | ब्रिटनमध्ये १.०७ |

वरील तालिकेवरून स्पष्ट आहे की, दरडोई उत्पन्नाप्रमाणेच निर्यातीच्या बाबतीत पाकिस्तानची कामगिरी भारतापेक्षा सरस आहे. चीनने अमेरिका व ब्रिटन दोन्ही देशांशी भारतापेक्षा जास्त निर्यात करण्यात यश मिळविले आहे.

येथे दुसरी गोष्ट ही लक्षात ठेवली पाहिजे की व्यापार हे ज्या देशाचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे तो देश जर आयातीपेक्षा जास्त निर्यात करीत असेल तर तो उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करीत असल्यामुळे भिकेच्या मार्गाला लागला आहे असे म्हणता येते. पण ज्या देशाला असणाऱ्या बव्हंश गरजा देशांतर्गत उत्पादनाने भागतात तो देश निर्यातीपेक्षा आयात जास्त करतो म्हणून भिकेच्या मार्गाला लागला आहे असे अनुमान काढता येत नाही. वरील तालिकेत भारतापेक्षा व्यापाराची तोंडमिळवणी प्रतिकूल असलेला देश श्रीलंका हा आहे. पण तो प्रगतीच्या सर्व निर्देशांकात भारताहून श्रेष्ठ आहे हे मागे दाखवून दिले आहे. अर्थात श्रीलंकेसारख्या टीचभर देशाने स्वयंपूर्णतेचे ध्येय गाठण्यात भारताच्या वर मजल गाठली आहे हे स्पष्ट आहे.

पूर्वी कम्युनिस्ट रशिया हा देश स्वयंपूर्णतेचे ध्येय बाळगून आर्थिक नियोजन करणारा देश होता. रशियात बनलेला कोणताच माल बाजारात मिळत नसे हे रशिया कम्युनिस्ट असतानाचे दिवस ज्यांना आठवतात त्यांना सांगण्याची जरूर नाही. असे असले तरी रशिया हा भिकेस लागलेला देश नव्हता. रशियन व्यवस्था कोलमडण्याचे मुख्य कारण लष्करी बळात जागतिक क्षेत्रात टिकण्यासारखे स्थान मिळविण्याचा रशियाने प्रयत्न केला तो स्वयंपूर्णतेच्या अर्थव्यवस्थेला झेपण्यासारखा नव्हता हे आहे. या मुद्याची विस्तृत चर्चा या पुस्तकाच्या मर्यादेत येत नाही.

नेहरूंची एकूण विचारसरणीच आयातलोलुप होती. अन्नापासून भाषेपर्यंत नेहरूवादाने ही आयातशरणता पसरविली आहे. आयातित माल वापरणे हे भारतात प्रतिष्ठेचे लक्षण आहे.

नेहरूंच्या आयातप्रियतेचे एक उदाहरण अन्नधान्याच्या बाबतीत सांगण्यासारखे



आहे. नेहरूंच्या हयातीतच जलयोजनांचे उद्दिष्ट व उपलब्धी याचे प्रमाण : ३/७ पासून ते ४/१० पर्यंत घसरत गेले. (Economic Survey 1998-99 and India as Argricultural Sector by CMIE)

याचे कारण आम्हाला खाऊ घालायला अमेरिका तर आहेच मग ही जलयोजनांची कटकट थोडी कमी झाली तर काय हरकत आहे ही नेहरूंची वृत्ती. १९६६ मध्ये भारतात गव्हाचे पीक उदंड असतानाही नेहरूंनी अमेरिकेशी गव्हाच्या खरेदीबद्दल करार केला. याचे परिणाम भारताला नेहरूनंतर लगेच शास्त्रींच्या काळात भोगावे लागले. शास्त्रींनी पाकिस्तानात सैन्य घुसविले म्हणून चिडून अमेरिकेने भारताला धान्य देणे बंद केले.

आता पुन: जलयोजनावर विचार करणे भाग पडले. पण आता या योजनांवर भाववाढीमुळे चारपट जास्त पैसा खर्च करणे जरूर होते. या व्यवहारामुळे १ कोटी ७० लक्ष जमीन जलसिंचनापासून वंचित राहिली व पुढे वीस वर्षे अमेरिकन गहू अनुदानाच्या आधारावर भारतीय बाजारपेठेत विकले गेल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना बराच फटका बसला.

■ ■ ■

# हिंदूंचा दुःस्वास

"माझ्या शिकवणीमुळे दंगे वाढत असतील तर त्याची मला पर्वा नाही."

*जवाहरलाल नेहरू*

विज्ञान व औद्योगीकरण यांच्याप्रमाणेच नेहरूंच्या शिरपेचात खोवला गेलेला तिसरा चांद इहवाद म्हणजे "सेक्युलॅरिझम" हा आहे. हा शब्द इंदिरा गांधींच्या काळात संविधानात घालण्यात आला. पण पंतप्रधान झाल्यापासूनच भारत हे "सेक्युलर" राज्य आहे अशी दवंडी पिटणे नेहरूंनी सुरू केले होते. सेक्युलर हा शब्द कोशात दिलेल्या अर्थानेच नेहरू वापरत असतील असे वाटल्यामुळे कोणी त्यावर आक्षेप घेतला नाही. कारण कोशात दिल्याप्रमाणे "सेक्युलर" राज्य म्हणजे "राज्यकारभारात परलोकविषयक श्रद्धांचा आधार न घेणारे" असा अर्थ होतो. अमुक एक ग्रंथ ईश्वरप्रणीत आहे असे मानून त्याच्या आधारे राज्य चालले पाहिजे असे मानणारे राज्य परलोकविषयक श्रद्धेवर आधारलेले असते. कारण ईश्वर हे पारलौकिक तत्त्व आहे. ऐहिक नाही. आपल्या संविधानाने कोणताही ग्रंथ ईश्वरप्रणीत मानलेला नाही. ईश्वराप्रमाणेच पुनर्जन्म व साक्षात्कार या पारलौकिक गोष्टी आहेत. न्यायालयात एखाद्या साक्षीदाराने मला पूर्वजन्मीची अशी आठवण आहे म्हणून सांगितले वा मला असा साक्षात्कार झाला आहे असे सांगितले तर ती साक्ष मराठेशाहीत वा मौर्य वा गुप्त यांच्या काळात देखील ग्राह्य मानली जात होती असे उल्लेख नाहीत. दिव्यावर विश्वास ही



पारलौकिक श्रद्धा आहे व पूर्वी हिंन्दू न्यायालयात दिव्ये वापरली जात होती हे उदाहरण वरील म्हणण्याला छेद देत नाही कारण दिव्य करणाऱ्यांना आपण अपराधी आहोत की नाही हे माहीत असते व आपण अपराधी आहोत हे माहीत असलेला माणूस दिव्य करणारच नाही. शिवाय जेथे "रवा आहे तेथे दिवा नाही" याचा अर्थ जेथे पुरावा आहे तेथे दिव्याचा उपयोग करू नये, असे तत्त्व मानले जात होते.

हिंदू कायद्याचा आधार जे धर्मशास्त्र ते ईश्वरप्रणीत मानले जात होते. पण धर्मशास्त्रापेक्षा रूढी जास्त प्रबळ मानली जात होती. शास्त्राददृढिर्बलीयसी.

तेव्हा इहवादी याअर्थी भारताचे आजचे संविधान व पूर्वपरंपरेतील राज्यशासन सेक्युलर आहे याबद्दल कोणाला शंका नव्हती.

पण लवकरच हे स्पष्ट होत गेले की "सेक्युलर राज्य" या शब्दप्रयोगाने नेहरूंना हा अर्थ अभिप्रेत नव्हता. संस्कृतभाषेचा प्रसार करण्याची योजना देऊन त्याबरोबर फारसी व अरबी या भाषेच्या प्रसारांची योजना न देणे, महाराष्ट्रातील मुसलमानांची भाषा मराठी आहे असा आग्रह धरणे, मुघल हे परकीय आक्रमक होते असे म्हणणे, भारताच्या इस्लामी शासकांनी इस्लामच्या प्रसारासाठी सैनिक बळाचा वापर केला असा प्रचार करणे हे सर्व नेहरूंच्या मते "सेक्युलॅरिझमचा द्रोह" करणे होते. संस्कृत व अरेबिक/फारसी यांचा काहीही अतूट संबंध नाही. त्यामुळे संस्कृतच्या प्रसारासाठी प्रयत्न करताना अरेबिक/फारसीच्या प्रसारासाठी प्रयत्न केलेच पाहिजेत असे नाही. या सर्वात इह/परलोकाचा संबंध येतोच कुठे?

नेहरूंच्या मते पाकिस्तानातून घुसखोरीने भारतात येणाऱ्या मुसलमानांना परत पाकिस्तानात पाठविणे देखील सेक्युलॅरिझमच्या विरुद्ध आहे. फकरुद्दीन अली अहमद यांनी १४ लक्ष पूर्व पाकिस्तानी घुसखोर भारतात आणले म्हणून त्यांच्याविरुद्ध नेहरूंकडे तक्रारी गेल्या तेव्हा नेहरूंनी त्यांना कानपिचक्या न देता केंद्रमंत्री बनविले. घुसखोरांना बाहेर काढण्याचा कार्यक्रम सरकारने सुरू केला तेव्हा पाकिस्तानचे मंत्री लियाकत अली खान भारतात आले व नेहरूंनी त्यांच्या सांगण्यावरून घुसखोरांना हाकलणे बंद केले. अयूबखानांनी "पाकिस्तानी घुसखोरांचे रक्षण करून पूर्व पाकिस्तानातली स्थिती शांतीस अनुकूल केली." म्हणून नेहरूंचे आभार मानले. इंदिरा गांधी तात्पुरत्या वनवासानंतर १९८० साली पुनः पंतप्रधान झाल्या तेव्हा त्यांनी आसामात घुसखोर येतात म्हणून ओरड करणाऱ्याविरुद्ध प्रखर टीका केली. या प्रकारात इहपरलोकाचा काही संबंध नाही. मुस्लिम घुसखोरांना भारतातून हाकलणे हा सेक्युलॅरिझमचा द्रोह आहे या तत्त्वात सेक्युलॅरिझमचा वेगळाचा अर्थ आहे.

## सांस्कृतिक राष्ट्रवाद

पारलौकिक श्रद्धा सोडल्या तर मुसलमान व हिंदू यात काही फरक नाही वा स्पष्ट शब्दात हिंदू व भारतीय मुसलमान यांची संस्कृती एकच आहे. जो काही फरक आहे तो परकीय आक्रमकांनी बळजबरीने लादलेला आहे या तथ्याचा प्रचार करणे ही हिंदू संकुचितता (chauvinism) वा नेहरूंना दुसरा आवडता शब्द घ्यायचा म्हणजे कम्युनॅलिझम आहे. भारताला 'सेक्युलर' म्हणताना भारत हा हिंदू देश नाही यावर नेहरूंना भर द्यायचा होता. पण भारत हिंदू नाही असे म्हटलेले कुणालाही धडधडीत असत्य वाटले असते त्यामुळे नेहरूंनी अहिंदू या अर्थी सेक्युलर या शब्दाचा प्रयोग केला.

भारत हिंदू नाही हे धडधडीत असत्यच केवळ नव्हे तर संविधानाचा अवमान करणारे देखील आहे. हिंदूंचे धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत व त्यामुळे भारत सरकारवर बंधनकारक आहेत या अर्थी भारत हा हिंदू देश नसला तरी भारताचे राष्ट्रीयत्व हिंदू आहे ही कल्पना आपल्या संविधानात अनुस्यूत आहे. हे संविधानामध्ये जी चित्रे अंतर्भूत केलेली आहेत त्यावरून स्पष्ट आहे. संविधानात भारताच्या राष्ट्रीयत्वाच्या द्योतक म्हणून खालील गोष्टी चित्रित केलेल्या आहेत:-

१. वैदिक आश्रम २. मोहेजोदरोच्या मुद्रा ३. रामाचा रावणावरील विजय ४. गीतोपदेश ५. बुद्धाच्या जीवनातील प्रसंग. ६. महावीराच्या चरित्रातील प्रसंग, ७. अशोकाचा धर्मविजय ८. गुप्तकला, ९. विक्रमादित्याचा दरबार, १०. नालंदा विश्वविद्यालय, ११. ओरिसातील शिल्पे १२. नटराज १३. भगीरथ प्रयत्न. १४. अकबराचा दरबार १५. शिवाजीचे चित्र १६. गुरुगोविंदसिंगाचे चित्र १७. इंग्रजांशी सामना देणारा टिपूसुलतान, १८. राणी लक्ष्मीबाई १९. नेताजी सुभाषचंद्र बोस.

वरील यादीवरून स्पष्ट आहे की संविधानाच्या मते भारत हे हिन्दू राष्ट्र आहे. मुघलापैकी फक्त अकबराचा दरबार दाखविला आहे. कारण अकबराने मुस्लिम धर्माचा त्याग केला होता. जिझिया कर रद्द केला होता व इतर मुस्लिम आक्रमकांच्या तुलनेने बऱ्याच मोठ्या प्रमाणात भारतीयत्वाचा अंगीकार केला होता. तसेच ख्रिस्ती मिशनरी व इस्लामिक आक्रमक हिंदूंना आपल्या धर्मात घेत आहेत असे प्रसंग दाखविलेले नाहीत. म्हणजे ख्रिस्ती धर्म व इस्लाम ही भारतीय राष्ट्रीयत्वाची अंगे आहेत हा नेहरूंचा शोध संविधानाला मान्य नाही. शिवाय या चित्रात दाखविलेली कोणतीच गोष्ट परकीय नाही. अकबराने भारतीयत्व स्वीकारले या समजुतीने अकबराचा तेवढा अपवाद केलेला आहे. अर्थात भारताचे राष्ट्रीयत्व अनेक आक्रमकांच्या कडबोळ्याच्या स्वरूपाचे आहे



हा नेहरूंचा आवडता सिद्धांत संविधानाला अजीबात मान्य नाही.

संविधानात चित्रित केलेली बरीच दृश्येच पहिल्या प्रजातंत्र दिवसाच्या सैनिक संचलनात फिरत्या प्रदर्शनाच्या रूपाने दाखविली होती.

यानंतर कोणत्याही सरकारी कार्यक्रमात अशा तऱ्हेचे दृश्य दाखविण्यात आले नाही. फक्त भगवान बुद्धाच्या २५०० वा निर्वाणदिन याला अपवाद होता. बुद्धापेक्षाही भारताच्या भावविश्वाशी ज्याचा अधिक निकटचा संबंध आहे त्या भगवान श्रीकृष्णाची ५००० वी जयंती साजरी करणे मात्र नेहरूंना सुचले नाही कारण बुद्ध हा त्यांच्या मते हिंदू नव्हता व श्रीकृष्ण हा हिंदूचा म्हणजे कम्युनॅलिस्टांचा शिरोमणि आहे.

आमचे राष्ट्रीयत्व असे काही नाही. वेळोवेळी आलेल्या आक्रमकांनी भारत वसविला आहे व या सगळ्यांच्या संस्कृतीच्या मिश्रणाने भारताचे समन्वित राष्ट्रीयत्व बनलेले आहे असा प्रचार व्याख्यानातून, आकाशवाणीवरून, दूरदर्शनवरून, पाठ्यपुस्तकातून व नंतर भाषणातूनच केवळ नव्हे तर मालिकांमधून देखील गेली ५० वर्षे सुरु आहे. नेहरू नेहमी विचारत "इतिहास पुसता येतो काय? इस्लामचे राज्य भारतात ५०० वर्षे व इंग्रजांचे २०० वर्षे नव्हतेच असे म्हणता येईल काय?"

या प्रतिपादनात हे विसरले आहे की इतिहासात घडलेली प्रत्येक गोष्ट ही आमच्या राष्ट्रीयत्वाचा भाग असते असे नाही. माझ्या आयुष्यात घडलेली प्रत्येक गोष्ट माझ्या चरित्राचा भाग असली तरी ती माझ्या व्यक्तित्वाचा भाग नाही. मला देवी आल्या होत्या हे माझ्या इतिहासातले सत्य असले तरी ती आपले विद्रूप माझ्या चेहऱ्यावर सोडून गेलेली असेल तरच माझ्या व्यक्तित्वाचा भाग होईल. पण असा भाग देखील कोणताही सुबुद्ध मानून मिटविण्याचा प्रयत्न करील, तेच अभिमानाचे निदान मानून मिरवत बसणार नाही. परकीय आक्रमणे ही मुळातच रोगासारखी आपला नाश करण्यास वा आपल्याला पीडा देण्यास वा अपंग करण्यास आलेली असतात. ती आमच्या राष्ट्रीयत्वाचा भाग कधीच होऊ शकत नाहीत.

## मुघल व ब्रिटिश आमचे बापजादे

भारताला सेक्युलर म्हणण्यात नेहरूंना भारताच्या इतिहासातले इस्लामी व ब्रिटिश आक्रमणाचे कालखंड हे आमच्या राष्ट्रीयत्वाचे अभिन्न अंग ठरवायचे होते. हिंदूंच्या धर्मांतराला उत्तेजन द्यायचे होते व भारतीय भाषांचे उच्चाटन करून इंग्रजीची स्थापना करायची होती. या विचाराला शोभणारे नाव वस्तुत: पारतंत्र्यपूजा हे आहे. सेक्युलॅरिझमशी त्याचा दूरान्वयानेही संबंध नाही. पण तरी नेहरूंनी या देशघातकी

विचाराला इंग्रजी कोशांची तमा न बाळगता सेक्युलॅरिझम हे नाव दिले.

आपल्या संविधानात ख्रिस्त व महम्मद यांची नावे देखील नाहीत. इस्लाम व ख्रिस्ती हे धर्म भारतात स्वयंमेव विकास पावले नाहीत. दोहोंच्याही मागे आक्रमकांच्या तरवारी होत्या. नेहरूंनी हे नाकबूल करण्याचा प्रयत्न केला व भाडोत्री इतिहासकार त्यासाठी कामास लावले. पण कोणत्याही जगन्मान्य इतिहासकाराला हे मान्य नाही. १८५७ घडले नसते तर आज बहुव्हंश भारत ख्रिस्ती झाला असता. पण १८५७ मध्ये हजारो वीरांनी बलिदान देऊन असे होऊ दिले नाही. राणी लक्ष्मीबाईंचे यासंबंधीचे उद्‌गार ध्यानात घेण्यासारखे आहेत. ती विष्णुभट्ट गोडसेला म्हणाली, ''मी मूठभर तांदळाची धनीण'' विधवा असल्यामुळे ''मला या भानगडीत पडण्याची गरज नव्हती. पण हिंदुधर्माचा अभिमान धरून या साहसास प्रवृत्त झाले व वित्ताची आणि जीविताची आशा सोडली.''

इस्लाम व ख्रिस्ती धर्म हिंदू धर्मापेक्षा श्रेष्ठ आहेत व भारत मुसलमान वा ख्रिस्ती झाला असता तर अधिक प्रगत झाला असता असे टॉयनबीसारखे मत असू शकते. पण आहे त्या स्थितीत हे धर्म हा आमच्या राष्ट्रीयत्वाचा भाग नाहीत.

नेहरूंना हिंदुत्व हे भारताचे राष्ट्रीयत्व आहे हे पूर्णपणे नाकारावयाचे होते. हिंदुत्व हे जर भारताचे राष्ट्रीयत्व नाही तर आहे तरी कोणते? याचे भारतीयत्व असे उत्तर दिले तर त्यावरून केवळ एक भौगोलिक उल्लेख होतो. उलट राष्ट्र ही कल्पना एका सामाजिक भावनेची द्योतक आहे. भारत हे वसतिस्थान आहे. राष्ट्रीयत्व म्हणजे वसतिस्थान असा अर्थ कोणत्याही कोशात दिलेला नाही.

भारताच्या सीमा कोणत्या? भारताच्या सीमेत पाकिस्तान घ्यायचा की नाही? गांधार, तिबेट व श्रीलंका हे भारताचे भाग आहेत की नाहीत? एकेकाळी ते भारताचे भाग मानले जात होते. ''हिंदू हे आमच्या राष्ट्रीयत्वाचे नाव स्वीकारले तर मुसलमान, ख्रिस्ती आदी एकतृतीयांश लोकसंख्येचे राष्ट्रीयत्व नाकारले जाते. भारत हा सध्या केवळ एक भूभाग आहे. राष्ट्र नाही. त्याला मी राष्ट्र बनविणार आहे.'' असा नेहरूंचा आविर्भाव होता.

''जे राष्ट्र नाहीच त्याला राष्ट्र बनविण्याचा खटाटोप कशाला?'' असे नेहरूंना विचारता आले असते.

भारत हे नेहरूंच्या कल्पनासृष्टीतले राष्ट्र मानले तरी कल्पनासृष्टीतले त्याचे स्वरूप काय हा प्रश्न उरतोच. सावरकरांनी आपल्या कल्पनेतील हिंदू राष्ट्राची संकल्पना हिंदुत्व या पुस्तकात सांगितली आहे. तदनुसार मुसलमान व ख्रिस्ती हे आज या राष्ट्राचे



घटक नसले तरी शुद्धीची चळवळ जोरात चालवून आम्ही त्यांना हिंदू राष्ट्रात सामील करून घेऊ असे सावरकरांचे म्हणणे होते. या कल्पनेत ब्रिटिश काळात व्यवहार्यता मुळीच नव्हती व आजही नाही. पण विचार या दृष्टीने ती अगदी स्पष्ट आहे.

नेहरूंच्या कल्पनेतील भारत राष्ट्राचे स्वरूप एवढे स्पष्ट नाही. मुसलमान व ख्रिस्ती यांना अल्पसंख्य म्हटल्याने सावरकरांचीच राष्ट्रकल्पना उचलून धरण्यासारखे होते. हिंदू बहुसंख्य व अहिंदू अल्पसंख्य हे धार्मिक वर्गीकरण आहे व याच वर्गीकरणाला संवैधानिक स्वरूप दिल्यामुळे धर्म हेच राष्ट्रीयत्वाचे स्वरूप आहे हे कबूल केल्यासारखे होते. पण नेहरूंना हिंदू धर्माचे राष्ट्रीयत्वही नाकारायचे होते व मुसलमानांना अल्पसंख्यही म्हणायचे होते. मुसलमानांना अल्पसंख्य म्हणताना हिंदुत्व हा भारतीय राष्ट्रीयत्वाचा मुख्य प्रवाह आहे ही गोष्ट नेहरूंना नाकबूल करता येत नव्हती. पण हे कबूल करण्यात त्यांना अत्यंत दुःख होत होते. म्हणून भारताचे हिंदुत्व हा भारतीय राष्ट्राचा मुख्य प्रवाह आहे हे नाकारण्यासाठी त्यांनी भारताचे राज्य सेक्युलर आहे असे म्हणण्यास सुरुवात केली. इंदिरा गांधी एकदा ''भारतीय राष्ट्रीयत्वाचा मुख्य प्रवाहच नाही'' असे स्पष्ट म्हणाल्या होत्या.

## हिंदू धर्माचे लक्षण

आपल्या संविधानात शिवाजी व गुरु गोविंदसिंग याची चित्रे आहेत. हे दोघेही नेहरूंचे ''राष्ट्रीय राज्यकर्ते'' जे मुघल त्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी लढले होते. तेव्हा अहिंदू याअर्थी भारताचे संविधान ''सेक्युलर'' नाही.

आमचे संविधान जर हिंदुराष्ट्राचे संविधान आहे तर भारतातील मुसलमानांचे काय? ते या राष्ट्राचे घटक आहेत की नाहीत?

याचे सरळ उत्तर असे की हिंदुधर्म व हिंदू राष्ट्र या वेगळ्या संकल्पना आहेत. धर्म अरबी असला तरी संस्कृती तो धर्म स्वीकारण्याच्या पूर्वीची असू शकते हे आग्नेय आशियातील देशांनी दाखवून दिले आहे. चीनचा धर्म भारतीय असला तरी चीनची संस्कृती भारतीय नाही.

भारतीय मुसलमान धर्माने हिंदू नसले तरी राष्ट्रीयत्वाने हिंदू आहेत. हे समजून घ्यायचे असेल तर हिंदू धर्म म्हणजे काय हे समजून घ्यावे लागेल.

हे समजून घेताना साऱ्या संस्कृत वाङ्मयात हिंदू धर्म असा शब्द कोठेही नाही हे ध्यानात ठेवले पाहिजे. मग आपण धर्माने हिंदू आहोत ते कसे?

धर्माने हिंदू आहोत म्हणजे आमचा धर्म हिंदमध्ये वा भारतामध्ये उद्‌भवलेला

आहे. हिंदू धर्म म्हणजे भारतात उद्भवला धर्म. हिंदू धर्म म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या धर्मात देशाचा उल्लेख न करता निर्देश करता येण्यासारखी काही तत्त्वे आहेत. ती म्हणजे १. अनेक उपास्ये २. उपास्यांचे अन्तर्यामित्व (immanent concepion of divinity) ३. मूर्तिपूजा ४. पुनर्जन्म व कर्मसिद्धांत ५. ईश्वर व ईश्वरतुल्य महात्मे मानवरूपाने वेळोवेळी या जगात अवतार घेतात. श्लोकरूपाने हे असे सांगता येईल.

उपास्यानामनेकत्वं तैरावास्यमिदं जगत् ।
पूजनं मूर्तिरूपेण यथाकर्म पुनर्भवः।
अवतारो भुवो भूत्यै बहुधा परमात्मनः।
धर्मस्यैतानि हिन्दूनां पंच तत्वानि सारतः।।

शीख, आर्यसमाज वगैरे काही पंथात मूर्तिपूजेला विरोध केला आहे. पण हे दोन्ही पंथ इस्लाम व ख्रिस्ती धर्म यांच्या आगमनानंतर त्यांच्या प्रभावाने उद्भवलेले आहेत.

धर्माने हिंदू असलेला माणूस वरील पाच तत्त्वांवर विश्वास ठेवणारा असला पाहिजे.

पण कट्टर हिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावरकरांचा वरील तत्त्वांपैकी कशावरच विश्वास नव्हता असे त्यांचे वाङ्मय वाचून वाटते. माझा देखील यापैकी कोणत्याही तत्त्वावर विश्वास नाही. मग आम्ही हिंदू कसे?

माझ्यापुरते याचे उत्तर मी असे देतो.

राष्ट्रीय धर्म हा राष्ट्रीय संस्कृतीचा भाग होऊन जातो. नास्तिक हिंदूचा वरील पाच कल्पनांपैकी कशावरच विश्वास असू शकत नाही. पण तरी त्याला या कल्पनाबद्दल आदर राहतो. कारण ज्या समाजात या कल्पना मान्य आहेत तो त्याला आपला समाज वाटतो. त्या कल्पना खऱ्या नसल्या तरी या समाजात हजारो वर्षे एकत्वाची भावना रुजविण्यास त्या उपयोगी पडलेल्या आहेत. काश्मीरात राहणारा हिंदू देखील इच्छापूर्तीसाठी आपल्यासारखाच सत्यनारायण करतो हे पाहून त्यांच्यात व आपल्यात एकत्वाचा धागा आहे असे केरळच्या हिंदूला वाटते. "सत्यनारायणाच्या मागची कल्पना खुशामतीमुळे मालक खुष होतो व आपल्याला बिदागी देतो" यासारखी एक बालिश कल्पना आहे म्हणून ती त्याज्य आहे. हा आक्षेप अप्रस्तुत आहे. कल्पना बालिश असली तरी पूर्वापार चालत आलेली व ऐक्यसाधक आहे की नाही याचे महत्त्व आहे.



## ऐक्पोषक विशेष

मृत्यूनंतर जीवन आहे की नाही? सदाचरणी माणसाला देखील दुःखमय जीवन का जगावे लागते? ईश्वर आहे काय? व तो असल्यास त्याचा जगाशी संबंध काय? या प्रश्नांची हिंदू धर्माने दिलेली उत्तरे कुणाला मान्य नसली तरी ती उत्तरे केवळ बालिश आहेत व विचारणीयच नाहीत असे कुणाचे म्हणणे नाही. या कल्पनांनी हजारो वर्षे हिंदू समाजाला ऐक्याचे सूत्र दिले आहे.

धार्मिक तत्त्वज्ञानाप्रमाणेच चालीरीती या देखील ऐक्य साधणाऱ्या असतात. काश्मीरच्या स्त्रिया देखील साडी/कुंकूत राहतात म्हणून केरळच्या हिंदूंना त्या आपल्यातल्याच आहेत असे वाटते. प्राचीन कालापासून चालत आलेल्या चालीरीती हानिकारक नसतील तर त्या प्राचीन कालापासून चालत आलेल्या व ऐक्यसाधक आहेत या एकाच कारणास्तव रक्षणीय ठरतात.

समान ऐतिहासिक स्मृती व त्याबद्दलच्या समान भावना राष्ट्रीयतेच्या आधारभूत आहेत. घोरीने पृथ्वीराजाचा पराभव केला. बाबराने राणा संगाचा पराभव केला व ह्यू रोजने राणी लक्ष्मीबाईचा पराभव केला याबद्दल ज्यांना दुःख होते ते एका समान ऐतिहासिक स्मृतीने बांधलेले आहेत.

अर्थात राष्ट्रीयत्व हे भावनात्मक सत्य आहे.

भावनामय स्मृतीच केवळ राजकीय इतिहासात असतात असे नाही. विज्ञान, कलाकौशल्य, चालीरीती या सर्व क्षेत्रात त्या असतात. शेक्सपीअर कितीही आवडला तरी कालिदासाचे काव्य आस्वादताना या काव्यामुळे साऱ्या जगात आपली प्रतिष्ठा वाढली आहे अशी आत्मसन्मानाची भावना पल्लवित होते. ती शेक्सपीअरच्या वाचनाने होत नाही. गॅलीलिआने पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध लावला म्हणून त्याच्याविषयी आदर वाटला तरी आर्यभट्टाचे या क्षेत्रातले कर्तृत्व आपल्याला आपलेच कर्तृत्व वाटते व आत्मविश्वास जागृत होतो. म्हणूनच समान परंपरा हानिकारक नसतील तर केवळ प्राचीन व सार्वत्रिक आहेत या एकाच कारणास्तव त्या वंद्य ठरतात. कारण त्याच राष्ट्रीयत्वाच्या मुळाशी आहेत. समानतेच्या अशा चिरस्थायी भावना हिंदू समाजात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहेत म्हणून हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व आहे.

एका अर्थी भारतीय मुसलमान हे देखील याच राष्ट्रीयत्वाचे घटक आहेत. पाकिस्तानचा इतिहास लिहिताना पाकिस्तानी मुसलमानांच्या हे लक्षात आले आहे. पाकिस्तानचा इतिहास १९४७ पासून सुरू होत असेल पण पाकिस्तान नागरिकांच्या पूर्वजांचा इतिहास १९४७ पासून सुरू होतो काय? बरे तो १९४७ पासून नव्हे तरी

कासिमच्या सिंधप्रांतावरील स्वारीपासून वा घोरीच्या भारतविजयापासून सुरू होतो काय?

मुळीच नाही. कासम हा आपला पूर्वज नसून अरबस्तानातून आलेला परका होता हे पाकिस्तानच्या मुसलमानांनादेखील चांगलेच आठवत आहे. आमचा पूर्वज कासिम नसून ज्याचे राज्य त्याने हिरावून घेतले तो दाहिर आहे असे सिंधचे मुसलमान देखील म्हणू लागले आहेत. इस्लामपूर्व नावे ठेवण्याची सिंधमध्ये चाल पडू लागली आहे. कारण आजच्या सिंध्यांचे पूर्वज अरबस्तानातले अरब नव्हते. ते हिंदूच होते. हीच गोष्ट पंजाबी मुसलमानांची आहे. पाकिस्तानची ५००० वर्षे असे एक पुस्तक पाकिस्तानात लिहिले गेले आहे. हा इतिहास अर्थात मोहंजोदरोपासून सुरू होतो. ''पाकिस्तानचा महान वैयाकरण पाणिनि याच्या स्मृतीस'' अशी एका उर्दू व्याकरणाची अर्पणपत्रिका आहे. कारण पाणिनि हा आजच्या भारतात राहत नसून पाकिस्तानातील शालातुरमध्ये राहता होता. ''वेद भारतात झाले नसून पाकिस्तानात झाले व त्यामुळे तुमच्यापेक्षा वेदांचा वारसा सांगण्याचा अधिकार आम्हाला जास्त आहे असे पाकिस्तानचे मुसलमान म्हणतात.'' असे एकदा लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मला सांगितले. आपले पूर्वज हिंदू होते ही जाणीव पाकिस्तानच्या मुळाशी असलेल्या भावनेलाच छेद देणारी आहे.

याच पार्श्वभूमीवर धर्मांतराच्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. प्रलोभन व धाकदपटशा यांच्या आधारे धर्मांतर करण्यास बंदी करायला संविधानाची व सर्वोच्च न्यायालयाची संमती आहे. नरकाची भीती व स्वर्गाचे आमिष यांचा यात समावेश होतो हे स्पष्ट व्हावयास हवे.

## रामजन्मभूमी : राष्ट्राचा मानबिंदू

वस्तुत: केवळ हिंदूंचे धर्मांतर बंद व्हावयास हवे. कारण हिंदुत्व ही राष्ट्रीयत्वाची भावना आहे व धर्मांतर झाल्यामुळे या भावनेला धक्का पोचतो. म्हणून केवळ पारलौकिक श्रद्धा बदलणे एवढेच या धर्मांतराचे स्वरूप नाही. आपले पूर्वज हिंदू होते हे नाकबूल करण्याकडे देखील मुसलमानांची प्रवृत्ती होती. एखाद्याला मूर्तिपूजा करण्यापेक्षा नमाज पढणे ही अधिक चांगली उपासना आहे असे वाटले तर त्याने खुशाल नमाज पढावा. त्यासाठी इस्लामची दीक्षा घेण्याची गरज नाही. दीक्षा घेतल्यामुळे एक व्यक्तीच नव्हे तर सारे कुटुंब केवळ उपासनापद्धतीच बदलत नसून आपला समाज सोडून स्वत:ला दुसऱ्या एका समाजाची घटक मानीत असतो. नमाज ही जास्त चांगली



उपासना वाटली तर एखाद्याने आपल्या घरातच एका कोपऱ्यात नमाज पढावा व दुसऱ्या कोपऱ्यात आपल्या बायकोला मूर्तिपूजा करू द्यावी.

या उलट भारतातील ख्रिस्ती व मुसलमान यांना हिंदुधर्मात प्रवेश देण्यास कोणतीच बंदी नसावी कारण तो राष्ट्रैक्यस्थापनेचा प्रयत्न आहे. ज्या धर्माचे संस्थापक स्वत:स हिंदू समजत होते त्या धर्माचा अहिंदूत समावेश करण्यास आडकाठी असावी. स्वत:चे नाव कोणतेही ठेवण्यास आडकाठी नाही. पण स्वत:च्या जातीचे नाव बदलण्यास आडकाठी आहे . एखादा ब्राह्मण ''मी महार आहे'' असे म्हणू लागला तर आजचे जाती तोडू इच्छिणारे सरकार त्याला तसे करू देणार नाही. त्याचप्रमाणे ''आम्ही हिंदू नाही'' असे म्हणणाऱ्या शीखावर आम्ही गुरु नानक व गुरुगोविंदसिंह यांनी ''आम्ही हिंदू नाही'' असे म्हटल्याचे दाखवून देण्याची जबाबदारी टाकावी. आम्ही हिंदू नाही असे म्हणणे म्हणजे ''जागे धर्म हिंदू सकल भण्ड भाजे'' असे म्हणणाऱ्या गोविंदसिंगाचे अनुयायित्व नाकारणेच होय. नुकतेच संघाने पंजाबात हिरिरीने प्रचार करून शीखांच्या जुन्या ग्रंथांत सर्वत्र हिंदू धर्म कसा पसरला आहे हे हजारो शीखांना पटवून दिले तेव्हा काही शीखांनी मानवाधिकार आयोगाकडे धाव घेतली. शीख हिंदू आहेत असे म्हटल्याने मानवाधिकारांचे हनन कसे होते? हा अधिकाराचा प्रश्न नसून ऐतिहासिक सत्याचा प्रश्न आहे. मानवाधिकार आयोगापुढे धाव घेणाऱ्या शीखांना ऐतिहासिक पुरावे देऊन संघाचा प्रचार खोडून काढता आला नाही हे स्पष्ट आहे.

वरील सूचनात इहवादाचे कोणतेच उल्लंघन नाही. कारण कोणी कोणत्या पारलौकिक श्रद्धा ठेवाव्या याबद्दल त्यात काहीच आग्रह नाही. आमचे पूर्वज हिंदू होते याची सतत जाणीव ठेवणारे मुसलमान ''धर्म यादृष्टीने इस्लाम श्रेष्ठ आहे.'' असा प्रत्यय आल्यामुळे मशिदीत प्रार्थना करीत असतील तर त्यामुळे राष्ट्राच्या ऐक्यभावनेला तडा जाणार नाही.

''रामजन्मभूमीचे आंदोलन हा धार्मिक मुद्दा आहे व म्हणून आमच्या सेक्युलर राज्याच्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे'' या नेहरूवादाच्या ओरडीला आमच्या संविधानाने राम व कृष्ण यांना केलेले वंदन छेद देते. राम व कृष्ण हे इहलोकातच अवतरले. भारत त्यांना ऐतिहासिक पुरुष मानतो. ते खरोखरच ऐतिहासिक होते की नाही हा प्रश्न आमच्या राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने अप्रस्तुत आहे. राष्ट्रीयत्व ही एक समान भावना आहे. अशी समान भावना राम व कृष्ण या व्यक्तीभोवती या देशात हजारो वर्षापासून आहे. म्हणून रामजन्मभूमीचा अपमान हा राष्ट्राचा अपमान आहे. ती एक पारलौकिक व धार्मिक बाब नाही. म्हणून सेक्युलॅरिझम शब्द वापरून रामजन्मभूमीच्या जीर्णोद्धाराच्या

मागणीला विरोध करणे हे विचारशक्तीचे दिवाळे वाजल्याचे लक्षण आहे. रामाच्या काळचे मुसलमानांचे पूर्वज देखील रामाचेच भजक होते. रामाचा अवमान करण्यात भारतीय मुसलमान स्वत:च्याच पूर्वजांचा अपमान करीत आहेत हे निर्विवाद सत्य भारतीय मुसलमानांपुढे ठेवले तर रामजन्मभूमीचे आंदोलन करण्याची गरज पडणार नाही.

"येथे मंदिराचा प्रश्न असल्यामुळे हा मुद्दा धार्मिक आहे व धार्मिक प्रश्न राजकारणात आणू नयेत" हा सेक्युलॅरिस्टांचा एक नारा झाला आहे. हे प्रश्न राजकारणात आणायचे नाहीत तर कोठे? विध्वस्त देवळांची पुन:स्थापना करू नये अशी सरकारची नीति असेल तर ती बदलून घेण्याचा निवडणुकीत जनतेचा कौल घेण्याखेरीज कोणता मार्ग आहे?

## सोमनाथाची प्रतिष्ठापना

हा प्रश्न निवडणुकीत उपस्थित करणे संविधानाच्या विरुद्ध आहे म्हटले तरी संविधान बदलवून घेण्याची प्रक्रिया संविधानातच सांगितली आहे. तिचा वापर करणारे सरकार निवडून द्या असे जनतेला सांगण्यात कोणता संविधानविरोध आहे?

नेहरूंच्या सेक्युलॅरिझमने आपले विषारी दात सोमनाथच्या जीर्णोद्धाराच्या वेळी काढले. सोमनाथ मंदिराचा वारंवार झालेला विध्वंस हा एक असह्य राष्ट्रीय अपमान आहे. जेव्हा जेव्हा राष्ट्रीय राज्यकर्ते प्रबल झाले तेव्हा तेव्हा त्यांनी सोमनाथचा जीर्णोद्धार केला. याच परंपरेनुसार सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथचा जीर्णोद्धार करण्याचा संकल्प सोडला. नेहरूंना हे पूर्णपणे नापसंत होते. त्यांनी जामसाहेब ऑफ नवानगरला पत्र लिहिले की "तुमच्या राज्यातील सोमनाथ मंदिरावर तुम्ही पैसा खर्च करू नये. कारण मंदिरावर सरकारी पैसा खर्च करणे सेक्युलॅरिझमच्या विरुद्ध आहे."

नेहरूंच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री काकासाहेब गाडगीळ लिहितात की याच वेळी मी नेहरूंच्या सांगण्यावरून मशिदी व दर्गे यावर वारेमाप सरकारी पैसा खर्च करीत होतो. (Government from within) नेहरूंच्या कोशात सेक्युलॅरिझमचा अर्थ हिंदुद्वेष हा होता हे यावरून स्पष्ट व्हावे.

नेहरूंनी आपल्या मंत्रिमंडळातील दुसरे एक सदस्य कन्हैयालाल मुन्शी यांना याच वेळी सोमनाथच्या जीर्णोद्धाराविषयी उत्साह दाखविण्याबद्दल दोष दिला. तेव्हा मुन्शी यांनी लिहिले.

"सोमनाथचा जीर्णोद्धार हे आमचे एक राष्ट्रीय कर्तव्य आहे व अशा कृत्यांना



पुनरुज्जीवनवाद म्हटले तर स्वतंत्र भारत ही कल्पनाच निरर्थक ठरेल."

नेहरूंनी राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांना देखील सोमनाथच्या जीर्णोद्धाराचे पुण्याहवाचन करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. नेहरूंनी कुरकूर केली की "अशा कृत्यांनी पाकिस्तानशी व एकूणच जगाशी आमचे संबंध बिघडतील." येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की पाकिस्तानात वा जगात कोठेही या कृत्याचा कधीच निषेध करण्यात आला नाही. सौदी अरेबियामध्ये बाबरी मशिदीच्या प्रकरणाबद्दल निषेध करणे हे भारताच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करण्यासारखे आहे असे सर्व नागरिकांना बजावण्यात आले होते.

भारतातील मुसलमानांनी देखील सोमनाथाच्या जीर्णोद्धाराच्या विरुद्ध मोर्चे काढल्याचे ऐकिवात नाही.

सोमनाथाचा जीर्णोद्धार केल्याने जग भारतावर नाराज होते पण आमचे राज्य हे मुस्लिम राज्य आहे व मुस्लिमेतरांना येथे मुस्लिमांच्या बरोबरीचे हक्क असू शकत नाहीत असे उघड करणाऱ्या पाकिस्तानवर मात्र जग खूष होते हे कसे काय?

बाबरी मशिदीच्या विध्वंसाबद्दल नरसिंहरावांनी उर बडविले पण याच वेळी काश्मीरात हिंदू मंदिरे पाडण्यात आली त्याबद्दल बडविण्यास त्यांच्या उरावर जागाच उरली नव्हती.

कोणत्याही मुस्लिम देशाने "आमच्या बाबराची मशीद पाडली हो" म्हणून आक्रोश केला नाही.

ब्रिटिशांनी उद्ध्वस्त मंदिराचा प्रश्न कसा हाताळला याचा विचार केला की नेहरूंपेक्षा आपल्या देशाला ख्रिस्ती देश म्हणून जाहीर करणारे ब्रिटिश हे जास्त सेक्युलर होते असे म्हणणे भाग पडते. काशी विश्वेश्वराचा प्रश्न ब्रिटिश काळात प्रीव्ही कौन्सिलपर्यंत गेला होता. पूर्वीच्या सरकारची कृत्ये वैध समजायची अशी आंतरराष्ट्रीय प्रथा आहे. त्याअनुसार प्रीव्ही कौन्सिलला म्हणता आले असते की "औरंगजेबाचे सरकार हे ब्रिटिशपूर्व सरकार होते व त्याच्या हुकूमाने काशी विश्वेश्वराचे देऊळ पाडले आहे. त्यामुळे ब्रिटिश सरकारला हे कृत्य कायदेशीर समजले पाहिजे व आता त्या मंदिरावर हिंदूंचा काही अधिकार नाही." पण प्रीव्ही कौन्सिलने ही भूमिका घेतली नाही. कारण natural justice म्हणजे सद्‌बुद्धीला काय न्याय्य वाटते याचाही विचार केला पाहिजे. केवळ सरकारची सर्वभौमता विचारात घेऊन उपयोग नाही असेही एक कायद्याचे तत्त्व आहे. त्याअनुसार हिंदूंना काही तरी न्याय्य बाजू आहे हे प्रीव्ही कौन्सिलने कबूल केले. एका निवृत्त हिंदू न्यायाधीशाने Indian Express मध्ये पत्र

लिहून अयोध्येचे राममंदिर बाबराने विध्वंसिले हा हिंदूंचा अपमान झाला व त्याचे परिमार्जन केले पाहिजे हा मुद्दा न्यायालयात विचारात घेण्यासारखाच नाही असे मत मांडले होते. प्रीव्ही कौन्सिलचे न्यायाधीश ख्रिस्ती असून देखील त्यांना हिंदूंच्या मागणीत न्याय दिसला यावरून ख्रिस्त्यापेक्षाही हिंदू हा किती कट्टर सेक्युलॅरिस्ट आहे हे दिसून आले.

## नेहरू शहाबुद्दीनपेक्षा जास्त सेक्युलर

प्रीव्ही कौन्सिलला हिंदूंची मागणी न्याय्य वाटली पण १७ व्या शतकात मंदिर पाडून बांधलेली मशीद विसाव्या शतकात पाडायला सांगायचे हे कायद्याच्या कालमर्यादेच्या दृष्टीने तसेच कोट्यवधी मुसलमान जेथे प्रार्थना करतात ती मशीद बळपूर्वक पाडणे व्यवहार्य नाही या दृष्टीने देखील स्वीकार्य वाटले नाही. म्हणून त्यांनी निकाल दिला की मुसलमानांनी या मशिदीत उपासना करावी पण तिची डागडुजी करू नये व ती आपोआप पडेल तेव्हा हिंदूंच्या स्वाधीन करावी. हा निकाल सर्वदृष्टींनी अत्यंत सुबुद्ध आहे व नेहरूंना त्याचा आधार घेऊन हे प्रश्न सहज सोडविता आले असते. पण नेहरूंना प्रश्न सोडवायचे नव्हते. आपण प्रीव्ही कौन्सिलपेक्षाही कसे जास्त सेक्युलर व जागतिक दृष्टीने पाहणारे आहोत हे जगाला दाखवून आपण केवळ भारताचे पुढारी नसून जगाचे पुढारी आहोत याचे प्रात्यक्षिक करायचे होते. प्रीव्ही कौन्सिलच्या हुकुमावर नेहरूकालात अंमलबजावणी झाली नाही व त्याचा आधारही ही भांडणे सोडविण्यास घेण्यात आला नाही.

मंदिरांच्या पुन:स्थापनेचा प्रश्न केवळ भावनात्मक व देशापुढील ''खरे'' म्हणजे दारिद्र्यासारखे प्रश्न सोडविण्यास निरुपयोगी आहेत असे नेहमी चेहरा लांब करून सांगण्यात येते. भावनात्मक प्रश्न दुर्लक्षणीय असतात असे मानले तर स्वराज्याचा प्रश्न देखील दुर्लक्षणीय मानता येईल. सधन होणे हेच केवळ एकमात्र मूल्य आहे असे मानले तर आपल्या देशात परकीय राज्य असले तर आपण सधन होऊ शकणार नाही. स्वराज्यातच केवळ सधनता लाभू शकते हे सिद्ध करता येईल काय?

स्वराज्याप्रमाणेच सर्व देशात एकत्वाची भावना असावी हेही भावनात्मकच उद्दिष्ट आहे अशी ऐक्यभावना रामजन्मभूमीसारखे प्रश्न धुमसत ठेवून साधणारी नाही. लाखो लोक काशी, मथुरा, अयोध्या वगैरे ठिकाणी यात्रेस वा दर्शनास जातात. ''हे बाबराने पाडले.'' ''हे औरंगजेबाने पाडले'' असे त्यांना सांगण्यात येते. या लाखो लोकांच्या मनात मुसलमानांबद्दल सद्भावना नांदू शकतील काय? हिंदु, मुस्लिम



ऐक्याच्या दृष्टीने देखील हे प्रश्न सुटणे अगत्याचे आहे.

यावर नेहरूंचा तोडगा असा की मुसलमानांनी ही स्थाने विध्वंसिली हे लोकांना सांगण्याची मनाई असावी. हा तोडगा असत्यावर समाज उभारण्याचा प्रयत्न आहे. असत्य किती दिवस टिकू शकेल? विशेषत: साऱ्या जगातले इतिहासकार जी गोष्ट सांगतात ती लोकांपासून किती दिवस लपून राहील? आर्याक्रमणासारखी असत्ये दोन शतके धुमाकूळ घालू शकली कारण जगाच्या चतुर्थांश भागावर साम्राज्य गाजविणाऱ्या इंग्रजांचा त्याला पाठिंबा होता. भारत सरकारजवळ असे सामर्थ्य राहण्याचा संभव आहे काय? तेव्हा जी पवित्र स्थळे लाखो लोकांच्या दर्शनाचे विषय आहेत त्यांच्याबद्दल तरी निदान कोट्यवधी लोकांच्या भावना दुखवणारे काही नसावे हे साधे तत्त्व अमान्य होईल काय?

काही लोक असे विचारतात की ५०० वर्षापूर्वीच्या मुसलमानांनी जे केले त्याची सजा आजच्या मुसलमानांना देणे योग्य आहे काय? कालच्या मुसलमानांनी आमची देवळे पाडली म्हणून आजच्या मुलसमानांच्या मशिदी पाडा असे कोणी म्हणत असेल तर हा प्रश्न प्रामाणिक ठरेल. पण असे कोणीही म्हणत नाही. जे देऊळ धर्मद्वेष म्हणून पाडले असेल त्याची पुन:स्थापना करावी एवढीच ही मागणी आहे. अशी मागणी करणे म्हणजेच आजच्या मुसलमानांचा द्वेष करणे होय असे सेक्युलॅरिस्टांचे म्हणणे आहे. त्यात ते हे गृहीत धरतात की हिंदूंची देवळे पाडण्याचा मुसलमानांना धार्मिक अधिकार आहे. हा अधिकार जे मुसलमान वा सेक्युलॅरिस्ट हिन्दू मानत असतील त्यांचा द्वेष करण्यात अन्याय तो कोणता? वस्तुत: रामजन्मभूमीचा उद्धार करण्याच्या मागणीला बव्हंश मुसलमानांचा विरोध आहे असे गृहीत धरणारे सेक्युलॅरिस्ट हेच खरे मुस्लिमद्वेष्टे आहेत. या विषयावर वाटाघाटी करण्यास मुसलमान तयार आहेत. हे शंकराचार्यांनी जो प्रयत्न केला त्यावरून स्पष्ट आहे. बाबरी समितीचे अध्यक्ष शहाबुद्दीन यांनी ''बाबराने राममंदिर पाडले असे सिद्ध झाले तर मी स्वत: तेथले मंदिर बांधण्यासाठी कारसेवा करायला तयार आहे.'' असे उद्गार काढले होते. कोणताही सेक्युलॅरिस्ट असे म्हणालेला नाही. सेक्युलॅरिस्टांनी मुसलमानांना समजाविण्याचा प्रयत्नच कधी केला नाही. उलट त्यांना चिथावण्या देण्याचेच 'सत्कार्य'' केले. उपासनास्थळांची १९४७ पूर्वीची स्थिती कायम ठेवावी असा ठराव नरसिंहरावांच्या वेळी लोकसभेने केला. याचा अर्थ हिंदूंची देवळे पाडण्याचे कृत्य समर्थनीय मानून चालावे असा होतो, असे असेल तर १९४७ च का? १९९३ का नव्हे? बाबरी मशिदीचा प्रश्न धुमसत ठेवायचा आहे म्हणून?

## हिंदूंनीही तसेच केले काय?

वस्तुत: हिंदूंची देवळे पाडण्याचा मुस्लिम राज्यकर्त्यांचा अधिकार आहे काय? व अशा देवळांचा उद्धार करण्यास मनाई असावी काय? यावर मुसलमानांचे सार्वत्रिक जनमत घेणे आवश्यक आहे. त्यात जर बहुसंख्य मुसलमानांनी नाही असे उत्तर दिले तर असे प्रश्न सोडविणे सुकर होईल.

हिंदूंची देवळे पाडणे समर्थनीय नाही असे सर्वसाधारण मुसलमानांना वाटणे स्वाभाविक आहे अशी सेक्युलॅरिस्टांना भीती असल्यामुळे, त्यांनी बाबराने वा औरंगजेबाने हिंदूंची देवळे पाडलीच नाहीत, असे खोटे आरोप करून मशिदी पाडणे हा "जातीय" हिंदूंचा हेतू आहे असा प्रचार सुरू केला. असा प्रचार उच्चपदस्थ हिंदूंकडून झाल्यावर तो कोणालाच वा त्यातून मुसलमानांना खरा वाटणार नाही असा संभव नाही. अशा प्रचारामुळे मुसलमानांचा जो मोठा समूह हिंदूंची मागणी स्वीकारण्यास तयार होता तोही हिंदूंच्या विरुद्ध झाला.

जेथे मुसलमानांनी देवळे पाडली हे नाकबूल करता येतच नाही तेथे सेक्युलॅरिस्ट लोक स्वत:च्या अचाट कल्पनाशक्तीतून निघालेली देवळे पाडण्याची कारणे देतात व "देवळात चोर दरोडेखोर लपले होते म्हणून देऊळ पाडले. इंदिरा गांधींनी सुवर्णमंदिर पाडले नाही काय? महम्मद गझनवीने सोमनाथच्या देवळात धन साठवून ठेवले होते म्हणून ते लुटले. हिंदूंचे देऊळ पाडण्याने पुण्यप्राप्ती होते या कल्पनेने नव्हे, काश्मीरच्या हर्षदेव राजाने देखील देवळे लुटली. मराठ्यांनी देखील शंकराचार्यांचा मठ दोनदा लुटला" असा इतिहास सांगतात.

मंदिरे वा मठ लुटणे व त्यातील मूर्ती फोडून त्या विध्वंसावर मशीद बांधणे ही एकच गोष्ट नाही. यात धनप्राप्ती हा उद्देश नसून धार्मिक कर्तव्याची भावना होती तसे मुस्लिम इतिहासकारांच्या साक्षीने दाखवून देता येते. गझनवी वा औरंगजेब हे केवळ लुटारू होते असे म्हणणे ही त्यांची अक्षम्य निंदा आहे. त्यांची कृत्ये धार्मिक उद्देशांनीच प्रेरित झालेली होती असेच कट्टर मुसलमानांचे मत आहे. "मी मूर्तिविक्या नसून मूर्तिभंजक आहे" असे गझनवीने सोमनाथच्या पुजाऱ्यांना गर्वपूर्वक सांगितले होते. याचे सविस्तर विवेचन सीमाराम गोयल यांनी हिंदू मंदिरावरील आपल्या ग्रंथात व विश्व हिंदू परिषदेने रामजन्मभूमीवरील आपल्या साक्षीत दाखवून दिले आहे. "हर्षदेवाने मंदिर लुटण्यात तुर्कांचे अनुकरण केले" असे कल्हण म्हणतो. शैवांनी केलेले जैनांवरील अत्याचार हे मुस्लिम आक्रमकांच्या अनुकरणाने झालेले आहेत. या अत्याचारात देखील जैनांची प्रार्थनास्थळे नष्ट करून तेथे वैदिक देवतांची मंदिरे उभारल्याची उदाहरणे



नाहीत. पुष्यमित्र शुगाने बौद्धांना मारले. त्यातही बौद्धांची प्रसिद्ध प्रार्थनास्थळे पाडल्याचे उल्लेख नाहीत. पुष्यमित्र शुगाचा व बौद्धांचा संघर्ष राजकीय असू शकतो. दोन हजार वर्षापूर्वीच्या इतिहासात काय घडले याबद्दल एक दोन वाक्यापेक्षा जास्त सविस्तर व अचूक उल्लेख सापडतच नाहीत. त्यामुळे या संदर्भात त्याची उदाहरणे घेणे बरोबर नाही. शिवाय सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की, मुसलमानांच्या मशिदी एखाद्या हिंदू राजाने पाडल्याचे सिद्ध झाले तरी ते देऊळ पाडून मुसलमानांना त्यांचे प्रार्थनास्थळ परत करू नये असे म्हणणारा एकही हिंदू सापडणार नाही. या पाश्वभूमीवर पाहिले असता हिंदूही असेच करीत या प्रतिपादनाचे औचित्यच नाहीसे होते.

पोथीवादी मुस्लिमांचे तत्त्वज्ञान जगविख्यात आहे व सेक्युलॅरिस्टांनी कितीही गप्पा मारल्या तरी आता ते लपून राहिलेले नाही. तालीबानांनी काल परवा अफगाणिस्तानातील बुद्धमूर्ती फोडून साऱ्या सेक्युलॅरिस्टांची वाचाच नाहीशी केली आहे. अमेरिकेसारख्या प्रबल राष्ट्रावर त्यांचा मोर्चा वळलेला आहे व त्यांच्या तत्त्वज्ञानाची माहिती अमेरिकेने जगभर पसरविली आहे.

## नेहरूवाद : देशद्रोहाचा कारखाना

नेहरू आणि नेहरूवाद भारतात फोफावला नसता तर मुस्लिम प्रश्न केव्हाच सुटला असता. पाकिस्ताननिर्मितीनंतर लगेच भारतात राहणाऱ्या मुसलमानांना पाकिस्तान झाल्याने आपले नुकसान झाले आहे हे लक्षात येऊ लागले होते. अखंड भारतात मुसलमानांची संख्या १/४ होती. खंडित भारतात ती १/१० झाली. लोकशाहीच्या काळात १/४ लोकसंख्या पूर्णत: विरुद्ध असता कोणतेच राज्य सुरळीतपणे चालू शकले नसते. खंडित भारतात मुसलमानांचे एकही मत न मिळता भक्कम बहुमताचे राज्य स्थापन होऊ शकते. बलराज मधोक यांनी दाखवून दिले आहे की लोकसभेच्या केवळ ३० जागात मुसलमान मतदारांचे मत निर्णायक ठरू शकते. म्हणजे मुसलमान एकजात विरुद्ध झाले तरी हिंदूमधला मोठा वर्ग त्यांच्या पाठीशी नसेल तर त्यांची राजकीय शक्ती शून्य राहील. उलट फारच थोडे हिंदू पाकिस्तानात राहिले व जे राहिले त्यांनाही हळू हळू हाकून देण्यात आले. तेव्हा ज्यांना पाकिस्तानातच राहून मुसलमानांची मर्जी सांभाळायची आहे असा हिंदूंचा वर्ग नगण्य आहे. पाकिस्तानचा तोडगा जवळ जवळ ५० टक्के मुसलमानांचे राजकीय सामर्थ्य नष्ट करणारा ठरला. हिंदूंशी मिळते घेणे हाच आपल्यापुढे एकमात्र पर्याय आहे हे भारतीय मुसलमानांना दिसून आल्यामुळेच त्यांनी हिंदी, समान नागरी कायदा, गोवधबंदी इत्यादींचा विनासायास

स्वीकार केला. संविधानातील राम/कृष्णांच्या चित्राबद्दल त्यांनी आक्षेप घेतले नाहीत. अकबराच्या ऐवजी औरंगजेबाचे वा बाबराचे चित्र लावा असे कोणताही मुसलमान म्हणाला नाही.

मुसलमान या मन:स्थितीत असताना जर हमीद दळवाईंचे तत्त्वज्ञान त्यांच्यापुढे ठेवण्यात आले असते तर भारतातला हिंदू/मुस्लिम प्रश्न कायमचा सुटला असता. हमीद दळवाई म्हणतात.

"भारतावर आक्रमण करणाऱ्या तुर्क/मुघलांचा द्वेष करण्याचा मला जेवढा अधिकार आहे तेवढा हिंदूंना नाही. कारण या आक्रमकांनी माझ्या पूर्वजांवर अत्याचार केले म्हणून मी आज मुसलमान आहे. हिंदूंच्या पूर्वजावर अत्याचार झाले नाहीत म्हणून ते हिंदू उरले."

याच मताचा मुसलमानांत प्रचार करण्यात भारत सरकारने आपले सर्व सामर्थ्य वापरले असते तर आपला धर्म वेगळा असला तरी आपले राष्ट्रीयत्व हिंदू आहे हे मुसलमानांना पटविणे अशक्य होते काय? हमीद दळवाई हा एक न भूतो न भविष्यति असा मानव होता काय? असे हजारो हमीद दळवाई भारतात निर्माण करण्याचे सामर्थ्य आमच्या सरकारमध्ये नव्हते काय?

सरकारचे सामर्थ्य हाती नसताना देखील महात्मा गांधींनी "भारत माता की जय" म्हणत हजारो मुसलमानांना पोलिसांच्या लाठ्या व तुरुंगवास यांची तमा न बाळण्याचे पाठ दिले होते. सीमा प्रांताचा मुसलमान पुढारी स्वत:ला सरहद्द गांधी म्हणवून घेण्यात भूषण मानीत होता, त्याने "महात्मा गांधी की जय" अशा घोषणा देत जिनांच्या मुस्लिम लीगचा पराभव करून सीमाप्रांतात काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापित केले होते व अखंड भारताचा पुरस्कार केला होता.

भारतीय मुसलमानांनी स्वत:चे राष्ट्रीयत्व हिंदू मानणे हीच स्वाभाविक प्रक्रिया आहे. ग्रीक लोक ख्रिस्ती झाले पण म्हणून प्लेटो व अरिस्टॉटल आमचे नाहीत, त्यांची भाषा ही आमची भाषा नाही असे ते म्हणत नाहीत. संस्कृतीने आम्ही ग्रीक आहोत व साऱ्या युरोपचे किंबहुना साऱ्या जगाचेच सांस्कृतिक जनक आहोत असे मानतात. पाकिस्तानच्या मुसलमानांत देखील वेद व पाणिनि आमचे आहेत, ही प्रवृत्ती मूळ धरू शकते तर भारतीय मुसलमानात का नाही?

याचे उत्तर सरळ आहे. नेहरू हिंदू संस्कृतीचा द्वेष करीत होते व तिचा शक्य तितक्या लोकांनी द्वेष करावा यासाठी त्यांनी आपले सर्व सामर्थ्य खर्च केले. या संबंधात हुमायून कबीराचे उदाहरण देण्यासारखे आहे. गांधीयुगात हुमायून कबीर आमच्या



कॉलेजच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करायला आले होते. त्यांनी हिंदू बहुसंख्य व मुसलमान अल्पसंख्य हा भेद ब्रिटिश पार्लमेंटमधील सरकारपक्ष व विरोधी पक्ष यांच्या भेदासारखा मानला पाहिजे. त्यात भिन्न राष्ट्रीयत्वाचा संबंध नाही असे प्रतिपादले. नेहरूयुगात भारतीय लोकसभेत याच हुमायून कबीरांनी "बहुसंख्य लोक अल्पसंख्य मुसलमानांना त्रास देत आहेत." असा आरोप केला. Times of India सारख्या "सेक्युलर" पत्राने देखील कबीरांच्या या भाषणाचे अल्पसंख्यवाद म्हणजे minorityism म्हणून वर्णन केले. नेहरूंचे दुसरे मुस्लिम मित्र शेख अब्दुल्ला यांना भारतविरोधी कारवाया केल्याबद्दल अटक करणे नेहरूंनाच भाग पडले. अब्दुल गफारखान गांधी युगात पूर्णपणे अखंड भारतवादी होते. पण पाकिस्ताननिर्मितीनंतर ते भारतात आले तेव्हा मुसलमानांवर अन्याय केल्याबद्दल ते भारतावर टीका करीत होते. नेहरूवादाचा मुसलमानांवर काय परिणाम झाला हे याचवरून स्पष्ट व्हावे.

## भौगोलिक राष्ट्रीयत्व

हिंदू-मुसलमान यांचे एकराष्ट्रीयत्व स्थापन करायचे म्हणजे हिंदू व मुसलमान या दोघांनाही भारताबद्दल सारखाच अभिमान व प्रेम वाटले पाहिजे या दिशेने प्रयत्न करायचे. नेहरूंच्या मताप्रमाणे भारताचे राष्ट्रीयत्व केवळ भौगोलिक असेल तर भारत या भूभागावरील प्रेम म्हणजे भारतीय राष्ट्रीयत्व अशी व्याख्या करावी लागेल. त्यात भारताच्या इतर रहिवाशांबद्दल प्रेम अंतर्भूत नाही. मग असे प्रेम तर बाबर व औरंगजेब यांनाही होते. बाबर आपल्या जन्मभूमीचे राज्य सोडून भारतात राज्य स्थापन करण्यास आला व औरंगजेबानेही आपल्या पूर्वजांची जी भूमी मध्य एशिया तेथे आपले राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला नाही. असे करण्याचे त्यांना-विशेषत: औरंगजेबाला-सामर्थ्य नव्हते असे म्हणता येत नाही. तेव्हा राष्ट्रीयत्व केवळ भौगोलिक असेल तर औरंगजेबाचे राष्ट्रीयत्व भारतीय होते असे ठरेल. नेहरूंचे असेच मत होते. यावरून नेहरूंची राष्ट्रीयत्वाची कल्पना सतत धर्माचा विचार करणे म्हणजे सेक्युलॅरिझम या त्यांच्या सेक्युलॅरिझमच्या कल्पनेप्रमाणेच भारताबद्दल स्वामित्वाची भावना ठेवून भारतीयांचा द्वेष करणे या वृत्तीला देखील भारतीय राष्ट्रीयत्व म्हणता येईल. या अर्थी औरंगजेबच नव्हे तर इंग्रज हे देखील भारतीय राष्ट्रीयत्वाचे पुतळे होते.

राष्ट्रीयत्वाच्या कोणत्याही संकल्पनेत केवळ व्यक्ती कुठे राहते यावरून तिचे राष्ट्रीयत्व ठरत नाही. राष्ट्रीयत्वच काय केवळ नागरिकत्वदेखील केवळ राहण्याच्या ठिकाणावरून ठरत नाही. निवासस्थानाच्या सरकारने नागरिकत्व मान्य करावे लागते.

औरंगजेबाचेच राज्य असल्यामुळे तो स्वत:ला भारतीय नागरिक मानीत असेल तर त्याला भारतीय नागरिक मानण्यास ते पुरेसे आहे. पण औरंगजेब कोठेही स्वत:ला भारतीय म्हणवत नाही. सारेच मुघल स्वत:ला तुर्क म्हणवीत. औरंगजेब लंगडा झाला तेव्हा ''माझा पूर्वज जो तैमूरलंग त्याच्यासारखा मी झालो'' म्हणून स्वत:चे समाधान करून घेत असे. स्वत:ला तुर्की म्हणविण्यात औरंगजेबाने आपले राष्ट्रीयत्व व वंश दोनही तुर्की असल्याचे जाहीर केले आहे. तेव्हा औरंगजेब भारतीय होता असे नेहरूंनी म्हणून उपयोग नाही, तो स्वत:ला जर भारतीय मानीत नव्हता तर नेहरूंनी त्याला भारतीय म्हणणे हा त्याच्यावर आरोप होईल.

भौगोलिक राष्ट्रीयत्व ही नेहरूंच्या डोक्यातली कल्पना आहे. या कल्पनेने कोणत्याही वास्तवाचा बोध होत नाही. औरंगजेब राष्ट्रीयत्वाने भारतीय होता असे मानण्यास तो भारतात राहणाऱ्या लोकांना म्हणजे मुख्यत: हिंदूंना आपले स्वजन मानीत होता की नाही हे पाहिले पाहिजे. पण औरंगजेबच काय अकबरदेखील हिंदूंना स्वजन मानीत होता याला काहीच पुरावा नाही. तोही स्वत:ला तुर्कच म्हणवीत असे. त्याची राहणी व रीतिरिवाज हे सर्व फारसी भाषा स्वीकारणाऱ्या तुर्कांसारखे होते. त्यात निवासस्थानापलीकडे भारतीयत्वाचा कोणताही अंश नव्हता. हिंदूबद्दल सहिष्णुता म्हणजे हिंदूबद्दलची आत्मीयता नव्हे. मानवांच्या समूहाला राष्ट्र म्हणतात, एखाद्या प्रदेशाला नव्हे. ज्यू लोकांना देशच नव्हता व ते जगभर विखुरले होते, तेव्हाही ते एकाच राष्ट्राचे घटक होते. भारतीयांबद्दल ज्याला आत्मीयता नाही त्याचे राष्ट्रीयत्व भारतीय आहे असे म्हणता येत नाही.

मुघलांच्या वेळी भारतीय वा इंडियन हे शब्द प्रचारात नव्हते. भारतीय या अर्थाचा त्यावेळी एकच शब्द होता व तो म्हणजे हिंदू. औरंगजेबाच्या काळी भारतीय मुसलमानांचा तुर्की मुसलमानांशी भेद दाखविण्यासाठी भारतीय मुसलमानांना हिंदू हा शब्द लावीत असत. मुस्लिम लीग व अलीगड विद्यापीठाचे संस्थापक सर सय्यद अहमदखान एका भाषणात म्हणाले होते की ''मी मुसलमान असलो तरी हिंदमध्ये राहतो या अर्थी हिंदू आहे.'' (भारतीय विद्याभवन : भारताचा इतिहास) ब्रिटिश मंत्रिमंडळाचे सदस्य भारताच्या भवितव्याबद्दल वाटाघाटी करायला भारतात आले होते तेव्हा बॅ. जिना ''मी इंडियन नाही'' असे म्हणाले होते. जिना स्वत: कायदेपंडित होते, तेव्हा वसतिस्थान द्योतविण्यासाठी त्यांनी इंडियन हा शब्द वापरला नव्हता अशी खात्री बाळगता येते. इंडिया नावाच्या देशात राहणाऱ्या सगळ्यांचे एक समान राष्ट्र आहे असे काँग्रेस म्हणत होती. त्याचा प्रतिवाद करण्यासाठी त्यांनी हे विधान केले. आपले



राष्ट्रीयत्व इंडियन आहे याचा अर्थ ते हिंदू आहे याशिवाय दुसरा होत नाही याच कारणास्तव जिनांनी स्वत:ला इंडियन म्हणण्याचे नाकारले.

## हिंदू-मुस्लिम संघर्षाची योजना

या संबंधी जिना व गांधी यात जो पत्रव्यवहार झाला त्यात गांधींनी म्हटले आहे की मी गुजराथी व जिनाही गुजराथी पण आमचे राष्ट्र वेगळे कारण आमचा धर्म वेगळा आहे. हे खरे मानले तर धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरते. ''धर्मांतरितांचे स्वतंत्र राष्ट्र झाल्याचे इतिहासात उदाहरण नाही.''

मुसलमानांना राष्ट्र मानणारे जिना इस्लाम धर्मावर श्रद्धा ठेवणारे नव्हते, शरियत ईश्वरप्रणीत आहे यावर त्यांचा विश्वास नव्हता व पाकिस्तानचे कायदे करण्यात त्यांनी केमाल पाशाचा ''सेक्युलर'' आदर्श डोळ्यासमोर ठेवला होता. ते डुकराचे मास खात. ते ''माझे राष्ट्र हिंदूपेक्षा वेगळे आहे.'' असे म्हणत तेव्हा त्यांना इस्लामी धर्मग्रंथांचे प्रामाण्य न मानणाऱ्या पण तरीही स्वत:ला मुस्लिम म्हणविणाऱ्या मुसलमानांचे राष्ट्र हिंदूपेक्षा वेगळे असते असे म्हणायचे होते. जास्त खोदखोदून विचारले असते तर जिनांनी आपले पूर्वज हिंदू होते हे नाकारले असते. त्यांनी अरब लीगच्या सदस्यत्वासाठी अर्ज केला होता यावरून हे स्पष्ट व्हावे. मुसलमानांशी त्यांच्या राष्ट्रीयतेबद्दल चर्चा केली व खोदखोदून विचारले तर आपले पूर्वज हिंदू होते हे ते नाकबूल करतात असा माझा अनुभव आहे. तेव्हा भारतीय मुसलमानांचे पूर्वज हिंदू होते या तथ्याच्या खडकावर मुस्लिम राष्ट्रवादाची नाव फुटते व या अविवाद्य मुद्यावर भर देणे हाच मुस्लिम राष्ट्रवादाच्या निराकरणाचा उपाय आहे. पाकिस्तानात देखील याच तथ्याच्या जाणिवेने सिंधी, पठाणी व बंगाली यांचा पाकिस्तान पासूनचा अलगाव निर्माण झाला आहे. त्यातूनच अखंड भारताची भावना निर्माण करणे सहज शक्य आहे.

नेहरूंनी भारतीय मुसलमानांचे पूर्वज हिंदू आहेत व म्हणून त्यांचा धर्म वेगळा असला तरी राष्ट्रीयत्व हिंदू आहे ही हमीद दळवाईंची विचारसरणी उचलून न धरता त्यांच्या दक्षिणोत्तर विरुद्ध अशी विचारसरणी उचलून धरली. मुसलमानांना तुमचे पूर्वज हिंदू होते असे न सांगता हिंदूंनाच ''औरंगजेब हा तुमचा राष्ट्रीय बादशहा होता व शिवाजी लुटारू होता'' असे सांगण्यास सुरवात केली. ''हिंदू-मुस्लिम प्रश्न प्रथम शिवाजीने, नंतर इंग्रजांनी व आता या दोघांचेही अपत्य जो राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्याने निर्माण केला, या शक्ती नाहीशा केल्या तर हिंदू-मुस्लिम प्रश्न सुटेल'' अशी नेहरूंची धारणा होती. लाल किल्ल्यावर मुघलांचे गुणगान गाण्यासाठी छायाप्रकाशाचे कार्यक्रम

त्यांनी सुरू केले व मुघलांना खडे चारणाऱ्या मराठ्यांची निंदा करण्यासाठी डॉ. ताराचंद यांच्यासारखे भाडोत्री इतिहासकार नेमले. संविधानाने संस्कृतनिष्ठ हिंदी ही केंद्र सरकारची भाषा असावी असा स्पष्ट शब्दात आदेश दिला असतानाही काँग्रेसमधीलच काही "जातीय हिंदू"-म्हणजे गोविंद वल्लभ पंतादि- उर्दू भाषकावर म्हणजेच मुसलमानांवर हिंदी व संस्कृत "लादत" आहेत असा आक्रोश केला. बंगाली मुसलमान उर्दूचा द्वेष करतात व संस्कृतमय बंगालीलाच आपली भाषा समजतात हे नेहरूंना माहीत नव्हते असे म्हणता येत नाही. मुसलमानांच्या भाषा हिंदूंच्या भाषापेक्षा वेगळ्या आहेत अशा प्रकारचा प्रचार करून तुम्ही मुसलमानांचा अलगाव वाढवीत आहात व दंगे वाढवीत आहात असे पंतांनी व राजेंद्रप्रसादांनी खडसावले तेव्हा नेहरू उघडच म्हणाले, "माझ्या तत्त्वांमुळे दंगे वाढत असतील तर त्याची मला पर्वा नाही" (गोपाल)

_ हा हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रयत्न नसून मुसलमानांना हिंदूंच्या विरुद्ध चिथावणेच होते.

## विचारस्वातंत्र्याचे शत्रू

एका दृष्टीने पाकिस्तानची निर्मिती हिंदू राष्ट्राची कल्पना मुसलमानांत पेरली जाण्यास अनुकूल अशी घटना होती हे "जीये सिंध" व बंगलादेशसारख्या चळवळींनी सिद्ध केले आहे. गांधींना जी संधी कधीही मिळाली नाही ती नेहरूंना मिळाली होती. ते भारताचे सर्वसत्ताधारी झाले होते. स्वराज्याच्या चळवळीने निर्माण केलेल्या भावना ताज्या असलेली जनता त्यांच्या मागे होती. त्यांनी हिंदू-मुसलमानांना समान शिक्षणपद्धती दोघांनीही समान असलेल्या मातृभाषात सुरू केली असती. इतिहास शिक्षणात भारतीय मुसलमानांचे पूर्वज हिंदू होते. पाकिस्तानचा इतिहास १९४७ पासून सुरू झाला तरी भारतीय मुसलमानांच्या पूर्वजांचा हिंदूप्रमाणेच वेदापासून सुरू होतो या तथ्यावर भर दिला असता व भारताला निदान चीनसारखे बलिष्ठ केले असते तर हिंदू-मुस्लिम प्रश्न सहज सुटला असता. हे सर्व नेहरूंना सहज शक्य होते. त्यांनी सर्वस्वी याच्याविरुद्ध वर्तन करून भारताला बलिष्ठ करणे तर सोडाच त्याला ६५ च्या युद्धाने सिद्ध केल्याप्रमाणे पाकिस्तानपेक्षाही दुबळे करून सोडले. त्यामुळे मुसलमानांना आपण भारतीय आहोत याचा अभिमान वाटण्याचे काहीच कारण उरले नाही. उलट त्यांच्याच मतांनी निर्माण झालेले पाकिस्तान भारतापेक्षा बलिष्ठ आहे याचा प्रत्यय आल्यामुळे हिंदू राष्ट्रीयत्वापेक्षा मुस्लिम राष्ट्रीयत्वाचे आकर्षण वाटू लागले व आपली जातकुळी हिंदू



आहे हे नाकारण्यास त्यांना उत्तेजन मिळाले.

नेहरू एकदा अलीगड विद्यापीठात भाषण देताना म्हणाले की "मुस्लिम संस्कृती अशी काही नाही." नेहरूंनी मुस्लिम अलगाव वाढविला या आरोपाचे खंडन करण्यासाठी या भाषणाचा आधार घेण्यात येतो. पण या वाक्याचा अर्थ अखंडभारतवादी समजात त्यापेक्षा अगदी वेगळा आहे. "मुसलमानांची वेगळी संस्कृती नाही म्हणजे आज जी मुस्लिम संस्कृती म्हणून समजली जाते तीच हिंदूंची देखील वर्तमान संस्कृती आहे. हिंदूंनी वेद व संस्कृत वाङमय यांना आपल्या संस्कृतीचे निधान समजणे म्हणजे एखाद्याने २०० वर्षापूर्वीचे त्याच्या पूर्वजांचे पडके घर व पिढ्यानपिढ्या दुसऱ्याकडे असलेली त्या जागेची मालकी विसरून तेच आपले घर आहे म्हणून सध्याचे अद्ययावत घर सोडण्याचा हट्ट धरणे होय." असा नेहरूंचा "मुस्लिम संस्कृती वेगळी नाही." असे म्हणण्यात उद्देश होता.

नेहरूंच्या "सेक्युलॅरिझमचा" मुख्य पैलू भारतात मुसलमानांना विशेषाधिकृत जमात म्हणून वागविणे हा होता. कोणालाही विशेषाधिकृत मानणे हे आपल्या संविधानाच्या केवळ शब्दयोजनेच्याच नव्हे तर उद्दिष्टांच्याही विरुद्ध आहे. जाती, धर्म व लिंग यांच्या आधारावर पक्षपात करण्यात येणार नाही अशी संविधान ग्वाही देते. असे असता नेहरूंनी आपल्या केंद्रातील तसेच प्रांतातील सहकाऱ्यांना मुसलमानांना नागरी व सैनिक सेवामध्ये पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात यावे म्हणून समज दिली. नोकऱ्यात प्रतिनिधित्वाची भाषा करणे म्हणजे नोकऱ्यांना कायदेमंडळसदस्यत्वांच्या पंक्तीला नेऊन बसविणे होय.

मुसलमानांना भारतात परके समजले जाते म्हणून नेहरू अश्रू ढाळीत. पण यात दोष कोणाचा? ज्या देशाचे आपण नागरिक होणे शक्यच नाही असा देश आपल्या जन्मभूमीचे तुकडे पाडून निर्माण करण्यात यावा अशी मागणी मुसलमानांनी पाकिस्तानच्या निर्मितीच्या बाजूने मत देऊन केली होती. अशा लोकांना देश परके मानीत होता ही देशाची चूक आहे काय? मुसलमानांनी पाकिस्ताननिर्मिते हे आपले स्वरूप बदलले आहे असे भारताला वाटण्यासारखी कोणती वागणूक केली होती?

नेहरूंच्या वरील सारख्या कृत्यांना हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी केलेली कृत्ये असे लेबल लावण्यात येते. पण मुसलमानांना केवळ मुसलमान म्हणून पसंत करणे हिंदू-मुस्लिम ऐक्यास पोषक होईल की हिंदू-मुस्लिम शत्रुत्वास?

नेहरूंच्या कोशात सेक्युलॅरिझम म्हणजे हिंदूंच्या व त्यांच्या धर्माचा द्वेष असा अर्थ होता हे भारतीय विद्याभवनाने प्रकाशित केलेल्या Religious Leaders या

पुस्तकाविरुद्ध मुसलमानांनी केलेल्या दंगलीच्या वेळी दिसून आले.

## ब्रिटिशांचा सेक्युलॅरिझम

Religious Leaders या पुस्तकात इतर धर्माच्या संस्थापकांप्रमाणेच मुस्लिम धर्माचा संस्थापक महम्मद पैगम्बर यांच्यावरही लेख आहे. हा लेख एका जगन्मान्य विद्वानाने लिहिला आहे. तो मुसलमानांच्या भावना दुखविणारा आहे. म्हणून त्या पुस्तकावर बंदी घालण्यात यावी अशी मुसलमानांनी मागणी केली. कायद्याप्रमाणे केवळ धार्मिक भावना दुखवतात म्हणून एखादे लिखाण दंडनार्ह ठरत नाही. लेखकाचा उद्देशच भावना दुखविण्याचा होता, सत्य सांगण्याचा नव्हता असे सिद्ध झाले पाहिजे. पण या लेखाबद्दल असे काही सिद्ध करणे अशक्य होते. या पुस्तकावर पाकिस्तान धरून इतर कोणत्याही मुस्लिम देशाने आक्षेप घेतला नव्हता. पुस्तकावर बंदी आणली तर न्यायालयांना ती मान्य होण्याचा संभव नव्हता.

मुसलमानांनी यावर उग्र रूप धारण केले. विजेच्या तारा तोडणे, इतर रीतीने संचाराची साधने तोडणे, लुटालूट करणे वगैरे प्रकारचे आंदोलन सुरू केले. नेहरूंच्या पोलिसांनी त्याविरुद्ध काही कारवाई केल्याचे वाचनात आले नाही.

उलट नेहरूंनी दिल्लीत रामलीला मैदानावर एक व्याख्यान देऊन या लेखावर तोंडसुख घेतले व ''या पुस्तकाविरुद्ध कारवाई करता यावी म्हणून धर्मसंस्थापकांची निंदा करणे हाच गुन्हा ठरविण्यात यावा व ती निंदा साधार की निराधार हा मुद्दा अप्रस्तुत मानण्यात यावा या अर्थाचा कायदा करण्यात यावा असा मी गृहमंत्र्यांना आदेश दिला आहे असे सांगितले. या घोषणेतील ''धर्मसंस्थापकांची'' हा शब्दप्रयोग महत्त्वाचा आहे. कारण हिंदू धर्माला संस्थापक नाहीत. राम-कृष्ण हे हिंदू धर्माचे संस्थापक नाहीत. त्यामुळे राम-कृष्णांची निंदा करणे हा या कायद्याप्रमाणे गुन्हा ठरणार नव्हता. तात्पर्य मुस्लिम व ख्रिस्ती यांना धार्मिक भावना बाळगण्याचा अधिकार आहे, हिंदूंना नाही असा या कायद्याचा अर्थ होतो.

पुढे या कायद्याचे काय झाले याबद्दल काहीच बातमी वाचण्यात आली नाही. याचे कारण स्पष्ट आहे. फक्त धर्मसंस्थापकांची निंदा दंडनीय समजण्यात यावी असे म्हणून हिंदू धर्मावरील निंदा अदंडनीय ठरविण्यास डॉ. राजेंद्रप्रसाद, गोविंद बल्लभ पंत वगैरे पुढारी तयार नव्हते व हिंदू धर्माचीही निंदा दंडनीय मानल्यास हिंदू त्याचा उपयोग मिशनऱ्यांविरुद्ध करून मिशनऱ्यांना सारा उद्योगच बंद पाडतील अशी नेहरूंना भीती वाटली.



हा केवळ तर्क आहे असा यावर आक्षेप येऊ शकतो. पण नेहरू व त्यानंतरच्या काँग्रेस सरकारांचे वर्तन या तर्काची पुष्टी करणारे आहे. धर्मनिंदा या कारणास्तव इस्लाम व ख्रिस्ती धर्म यांची निंदा दंडनीय न ठरविली तरी सामाजिक शांततेस धोका या सबबीस्तव तिच्यावर बंदी घालण्याचा क्रम काँग्रेस सरकारांनी सुरू ठेवला. सीमाराम गोएल यांना कुराणाबद्दल न्यायालयात सादर केलेले निवेदनही प्रसिद्ध करण्यास मनाई करण्यात आली. रामस्वरूप यांनी हादिसच्या आधारे केलेली इस्लामची चर्चा देखील विकण्याची वा ग्रंथालयात ठेवण्याची बंदी करण्यात आली. हिंदू धर्मावरील अशा तऱ्हेच्या कोणत्याही विवेचनाला बंदी करण्यात आली नाही. उलट 'रिलिजस लीडर्स' या पुस्तकाबद्दलच्या दंगलीच्या सुमारासच लीलावती मुन्शींनी श्रीकृष्णाची निंदा केली. त्याबद्दल हिंदूंनी व्यक्त केलेला रोष सरकारदरबारी चुळबुळ देखील उठवू शकला नाही. शूर्पणखाविरूपणाबद्दल मिशनऱ्यांनी केलेली रामाची जुनीच निंदा पुन: उगाळण्यात आली. तिला आकाशवाणीवर देखील प्रसिद्धी देण्यात आली मग तिच्याविरुद्ध कारवाई करणे तर दूरच.

सेक्युलॅरिझम म्हणजे हिंदुद्वेष याचे आणखी एक प्रमाण मिळाले.

नेहरू व नंतरची काँग्रेस सरकारे याच्या आमदानीत हिंदू-मुस्लिम दंगे ब्रिटिश काळापेक्षा जास्त का झाले यावर प्रकाश पाडण्यास हा मुद्दा उपयुक्त ठरतो. ब्रिटिश काळात ''रंगिला रसूल'' नावाचे एक पुस्तक प्रचारात होते. एच. जी. वेल्सच्या Outline of World History या पुस्तकात थोडक्यात मांडलेला मुद्दा या पुस्तकात विस्ताराने मांडला आहे. या पुस्तकावरून मुसलमानांनी ब्रिटिश काळात दंगे केल्याचे ऐकिवात नाही. पुढे सिंधमध्ये नाथूराम नावाच्या एका लेखकाने असेच पुस्तक लिहिले. त्याविरुद्ध मुसलमानांनी फिर्याद केली. ती फेटाळण्यात आली. तेव्हा फिर्यादीने न्यायाधीशासमोरच नाथूरामला गोळी घातली. गोळी घालणाऱ्याला ताबडतोब अटक करण्यात येऊन न्यायाच्या योग्य प्रक्रियेनंतर त्याला फाशी देण्यात आली. ''फाशीवर जाणाऱ्याची शहीद म्हणून आम्हाला प्रेतयात्रा काढायची आहे म्हणून त्याचे प्रेत आमच्या स्वाधीन करावे'' अशी काही मुसलमानांनी विनंती केली. तेव्हा त्यांना सांगण्यात आले की ''प्रेताचा ताबा देण्यास हरकत नाही पण त्याची मिरवणूक न काढता शांतपणे प्रेतसंस्कार झाले पाहिजेत.'' ताबा घेणाऱ्यांनी असे वचन दिले, पण तुरूंगाच्या बाहेर गेल्याबरोबर शहीदाची प्रेतयात्रा काढली. ''ताबडतोब प्रेत परत करा व मिरवणूक सोडून जा'' अशी पोलिसांनी मिरवणूकवाल्यांना आज्ञा केली व ती अंमलात आली नाही म्हणून गोळीबार केला. या गोळीबारात ६० मुसलमान बळी पडले व पोलिसांनी प्रेत ताब्यात घेतले.

## सेक्युलर राज्यातील हिंदू व मुस्लिम संहिता

ब्रिटिशांनी आपल्या बोलण्यानेच नव्हे तर वर्तनाने हे स्पष्ट केले होते की कोणत्याही धर्माची निंदा हा गुन्हा नाही. केवळ निंदा करून एखाद्या धर्माबद्दल द्वेष पसरविणे याच हेतूने निंदा केली, या निंदेला कोणताही आधार नाही हे सिद्ध केले पाहिजे. ब्रिटनचे सिंहासन ख्रिस्ती धर्मरक्षक असले तरी १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार भारताचे सरकार ख्रिस्ती वा इतर कोणत्याही धर्माचे नाही. जो फौजदारी कायदा ख्रिस्त्यांना लागू आहे, तोच ख्रिस्तेतर धर्मीयांनाही लागू राहील. कायद्याचा भंग करणाऱ्यांना कोणतीही दया दाखविण्यात येणार नाही. ब्रिटिशांनी धर्मासंबंधीचे कायदे कोणताही धार्मिक पक्षपात न करता अमलात आणले. उलट नेहरूकाळात फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत हिंदूविरुद्ध पक्षपात करण्यात येई. डेली टेलिग्राफसारख्या ब्रिटिश वर्तमानपत्राने देखील नेहरू मुस्लिमांचे लाड (Molley Coddling) करतात असे उद्‌गार काढले होते.

दुसऱ्यांच्या धर्मात वाईट काय आहे याचा प्रचार खरा असला तरी ऐक्यपोषक नाही म्हणून तो टाळावा असे काही सद्बुद्ध लोक म्हणतील. पण खऱ्याकडे डोळेझाक करणे तात्पुरत्या अडचणी निभावून नेणारे असले तरी दीर्घकालीन परिणाम साधणारे नाही. धर्माधर्मात कलह टाळायचे असतील तर सगळ्या धर्मांची खोटी स्तुती करण्यापेक्षा सर्वच धर्मांचे सत्यस्वरूप उघड करणे हा त्यावर उपाय आहे. असे केल्याने सर्व धर्मांचाच अभ्यास करण्याची वृत्ती वाढीस लागेल व काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर दगड मारू नयेत ही भावना वाढीस लागेल. आज फक्त हिंदू धर्मावर वाटेल ती टीका केली तर चालते पण इस्लाम व ख्रिस्ती धर्माबद्दल विशेषतः हिंदूंनी काही बोलू नये असे मत प्रतिष्ठित झाले आहे. यामुळे हिंदू धर्म फक्त वाईट आहे. इतर धर्म सोवळे आहेत ही कल्पना हिंदू सुशिक्षितांच्या मनात देखील घर करू लागली आहे. राम, कृष्ण, गीता यांची जी टवाळी केली जाते ती आबालवृद्धांच्या कानापर्यंत पोचली आहे. उलट हिंदूंना ख्रिस्ती व इस्लाम धर्माबद्दल अजीबात ज्ञान नाही. राम-कृष्ण झालेच नाहीत असे सुशिक्षित हिंदू बेलाशक सांगतो, पण ख्रिस्ताच्या ऐतिहासिक अस्तित्वाबद्दलदेखील वाद आहे हे त्याला माहीत नसते. आपल्याच देशात उद्‌भवलेल्या बौद्ध धर्माबद्दल तर उच्चशिक्षित सरकारी अधिकाऱ्यात देखील एवढे अज्ञान आहे की, दलाई लामा भारतात आला तेव्हा त्याच्या भोजनाची व्यवस्था करताना मांसाहार अजीबात वर्ज्य करण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या होत्या. मग दलाई लामालाच या आहाराने आपली उपासमार होत आहे असे सांगावे लागले.



नेहरूंच्या "सेक्युलॅरिझमचे दुसरे अपत्य हिंदूसंहिता हे होय. संविधानाने सर्व नागरिकांना लागू होणारा एक समान कायदा असावा असा स्पष्ट आदेश दिलेला आहे. नेहरूंनी त्याचे स्पष्ट उल्लंघन करून हिंदूसाठी वेगळी संहिता लागू केली. दुर्गादास यांनी याबद्दल प्रश्न विचारला असता नेहरूंनी सांगितले की, "मुसलमानांना बहुसंख्य हिंदूंनी पारित केलेला कायदा लागू केला तर मुस्लिम देश रूष्ट होतील."

या उत्तराने अनेक गोष्टी स्पष्ट होतात. पोर्तुगीज काळात गोव्यात सर्व नागरिकांना एकच कायदा लागू होता व अजूनही लागू आहे. त्यामुळे मुस्लिम देश रूष्ट झाले नाहीत. ब्रिटिशांच्या काळी धर्माप्रमाणे कायदा बदलेल हे तत्त्व मान्य नव्हते. कायदा रूढीवर आधारलेला असला पाहिजे या तत्त्वाला ब्रिटिशांनी महत्त्व दिले होते. त्यामुळे मुस्लिमांच्या देखील ज्या जातींना गेली शंभर वर्षे हिंदू कायदा लागू होता त्यांना ब्रिटिश काळातही हिंदू कायदाच लागू राहिला. गुजराथेतील कच्छी मेमन हे याचे एकमात्र उदाहरण नाही. केरलातील मरुमक्कायम हा कायदा फक्त हिंदूपुरताच मर्यादित नाही. ब्रिटिशांच्या काळी तो मुसलमानांनाही लागू होता. १९४० साली मध्यवर्ती विधिमंडळाने मुस्लिमांना वेगळा कायदा लागू असावा असा ठराव केला होता. पण या ठरावाची अंमलबजावणी होऊन मुसलमानांसाठी वेगळ्या कायद्याचे ग्रंथन व त्याला कायदेमंडळांची मान्यता हे सर्व विधी सुरूही झाले नव्हते. कारण १९३९ सालीच दुसरे महायुद्ध सुरू झाले होते व असली कामे करण्यात इंग्रजांना रस नव्हता. डॉ. आंबेडकरांनी समान नागरी कायद्याचा संविधानाचा आदेश पारित झाला तेव्हा याकडे मुसलमानांचे लक्ष वेधले होते. अलीकडे न्यायमूर्ती रत्नपारखी यांनी व्याख्यान-लेखनाद्वारे हाच मुद्दा मांडला आहे. मुस्लिम राष्ट्रांनी यासंबंधी कधीच नापसंती व्यक्त केली नव्हती.

## ३७० कलमाचा हेतू

भारताबाहेरचे मुसलमान नव्हेत तरी भारतातले मुसलमान हिंदू बहुसंख्येने मुस्लिमासाठी कायदा केला म्हणून नाराज होतील असाही संभव नव्हता. समान नागरी कायद्याचा आदेश संविधानात घातला तेव्हा भारतीय मुसलमानांनी त्याचा निषेध केला नव्हता. महाराष्ट्रात भाजप/शिवसेना सरकारने मुस्लिमासकट सर्वांना लागू होणारा दत्तक व विवाहविषयक कायदा पारित केला तेव्हा मुस्लिम समाजात चुळबुळ देखील झाली नव्हती. केंद्रातील कॉंग्रेस सरकारने राष्ट्रपतींची संमती त्याला मिळू दिली नाही म्हणून या ठरावाला कायद्याचे स्वरूप येऊ शकले नाही.

बाहेरचे मुस्लिम देश वा भारतातील मुस्लिम रागावतील हे वस्तुत: हिंदू संहिता पारित करण्याचे कारणच नव्हते हे यावरून स्पष्ट व्हावे.

न्यायमूर्ती छागला यांच्यासमोर हिंदू संहिता संविधानविरोधी आहे असे न्यायालयाने जाहीर करावे म्हणून याचिका आली असता "मुस्लिम समाज अजून आधुनिक सुधारणा पचविण्याइतका प्रगत झाला नाही, म्हणून त्याला व हिंदूंना एकच कायदा लावणे योग्य होणार नाही." असा त्यांनी निकाल दिला. हिंदूंचे सर्व घटक तरी हिंदूसंहिता मान्य करण्यास तयार आहेत काय? जे समाज बहुपत्नीकत्व पाळत होते ते अजूनही पाळतात. ज्यांच्यात बालविवाह रूढ होते त्यांच्यात कायद्याची पर्वा न करता अजूनही बालविवाह होतात. कायदा नुसता कागदावर आहे.

नेहरूंनी असे का केले याचे उत्तर नेहरूंच्या मनाची मीमांसा करताना देण्यात येईल. नेहरूंच्या भक्तांना नेहरू समजले नाहीत त्याचप्रमाणे नेहरूंच्या विरोधकांना देखील ते समजले नाहीत. विरोधक या कृत्यांचे वर्णन appeasement म्हणजे तुष्टीकरण असे करतात. पण अपीझमेंटचा अर्थ हट्ट पुरविणे असा होतो. नेहरूंच्या तुष्टीकरणात ज्यांचे तुष्टीकरण त्यांनी केले त्यांनी हट्ट केलेलाच नव्हता. "आम्हाला समान कायदा लागू करू नका" अशी मुसलमानांनी मागणी केलीच नव्हती. संविधानसभेत मुसलमान होते तिच्याच समान संहितेचा ठराव झाला तेव्हा हिंदू-मुस्लिम असे तट पडल्याचा उल्लेख नाही. तसेच "नोकऱ्यात आम्हाला हिंदूंच्या बरोबरीचे वा त्याहून जास्त मोठे स्थान मिळाले पाहिजे" अशी नेहरूंनी मुसलमानांच्या वतीने केलेली मागणी मुसलमानांनी कधी केलेलीच नव्हती. "हिंदी आमची भाषा नाही म्हणून आम्ही केंद्र सरकारची भाषा म्हणून हिंदीचा स्वीकार करणार नाही." असे मुसलमान म्हणाल्याचीही नोंद नाही.

मुसलमानांनी काश्मीरला ३७० कलम लागू करावे अशी मागणी देखील कधीच केली नव्हती. तरी नेहरूंनी स्वत: पुढाकार घेऊन ३७० कलम पारित करविले. वस्तुत: काश्मीरमध्ये न राहणाऱ्या मुसलमानाचा ३७० कलमामुळे काहीच फायदा होण्यासारखा नाही. गैरकाश्मीरी हिंदूंप्रमाणेच त्यांनाही काश्मीरात काही स्थान नाही. नेहरूंनी हा खटाटोप भारतीय मुसलमानांच्या भल्यासाठी केला नसून ते दुर्गादासला हिंदू कायद्याबद्दल जे म्हणाले त्याप्रमाणे भारताबाहेरच्या मुस्लिम देशांनी "नेहरूंनी एक मुसलमान देश हिंदू बहुसंख्येत बुडू न देता मुसलमान ठेवला म्हणून आपल्याला दुवा द्यावा." या उद्देशाने केला.



## पाकिस्तानचे हिंदू आमचे कोण?

शिवाजीला शिव्या देण्यात देखील केवळ भारतातल्याच नव्हे तर जगातील मुसलमानांचे आपल्याबद्दल अनुकूल मत व्हावे हा हेतू होता. सुरुवातीला शिवाजीला शिव्या देण्यात आपल्या राजकीय स्थानाला काही धोका नाही अशी नेहरूंची समजूत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी ही समजूत चुकीची आहे हे त्यांना कळून चुकले. शिवाजी केवळ इतिहास वाचताना भक्तिभाव प्रकट करण्यापुरता महत्त्वाचा नाही. त्याच्याबद्दल अनादर दाखविला तर आपण निवडणुका देखील हरू शकतो हे यावेळी नेहरूंच्या अनुभवास आले. त्यामुळे शिवाजी महाराजांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित केलेल्या एका समारंभाचे आमंत्रण त्यांनी स्वीकारले. पण याप्रसंगी त्यांनी जे भाषण केले ते शिवाजीचा गौरव करणारे नव्हते. तेही जगातील मुसलमानांना उद्देशून होते. "मुसलमानांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न शहाणपणाचा नाही" असे त्यांनी या समारंभाच्या आयोजकांना खडसावले. वस्तुत: भारतातील मुसलमानांना हिंदू बनविण्याचा कोणताच कार्यक्रम शिवाजी महाराजांनी आखला नव्हता. त्यांच्याच हयातीत मुसलमान झालेल्या चारदोन हिंदूंचे त्यांनी शुद्धीकरण केले. त्यांच्यापैकी काही त्यांचेच नातलग होते. शिवाजी महाराजांनी मुस्लिमांच्या शुद्धीचा पद्धतशीर कार्यक्रम आखला असता तर त्यांच्या राज्यात लक्षावधी मुसलमान उरलेच नसते. महाराष्ट्रातल्या मुसलमानांना देखील हे चांगले माहीत होते व शिवाजी उत्सव करणाऱ्यांचे महत्त्व वाढले तर आपल्याला आपल्या धर्माला मुकावे लागेल अशी भीती त्यांना कधीच वाटली नव्हती. असे असता नेहरूंनी असे भाषण केले कारण हे भाषण महाराष्ट्रातील वा भारतातील मुसलमानांसाठी नव्हतेच. ते जगातील मुसलमानांसाठी होते. आपण मुसलमानांच्या धर्मावर घाला घालू इच्छिणाऱ्या लोकांना कानपिचक्या दिल्याबद्दल जगातील मुसलमान आपल्याबद्दल कृतज्ञता बाळगतील अशी नेहरूंची अपेक्षा होती.

"पटेल व राजेंद्रप्रसाद हे भारतीय मुसलमानांच्या देशनिष्ठेबद्दल शंका घेत व नेहरूंनी याला हरकत घेतली" असे नेहरूंचे स्तोत्र लिहिणारे गोपाल म्हणतात, "दिल्लीत मुसलमानांसाठी काही भाग राखून ठेवावे या नेहरूंच्या सूचनेला पटेलांनी कसून विरोध केला होता. यात कोण जास्त सेक्युलर होते पटेल की नेहरू? एकाच देशात धर्मावरून निवासस्थाने वेगळी व्हावी हा सेक्युलॅरिझम आहे काय? वस्तुत: भारतात हिंदू-मुस्लिम वसत्या सरमिसळ असल्या पाहिजेत. मुस्लिम बहुसंख्येचे हजारो मैलांचे सलग प्रदेश असणे हे धार्मिक ऐक्याला विघातक आहे. हा न्याय काश्मीरला लागू करणे अगत्याचे

आहे.

मुसलमानांनी नुकतेच पाकिस्तान निर्मितीच्या बाजूने मतदान केले होते. पाकिस्तान झाल्याबरोबर भारतात रहावे लागेल म्हणून ते हे पार विसरून जातील अशी नेहरू अपेक्षा करीत असतील तर त्यांच्या बुद्धीबद्दल कीवच करावी लागेल. भारतीय मुसलमान खेळांच्या सामन्यात पाकिस्तानच्या विजयाने हर्षित होतात हे मुसलमानांनीही लपवून ठेवले नाही. मुसलमानांत भारतीयत्वाची जाणीव निर्माण करण्यास खास प्रयत्नांची जरूर आहे हे नाकबूल करताच येत नाही. पण नेहरूंना मुसलमानांना चार गोष्टी सांगायची जरूर आहे हे पटल्यासारखे वर्तन त्यांनी कधी केलेच नाही. ज्या काय कानपिचक्या द्यायच्या आहेत त्या हिंदूनाच दिल्या पाहिजेत असे ते भासवीत होते. मुसलमानांनी कसे वागावे याबद्दल त्यांच्या एकाही व्याख्यानात अवाक्षरही नव्हते.

पश्चिम पाकिस्तानातून म्हणजे आजच्या बंगला देशातून हिंदू शरणार्थींचे लोंढे भारतात येऊ लागले तेव्हा सरदार पटेल व पूर्व बंगालचे मुख्यमंत्री विधानचंद्र रॉय यांनी नेहरूंपुढे पुढील प्रस्ताव ठेवला.

''यापुढे पूर्व पाकिस्तानातून जितके हिंदू शरणार्थी येतील तितकेच मुसलमान पूर्व बंगालमधून पाकिस्तानात हाकलले जातील असे पाकिस्तानला कळवावे.''

याचवेळी मोहनलाल सक्सेना हे केंद्र सरकारचे पुनर्वासमंत्री होते. त्यांनी दिल्ली व उत्तरप्रदेश येथील मुसलमानांच्या दुकानांना ताळे ठोकण्याचे आदेश दिले. नेहरूंनी याला विरोध केला म्हणून गोपाल नेहरूंची स्तुती करतात. पाकिस्तान हा वेगळा देश आहे. तेथील हिंदू हे पाकिस्तानचे रहिवासी आहेत, त्यांचे काय होते याची उठाठेव भारताने करणे, दुसऱ्याच्या घरात ढवळाढवळ करणे होय. उलट भारतीय मुसलमान भारताचे रहिवासी असल्यामुळे त्यांचे हित पाहणे हे भारताचे कर्तव्य आहे असे गोपालांचे म्हणणे.

## भारताच्या बदनामीचे ढोल

गोपालांचे हे म्हणणे कितपत प्रामाणिक आहे याचा विचार करताना बंगला देशातून आमच्या देशात शरणार्थी येतात असे सांगून इंदिरा गांधींनी १९७१ साली पाकिस्तानविरुद्ध लढाई केली याबद्दल गोपाल त्यांना सेक्युलॅरिझमचे शत्रू का मानीत नाहीत असा प्रश्न विचारता येईल.

पाकिस्तानातील हिंदू हे भारताचे कोणी लागत नाहीत या मताचा विचार करताना पाकिस्ताननिर्मितीचा इतिहास लक्षात घेतला पाहिजे. पाकिस्ताननिर्मिती



१९४६ च्या निवडणुकीतील मतदानाच्या आधाराने झाली. भारतात राहणाऱ्या मुसलमानांनी पाकिस्तानात राहणाऱ्या मुसलमानांच्या पेक्षा पुष्कळच अधिक प्रमाणात पाकिस्ताननिर्मितीच्या बाजूने मते दिली. तेव्हा भारतीय मुसलमान हे पाकिस्तानचे कोणी लागत नाहीत असे म्हणणे म्हणजे ज्यांच्या मताने पाकिस्तान झाले तेच पाकिस्तानचे कोणी लागत नाहीत असे म्हणणे होय.

उलट पाकिस्तानात राहणाऱ्या हिंदूंनी अखंड भारताच्या बाजूने मते दिली. ते भारताचे कोणी लागत नाहीत या म्हणण्यात अर्थ काय? भारतातील सत्तापरिवर्तनाबद्दल वाटाघाटी करताना अखंड भारतासाठी मतदान करणाऱ्या सर्व हिंदूंच्या हिताचे रक्षण झाले पाहिजे असा आग्रह काँग्रेसच्या भूमिकेत अनुस्यूत नव्हता काय?

पाकिस्ताननिर्मितीच्या वेळी उभय देशातील धार्मिक अल्पसंख्यकांच्या सुरक्षिततेबद्दल प्रश्न उपस्थित झाला होता व याचा निकाल लावण्यासाठी अल्पसंख्यकांचे स्थलांतर करावे असे सुचविण्यात आले होते. तेव्हा माऊंटबॅटनने ''अशा परिस्थितीत मुसलमानांच्या संख्येच्या प्रमाणात त्यांना प्रदेश मिळाला पाहिजे, मी देऊ केलेले पाकिस्तान यासाठी पुरेसे नाही.'' असा युक्तिवाद केला. तो भारताला मान्य झाला नाही व धार्मिक अल्पसंख्यकांना नागरिक न समजणे बरोबर नाही तेही इतरांच्या दर्जाचेच नागरिक आहेत हे तत्त्व दोन्ही देशांनी कबूल करावे असे ठरले.

पाकिस्तानने हिंदूंना हाकलून या आश्वासनाचा भंग केला. तेव्हा ज्या अटीवर पाकिस्तानची निर्मिती झाली तीच पाकिस्तानने मोडल्यावर पाकिस्तानच्या हिंदू रहिवाशाबद्दल बोलायचा भारताला काही अधिकार नाही असे कसे म्हणता येईल?

सरदार पटेल व बिधानचंद्र रॉय यांची सूचना मान्य झाली असती तर पाकिस्तानातून हिंदू शरणार्थी येणे ताबडतोब बंद झाले असते. कारण पाकिस्तानातील हिंदूंपेक्षा भारतातील मुसलमानांची संख्या फारच जास्त आहे. त्यांचे लोंढे पाकिस्तानात आले तर पाकिस्तानचे कंबरडे मोडेल हे पाकिस्तानच्या पुढाऱ्यांना कळत होते.

भारतात राहणारे पाच कोटी मुसलमान पाकिस्तानात जाणे शक्य नाही तेव्हा आपण पाकिस्तान निर्माण केले यात आपले काहीच हित नाही, आपल्याला भारतातच राहून हिंदूंशी मिळते घेतले पाहिजे हे मुसलमानांनी ओळखले असते व हिंदू-मुस्लिम ऐक्य सुकर झाले असते.

लाखो हिंदूंना हाकलून दिले तरी भारत त्याविरुद्ध ब्रही काढत नाही हे पाहून पाकिस्तानने भारतात हिंदू शरणार्थींबरोबर मुसलमान घुसखोर पाठवण्यास सुरवात केली. या घुसखोरांची संख्या तीन कोटींवर आहे. आधीच भारतावर लोकसंख्येचा अतोनात

भार आहे. त्यात भारताच्या शत्रूशी भावनेने एकरूप असणारे कोट्यवधी लोक भारतात असणे हे घराच्या पायाशीच सुरुंग असण्यासारखे आहे.

नेहरू सतत पाकिस्तानच्या हिताची जबाबदारी आपल्यावरच आहे व भारताचे आपण काहीच लागत नाही अशा आविर्भावात वागत होते.

राजेंद्र प्रसादांनी नेहरूंना एक पत्र लिहून कळविले की, ''भारतीय हिंदूंनी पाकिस्तानात हिंदूंना मिळणाऱ्या वागणुकीची प्रतिक्रिया म्हणून काही वर्तन केले तर तुम्ही लगेच हिंदूंना शिव्या देता. तुमची भाषणे जगात पसरल्यामुळे देशाची जगभर बदनामी होते. असे प्रसंग टाळायचे असतील तर पाकिस्तानातील हिंदू सुरक्षित राहतील याची काळजी भारत सरकारला आहे असे भारतीय हिंदूंना वाटले पाहिजे.''

## पटेल व राजेंद्रप्रसाद

राजेंद्रप्रसादांच्या या पत्रात आक्षेपार्ह असे काय आहे? पटेल व राजेंद्रप्रसाद यांच्या धोरणानुसार नेहरूंचे वर्तन झाले असते तर मुसलमानात फरक होण्यास वेळ लागला नसता. मुसलमानांना आपल्या धर्मांतरापूर्वीच्या जाती व पूर्वज आठवले असते व हिंदू-मुस्लिम समस्या मिटली असती.

नेहरूंची दंग्याबद्दलची भूमिकाही या संदर्भात विचारात घेण्यासारखी आहे. नेहरूंच्या काळात २५ दंग्यांची चौकशी करण्यात आली होती. त्या चौकशींची प्रतिवृत्ते कधीच प्रकाशित करण्यात आली नाहीत. पण दर दंग्यानंतर नेहरू राष्ट्रीय ऐक्यावर प्रवचन देत व दंग्यात नेहमीच हिंदू दोषी असतात, मुस्लिम दोषी असणेच शक्य नाही. कारण ते अल्पसंख्य आहेत असे भाष्य करीत. नेहरूंनीच नेमलेल्या चौकशांचा असाच निष्कर्ष असता तर नेहरूंनी या संदर्भात त्याचा हवाला दिला असता अशी अपेक्षा आहे.

नेहरूंच्या पुढच्या नेहरूवादी सरकारांनी दंग्यात पोलिसांचा मार खाल्लेल्या मुसलमानांना लाखो रूपये नुकसानभरपाई देण्याचा क्रम सुरू केला. पोलिसांचा मार खाल्ला त्याअर्थी हे नुकसानभरपाई मिळविणारे दंग्यात सामील होते असे सर्वसाधारण माणूस अनुमान काढील. पण नेहरू व नेहरूवादी हे असाधारण पुरुष होते व आहेत.

इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत अहमदाबादमध्ये झालेल्या दंग्यावर नंदन कागल यांनी Indian Express मध्ये विस्तृत लेख लिहून दंग्यांचा दोष पूर्णपणे मुसलमानांवर टाकला होता. यानंतर एक चौकशी अहवाल सादर केला गेला होता. त्यात दंग्यांचा सारा दोष हिंदूंच्या माथी मारला होता. इंदिरा गांधींनी हा अहवाल नंदन कागल यांच्या अहवालाचा प्रतिवाद करण्यासाठी पश्चातबुद्धीने लिहिला होता हे स्पष्ट होते.



नेहरूंचे वर्तन हे तुष्टीकरण नसून मुसलमान व ख्रिस्ती यांनी आपण कोणत्याही अर्थाने हिंदू नाही म्हणून आपले वेगळेपण जोपासावे या उद्देशाने केलेला तो प्रचार होता. मुसलमान व ख्रिस्ती यांनी आपली identity म्हणजे ओळख जोपासावी असे नेहरू म्हणत. हिंदूत मिसळू शकणाऱ्यांना तुम्ही वेगळेच आहात असे सतत सांगणे ही भांडणे लावण्यासाठी करण्यात आलेली चिथावणी आहे, तुष्टीकरण नव्हे.

नेहरू हे केवळ हिंदू संहितेचेच नव्हे तर विसाव्या शतकातील मुस्लिम पोथीवादाचे जनक होते. पाकिस्तानचे भुट्टो पर्यंतचे नेते पाकिस्तानात शरियत लावण्याच्या विरुद्ध होते. पण नेहरूंनी भारतातच शरियतला मान्यता दिल्यावर पाकिस्तानात ती न मिळणे अशक्यच होते. काफिर देशात शरियतला मान आहे. मुस्लिम देशात मात्र नाही या मुल्लामोलवींनी दिलेल्या टोल्यापासून बचावणे अशक्य झाले. मुस्लिम जगात जो पोथीवाद पसरला तो नेहरूवादाचे भारतात बंड माजल्यावरच पसरला.

भांडणातील न्याय/अन्यायाचा निवाडा करणारे न्यायाधीश वा भांडणाऱ्यांचा समेट घडवू इच्छिणारे मध्यस्थ कोणत्याही एका पक्षाला तुझे सर्वस्वी चूक व तुझ्या प्रतिपक्षाचे सर्वस्वी बरोबर असे एखाद्या पक्षाला सांगत नसतात. नेहरूंनी याच्या सर्वस्वी विरुद्ध वर्तन केले यावरून त्यांची कलहातील भूमिका न्यायाधीशांची वा मध्यस्थाची नव्हती हे स्पष्ट आहे. हिंदूंशी सख्य साधण्यासाठी मुसलमानांनी काय करावे हे नेहरूंनी एका वाक्याने देखील कधी मुसलमानांना सांगितले नाही. यावरून नेहरूंचा उद्देश हिंदू-मुसलमानांचे भांडण सोडविण्याचा नसून ती वाढविण्याचाच होता असे अनुमान काढता येणार नाही काय?

## नेहरू आणि इस्राइल

नेहरूंचा इस्लामिक इहवाद त्यांच्या इस्राइलविषयीच्या धोरणात स्पष्ट दिसून येतो. अरबांना इस्राइल साहजिकच नको आहे कारण २००० वर्षापासूनच ते जेथे वस्ती करून होते त्या प्रदेशातून त्यांना हुसकून इस्राइल बसविण्यात आले आहे. अरब मुसलमान असल्यामुळे भारतीय मुसलमानांनी देखील इस्राइलला विरोध करावा अशी नेहरूंची अपेक्षा होती. ईजिप्त या अरब देशाचा प्रमुख फारुक याने याच सुमारास भारताविरुद्ध निझामाची बाजू घेतली होती. कारण निझाम हा मुस्लिम होता. नेहरूंवर याचा काही परिणाम झाला नाही कारण ''कम्युनल'' हिंदूंचा द्वेष करण्याचा जगातील मुस्लिमांना अधिकारच आहे. अमेरिका, ब्रिटन, रशिया व खुद्द काही अरब देश यांनी

देखील इस्राइलला मान्यता दिली पण नेहरूंच्या ''सेक्युलर'' भारताने इस्राइलला मान्यता नाकारली. इस्राइलमध्ये भरणाऱ्या एका आफ्रो-एशियन परिषदेला जाण्याचे नेहरूंनी नाकारले कारण तिचे आमंत्रण अरबांकडून आलेले नव्हते. चीनी आक्रमणाच्या वेळी शस्त्रास्त्रांची अत्यंत निकड होती व ती इस्राइल पुरविण्यास तयार होता. पण नेहरूंनी ती घेतली नाही. कारण ईजिप्तचा नासर त्यांच्या विरुद्ध होता, सारे मुस्लिम देश भारताविरुद्ध पाकिस्तानला पाठिंबा देतात व ज्यांना ऐपत आहे ते सारे पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत देखील करतात. इस्राइल भारतास मदत करण्यास तयार आहे कारण इस्राइलचे बहुतेक शत्रू हे भारताचेदेखील शत्रू आहेत. इस्राइल चिमुकला देश असला तरी प्रगत आहे व त्यांचे अमेरिकेवर वजन आहे. या सगळ्यांचा भारताला उपयोग होऊ शकतो. नेहरूंच्या मते भारताला काय उपयोगी आहे हा अप्रस्तुत प्रश्न आहे. सेक्युलॅरिझमला काय उपयोगी आहे हे पाहिले पाहिजे.

जगात ज्यूंची संख्या नगण्य आहे. उलट जगात १०७ कोटी मुसलमान आहेत व ज्याला जगाचे पुढारी व्हायचे आहे त्यांना मुसलमानांना नाराज करून इस्राइलला खूष करणे परवडणारे नाही.

या सर्व धोरणांचा भारतीय मुसलमानांच्या दृष्टीने असा अर्थ होतो की त्यांच्या निष्ठा मूलतः मातृभूमीशी निगडित न राहता आंतरराष्ट्रीय इस्लामशी निगडित असल्या पाहिजेत.

## बोलके आकडे

गोपाल लिहितात की गांधींनी अल्पसंख्यकांचे रक्षण करावे व त्यांच्याबद्दलची सूडबुद्धी सोडावी या नेहरूंच्या धोरणाचा पाठपुरावा केला. पण भारत सरकारने मुसलमानांचे रक्षण करू नये व त्यांच्यावर सूड उगवावा असे पटेल व राजेंद्रप्रसाद यांचे म्हणणे होते काय?

हिंदू-मूसलमानांना समतेने वागवावे हा शब्दप्रयोग वस्तुतः चूक आहे. याचा अर्थ असा होईल की हिंदूंना मूर्तिपूजेची मुभा व मुसलमानांना नमाजाची मुभा ही समता नाही. दोघांनाही एकतर मूर्तिपूजेची मुभा असावी नाही तर नमाजाची! स्त्रीपुरुषसमता म्हणजे स्त्रीपुरुषांचे वेष व स्वच्छतास्थाने वेगळी असू नयेत असे म्हणण्यासारखे आहे.

समता या ऐवजी न्याय हा शब्द जास्त अचूक आहे. हिंदू व मुसलमान जी समाजविघातक कृत्ये करतील त्याची कारणे वेगळी असू शकतात. पाकिस्तानचे प्रेम हे मुसलमानातच दंडनीय कामे करण्याचे कारण असू शकते, हिंदूत नाही. उलट एखाद्या



स्त्रीला सती जाण्यास भाग पाडणे वा कुणाचा अस्पृश्य म्हणून मंदिरात जाण्यास मनाई करणे ही समाजविघातक कृत्ये हिंदूंच करू शकतो. हिंदू व मुसलमान या दोघांवरही न्याय करायचा म्हणजे एकाच्या पातिव्रत्य व वर्णश्रेष्ठतेच्या कल्पना व दुसऱ्याचे पाकिस्तानप्रेम नियंत्रणात ठेवले पाहिजे.

देशद्रोहाची प्रेरणा देणारे हिंदुत्वात काहीही नाही, हिंदू देशद्रोह करील तो हिंदुत्वाव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या कारणामुळे. उलट मुसलमानांना भारताव्यतिरिक्त इतर देशांचे जास्त प्रेम वाटण्यास त्यांचे मुस्लिमत्व हेच कारण असू शकते. कारण कट्टर इस्लाम मुस्लिम भूमी व शत्रूभूमी असे जगाचे दोन भाग आहेत असे मानतो. हे मत जीर्ण व केवळ पुस्तकात राहिलेले नाही. या मताच्या आहारी जाणाऱ्यांना पाकिस्तानात पाठविणे म्हणजे साऱ्या मुस्लिम जमातीवर सूड उगविणे व भारत सरकारला मुसलमानांच्या सुरक्षिततेचे काही सोयरसुतक नाही असे म्हणण्यासारखे आहे काय?

''सेक्युलॅरिझमची स्पष्ट व्याख्या करा'' अशी मागणी झाली असताना मुसलमानांच्या देशनिष्ठेबद्दल शंका घेणे हा सेक्युलॅरिझमचा द्रोह आहे अशी व्याख्या करण्यात आली आहे. म्हणजे मुसलमानाला सीझरच्या पत्नीप्रमाणे संशयातीत समजावे हे सेक्युलॅरिझमचे लक्षण झाले. इंदिरा गांधीदेखील मुसलमानांकडे संशयाच्या नजरेनेच पाहत होत्या व बंगलादेश युद्धाच्या वेळी संवेदनाक्षम स्थानावर मुसलमान ठेवू नयेत असे आदेश त्यांनी दिले होते हे फर्नांडिस यांनी लोकसभेत दाखवून दिले होते. मुसलमानांच्या मतानेच पाकिस्तान निर्माण झाले हे विसरून त्यांच्याशी व्यवहार करावे हे म्हणणे अप्रामाणिकपणाचे आहे. ''पाकिस्तान झिंदाबाद''चे नारे कोण देते, मदरशात इतर धर्माचा द्वेष करण्याचे शिक्षण दिले जाते की नाही यावर नजर ठेवून असे करणाऱ्यांना पाकिस्तानात हद्दपार केले असते तर नंतरचे अनर्थ टळले असते. चार मदरशांवर धाडी घातल्या तर चार पाठशाळांवरही धाडी घातल्या पाहिजेत ही सेक्युलॅरिझमची व्याख्या फक्त नेहरूभक्तांनाच शोभते.

अहिंदूंना खास प्रेमाची वागणूक द्यावी अशा शिकवणुकीमुळे नागा ख्रिस्ती आहेत म्हणून त्यांनाही खास वागणूक देण्यात आली. शीखाबाबतही तसेच झाले, त्यामुळे नागांची बंडाळी व शीखांनी काही दिवस पंजाबात कहर केला.

दहशतवादप्रतिबंधक कायदा हा मुस्लिमविरोधी आहे कारण या कायद्याखाली फक्त मुस्लिमांना अटक होते अशी सेक्युलॅरिस्ट लोक ओरड करतात. ही ओरड करणारे प्रामाणिक आहेत असे समजणे कठीण आहे. दहशतवाद हा साऱ्या जगात मुस्लिम दहशतवाद म्हणूनच प्रसिद्ध आहे. या दहशतवाद्यांची शस्त्रास्त्रे व द्रव्यनिधी मुस्लिम

देशातून येतो. ते सैनिक प्रतिष्ठानावर हल्ले करून काही सैनिकांना मारतात. तसेच कोणत्याही हिंदू नागरिकाला मारतात. यात्रेकरूंवर हल्ले करून जास्तीत जास्त काफीर मारणे हा त्यांचा उद्देश असतो. ते भारतात राहत नाहीत. त्यांचे अड्डे मुस्लिम देशात असतात. हे सर्व जगत्प्रसिद्ध आहे. त्यामुळे वरील वर्णनांत बसणारा गुन्हा घडला की पोलिस मुसलमानावर संशय घेतात यात आक्षेपार्ह काय आहे? सापडणारे बहुवंश गुन्हेगार मुस्लिमच असतात. कारण कायदाच मुस्लिमविरोधी आहे हे म्हणणे प्रामाणिक असूच शकत नाही. संजय दत्त मुसलमान असल्यामुळेच त्याला पकडले अशी आमच्या सेक्युलॅरिस्टांनी कावकाव केली. त्याच्यावरचे आरोप स्पष्टपणे केलेले होते. ते खोटे आहेत असे आमच्या सेक्युलॅरिस्टांनी का गृहीत धरले?

नेहरूंचे मुस्लिम धोरण ऐक्याचे पोषक होते की तेढ वाढविणारे होते हे दंग्यासंबंधीचे आकडेच सांगतात. ब्रिटिश काळात वर्षाला २६ दंगे होत होते. नेहरूकाळात ९० होऊ लागले असे गोपाल यांच्या नेहरूप्रशस्तीतच लिहिले आहे.

■■■





# कोसळणारे आभाळ सावरले

नेहरूंच्या शिरपेचात नेहरूभक्तांनी खोवलेला चौथा चांद म्हणजे त्यांनी कोसळू पाहणारे आंतरराष्ट्रीय आकाश, आपल्या माथ्यावर सावरून अणुयुद्ध होऊ दिले नाही व जगाला वाचविले हा आहे. ''नेहरू जगाचे पुढारी असल्यामुळे त्यांनी भारताचे काय भले केले यावरून त्यांचे मूल्यमापन करण्याऐवजी त्यांनी जगासाठी काय केले याचा विचार केला पाहिजे. महात्मा गांधींचे मूल्यमापन करताना त्यांनी आपल्या कुटुंबासाठी काय केले याचा विचार करून आपल्या कुटुंबाची दोन पिढ्यांसाठी बेगमी करून ठेवणाऱ्या एखाद्या व्यवहारी माणसाला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरविणे जसे चूक होईल तसेच केवळ राष्ट्राचा विचार करणाऱ्या पटेलादिकांना नेहरूपेक्षा श्रेष्ठ ठरविणे चूक आहे.'' अशा आविर्भावाने पुष्कळ वेळा नेहरूभक्त बोलत असतात. ते हे विसरतात की महात्मा गांधी व सरदार पटेल या अव्यवहारी व्यक्तींप्रमाणेच नेहरूंनी आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले नाही. आपली कन्या आपल्या पश्चात भारताची पंतप्रधान व्हावी अशी व्यवस्था त्यांनी करून ठेवली. याबाबतीत त्यांनी आपण काँग्रेसचे अध्यक्ष व्हावे म्हणून म. गांधींकडे रदबदली करणाऱ्या आपल्या पिताश्रींचा आदर्श आपल्या डोळ्यापुढे ठेवला होता. याच्या उलट महात्मा गांधी व सरदार पटेल या अव्यवहारी व्यक्तींच्या अपत्यांना राजकारणाच्या वेशीवर देखील प्रवेश मिळाला नव्हता.

असे असले तरी नेहरूंनी साऱ्या जगाचे काही भले केले असेल तर त्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे.

नेहरूंची अत्युच्च उपलब्धी म्हणून गोपाल यांनी चर्चिलने नेहरूंना The Light of Asia 'आशियाचा प्रदीप' म्हणून गौरविले याचा उल्लेख केला आहे. चर्चिलने नेहरूंना अशी पदवी का दिली हे स्पष्ट आहे. साम्राज्य गमवावे लागले व आता त्यामुळे ब्रिटनची जगातील प्रतिष्ठा नाहीशी होईल अशी चर्चिलला भीती वाटत होती. पण तसे काही झाले नाही. ब्रिटनच्या साम्राज्यातील सगळ्यात मोठा देश जे भारत ते ब्रिटिश साम्राज्यापासून स्वतंत्र असलेले सार्वभौम प्रजासत्ताक राहील असा संविधानसभेचा पहिला ठराव होता. तो बदलून नेहरूंनी भारत हा ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश राहील असा ठराव पारित करून घेतला. मूळ ठरावातील स्वतंत्र हा शब्द गाळला. म्हणजे भारताला स्वतंत्र देश म्हणण्याची देखील सोय नाही. भारताने असे केले नसते तर इतर देश ब्रिटिश साम्राज्यात राहिले असते की नाही याची शंका आहे. ब्रह्मदेशाने आधीच ब्रिटिश साम्राज्यापासून स्वत:चे स्वातंत्र्य जाहीर केले होते. या घटनेचे ब्रिटिश वृत्तपत्रांनी Burma cuts the painter या शब्दांनी वर्णन केले होते. येथे पेंटर या शब्दाचा अर्थ नावेला किनाऱ्याशी बांधून ठेवणारा दोर असा आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश हे ब्रिटिश साम्राज्याशी आश्रिताच्या नात्याने बांधलेले आहेत व हा आश्रयच ब्रह्मदेशाने तोडला असा याचा अर्थ आहे. किनाऱ्याशिवाय नाव राहू शकत नाही. त्याचप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश ब्रिटिश साम्राज्याशिवाय सुरक्षित राहू शकत नाहीत हे यात सूचित केले आहे. ब्रह्मदेशाप्रमाणेच भारताने आमच्या नावेला तुमच्या किनाऱ्याचा आश्रय नको आहे म्हणून ब्रिटिश साम्राज्याचा संबंध तोडला असता तर इतर देशांनीही तसेच केले असते असा प्रबळ संभव आहे. साम्राज्याशी नाते न तोडण्याचे नेहरूंनी जे कारण दिले ते अगदीच फुसके आहे. भारताच्या बाहेर ब्रिटिश साम्राज्यात लक्षावधी भारतीय राहतात. त्यांची स्थिती साम्राज्याशी संबंध तोडल्यामुळे बिकट होईल असे नेहरूंनी सांगितले (भाषणे भारत सरकार). साम्राज्यातील इतर देशात राहणाऱ्या ब्रह्मी लोकांची स्थिती बिकट झाल्याची वार्ता नाही. १९२९ साली पूर्ण स्वराज्याचा ठराव नेहरूंनी स्वत: काँग्रेसमध्ये मांडला होता व काँग्रेसचे तेच ध्येय होते. केवळ नेहरूच नव्हे तर सारा देश आपले ध्येय इतक्या लवकर विसरला ही फार शोचनीय गोष्ट आहे. नेहरूंच्या राज्यात इंग्रजी भाषा व एकूणच आंग्लदास्याची वृत्ती फोफावली. चर्चिलला याचा आनंद होऊ नये तर कोणाला? अशा कामाबद्दल चर्चिलसारख्या भारतद्वेष्टयाने दिलेले शिफारसपत्र आम्हाला शिरोधार्य वाटावे ही आमच्या अध:पाताची परिसीमा आहे.



## नेहरू व चौ एन लाय यांचे ज्ञान

चर्चिलने ज्या कामगिरीबद्दल नेहरूंना 'आशियाचा प्रदीप' म्हटले त्याच कामाबद्दल माओत्से टंगन त्यांना चीनी भाषेत जे म्हटले त्यांचे toady of imperialism, Running dog of imperialism वगैरे अनेक प्रकारे भाषांतर केले जाते.

नेहरूंनी युनू, सोकार्नो, हट्टा व शबीर यांना पैतृक उपदेश केला असे गोपाल सांगतात. इतर देशात या उपदेशाचे आजीबाईपणा असे वर्णन केले जाते. ब्रह्मदेशाचे शासक व केरेन बंडखोर यांच्यात मध्यस्थी करण्याची इच्छा नेहरूंनी दर्शविली असे गोपाल सांगतात. नेहरूंना हे देश आपला सल्लागार मानत नव्हते व त्यांनी नेहरूंना मध्यस्थीची विनंती केली नव्हती. अशा स्थितीत स्वत: होऊनच ''मी मध्यस्थी करतो'' असे म्हणणे म्हणजे स्वत:कडे ढूंकूनही न पाहणाऱ्या एखाद्या सौंदर्यवतीला एखाद्या रस्त्यावरील रोमियोने ''मी तुझ्याशी लग्न करायला तयार आहे'' म्हणून निरोप पाठविण्यासारखेच आहे. नेहरूंच्या स्वयंसेवी मध्यस्थीची हीच गत झाली हे नेहरूंच्या पुढाकाराला संबंधितांकडून उत्तरही आले नाही यावरून स्पष्ट आहे. या प्रकरणात नेहरूंनी सोडविलेल्या एकाही भांडणाचा गोपाल उल्लेख करीत नाहीत. कारण या क्षेत्रात देखील नेहरूंची कामगिरी शून्य होती.

गोपाल यांच्या मूल्यकल्पना किती विकृत आहेत हेही या गोष्टी नेहरूंना गौरवास्पद आहेत असे ते मानतात यावरून दिसते. नेहरू हे पंतप्रधान होते. त्यांची महत्ता पंतप्रधानांची कर्तव्य त्यांनी कशी पार पाडली यावरून जोखायची आहे. नेहरूंना मध्यस्थ म्हणून नाव कमवायचे होते तर त्यांनी संयुक्त राष्ट्रांचे महासचिव व्हायला पाहिजे होते.

केवळ ब्रह्मी पुढारी व केरेन बंडखोर यांच्यातच मध्यस्थी करण्यापुरती नेहरूंची महत्त्वाकांक्षा नव्हती. त्यांना आधुनिक जगातले सुदोपसुंद जे अमेरिका व रशिया त्यांच्याही नाकात वेसण घालण्याची महत्त्वाकांक्षा होती. पण जेथे ब्रह्मदेशालाच नेहरूंचा चोंबडेपणा नको होता तेथे अमेरिका व रशिया तो खपवून घेतील काय? स्टॅलिन नेहरूंच्या पत्राला उत्तरच देत नसे.

ख्रिस्टोफर ईशरवुड लिहितात.

''नेहरू ही मोठी मावशी होती. क्रुश्चाव्ह व केनेडी यांना आपले भांडकुदळ पुतणे समजून ते त्यांना ''भांडू नका'' म्हणून उपदेश करीत.''

गोपाल या वाक्याचा उल्लेख करतात पण ही स्तुती नसून टवाळी आहे हे त्यांच्या

लक्षात आलेले दिसत नाही.

चौ एन लाय एकदा सगळा संयम बाजूला ठेवून सरळच म्हणाले की, नेहरू इतका उर्मट पुढारी मी दुसरा कोणी पाहिला नाही. बांडुग परिषदेत आपणच या परिषदेचे आमंत्रक व यजमान आहोत असे समजून ते सगळ्यांची ओळख करून देत होते. यामुळे परिषदेच्या आमंत्रकांना आपला अपमान झाल्यासारखे वाटले.

गोपाल यांनी चौ एन लायचे खालील पत्र नेहरूंच्या गौरवार्थ उद्‌धृत केले आहे-

''आपल्यासारख्या उत्कृष्टांना (excellency) केवळ एशियाच नव्हे तर साऱ्या जगाबद्दल जास्त ज्ञान आहे. मी हे विनयाने म्हणत नाही. कारण आपण आंतरराष्ट्रीय घडामोडीत जेवढे लक्ष घातले आहे तेवढे मी घातले नाही. आम्ही आपला देश व त्याच्या समस्या यातच गुरफटलेले आहोत.''

गोपाल यांना हे पत्र उपरोधिक वाटले नाही. नेहरूंनी जगाचा इतिहास वाचला व लिहिला होता यावरून त्यांना कुबलई खानच्या कारकीर्दीत चीनमध्ये काय झाले याबद्दल चाउ एन लायच्या शिवाजी वा औरंगजेबाबद्दलच्या माहितीपेक्षा जास्त माहिती होती असे म्हणता येईल. पण भारताचे पंतप्रधान म्हणून ज्या गोष्टी जाणणे अत्यावश्यक होते. त्यातले त्यांना शष्प देखील कळत होते असे म्हणणे कठिण आहे.

## दुसऱ्यांच्या अकलेचे माप

भारताच्या दृष्टीने तिबेटचे महत्त्व काय आहे, ब्रिटिशांनी तिबेटमध्ये सैन्य पाठवून त्यावर आपली पकड का जमविली, रशिया व चीन या दोघांनीही तिबेटपासून दूर रहावे म्हणून ब्रिटिश राज्यकर्ते सदा जागरूक का राहिले? आपण ब्रिटिशांचे उत्तराधिकारी असल्यामुळे ब्रिटिशांनी केलेले करारमदार आपल्यावर बंधनकारक आहेत व ते करारमदार भारताला रशिया व चीन यांच्या आक्रमणापासून वाचविण्यासाठी केले असल्यामुळे या दृष्टीने त्यांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, दलाई लामा ब्रिटिश कारकीर्दीत चीन्यांच्या विरुद्ध इंग्रजांच्या आश्रयाला आला होता, तिबेटला चीनपासूनच उपद्रव होण्याचा संभव आहे व तसा उपद्रव झाल्यावर तिबेट आपल्याकडेच संरक्षणासाठी धाव घेईल या गोष्टी १९१२ पासूनचा तिबेटचा इतिहास ज्याला माहीत आहे, अशा कोणत्याही सुबुद्ध पंतप्रधानाला कळण्यासारख्या होत्या. पण त्या नेहरूंना मुळीच कळल्या नाहीत.

आपले संभाव्य शत्रू कोण या बाबतीत नेहरूंचे ज्ञान कीव करण्यासारखे होते. पाकिस्तानशी सहकार्य करून आपल्या संरक्षणाची व्यवस्था करावी असे आयेसनहावरने



नेहरूंना सुचविले असता ''कुणाविरुद्ध संरक्षणाची आम्हाला गरज आहे?'' असा प्रश्न विचारून साऱ्या जगात नेहरूंनी आपले हसे करून घेतले.

नेहरूंचे जगाच्या इतिहासाचे ज्ञान आपल्यापेक्षा जास्त आहे हे चौ एन लायला माहीत होते व त्यामुळे हे कबूल करण्यात विनयाचा भाग नव्हता. पण स्वतःच्या राष्ट्राचे हितसंबंध जेथे गुंतले आहेत अशा आंतरराष्ट्रीय घटनाचे ज्ञान आपल्याला नेहरूंपेक्षा पुष्कळच जास्त आहे हे चौ एन लाय ओळखून होता यात संशय नाही व त्यामुळे या पत्राचा पुढचा भाग उघडपणे उपरोधिक आहे.

नेहरू एकदा चीनच्या भेटीवरून परत आले व कुरकूर करू लागले की ''माओत्से टंगने मला आपल्या मंत्र्यासारखे वागविले.'' ही तक्रार फार विचित्र आहे. नेहरू हे पंतप्रधान असले तरी प्रधानच होते. उलट माओ हा चीनचा सर्वेसर्वा होता. नेहरूंना त्याने स्वतःच्या बरोबरीने वागविणे राजकीय शिष्टाचारास सोडून झाले असते.

पण नेहरू आपल्या परकीय भेटीत ''दुसऱ्या देशांनी मला केवळ पंतप्रधान म्हणून न वागविता जगच्छान्तीचा अग्रदूत म्हणून पहावे'' अशी अपेक्षा करीत. यामुळेच माल्कम मगरिजला नेहरू ''गर्विष्ठ व दुय्यम दर्जाचे'' वाटले. ह्यू गॅस्केल म्हणाला ''नेहरू फार उर्मट आहे. कोठेही गेला तरी त्याला वाटते की तेथे जमलेले लोक आपली अमृतवाणी ऐकण्यासच जमलेले आहेत. त्याची वागणूक तुटक व मैत्रीहीन आहे.''

नेहरू परदेशी प्रवासात काय अपेक्षित होते हे त्यांनी स्वतःच विजयलक्ष्मीला लिहिलेल्या पत्रात सांगितले आहे. ते म्हणतात ''मी अमेरिकेत गेलो तेव्हा माझे भव्य स्वागत झाले. पण माझ्या मागून पाकिस्तानचे प्रधानमंत्री लियाकत अली तेथे गेले तेव्हा माझे स्वागत ही त्यांच्या स्वागताची रंगतालीमच होती असे वृत्तपत्रावरून दिसते. हे अमेरिकन फारच बालिश व मूर्ख आहेत. नेहर, लियाकत अली व इराणचा शहा हे सर्व त्यांच्यादृष्टीने एकच.''

आपण आपले जगात जे स्थान आहे असे समजतो ते अमेरिकेच्या दृष्टीतून पाहिले तर मुळीच नाही हे नेहरूंना कळून चुकले होते. पण यावरून स्वतःबद्दलच्या कल्पना न सुधारता ते अमेरिकनांनाच मूर्ख समजू लागले व अमेरिकेच्या नाहीतरी विशेषतः तिसऱ्या जगात आपले स्थान आपण समजतो तसेच म्हणजे शांतीच्या अग्रदूताचे आहे असे ते समजत. शांतीवर दोन व्याख्याने दिली की जगाच्या शांतीचे अग्रदूत होता येत असेल तर रेमेडोक्यांना देखील ते शक्य आहे हे स्वतःला ''बुद्धिमान्'' समजणाऱ्या नेहरूंना समजले नाही.

या पत्रातून दुसरी एक गोष्ट स्पष्ट होते व ती म्हणजे दुसऱ्यांच्या अकलेचे माप

घेण्यास नेहरू फार तत्पर असत. त्यांची स्वत:च्या बुद्धिमत्तेबद्दल फारच अवास्तव कल्पना होती व आपले पुष्कळसे बोलणे व वागणे मूर्खपणाचे असते असा अनेक जगत्प्रसिद्ध पुढाऱ्यांचा समज आहे ही गोष्ट त्याच्या ध्यानीमनीही नव्हती.

केनेडी व नेहरू यांची ९० मिनिटांची भेट या बाबतीत उल्लेखनीय आहे. या ९० मिनिटात केनेडी काहीच बोलले नाहीत. सारा वेळ नेहरूच व्याख्यान देत होते. नेहरू थांबले तेव्हा केनेडी म्हणाले thank you भेट संपल्याची ही सूचना होती.

## अणुयुद्ध व नेहरू

भेट झाल्यावर पत्रकारांनी भेटीबद्दल विचारले तेव्हा नेहरू म्हणाले, ''बोलण्याने कोणावर परिणाम होत नसतो. केवळ घटनाच हे काम करू शकतात.'' पत्रकारांनी केनेडीला ''भेट कशी झाली?'' म्हणून विचारले तेव्हा केनेडी म्हणाले.

''मी भारताच्या पंतप्रधानांशी बोलत नसून चीनच्या दूताशी बोलत आहे असे वाटले.'' कारण स्पष्ट आहे ९० मिनिटे नेहरू भारताविषयी काही न बोलता चीनला संयुक्त राष्ट्रांचे सदस्य करून घ्यावे म्हणून रदबदली करीत होते. चीनकडून अशी विनंती केनेडीकडे आली नव्हती व चीनने नेहरूंना आपली शिफारस करण्यास पाठविले नव्हते. ''चीनला सदस्य न केल्यामुळे भारताचे अमुक नुकसान होते'' असे नेहरू म्हणाले असते तर केनेडींनी त्याचा काहीतरी विचार केला असता. अशा तऱ्हेचे भाषण संयुक्त राष्ट्राच्या सभेत भारताच्या प्रतिनिधीने केलेले चालते असते कारण तो संयुक्त राष्ट्राचा सदस्य या नात्याने बोलत असतो, भारताचा पंतप्रधान या नात्याने नव्हे.

''कुणाच्याही भेटीला गेले तरी तो आपले व्याख्यान ऐकण्यास आपल्या समोर बसला आहे असे नेहरूंना वाटते'' असे ह्यू गॅस्केलने का लिहिले आहे हे यावरून स्पष्ट होते.

''नेहरू जगाचे पुढारी आहेत'' अशी प्रौढी चीनने लाथ हाणल्यानंतर भारतात कधी ऐकू आली नाही. पण तरी ''नेहरूंनी जगाला अणुयुद्धापासून वाचविले'' असे महाराष्ट्रात पां. वा. गाडगीळ म्हणत होते. त्याचप्रमाणे इतर प्रातांतही म्हणणारे होते.

''नेहरू नसते तर जग अणुयुद्धाच्या वणव्यात सापडले असते'' असा विचित्र ग्रह पसरण्याचे कारण काय?

जग अणुयुद्धाच्या काठाशी आले ते १९६२ साली. याच वर्षी नेहरूंची खरी किंमत काय आहे हे चीनने नेहरूंना व साऱ्या जगाला दाखवून दिले. नेहरूंना जगाला वाचविण्याचे भान राहणे दूरच चीनी आणखी एखादा आठवडा पुढे सरकत राहिले असते



तर नेहरूंना आपली खुर्ची वाचविणेही कठिण होते. डॉ. राधाकृष्णन् यावेळी राष्ट्रपती होते व त्यांनी नेहरूंना बडतर्फ करून अमेरिकेशी चीनविरोधी तह करण्याचा निश्चय केला होता अशी लोकसभा सदस्यांत त्यावेळी बातमी पसरली होती. पण चीनची लष्करी उद्दिष्टे भारतीय सेनेचा पूर्ण नाश केल्याने सफल झाली होती व त्याने युद्धविराम जाहीर केला.

याच सुमारास रशियाने आपल्या सरहद्दीवर अण्वस्त्रे तैनात केली आहेत याबद्दल अमेरिकेने जबरदस्त आक्षेप घेतला व अणुयुद्धाची धमकी दिली. रशियाने ''तुम्हीही आमच्या सरहद्दीवर अण्वस्त्रे ठेवली आहेत. ती काढा'' असे दरडावले. अमेरिकेने हे मान्य केले व दोघांनीही एकमेकांच्या सीमेवरील अण्वस्त्रे काढून घेतली. म्हणजे अणुयुद्ध होण्याचे टळले ते एकमेकांच्या अण्वस्त्रांची भीती वाटली म्हणून शांतिपाठामुळे नव्हे. वस्तुत: यावेळी नेहरूंनी आपला नेहमीचा शांतिपाठ गायिलाच नव्हता. ते काम बर्टरँड रसेलने केले, पण ''आपले शांतिपाठ रशियापुढे गा'' अशी अमेरिकेने त्यांना समज दिली.

नेहरूंच्या शांतिपाठामुळे अणुयुद्ध टळले ही एक लोणकढी थाप आहे.

अणुयुद्ध टळले तर ते अणुसज्जतेमुळेच टळेल हेही यावेळी सिद्ध झाले. जपानवर अणुबॉम्ब पडला कारण जपानजवळ अणुबॉम्ब नव्हता. तो रशियावर पडला नाही. कारण अणुबॉम्बचे अणुबॉम्बने उत्तर देणे रशियाला शक्य होते.

नेहरूंमुळे जगात शांती नांदेल हे सारी विचारशक्ती हरवून बसलेल्या भारतातील आंग्लशिक्षित वर्गाला फक्त खरे वाटत होते. एक माणूस नेहमी हात वर करून चालत असे. ''तू असे का चालतोस.'' असे त्याला विचारले तेव्हा तो म्हणाला ''मी असा चालतो म्हणून आभाळ कोसळत नाही.'' नेहरू व नेहरूभक्त यापेक्षा वेगळे नाहीत.

नेहरूंमुळे अणुयुद्धापासून जग वाचले हे सुतराम असत्य आहे एवढेच नव्हे तर ''ज्याच्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वात जास्त युद्धे छेडली गेली अशा एका व्यक्तीचे नाव घ्या'' म्हटले तर नेहरूंचेच घ्यावे लागेल. काश्मीरचा महाराजा भारतात सामील होण्याच्या पक्षाचा होता हे अधिकाधिक स्पष्ट झाले आहे. पण नेहरू काश्मीरबद्दल बोलताना महाराजाला शिव्या दिल्याशिवाय तोंड उघडत नसत. त्यामुळे महाराजाने याबाबतीत निर्णय घेण्यास विलंब केला. याने जिनांना काश्मीरमध्ये छिपे सैन्य पाठविण्यास अवसर मिळाला. महाराजा सामील झाल्यावरही नेहरूंनी काश्मीरचा पूर्ण ताबा घेण्यात भारतीय सेनेच्या मार्गात अडथळे आणले व आझाद काश्मीर पाकिस्तानच्या घशात घातला. काश्मीरचे विलीनीकरण अंतिम नाही असे स्वत:च

जाहीर करून काश्मीर हा विवादास्पद प्रदेश आहे, ही कल्पना सर्व जगात पसरविली. ६५ चे युद्ध व पुढील आजतागायत चालू असलेली अतिरेकी युद्धे ही नेहरूंच्या नीतीमुळेच निर्माण झाली आहेत. नागांच्या ख्रिस्तीकरणाला उत्तेजन देऊन नागांची बंडाळी नेहरूंनीच निर्माण केली. तिबेटचे उदक चीनच्या हातावर सोडून चीन-भारतयुद्ध नेहरूंनीच ओढवून घेतले, नेहरूंनी भारतावर ओढवून आणलेल्या युद्धात कमीत कमी ४०००० सैनिकांचे प्राण गेले आहेत.

## कलहनिर्माता

केवळ युद्धेच नव्हेत तर नेहरूनीतीमुळे हिंदू-मुसलमानांचे दंगे अभूतपूर्व रीतीने वाढले. पंजाबात खालिस्तानी अतिरेक्यांच्या फुटीरतेला उत्तेजन देण्याच्या नेहरूनीतीनेच पंजाबचे हिंसासत्र उद्‌भवले. आज सुरू असलेला नक्षलवादी व तत्सदृश बंडखोरांचा धुमाकूळ नेहरूनीतीतूनच उद्‌भवला आहे. भाषिक प्रांतांची सार्वत्रिक व दीर्घकालीन मागणी धुडकावून लावण्याने माजलेले दंगे नेहरूंनीच माजविले. जगच्छान्तीलाच नव्हे तर भारताच्या शांतीलादेखील सर्वात जास्त धोका कोणा एका व्यक्तीमुळे निर्माण झाला असेल तर ती व्यक्ती जवाहरलाल नेहरू हीच होय.

नेहरू स्वत:ला परराष्ट्रीय राजकारणाचे तज्ज्ञ समजत असत. याचे एकमात्र कारण त्यांचे शिक्षण परदेशात झाले होते व ते वारंवार युरोपच्या प्रवासास जात. तेथे ते काय करीत याबद्दल वर्तमानपत्रांत कधीच काही आले नाही व त्यांच्या आत्मचरित्रावरूनही याचा बोध होत नाही. Discovery of India मध्ये याबद्दल थोडी माहिती आहे. "मुसोलिनीने मला भेटीस बोलावले पण मी ती भेट नाकारली" असे नेहरूंनी लिहिले आहे. यात मी मोठे शतकृत्य केले असा नेहरूंच्या लिहिण्याचा आविर्भाव आहे. मुसोलिनीने का बोलावले याची माहिती नेहरू देत नाहीत. आमंत्रण नाकारण्याचे कारणही नेहरू सांगत नाहीत.

"विदेशी राज्यकर्त्यांशी दोस्ती करण्याचा प्रयत्न करू नये कारण तसे केल्यास त्यांच्या मदतीने आपण भारतात बंड करू इच्छितो असा ब्रिटिशांचा ग्रह होईल व आपण शांततामय चळवळ केली तरी ती ते दडपून टाकतील." अशी गांधींची विचारसरणी होती. पण नेहरू मुसोलिनीला भेटले नाहीत याचे हे कारण नव्हते. मुसोलिनी त्यावेळी ब्रिटनचा शत्रू मानला जात नव्हता. उलट मुसोलिनीप्रमाणेच इंग्रज देखील स्वत:ला कम्युनिझमचे शत्रू मानत होते व त्यामुळे मुसोलिनीशी त्यांचे संबंध सख्याचेच होते.

नेहरू मुसोलिनीला भेटले नाहीत कारण ते विचाराने कम्युनिस्ट होते व



कम्युनिझमचा नाश हे मुसोलिनीचे ध्येय होते.

असे असले तरी नेहरूंनी लेनिन व स्टॅलिन यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही. याचेही कारण स्पष्ट आहे. भारताचा एखादा विद्यार्थी जरी रशियात गेला तरी त्याची पोलिसाकडून चौकशी होत असे इतके इंग्रज सरकार कम्युनिझमच्या विरुद्ध होते. अंगावर फार शेकणार नाही अशा रीतीनेच राजकारण करायचे अशी काळजी नेहरू घेत असत. वारंवार युरोपात जाऊन विदेशी राज्यकर्त्यांशी संपर्क साधणे नेहरूंच्या स्वप्नातही नव्हते. युरोपात जाऊन तेथील राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांशी नेहरू संपर्क साधत होते असेही दिसत नाही. तेव्हा नेहरूंचे वारंवार परदेशी वाऱ्या करण्यात भारताचे राजकीय हित हा उद्देश नसून त्यांना भारतात बरे वाटत नव्हते व युरोपात गेल्याने माहेरी आल्यासारखे वाटत होते हेच असावे. यात जो पैसा खर्च होत होता तो नेहरूंनी मिळविलेला नव्हता. कारण नेहरूंना उत्पन्नाचे कोणतेच साधन नव्हते. तो पैसा काँग्रेचाही नव्हता कारण तसे असते तर त्याची काँग्रेस पक्षात चर्चा झाली असती व त्याचा हिशेब काँग्रेसच्या दप्तरात असता.

बिर्ला नेहरूंना दर वाढदिवसाला ते जितक्या वर्षाचे झाले तितके हजार रुपये देत असत असे वर्तमानपत्रात आले होते. हे पैसे देताना त्यांचा विनियोग कसा व्हावा याबद्दल बिर्लाच्या काही अटी नव्हत्या तेव्हा हा पैसा तोच असला पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान

नेहरूंचे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचे आंतरराष्ट्रीय परिस्थितीबद्दल काय मत आहे याचे ज्ञान होते. नेहरू दर वर्षी काँग्रेसच्या अधिवेशनात विदेश नीतीबद्दल ठराव आणीत. कम्युनिस्ट रशिया ज्यांना आपले मित्र समजतो त्यांना मदत करावी व तो ज्यांना आपले शत्रू समजतो त्यांना विरोध करावा अशा आशयाचे हे ठराव असत.

स्पेनच्या सरकारविरुद्ध जनरल फ्रँकोने बंड केले. त्याला हिटलर व मुसोलिनी यांची मदत होती म्हणून जनरल फ्रँकोच्या विरुद्ध लढण्यासाठी काही पुरोगामी स्वयंसेवक स्पेनच्या रणांगणावर गेले. त्यातच नागपुरातले बाळाजी हुद्दार होते. स्पेनला मदत करण्यासाठी गव्हाची पोती पाठवावी असा काँग्रेसचा ठराव होता. चीनवर जपानने स्वारी केली म्हणून चीनच्या मदतीसाठी डॉक्टरांचे एक पथक पाठवावे असा ठराव करून नेहरूंनी डॉ. कोटणीस व नागपूरचे डॉ. चोळकर यांना चीनमध्ये पाठविले. याने भारताचे काय भले झाले ते कळणे कठिण आहे. भारताचे तर सोडाच स्पेन व चीन

यांच्याबाबतीत देखील ही मदत केवळ प्रतीकात्मक होती.

चीनवरील जपानची स्वारी हे आक्रमण होते म्हणून नेहरू चीनच्या मदतीला धावले अशातला भाग नव्हता. रशियाने फिनलँड व लिथुआनिया इत्यादी देशावर स्वारी केली तेव्हा नेहरूंना ते आक्रमण वाटले नाही. रशियाचा फार मोठा भाग झारने जिंकलेल्या बिगर रशियनाचा होता तरी नेहरूंनी रशियाला कधी साम्राज्यवादी म्हटले नाही. बिगर कम्युनिस्टांना जिंकणे हा साम्राज्यवाद नसून विमोचन आहे असे नेहरूंचे मत होते.

१९४२ साली ब्रिटिशांविरुद्ध देशव्यापी आंदोलन करण्याचे गांधीनी ठरविले तेव्हा नेहरूंनी असे आंदोलन केल्यास ब्रिटनच्या बाजूने लढणाऱ्या रशियाचे हित धोक्यात येईल म्हणून हे आंदोलन करू नये असा सल्ला दिला होता.

काँग्रेसमध्ये विदेशनीतीबद्दलचे ठराव आणणे हेच मुळी असमर्थनीय आहे असे बहुतेक काँग्रेस पुढाऱ्यांचे मत होते. काँग्रेस हे सार्वभौम सरकार नव्हते. सत्तासीन सरकारने आमचा देश सोडून जावे म्हणून चळवळ करणारी ती एक संस्था होती. अशी संस्था विदेशनीतीच्या बाबतीत सत्तासीन सरकारला कोणत्या नात्याने सल्ले देणार? त्यामुळे नेहरूंच्या ठरावावर काही वाद न घालता इतर काँग्रेस पुढारी ते लगेच पारित करून कटकट मिटवून टाकीत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेच नेहरूंनी आपली अलिप्तता चळवळ सुरू केली. अलिप्तता म्हणजे अमेरिका व रशिया यांच्या गटात असलेल्या देशापासून अलिप्तता वा त्यांच्याबद्दल तटस्थता असे सर्वसाधारण लोक समजत होते. पण नेहरू सर्वसाधारण नव्हते व त्यांचे इंग्रजीही सर्वसाधारण लोकांसारखे कोशावर चालणार नव्हते. ज्याप्रमाणे त्यांच्या कोशात सेक्युलॅरिझम म्हणजे हिंदुद्वेष असा अर्थ होता त्याचप्रमाणे अलिप्तता म्हणजे रशियन गटाशी लिप्तता असा नेहरूंचा अर्थ होता. अलिप्तता म्हणजे रशियाची साथ देणे नव्हे असे गिरिलाल जैन यांनी एकदा टाइम्स मध्ये लिहिले तेव्हा अलिप्तता म्हणजे रशियाशी लिप्तता असाच नेहरूंचा अर्थ होता असे दाखविणारे नेहरूंचे अनेक उद्‌गार उद्‌धृत करून पुष्कळशा वाचकांनी गिरिलाल जैन यांचे म्हणणे खोडून काढले. आंतरराष्ट्रीय राजकारणात नेहरू म्हणतात त्याप्रमाणे दोन गट नसून रशिया व त्याचे उपग्रह हा एकच गट आहे कारण दुसऱ्या गटातील देश संयुक्त राष्ट्रांमध्ये कधीही एक गठ्ठा मतदान करीत नाहीत असे मिनू मसानी यांनी आकड्यानिशी दाखवून दिले होते. सुवेझच्या बाबतीत ब्रिटनने इस्राइलशी मिळून ईजिप्तशी झगडा केला तेव्हा अमेरिकेने ब्रिटनला विरोध करून रशियाला साथ दिली होती. रशियन गटात असे मतभेद झाल्याचे उदाहरण नाही. म्हणूनच अलिप्त राष्ट्रांचे ''रशियाचे अशील देश'' असे अमेरिकन अध्यक्ष वर्णन करीत. अलिप्त राष्ट्रांच्या एका संमेलनात श्रीलंकेच्या कोटलवालांनी एकदा ''वसाहतवादाची निंदा करताना पूर्व युरोपातील देशाशी रशिया करीत असलेल्या दादागिरीचीही निंदा केली पाहिजे.'' असे म्हटले तेव्हा नेहरू त्यांच्यावर खपा झाले. संयुक्त राष्ट्रातील भारताचा प्रतिनिधी नेहमी रशियाच्या बाजूने मत देई. यामुळे जगच्छान्ति प्रस्थापित करण्यास कशी मदत झाली व अणुशक्तीने भारलेले आकाश कोसळता कोसळता अलगद कसे उचलले गेले हे नेहरूभक्तच जाणोत.

उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर स्वारी केली तेव्हा उत्तर कोरियाविरुद्ध सैन्य पाठविण्याचा संयुक्त राष्ट्रांनी घेतलेला निर्णय भारत सरकारने स्वीकारला यावरून भारताची अलिप्तता सिद्ध होत नाही.

## रशियाशी सख्य

यावेळी संयुक्त राष्ट्रांच्या सभेवर रशियाने बहिष्कार घालण्याची चूक केली. त्यामुळे उत्तर कोरियाविरुद्ध सैन्य पाठविण्याचा ठराव पारित होऊ शकला. नाहीतर रशियाला तो नकाराधिकाराने धुडकावून लावता आला असता. नेहरू हे कम्युनिस्टपक्षाचे सभासद नव्हते व त्यांना रशियन राज्यकर्त्यांचे विचार काय आहेत याबद्दल पहिल्या प्रतीची माहिती नव्हती. त्यामुळे रशिया व चीन यांचा उत्तर कोरियाला पाठिंबा आहे हे त्यांना माहीत नव्हते व हे तर्काने सहज कळण्यासारखे असून देखील इतर अनेक गोष्टींप्रमाणे त्यांना कळले नाही.

काही लोक म्हणतात की रशियाशी साथ देण्याच्या नीतीला अलिप्तता म्हणता न आले तरी तिच्यामुळे भारताचा फायदाच झाला. रशियाने गोवा व काश्मीरवरील भारतविरोधी ठराव आपल्या नकाराधिकाराने रद्द करविले व ७१ च्या युद्धात भारताला मदत केली.

७१ च्या युद्धाबद्दल सविस्तर चर्चा इंदिरा गांधीवर लिहिताना करण्यात येईल. येथे एवढेच सांगणे आवश्यक आहे की हे युद्ध भारताचे युद्ध नसून रशियाने घडवून आणलेले होते. त्यात पाकिस्तानला आपल्या व्यूहात आणून अमेरिकन व्यूहातून फोडणे हा उद्देश होता. भारताचा उपयोग एक साधन म्हणून करण्यात आला होता. पाकिस्तानने छांब हा काश्मीरचा भाग जिंकून घेतला होता. रशियाच्या दबावामुळे तो पाकिसतान जवळच राहू देणे भारताला भाग पडले. ''भारताने पूर्व पाकिस्तान जिंकूनही तो का सोडून दिला?'' असे काही भाबडे हिंदू विचारतात. रशियाच्या पाठिंब्याशिवाय

भारताला काहीच ज़िंकणे शक्य नव्हते ही साधी गोष्ट ते विसरतात.

काश्मीरबद्दल तर बोलणेच नको. काश्मीर भारताचा नाही असे नेहरूखेरीज कोणी म्हणालेच नव्हते. पाकिस्तानने देखील महाराजांचा भारतास मिळण्याचा अधिकार मान्य केले होता. शिवाय रशिया जर काश्मीर भारताचे आहे असे मानत होता तर त्याने ताश्कंदमध्ये शास्त्रींना आझाद काश्मीरमधून सैन्य काढून घेण्यास भाग का पाडले? गोव्यात उघडपणे भारतीय सैन्य पाठविणे हे मुत्सद्देगिरीचे नव्हते, बहुतेक देश अशी कामे स्थानीय बंडखोरांना मदत म्हूणन करीत असतात. सरदार पटेलांनी जुनागड याच प्रकारे मुक्त केले. जिनांनी काश्मीर तसेच हस्तगत करण्याचा व्यूह रचला होता पण भारतीय सैन्याच्या हस्तक्षेपामुळे तो फसला.

नेहरूंनी हा मार्ग न स्वीकारता सरळ भारतीय सैन्य गोव्यात घुसविले कारण त्यांना मुंबईच्या निवडणुकीत कृष्ण मेननला जिंकवायचे होते. भारतीय सैन्य गोव्यात घुसविल्यामुळे या जयाचे पूर्ण श्रेय रक्षामंत्री कृष्ण मेनन यांना मिळाले. स्थानिक बंडखोरांना उत्तेजन दिले असते तर मेननला एवढे सरळ श्रेय मिळाले नसते.

कृष्ण मेननने गोवामुक्तीबद्दल दोन लेख टाइम्स ऑफ इंडिया मध्ये लिहिले. त्यात नेहरूंचे अधिकच दु:खद स्वरूप प्रकट होते. भारतीय सैन्य गोव्यात घुसण्याच्या पवित्र्यात असता त्यांना दिसून आले की पोतुगीजांना आज भारतीय सैन्याचा आघात होणार हे माहीत होते. अशा स्थितीत आघात केल्याने जय मिळण्यास उशीर व जास्त हानी झाली असती. म्हणून आघात न करता सैन्य माघारी आले. दुसऱ्या तारखेलाही असेच झाले. तेव्हा कोणी तरी पोर्तुगीजांना स्वारीची तारीख कळवितो अशी मेननला शंका आली. अधिक विचार करता नेहरूंवर या शंकेची सुई स्थिरावली. तिसऱ्या वेळेस मेननने नेहरूंना न सांगता तारीख ठरविली व २४ तासात गोवा सर झाला.

असे करण्यात नेहरूंचा उद्देश काय असेल? नेहरूंच्या पंतप्रधानकीचा उद्देश जगाची मान्यता मिळविणे हा होता. मुंबईच्या मूर्ख हिंदूमध्ये लोकप्रियता मिळविणे त्यांना मेननला जिंकविण्याच्या दृष्टीने भाग पडले. याने गेलेली आपली प्रतिमा जपण्यासाठी त्यांनी पोर्तुगीजांना व जगाला असे भासविण्याचा प्रयत्न केला की मेनन सारखे वाईट लोक लढाया करतात पण मी शांतिदूत आहे. चालले आहे हे सर्व माझ्या इच्छेविरुद्ध आहे.

## नेहरू व सैनिक गुपिते

नेहरूंच्या कृतीचा दुसरा काही अर्थ लावता येत नाही. पण असा अर्थ लावला



तर नेहरूंच्या विचारशक्तीबद्दल फारच निकृष्ट कल्पना करावी लागते. असे सांगितल्याने कोणीही आपल्यावर विश्वास ठेवणार नाही वा ठेवलाच तर आपण भारताचे नामधारी पंतप्रधान आहोत असे वाटेल हे नेहरूंच्या लक्षात आले नाही वा लक्षात आले तरी नामधारी पंतप्रधान म्हणवून घेण्याच्या नामुष्कीपेक्षा नेहरू स्वत:च्या देशासाठी लढाया करण्यास तयार असलेल्या इतर राज्यकर्त्यांसारखेच आहेत अशा प्रकारची नामुष्की त्यांना अधिक दु:सह वाटली.

जगात लोकप्रिय होण्यासाठी नेहरू भारताचे नुकसान करायला कोणत्या थराला जाऊ शकत होते याचे दुसरे प्रत्यंतर अक्सै चिनच्या प्रकरणात आले. चीनने अक्सै चीन ताब्यात घेतले आहे हे नेहरूंना माहीत होते. चीनला तिबेट व काश्मीरच्या लगतचे आपले प्रदेश यांना जोडण्यास अक्सै चीनचा उपयोग होतो. तेथे चीनी लोक रस्ते बांधू लागले ही गोष्ट जगातल्या वर्तमानपत्रात देखील छापून आली. तेव्हा गोरे यांनी लोकसभेत विचारले की, भारताच्या प्रदेशात चीनी रस्ते कसे बांधत आहेत? तेव्हा हे गुपित बाहेर पडले. पण नेहरूंनी उत्तर दिले.

''अक्सै चीनची फिकिर कशाला? तेथे गवताचे पाते देखील उगवत नाही.''

जणू अक्सै चीन ही नेहरूंची निजी मालमत्ता होती. तिच्याशी मंत्रिमंडळ व लोकसभा यांचा काही संबंध नव्हता. शिवाय शेतीशिवाय जमिनीचे दुसरे उपयोग नसतात.

चीन्यांनी बळपूर्वक भारताचा केवळ अक्सै चीनच नव्हे तर हजारो चौरस मैल भाग गिळंकृत केला होता. त्यातलाच आणखी एक अक्सै चीन. नेहरू हे रोखण्यास असमर्थ होते हे नेहरूंच्या कृत्याचे समर्थन होऊ शकत नाही. विशेषत: चीनच्या विरुद्ध सर्व प्रकारची मदत करायला अमेरिका तयार होती. पण नेहरू ही मदत घ्यायला तयार नव्हते. याची कारणे दोन होती (१) नेहरूंच्या मते कम्युनिस्ट राष्ट्राचे आक्रमण हे विमोचन असते. चीनने आक्रांत केलेले प्रदेश हे वस्तुत: भांडवलशाहीतून कम्युनिझमकडे प्रवास करण्यासाठी मुक्त केलेले प्रदेश आहेत. तिबेटबद्दल एक नेहरूभक्त लोकसभेत असे स्पष्टच म्हणाले होते. (२) भारताचे प्रदेश आपल्या पदरात टाकले म्हणून चीन आपल्याला धन्यवाद देईल व कम्युनिस्ट चळवळीच्या इतिहासात आपले नाव अजरामर होईल. बिगर कम्युनिस्ट जगातदेखील शांतिपूजक लोक आहेत. ''नेहरूंनी जगच्छान्तीसाठी आपल्या देशाच्या हिताची पर्वा केली नाही म्हणून ते आपल्याला शांतिदूत समजतील. नाराज होतील ते चारदोन हिंदू. पण त्यांना आपण चार लाथा मारल्या तरी ते आपल्यावर नेहरूंचा अनुग्रह झाला असेच समजतील.'' असे

नेहरूंचे गणित होते.

या गणितातील फक्त शेवटचा भाग खरा होता.

७१च्या युद्धात अमेरिका भारताच्या विरुद्ध होती अशी समजूत सार्वत्रिक आहे पण ती बरोबर नाही. पश्चिम पाकिस्तान भारताने नष्ट करू नये यावर अमेरिका दृढ होती. पण याबाबतीत अमेरिकेच्या व रशियाच्या भूमिकेत काहीही फरक नव्हता. बंगलादेशाच्या स्थापनेला अमेरिकेचा विरोध नव्हता. ब्रिटन उघडपणेच बंगलादेशच्या स्थापनेचे स्वागत करीत होते. अमेरिकेचे याबाबतीतले धोरण ब्रिटनच्या धोरणावरून अनुतानिता येते.

अमेरिकेने या युद्धाच्या शेवटी शेवटी आपले एक जहाज पूर्व पाकिस्तानच्या किनाऱ्यावर पाठविले होते. ते पाकिस्तानी सैनिक भारतीय सैन्याच्या हाती सापडू नयेत व त्यांना पाकिस्तानात नेता यावे म्हणून असावे. पण हे सैनिक समुद्रकिनाऱ्यापर्यंत पोचलेच नाहीत.

■■■



# भारताच्या सुरक्षेचा खेळखंडोबा

ए. रूद्रांच्या आठवणीत (Memoris) लिहिले आहे की, १९४७ मध्ये तिन्ही रक्षादलांचे प्रमुख भारताच्या सुरक्षेला कोणकोणते धोके आहेत व त्याच्यापासून बचावण्यासाठी काय उपाय केले पाहिजेत याचे एक निवेदन नेहरूंकडे घेऊन गेले. नेहरू ते पाहून खवळले व म्हणाले.

''मूर्खपणा, शुद्ध मूर्खपणा. भारताला काहीच धोका असू शकत नाही. भारत अहिंसावादी आहे. असल्या योजना करण्यापेक्षा ही रक्षादळे बरखास्तच करा. नुसत्या पोलिसांनी आमचे कायम भागेल''

नेहरूंच्या या उद्‌गारांची गंभीर दखल घेतली पाहिजे. नंतर जो भारताच्या रक्षणाचा खेळखंडोबा झाला त्याच्या संदर्भात ते अत्यंत महत्त्वाचे आहेत.

पाठवावेत असे सरदारांना कधीच सुचविले नव्हते. जे त्यांनी सुचविलेच नाही ते सरदारांनी ऐकले नाही असे म्हणण्यात काय अर्थ?

नेहरूंच्या वरील वागण्याचा अर्थ स्पष्ट आहे. ''आपण आपल्या सेनापतींना काय सांगितले ही वार्ता बाहेर पसरणारच व असे झाले की आपल्या सेनापतींना अहिंसा शिकविणारा जगातला एकमेव व अशोकापेक्षाही श्रेष्ठ राज्यकर्ता म्हणून आपली प्रतिमा निर्माण होईल.'' असा नेहरूंचा होरा होता.

नेहरूंनी भारताच्या संभाव्य संकटांचा अंदाज बांधून एक पर्याप्त संरक्षणयोजना आखण्याचा कधी प्रयत्नच केला नाही याचे कारण नेहरू शांततावादी होते हे नाही. ''भारताला सैनिक संकटांना तोंड द्यावे लागण्याचा संभवच नाही,'' अशी त्यांची खात्री होती. आपल्याशिवाय आंतरराष्ट्रीय राजकारण कुणाला समजतच नाही. त्यातून खाकीवाल्यांचे विचार नेहमी युद्धाभोवतीच घुटमळत राहणार. त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारण काय समजते? झाल्याच तर पाकिस्तानशी सीमेवर काही कटकटी होतील. पाकिस्तानजवळ वायुदल नाही, नौदल नाही व अवघे ८ रणगाडे आहेत. त्यांना भिऊन एखादी संरक्षणयोजना आखण्याची काहीच जरूर नाही. चीन बलिष्ठ होऊ शकतो पण तो कम्युनिस्ट व पुरोगामी आहे. पुरोगामी व कम्युनिस्ट राष्ट्रे कुणावर आक्रमण करीत नसतात. कम्युनिस्टांचे आक्रमण हा शब्दप्रयोग ''पतीने केलेला बलात्कार'' या शब्दप्रयोगासारखा आहे.

शिवाय आपण कम्युनिस्टांचे सहप्रवासी आहोत याचे ध्यान चीन जरूर ठेवील. चीनने आपल्याशी युद्धच करायचे ठरविले तर त्यातून जागतिक युद्ध उद्‌भवेल व आपण कोणाच्या तरी पक्षात राहू. त्या पक्षाची आपल्यास पूर्ण मदत राहील. मग आपल्यास वेगळी तयारी करण्याची जरूर काय? अशी नेहरूंची विचारसरणी होती. नेहरू त्यांच्या कारकीर्दीतील १७ वर्षात रोज अनेक भाषणे करीत होते. या सतरा वर्षात रोज वर्तमानपत्र वाचणाऱ्या व नभोवाणी ऐकणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला याबद्दल शंका असणार नाही.

नेहरू भारताचे अविवाद्य पुढारी झाले होते. थोडेसे काही बिघडल्याने त्यांचे पुढारीपण धोक्यात येण्यासारखे नव्हते.

पाकिस्तान यावेळी सैनिक शक्तीत अगदीच दुबळा होता व एखाद्या आठवड्यात त्याचा पूर्ण पराभव करणे भारताला शक्य होते. असे नसते तर सरदार पटेलांच्या वेळी पूर्व पाकिस्तानच्या सर हद्दीवर भारतीय सैन्य युद्धाच्या पावित्र्यात उभे झाले तेव्हा पाकिस्तानचा पंतप्रधान शांतीची भीक मागत दिल्लीत आला नसता.

पाकिस्तानच्या पुढाऱ्यांना या परिस्थितीची दुःखद जाणीव व शक्य तितक्या



लवकर आपण भारताशी सैनिक शक्तीत तुल्य झाले पाहिजे हा सर्व पाकिस्तानी पुढाऱ्यांनी ध्यास घेतला होता. पाकिस्ताननिर्मितीच्या तत्त्वज्ञानाने भारलेल्या मुसलमानांना काफिराकडून-विशेषतः हिंदूकडून रणांगणात पराभव पत्करणे ही सगळ्यात नामुष्कीची गोष्ट होती

## पाकिस्तानची मोठी उपलब्धी

यावेळी पाकिस्तानच्या पुढाऱ्यांची राजनीतिपटुता व देशाभिमान ही नेहरूंपेक्षा किती श्रेष्ठ आहे हे स्पष्ट झाले. त्यांनी अमेरिकेच्या कम्युनिस्टविरोधी व्यूहात शिरण्याचा निर्णय घेतला. या व्यूहात शिरल्यामुळे काही खर्च न करता पाकिस्तानात अद्ययावत शस्त्रास्त्रांचा ओघ सुरू झाला व अवघ्या पाच वर्षात पाकिस्तान भारताशी तुल्यबळ झाले.

या वेळेस काकासाहेब गाडगीळ यांच्याशी माझी चर्चा झाली. त्यात ते म्हणाले, ''पाकिस्तानचे नेते अदूरदृष्टीचे आहेत. भारताशी तुल्यबल व्हायचे एवढा एकच ध्यास धरून त्यांनी रशियासारख्या प्रबल राष्ट्राचा रोष ओढवून घेतला आहे. याची किंमत त्यांना चुकवावी लागेल.''

प्रत्यक्षात असे काहीच घडले नाही. रशियाने देखील ताश्कंद व सिमला या दोन्हीप्रसंगी पाकिस्तानलाच साथ दिली. १९८० च्या आसपास रशियन नेत्यांनी भारताकरवी पाकिस्तान नष्ट करण्याची योजना आखली होती. पण ही योजना अमेरिका व चीन या दोघांनीही हाणून पाडली असती यात संशय नाही. या कारणास्तव पंतप्रधान मुरारजी देसाई यांनी रशियाला साथ दिली नाही.

पाकिस्तान कम्युनिस्टविरोधी व्यूहात असून देखील चीनसारखा कम्युनिस्ट देश त्याला आपला मित्र समजत होता व सहप्रवासी भारताला शत्रू समजत होता याचे मर्म नेहरूंना कधीच समजले नाही. कम्युनिझमच्या पूर्वी ख्रिस्ती धर्म व इस्लाम या दोन राष्ट्रवादविरोधी आंतरराष्ट्रीय विचारसरणी जगात पसरल्या होत्या पण त्या दोघांनाही राष्ट्रवादावर मात करता आली नाही. अरबाकडून इस्लाम स्वीकारलेल्या तुर्कांनी खुद्द अरबांचेच देश आपल्या ताब्यात घेतले. पुढे इस्लामी तुर्कांच्या विरुद्ध इस्लामी अरबांनी स्वातंत्र्ययुद्ध केले. ख्रिस्ती राष्ट्रांनी आपसात जागतिक स्तरावर युद्धे केली. हे सांगायचीच जरूर नाही. ख्रिस्ती धर्म व इस्लाम यांच्या मानाने कम्युनिझमचे आंतरराष्ट्रीय स्वरूप बेगडी होते. स्टॅलिनने त्याचा केव्हाच मुडदा पाडून राष्ट्रवादावर रशियाची उभारणी केली होती. जर्मनीचे परचक्र आले तेव्हा ''पितृभूमीच्या रक्षणार्थ लढा'' अशी स्टॅलिनने हाक

दिली होती. "कम्युनिझमसाठी लढा" अशी नाही. इतिहास वाचून देखील नेहरूंच्या हे कधी डोक्यात शिरले नाही.

प्रत्यक्ष महायुद्ध पेटलेच असते तर भारताची नेहरूप्रणीत तटस्थता त्याच्या कामी आली नसती. पाकिस्तानला वाचविण्यासाठी चीनने भारतावरच झडप घातली असती. भारत केव्हाही डोईजड होऊ शकतो, त्याला तसे होऊ न देणे हे चीनचे नेहमीच उद्दिष्ट राहिले आहे.

रशियाशी अमेरिकेची "झमकली" असती तरी चीन कम्युनिस्ट असूनही रशियाच्या बाजूने युद्धात पडण्याचा संभव नव्हता.

भारतीय नेत्यापेक्षा पाकिस्तानचे नेते अधिक चाणाक्ष होते हे पुढील घटनांनी सिद्ध केले आहे.

पाकिस्तान आपल्यापेक्षा आठपट लोकसंख्या व इतर साधने असलेल्या भारताशी बरोबरीच्या नात्याने सामना करण्याइतका समर्थ झाला व त्याने अणुगोलही भारताच्या आधी बनविला ही पाकिस्तानची मोठीच उपलब्धी आहे. भारताची एवढी मोठी कोणतीच उपलब्धी नाही.

भारताने पाकिस्तानवर स्वारी केली वा चीनने भारतावर स्वारी केली तर जागतिक युद्ध होईल, वगैरे नेहरूचे आडाखे अत्यंत ढोबळ होते. तत्काल निकाल न लागता युद्ध लांबले तरच या गोष्टी होऊ शकतात. हैदराबादची पोलिस कारवाई पाच दिवसात न आटपता महिनोगणती लांबली असती तर हैदराबाद कारवाईतूनही आंतरराष्ट्रीय भानगडी निर्माण झाल्या असत्या. चीनने सात दिवसात भारतीय सैन्याचा पूर्ण नाश केला म्हणून चीनच्या हल्ल्यापासून जागतिक संघर्ष उद्‌भवले नाहीत. बलप्रयोग करायचा तर ताबडतोब सफल होईल एवढ्या प्रमाणात केला पाहिजे. म्हणजे जग त्याची उठाठेव करीत नाही. ज्याने शांततेचा फारसा भंग होत नाही अशा भांडणात संयुक्त राष्ट्रे लक्ष घालीत नाहीत.

पाकिस्तान भारताशी तुल्यबळ झाले ही भारतासाठी कायमची डोकेदुखी आहे हे ओळखून नेहरूंनी काहीच पावले उचलली नाहीत.

## सभागृहात थिमय्या व रणांगणावर नेहरू यांची फजिती

कुलदीप नायरासारखे नेहरूभक्त म्हणतात की "चीनशी झालेल्या फजितीला सैनिक अधिकारी जबाबदार आहेत, नेहरू नव्हे." कुलदीप नायर हे प्रामाणिकपणे म्हणत असतील तर आश्चर्याची गोष्ट आहे. लोकशाहीमध्ये आपले संभाव्य शत्रू कोण



आहेत हे ओळखून त्या अनुसार आपल्या संरक्षणाची तजवीज करणे ही सरकारची जबाबदारी आहे. आपले कुणाशी बिनसेल हे आपल्या आंतरराष्ट्रीय संबंधांवर अवलंबून आहे. हे सैन्य ठरवीत नसते. तसेच संभाव्य शत्रूची बलस्थाने कोणती हे शोधून काढण्यास सैन्याजवळ काहीच साधने नसतात. ती फक्त सरकारजवळच असतात. सरकारने ही माहिती सैन्याला पुरवून मग उपाययोजनेसाठी कोणती शस्त्रास्त्रे लागतील हे सैन्याला विचारायचे असते. सैन्याची जबाबदारी या टप्प्यापासून सुरू होते.

पण नेहरूंना आपल्याला सैन्याची जरूरच नाही असे वाटत होते. गोपाल लिहितात. "१९६२ साली सेनापतींनी अनेक वेळा "आवश्यक शस्त्रास्त्रांची भयदायी कमतरता आहे" असे सरकारला कळविले होते. पण निकट भविष्यात युद्ध संभवतच नाही म्हणून नेहरूंनी तिकडे दुर्लक्ष केले." सेनापतींना धोका कळला होता पण नेहरूंना नाही.

याचा मला प्रत्यक्षच अनुभव आला. रक्षाविज्ञानप्रयोगशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी नेहरूंचे भाषण होते. रक्षामंत्री मेनन व सेनापती थिमय्या हजर होते. सगळ्यात आधी थिमय्या बोलले:-

"देशाचे रक्षण करण्यासाठी सज्ज असणे ही सैन्याची जबाबदारी असली तरी वाटेल त्या आक्रमणाला तोंड देण्याइतकी सज्जता कोणालाच शक्य नसते. आपल्या संभाव्य शत्रूच्या मानाने आपण प्रबळ असले पाहिजे हे सज्जतेचे तत्त्व आहे पण त्यासाठी आपला संभाव्य शत्रू कोण हे कळले पाहिजे."

थिमय्यांचा रोख अगदी स्पष्ट होता. "आपल्याला चीनपासून धोका आहे व चीनशी टक्कर देता येईल एवढे आपले सामर्थ्य असले पाहिजे. आमच्या राज्यकर्त्यांनी हे स्पष्टतया जाणून सैन्याच्या तयारीला मदत केली पाहिजे."

यानंतर रक्षामंत्री मेनन उभे राहिले व म्हणाले - "सेनापतीसाहेबांचे भाषण ऐकून मला माझ्या लहानपणची गोष्ट आठवते. आमच्या शाळेजवळ बरीच झाडी होती. आम्ही तिला जंगल म्हणत असू. मी मास्तरांना अनेक वेळा विचारले." "आम्ही या जंगलात फिरायला जातो. पण मला सारखी भीती वाटते." एखाद्या वेळेस आमची वाट एखाद्या सिंहाने अडवली तर काय करावे?" मास्तर माझे प्रश्न ऐकून नुसतेच हसत. मी एकदा रडकुंडीला येऊन विचारले, तुम्ही सिंहाबद्दल काही सांगत नाही. मला वाटते मी फिरणे सोडून द्यावे. तेव्हा मास्तर म्हणाले, "फिरणे सोडू नकोस. यदाकदाचित सिंह आलाच तर काय करावे याची काळजी कशाला? तुला काहीच करावे लागणार नाही. जे काय करायचे ते सिंहच करील."

नेहरू हे ऐकत होते. चीनी सिंह झडप घालायला येईल हे शाळेच्या जवळ असणाऱ्या झाडीत सिंह भेटण्याइतकेच संभवनीय आहे. पण भेटलाच तर आलीया भोगासी असावे सादर. बंदूक घेऊन जाण्याचा खटाटोप व्यर्थ आहे. गरीब विद्यार्थ्यांच्या पालकांचे अर्धे उत्पन्न त्या बंदुकीच्या किमतीत व राखणीतच जायचे. तिचा एकदाही वापर व्हायचा प्रसंग यायचा नाही.

सर्व श्रोते थिमय्याची कशी फजिती झाली म्हणून हसले. पण नियती थिमय्याला हसणार नसून नेहरू/मेनन जोड्याला हसणार आहे हे फारच थोड्यांना माहीत होते.

सेनापती आपल्या कर्तव्यास चुकले नसून रक्षामंत्री व प्रधानमंत्रीच चुकले हे स्पष्ट आहे. वरील प्रकार नेहरूंच्या समोरच घडला. थिमय्या जे बोलले ते पूर्वी अनेकवेळा नेहरू व मेनन यांच्या जवळ बोलले असणार. सेनापती थोरात म्हणाले होते की ''त्यांनी चीनला कसे थोपवावे याची एक योजना मेननला दिली होती पण ती नेहरूपर्यंत पोचलीच नाही.'' ही थोरातांची भाबडी समजूत होती. मेनन नेहरूंचेच विचार बोलत होते. मेननला शिव्या देणाऱ्या बहुतेकांना हे माहीत होते. पण नेहरूंवर टीका करण्याची त्यांची हिम्मत नव्हती. सिंहाला बळी देणे परवडत नाही म्हणून बळीसाठी निवडलेला मेनन हा एक बकरा होता.

## नेहरूंच्या रक्षणास चीन धावला

नेहरूंनी स्वत:च अनेक वेळा स्पष्ट केले की ''मेनन जे करतात व बोलतात त्याला त्यांचा पूर्ण पाठिंबा आहे. मेननवरील टीका ही माझ्यावरील टीका आहे.''

१९६२ मध्ये चीन्यांशी झुंजण्यात सारे भारतीय सैन्य पूर्व आघाडीवर गुंतले असता पाकिस्तान सीमेवर भारताचा एकही शिपाई नव्हता व मनात येईल तेव्हा पाकिस्तानला दिल्लीपर्यंत आपले साम्राज्य पसरता आले असते. पण अमेरिकेने पाकिस्तानला ''खबरदार म्हणून रोखून धरले.''

भारताला एवढा धोका निर्माण झाला तेव्हा मेननला काढण्याच्या मागणीने जोर धरला तेव्हा नेहरू म्हणाले. ''मला काढल्याशिवाय मेननला काढता येणार नाही.'' तेव्हा परिस्थितीच्या गांभीर्याने धैर्य धारण करून महावीर त्यागी म्हणाले, ''असे असेल तर तुम्हाला काढण्याचाही विचार करावा लागेल.''

चीनने भारतीय सैन्याचा नाश करण्याचे आपले उद्दिष्ट साध्य केल्याबरोबर युद्धविराम केला म्हणून नेहरू वाचले.

वस्तुत: नेहरूंना वाचविणे हा चीनी युद्धविरामाच्या मागचा एक हेतू होता.



नेहरूंना बडतर्फ करून अमेरिकेशी चीनच्या विरुद्ध तह करण्याचा राष्ट्रपती राधाकृष्णन् यांचा विचार होता अशी वार्ता साऱ्या रक्षामंत्रालयात पोचली होती. अमेरिकेशी असा तह झाला असता तर अमेरिकेकडे दलाई लामा आपली फिर्याद घेऊन पोचले असते. चांग कै शेख हा अमेरिकेचा दोस्त खुद्द चीनवरच अधिकार सांगत होता. अमेरिकेशी संकल्पित तह झाला असता तर तिबेटवरील चीनच्या तथाकथित सार्वभौमत्वापासून तो चीनमधील कम्युनिस्ट क्रांतीच्या वैधतेपर्यंत सर्वच मुद्दे अमेरिकेने उपस्थित केले असते. भारताचे चीनपासून रक्षण करणे आवश्यक आहे असे अमेरिकेला पुष्कळ आधीपासूनच वाटत होते व म्हणून आयसेनहावर यांनी नेहरूंना अयूबखानांशी चर्चा करून एक संयुक्त रक्षणव्यवस्था निर्माण करण्याची सूचना केली होती. तेव्हा ''कुणाविरुद्ध रक्षण करायचे?'' असे विचारून नेहरूंनी साऱ्या जगात आपले हसे करून घेतले होते. १९५७ मध्ये चीनशी प्रसंग पडण्याचा अजीबात संभव नाही. म्हणून त्यांनी लोकसभेला सांगितले होते. नेहरूंना परराष्ट्रीय राजकारण किती कळत होते याचा हा पुरावाच आहे.

भारतीय सैन्याला शस्त्रांची फक्त आवश्यकता होती. भारताचे व चांग कै शेखचे सैन्य व अमेरिकेची शस्त्रास्त्रे यांच्या पुढे चीनी कम्युनिस्ट क्षणभरही टिकू शकले नसते. युद्धविराम करून आपला भारताविरुद्धचा सगळ्यात मोठा दोस्त जो नेहरू त्याला चीनने वाचविले व भारताविरुद्ध आपली कायमची श्रेष्ठता प्रस्थापित केली.

चीनी आणखी पुढे धडक मारीत आले तर आपले काही खरे नाही हे ओळखून नेहरूच अमेरिकेकडे धाव घेतील हे चीनलाही कळत होते. तुमच्या स्थानाला धक्का लागेल असे आम्ही काही करणार नाही अशी नेहरूंना सूचना देण्याची गरज चीन्यांनाही वाटत होती. म्हणून त्यांनी टाइम्सचे संपादक नानपोरिया यांना निवडले. नानपोरियाने चीनी युद्धविराम होण्याच्या आठवडाभर आधी ''चीनी लवकरच युद्धविराम करतील'' असे प्रतिपादन करणारा एक लेख लिहिला. तो नेहरूंच्या वाचनात न येणे शक्यच नव्हते. नेहरू टाइम्स वाचत. नानपोरियाशी त्यांचा चांगला परिचय होता. राधाकृष्णन् व अमेरिकन अध्यक्ष यांनाही अर्थात याची पूर्वकल्पना आली असली पाहिजे. त्यामुळे चीनी युद्धविराम होण्याच्या आधीच अमेरिकेशी चीनविरुद्ध तह होण्याची शक्यता मावळली.

नानपोरियाला चीनकडून सूचना मिळाली होती असे समजण्याचे कारण नानपोरियाचे पूर्वीचे व नंतरचे चीनबद्दलचे कोणतेच भाकित खरे ठरले नाही. तेव्हा नानपोरिया हे मोठे अचाट भविष्यदर्शी नव्हते हे स्पष्ट आहे.

## भारताचा बुद्धया बळी

परिस्थिती पूर्णपणे अनुकूल असूनही नेहरूंनी भारताचे वाटोळे कसे केले याचे चीन्याकरवी फजिती हे उत्कृष्ट उदाहरण आहे. कम्युनिस्टविरोधी व्यूहात सामील होणे हे नेहरूंच्या तत्त्वांविरुद्ध आहे हे ओळखून आयसेनहावर यांनी नेहरूंना पाकिस्तानशी संयुक्त रक्षाव्यवस्था करायची सूचना केली. नेहरू अखंडभारतवादी आहेत हे त्याने ऐकले होते व या निमित्ताने भारतीय उपखंडाची भारत व पाकिस्तान या दोघांनाही काळजी आहे व याबाहेरील शक्तींना ते तेथे पाय ठेवू देणार नाहीत ही विचाराची दिशा नेहरूंना पसंत पडेल असे आयसेनहावरला वाटत होते. आयसेनहावरची दुसरी सूचना भारताला बिनशर्त शस्त्रपूर्ती करण्याची देखील होती. कसेही करून चीनला पायबंद बसला पाहिजे हा अमेरिकेचा उद्देश होता.

बिचारा आयसेनहावर! त्याला काय माहीत की पाकिस्तान व हिंदुस्तान यांचा संयुक्त भारत व त्याचे बाहेरील शक्तीपासून रक्षण या राष्ट्रवादी गोष्टींना नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय विचारात काहीही स्थान नव्हते. जगाचे पुढारी म्हणून मिरवण्यासाठी त्यांना चीनचेही भले करायचे होते. भारत हे त्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वापरता येऊ शकणारे एक भांडवल होते.

नेहरू व गांधी वा इतर पुढारी यांच्यात फरक हा आहे की इतर पुढारी इतिहासजमा झाले आहेत. उलट भारताचा सारा व्यवहार नेहरूवादावर आजही चालला आहे. सुरक्षेबद्दल तर हे अविवाद्यपणे खरे आहे. चीनच्या विरुद्ध लष्करी तयारीची गोष्ट काढल्याबद्दल थिमय्यांना लोक हसले होते. आज खुद्द रक्षामंत्री फर्नांडिस "चीन आमचा शत्रू आहे." असे म्हणाल्याबरोबर त्यांचे तोंड बंद करण्यात आले. आमच्या देशातील प्रदेशावर ज्या देशाने अधिकार सांगितला व तो स्थापित करण्यासाठी आमच्यावर स्वारी केली त्याने ते आपले दावे सोडले नसताना देखील त्याला शत्रू म्हणणे हा या देशात गुन्हा आहे. लोकसभेने नेहरूंच्या काळातच चीनच्या ताब्यात असलेले प्रदेश मुक्त करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्या प्रतिज्ञेची आठवण करून देणाराही आज वेड्यात काढला जाईल. आमची लष्करी तयारी जेमतेम पाकिस्तानच्या बरोबर आहे. "चीनचे काय?" असे विचारल्याबरोबर "चीनशी तुलना करू नका." असे सांगण्यात येते. का बरे तुलना करू नये? चीनमधील सध्याची सत्ता १९४९ मध्ये म्हणजे आमच्या हल्लीच्या सत्तेच्या दोन वर्षे नंतर उदयास आली. त्यावेळी चीनचे सामर्थ्य आमच्यापेक्षा कमी होते. ते अवघ्या दहा वर्षात अनेकपट करून चीनने आमच्या सर्व सेनेचा नाश केला व आमच्या ताब्यातील ८८०६० चौरस कि. मी. भूमी



हिसकून घेतली. चीनचा दावा न्यायाचा होता की नव्हता? न्यायाचा असेल तर अजून त्याने अधिकार सांगितलेली पण १९६२ च्या युद्धात न व्यापलेली बरीच भूमी भारतात आहे. ती घेण्याचा प्रयत्न तो करणार आहे की नाही? त्याच्यात तसे करण्याचे सामर्थ्य आहे. तो तसे करणार नाही असे मानले तर ६२ सालीच त्याला आमचे २०००० सैनिक कापून काढण्याचीही गरज का भासली? चीन म्हणतो "भारतीय सैन्यानेच प्रथम आमच्यावर हल्ला केला. आम्ही भारताची एक इंचही भूमी घेतली नव्हती." या सर्वाबद्दल आमच्या राष्ट्राचे असे मत आहे काय की, नेहरूंनीच सामर्थ्य नसता चीनची आगळिक केली व आता आपण आगळिक केली नाही तर चीनपासून आपल्याला काही धोका नाही? असे जर आमच्या सरकारला वाटत नसेल तर चीनला थोपविता यावे यादृष्टीने आम्ही कोणतीच पावले उचलीत नाही याचा अर्थ काय करावा?

भारतात इतर सर्व क्षेत्राप्रमाणेच सैनिक सामर्थ्याच्या बाबतीत देखील परावलंबनाचीच नीती आहे. नेहरूंनी भारतात विज्ञानाचे संवर्धन केले असे सांगण्यात येते. पण भारताला अजून रणगाड्याचे ऊर्जक बनविता येत नाही. आमचा विजयंता रणगाडा बेकार ठरला व अर्जुन रणगाड्यासाठी जर्मनीकडून ऊर्जक घ्यावे लागले. जर्मनी आमची निकड पाहून या ऊर्जकाची किंमत सारखी वाढवत आहे.

आम्ही दुसऱ्यापासून शस्त्रास्त्रे विकत घेतो. बहुधा रशियापासून. रशियाची शस्त्रास्त्रे अमेरिकेच्या शस्त्रास्त्रापेक्षा निकृष्ट आहेत. पाकिस्तानची शस्त्रास्त्रे मुख्यत: अमेरिकन आहेत म्हणजे आम्ही शस्त्रास्त्रात पाकिस्तानशी ज्या बरोबरीचा दावा सांगतो तो आमची शस्त्रास्त्रे पाकिस्तानच्या शस्त्रास्त्रापेक्षा निकृष्ट आहेत हे विसरून सांगतो. आमच्या सैनिकांनी ए. के. ४७ बंदूक प्रथम नागा विद्रोह्याजवळ पाहिली. म्हणजे बंडखोराइतकी देखील आमची शस्त्रास्त्रे क्षम नाहीत. शिवाय विकत घेतलेल्या शस्त्रांना दारुगोळा व राखण याबाबतीत परकीयांवर अवलंबून रहावे लागते. कारगीलमध्ये तोफा वापरण्याची जरूर पडल्यावर आम्हाला त्या तोफात गोळे नाहीत म्हणून युरोपात धाव घ्यावी लागी. प्रत्येक युद्धात आमचा दारूगोळा एखाददोन आठवड्यातच संपतो. हे परावलंबन थांबविले नाही तर आतापर्यंत जी लाथा खाण्याची परंपरा स्थापित झाली आहे तिच्यात खंड पडणार नाही. (ज. दौलतसिंग Indian Express 9/1/2005).

■■■

# नेहरूंनी ओढवून आणलेले चीनी गंडांतर

कुरुकटकासि पहाता तो उत्तर बाळ फार गडबडला।
स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु बायकात बडबडला।

*मोरोपंत*

"नेहरू जगाचे शांतिदूत होते." ही आरती भारतीयांच्या जखमांवर मीठ चोळणारी आहे. स्वराज्य स्थापन झाल्यापासूनच भारताला युद्धे लढावी लागली. ही सर्व युद्धे सहज टाळण्यासारखी व केवळ नेहरूनीतीतून उद्‌भवलेली होती. काश्मीरच्या बाबतीत हा आरोप काश्मीरप्रकरणातच चर्चिला आहे. नेहरूनीतीमुळे परसत्तेशी झालेले महान गंडांतरासारखे व भारताला साऱ्या भविष्यकाळात मान खाली घालायला लावील असे युद्ध चीनशी झालेले होते. हे युद्ध नेहरूंनी बोलावून आणलेले होते. याशिवाय देशात निर्माण झालेला नागा, नक्षलवादी, खालिस्तानी वगैरेंची हजारो हिंदूंच्या कत्तलीस कारणीभूत झालेली व अजून न शमलेली बंडे ही सर्व नेहरूंनी निर्माण केलेली आहेत. नेहरूनंतर पाकिस्तानशी झालेली दोन युद्धे व आता उद्‌भवलेला भीषण इस्लामी आतंकवाद या नेहरूवादाच्याच देणग्या आहेत. स्वराज्यानंतर गोवामुक्ती हे एकच युद्ध भारताने जिंकलेले व भारताला मुळीच क्षति न पोचता लाभप्रद झालेले युद्ध होते. बाकी सर्व युद्धे भारत हरला आहे. याला ७१ चे बंगलादेश युद्ध हा अपवाद आहे अशी समजूत आहे. पण ती फारशी बरोबर नाही हे इंदिरा गांधी प्रकरणात दाखवून देण्यात येईल.



चीनयुद्ध नेहरूंनी चीनला तिबेटचे दान केल्यामुळे उद्‌भवले. त्यामुळे स्वराज्यस्थापनेच्या वेळी भारताचे व चीनचे तिबेटमध्ये काय अधिकार होते याची चर्चा केली पाहिजे. (आधार : Advanced History of India, R. C. Majumdar.)

ब्रिटिश लोकसभेचा भारतीय स्वातंत्र्याचा कायदा हा भारत सरकारच्या अधिकारांचा वैधानिक आधार आहे. या कायद्यानुसार भारतावरील ब्रिटिश राज्याचे जे अधिकार भारताच्या व्हाइसरॉयला होते त्यातून पाकिस्तानात अंतर्भूत केलेल्या प्रदेशासंबंधीचे अधिकार वगळता बाकीचे सर्व अधिकार स्वतंत्र भारताच्या सरकारला आहेत. म्हणजे तिबेटवर व्हाइसरॉयला जे अधिकार होते ते सर्व नेहरू सरकारला होते. हे अधिकार कोणते होते हे समजून घेण्यासाठी तिबेट व ब्रिटिश यांच्या संबंधांचा इतिहास सांगितला पाहिजे.

ब्रिटिश कालात तिबेटमध्ये दलई लामाची सत्ता होती, चीनची नव्हे. तिबेटचा मुख्य मंत्री रशियाशी संधान बांधू इच्छितो अशी कुणकुण लागल्यामुळे १९०३ मध्ये ब्रिटिश सरकारने यंग हस्बंड याच्या नेतृत्वाखाली तिबेटमध्ये सैन्य पाठविले. त्याने १९०४ मध्ये ल्हासामध्ये प्रवेश केला. त्यावेळी तिबेटने रशियाशी संबंध ठेवणार नाही असे वचन दिले. भारताच्या ब्रिटिश सरकारशी त्याचा यावेळी जो तह झाला त्या अनुसार भारताला ग्यांटसी, गार्टोक व यातुंग येथे बाजारपेठा उघडून त्या भारताशी तारायंत्रांनी जोडण्याचा व त्यांच्या रक्षणासाठी सैन्य ठेवण्याचा अधिकार प्राप्त झाला. ग्यांग्स्टी येथे भारताचा व्यापारप्रतिनिधी नेमण्यात आला.

यावेळी चीनने ब्रिटनशी करार केला व ब्रिटिशांनी तिबेट खालसा करणार नाही वा त्याच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करणार नाही असे वचन दिले. तात्पर्य तिबेट चीनच्या सैनिक प्रभावाखाली नसून ब्रिटिशांच्या सैनिक प्रभावाखाली होता व ते वाटेल तेव्हा तिबेट खालसा करू शकत होते.

तिबेटमध्ये ब्रिटिश सैन्य येऊ नये असे रशियाला वाटत होते. त्यामुळे त्याने १९०७ मध्ये भारताच्या ब्रिटिश सरकारशी तह करून रशिया तिबेट ताब्यात घेणार नाही तसेच ब्रिटिशही तो ताब्यात घेणार नाहीत असे कबूल केले. भारतीय सैन्याव्यतिरिक्त तिबेट सोडून दुसऱ्या कुणाचेही सैन्य तिबेटमध्ये नव्हते.

चीनला ही स्थिती रुचत नव्हती व १९१० साली त्याने तिबेटवर स्वारी करून तिबेट ताब्यात घेतले. तेव्हा दलई लामा नेहरूंच्या काळाप्रमाणेच भारताच्या आश्रयाला आला. १९११ साली चीनमध्ये क्रांती झाली तेव्हा तिबेटी लोकांनी चीनविरुद्ध बंड करून चीन्यांना तिबेटमधून हाकून लावले.

चीनी तिबेटवर पुन: स्वारी करतील व तिबेट अस्थिर होईल म्हणून व्हाइसरॉयने चीन व तिबेट यांच्या प्रतिनिधींना १९१३ मध्ये सिमल्यास बोलावले व त्यांच्याशी करार केला.

## तिबेटची स्वायतत्ता

१९१३ च्या तहाप्रमाणे चीनने तिबेटमध्ये सैन्य घुसविण्याचा व त्याच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करण्याचा आपल्याला अधिकार नाही हे कबूल केले. उलट भारताचे सैन्य तेथे होते व आणखी सैन्य पाठविता येणार नाही असे भारतावर कोणतेच बंधन नव्हते. म्हणजे तिबेटवर भारताचा अधिकार हे सत्य होते व चीनचा अधिकार हे मिथ्य होते.

१९४९ साली तिबेटने चीनी प्रतिनिधीला आपला गाशा गुंडाळून तिबेटमधून निघून जाण्यास सांगितले होते. त्यानंतर तिबेटमध्ये चीनच्या अस्तित्वाचे कोणतेच चिन्ह नव्हते.

याच वेळी तिबेट व ईशान्य भारत यांची सीमा सांगणारी मॅक्मोहन रेषा अस्तित्वात आली. ती चीनने मान्य केली होती असे डॉ. चक्रवर्ती यांनी म्हटले आहे. (India China Relations) पण चीनने हे अनेक वेळा अमान्य केले आहे. सिमला परिषदेबद्दल चीनने वापरलेले शब्द असे आहेत : ''आंतरिक व बाह्य तिबेटची सीमा सोडून या परिषदेतील निर्णयाशी चीन सहमत आहे.'' या शब्दप्रयोगावरून चीनने मॅक्मोहन रेषा मान्य केली होती असे निश्चितपणे म्हणता येत नाही.

१९५० साली चीनने भारताला पत्र पाठवून उघडपणेच ब्रिटिशांशी झालेला तह आपल्याला मान्य नाही. तिबेट हा चीनचा भाग आहे व तो घेण्यासाठी चीन सैन्य पाठवित आहे. भारताने आपले तेथले सैन्य काढून घ्यावे असे अंतिमोक्त भारताला दिले. भारताने आपले सैन्य काढून घेतले. यावेळी भारताने १९१३ च्या तहाचा हवाला देऊन ''तिबेटची स्वायत्तता नष्ट करणे हा आंतरराष्ट्रीय कराराचा भंग आहे असे म्हटले नाही. ''चीनचा तिबेट प्रदेश'' असेच भारतही चीनप्रमाणेच तिबेटचे वर्णन करीत होता. तिबेट जर पूर्णपणे चीनचाच भाग असेल तर त्याला स्वायत्तता देणारा साराच तह अवैध ठरतो. भारताने या तहात ठरलेल्या सीमांचा हवाला देण्यात काय अर्थ?'' ''चीनने दगा दिला'' असे नेहमी म्हणण्यात येते. पण चीनने तिबेटमध्ये सैन्य पाठवण्याचा निर्णय भारताला कळवून ''तिबेटची स्वायत्तता आम्हाला मान्य नाही म्हणजेच १९१३ चा तह मान्य नाही'' असे स्पष्टच सांगितले. मग दगलबाजीचा आरोप कसा लागू होतो?



यावेळी पटेलांनी नेहरूंना खालील पत्र लिहिले.

लवकरच चीनी ब्रिटिश भारताशी झालेले सर्वच करारमदार धाब्यावर बसवतील. आपली तिबेट सीमा निश्चित नाही व या सीमेवर तिबेट व चीनी यांच्याशी सहानुभूती असलेली जनता राहते. चीनशी संबंध पार बिघडण्यास आणखी कोणत्या कारणाची जरूर आहे काय?

नेहरूंनी या पत्राकडे दुर्लक्ष केले. पुढे १९५४ साली नेहरूंनी १९१३ च्या तहाने भारताला प्राप्त झालेले सर्व अधिकार चीनच्या चरणावर अर्पण केले. यामुळे सीमेवरचा अमुक प्रदेश भारताचा असे म्हणण्यास भारताजवळ कोणताच कायदेशीर आधार उरला नाही.

हे सर्व करण्यात नेहरूंचा काय हेतू असावा? याने भारताचे नुकसान होईल हे त्यांना कळत नव्हते काय? नव्हते असे म्हणणे म्हणजे नेहरू अगदीच अपरिपक्व होते असे समजण्यासारखे आहे. भारताचे नुकसान होईल पण आपली जगात प्रतिष्ठा वाढेल असे त्यांचे गणित होते.

चीनी आपल्या उपकारांची पावती द्यायला तयार नाहीत असे नेहरूंना लवकरच कळून चुकले व ''चीनला आमची मैत्री कस्पटासमान वाटते (low evaluation of our friendship) अशी त्यांनी कुरकुर केली. आपण ज्याच्याशी मैत्री करू इच्छितो त्याला आपली मैत्री हवी असते असे गृहीत धरणे चुकीचे आहे, हे साध्या व्यवहारात देखील अनुभवास येते, राजकारणात तर भारवीने म्हटल्याप्रमाणे ''अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषा दर:'' जो काहीही सहन करतो असा मनुष्य शत्रू असला तर भीती कसली? वा मित्र असला तर फायदा कोणता? नेहरूंचा भारत मित्र झाल्यास ते आपल्या गळ्यातले लोढणेच होईल व शत्रू झाला तरी सहज झटकून टाकता येणाऱ्या झुरळापेक्षा त्याची जास्त कटकट होणार नाही अशी चीनच्या मनात भारताची प्रतिमा होती व ती नंतरच्या घटनांनी खरी ठरली. नेहरूंनी यापासून काहीच बोध घेतला नाही. कारण चीनने भारताला लुबाडले तर नेहरूंना त्याचे दु:ख नव्हतेच. चीनने लुबाडले तरी चीनी इतिहासात चीनचा हितकर्ता म्हणून आपली नोंद होईल व बाकीचे जग आपल्याला स्वत:च्या देशाचा जगच्छांतीसाठी बळी देणारा महापुरुष मानील अशी त्यांना आशा होती. चीन्यांनी लाथा मारल्यानंतर पुढे त्यांनी ''चीनी युद्धाने जगात भारताची प्रतिमा उंचावली आहे व चीनची डागळली आहे.'' असे एका जाहीर भाषणात स्पष्टच म्हटले.''

## निष्कारण निर्मिलेला प्रश्न

चीन्यांनी तिबेटमध्ये सैन्य पाठवायचे ठरविले तेव्हा भारताकडून काहीच प्रतिकार

न होता तिबेट गिळण्यास उलट भारताचे सहकार्यच मिळेल अशी चीनची अपेक्षा होती काय? अशी अपेक्षा असण्याचा संभव नाही. कारण भारताच्या मंत्रिमंडळसदस्यांना देखील नेहरू असे वागतील असे वाटले नव्हते. पण तिबेट काबीज करण्यात किती किंमत मोजावी लागेल याचा क्रमाक्रमाने अंदाज होण्यासारखा होता. पहिले पाऊल उचलतानाच सर्व परिस्थिती स्पष्ट होण्याची गरज नव्हती. आधी अंगठा, मग हात व शेवटी मानगूट या क्रमाने सर्व साधण्याचा चीनचा बेत होता. नेहरूंनी बोटापासून सुरूवात करण्याची चीन्यांना जरूरच ठेवली नाही. त्यांनी आपण होऊनच भारताची मानगूट चीनच्या दुहेरी पंजात दिली.

नेहरूंच्या कृत्याचे कौतुक करणारे शेकडो भारतीय होते व आहेत. नेहरूंनी १९५८ साली चीनी लष्करी प्रतिनिधींना भारताची प्रमुख रक्षाप्रतिष्ठाने दाखविली. असा एम. जे. अकबरांनी नेहरूंचा महिमा गायिला आहे. (Nehru, the making of India) जगाबद्दल नेहरूंचा होरा सपशेल चुकला तरी ज्या भारतीयांबद्दल त्यांना अतीव तुच्छता होती ते त्यांची पूजाच करीत राहिले. नेहरू भारताच्या शत्रूशी जसे वागत होते तसेच भारतीय नेहरूंशी वागत होते.

सारे जग चीनच्या तिबेटशी झालेल्या वागणुकीचा धिक्कार करीत होते. दलाई लामाला ब्रिटिश भारताच्या काळची स्थिती कायम राहावी, भारतीय सैन्य तिबेटमध्ये यावे व त्याने चीनपासून भारताचे रक्षण करावे असेच वाटत होते. भारताचे तिबेटमधील अधिकार हे दुसऱ्या देशावरचे साम्राज्यवादी अधिकार होते असे नेहरूंनी लोकसभेत सांगितले. त्यावेळी नाथ पै यांनी स्पष्टच विचारले, ''भारताचे अधिकार साम्राज्यवादी होते व चीनने सैन्य घुसवून जे केले ते तिबेटी राष्ट्रवादाचे कृत्य होते काय?'' दुसरे एक नेहरूभक्त लोकसभेत म्हणाले, ''चीनने तिबेटच्या स्वातंत्र्याचे अपहरण केले नाही. अपहरण करायला तिबेटमध्ये स्वातंत्र्य होतेच कुठे?'' या नेहरूभक्तांच्या मते लाल चौकात लक्षावधी विद्यार्थ्यांवर बुलडोझर चालविणाऱ्या राज्यकर्त्यांच्या हातात असलेल्या चीनमध्ये जास्त स्वातंत्र्य होते.

''दलाई लामापासून आम्हाला मुक्त करा अशी तिबेटी जनतेने चीनला हाक दिली होती काय?'' कायद्याचे मुद्दे बाजूला ठेवले तरी चीनला सहज सांगता आले असते की ''तिबेट लोक हे चीनी नाहीत व त्यांना तुमचा अंमल नको आहे. याबद्दल शंका असेल तर तिबेटमध्ये जनमत घेऊ'' कायद्याची भाषा वापरली तर भारताची स्वातंत्र्याची चळवळदेखील बेकायदेशीरच होती, त्यावेळी भारतात कायदा चालत होता तो ब्रिटिशांचा.'' पण जे नेहरू ''शेख अब्दुल्ला हा काश्मीरी जनतेचा प्रतिनिधी आहे व त्याने



काश्मीरच्या भारतविलयाला सम्मति दिल्याशिवाय मी काश्मीरचा स्वीकार करणार नाही.'' असे म्हणत होते यांना दलाई लामाने रक्षणासाठी किंकाळी फोडली तरी तिबेटी जनतेची आठवण झाली नाही. जेथे उच्च तत्त्वांनी भारताचे नुकसान होत असेल तेथेच उच्च तत्त्वाचा घोष करायचा व जेथे उच्च तत्त्वे भारताच्या हिताची असतील तेथे जगाच्या हितासाठी भारताचे हित त्यागण्याचे तत्त्व सांगायचे हा नेहरूंचा बाणा होता. राष्ट्राच्या हिताचा बळी देण्यात नेहरूंना स्वत:ची आंतरराष्ट्रीय महत्ता दिसत होती. त्याचप्रमाणे जे हिंदू त्यांचे पाय चाटत होते त्याच्याबद्दल त्यांना वाटणाऱ्या तुच्छतेलाही गुदगुल्या होत होत्या.

नेहरूंचे दुर्दैव एवढेच की, नेहरूंची हिंदूबद्दल जी वृत्ती होती तीच कम्युनिस्ट राष्ट्र व मुस्लिम समाज यांची नेहरूंबद्दल होती. त्यांचा अनुनय शूर्पणखेने केलेल्या रामाच्या अनुनयासारखा त्यांना तुच्छ वाटत होता.

''नेहरूंनी युद्धे टाळून देशाची आर्थिक प्रगती करण्याचा प्रयत्न केला पण भारत दुबळा आहे असे पाहून चीन व पाकिस्तान यांनी त्याचा फायदा घेतला. लष्करी बळ नसल्यामुळे चीनपुढे त्यांचे काही चालले नाही. जे झाले त्याबद्दल नेहरूंच्या देशप्रेमाबद्दल शंका घेणे युक्त नाही.'' असे वारंवार ऐकविण्यात येते.

## भारताला सर्वच अनुकूल होते

यातले अक्षरन अक्षर खोटे आहे. तिबेटच्या मुद्यावर रशिया धरून सारे जगच चीनच्या विरुद्ध होते. चीनने रशिया-चीन सीमांचे पुनर्निर्धारण केले पाहिजे अशी रशियाकडे मागणी केली होती व रशियन सरहद्दीवर दोन्ही देशात काही चकमकीही घडल्या होत्या. तिबेटमध्ये चीनची सत्ता असण्यापेक्षा भारताची सत्ता असणे रशियाल अधिक पसंत होते. तिबेटमध्ये भारताची सत्ता ब्रिटिश काळापासून होतीच. तीच स्वतंत्र भारताने चालवून चीनला रोखणे सहज शक्य होते. आपल्याला ब्रिटिशांच्या प्रबल साम्राज्यापासून तिबेटद्वारा धोका पोचला नाही तो दुबळ्या भारतापासून पोचण्याचा संभव नाही हे रशिया ओळखून होता. चीन प्रबल झाल्यास साऱ्या तिबेटचा किल्ल्यासारखा उपयोग करून त्याला आपल्या सामर्थ्यांचा तळ बनवायचे व रशियाला त्रस्त करायचे अशी चीनची योजना असू शकते असे रशियाला वाटत असणार अमेरिकेला तर कम्युनिस्ट देश म्हणून चीन शत्रूच वाटत होता. कोरियात त्यांचे चीनशी युद्धच सुरू होते. वर्तमान चीनी सरकारचा शत्रू जो चांग कै शेख तो अमेरिकेचा मित्र होता. भारत जर दलाई लामाच्या पाठीस उभा राहिला असता तर अमेरिकेचे सारे बळ भारताच्या बाजूने उभे ठाकले असते.

''लंडनच्या Economic Times ने याच वेळी लिहिले-

''१९१२ पासून तिबेट चीनपासून पूर्णपणे स्वतंत्र राहिलेला आहे. त्यामुळे सारे जग तिबेटच्या स्वातंत्र्याला मान्यता देईल. भारताने जर तिबेटच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली तर ब्रिटन व अमेरिका त्याची पुष्टी करतील.''

१९६२ मध्ये चीन जेवढा बलशाली होता तेवढा १९५० मध्ये नव्हता. चीनने यांग्स्टी पार करून जेव्हा ऑक्टोबर ७, १९५० ला तिबेटमध्ये प्रवेश केला तेव्हाच त्याने कोरियन युद्धात देखील स्वत:ला झोकून दिले होते. ज. मॅकआर्थर त्याच वेळी चीनला पायबंद घालण्याच्या योजना आखीत होता. भारताने यावेळी चीनला विरोध केला असता तर मॅकआर्थरचे अमेरिकन सैन्य व भारताचे सैन्य या दोन सैन्याशी त्याला लढावे लागले असते. १९५० चे भारतीय सैन्य १९६२ च्या भारतीय सैन्याइतके दुबळे नव्हते. शिवाय चांग कै शेखही मॅकऑर्थरच्या मदतीने चीनच्या भूमीवर स्वारी करण्याच्या विचारात होता.

क्षणभर चीनच्या पुढे टिकाव धरण्याइतके सामर्थ्य, अमेरिकन मदत घेऊनही भारताजवळ नव्हते असे मानले तरी चीनचा तिबेटवरील हक्क मान्य करून काहीच साधणार नव्हते. चीनने तिबेट काबीज केले तरी तिबेटवरील चीनचे सार्वभौमत्व मानल्यामुळे तिबेटची ब्रिटिशांनी ठरविलेली सीमाच बेकायदा झाली तशी झाली नसती. शिवाय दलई लामा भारतातून नव्हे तर अमेरिकेमधून तिबेटचे सरकार स्थापित करून चीनशी झुंजत राहिला असता.

लष्करी दौर्बल्यामुळे नेहरूंचा निरुपाय होता हे म्हणणे पोकळ आहे. तिबेटचे उदक चीनच्या हातावर सोडण्याचा नेहरूंनी निर्णय घेतला तेव्हा गिरिजाशंकर वाजपेयी व के. पी. एस. मेनन या परराष्ट्रखात्यातील अनुभवी अधिकाऱ्यांनी नेहरूंना ''असे करण्यापूर्वी निदान तिबेटच्या वर्तमान सीमांना चीनची मंजुरी घेऊन ठेवा नाहीतर सीमाविवादावरून चीनशी कटकटी उद्‌भवतील.'' असा सल्ला दिला होता. यावर नेहरू म्हणाले की, ''आपल्या तिबेटमधील सीमांना निकट भविष्यात काही धोका निर्माण होण्याचा संभव नाही.'' नेहरू ब्रिटिशांनी आखलेल्या सीमा अनुल्लंघ्य समजत होते. ते हे विसरले की ब्रिटिशांनी आखलेल्या सीमा अनुल्लंघ्य ठेवण्यासाठी आपल्याला ब्रिटिशासारखे वागावे लागेल.

चीनने लवकरच काही नकाशे प्रकाशित करून भारताचा १३२०९० कि.मी. भाग आपला म्हणून दाखविला. भारताने यावर आक्षेप घेतला तेव्हा चीनने उडवाउडवीची उत्तरे दिली. पण या उत्तरातही भारत व चीन यांच्या सीमा निश्चित



करण्याची जरूर आहे असा सूर होता. १९५९ मध्ये चीनने तिबेटमध्ये मोठे सैन्य घुसवून भीतीचे तांडव सुरू केले. तेव्हा दलई लामा आपल्या काही अनुयायासह भारताच्या आश्रयाला आला.

## आगे बढो

चीनची ही स्वारी अनपेक्षित नव्हती. चीनी नभोवाणीने ''आम्ही तिबेटचे विमोचन करणार आहोत.'' असे अनेक वेळा स्पष्टच सांगितले होते. यावर भारत सरकारने ''आम्ही याला कोणत्याही प्रकारे-सेनेच्या साहाय्याने तर नव्हेच नव्हे-विरोध करणार नाही.'' असे स्पष्ट केले होते. ''चीन्यांनो, या तिबेट तुमचाच आहे, तेथे तुमचे स्वागत आहे असे म्हणणारे आम्ही कोण?'' एवढेच म्हणायचे बाकी राहिले होते. असे असून चीन्यांनी विश्वासघात केला अशी भाषा भारतात सर्वत्र ऐकू येते.

मला वाटते की विश्वासघाताची भाषा तिबेटवर स्वारी करण्यासंबंधी नसून चीन्यांनी ३०००० सैन्यानिशी भारतीय फौजवर हल्ला केला याबद्दल आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हल्ला होईल असे नेहरू वा सैन्य यापैकी कुणालाच वाटले नव्हते म्हणून याला विश्वासघात म्हणायचे. म्हणजे विश्वासघाताच्या आरोपातून सुटण्यासाठी चीन्यांनी आपल्या सैन्याची संख्या. त्याच्याजवळील शस्त्रास्त्रे व हल्ला करण्याची तारीख आणि ठिकाण हे सर्व नेहरूंना सांगायला पाहिजे होते म्हणजे नेहरूंच्या लेखी तो विश्वासघात ठरला नसता.

चीनने तिबेट व्यापल्यावर दलई लामा तिबेटला परत जायला तयार नव्हते. नेहरूंनी त्यांना भारतात राहू देऊन तिबेटचे निर्वासित सरकार स्थापित करविले असते व संयुक्त राष्ट्रात त्याची फिर्याद दाखल केली असती तर चीनला चांगला पायबंद बसला असता. पण नेहरूंनी त्यांना तिबेटमध्ये परत जाण्यास भाग पाडले. ''तुम्हाला चीनी चांगले वागवतील अशी मी हमी घेतो.'' असे त्यांनी सांगितले. काय चमत्कार आहे! जे चीनी नेहरूंनाच लाथा मारीत होते ते दलई लामांना आपण चांगले वागवायला सांगितले तर आपले ऐकतील असे नेहरूंना वाटले. चीन्यांनी इतक्या थपडा मारल्या तरी नेहरूंना आपला ''करिष्मा'' व जागतिक प्रतिमा या आपल्या व काही आंग्लशिक्षित भारतीयांच्या स्वप्नातल्या वस्तू आहेत हे कळलेच नव्हते.

बिचारे दलई लामा तिबेटला परत गेले. पण चीन्यांनी नेहरूंच्या ''करिष्म्याची'' पर्वा न करता त्यांना छळण्यास सुरूवात केली, तेव्हा त्यांनी आपले गाऱ्हाणे नेहरूंकडे पाठविले. नेहरूंनी त्यांना आश्वासन दिले की ''मी स्वत: तिबेटमध्ये येऊन तुमची व

चीनची दोस्ती करून देतो.''

नेहरूंचा तिबेटमध्ये जाण्याचा उद्देश जाहीर झाल्याबरोबर चीन्यांनी जाहीर केले की ''तिबेटमध्ये कोणी जावे हे ठरविण्याचा अधिकार आमचा आहे. नेहरूंना तिबेटमध्ये जाऊ देण्यास आमची परवानगी नाही व चीनमध्ये जाऊन चीनच्या अंतर्गत मामल्यात त्यांनी दखल देण्याचा उद्देश जाहीर करावा हा चीनचा अपमान आहे.'' हे वाचून नेहरूंनी तिबेटमध्ये जाण्याऐवजी सिकिममध्ये जाऊन आपले समाधान करून घेतले.

सिमला कराराप्रमाणे तिबेटने ज्या सीमा मान्य केल्या होत्या त्यांच्यावर सर्वत्र ब्रिटिशांनी फौजा ठेवलेल्या नव्हत्या व जमिनीवर त्या निश्चितपणे कळतील अशी काही चिन्हे सर्वत्र नव्हती. चीनी तेथे येऊ नयेत म्हणून भारताने सीमेवर चौक्या बसवायचे ठरविले. नकाशावर ज्या सीमा दाखविल्या होत्या तेथपर्यंत एकदमच चौक्या बसविणे शक्य नव्हते कारण त्यामुळे फौजी आक्रमणाचे दृश्य निर्माण झाले असते. म्हणून बऱ्याच अलीकडे चौक्या बसवून त्या हळूहळू पुढे सरकविण्याचे धोरण नेहरू व मेनन यांनी आखले. या धोरणाला "forward policy : आगे बढो धोरण'' असे त्यांनी नाव दिले. या धोरणाने १९५८ साली भारताच्या चौक्या ज्या ठिकाणी होत्या त्यांच्या बऱ्याच पुढे १९६२ साली त्या आल्या. चीन्यांना जगापुढे हा आक्रमणाचा पुरावा म्हणून सादर करण्यासारखा होता. चीन्यांनीही आपल्या चौक्या पुढे सरकविण्यास सुरुवात केली. यामुळे भारतीय सैनिक व चीनी सैनिक यामध्ये खटके उडू लागले. दोन राष्ट्रांच्या सैनिकात असे खटके उडणे ही युद्धाची नांदी ठरते. म्हणूनच बडी राष्ट्रे आपल्या सीमा एकमेकांना भिडू नयेत म्हणून मध्ये आघातग्राहक असे लहान देश असणे पसंत करतात. ब्रिटिशांनी याच कारणास्तव रशिया व चीन यांच्या सरहद्दी आपल्याला भिडू नयेत म्हणून तिबेटचे आघातग्राही मध्ये ठेवले होते. नेहरू अशा विचारांचे ''जुने पुराणे व विसाव्या शतकात गैरलागू असणारे विचार'' म्हणून टवाळी करीत. नेहरूंनी ज्यांची टवाळी केली ती प्रत्येक गोष्ट भारतावर शेकली. नेहरू मात्र सही सलामत राहिले.

## जवान हे बळीचे बकरे

मॅक्स्वेल या प्रसिद्ध पत्रकाराशी बोलणारे सर्व चीनी नेते नेहरूंची निंदा करीत होते. चीनी नेत्यांचा नेहरूंवर रोष होण्याचे एक खास कारणही होते. चीनी नेत्यांनी सीमानिर्धारणासाठी काही प्रस्ताव नेहरूंपुढे ठेवले की ''तुम्ही पंचशील करारावर सह्या केल्या आहेत, तेव्हा पंचशील कराराच्या आधारावर बोला.'' असे नेहरू उत्तर देत. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की पंचशील करारात प्रत्यक्ष व्यवहारात मार्गदर्शक होईल असे



काहीच नाही. ''कुणाशी भांडण करू नये'', ''गुण्यागोविंदाने नांदावे'' वगैरे आजीबाईवचनेच त्यात आहेत. सीमाप्रश्नाबद्दल कोणतेही ठोस प्रस्ताव त्यातून निघण्याचा संभव नाही. त्यामुळे नेहरू आपल्याला मूर्ख समजून सीमाप्रश्नावर चर्चा करण्याचे टाळण्यासाठी निरर्थक नैतिक प्रवचने देत आहेत असे चीन्यांना वाटले. आपल्याला नीतिमत्ता शिकविणारा कुणाला आवडत असतो काय? त्यातून ज्याला आपला कासटा सांभाळता येत नाही त्याने एखाद्या बलवन्ताला नीती शिकविणे अत्यंत चीड आणणारे कृत्य आहे.

त्यावेळी आशियात सर्वत्र नेहरूंची प्रतिमा एक नकली इंग्रज व इंग्रजी साम्राज्यवादाचा हस्तक अशी होती. भारतीय स्वातंत्र्य हे एक मिथ्य आहे असेच त्यावेळी चीन, जपान वगैरे एशियाच्या बहुवंश प्रदेशात मत होते. भारताच्या गेल्या ५० वर्षाच्या वागणुकीने ही समजूत अक्षरश: खरी ठरली आहे. दिवसेंदिवस परिस्थिती चीनला अनुकूल व भारताला प्रतिकूल होते आहे. त्यामुळे जितके दिवस जातील तितके सीमाप्रश्न भारताचे फार नुकसान होणार नाही अशा रीतीने सोडविणे कठिण जाईल.

चीनी भारताच्या सीमांचे उल्लंघन करीत आहेत व त्यामुळे आपल्या चौक्यांवर त्यांचे हल्ले होत आहेत असा प्रचार भारतात प्रत्यही होत होता. असे असून भारत संयम पाळत आहे असाही या प्रचारात सूर होता. या बातम्या ऐकून भारतीय जनता क्षुब्ध होणार नाही व त्यांचे लोकसभेतील प्रतिनिधी या क्षुब्धतेला वाचा फोडणार नाहीत हे शक्यच नव्हते. नेहरूंनी भारताचे सैन्य शस्त्रसामर्थ्यात खच्ची करून ठेवले आहे. त्याच्यात पाकिस्तानला रोखण्याचे देखील सामर्थ्य नाही मग चीनला रोखणे तर दूरच या विदारक सत्याची भारतीय जनतेलाच काय, लोकसभासदस्यांना देखील माहिती नव्हती. त्यामुळे त्यांनी चीन्यांना धडा शिकवावा असा लकडा लावला. याला साथ देऊन आपण काहीच पावले उचलली नाहीत तर आपले पंतप्रधानपदच धोक्यात येईल अशी नेहरूंना भीती वाटण्याइतपत चीन्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी प्रबल होती. एकजात सारी वृत्तपत्रे सरकारला ''आपली तरवार म्यानातून काढा'' अशीच हाक देत होती. बिचाऱ्यांना काय माहीत की नेहरूंनी सैन्याच्या म्यानातली खरी तरवारच काढून घेतली आहे. सध्या त्यांच्याजवळ जी तलवार आहे ती शोभेची आहे.

नेहरूंच्या अंगी थोडा जरी प्रामाणिकपणा असता तरी त्यांनी जनतेला विश्वासात घेऊन आपले धोरण शांततेचे असल्यामुळे आपण चीनला टक्कर देता येईल या उद्देशाने सैन्याचे बलसंवर्धन केले नाही, आता विचार बदलला पाहिजे पण त्याला वेळ लागेल तो पर्यंत थोडी कळ सोसली पाहिजे असे सांगितले असते. पण नेहरूमध्ये एवढा

प्रामाणिकपणा कधीच नव्हता. त्यांनी "चीन्यांविरुद्ध कारवाई केली जाईल" असे जनतेला आश्वासन दिले व चीन्यांचा भारतीय चौक्यावरील दबाव वाढत चालला तेव्हा "चीन्यांना उचलून फेकून द्या" हा आपला कुप्रसिद्ध आदेश सैन्याला दिला. आमच्या कार्यालयातील कर्नलच्या हुद्याच्या वर नसलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी ही बातमी वाचून विचारले, "चीन्यांशी लढण्यासाठी कोणत्या फौजा आपल्या जवळ आहेत?"

चीन्यांच्या प्रबळ सैन्यावर अक्षोहिणीच्या (डिव्हिजनच्या) प्रमाणावर हल्ला करणे म्हणजे साऱ्या सैन्याची कत्तल ओढवून घेणे होय हे नेहरूंना कळत असले पाहिजे व कळत नसले तरी सैन्याने ते त्यांच्या लक्षात आणून दिले होते. पण जवानांचे प्राण हे नेहरूंच्या लेखी स्वत:ची प्रतिमा रक्षिण्यासाठी खर्चण्याइतके सवंग होते.

सप्टेंबर १९६२ मध्ये सध्याच्या अरुणाचल प्रदेशचे सैन्यप्रमुख उमराव सिंग यांना नेहरूंचा हास्यास्पद हुकूम पोचला. हा हुकूम आपण दिला आहे असे नेहरूंनी परदेशात जाण्यासाठी विमानतळावर पाय ठेवताना वृत्तप्रतिनिधींना सांगितले. "आसेतुपर्वत उचंबळला स्वदेश. वीराकृति धरित टाकुनि दीन वेष ॥ असे वातावरण निर्माण झाले. नेहरू नेहमीप्रमाणे जगाची काळजी वाहण्यास भारताबाहेर गेले.

उमरावसिंगांनी सांगितले की "चीनी सैन्याशी झुंज घेण्याइतके माझ्या सैन्याचे सामर्थ्य नाही. त्यासाठी निदान सहा महिने तयारी करावी लागेल व अमुक अमुक शस्त्रास्त्रे लागतील."

## नेहरूंचे आवडते सेनानी

उमरावसिंग काय म्हणाले हे लोकसभेला व जनतेला माहीत नव्हते. जनता भारतीय सैनिकांच्या वीरगाथा ऐकण्यासाठी आतुर होती.

नेहरूंनी उमरावसिंगांना बडतर्फ करून आपले आवडते सेनानी कौल यांना नियुक्त केले. कौल यांना नेहरूंनी ज्येष्ठ अधिकाऱ्यांना दूर सारून बढती दिली होती. ते नेहरूंचे नातलग होते. त्यांना बढती देण्याचे समर्थन करताना नेहरूंनी लोकसभेला खोटी माहिती पुरविली होती असे तत्कालीन सेनाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

कौल चीन्यापुढे टिकाव धरू शकणार नाहीत हे नेहरूंना माहीत होते. कौल रणांगणावरून अक्षरश: पळून आले ते थेट दिल्लीलाच. आपण आजारी आहोत असे त्यांनी कारण सांगितले. जणू रणांगणाजवळ सैनिक इस्पितळे नव्हतीच.

"चीन्यांना हाकला" या आपल्या अपमानास्पद शब्दप्रयोगाने चीनी चिडतील व आपल्याला धडा शिकविण्याच्या उद्देशाने कारवाई करतील, केवळ आत्मरक्षणासाठी



नव्हे, याचा अंदाज नेहरूंना झाला नाही. "सुरवातीला आपण चीन्यांना ढकलू. त्यांचे मोठे सैन्य आपल्या सैन्यावर तुटून पडायला थोडा वेळ लागेल. ते आल्यावर काय करायचे हे पुढे पाहू." असा नेहरूंचा विचार असावा.

ज्या गोष्टींचे नेहरूंना अजीबात ज्ञान नव्हते त्याबाबतीत देखील ते स्वत:ला तज्ज्ञ समजत. अशा क्षेत्रापैकी युद्ध हे एक होते. लोकसभेत एकदा प्रा. रंगांनी त्यांना सैनिक समस्यांबद्दल धारेवर धरले तेव्हा नेहरू चिडून म्हणाले. "I wonder how much Prof Ranga knows about war." "प्रा. रंगांना युद्धातले काय कळते?" त्यावर रंगांनी नेहरूंच्या मर्मी बसेल असे उत्तर दिले. "As much as the prime Minister does", "पंतप्रधानांना कळते तेवढेच." यावर नेहरूंनी स्वत:चीच भलावण केली. "Then you know a good deal" "मग तुम्हाला बरेच कळते."

नेहरूंनी इतिहासाचे ग्रंथ वाचले होते व एवढ्यावरून आपल्याला युद्धाबद्दल पुष्कळ कळते अशी त्यांनी स्वत:ची समजूत करून घेतली होती. ऐतिहासिक युद्धातील शस्त्रास्त्रे, सैनिकांची संख्या, शौर्याचा दर्जा, उभय पक्षांची युद्धपद्धती व युद्धावर खर्च करता येण्यासारखी साधनसंपत्ति याबद्दल सामान्य इतिहासग्रंथात फारशी माहिती नसते. त्यासाठी खास सैनिकांसाठी लिहिलेले युद्धांचे इतिहास वाचावे लागतात. नेहरूंचे अशा ग्रंथांचे मुळीच वाचन नव्हते हे त्यांची हजारो पृष्ठात ग्रंथित केलेली वाणी उपलब्ध आहे त्यावरून स्पष्ट आहे. त्यांनी रणभूमी कधीच माहिती नव्हती याबद्दल वाद होण्यासारखा नाही. असे असून देशासमोर एक मोठे संकट आ वासून बसले असताना "चंगीझखान हा जगातला सगळ्यात मोठा सेनानी होता." असे प्रतिपादन करण्यासाठी त्यांनी लोकसभेचा बराच वेळ घेतला. एकाही लोकसभासदस्याने "चीनच्या आक्रमणाबद्दल बोला. म्हणून त्यांना हटकले नाही.

चंगीझखानच्या सेनापत्याचे मोठेपण त्याने जिंकलेल्या प्रदेशाच्या विस्तारावरून त्यांनी ठरविले हे त्यांच्या चंगीझखानाच्या प्रशस्तीवरून स्पष्ट होते. ही फारच भाबडी रीत झाली. सेनानीचे श्रेष्ठत्व ठरविताना त्याच्या प्रतिपक्षाचे सामर्थ्य किती होते हे विचारात घेतले पाहिजे. साधारणपणे युद्धे शस्त्रास्त्रांची श्रेष्ठता, सैनिकांची संख्या व इतर साधनाची मुबलकता यांच्या साहाय्याने जिंकली जातात. याला शिवाजी व बाजीराव हे दोन महान अपवाद आहेत असे तज्ज्ञ सैनिक इतिहासकारांचे मत आहे. या दोन सेनानींची साधने त्यांच्या शत्रूच्या मानाने तोटकी होती. बाजीरावाच्या सेनपतित्याचा अभ्यास करणाऱ्यात ज. मॉण्टगामेरी अंतर्भूत आहेत. नेहरूंना याचे ज्ञान नव्हते व स्वत:च्या देशात उपलब्ध असलेली प्रतिभा देशाच्या उत्कर्षासाठी वापरावी ही दृष्टी नव्हती.

भारतीय वर्तमानपत्रे व मजुमदारासारखे इतिहासकार देखील चीनने

अक्षोहिणीकल्प सैन्याने भारतावर स्वारी केली असे सांगतात. पण या स्वारीच्या पूर्वी भारताच्या सर्वोत्कृष्ट चवथ्या अक्षोहिणीने चीनी चौक्यांवर हल्ला केला होता हे सांगत नाहीत. चीनी याचीच वाट पाहत होते. त्यांनी ३०००० सैन्यानिशी हल्ला केला असे मजुमदार सांगतात. काही वृत्तांतात ही संख्या १०००० इतकी लहान आहे.

## सात महाराष्ट्र घालविले

चीनी सैन्याचे समुद्र भारतीय सेनेवर कोसळत आहेत असे नेहरूंनी लोकसभेत सांगितले ते अजीबात खरे नाही. मजुमदारांनी दिलेली संख्या देखील भारतीय आघाती सैन्यापेक्षा फारशी मोठी नव्हती. भारतीय सैन्याचा फज्जा संख्येमुळे उडाला नाही. चीन्यांच्या हाती ए. के. ४७ ही एका चापात अनेक फैरी झाडणारी बंदूक होती व आपले सैनिक एकेका गोळीला एकेक चाप जिच्यात ओढावा लागतो अशा ३०३ या जुन्यापुराण्या बंदुकीने लढत होते. हा छोटा यंत्रनाल त्यांनी पहिल्यांदा नागा बंडखोरांजवळ पाहिला होता. आधुनिकता, विज्ञान वगैरेचा जप करणाऱ्या नेहरूंच्या सैन्यात कोणतीच आधुनिकता व कोणतेच विज्ञान नव्हते. याच लढाईत भारताच्या २०००० जवानांची कत्तल झाली. म्हणजे जवळ जवळ सगळे सैन्य गारद झाले असे तरुण भारताचे वृत्त होते. मराठी विश्वकोशात १३०० ठार व १६०० बेपत्ता असा आकडा दिला आहे. ज्यांचे प्रेत सापडले नाही वा जे शत्रूच्या हाती लागल्याची वार्ता कळली नाही ते बेपत्ता. पण ते जिवंत असते तर आजपर्यंत परत आले असते. तेव्हा त्यांचा समावेशही मृतातच करायला पाहिजे, म्हणजे ठार झालेल्यांची संख्या २९०० ठरते. शिवाय सैन्याची सर्व साधनसामग्री चीन्यांच्या हाती लागली. "आपली शस्त्रे परत हवी असतील तर आम्ही द्यायला तयार आहोत. ती घ्यायला या." असे चीन्यांची खिजवले. म्हणजे विश्वकोशाच्या मते केवळ २९०० सैनिक गमावल्याने सारी अक्षौहिणी नष्ट झाली!

जवानांची एवढ्या मोठ्या प्रमाणावर कत्तल होण्याचे एक कारण असे की जमिनीवरील सैन्याला मदत करण्यास त्यांच्यावर विमानांचे छत्र देण्याची पद्धत आहे. ही विमाने शत्रूवर मारा करीत असतात त्यामुळे भूसैन्याचे रक्षण होते. पण नेहरूंनी भारतीय सैनिकांना हे छत्र मिळू दिले नाही. कारण? "असे केले तर चीनी विमाने आमच्या शहरावर विमान हल्ले करतील!" नेहरूंना युद्धातले काहीच कळत नव्हते याचे हे प्रमाण आहे. स्वारी करणाऱ्या सैन्याचे मुख्य काम स्थानिक सैन्याचा पराभव करणे हे असते. ते काम सोडून रणभूमीपासून शेकडो मैल दूर असलेल्या शहरावर हल्ले करण्यात बॉम्ब व पेट्रोल खर्च करण्याचा मूर्खपणा कोणताही सेनापती करणार नाही, शत्रूच्या शेकडो मैल दूर असलेल्या शहरातील काही नागरिक मारल्याने व तेथील शस्त्रास्त्रांच्या कारखान्याना



नुकसान पोहचविल्याने समोर उभ्या ठाकलेल्या सैन्याचा पराभव करण्यास काहीच मदत होत नाही. त्या कारखान्यातील शस्त्रे सैनिकांपर्यंत पोचण्यास निदान सहा महिने लागतात. ज्यात आपल्याला काही कळत नाही अशा क्षेत्रात देखील नेहरू त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत धुडकावून स्वत:चाच हट्ट पुरा करीत असत.

भारतीय बुद्धिमतांत भारताच्या रक्षणापेक्षा नेहरूंच्या रक्षणाबद्दल जास्त आस्था असते. त्यामुळे मराठी विश्वकोशात भारताने विमाने का वापरली नाहीत याची कारणे न देता चीननेही विमाने वापरली नाहीत असे विधान केले आहे. नेहरूंनी सैन्याला विमाने वापरू न दिल्यामुळे जवानांना आकाशी कवच मिळाले नाही, नाहीतर त्यांच्या कत्तलीचे प्रमाण बरेच कमी झाले असते असे पुष्कळ सेनाधिकाऱ्यांचे मत वर्तमानपत्रातून व्यक्त करण्यात आले होते. ही गोष्ट विश्वकोश लपवून ठेवतो. चीनने विमाने वापरली नाहीत याचे कारण लष्करी कामात अज्ञ पुढाऱ्याचा हस्तक्षेप हे नव्हते. रणभूमीजवळच्या तिबेटच्या डोंगराळ प्रदेशात विमानतळ नव्हते हे याचे कारण असू शकेल. पण भारताने विमाने वापरली नाहीत याचे चीनने विमाने न वापरणे हे कारण असू शकत नाही. शत्रूच्या अडचणींचा फायदा घेणे ही साधारण युद्धनीति आहे. नेहरूंच्या मर्जीखातर हजारो जवानांचे प्राण गेले असे म्हणायला विश्वकोशाची जीभ धजावत नाही. नेहरूंची तथाकथित उदात्त प्रतिमा आजच्या देशाच्या हितापेक्षा जास्त महत्त्वाची आहे.

याहूनही संतापजनक वाक्य असे आहे-

"स्वातंत्र्योत्तर काळात भारताला जी युद्धे लढावी लागली त्याच्या तुलनेत चीनी युद्ध क्षुद्रच म्हणावे लागते."

ज्या युद्धात विश्वकोशाच्या भारताची ४२००० किमी भूमि शत्रूच्या घशात गेली ते युद्ध तर क्षुद्र.

केवळ प्राणहानीचाच प्रश्न नाही. या युद्धामुळे भारतीयांचे मनोधैर्य कायमचे खचले. इतके की "चीन हा आमचा शत्रू आहे" असे म्हटल्याबद्दल एका रक्षामंत्र्याला गप्प करण्यात आले. तिबेटच्या बाबतीत चीन आक्रमक असूनही भारतच आक्रमक ठरला व सामर्थ्य नसताना कुरापत काढणारा केवळ सामर्थ्यानेच नव्हे नीतिमत्तेनेही शून्य असलेला देश म्हणून त्याची जगात नाचक्की झाली. असे युद्ध क्षुद्र होते असे म्हणण्याने या देशाची बौद्धिक व नैतिक दोन्ही प्रकारची दिवाळखोरी व्यक्त होते. "आम्ही केवळ आत्मरक्षणासाठी लढत असता चीन्यांनी आमच्यावर हल्ला केला." असे म्हणण्याची देखील नेहरूंनी सोय ठेवली नव्हती. आम्हीच आधी हल्ला केला होता व चीनी फौज केवळ आत्मरक्षणार्थ लढली हा चीन्यांचा दावा जगाला मान्य झाला होता. मॅक्स्वेल या पत्रकाराने "India's China war" "भारताने चीनवर लादलेले युद्ध" हे पुस्तक

लिहून या युद्धात भारतच कसा आक्रमक होता हे विस्तारपूर्वक सांगितले आहे. त्यात मुख्य मुद्दा १९१३ चा तह रद्द झाल्यामुळे अमुकच सीमा आमची हा भारताचा आग्रह चुकीचा होता व सीमांचा पुनर्विचार करण्याची चीनची मागणी नेहरूंनी अनेक वेळा धुडकावून लावली हे मुद्दे प्रमुख आहेत.

चीनची पुनर्विचाराची मागणी मानली तर कित्येक शतकापासून चीनच्या ताब्यात नसलेला १३२०९० चौरस कि.मी. प्रदेश चीन्यांना द्यावा लागत होता. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३०७७६२ कि.मी. आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या तिपटीपेक्षा जास्त भूमीवर चीनी हक्क सांगत होते.

तिबेटचे क्षेत्रफळ २० लाख चौ.कि.मीच्या वर आहे. ते सर्व नेहरूंनी अनायासे चीनच्या घशात घातले. मग नेहरू १३२०९० किमीसाठी कुरकूर करतील असे चीन्यांना वाटले नाही तर त्यांना दोष देता येईल काय?

नेहरूंची गणिते अशी होती १. तिबेटचे दान केल्यामुळे चीनी आपल्यावर खुष होतील व आपल्या एशियाच्या पुढारीपणाला मान्यता देतील. २. तिबेटमधील चीनी सैन्य भारतावर आक्रमण करण्यासाठी ठेवलेले नसून तिबेटच्या रक्षणासाठी ठेवले आहे. आपण तिबेटवर हल्ला केला नाही तर ते सैन्य आपल्याविरुद्ध वापरण्यात येणार नाही. ३. चीनी चौक्यावरील हल्ला हा चीनी सैन्यावर हल्ला आहे असे चीन्यांना वाटणार नाही. ४. असे वाटले तरी ते ३०००० सैन्यानिशी त्यावर तुटून पडणार नाहीत. नेहरूभक्त हे सर्व विसरून युद्धशास्त्र, आंतरराष्ट्रीय राजनीती व मानवी मनोवृत्ती यापैकी नेहरूंना काय समजत होते असे म्हणण्यास धजावतील?

नेहरूंनी सैन्याच्या हेरखात्याची इतकी हेळसांड केली होती की चीन्यांवर हल्ला करायचे ठरविले तेव्हा जनरल सेन यांनी सीमेवरील चीनी लष्कराची संख्या ६०० सांगितली होती. त्याच वेळी ती १०००० होती असे आता बाहेर आले आहे. (तरुण भारत १३/६/९९)

१९६२ साली अरुणाचलच्या थंडीत वापरायला सैन्याजवळ कांबळी देखील नव्हती. पण काही महिने आधीच रक्षामंत्री मेनन सांगत होते की, सैनिक कारखान्यांना काम नाही कारण सैन्यसामग्रीची आपल्याजवळ विपुलता आहे, म्हणून सैन्याच्या कारखान्यात गैरसैनिकी माल बनवावा. अशा गैरसैनिकी मालात कॉफी तयार करण्याचे पात्र सामील होते. इंग्रजीत Indian Coffee Percolating Machine असे याचे नाव होते. यावेळी मुरारजी देसाई वित्तमंत्री होते. त्यांना ''अशा कामासाठी तुम्ही पैसे का मंजूर केले?'' असे विचारले तेव्हा ते म्हणाले ''आय.सी.पी.एम. हे एखादे आयसीबीएम सारखे मिसाइल म्हणजे अस्त्र असावे असे मला वाटले!''



## क्षात्रधर्माची होळी

१७ वर्षे आधी आज ज्या भारतीय सैन्याचे चीनने हसे करून सोडले होते ते सैन्य जगातील कोणत्याही सैन्याचा मुकाबला करण्यास सक्षम सिद्ध झाले होते. सैन्याचा हा अध:पात या सतरा वर्षात ज्याच्या हाती कर्तु कर्तुमन्यथा कर्तु अशी शक्ति भारतीय जनतेने दिली होती त्या भारताच्या पंतप्रधानाने केली नव्हती तर कुणी?

यशवंतराव चव्हाणांच्या दिल्लीतील निवासस्थानी नागपूरच्या यमुनाबाई शेवडे यांनी लिहिलेल्या तात्या टोपे यांच्या चरित्राचा प्रकाशनसमारंभ होता. त्यावर बोलताना एक वक्ते म्हणाले ''ज्या मालेत हे चरित्र प्रसिद्ध होत आहे तीतच नेहरूंचे चरित्रही प्रसिद्ध होणार आहे. अशा मालेत चरित्र प्रसिद्ध व्हावे अशी तात्या टोपेची योग्यता होती काय?''

या प्रश्नाचे उत्तर खालीलप्रमाणे आहे:-

''१९६२ मधील चीनी व भारतीय सैन्यात जो फरक होता त्या मानाने १८५७ साली तात्या टोपे व इंग्रज यांच्या सैन्यामधील फरक अनेक पटींनी जास्त होता. तात्या टोपेच्या सगळ्या सैनिकाजवळ बंदुका देखील नव्हत्या. पुष्कळसे सैन्य भाला-तलवारींनींच लढत होते. तात्याच्या तोफांचा पल्ला इंग्रजी तोफापेक्षा बराच कमी होता. तात्याला स्वत: सेनानायकांच्या कामाचा अनुभव व प्रशिक्षण नव्हते. जेथे तळ बनविता येईल व इंग्रज ज्याचा सहज नाश करू शकणार नाहीत असे कोणतेच स्थान तात्याला उपलब्ध नव्हते. सैन्याला लागणारी सर्व प्रकारची रसद त्याला लूटमार करूनच मिळवावी लागे, असे असून तात्याने इंग्रजाशी डझनवारी लढाया दिल्या. बहुतेक वेळा पराभव झाला तरी आपल्या सैन्याचा बचाव करून तो निसटत असे व दुसऱ्या ठिकाणी लढाई देत असे. अशा तऱ्हेने त्याने इंग्रजांशी वर्षभर लढाया दिल्या.

१९६२ साली भारतीय सेनानींना आपले एक अक्षोहिणी (डिव्हिजन) सैन्य सुरक्षित ठेवून माघार देखील घेता आली नाही. ते सैन्य, सैन्य म्हणून राहिलेच नाही. त्याचे प्रहारसामर्थ्यच नष्ट झाले. नेहरूंनी भारताचे प्रहारसामर्थ्य नष्ट केले ते केवळ साधनांच्या बाबतीतच नव्हे तर क्षात्रधर्माच्या बाबतीत देखील. सर्व साधने अनुकूल असताना देशाचे सैनिक सामर्थ्य खच्ची करणारा प्रंतप्रधान व तोटकी साधने असताना जगातील सगळ्यात मोठ्या सैनिक शक्तीशी दोन वर्षे टक्कर देणारा तात्या टोपे यांची तुलना करून तात्या टोपेला हीन ठरविणाऱ्या वक्त्याचे ज्ञान व विवेकबुद्धी काय मोलाची होती? अशा वक्त्याला भारताच्या रक्षामंत्र्याच्या बंगल्यावर तात्या टोपेवर बोलण्याचे आमंत्रण देऊन त्या राष्ट्रपुरुषाचा अपमान करण्यात आला हा मोठा दैवदुर्विलास आहे.

नेहरूंच्या काळात सैन्यामध्ये क्षात्रधर्म जोपासण्यासाठी काय केले जात होते? कॉन्व्हेन्टसदृश शिक्षण घेणाऱ्यांना सेनाधिकाऱ्यांची नोकरी मिळणे सुलभ जात असे. आपण भारतीय आहोत याची मुलांना लाज वाटावी असा या शिक्षणाचा उद्देश आहे. सैन्यात गेल्यावर देखील तेथील अधिकाऱ्यांच्या आवासात व भोजनकक्षात प्रतीत होणारे समाजजीवन आपण भारतीय आहोत याची लाज बाळगणारे व जेवणाच्या पद्धतीपासून तो गायनापर्यंत इंग्रजांचे मर्कटानुकरण करणारे होते. ''कालू'' ही शिवी वापरण्याची सैन्यात फॅशन होती. अशी शिव्या देणारे हे विसरत होते की ते स्वत:च कालू होते व इंग्रज त्यांना तसेच संबोधित होते. अशा मनोवृत्तीची जोपासना करणाऱ्या सैन्यात तात्या टोपे कुठून उत्पन्न होणार?

सैन्याचे हे जीवन इंग्रजांच्या काळापासून चालत आलेले होते. मग इंगजांच्या सैन्याचा असा फज्जा का उडाला नाही? असे विचारण्यात येईल.

येथे हे विसरण्यात येते की इंग्रजांनी इंग्रजांसारखे वागणे व भारतीयांनी त्यांचे मर्कटानुकरण करणे ही एकच गोष्ट नाही. इंग्रजांच्या काळात भारतीय सेनेचे नेतृत्व इंग्रज अधिकारी करीत होते. भारतीय अधिकारी फारच खालच्या स्तरावर असत. स्वराज्य आल्यावर सैन्याचे शिक्षण आमूलाग्र बदलून त्याला राष्ट्रीय स्वरूप द्यायला पाहिजे होते. नेहरूंनी तसे न करता केवळ सैन्यातच नव्हे तर साऱ्याच देशात राष्ट्रीयत्वाचे खच्चीकरण केले.

केवळ अरुणाचल प्रदेशच नव्हे तर सारेच भारत क्रमाक्रमाने चीन्यांच्या स्वाधीन करण्याची नेहरूंच्या मनाची तयारी झाली होती हे तेजपुरच्या लोकांना चीनी आक्रमणाचा प्रतिकार करण्यास सिद्ध करण्याऐवजी त्यांना नेहरूंनी जो ''निरोप'' दिला त्यावरून स्पष्ट आहे.

## नेहरूनिर्मित आपत्ती

यावेळी पाकिस्तानसरहद्दीवर भारताचा एकही शिपाई नव्हता. अमेरिकेने पाकिस्तानला रोखले नसते तर चीनच्या घशात जाण्याच्या आधीच भारत पाकिस्तानच्या घशात गेला असता.

नेहरूंना भारताचे कितीही नुकसान झाले तरी आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप होत नसे. चीनी संक्रांत कोसळली असताना भारताला प्रत्येक शिपायाची गरज होती. पण त्यांनी याचवेळी कांगोमध्ये संयुक्त राष्ट्रांची कामगिरी पार पाडण्यास दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राने पाठवले नव्हते एवढे सैन्य पाठविले व लोकसभेत ''घरी कितीही अडचण असली तरी जगाची कामे जास्त महत्त्वाची आहेत.'' म्हणून निर्लज्जपणे या कृत्याचे समर्थन केले.



नेहरूंना कोणी जाब विचारला नाही.

चीन प्रकरणात पूर्ण फजिती होऊन देखील नेहरूंनी त्यागपत्र दिले नाही म्हणून काही लोक टीका करतात. पण ही टीका गैरलागू आहे. नेहरूंना काढण्याचे काम लोकसभासदस्यांचे होते. त्यांनी जर नेहरूंना काढण्याची गोष्टच केली नाही तर नेहरूंनी त्यागपत्र का द्यावे?

नेहरूंनी पाठविलेलं एक अक्षोहिणी (डिव्हिजन) सैन्य शस्त्रास्त्रांच्या बाबतीत इतके खुजे होते की चीनला त्याचा सहज पराभव करता आला असता, त्याचा पूर्ण नाश करण्याची जरूर नव्हती. मग ''चीनने एवढा महान विध्वंसक प्रहार का केला?'' असे चीनी नेत्यांना विचारले असता त्यांनी जे उत्तर दिले ते भांडारनायके यांच्या दिल्लीत दिलेल्या प्रतिवृत्तात आहे. ते उत्तर असे:-

''भारताने आपले सर्वोत्कृष्ट सैन्य पाठविले तरी त्यापासून आम्हाला फारसा धोका नव्हता. एखादा ठोसा मारला असता तरी ते सैन्य पळाले असते. पण आम्हाला भारताच्या मगरूरीने क्रोध आणला होता. भारत आपण जगाचे पुढारी असल्यासारखा जो सगळ्यांचा अधिक्षेप करीत वागत होता तो त्याचा आव पोकळ आहे हे आम्हाला कायमचे सिद्ध करायचे होते.''

आपण जगाचे पुढारी आहोत असे समजून नेहरू वागत ते जगातील इतर पुढाऱ्यांना अत्यंत अपमानास्पद वाटत असे. ''नेहरूसारखा उद्धट माणूस मी पाहिला नाही.'' असे चौ एन लाय स्पष्टच म्हणाले होते.

या पराभवानंतर इतर देशात अशा पुढाऱ्याला जे शासन मिळते ते भारताने दिले नाही तरी नेहरूंच्या मोठेपणाचा फुगा चीनने फोडला हे भारतावर एकप्रकारे उपकार झाले. या घटनेनंतर कोणताही नेहरूभक्त ''नेहरू जगाचे पुढारी आहेत,'' असे म्हणण्यास धजावला नाही. नेहरूंची स्तोत्रे गाण्यास जरी नेहरूभक्त त्यानंतरही चुकले नाहीत तरी त्यांच्या बोलण्यातला विश्वास नाहीसा झाला होता, फक्त मुजोरी उरली होती. हा भ्रमनिरास झाला नसता तर नेहरूवाद भारतात किती खोल रुजला असता याची कल्पना करवत नाही.

नेहरूंच्या जागी दुसरा कोणताही पंतप्रधान असता तर चीनी संकट उद्भवले नसते. ब्रिटिशांच्या वारशाने मिळालेली सत्ता आपण होऊन चीनच्या पायावर अर्पण करण्याची बुद्धी ज्याला झाली असती असे म्हणता येईल असा एकही पुढारी त्यावेळी भारतात नव्हता.

■ ■ ■

# काश्मीरचा वाहता गळू

१९४७ मध्ये ब्रिटिशांनी पाय काढल्यावर संस्थानांचा प्रश्न उद्‌भवला. लहान मोठी ३०० च्या वर संस्थाने होती. ब्रिटिश गेल्यावर कायद्याप्रमाणे ती सार्वभौम झाली पण तरी त्यांनी स्वतंत्र न राहता भारत वा पाकिस्तान यापैकी कोणत्या तरी एका देशाला मिळावे अशी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इच्छा जाहीर केली होती व त्यांचे प्रतिनिधी

असा पाकिस्तानला इशारा दिला. पण पाकिस्तानचा उपद्रव वाढतच गेला व त्याने स्वारीचे स्वरूप धारण केले. टोळीवाले बारामुलापर्यंत आले. बारामुला घेऊन त्यांनी लुटालुटीस प्रारंभ केला. तेव्हा महाराजाने मेहेरचंद महाजन यांना मदत मागण्यासाठी दिल्लीस पाठविले.

महाजन दिल्लीत आले व त्यांनी नेहरूंची भेट घेतली. ''लुटारू संस्थानात शिरले आहेत. त्यांनी बारामुला घेतले आहे व कत्तली, बलात्कार लुटालूट यांनी काश्मीर ग्रस्त झाले आहे. हे ताबडतोब थांबविण्यासाठी भारतीय सैन्य पाठवावे नाहीतर काश्मीरचा नाश होईल. एखाद्या दिवसात लुटारू श्रीनगर घेतील व मग काश्मीरला वाचविणे अशक्य होईल असे त्यांनी नेहरूंना सांगितले.

यावर नेहरू म्हणाले, ''काहीही घाई नाही. श्रीनगर गेले तरी पुन: घेता येईल.''

महाजन म्हणाले, ''तुम्हाला घाई नाही पण काश्मीरचे प्राण कंठाशी आले आहेत. काश्मीर वाचविलेच पाहिजे. तुम्ही सैन्य पाठवीत नसाल तर सध्या जिना दिल्लीतच आहेत. मी त्यांच्याकडे जाऊन काश्मीरला पाकिस्तानात सामील करतो. महाराजांनी मला तसे अधिकार दिले आहोत.''

या अंतिमोक्तानंतर महाजन निघून आले. नेहरू त्यांना "Get Out" म्हणाले असेही वर्तमानपत्रात आले होते.

महाजन बाहेर पडल्याबरोबर शेजारच्या खोलीत शेख अब्दुल्ला बसले होते. ते घाबऱ्या घाबऱ्या आत आले व नेहरूंना म्हणाले, ''महाजनांना ताबडतोब परत बोलवा. हे तुम्ही काय केले आहे? जिनांच्या ताब्यात काश्मीर जाणे म्हणजे आपल्या

पाकिस्तानातसकट कोणत्याही देशाचे मत असे नव्हते. हे एकमात्र नेहरूंचे मत होते.

संयुक्त राष्ट्रात दाखल झालेली भारताची फिर्याद देखील कलम ७ मधील ''आक्रमणकृत्ये' या सदराखाली दाखल झाली नसून कलम ३५ खालील ''भांडणाची शांततामय सोडवणूक' या खाली दाखल झालेली आहे. शांतता स्थापन झाल्यावर काश्मीरमध्ये जनमत घेण्याचे भारताच्या प्रतिनिधीने संयुक्त राष्ट्रांना वचन दिले. याप्रमाणे शत्रूचा पक्ष घेऊन नेहरूच शत्रूला हव्या असलेल्या पण त्याने उघडपणे न मागितलेल्या गोष्टी देऊ करीत होते.

भारतीय सैन्याने श्रीनगर व बारामुला काबीज केले. बाकीचा काश्मीर हस्तगत होण्याच्या आधीच काश्मीरमध्ये बर्फ पडू लागला व भारतीय सैन्याचे मार्ग रुद्ध झाले. पाकिस्तानचे मार्ग मात्र साफ होते. त्यामुळे पाकिस्तान बाकीच्या भागात ठाण मांडून राहिला व भारताला बर्फ वितळण्याची वाट पाहत मुठी वळत स्वस्थ बसावे लागले.

पण तरी फक्त दोनतीन महिने वाट पाहण्याचा प्रश्न होता. पाकिस्तानला काश्मीरमधून हाकून लावणे सहज शक्य होते. तरी पण नेहरूंनी काश्मीरप्रश्न संयुक्त राष्ट्राकडे नेला. हे मुख्यत: नेहरू माउण्टबॅटन दम्पतीच्या प्रभावाखाली गेल्यामुळे घडले. यात त्यांनी गांधीचीही अवज्ञा केली हे पुढे त्यांनी लोकसभेत कबूल केले.

गोपालस्वामी अय्यंगारांनी भारताचा पक्ष मांडला.

''काश्मीर भारतात सामील झाले आहे. पाकिस्तानने त्यावर आक्रमण केले आहे. हे संयुक्त राष्ट्रांनी थांबवावे अशी भारताची साधी फिर्याद आहे.''

यावर पाकिस्तानतर्फे जाफरउल्ला यांनी दीर्घ भाषण केले. ''पाकिस्तानने आक्रमण केले नाही. काश्मीरमध्ये लढणारे पाकिस्तानचे रहिवासी आहेत हे खरे. पण आपले धर्मबांधव जे काश्मीरी मुसलमान त्यांचे भारतापासून रक्षण करण्यासाठी ते स्वयंस्फूर्तीने काश्मीरमध्ये जात आहेत. पाकिस्तानने त्यांना शस्त्रास्त्रे वा इतर कोणतेही साहाय्य केलेले नाही. पाकिस्तान त्यांना अडवू इच्छीत नाही एवढेच. का अडवावे? म्हणून जाफरउल्लांनी भारतात मुसलमानांवर होत असलेल्या अत्याचारांचे पदोपदी नेहरूंच्या भाषणाचे उतारे देऊन भयंकर चित्र उभे केले. अशा देशाच्या पंजाखाली मुसलमान जावेत असे कोणाला वाटेल?

भारत पाकिस्तानने आक्रमण केले म्हणून आकांत करतो आहे. पण भारताने जुनागढमध्ये काय केले? जुनागढ पाकिस्तानात सामील झाले होते याची फिकिर भारताने केली होती काय? काश्मीरचे मुसलमान भारतात सामील व्हावेत अशी भारत इच्छा करतो. मग जुनागढचे हिंदू मात्र पाकिस्तानात सामील झाले तर त्याने



अकांडतांडव का करावे?

नेहरूंच्या भाषणाचे सविस्तर उतारे दिल्यामुळे जाफरउल्लांच्या भाषणापुढे गोपालस्वामी अय्यंगार यांना काही उत्तर देता येईना. संयुक्त राष्ट्रांना काश्मीरमध्ये फौजा पाठवून पाकिस्तानी छापेमारांना हुसकून लावण्याची जरूर वाटली नाही. त्यांनी भारताने सांगितल्याप्रमाणे काश्मीरमध्ये जनमत घ्यावे असा ठराव पारित केला.

जगाने तेव्हापासून काश्मीरच्या बाबतीत भारतालाच दोषी मानले आहे. दुसरे कुणी काय केले असते? जनमताची मागणी भारतानेच केली होती ना?

दुसरा एक मुद्दा पाकिस्तानने मांडला नाही पण संयुक्त राष्ट्रांच्या नजरेस नक्की आला असला पाहिजे, तो म्हणजे ज्यांच्याजवळ विमाने, तोफा व रणगाडे नाहीत अशा केवळ छापेमारांचा बंदोबस्त करण्यासाठी भारत संयुक्त राष्ट्राकडे धाव घेतो हे विचित्र आहे. भारताला संयुक्त राष्ट्रांना मान्य असे जनमतच पाहिजे आहे तर त्याने संयुक्त राष्ट्रांने निरीक्षक पाठवावे एवढीच विनंती करावी त्यासाठी पाकिस्तानविरुद्ध तक्रार करण्याचे कारण काय?''

या सर्व प्रकारावरून स्पष्ट आहे की, ''काश्मीर आयता पदरात पडला असूनही नेहरू काश्मीरात जनमत घेतात. दुसरा कोणताही राज्यकर्ता, न्यायाची इतकी चाड बाळगणार नाही, या गोष्टीचा गाजावाजा करणे हा एक संयुक्त राष्ट्रांकडे फिर्याद नेण्यात नेहरूंचा हेतू होता.

गोपालस्वामी परत आल्यावर, मी आपले काम करू शकलो नाही म्हणून मी राजीनामा देतो असे गृहमंत्री पटेल यांना म्हणाले. त्यावर पटेल म्हणाले, ''तुमचा दोष नाही, तुम्ही कशाला राजीनामा देता? ज्या व्यक्तीने खरोखर राजीनामा दिला पाहिजे त्या व्यक्तीचा राजीनामा मागण्याचा मला अधिकार नाही हे दुर्दैव.''

शेवटी जनमत घ्या असेच संयुक्त राष्ट्रांनी म्हटले. जनमत भारताने स्वत: होऊनच मागितले होते. संयुक्त राष्ट्रांनी लुटारू पाठविल्याबद्दल पाकिस्तानची निंदा करावी व लुटारूंना हाकलण्यास भारताला मदत करावी अशी भारताची मागणी होती. त्याबद्दल संयुक्त राष्ट्र काही बोलले नाही. पण हे बोलण्याची जरूरच नव्हती. ''युद्धविराम करा'' हा संयुक्त राष्ट्रांचा ठराव पाकिस्तानने मानला होता व काश्मीरात लढाई थांबली होती.

लुटारू जर पाकिस्तानने पाठविलेच नव्हते तर संयुक्त राष्ट्र युद्धविराम करायला कोणाला सांगत होते असा प्रश्न उद्‌भवतो. अर्थात लुटारू पाकिस्तानने पाठविले नसले तरी काश्मीरमध्ये जनमताच्या आधारे निर्णय होईल असे संयुक्त राष्ट्राकडून आश्वासन

मिळाल्यास ते आपोआपच थांबतील हा पाकिस्तानचा युक्तिवाद संयुक्त राष्ट्रांनी मान्य केला.

''नेहरूंकडून केवळ चुका झाल्या, आपल्या भाषणामुळे भारताविरुद्ध ठराव झाला याचे नेहरूंना दुःख झाले असेल.'' असे ज्यांना वाटते त्यांना नेहरू कळलेच नाहीत. असल्या भाषणामुळे देशाची प्रतिमा उंचावेल असे नेहरूंना वाटले असेल तर त्याची बुद्धी सर्वसाधारण मानवापेक्षा अत्यंत निम्न दर्जाची होती असे म्हणावे लागेल. खरी गोष्ट अशी आहे की भारताची बदनामी होण्यात नेहरूंना दुःख नव्हते. भारताची बदनामी झाली तरी नेहरू हे विश्वदर्शी आहेत, केवळ भारताचे पुढारी नसून विश्वाचे पुढारी आहेत अशी आपली प्रतिमा जगात निर्माण होण्यास आपल्या भाषणांनी मदत झाली की नाही एवढाच विचार नेहरूंच्या मनात प्रभावी होता.

हे लवकरच स्पष्ट झाले. नेहरूंनी काश्मीर भारताशी कधीच एकरूप होऊ नये म्हणून ३७० कलम पारित केले. या कलमानुसार भारताच्या नागरिकांना काश्मीरमध्ये वस्ती करण्याचा व तेथे मालमत्ता खरीदण्याचा अधिकार नाही. काश्मरचे नागरिक मात्र भारतात मुक्तपणे संचार करू शकतात, राहू शकतात वा मालमत्ता खरीदू शकतात. भारताचे कायदे, काश्मीरच्या विधिमंडळाने पारित केल्याशिवाय काश्मीरला लागू नाहीत.

हा कायदा पारित करण्यात नेहरूंचा उद्देश काय असावा? एखादा मुस्लिम प्रांत मुस्लिम रहावा, हिंदूंच्या आगमनाने तेथली मुस्लिम बहुसंख्या नष्ट होऊ नये असे मुसलमानांना वाटणार व या दृष्टीने हे कलम मुसलमानांना प्रिय असणार. या भीतीनेच आजचे सारे ''सेक्युलर'' पक्ष हे कलम रद्द करण्याच्या विरुद्ध आहेत.

नेहरूंना जर स्वयंनिर्णयाचे इतके प्रेम होते तर त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या कलमाप्रमाणे काश्मीरमध्ये युद्धविरामानंतर पूर्ण शांतता असताना देखील जनमत का घेतले नाही? नेहरूंच्या तत्त्वनिष्ठेला कोणती अडचण निर्माण झाली होती?

नेहरू काश्मीरमध्ये सैन्य पाठविण्यास कसे तयार झाले याचा वर लिहिलेला इतिहास आठवला तर याचे उत्तर सहज मिळेल. नेहरू काश्मीरमध्ये सैन्य पाठवायला तयार झाले ते शेख अब्दुल्लाचे हित साधण्यासाठी. जनमत मागण्यात जगाला खुष करणे व जनमत न घेण्यात शेख अब्दुल्लाला खुष करणे असे नेहरूंचे परस्परविरुद्ध उद्देश होते. जनमत घेतले असते तर काश्मीर पाकिस्तानकडे गेले असते याबद्दल कोणाला शंका नाही. जनमतात स्वतंत्र काश्मीरचा पर्याय असावा हे संयुक्त राष्ट्रांना व मुख्यतः ब्रिटनला मान्य नव्हते. पूर्वी सीमाप्रांतात मताकलन केले गेले तेव्हा स्वतंत्र पख्तूनिस्तानचा पर्याय



मतदारांना खुला असावा हा प्रस्ताव इंग्रजांनी अमान्य केला होता. कारण भारताचे दोन पेक्षा जास्त तुकडे पडू नयेत असे त्यांचे धोरण होते. तेव्हा काश्मीरमध्ये जनमत घेणे म्हणजे शेख अब्दुल्लाला काश्मीरच्या तख्तावर न चढविता फाशीच्या तख्तावर चढविणे ठरले असते.

शेख अब्दुल्लाला खुष करण्यासाठी नेहरूंनी काश्मीरमध्ये जनमत घेण्याची स्वतःचीच सूचना रद्द केली एवढे शेख अब्दुल्लांचे कोणते महत्त्व होते?

काश्मीरी मुसलमानांचा पुढारी आपला अनुयायी आहे म्हणजे काश्मीरचे मुसलमान आपले अनुयायी आहेत असे ठरते. ही कल्पना नेहरूंना अत्यंत सुखावह होती. भारताच्या मुसलमानात आपले काहीच वजन नाही हे त्यांना अनुभवाने कळून चुकले होते. ''मुस्लिम अनुयायायी पाहिजेत'' अशी पाटीच जणू नेहरूंनी आपल्या गळ्यात बांधली होती.

पण नेहरूंना वाटत होते त्याप्रमाणे शेख अब्दुल्ला हा नेहरूंचा अनुयायी नव्हता. पुढे नेहरूंनाच त्याने असे सुनावले व त्याला अटक करणे नेहरूंना भाग पडले.

काश्मीरमध्ये सामसूम दिसल्यावर नेहरूंचे गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी काश्मीरमध्ये जनमत घेतले जाणार नाही असे एका भाषणात जाहीर केले. याचे कारण काश्मीरमधील आपले सैन्य पाकिस्तानाने पूर्णपणे काढून घ्यावे ही अट पाकिस्तानने पाळली नाही असे सांगण्यात आले. ही अट पाकिस्तानने पाळावी एवढेच नव्हे तर जनमतात लुटारू हस्तक्षेप करणार नाहीत याचीही हमी द्यावी असे अपेक्षित आहे. ''ही परिस्थिती निर्माण करण्यास पाकिस्तानचा सहयोग नाही.'' म्हणून काश्मीरात जनमत घेता येत नाही. असे वर्तमानपत्रातून सांगण्यात आले होते.

पाकिस्तान अर्थातच स्वस्थ बसले नाही. त्याने संयुक्त राष्ट्राकडे लकडा लावला व संयुक्त राष्ट्रांनी भारताचे सर्व मुद्दे फेटाळून काश्मीरमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या फौजा पाठवून जनमत घ्यावे असा ठराव आणविला. याप्रसंगी कृष्ण मेनन यांनी सतत दोन दिवस न थांबता भाषण केले होते. त्याची भारतात फार वाहवा झाली पण लांब बोलणे म्हणजे वाजवी बोलणे हे समीकरण संयुक्त राष्ट्रात कुणाला मान्य नव्हते. मेननला आपले भाषण थांबविण्यास सांगण्यात आले. ठराव सगळ्या राष्ट्रांना मान्य होण्याचा संभव आहे असे पाहून रशियाने आपला नकाराधिकार वापरून तो फेटाळला.

नेहरूंवर देशविघातक हेतूंचा आरोप करणे काही लोकांना आवडत नाही. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर नेहरूंची श्रद्धा होती व या तत्त्वानुसार काश्मीरच्या लोकांचे भवितव्य ठरावे म्हणून त्यांनी सर्व खटाटोप केला असे म्हणण्यात येते. असे

म्हणणाऱ्यांजवळ पुढे जनमत घेण्याचे नेहरूंनी का नाकारले याचे पटण्यासारखे उत्तर नाही.

नेहरूंना जर स्वयंनिर्णयाची एवढी चाड होती तर तिबेटच्या बाबतीत ती कुठे गेली होती? तिबेटचे भवितव्य ठरविण्यासाठी जनमत घ्यावे असा आग्रह त्यांनी का धरला नाही? त्यावेळी चीनची ब्रिटिशांनी पौराणिक मिथ्यासारखी मानलेली सार्वभौमता त्यांना फार मोलाची कशी वाटली? तिबेट हा प्राचीन हिंदू संस्कृतीशी निगडित देश आहे व त्याच्यावर चीन या कम्युनिस्ट देशाचा डोळा आहे तेव्हा तिबेटचे वस्त्रहरण झाल्याने हिंदूंचे वस्त्रहरण होते व एका कम्युनिस्ट राष्ट्राचेही हित जोपासले जाते असे दुहेरी सत्कर्म साधणे हे नेहरूंना आपल्या जीवनाच्या इतिकर्तव्यतेला पोषक वाटले. तिबेटशी भारताचे नाते कैलास व मानसरोवर या पौराणिक कथापुरते आहे अशी नेहरू खुद्द लोकसभेत भारताची टवाळी करीत. हिंदूंच्या जिव्हारी लागेल असे बोलण्यात व वागण्यात नेहरूंना आसुरी आनंद होत असे हे मी अनेकवेळा अनुभवले आहे.

नेहरूंचे व्यक्तित्व विसरून काश्मीर भारतात असावे या म्हणण्यात काही न्याय्यता आहे काय याचा विचार आवश्यक आहे. याच्या दोन बाजू आहेत एक वैधानिक व दुसरी नैतिक.

वैधानिक बाजू स्पष्ट आहे. १९४७ साली स्थापन झालेल्या भारतीय स्वातंत्र्याचा आधार ब्रिटिश लोकसभेने पारित केलेला भारतीय स्वातंत्र्याचा कायदा हा आहे. या कायद्याप्रमाणे भारतीय संस्थानांच्या राजांना भारत व पाकिस्तान यापैकी एका देशात सामील होणे व स्वतंत्र होणे हे तीन पर्याय खुले होते. काश्मीरच्या महाराजाने भारतात सामील होणे पसंत केले. तेव्हा काश्मीर भारताचे आहे ही कायद्याची नि:संदिग्ध ग्वाही आहे.

पण या कायद्याला भारताच्या पंतप्रधानांनी दिलेल्या वचनांचीही जोड दिली पाहिजे. संयुक्त राष्ट्रांना भारताच्या पंतप्रधानांनी दिलेली वचने भारतावर बंधनकारक आहेत. ती जर वैधानिक बाजूचा भाग मानली तर भारताच्या बाजूने बोलण्यासारखे काही उरतच नाही. कारण काश्मीरात जनमत घेतले पाहिजे अशी भारतानेच संयुक्त राष्ट्राकडे मागणी केली होती व आता भारत जनमतातून निसटून जाण्यासाठी सबबी शोधत होता. महाराजांच्या कृतीने जो न्याय पूर्णपणे भारताकडे होता तो नेहरूंच्या कृतीने पूर्णपणे भारताविरुद्ध गेला.

कायद्याच्या दृष्टीने काश्मीरला स्वयंनिर्णयाचा हक्क नाही. न्यायमूर्ती छागला यांच्या मतानुसार स्वयंनिर्णयाचा अधिकार फक्त देशांना असतो, देशांच्या भागांना नव्हे.



काश्मीर कधीतरी स्वतंत्र देश होता काय? तो नेहमीच भारताचा भाग म्हणून राहिलेला आहे. इंग्रज येण्याच्या आधी तो रणजीतसिंगाच्या राज्यात होता. त्यापूर्वी तो मुघलांच्या राज्यात होता. त्याच्या पूर्वी कुशानांच्या. काश्मीरचे राजे भारतीय युद्धात भारताचे सम्राटपद कुणाकडे जावे हे ठरविण्यासाठी लढले असे राजतरंगिणी सांगते. काश्मीर भारताचा भाग असल्याशिवाय काश्मीरच्या राजांना भारताच्या सार्वभौमत्वाशी काय करायचे होते?

नेहरू नेहमी सांस्कृतिक राष्ट्रवादाची टवाळी करीत. कैलास व मानसरोवराची देखील त्यांनी टवाळी केली. तेव्हा बिल्हण कल्हण आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांचा काश्मीर अभारतीय असू शकत नाही या दाव्याची देखील ते टवाळी करणार हे अपेक्षित होते.

स्वयंनिर्णयाचा हक्क अनिर्बंध ठेवला तर काश्मीरला तरी अभंग का मानावे? जम्मू व लडाखला स्वतंत्र का मानू नये? शिवाय जनमत एकदाच का घ्यावे? आजच्या पिढीने पुढच्या साऱ्या पिढ्यांचे भवितव्य ठरविणे याला स्वयंनिर्णय म्हणता येईल काय? पंचवार्षिक निवडणुकाप्रमाणे पंचवार्षिक जनमते का असू नयेत?

काश्मीरवर भारताचा काय हक्क आहे याची चर्चा केल्यावर पाकिस्तानचा त्यावर काय हक्क आहे याची चर्चा ओघानेच येते. काश्मीरमध्ये मुसलमानांची बहुसंख्या असल्यामुळे काश्मीर पाकिस्तानात असावे असे पाकिस्तानला वाटत असले तरी काश्मीरवर हक्क सांगताना त्याने कुठेही हे कारण पुढे केलेले नाही. पाकिस्तान काश्मीरवर हक्क सांगतच नाही, नेहरूंनी हा प्रश्न संयुक्त राष्ट्रापुढे नेला नसता तर पाकिस्तानने तो नेला असता याचा मुळीच संभव नाही. पाकिस्तानचा सारा दावा नेहरूंनी काश्मीरच्या भवितव्याबद्दल जनमत घेण्याचे कबूल केले होते व आता ते त्यातून निसटू पाहत आहेत हा आहे. पाकिस्तानचे हे म्हणणे सर्वथैव सत्य आहे.

अलीकडे भारतात असे म्हटले जाते की काश्मीरच्या भवितव्याबद्दल जनमत घेण्याचे आश्वासन काश्मीरच्या जनतेला दिले होते, पाकिस्तानला नव्हे. संयुक्त राष्ट्राकडे हा प्रश्न गेलाच नसता तर हे म्हणणे बरोबर होते. पण नेहरू संयुक्त राष्ट्राकडे गेल्यामुळे जनमताचे वचन काश्मीरच्या जनतेला नव्हे तर संयुक्त राष्ट्रांना दिले असे ठरते. संयुक्त राष्ट्रांना दिलेले वचन भारताने पाळावे असा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्राकडे आग्रह धरणे सर्वथैव वैध आहे. कारण पाकिस्तान हा संयुक्त राष्ट्रांचा सदस्य देश आहे.

काश्मीर प्रश्नाचा आता पुढचा कोळसादेखील उगाळला पाहिजे.

काश्मीरातील बर्फ वितळू लागले व भारतीय सैन्याने आपली मोहीम सुरू केली.

इतक्यात संयुक्त राष्ट्रांनी युद्धविराम जाहीर केला. लुटारू युद्धविराम मानतील याची हमी कुणी द्यायची हे न विचारता नेहरूंनी युद्धविराम स्वीकारला. युद्धविराम अमलात आणण्यात नेहरूंनी चार दोन दिवसांचा विलंब केला असता तरी पाकव्याप्त काश्मीरला मुक्त करता आले असते असे बहुतेक सेनाधिकाऱ्यांच्या तोंडी ऐकले आहे. मग नेहरूंनी तसे का केले नाही?

साऱ्या काश्मीरवर भारताचा प्रभाव स्थापन करणे म्हणजे हिंदूंचा प्रभाव स्थापन करणे, हे ''प्रतिगामी'' आचरण नेहरूंना कसे मान्य होईल?

या व्यतिरिक्त दुसरेही कारण आहे. ज्या शेख अब्दुल्लाच्या खातर नेहरूंनी काश्मीरात सैन्य पाठविले त्या शेख अब्दुल्लांना पाकव्याप्त काश्मीरवर ताबा नको होता. कारण तेथे त्याचे पुढारीपण कोणी मानत नव्हते व तो भाग काश्मीरात असता तर दुसराच कोणी काश्मीरचा पंतप्रधान झाला असता. नेहरूंचे आवडते शेख अब्दुल्ला जिभल्या चाटतच राहिले असते. (Ajit Bhattacharya, Indian Express 19/7/1999)

तिबेटप्रमाणेच काश्मीरचे उदकही शत्रूच्या हातावर सोडण्यास नेहरू तयार होते असे गोपालने उघडच लिहिले आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान महमदअली आले तेव्हा नेहरूंनी त्यांना वचन दिले होते की, तुम्ही पाकिस्तानात परततात्च काश्मीरचे दान तुमच्या पदरात पडेल. पण असे झाले नाही. कारण पाकिस्तानने अमेरिकेशी सुप्रसिद्ध रक्षाकरार केला. अमेरिका हा रशियाविरोधी, कम्युनिझमविरोधी व भांडवलशाही देश म्हणून त्यांच्याशी दोस्ती करणाऱ्या पाकिस्तानचे काही बरे करावे असे नेहरूंना कसे वाटेल? त्यानी काश्मीरबद्दल कानावर हात ठेवले.

नेहरूंच्या या योजनेनुसार काश्मीर पाकिस्तानचे झाले असते तर काय कहर झाला असता याची कल्पना करवत नाही. भारताचे सैन्य पाकिस्तानमध्ये ठाण मांडून बसले असताना हजारो पंडितांना घरदार, बायका वगैरे सोडून भारतात शरणार्थी म्हणून जीवन कंठावे लागत आहे. काश्मीर पूर्णपणेच पाकिस्तानच्या ताब्यात गेले असते तर जम्मूमधील हजारो हिंदूंना घरदार व स्त्रिया सोडून भारताच्या आश्रयाला यावे लागले असते. याने उत्तेजन मिळून पश्चिम व पूर्व पाकिस्तान या दोन्ही ठिकाणी हिंदूंचे शिरकाण सुरू झाले असते. भारतात याचा प्रत्याघात होऊ शकला असता. मात्र हा सर्व कहर होऊनही हे सर्व हिंदू नेहरूंची पूजाच करीत राहिले असते. कुशल झाले तर आपण ईश्वराला धन्यवाद देतो पण आपत्ती आली तरी ईश्वराला शिव्या देत नाही. उलट जास्त भक्तीने त्याची पूजा करू लागतो. नेहरू ईश्वरापेक्षा कमी होते काय?



नेहरूंचे विचार किती विकृत होते हे यावरून स्पष्ट व्हावे. काश्मीरचा विचार करताना काश्मीर व भारत यांचे हित हा नेहरूंच्या मते अप्रस्तुत मुद्दा होता. कम्युनिझमच्या भल्यासाठी नेहरू भारताचे पंतप्रधान झाले होते.

हैदराबादचेही काश्मीर करण्याचा नेहरूंचा विचार होता असे मराठवाड्यातील प्रसिद्ध लेखक नरहर कुरुंदकर यांनी उजेडात आणले आहे. (चं. ग. माडखोलकर-तरुण भारत) नेहरूंनी हैदराबादचे दिवाण यावर जंग यांच्याशी करार करून निझामालाही ३७० कलम व पूर्ण अंतर्गत सार्वभौमता देऊ केली होती. निझामाला पूर्ण सार्वभौमत्व पाहिजे होते म्हणून त्याने नेहरूंचा प्रस्ताव नाकारला.

निझामाने हा प्रस्ताव नाकारला नसता तर भारताच्या पोटातच शेख अब्दुल्लापेक्षाही घातक संकट उभे झाले असते. काश्मीरमध्ये ३७० कलमाने प्राप्त झालेले अधिकार तेथील जनतेने निवडून दिलेले सरकार वापरते. हैदराबादेत हे सर्व अधिकार निझामाला मिळाले असते, हैदराबादी जनतेला नव्हे. ब्रिटिशांच्या काळात रेसिडेंट नावाचा एक अधिकारी संस्थानातील कारभाराची देखरेख करीत असे. ३७० कलमाखाली तशी काहीच व्यवस्था नाही. काश्मीरात करणसिंग हा हिंदू सदरे रियासत होता. त्याच्या हुकुमाने शेख अब्दुल्लाला पकडता आले. निजामाच्या राष्ट्रद्रोही कारस्थानांना आळा घालू शकण्यास असा काहीच कायदेशीर उपाय नव्हता. काहीच कायदेशीर अधिकार नसताना नक्षलवादी, उल्फा वगैरेंचे लक्षावधी सैनिक धुमाकूळ घालीत आहेत. फ्रान्स, जर्मनी वगैरे देशाएवढा मोठा प्रदेश ज्याच्या ताब्यात आहे त्या निजामाने भारत सरकारलाच घशात घातले असते. ब्रिटिशांच्या काळात अत्यंत मर्यादित अशी सत्ता असताना देखील निजामाचे राज्य औरंगजेबाचे अनुकरण करीत असे. अनिर्बंध सत्ता प्राप्त झाल्यावर त्याने काय केले असते याची कल्पनाच करावी.

■ ■ ■

नेहरू आणि नेहरूवाद

# संविधानाचे तीन तेरा

## जन्मत:च स्वातंत्र्याची हत्या

भारताचे मूळ संविधान साधारणपणे स्वातंत्र्यांच्या चळवळीने जोपासलेल्या तत्त्वावर आधारलेले होते, पण नेहरूंना ही तत्त्वेच पसंत नव्हती व सर्व संविधानच गुंडाळून ठेवायचे होते. त्यांनी संविधानात दुरुस्त्या करून संविधानसभेच्या साऱ्या उद्देशावरच हरताळ फासला व संविधान विद्रूप करून टाकले. यापैकी समान नागरी संहितेची त्यांनी काय दशा केली हे ''सेक्युलॅरिझम'' संबंधीच्या प्रकरणात सांगितलेच आहे.

माउंटबॅटन दम्पतींच्या प्रभावामुळे नेहरूंना आपण इंग्रजच आहोत असे वाटू लागले होते. ''भारतावर राज्य करणारा मी शेवटचा इंग्रज आहे.'' असे ते स्पष्टच म्हणाले होते. कावळ्याने मोराची पिसे खोवून आपण मोर आहोत म्हणून बतावणी करणे तुच्छतापात्र समजले जाते. शिवाय कालपरवापर्यंत ज्यांच्या राज्याविरुद्ध आपण परराज्य म्हणून चळवळ करीत होतो त्यांच्याच कळपात शिरण्याचा प्रयत्न करणे कोंडवाड्यातून सुटल्यावर एखाद्या गाढवाने ''मी गाढव नसून कोंडवाड्याच्या मालकाचा जावई आहे'' असा आव आणण्यासारखे हास्यास्पद आहे.



असा आव आणणाऱ्या नेहरूंनी ''कोंडवाडा हाच माझा वडिलोपार्जित वाडा आहे'' असा दावा प्रस्थापित करण्यासाठी ''भारत हे स्वतंत्र प्रभुत्वशाली प्रजासत्ताक राहील.'' या संविधान सभेच्या पहिल्या ठरावातील स्वतंत्र हा शब्द गाळून भारत हा ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश आहे असे जाहीर केले. आपण स्वातंत्र्यदिन वगैरे शब्द वापरतो पण हे शब्द आपल्या संविधानाच्या विरोधी आहेत याची आपल्याला जाणीव नसते.

इंग्लंडच्या वारीवरून परत आल्यावर लगेच नेहरूंनी हा ठराव मांडला. ठरावाचे समर्थन करताना त्यांनी ''आपण स्वतंत्र झालो तर जगात एकाकी पडू.'' असे कारण दिले. ज्याने ''ब्रिटिश साम्राज्य सोडले तो ब्रह्मदेश एकाकी आहे काय?'' असे कोणीही विचारले नाही. ब्रिटिश साम्राज्यात पुष्कळ भारतीय राहतात त्यांना आपण स्वतंत्र झाल्याने वाऱ्यावर सोडल्यासारखे होईल असे दुसरे कारण नेहरूंनी दिले. ब्रह्मदेश साम्राज्यातून फुटून निघाला म्हणून ब्रिटिश साम्राज्यात राहणारे ब्रह्मी वाऱ्यावर सोडल्यासारखे झाले आहेत काय? आम्ही ब्रिटिश साम्राज्यात असूनदेखील आफ्रिकेतील ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशच केवळ नव्हे तर आमच्या ओसरीतलीच श्रीलंका आम्हाला लाथ मारते हे कसे?

''गांधी, पटेल वगैरे या आमूलाग्र बदलाशी कसे सहमत झाले? असा प्रश्न उद्‌भवतो. ब्रिटिश साम्राज्यात राहण्याची कल्पना गांधींना मान्य नसली तरी स्वतंत्र भारताच्या ध्वजावर एका कोपऱ्यात युनियन जॅकही असावा असे त्यांनी सुचवले होते. असे सुचविणाऱ्या गांधींना ''ब्रिटिश साम्राज्यात राह्यलाच काय हरकत आहे?'' असे वाटू शकते. साम्राज्यात राहण्याच्या सूचनेला फारसा विरोध झाला नाही हे खरे असले तरी या सूचनेचा मूळ उपक्रम नेहरूंचा होता हे विसरता येत नाही.

''भारत प्रजासत्ताक असल्यामुळे ज्या साम्राज्याचे प्रमुखत्व सिंहासनाकडे आहे त्या साम्राज्यात तो कसा राहू शकतो?'' असा प्रश्न उद्‌भवला. तो टाळण्यासाठी ब्रिटिश सिंहासन हे भारतीय प्रजासत्ताकाच्या सार्वभौमतेचे प्रतीक आहे, असे सांगण्यात आले. मात्र आपण प्रजासत्ताक आहोत हे दाखविण्यासाठी सचिवालयावरील मुकुटांचे शिल्प काढण्यात आले. एकदा लोकसभेवर तिरंग्याऐवजी युनियन जॅक फडकला होता. याबद्दल खुलासा विचारता नेहरूंनी सांगितले की ''मी सचिवालयावर युनियन जॅक फडकवायला सांगितले होते. पण गैरसमजाने तो लोकसभेवरच फडकविण्यात आला. नेहरूंचे तर्कशास्त्र समजणे मला नेहमीच कठिण गेले आहे. सचिवालयावर मुकुटाचे शिल्प जर चालत नाही तर युनियन जॅक कसा चालतो? सचिवालयावर युनियन जॅक

चालतो तर लोकसभेवर का नाही?

साम्राज्यात राहणे याचा निश्चित अर्थ तरी काय? वेळोवेळी साम्राज्य वा जास्त सोज्ज्वळ शब्द वापरायचा म्हणजे कॉमनवेल्थ यातील सामायिक देशाचे वेळोवेळी सम्मेलन होते. त्यात समान प्रश्नावर चर्चा होते. या सम्मेलनाच्या सदस्यत्वापलीकडे साम्राज्यात राहण्याने अमुक अमुक करावे लागते वा अमुक लाभ होतो हे कुणीही सांगू शकत नाही. या सम्मेलनाचे अध्यक्षपद फक्त ब्रिटनचे राजसिंहासनच करू शकते. नेहरूंनी स्वत:ला इंग्रज मानले वा स्वत:ला पंतप्रधान न म्हणता बादशहा म्हणवून घेतले असते तरी ते या सम्मेलनाचे अध्यक्ष होऊ शकले नसते.

सामायिक देश ब्रिटिश साम्राज्यात आहेत पण त्याहून स्वतंत्र आहेत याचा अर्थ इतकाच की, ब्रिटन या देशावर कोणतीही बंधने लादत नाही. वस्तुत: वसाहती देशात जर गव्हर्नर जनरलचे पद असेल तर तो गव्हर्नर जनरल ब्रिटिश राजसत्तेच्या हुकूमाने नेमला जातो, पण फिजीच्या बंडखोरांनी जेव्हा राणीने नेमलेल्या गव्हर्नर जनरलला बडतर्फ केले तेव्हा त्या बंडखोरांविरुद्ध कारवाई करण्याचा ब्रिटनला अधिकार असून देखील ब्रिटनने तसे करण्याचे नाकारले.

पण ही परंपरा झाली. ब्रिटनच्या संविधानात ब्रिटनला असे करता येत नाही असे काही कलम नाही. कारण ब्रिटनला लेखी संविधानच नाही.

ही अडचण दूर करण्यासाठी डॉ. मलान यांनी ''ब्रिटन वसाहतींच्या बाबतीत सार्वभौमत्वाचे अधिकार वापरणार नाही'' असे कलम असण्याची सूचना केली होती. असे कलम सामायिक देशांच्या सम्मेलनात त्या सम्मेलनाचा ठराव म्हणून पारित होऊ शकले असते. पण ब्रिटिश सिंहासनाला केवळ एक विनंती यापेक्षा या ठरावाचे काही महत्त्व असू शकत नाही. तो ठराव ब्रिटिश सिंहासनावर बंधनकारक असू शकत नाही. कारण ब्रिटिश सिंहासन हे या सम्मेलनापेक्षा वरिष्ठ अशी संस्था आहे. शिवाय तर्कशुद्धतेच्या दृष्टीने देखील ''अधिकार'' व ''अधिकार वापरण्याचा अधिकार'' असा भेद अर्थशून्य आहे. तेव्हा कायद्याच्या दृष्टीने सामायिक देश स्वतंत्र नाहीत. त्यांचे स्वातंत्र्य ब्रिटनच्या मर्जीवर अवलंबून आहे. ब्रिटन भारताच्या अध्यक्षाला पदच्युत करीत नाही ही त्यांची कृपा आहे. तो आमचा अधिकार नाही.

ब्रिटिश साम्राज्याच्या सदस्यत्वात फायदा कोणताही नाही असे असताना आम्ही आपण होऊनच अशा सदस्यत्वाचा हव्यास धरावा याचे कारण गुलामाला गुलामीच्या पाशाबद्दल प्रेम वाटू लागते. कारण त्याच्या अस्तित्वाचा तो भाग झालेला असतो, ''जो देश गुलामी हा आपल्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग मानतो तो आदरणीय जीवन



जगण्याची क्षमता प्राप्त करू शकेल काय?'' याचा सुज्ञांनी विचार करावा.

मुळात वसाहतींचे स्वराज्य dominion status ही कल्पना ज्या देशात इंग्रजच वसती करण्यास गेले व राज्य करू लागले त्या देशांसाठी आहे. जसे कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशातील राज्यकर्ते देखील इंग्रजच होते व आहेत. नेहरू स्वत:लाच इंग्रज समजत होते व कॅनडातील व ऑस्ट्रेलियातील इंग्रज जसे तेथील नेटिवावर म्हणजे मावरी सारख्या एतद्देशीयावर राज्य करतात तसे आपण आपले पाय चाटणाऱ्या या ''गोबर संस्कृतीच्या'' हिंदूवर राज्य करीत आहोत अशी कल्पना माउंट बॅटन दम्पतीच्या सहवासाने नेहरूच्या डोक्यात प्रबल झाली होती. हे एकमात्र कारण भारताने ब्रिटिश साम्राज्याचे सदस्यत्व स्वीकारण्याच्या मागे होते.

## हिंदू समाजाचे शकलीकरण

संविधानाच्या मूलभूत स्वरूपाचे एक कलम म्हणते.

''जाती, धर्म व लिंग याबाबतीत भेदभाव केला जाणार नाही.''

समतेचे तत्त्व असे वरील कलमाचे वर्णन केले जाते. पण समता याचा अर्थ काही ''पुरोगामी'' लोकांच्या मनात वेगळाच असतो. ज्योतिबा फुल्यांनी ब्राह्मणद्वेषाचा उपदेश केला तरी ते समतेचे पुरस्कर्ते होते असा प्रचार करण्यात येतो. नेहरू हे अशाच समतावाद्यापैकी होते. मद्रास उच्च न्यायालयाने नोकऱ्यांच्या बाबतीत ब्राह्मण/अब्राह्मण असा भेदभाव करता येणार नाही असा निकाल दिला तेव्हा नेहरू गरजले. ''दुबळ्या वर्गांच्या हितासाठी केलेला भेदभाव वरील कलमात भेदभाव म्हणून मानलेला नाही.'' हे कलम पारित झाले तेव्हा नेहरूंनी असा युक्तिवाद केल्याचे ऐकिवात नाही. कारण संविधानकर्ते ज़ातीय आरक्षणाच्या विरुद्ध होते. संविधानात फक्त हरिजनासाठी आरक्षण मान्य केले होते व तेही दहा वर्षात संपवावे असा आदेश होता. दहा वर्षात हे संपणे तर दूरच सर्रास जातीच्या आधारावर आरक्षणे सुरू झाली. संविधानात मागासलेल्या वर्गासाठी खास सवलतींना मुभा दिली आहे. पण ''मागासलेले वर्ग'' म्हणजे ''मागासलेल्या जाती'' असा अर्थ करण्यात आला व जातीच्या आधारावर सर्रास आरक्षणे सुरू झाली. याबद्दल ओरड होऊन ''ब्राह्मण मागासलेले नाहीत'' या म्हणण्यास आधार काय? पुढारलेपणाचे आजच्या जगातील लक्षण आर्थिक उत्पन्न हे आहे. या बाबतीत ब्राह्मणांचा क्रमांक अब्राह्मणांच्या वरचा आहे याला आधार काय? शिक्षण हा दुसरा पुढारलेपणाचा निकष घेतला तरी पुरोहितोचा वर्ग पुढारलेला म्हणता येईल काय? बहुतेक पुरोहितांना संस्कृत देखील येत

नसते, आपल्या कामाचे मंत्र फक्त पाठ म्हणता येतात. आजच्या भारतात पुढारलेपणा व इंग्रजी यांचे समीकरण आहे. या समीकरणाच्या आधारे पुरोहितांना पुढारलेले समजता येईल काय? पुरोहितांचा धंदा करणाऱ्या ब्राह्मणांचा अंतर्भाव मागासलेल्या वर्गात का करू नये?'' असे विचारण्यात आले. मंडल समितीने या युक्तिवादांना मान्यता दिली व ब्राह्मणात देखील मागासले वर्ग असल्याचे कबूल करून त्यांच्या आरक्षणाची तरतूद केली.

याचा परिणाम मागासले म्हणवून घेण्याची व आपण राष्ट्राच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर आहोत असे दाखविण्याची चढाओढ निर्माण करण्यात झाला. गोंड हे पूर्वी आम्ही क्षत्रिय आहोत, आम्ही या देशात राज्ये केली आहेत, आम्हाला या देशाच्या मुख्य प्रवाहात मानाचे स्थान आहे असे मानण्यात भूषण मानीत होते. ते आता स्वत:ला मागासले म्हणवू लागले आहेत.

नोकऱ्या ही खैरात आहे काय की ज्याच्यावर मर्जी बसेल त्याला नोकरी द्यावी? नोकरी कामासाठी असते व काम करण्याची क्षमता हाच त्यात एकमात्र निकष असला पाहिजे. ''यावर मागासलेल्या जातीही कार्यक्षम असतात?'' असे भूतपूर्व पंतप्रधान वि. प्र. सिंग उत्तर देत. असे जर आहे तर त्यांना आरक्षणाची जरूर काय?

गरिबांना जातिनिरपेक्ष शिष्यवृत्त्या व अमुक जातीचा म्हणून शाळा कॉलेजात उपसर्ग पोचत असेल तर त्याविरुद्ध सक्त उपाययोजना यामुळे दुबळ्या वर्गाचे सहज रक्षण होईल.

पण दुबळ्या वर्गाचे रक्षण हा नेहरूंचा हेतू नव्हताच. हिंदू समाजातील एकत्वाची भावना नष्ट करणे हाच त्यांचा उद्देश होता.

आमचे उद्योग जगाच्या स्पर्धेत टिकत नाहीत याचे एक महत्त्वाचे कारण ''आमचा कर्मचारी वर्ग कामचुकार व अक्षम आहे.'' असे सांगण्यात येते. वरील धोरणाने या शिवाय दुसरे काय होणार?

## हजारामागे एक गुत्ता

दारूबंदी हा स्वराज्याच्या चळवळीचाच लो. टिळकांपासूनच एक भाग होता. ३७ साली स्थापन झालेल्या काँग्रेस सरकारांनी दारूबंदीचे कायदे केले होते. त्या अनुसार भारताच्या संविधानात देखील आदेशपर तत्त्वामध्ये दारूबंदीचा समावेश करण्यात आला आहे.

दारूबंदी नेहरूंना पसंत नव्हती. कारण ते अस्सल विदेशी दारूचे भोक्ते



असणाऱ्या मोतीलालांचे चिरंजीव व भारतावर राज्य करणारे शेवटचे इंग्रज होते. पाश्चात्त्य देशात दारू सार्वत्रिक आहे. त्याअर्थी दारू पिण्यात काही वाईट असू शकत नाही अशी भारतात सार्वत्रिक समजूत आहे. पं. नेहरू दारू पीत नव्हते असे एम. ओ. मथाई सांगतात. याचा अर्थ ते नेहमी दारू पीत नव्हते एवढाच घ्यायचा. कारण राव दम्पतींनी लिहिलेल्या ''नेहरूंचे हजार दिवस'' या पुस्तकात ''गांधी वरच्या मजल्यावर बसले असताना नेहरू अमृत कौर समवेत खालच्या मजल्यावर दारूची मजा चाखत होते व गांधी दारूबंदी सारख्या क्षुद्र प्रश्नांवर भर देतात म्हणून त्यांच्यावर टीका करीत होते'' असे वर्णन केले आहे. वाचकांपैकी पुष्कळांचे असेच मत असण्याचा संभव आहे. त्यामुळे नेहरूंनी दारूबंदीची परवड केली हे चांगलेच झाले असे नेहरूंचे समर्थन करण्यात येईल. पण आदेशात्मक तत्त्व पारित झाले तेव्हा नेहरूंनी संविधानसभेत त्याला विरोध केला नव्हता. शिवाय असे त्यांचे मत होते तर पंतप्रधान झाल्यावर त्यांनी ''दारू निरुपद्रवी आहे व संविधानातील दारूबंदीचा आदेश रद्द करायला पाहिजे'' असा प्रचार करायला पाहिजे होता. तसे न करता हातातल्या सत्तेचा वापर करून संविधानाची अवज्ञा करणे ऋजुतेचे लक्षण नाही.

या तात्त्विक मुद्यावर अधिक विस्तार न करता दारूबद्दलचे सत्य सांगणे आवश्यक आहे.

कोलमन यांच्या Abnormal Psychology : या ग्रंथात दारूबद्दल विस्तृत प्रकरण आहे. त्यात ''दारूचा औषध म्हणून उपयोग शून्य आहे.'' असा निर्माळा दिला आहे.

दारूच्या शीतनिवारकतेबद्दल ऑक्स्फर्ड विश्वविद्यालयाच्या Food and Health या पुस्तकात पुढील उल्लेख आहे-

"Alchohol dilates the capillaries of the skin and this leads to extra loss of heat-The popular notion that alchohol fortifies people against cold weather is a dangerous fallacy."

''दारूच्या हानिकारकतेबद्दलच्या समजुती खऱ्या असत्या तर पाश्चात्त्य देशांचा आतापर्यंत नाश झाला असता'' हे सुभाषित सार्वत्रिक आहे. पण नाश म्हणजे काय? ''यादवांचा जसा दारूने नाश झाला म्हणजे पृथ्वीतलावर यादवच उरते नाहीत तसे पाश्चात्त्यांचे का झाले नाही?'' असे विचारण्याचा उद्देश असेल तर आजपर्यंत कोणत्याही समग्र देशाचा कशानेही-अणुबॉम्बने देखील अशा तऱ्हेचा नाश झाला नाही. पण दारूला आळा घातला पाहिजे असे अमेरिका व रशिया या दोन्ही अग्रगण्य देशात मत आहे. गार्बाचाव्हने रशियात दारूबंदी करण्याचा प्रयत्न केला व अमेरिकेतही दारूला

आळा घालण्यासाठी कायदे आहेत. पण अमेरिकेत भर मुख्यत: प्रचारावर आहे. "उपदेशाने दारू सुटत नाही." हे अर्धसत्य आहे. अमेरिकेत दारूच्या परिणामाबद्दल खऱ्या माहितीला प्रसिद्धी दिल्यामुळे दारूवर बराच आळा बसला आहे. नाहीतर पूर्वी अमेरिकेत दारूने बराच कहर केला होता. अमेरिकेत चार टक्के लोक अल्कोहोलिक म्हणजे मद्यनष्ट होते. दुसरा कोणताही रोग देशातील चार टक्के लोकांना झालेला सहसा आढळणार नाही. मद्यनष्ट म्हणजे दारू पिण्याशिवाय ज्यांना आयुष्यात काहीच करता येत नाही व समाजाच्या खर्चाने इस्पितळात ठेवावे लागते असे लोक. यांच्या रक्तात नेहमी दारू असते व तिचे प्रमाण कमी झाले की ते पूर्ववत आणण्यासाठी दारू प्याल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. उरलेले जे मद्यनष्ट नाहीत पण दारू घेतल्याशिवाय जे कोणतेही काम करू शकत नाहीत व दारू न मिळाली तर ज्यांना निरनिराळ्या प्रकारचे झटके येतात असे लक्षावधी लोक आहेत.

रस्त्यावरील अपघात व गुन्हे यापैकी बहुतांश दारूमुळे घडतात. खुनासारखे गंभीर गुन्हे करण्याची देखील प्रवृत्ती दारू पिणाऱ्यात जास्त असते.

दारूबंदीमुळे अबकारी उत्पन्न जाईल असा मुद्दा दारूबंदीविरुद्ध मांडण्यात येतो. हे उत्पन्न वर वर्णन केलेल्या भुर्दंडांच्या मानाने अगदीच क्षुद्र आहे.

दारूचा "एकच प्याला" घेतल्यामुळे आयुष्याची राखरांगोळी होते हे वर्णन जरी अतिरंजित असले तरी पहिला प्याला घेणाऱ्यापैकी १५ टक्के लोकांना दारूची सवय लागते. ही सवय लागलेल्यापैकी पुष्कळ लोक अपघात, गुन्हे, मद्याधीनता व मद्यनष्टता यापासून बचावले तरी न सुटणाऱ्या महाग सवयीमुळे आर्थिक विवंचनेत सापडतात. शिवाय आजकाल नवरा पीत असला तरी बायको पिणार नाही व बायको पीत असली तरी मुले पिणार नाहीत असे शक्य नाही. सगळ्या कुटुंबावर दारूचा खर्च करावा लागणे ही उच्च मध्यम वर्गाला देखील न पेलणारी गोष्ट आहे.

दारूबंदीमुळे बेकायदा व अपायकारक हातभट्टीचा प्रसार होतो असे नेहमी म्हणण्यात येते. पण कोदण्ड राव यांनी हितवादमधील एका लेखात "ओल्या" व "कोरड्या" प्रदेशात किती हातभट्ट्या आहेत याचे आकडे दिले होते. त्यावरून ओल्या प्रदेशातच हातभट्ट्यांचे प्रमाण अधिक असते कारण प्यायची सवय लागल्यावर महागड्या दारूपेक्षा स्वस्त हातभट्टीकडे वळण्याची स्वाभाविकच प्रवृत्ती होते, हे स्पष्ट झाले.

दारूबंदी करणाऱ्या सरकारला निवडणुका जिंकणे कठिण जाते असे सांगण्यात येते. पण नुकतेच आंध्र प्रदेश व तामिळनाडू येथील स्त्रियांनी दारूबंदी रद्द करणाऱ्या



सरकारला सत्तेवरून खाली खेचून या समजुतीचा फोलपणा उघड केला आहे. मुलाबाळांचे पालनपोषण करण्याची सर्व जबाबदारी स्त्रीची, पुरुषाची कमाई व व्यवसायाव्यतिरिक्तचा सर्व वेळ दारू पिण्यासाठी, अशा प्रकारच्या संसारांची संख्या वाढत आहे. वरिष्ठ मध्यम वर्गात देखील बापाच्या दारू पिण्यामुळे ज्यांचे शिक्षण अडचणीत येते अशा मुलामुलींची संख्या वाढत आहे.

"दारूने सुखाचा अनुभव येतो. तो का हिरावून घ्यावा?" असा एक प्रश्न आहे. दारूच्या सुखाची प्रक्रिया तपासली तर या प्रश्नाचे उत्तर मिळते. "दारूमुळे सुख लाभते, ही दारूची सवय लागण्याच्या पूर्वीची अवस्था आहे. पण असे सुख लाभण्यासाठी दारूची जेवढी मात्रा आवश्यक आहे ती सारखी वाढत जाते. अशी मात्रा वाढता वाढता एक अवस्था अशी येते की दारूने सुख लाभत नाही. सुख लाभेल ही लालूच केवळ कामय राहते व त्या अपेक्षेने माणूस दारूची मात्रा वाढवीत जातो. ज्यांना "एकच प्याला" पिऊनही दारूची सवय लागत नाही असे हजारो लोक आहेत. त्यांनी दारू घेतली तर आक्षेप असण्याचा संभव नाही. पण कोट्यवधीच्या समाजात हजारो लोक नगण्य आहेत. त्यांची सोय करण्यासाठी मोजक्या दारूच्या खास परवान्यांची व्यवस्था करता येईल. "एकच प्याला" सुरू करणाऱ्यांपैकी १५ टक्के लोकांना दारूची सवय लागते. समाजातील १५ टक्के ही संख्या प्रचंड आहे. सर्वसाधारण समाजाच्या कल्याणासाठी दारूबंदी आवश्यक आहे.

अशा या हितकारक दारूबंदीच्या विरुद्ध आपले अधिकार वापरून नेहरूंनी समाजाच्या आरोग्याचे व नीतिमत्तेचे मातेरे केले. ज्या प्रांतांनी दारूबंदीचे कायदे केले होते त्यांना नेहरूंनी बजावले "सद्‌गुणसंवर्धक कायदे आस्ते करा." "आस्ते करा" याचा अर्थ "करू नका" असा होतो. कारण कशाला "आस्ते" म्हणायचे व कशाला "घाई" म्हणायची? केंद्र सरकारने दारूबंदी न करून प्रांताचे दारूबंदी करण्याचे काम कठिण करून ठेवले. एका प्रांतात वा जिल्ह्यात दारूबंदी व शेजारच्यात नाही अशा परिस्थितीत दारूबंदी यशस्वी होणे कसे शक्य आहे? एका जिल्ह्यात दारूबंदी करणे राणा प्रतापाची गवतावर निजण्याची प्रतिज्ञा पाळण्यासाठी मेवाडचे राणे गादीच्या खाली गवत ठेवून निजत होते त्यासारखेच आहे.

अशा वातावरणातच वसंतराव नाईकांसारखे मुख्यमंत्री झाले व त्यांनी हजार जनसंख्येमागे एक गुत्ता स्थापन करण्याचा आपला संकल्प जाहीर केला. हजार लोकसंख्येच्या मागे एक गुत्ता केला तर हजार लोकसंख्येसाठी एक गटार उपलब्ध करून देणेही ओघाने आलेच!

बंदीची गोष्ट तर दूरच, नेहरूंच्या वर्तनामुळे दारूला समाजात पूर्वी कधी नव्हती एवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. दारू न पिणाऱ्या पुरुषाला भटजी व स्त्रीला काकूबाई म्हणून हिणविण्याची फॅशन आहे. या हिणविण्याचा बऱ्याच लोकांवर मोठा परिणाम होतो. भारतात एका दारूच्या बाटलीने कोणतेही गुपित विकत घेता येते असे एक अमेरिकन पत्रकार म्हणाला होता. अभ्रष्टतेत भारताचा क्रमांक ९० वा आहे यात आश्चर्य आहे काय? जगाच्या तुलनेने आम्ही असे विक्रम करतो याचे दारू हे एक कारण नाही काय?

## गोवधबंदी

संविधानाच्या आदेशरूप तत्त्वामध्ये गोवधबंदीचाही समावेश होतो. गोवधबंदीबद्दल नेहरूंना अत्यंत घृणा होती. ''गोबरसंस्कृती' या त्यांच्या शब्दात ती व्यक्त झाली आहे. गोवधबंदीची मागणी करण्यासाठी धरणे देऊन बसलेल्या एका म्हाताऱ्या साधूला ते उचलून फेकत आहेत असे चित्र ऑर्गनायझर या साप्ताहिकात प्रकाशित झाले होते. नेहरूंचा गोवधबंदीवर आक्षेप असावा हे अपेक्षितच होते. ते ''शेवटचे इंग्रज'' असल्यामुळे गोमांस खाणे हा त्याचा हक्कच होता. शिवाय ''गायी खा'' अशी इस्लामची आज्ञा नसली तरी मुस्लिमांना गोवधबंदी नको आहे. शिवाय गायीसारख्या पशूची पूजा करणे नेहरूंना लाजिरवाणे वाटत होते.

गायीची पूजा खरोखरच लाजिरवाणी आहे काय? गायीइतका उपयुक्त पशु दुसरा कोणताही नाही. देशाचा मुख्य आर्थिक व्यवहार जो शेती त्याच्याशी गायीचा अविभाज्य संबंध आहे. आपले भले करणाऱ्या कोणत्याही गोष्टीविषयी आदर वाटणे यात लाजिरवाणे काय आहे? ''गाय हा एक उपयुक्त पशु आहे या पलीकडे तिला महत्त्व देणे अडाणीपणाचे आहे'' असे सावरकरांचे म्हणणे होते. मग याच न्यायाने दसऱ्याच्या दिवशी तरवारीची पूजा करणेही त्यांना आक्षेपार्ह वाटायला हवे. तरवार हे एक उपयुक्त शस्त्र आहे, नव्हे होते. आजच्या लढाईत त्याची उपयुक्तता नष्ट झाली आहे. तरवारीची पूजा ही प्रतीकरूपाने शस्त्रसामर्थ्याची पूजा आहे. त्याचप्रमाणे गायीची पूजा ही समाजोपयोगी जीवनाची प्रतीकरूपाने पूजा आहे. अशा पूजेने समाजाचे नुकसान होते असे सावरकरांचे म्हणणे होते. या मुद्याची चर्चा पुढे केली जाईल.

स्वत:ला मान्य नसलेल्या पण संविधानात प्रविष्ट केलेल्या कोणत्याच कलमाला नेहरूंनी संविधानसभेत विरोध केला नव्हता. सावरकरांनी जसे गोवधबंदीविरुद्धचे आपले विचार उघड बोलून दाखविले तसे नेहरूंनी कधी केले नाही. पण नेहरूंचे



दारूसमर्थक विचार जसे सुशिक्षितात सार्वत्रिक मान्यता पावलेले आहेत तसेच गोवधबंदीचेही झाले आहे. या विचारांचे सार असे-

(१) म्हाताऱ्या गायी पोसण्याचा खर्च भारतासारख्या गरीब देशाला सोसण्यासारखा नाही. (२) गाईसारख्या पशूला देवता मानून तिची पूजा करणे अडाणीपणाचे आहे.

पहिला आक्षेप गोधनाच्या अर्थशास्त्राबद्दल गाढ अज्ञान दाखविणारा आहे. गाय तरुण असते तेव्हा देखील तिच्या दुधापेक्षा तिच्या शेणमूताची किंमत जास्त असते असे पशुपालनतज्ज्ञ सांगतात. गाय म्हातारी होते तेव्हा दूध देईनाशी होते. पण तिचे शेणमूत देणे कधीच बंद होत नाही. इंधन या दृष्टीने १० टन शेणाचे मूल्य १ टन कोळसा व दोन टन लाकूड यांच्या एवढे आहे. शेणाचे मूल्य खत म्हणून यापेक्षाही अधिक आहे. गायीबरोबर बैलाचाही विचार केला पाहिजे. भारतातील शेती, ने आण वगैरेची अधिकांश कामे बैलच करतात. म्हणजे भारतीय उद्योगात बैल हा शक्तिगृहाचे काम करतो. या कामाच्या व्यतिरिक्त गायीप्रमाणेच खत व इंधनाचे उत्पादन तो म्हातारा झाल्यावरही करीत असतो तेव्हा म्हातारी गाय व बैल हा केवळ आर्थिक बोजा आहे ही कल्पनाच निराधार आहे.

''म्हातारी गाय पूर्णपणे निरुपयोगी नसली तरी तिला पोसणे हा केवळ एका भावनेसाठी केलेला निरर्थक खर्च आहे'' असे म्हणणाऱ्यांना गायीच्या मानाने ज्यांची उपयुक्तता शून्य आहे अशा कुत्र्यावर केलेला खर्च कसा चालतो? हा खर्च म्हाताऱ्या गायीवर होणाऱ्या खर्चापेक्षा कमी असतो काय? की इंग्रजही तसा खर्च करतो म्हणून तो आदरणीय ठरतो?

'भाजीपेक्षा गोमांस स्वस्त असते'' असे एक गोवधबंदीचे पुरस्कर्ते मला सांगत होते. कोणत्या प्रतीचे गोमांस व कोणत्या तऱ्हेची भाजी याची त्यांनी तुलना केली ते मला सांगितले नाही. तज्ज्ञाकडे चौकशी करता असे कळले की, गोमांसाचे शौकीन जे कधीही खाणार नाहीत अशा तऱ्हेचे गोमांस भाजीपेक्षा स्वस्त असते.

शहरात गायी पाळण्यास बंदी आहे. पण आपल्या देशातले कायदे मोडण्यासाठीच असल्यामुळे असा कायदा आहे हे देखील बहुतेकांना माहीत नसते. शहरामधून माणसांना रहायला जागा सापडणे कठिण आहे मग गुरांच्या राहण्याची व्यवस्था कशी करणार? त्यामुळे मालक या गायींना मोकाट सोडतात. अर्थात त्यापैकी काही खाटकाने नेल्या तरी हा मालक तक्रार कसा करणार? म्हणजे खाटकालाही गाय फुकटात पडते व तिचे मांसही अर्थात स्वस्तात विकले जाते. हे गोमांस भाजीपेक्षा स्वस्त

असते. यावरून सारेच गोमांस भाजीपेक्षा स्वस्त असते असे म्हणणे चोरीचे सोने, चांदी बाजारातल्या चांदीपेक्षा स्वस्त पडले म्हणून सोने चांदीपेक्षा स्वस्त असते असे म्हणण्यासारखे आहे.

साधारणपणे शाकाहारापेक्षा मांसाहार सोळापट स्वस्त असतो कारण एक शेर मांसाहार निर्माण करण्यासाठी १६ शेराचा शाकाहार खर्च करावा लागतो.

बैलाचा मजूर म्हणून उपयोग फक्त मागासलेल्या देशातच होतो. भारत सदाचाच मागासलेला राहणार नाही. आज ज्या कामासाठी बैलाची आवश्यकता आहे ती सर्व कामे अमेरिकेप्रमाणे ट्रॅक्टर व ट्रक यांनी केली जातील व मग बैलाचा उपयोग आहारासाठी करणे क्रमप्राप्त होईल.

या परिस्थितीत मासाहार टाळायचा असेल तर गायीचे गर्भजलपरीक्षण करून बैलांचा गर्भ जन्माच्या आधीच नष्ट करावा लागेल. बैलांना मुद्दाम धष्टपुष्ट बनवून मग त्यांची कत्तल करण्यापेक्षा हे जास्त सुसंस्कृतपणाचे होईल.

मांसाहाराबद्दल एक विचित्र युक्तिवाद मी सैन्याच्या भोजनगृहात ऐकला. ''पशूंना मारून खाल्ले नाही तर ते मानवाला लागणारे अन्नच खातात. त्यामुळे मांसाहार आर्थिक दृष्ट्या आवश्यक आहे'' असा तो युक्तिवाद आहे. उंदीर खाऊन जगणाऱ्यांनी असा युक्तिवाद केला तर तो बरोबर ठरेल. कारण कोणताही प्रयत्न न करता उंदरांची संख्या वाढते व उंदीर खाणारे लोक स्वत:चे पोट भरण्याबरोबरच समाजावरील भार हलका करीत असतात. बिहारमध्ये मूछहर नावाचे लोक आहेत. ते उंदरांना हातानेच पकडून पटकून मारतात व खातात. एखाद्या भागातले उंदीर संपवायचे असतील तर त्यांना पैसे देऊन बोलावले जाते. म्हणजे भोजनाचे आमंत्रण देऊन वर दक्षिणाही पदरात पडण्याचा हा प्रकार आहे.

मांसाहार करणारे लोक उंदीर पसंत करीत नाहीत. त्यांना गाय, बैल, बोकड, कोंबड्या वगैरे पाहिजेत. या सर्वांची संख्या प्रयत्नपूर्वक वाढवावी लागते. निसर्गत:च जन्माला येणाऱ्या कोंबड्यांनी कोंबड्यांची मागणी पुरी करता येऊ शकत नाही. ज्याप्रमाणे नैसर्गिकरीत्या उगविणारे धान्य खाऊन पोट भरता येणार नाही, त्यासाठी शेती करावी लागते त्याचप्रमाणे मांसाहारासाठी पशूंची शेती करावी लागते. याला Animal Husbandry म्हणतात.

गोमांस खाण्याची प्रथा सार्वत्रिक झाल्याने म्हाताऱ्या गायींचे ओझे बाळगावे लागणार नाही असे म्हणणारे लोक समजतात की गोमांस खाणारे फक्त म्हाताऱ्या निरुपयोगी गायीच मारून खातात. ते हे विसरतात की म्हाताऱ्या गायी जशा इतर



कामासाठी निरुपयोगी असतात त्याचप्रमाणे त्या आहारासाठी देखील निरुपयोगी असतात. गोमांसाचा शौक करणाऱ्याला लुसलुशीत असे वासरांचे मांस पाहिजे असते. त्यांना तरण्याताठ्या गायी देखील चालत नाहीत. वासरे खाणे ही संस्कृती आहे असे ज्यांना वाटत असेल त्यांना शिशुभक्षण ही संस्कृती का वाटू नये? कुणाच्याही आहाराचे नियमन करणारे कायदे नसावेत असे एक पुरोगामी तत्त्व आहे. मग नरमांसभक्षण हा गुन्हा ठरविण्यात येऊ नये काय?

मांसाहाराचे समर्थन करणारे किती खोटे बोलू शकतात याला सीमा नाही. पशूंना सुखदु:खाची संवेदनाच नसते असे काही मांसाहारी लोकांच्या तोंडी मी ऐकले आहे. सुई टोचली तर माणसाप्रमाणेच पशू देखील आक्रोश करतो हे त्यांनी पाहिले नसेल हे शक्य नाही.

मानव व अमानव प्राण्यात फरक केला पाहिजे हे खरे. पण जेव्हा ''मानव खावा की अमानव खावा?'' असा विकल्प असेल तेव्हा. असा विकल्प नाही. ज्याला सुखदु:खसंवेदना आहेत अशा पशूंची खाण्यासाठी हत्या करू नये हे तत्त्व ''सर्वे न: सुखिन: सन्तु'' हे नीतितत्त्व मानले तर अबाधित ठरते.

शाकाहार हे अपुरे अन्न आहे. कारण त्यात शरीराला आवश्यक अशी काही आम्ले नसतात असे नेहमी सांगण्यात येते. असे काही असते तर शुद्ध शाकाहार करणाऱ्या लोकांच्या शरीरात काही कमतरता आढळली असती. पण पोटात अन्नाचा कण नसेल व तोंडात खाल्लेल्या अन्नाचे कण राहिले नसतील तर माणसाची वैद्यकीय तपासणी करून तो शाकाहारी की मांसाहारी हे कळणे अशक्य असते. वैद्यकीय तपासणीने जीवनसत्त्वांची, प्रथिनांची, धातूची वगैरे कमतरता ओळखता येते. पण ही कमतरता मांसाहारी लोकातही आढळते. शाकाहारी लोकात ती जास्त आढळते असे कुठेही दिसून आले नाही. शाकाहार हा जर स्वभावत:च अपुरा आहार असता तर सगळ्याच शाकाहाऱ्यात अशी कमतरता आढळायला पाहिजे. काही शाकाहाऱ्यातच ती आढळते असे होणारच नाही. जी तत्त्वे शाकाहारात नाहीतच ती शुद्ध शाकाहार करणाऱ्या एकाही माणसात दिसू शकणार नाहीत. शरीरात अन्नात नसलेली काही द्रव्ये निर्माण करण्याची शक्ति आहे असे म्हणून या अडचणीतून सुटून जाता येणार नाही. कारण असे असेल तर ही द्रव्ये अन्नातून घेण्याची जरूर नाही असे ठरेल.

शाकाहाराबद्दल हल्ली श्रीमती मेनका गांधी यांनी दूरदर्शनवर चांगली भाषणे दिली आहेत. त्यांचे विचार पुस्तकरूपाने देखील प्रकाशित झाले आहेत.

■ ■ ■

नेहरू आणि नेहरूवाद

# देशद्रोह हा मूलभूत अधिकार!

भारत हे राष्ट्रच नाही एवढेच म्हणून नेहरू थांबले नाहीत तर देशात ज्या ज्या ऐक्यवर्धक प्रणाली होत्या त्या सर्वांवर शस्त्र धरून भारत हा त्यांच्या कल्पनेप्रमाणे ज्यात कोणतेही एकतेचे तत्त्व नाही असा एक भूभाग बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भारत हे राष्ट्रच नसल्यामुळे त्यांच्या मते भारतात राष्ट्रद्रोह अशी काही चीज असू शकत नाही. म्हणून देखील राष्ट्रद्रोही उठावाकडे सहानुभूतिपूर्वक पाहण्याची नेहरूंची भूमिका होती.

भारताच्या सर्व प्रांतात कुठे ना कुठे वनवासी राहतात. 'त्यांना आदिवासी असे नाव मिशनऱ्यांनी दिले आहे. इतर हिंदू भारताच्या बाहेरून आले व हे वनवासी आधीपासून भारताचे रहिवासी होते असे सुचविण्याचा या नामकरणाचा हेतू आहे. या मिशनरी कल्पनेला काडीचाही आधार नाही.

या वनवासींपैकी ज्यांचे नाव सर्वात जास्त ऐकू येते ते नागा होत. नागा हे नाव नग म्हणजे पर्वत यापासून आले आहे. कारण ते डोंगराळ प्रदेशात राहतात. नागपूजक याअर्थीही नागा शब्द असू शकतो. पण आसामातले नागा नागपूजक नाहीत. ऋग्वेदातील काही सूक्तांचे द्रष्टे नाग होते. लव, कुश, मेघनाद, यदु, उग्रसेन अशा राजपुरुषांच्या राण्या नाग होत्या. अर्जुनाच्या उलूपी व चित्रांगदा या स्त्रिया नागवंशीय होत्या.

मिशनऱ्यांनी रचलेल्या आर्य/अनार्य संघर्षाच्या भाकडकथेत आर्य व नागा



संघर्षही वर्णिले आहेत. या भाकडकथा विश्वकोशासारख्या ग्रंथातूनही प्रमाण न देता उल्लेखिल्या आहेत. कोणत्याही प्राचीन वाङ्मयात असे संघर्ष वर्णिलेले नाहीत. नागांना शेष भारताबद्दल काहीही प्रेम नाही असा प्रवाद मिशनऱ्यांची पोपटपंची करणाऱ्या नेहरूंनी पसरविला. तो ख्रिस्ती झालेल्या नागापुरताच खरा आहे. राणी गिडेलोसारख्या हिंदू नागांना हा आरोप लागू होत नाही. नागांचा धर्म जडपदार्थात देखील आत्मा आहे असे सांगतो. एवढ्यावरून ते हिंदू नाहीत असा मिशनरी प्रचार आहे. पण सर्वाभूती आत्मा आहे असे मानणाऱ्या हिंदू धर्माचे देखील असेच तत्त्व आहे. पॅनथीइझम म्हणजे विश्वातली कोणतीही वस्तू ईश्वररूप आहे ही कल्पना सारेच विश्व जीवात्मक आहे या कल्पनेला पोषक आहे. नागा आत्मा अमर मानतात पण हा आत्मा निवाड्याच्या दिवसापर्यंत झोपून राहतो व त्या दिवशी ईश्वर त्यांना उठवितो अशी त्यांच्यात कोठेही कल्पना नाही. अर्थात नागांची आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना ही अखिल भारतात स्वत:ला हिंदू म्हणण्यास तयार नसलेल्या पण भारतातच निर्माण झालेल्या धर्मपथांतही असलेल्या पुनर्जन्माचीच कल्पना आहे असे समजण्यास काहीच हरकत नाही. नागा इतर हिंदूप्रमाणेच अनेकदेवतावादी व मूर्तिपूजक आहेत.

नागात अनेक बोली असल्यामुळे एकमेकात बोलण्यासाठी नागा हिंदी व आसामी या भाषांचा प्रयोग करीत. हिंदी हा अखिल भारतीयत्वाचा एक मोठा आधार आहे. नागा आसामीचाही प्रयोग करीत यावरून आसामभाषी प्रांत स्थापित झाला असता तर त्यांना त्यात सामावून घेणे फारसे कठिण नव्हते असे म्हणता येते. शिवाय नागात अनेक पोटभेद आहेत, त्यांचे आपसात काही उजू नाही. त्यामुळे सर्व नागांची भारतीय राष्ट्रीयत्वाविरुद्ध एकजूट होण्याचा सम्भव कधीच नव्हता.

स्वराज्य झाले तेव्हा नागभूमीमध्ये अवघे २०० ख्रिस्ती होते असे आसामचे प्रसिद्ध पुढारी शास्त्री यांनी सांगितले होते. बव्हंश नागा ख्रिस्ती झाले होते असे विश्वकोश सांगतो. ती १९४७ ची परिस्थिती नाही, ती नेहरूकारकीर्द सतरा वर्षे चालल्यानंतरची परिस्थिती आहे.

सारांश १९४७ साली नागासमस्याच अस्तित्वात नव्हती. ती इतर समस्याप्रमाणेच नेहरूंनी निर्माण केली.

नेहरूंच्या उत्तेजनाने नागभूमीमध्ये मिशनऱ्यांचा सुळसुळाट झाला. मिशनऱ्यांविरुद्ध आघाडी उघडू इच्छिणाऱ्या संस्थांना नागभूमीमध्ये प्रवेश मिळविणे कठिण होते अशी त्यांची तक्रार होती. नेहरूंनी आपल्या सल्लागारात राणी गिडेलोसारख्या कोणत्याही हिंदू नागाला स्थान दिले नव्हते. त्यांचे सल्लागार मुख्यत:

मिशनरी होते. यात फादर एल्विनचे नाव प्रसिद्ध आहे. मिशनऱ्यांनी नागभूमीचे शिक्षण इतर ठिकाणच्या प्रमाणेच हातात घेतले होते व "तुम्ही हिंदू नाही, हिंदूंनी तुमच्यावर अत्याचार केले आहेत. नागालँड हे आशियातील एक स्वतंत्र ख्रिस्ती राष्ट्र होऊ शकते" असे नागांना शिकविले. मिशनऱ्यांनी नागभूमीतील पाद्र्यांना एक परिपत्र पाठविले होते. त्यात "५ एप्रिल हा नागा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळावा" असे आवाहन केले होते. खुनाचे आरोप असलेला नागा पुढारी पिझो याचे स्कॉट नावाच्या मिशनऱ्यांशी घनिष्ठ संबंध होते. हा स्कॉट नेहरूंच्या मर्जीतला होता. ख्रिस्ती झालेल्या नागांनी पाकिस्तानशीदेखील जवळीक साधली होती.

नेहरूंना हिंदू/हिंदी वगैरेबद्दल द्वेष होताच. त्यामुळे नागालँडमधून हिंदू धर्माचे व हिंदीचे उच्चाटन करण्यास त्यांनी मिशनऱ्यांना साथ दिली. काही लाख हिंदू येशूच्या कळपात घातले तर ख्रिस्ती देश आपल्याला आपला पुढारी समजतील अशी त्यांना आशा होती. पुढे भाषावर प्रांतरचनेच्या वेळी "नागा हे आसामी भाषेच्या विरुद्ध असून त्यांची भाषा इंग्रजी व लिपी रोमन आहे म्हणून त्यांच्यावर आसामी वा हिंदी "लादणे" योग्य नाही. त्यांचा समावेश आसामात होऊ शकत नाही" असा नेहरूंनी प्रचार केला. शिवाय "वनवासींच्या भाषा, धर्म व लिपी यांचे रक्षण केले पाहिजे." म्हणून नागांच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी नेहरूंनी त्याच्या ख्रिस्तीकरणास उत्तेजन दिले व भाषेचे आणि लिपीचे रक्षण करण्यासाठी त्यांना इंग्रजीभाषी व रोमनवाचक बनविले! "नागांच्या भाषा नागरी लिपीत लिहाव्यात असे माझे मत आहे. पण मी काय करू? नागांची लिपी रोमन आहे. त्यांच्यावर नागरी लादणे योग्य नाही." असा नेहरूंनी लोकसभेत कांगावा केला.

युद्धकाली कोहीमा येथून जपान्यांना हाकून लावण्यासाठी ब्रिटिशांनी नागांची मदत घेतली होती. त्यावेळची शस्त्रास्त्रे नागाजवळ होती. ती घेऊन नागांनी भारताविरुद्ध बंड उभारले. नेहरूंनी सैन्याला प्रभावी उपाय योजू दिले नाहीत. "नागांना जंगलात कोंडण्याचा प्रयत्न करू नका, त्यांच्याविरुद्ध मशीनगन्स व विमाने वापरू नका, तुमच्यावर हल्ला झाल्याशिवाय हल्ला करू नका." म्हणून सैन्याचे हात बांधून ठेवले व बाकीच्या भारतात "नागांचे बंड सैन्याला आवरता येत नाही. त्यांचे राजकीय समाधान केले पाहिजे." म्हणून कांगावा केला.

नेहरूंनी नागभूमीच्या गव्हर्नरला एक पत्र लिहिले. ते असे-

नागा हे आपल्या स्वातंत्र्यासाठी लढणारे आदर्शवादी आहेत. ते गुन्हेगार नाहीत. त्यांच्याशी गुन्हेगारासारखे वर्तन करू नये. त्यांना साधारणपणे माफीच द्यावी, फारच मोठे गुन्हे घडले असतील तर ते नागा कौन्सिलकडे वर्ग करावे. (पोलिसांकडे नव्हे. लष्करी



न्यायासनापुढे तर नव्हेच नव्हे. ही ठिकाणे फक्त हिंदूंचा न्याय करण्यासाठी आहेत.)

दुसऱ्या शब्दात एखाद्याला भारताविरुद्ध बंड करायचे असेल तर त्याने "मी हिंदू नाही" असे जाहीर करावे म्हणजे तो ध्येयवादी म्हणून पूजला जाईल. पंजाबातील खालिस्तानची चळवळ ही अशा धोरणातूनच उद्‌भवलेली आहे. हिंदू नसल्याने जर आपोआप राष्ट्रीयत्व बदलते तर खालिस्तानीही तसेच म्हणत होते मग त्यांना नागासारखे विशेषाधिकार का नसावेत?

नेहरूंनी नागांचा न्याय खालिस्तान्यांना लावला नाही याचे कारण खालिस्तानी स्वत:ला हिंदू म्हणवत नसले तरी ख्रिस्ती वा मुसलमान देखील म्हणवत नाहीत. त्यांची मुळे गुरु नानक व इतर गुरु यांच्या वाङ्मयात म्हणजे पूर्णपणे भारतात आहेत. तेव्हा त्यांनी "आम्ही हिंदू नाही" असे कितीही म्हटले तरी ते शेवटी हिंदूंच्या "गोबरसंस्कृतीचे" एतद्देशीयच ना? ते ख्रिस्ती व मुसलमान यांच्यासारखे इंग्रजी व अरबी संस्कृतीचे "आंतरराष्ट्रीय" थोडेच होणार!

हाच दृष्टीकोन तमिळ राष्ट्रवादाला लागू होता. नेहरूंनी एकदा तमिळांविरुद्ध गर्जना केली होती की "फुटीरपणाची भाषा कराल तर युद्धाला तयार राहावे लागेल." असे ते नागांना कधीच म्हणाले नाहीत. कारण तमिळांनी कितीही "आम्ही हिंदू नाही" म्हटले तरी ते तिरुक्कुरल, मणिमेकले व शिलप्पाधिकारम यांच्याकडेच पाहणार ना? आणि हे सर्व वेद आणि अश्वमेध यांच्याच म्हणजे "गोबरसंस्कृतीच्याच" गोष्टी करणार! त्यांना इंग्रजीभक्त ख्रिस्ती नागांची सर येणार आहे काय?

नेहरू हिंदूंना तुच्छ मानत होते याचे कारण हिंदू त्यांची पूजा करीत होते व त्यांच्या पायावर लोटांगण घालीत होते. म्हणजे हिंदूंशी नेहरूंचे असलेले संबंध गुलामाचे व मालकाचे होते. मालकाला गुलामाबाद्दल तुच्छतेशिवाय काही वाटते काय?

नेहरूंनी उघडपणेच साऱ्या नागांच्या सर्व देशविरोधी कृत्यांना माफी जाहीर केली व त्यांच्याविरुद्धची सारी सैनिक कारवाई बंद केली. याबद्दल त्यांनी स्वत:चीच पाठ थोपटून घेतली.

"जगातील दुसरा कोणताही राज्यकर्ता बंडखोरांशी एवढ्या प्रेमळपणे वागत नाही" या एका वाक्यात नेहरूंनी आपल्या साऱ्या वागण्याच्या मागची प्रेरणा कोणती हे स्पष्ट केले आहे. त्यांना जगातला सर्वश्रेष्ठ पुरुष म्हणून घ्यायचे होते.

बाकी सर्व राज्यकर्त्यांना आपण आपल्या देशाच्या हिताचे रक्षक आहोत ही जाणीव असते. भारताचेच दुर्दैव असे की त्याच्या राज्यकर्त्यांना भारताचे हितसंबंध हे आपली जागतिक प्रतिमा उजळण्यासाठी वापरता येण्यासारखे भांडवल वाटत होते.

नेहरूंचे भाट गोपाल यांनाही हे ''अति झाले'' असे वाटले. ते लिहितात- ''भारतीय सैनिक केवळ उभे आहेत व अवघ्या १५० सशस्त्र नागांच्या हातात नागभूमीतले सर्व उपक्रम आहेत हे भारताच्या दुबळेपणाचे प्रदर्शनच वाटले.''

नागामध्ये अनेक गट असल्यामुळे राजकीय बाबतीत देखील त्याच्यात एकमत होण्याचा संभव नव्हता व भारतापासूनची विमुक्ततेची मागणी ही मुळातच नेहरूनिर्मित असल्यामुळे तिने फारसा जोर धरला नाही व बहुतेक नागा १९५७ साली कोहिमात नागा प्रजापरिषदेला हजर झाले.

१९६२ मध्ये लोकसभेने तेरावे संशोधन विधेयक मान्य केले. त्या अनुसार धर्म, सामाजिक चालीरीती, जमातींच्या न्यायपद्धती, प्रादेशिक स्वायत्तता, याबाबतीत नागांच्या प्रदेशाला अभिरक्षण देण्यात आले व ''नागांच्या इच्छेने'' म्हणजे १९४७ नंतर ख्रिस्ती झालेल्या नागांच्या व नेहरूंच्या इच्छेने या प्रांताचे नाव नागालँड ठेवण्यात आले. याप्रकारे ४ लक्ष वसतीचे व ५ लक्ष उत्पन्नाचे हे स्वतंत्र राज्य आसामच्या पोटात अवतीर्ण झाले. अशीच अर्धा डझन राज्ये आसामच्या पोटात नेहरूंनी निर्माण केली व आसामचे शकलीकरण केले. मात्र नागांची स्वतंत्र संस्कृती टिकविण्याच्या या प्रयत्नात मिशनऱ्यांना नागांचे आंग्लीकरण करण्यास बंदी नाही. ''वनवासी, भारताच्या विशाल जनसागरात लुप्त होऊ नयेत'' एवढीच नेहरूंना काळजी होती. स्पष्ट शब्दात सांगायचे म्हणजे भारतातले शक्य तितके समूह त्यांना भारतीय एकत्वातून फोडून त्यांना ख्रिस्ती, इस्लामी वा कम्युनिस्ट साज चढवायचे होते.

आता काश्मीरप्रमाणेच नागालँडमध्ये भारताचा कायदा चालत नाही. नागा भारतात राहिला तरी त्याला भारतीय कर म्हणून आयकर द्यावा लागत नाही, तो भारतात राहू शकतो पण बिगर नागा नागभूमीत वसती करू शकत नाही.

ज्या मिशनरी कारवायांनी नागालँड निर्माण केले त्याच भारताचे ख्रिस्तीलॅण्ड देखील बनवू शकतात म्हणून तत्कालीन मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री रविशंकर शुक्ल यांनी मिशनऱ्यांच्या करवायांची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमली. या चौकशीसमितीने मिशनऱ्यांच्या कारवायावर चांगला प्रकाश टाकला.

यामुळे रविशंकर शुक्ल व न्या. मू. नियोगी यांच्यावर नेहरूंचा रोष झाला. पुढे नेहरूंनी रविशंकर शुक्लांना गचांडी दिली याचे कारण ते भ्रष्ट होते असे देण्यात येते. रविशंकर शुक्लांवर भ्रष्टतेचे आरोप लागूच होत नव्हते असे म्हणता येणार नाही, पण नेहरूंच्या प्रिय पात्रापैकी कोण भ्रष्ट नव्हते? कृष्ण मेनन, के. डी. मालवीय, एम. ओ.



मथाई, तेजा व प्रतापसिंग कैरो हे धुतल्या तांदळासारखे होते काय?

## तेलंगणा

ख्रिश्चन व मुस्लिम या आंतरराष्ट्रीय विचारसरणीप्रमाणेच कम्युनिझम ही तिसरी आंतरराष्ट्रीय विचारसरणी आहे. त्यामुळे कम्युनिस्टप्रेरित देशद्रोहाचा पाठपुरावा केल्याने आपली आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळेल असे नेहरूंना वाटत होते. हे तेलंगणा बंडाच्या वेळी स्पष्ट झाले. नागा हे ''आम्हाला केंद्र सरकारपासून स्वतंत्र व्हायचे आहे'' एवढेच म्हणत होते. आम्हाला केंद्र सरकार नष्ट करून तेथे दुसऱ्या एखाद्या देशाची सत्ता स्थापित करायची आहे असे म्हणत नव्हते. पण तेलंगणातील बंडखोर लोकशाही पद्धतीने लोकांनी निवडून दिलेले सरकारच आम्हाला मान्य नाही एवढेच नव्हे तर लोकशाहीच मान्य नाही म्हणून सरकारच नष्ट करायला उठले होते. त्यांची निष्ठा कोणत्याही भारतीय तत्त्वाशी वा समूहाशी नसून कम्युनिस्ट राष्ट्राशी होती. आश्चर्याची गोष्ट अशी की, स्वत: नेहरूच ज्या सरकारचे प्रमुख होते तेच सरकार भांडवलशाही आहे व त्याचे उच्चाटन केले पाहिजे असे म्हणणारे लोकही नेहरूंना आदर्शवादी वाटत होते. आंध्रप्रदेशातील तेलंगणा प्रदेशात झालेले बंड हे कम्युनिस्टांचे बंड होते व भारत सरकारचे उच्चाटन करण्यासाठी रशियाची मदत घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. पण शस्त्रसज्ज भारत सरकार समोर त्याला यश मिळण्याचा काहीच संभव नसल्यामुळे स्टॅलिनने त्यांना ''बंड करू नका'' असा सल्ला दिला होता अशी त्या वेळची माहिती होती. अशा तऱ्हेच्या गोष्टी उघडपणे कोणी करीत नसल्यामुळे त्याबद्दल पुरावा देणे शक्य नसते. पण या बंडाशी सहानुभूती असणारे लोक असे सांगत असत.

आंधप्रदेशात या बंडाचा मुख्य प्रभाव असला तरी त्रावणकोर, कोचीन, त्रिपुरा, मणिपूर, मलबार, बंगाल, बिहार, पूर्व उत्तर प्रदेश व महाराष्ट्र येथे देखील त्याचे प्रतिध्वनी उमटले होते.

हैदराबादमध्ये बंड करणारे तेथील रझाकारांना सामील झाले होते व त्यांनी भारतीय सैन्याशी झटापटी केल्या होत्या. हे कम्युनिस्ट म्हणत, ''सरदार पटेलांचे सैन्य काँग्रेस पक्षाच्या बुर्झ्वा सरंजामशाही सरकारचे व हैदराबादच्या निझामाचे लोकशाही क्रांतीच्या वाढत्या बळापासून रक्षण करायला आलेले आहे.''

कम्युनिस्टांचे वक्तव्य केवळ व्याकरणाच्या दृष्टीने बरोबर असलेल्या पण ज्यातून काहीही अर्थ काढता येत नाही अशा वाक्यांचे बनलेले असते याचे हे एक उदाहरण आहे. पण अशा वाक्यात देखील पं. नेहरूंना आदर्शवाद दिसत होता.

या कम्युनिस्टांनी रेल्वे यंत्रणेत संप करवून साऱ्या दळणवळणाची वाताहत करण्याचा प्रयत्न केला. नेहरू संघाला शिव्या देण्यासाठी त्याला फॅसिस्ट म्हणत. उलट तेलंगणातले बंडखोर खुद्द नेहरूंचेच वर्णन "अमेरिकन पुंजीपतींच्या स्वार्थासाठी कामगारांच्या हिताचा होम करणारा फॅसिस्ट" असे करीत. पाम दत्तने जेव्हा पाहिले की नेहरू हे कम्युनिस्ट सहप्रवासीच आहेत तेव्हाच त्याने "हा उठाव मागे घ्यावा" असा सल्ला दिला. ही गोष्ट तीन वर्षानंतर झाली.

नेहरूंची या उठावाकडे पाहण्याची दृष्टी लक्षात घेण्यासारखी आहे. ते म्हणाले की "काही गुन्हे घडले असतील. पण त्याचा समाचार नेहमीच्या कायद्याप्रमाणे घ्यावा. म्हणजे एका खटल्याचा निकाल लागण्यास दहादहा वर्षे जाऊ द्यावी. ज्यांना सजा झाल्या त्यांच्या सजा माफ करविण्यासाठी नेहरूंनी आपले वजन खर्च केले. या बंडात भाग घेणाऱ्या एकालाही फासावर चढावे लागल्याचे ऐकिवात नाही. यावेळी कम्युनिस्टविरोधाबद्दल प्रसिद्ध असणारे राजगोपालाचारी हे गव्हर्नर जनरल होते. त्यांनी सांगितले की, "जे परकीय म्हणजे मुख्यत:-रशियन या बंडखोरांना साथ देतात त्यांना देशाबाहेर हाकून दिले पाहिजे." नेहरूंनी या सूचनेला कसून विरोध केला.

ब्रिटिश काळात अशा तऱ्हेच्या बंडांचा उपशम सैनिक न्यायाची द्वाही फिरवून होत असे. सैनिक न्यायात प्रत्येक व्यक्तीविरुद्ध वेगळा पुरावा शोधण्याची आवश्यकता नसते. बंडात सामील असण्याचा पुरावा मिळाला की अंतिम शासनास गुन्हेगार पात्र ठरत असे. बंडाच्या आरोपावरून हजारो हूरांना झाडावर टांगण्यात आले होते. त्यामुळे हूराचे बंड एका आठवड्यात संपले. मोपल्याचे बंड असेच गुरखा सैनिक पाठवून व मोपल्याचे गटचे गट कोठड्यात गुदमरण्यास कोंबून मोडून काढण्यात आले होते. स्वराज्यात देखील खालिस्तानी अत्याचारांचा उपद्रव सैनिक न्यायानेच मोडून काढण्यात आला होता. नाहीतर आजच्या नक्षलवादी बंडासारख्याच या कायमच्या पोटदुख्या होऊन बसल्या असत्या.

## गोवामुक्तीनंतर

गोवामुक्तीनंतर "गोवा महाराष्ट्रात विलीन करण्यात यावा" या मागणीने जोर धरला. गोव्यातील कोकणी ही मराठीची बोली आहे असे एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकात लिहिले आहे. इतर सर्व बाबतीत या एन्सायक्लोपीडियाचे मत ग्राह्य मानणाऱ्या नेहरूंना हे मत मात्र ग्राह्य झाले नाही. गोव्यात महाराष्ट्रवादी गोमांतक पक्ष वारंवार निवडणुका जिंकून सत्तेवर आला यावरून गोव्यातील जनतेला महाराष्ट्रात विलीन व्हायचे होते हे स्पष्ट आहे. गोव्यात कोकणीचा उपयोग फक्त घरात असे,



शिक्षणात सर्वत्र मराठीचाच उपयोग होत होता. नेहरूंचे म्हणणे असे होते की "गोव्याची संस्कृती पोर्तुगीज आहे व गोवा महाराष्ट्रात विलीन केला तर मराठी संस्कती पोर्तुगीज संस्कृतीला खाऊन टाकील." ख्रिस्ती संस्कृतीने नागांची संस्कृती गिळंकृत करावी म्हणून प्रयत्न करणाऱ्या नेहरूंना गोव्याला आपल्या पुरातन संस्कृतीपासून बळजबरी व फसवणूक यांनी तोडून टाकणाऱ्या पोर्तुगीज सत्तेचा अस्त झाल्यावर गोव्याच्या मराठी लोकांनी आपल्या मूळच्या संस्कृतीकडे परतणे विचित्र वाटत होते. नेहरूंच्या मते पांदीचरीची संस्कृती फ्रेंच, गोव्याची पोर्तुगीज व बाकीच्या भारताची इंग्रजी आहे. "हिंदू ही कोणाची संस्कृती आहे?" असे विचारले तर "या प्राण्याचे नाव आम्ही पूर्वी कधी ऐकले नाही."

गोव्यात संस्कृती धर्मावर आधारित आहे. पोर्तुगीज संस्कृतीचे उत्तराधिकारी गोव्यातील ख्रिस्ती होत असे नेहरूंचे म्हणणे होते. वस्तुत: गोवामुक्तीनंतर आता आपण आपल्या पुरातन संस्कृतीकडे परतले पाहिजे असे गोव्यातील ख्रिस्त्यांना वाटू लागले व हेन्री विश्वनाथचा नुसता विश्वनाथ झाला. पण नेहरू व त्यांची काँग्रेस यांनी याविरुद्ध जोराचा प्रचार केला. पुढे महाराष्ट्रात विलीन व्हायचे की नाही याबद्दल गोव्यात जनमत घेण्यात आले तेव्हा काँग्रेसने हिरिरीने गोव्याची संस्कृती पोर्तुगीज आहे व त्याने महाराष्ट्रात विलीन होऊ नये म्हणून प्रचार केला. परिणामत: गोवा महाराष्ट्रात विलीन होऊ शकला नाही व भारतीय राष्ट्रीयत्वाच्या प्रधान स्रोताच्या बाहेर राहू इच्छिणारा एक मोठा समूह निर्माण केला गेला.

नेहरूंनी हिंदू राष्ट्र हा शब्दप्रयोग वापरणे अशक्यच होते. पण "भारतीय राष्ट्रीयत्वाचा मुख्य स्रोत" असा शब्दप्रयोग देखील कधी केला नाही. असे असून देखील "अहिंदू म्हणविणारे सगळे अल्पसंख्य, हिंदूंना केंद्र सरकारने पारित केलेला कोणताही कायदा लागू करायला हरकत नाही पण अहिंदूंनी तो लागू करणे हा अल्पसंख्यांच्या स्वायत्ततेवर घाला आहे. नागा हे हिंदू नसल्यामुळे त्यांनी भारतापासून स्वतंत्र होण्याची मागणी करणे रास्त आहे" वगैरे विचार त्यांच्या डोक्यात ठाम होते. "हिंदू हे जर राष्ट्रच नाही तर अहिंदू हे अल्पसंख्य कसे?" हा विचार त्यांच्या मनात आलाच नाही. अल्पसंख्य या शब्दाचा अर्थच "राष्ट्रीयत्वाच्या मुख्य स्रोताच्या बाहेरचे" असा होतो. हिंदू समाज एकसंध मानला नाही तर ब्राह्मणांना अल्पसंख्य का म्हणू नये?

■ ■ ■

# समाजसुधारणा की समाजद्रोह?

## जातिभेदाविरुद्ध अकांडतांडव

संविधानसभेची उद्दिष्टे सांगणाऱ्या ठरावाचा मसुदा नेहरूंनी तयार केला होता. या मसुद्यात अल्पसंख्य, मागासलेल्या जाती, मागासलेले वर्ग व अन्य टोळ्या वगैरेंचा उल्लेख आहे. समाजातल्या एखाद्या वर्गाला अल्पसंख्य म्हणावे की नाही हे त्यांच्या संख्येवरून ठरविले जाते, असे अल्पसंख्य या शब्दावरून वाटते. पण असे नाही. तसे असते तर ब्राह्मणांना अल्पसंख्य म्हणता आले असते. तसेच मागासलेल्या म्हणजे अर्थार्जनाच्या बाबतीत असमर्थ असलेल्या, अशिक्षित व कमी आयुर्मानाच्या असा अर्थ असायला पाहिजे. कारण संयुक्त राष्ट्रांच्या मते या तीन गोष्टीच विकासाचे मानदंड म्हणून वापरलेल्या आहेत. पण हा मानदंड वापरला तर भिक्षुकांचा वर्ग मागासलेला ठरतो. साधारणपणे भिक्षुक अत्यंत गरीब असतो व विशिष्ट विधींना लागणारे मंत्र अर्थाशिवाय पाठ करणे एवढेच त्यांचे शिक्षण असते. त्याला मातृभाषेची अक्षरे वाचता येतात. पण परंपरेप्रमाणे त्यांची साक्षरता कारकुनी कामास देखील अपुरी असते. ''भिक्षुकाने प्रयत्नपूर्वक लिहिलेले अक्षर देखील वाचणे कठिण असते.'' असे चाणक्य मुद्राराक्षसात म्हणतो. विकासाचा तिसरा निकष आयुर्मान हा आहे. पण भारतात ''कोणत्याही मागासलेल्या वर्गाचे आयुर्मान किती आहे?'' या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही. नेहरूंनी



जातिवार शिरगणती करण्यास मनाई केली होती व त्यामुळे जातीबद्दलचे सत्य कळणेच अशक्य झाले आहे. कोणत्या जातीची आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थिती काय आहे याचे आकडे उपलब्धच नाहीत. सत्य काय आहे हे पाहण्यासाठी अवलोकन केले पाहिजे हेच नेहरूंना मान्य नव्हते. त्यांना पूज्य असलेल्या मार्क्सच्या विचारात सर्वेक्षणांना काही महत्त्व नाही. मार्क्सवादी लिखाणात ''भांडवलशाही'', ''सरंजामशाही'' वगैरेबद्दल ठासून विधाने केलेली असतात. पण या अवस्था कोणत्या देशात कोणत्या काळी होत्या व या अवस्थेतील लोकांचे शिक्षण आयुर्मान व उत्पन्न काय होते याबाबतीत काडीचाही पुरावा दिलेला नसतो. कारण अवलोकन हा सत्यज्ञानाचा मार्ग नसून विरोधविकासवादाने सत्याचा साक्षात्कार होतो असे मार्क्सवादी प्रतिपादन आहे. नेहरूंचीही श्रद्धा अशीच होती. एखाद्या वादाचा आश्रय केला की सत्याचे ज्ञान होते. वाद ''पुरोगामी'' असला की ज्ञानच ज्ञान व ''प्रतिगामी'' असला की अज्ञानच अज्ञान!

तात्पर्य विकासाचे मानदंड विचारात न घेताच काही समूहांना पुढारलेले व काहींना मागासलेले ठरविण्यात आले आहे. वन्य टोळ्यांमध्ये समाविष्ट होणारे काही समूह गेल्या काही शतकापासून वनात कधीच राहत नव्हते. गोंड हे याचे उदाहरण आहे. या टोळ्या मागासलेल्या समजल्या जातात पण मागासलेले म्हणणे स्वराज्यापूर्वी गोंडांना आवडत नव्हते. ''आम्ही राज्ये चालविली आहेत,'' ''आम्ही क्षत्रिय आहोत.'' असे ते म्हणत. तेव्हा या वर्गीकरणाला काही आधार नाही. इंग्रजांनी केलेले हे वर्गीकरण स्वराज्य झाल्यावर काटेकोरपणे तपासणे आवश्यक होते. पण हे काम ''शेवटच्या इंग्रजाच्या'' कुवतीबाहेरचे होते. यासाठी हाडाचा राष्ट्रवादीच हवा होता.

स्वराज्यानंतर वरीलप्रमाणे इतके समूह वेगळ्या वागणुकीसाठी पात्र ठरविण्यात आले आहेत की, ते सगळे मिळविल्यास त्यांचीच बहुसंख्या होण्याचा संभव आहे. मंडल अहवालातून बहुधा कोणताच समूह मागासलेपणातून सुटलेला नाही.

असे जर असेल तर भारतात मुळातच लोकशाही लागू नाही असे ठरेल. कारण लोकशाहीचे प्रधान तत्त्व प्रत्येक व्यक्ती एकच मानण्यात यावी, काही व्यक्ती एकाच्याबरोबर, काही अर्ध्याच्या बरोबर तर काही शंभराच्या बरोबर असतील तर लोकशाही लागू होऊ शकणार नाही. लोकशाहीच अप्रस्तुत ठरेल अशा गोष्टी संविधानात घालण्यात नेहरूविचारांचा सिंहाचा वाटा होता.

संविधानसभेत झालेल्या चर्चेनुसार अनुसूचित जातीसाठी आरक्षण १० वर्षांनंतर बंद करण्यात यावे. पण प्रकाश आंबेडकर म्हणतात की, आंबेडकरांनी या सूचनेला दिलेला पाठिंबा फक्त राजकीय आरक्षणाबद्दल होता. सरकारी नोकऱ्यासाठी नाही. पण सभेतील बहुसंख्य सदस्यांचा सूर सर्वच आरक्षणाविरुद्ध होता. आरक्षणाचा उद्देश दुबळ्या

वर्गाला सुधारण्याची संधी देण्याचा आहे. अर्थात् हे वर्ग कधी सुधारणारच नाहीत असे गृहीत धरल्याशिवाय आरक्षण हे संविधानाचे कायमचे अंग असू शकत नाही.

अशी आरक्षणे ब्रिटिशांनी दुबळ्या वर्गाला सुधारण्याची संधी देण्यासाठी केली होती की भारतीय समाजाच्या निरनिराळ्या घटकात कलह माजविण्यासाठी याचाच मुळात विचार व्हायला पाहिजे होता. अनुसूचित जाती शिक्षणात मागासलेल्या आहेत म्हणून त्यांना सरकारी नोकऱ्यात स्थान नव्हते हे खरे असेल तर आरक्षणामुळे त्यांच्यात जास्त शिक्षणाचा प्रसार कसा होणार? शिक्षणामुळे सरकारी नोकऱ्या मिळतात, हे या जातींना आरक्षणामुळे कळले. त्यापूर्वी हे त्यांना माहीत नव्हते असे म्हणता येईल काय? शिकण्याची ऐपत नव्हती म्हणून ते शिक्षणात मागे राहिले असतील तर लायक विद्यार्थ्यांना जातीचा विचार न करता शिष्यवृत्त्या दिल्याने हा प्रश्न सुटू शकला असता. या जातींना अस्पृश्य समजल्यामुळे त्यांना इतरांबरोबर शिक्षण घेणे शक्य होत नाही हे खरे मानले तरी आरक्षणामुळे हा प्रश्न कसा सुटेल? उलट त्यामुळे आपल्या नोकऱ्या हिसकावून घेणारी जात म्हणून या जातीबद्दलचा द्वेष वाढण्याचा संभव नाही काय?

गेल्या पन्नास वर्षात आरक्षणामुळे हरिजन जास्त पुढारले असतील तर आता आरक्षण बंद करावे व पुढारले नसतील तर आरक्षणाला काही समर्थनच उरत नाही. पन्नास वर्षे म्हणजे जवळ जवळ अर्धी आंग्लाई व अर्धी मराठेशाही. तेव्हा हा काल एखाद्या जातीची सुधारणा घडवून आणण्यास अपुरा नाही. अनुसूचित जाती गेल्या पन्नास वर्षात अधिक शिक्षित झाल्या आहेत हे खरे पण त्याचे श्रेय आरक्षणाला नाही. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या सर्वच देशात सर्वच समाजाची शिक्षणात सुधारणा झाली आहे, केवळ अनुसूचित जातीची नव्हे. जी सुधारणा झाली ती आरक्षणामुळे झाली असे म्हणण्यास जागा नाही. उलट आरक्षणामुळे मागासलेपणा हा एक सवलती उपटण्याचा परवाना झाला आहे.

अनुसूचित जातीच्या मागासलेपणाचे कारण अस्पृश्यता हे असू शकते. पण इतर जातीचे काय? त्यांच्या मागासलेपणाला इतर जाती कशा काय जबाबदार आहेत? त्यांना ब्राह्मणांनी मागे ठेवले असा आरोप करण्यात येतो. मूठभर बाह्मणांना साऱ्या समाजाला मागे ठेवण्याचे सामर्थ्य यायला ते सत्ताधारी होते काय? एवढी सत्ता ब्राह्मणांच्या हातात कोणत्या काळी होती? पेशव्यांची सत्ता फक्त पश्चिम महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांवर होती. तीही छत्रपतींचे ते केवळ नोकर न उरता स्वत:च सत्ताधारी झाल्यावर. हा काळ १७५० ते १८१८ म्हणजे अवघ्या ६८ वर्षांचा आहे. शिंदे, होळकर, भोसले वगैरे पेशव्यास जुमानीत नसत. त्यांच्याशी लढाया देखील करीत. तेव्हा इतर जातीच्या मागासलेपणास पेशवे जर कारण असतील तर ते या चार आठ जिल्ह्यापुरते. बाकीच्या



साऱ्या भारताला ते कारण लागू होत नाही. शिवाय १८१८ नंतर तेही कारण संपले व १९४७ पर्यंत म्हणजे जवळपास १३० वर्षे सारी सत्ता इंग्रजांच्या हाती होती. एवढी सत्ता व एवढा काळ या जातींचा मागासलेपणा घालवण्यास पुरेसा नव्हता काय?

मनुस्मृतीने ब्रह्मणशाही हजारो वर्षे आधी सुरू केली त्यामुळे केवळ पेशवाईचा विचार करून चालणार नाही असे म्हणण्याची फॅशन आहे. पण शिवाजीच्या आधी भारतातील सर्वश्रेष्ठ सत्ता मुघलांची व त्यांच्याही पूर्वी तुर्क/अफगाणींची होती. म्हणजे तेराव्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत म्हणजे ५०० वर्षे ब्रह्मण किंवा हिंदूंची कोणतीही जात इतर जातींना मागसलेले ठेवण्याचे कर्म करण्यास समर्थ नव्हती.

तेव्हा इतिहासाचा काहीच आधार नसलेल्या आरोपावर आधारलेली धोरणे इंग्रजांकडून वारशाने आली होती. ती जशीच्या तशी राबविण्याचा निर्बुद्धपणा भारतीय नेते करतील अशी अपेक्षा नव्हती व असा निर्बुद्धपणा त्यांनी केलाही नाही. त्यांनी अस्पृश्यांच्या मागासलेपणाला वरिष्ठ जातींना केवळ ब्राह्मणांनाच नव्हे-जबाबदार धरले पण ब्राह्मणेतराच्या मागासलेपणाबद्दल ब्राह्मणांना जबाबदार धरले नाही. संविधानाने अनुसूचित जातींसाठी आरक्षण मान्य केले असले तरी इतर जातीसाठी केले नाही व मागासलेल्या जाती असा शब्दप्रयोग न करता मागासलेले वर्ग असा शब्दप्रयोग केला आहे. म्हणूनच तमिळनाडू सरकारने जेव्हा ब्राह्मण असण्याच्या कारणावर एका उमेदवाराला नोकरी नाकारली तेव्हा ते कृत्य असंवैधानिक असल्याचा तमिळनाडूच्या उच्च न्यायालयाने निर्णय दिला.

या निर्णयावर टीका करताना नेहरूंनी ''जातीच्या आधारे पक्षपात केला जाणार नाही याचा अर्थ दुबळ्या वर्गाच्या संरक्षणासाठी पक्षपात केला जाणार नाही असा नाही'' असे उद्गार काढले. नेहरूंचा प्रभाव इतका होता की पुढे काही न्यायालयांनी देखील भारताच्या संदर्भात मागासलेले वर्ग याचा अर्थ मागासलेल्या जाती असाच होतो असा निर्णय दिला.

भारतीय समाज हा एक समाज नाही हे अनेक लहान जमातीचे कडबोळे आहे या नेहरूवादी विचारामुळे भारतातील कलह वाढले. पेशवाईत अनुसूचित जातींना ''आपला लोकांना विटाळ होऊ नये'' म्हणून ढोले बडवीत जावे लागे अशी पेशवाईची निंदा करण्यात येते. पण ही चाल पेशव्यांनी सुरू केली नव्हती. उलट नेहरूवादी भारतात अनुसूचित जमातींच्या कत्तली होऊ लागल्या. परजातीच्या लोकांच्या कत्तली करण्यासाठी सेना उभारण्यात आल्या. हे बिहारातील रणबीर सेना व दलित सेना वगैरेंच्या उदाहरणावरून स्पष्ट होईल.

नेहरूंच्या जातिविषयक धोरणांचा त्यांच्या नेहरूवादी उत्तराधिकाऱ्यांनी हिरिरीने पाठपुरावा केला व खालच्यासारखे कायदे पारित केले.

१. अनुसूचित जातीच्या व्यक्तीला गैर अनुसूचित जातीच्या व्यक्तीने जातीवरून शिव्या दिल्या तर गुन्हा होतो. अनुसूचित जातीच्या व्यक्तीने इतर जातीच्या व्यक्तीला जातिविषयक शिवी दिली तर गुन्हा होत नाही.

२. हा गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी अनुसूचित जातीच्या व्यक्तींची नाही. त्याने आरोप केला की आरोपितांवर तो खोटा ठरविण्याची जबाबदारी आहे. फौजदारी कायद्याच्या मूलभूत सिद्धांताचेच हे उल्लंघन आहे. या कायद्याच्या अनर्थामुळे मराठवाड्यात अनुसूचित जाती व बिगर अनुसूचित जाती यांच्यात दंगे माजले.

३. खालील वर्तन अनुसूचित जातीविरुद्ध इतर जातींनी केले असेल तरच गुन्हा होतो. अनुसूचित जातींनी केले असेल तर तो गुन्हा ठरविण्यासाठी दुसरा एखादा कायदा शोधावा लागेल. या कायद्याखाली तो गुन्हा होत नाही.

१. दूषित पदार्थ खाण्यास भाग पाडणे.
२. अंगावर वा अंगाजवळ दूषित पदार्थ फेकणे.
३. विवस्त्र करून धिंड काढणे.
४. अनुसूचित जातीच्या व्यक्तीची जमीन हडप करणे.
५. वेठीस धरणे.
६. अनुसूचित स्त्रियांची छलना करणे.

या कायद्याचा असा अर्थ होतो की अनुसूचित जातीच्या माणसाला इतर जातींच्या माणसाला नग्न करून धिंड काढणे, त्याची जमीन बळकावणे, त्याला वेठीस धरणे वा त्याच्या स्त्रियांची छलना करणे ही कृत्ये करण्याचा परवाना आहे.

आणखी कोणत्याही देशात एवढे घृणास्पद कायदे असतील असे वाटत नाही.

असे कायदे करण्यात वा पटावर राहू देण्यात नेहरूनंतरच्या राजकारण्याचा उद्देश अनुसूचित जातींची गठ्ठा मते मिळविणे हा असतो. नेहरूंना अशी मते मिळविण्याची गरज नव्हती. ते कधी निवडणूक हरण्याचा संभव नव्हता. अर्थात् नेहरूंचा उद्देश भारतातल्या कोणत्याही मतदारवर्गाला खूष करण्याचा नसून, ख्रिस्ती व इस्लाम या दोन धर्मात मुख्यत: विभागलेल्या भारताबाहेरच्या जगाला खूष करणे हा होता. ज्या हिंदू समाजाचा ते द्वेष करीत होते त्यात भांडणे माजावी व त्याला स्वत:त सामील करून घेऊ इच्छिणाऱ्या ख्रिस्ती मिशनरी व इस्लामी तबलीघ यांना नेहरूंचे धोरण भारत हा कधीच हिंदुस्थान होऊ नये ही आपली मनीषा पूर्ण होण्यास साहाय्य करणारे आहे असे वाटावे व त्यांनी आपल्याला आपला पुढारी मानावे अशी नेहरूंची अपेक्षा होती.



## दोन स्त्रिया करणे म्हणजे खून करणे

समाजसुधारकांचा जातिसंस्थेवर रोष आहे तसाच हिंदूंच्या विवाहविषयक रूढींवर ही आहे. हा रोष पूर्णपणे अन्याय्य आहे असे कोणी म्हणणार नाही. पण जाती नष्ट करायचा उद्देश न्याय्य मानला तरी वरील कायदे न्याय्य ठरत नाहीत. त्याचप्रमाणे हिंदूंच्या विवाहविषयक रुढीत सुधारणा करण्याची गरज असली तरी नेहरूंनी त्याविरुद्ध केलेले कायदे न्याय्य ठरत नाहीत.

ख्रिस्ती धर्माचा बहुपत्नीकत्वाविरुद्ध करडा रोष आहे. त्यासाठी ख्रिस्ती देशात जन्मठेपेची सजा आहे. एकीपेक्षा अधिक स्त्रिया असणे हा खुनासारखा गुन्हा मानणे ही एक मूल्यविकृति आहे. खून करणारा माणूस स्वत:च्या स्वार्थासाठी दुसऱ्या मानवाजवळ असलेले सर्वात मोलाचे जे जीवन तेच हरण करतो. ही प्रवृत्ती समाजाने घृणास्पद न मानली व कुणालाही मर्जीप्रमाणे दुसऱ्याचा प्राण घेण्याची मुभा असली तर समाजाची सारी घडीच बिघडून जाईल. बहुपत्नीकत्वात स्वत:च्या स्वार्थासाठी दुसऱ्याच्या जीवितावर घाला घातला जातो काय? स्त्रियांच्या मर्जीविरुद्ध त्यांचे लग्न लावावे अशी ही रूढी नाही. पती हा पत्नीचा पालक आहे. तिची व तिच्या मुलांची सर्व प्रकारची जबाबदारी त्याच्यावर आहे असे मानले तर एकापेक्षा अधिक स्त्रिया असणे हे एकापेक्षा अधिक अपत्य असण्यासारखे आहे. त्यात खुनासारखा कोणताही अपराध घडत नाही हे मान्य व्हायला हरकत असू नये. अनेक स्त्रिया असणाऱ्या पुरुषाचे विवाहजीवन स्त्रियांची आपसातली व त्यामुळे स्वत:शी होणारी भांडणे सोडविण्यात व सोसण्यात खर्च होते ही समजूत बरोबर नाही. ज्या समाजात अशी चालच आहे तेथे सवतीपेक्षा देखील जावाजावात अधिक भांडणे होतात. कारण सवतींचा स्वार्थ समान पतीमुळे एकमेकाशी बांधलेला असतो उलट जावांचे पती भिन्न असल्यामुळे त्यांचे स्वार्थ एवढे एकमेकांशी निगडित नसतात. पतीने व्यभिचार केला तर स्त्रीला अतीव दु:ख होते कारण एकपत्नीत्व कबूल केल्यावर दुसऱ्या स्त्रीशी रमणे हा विश्वासघात ठरतो. पत्नीवरील प्रेम कमी झाल्याचे वा नष्ट झाल्याचेही ते प्रमाण असू शकते. पण समाजात सर्रास बहुपत्नीकत्वाची चाल असल्यामुळे पतीने दुसरी पत्नी केली तर पहिल्या पत्नीला यापैकी कोणतीही भावना अनुभवास येण्याचे कारण नाही. दुसरे असे की किन्सेच्या पाहणीनुसार पुरुषाची कामवासना स्त्रीपेक्षा चौपट प्रबल असल्यामुळे दुसरी पत्नी आहे म्हणून पहिल्या पत्नीशी शृंगार करण्याची त्याची इच्छा कमी होईल असे समजण्याचे कारण नसते. उलट शृंगारातील एकसुरीपणा नाहीसा झाल्यामुळे तो अधिक ताजेपणाने पहिल्या पत्नीकडे जाण्याचा संभव असतो. आपला नवरा वर्षानुवर्षे दुसऱ्या स्त्रीकडे जात होता हे पुष्कळ

वेळा स्त्रीला बाहेरून कळते. त्याच्या स्वत:शी झालेल्या वर्तनावरून तिला असा संशय येत नाही. अशी अनेक उदाहरणे आहेत. सत्य कळल्यावर संताप येण्याचे मुख्य कारण ''आपल्याशी विश्वासघात केला गेला'' या जाणिवेची दु:सहता हेच असते.

बहुपत्नीकत्व हा आदर्श असू शकत नाही. कारण स्त्रीपुरुषांची संख्या साधारणपणे सारखीच असल्यामुळे एकपत्नीत्व हेच सर्वसाधारण पुरुषाचे जीवन राहू शकते. शिवाय एकनिष्ठा म्हणजे एकसुरीपणा हे समीरकण बरोबर नाही. एकनिष्ठ प्रेम बहुगामी प्रेमापेक्षा कमी तीव्र वाटले तरी ते त्यापेक्षा अधिक सखोल असण्याचा संभव असतो. सखोलतेला खळखळाट नसला तरी गांभीर्य व स्थैर्य असते.

एकपत्नीकत्व हाच आदर्श असला तरी बहुपत्नीकत्वाला गुन्हा समजणे सर्वथैव चूक व ख्रिस्ती समाजाची निर्बुद्ध नक्कल आहे.

''एका पुरुषाला दोन स्त्रिया असणे अनैतिक नाही तसेच एका स्त्रीला दोन पती असणे अनैतिक नाही. दोन पुरुष स्वेच्छेने एका स्त्रीबरोबर राह्यला तयार असतील तर कायद्याने त्यांच्या आड येऊ नये. ती स्त्री त्या पुरुषांचे संपूर्ण पालनपोषण करण्याइतकी समर्थ असेल तर आपल्या प्रेमात वाटेकरी आहे या विचाराने साऱ्याच पुरुषाचा भडका उडेल असे समजणे चुकीचे आहे. हा संस्काराचा प्रश्न आहे. बहुपतिकत्वाची चाल आजही हिमाचल प्रदेश व सिकिम वगैरे प्रांतात आहे. तेथले विवाह जीवन, एकविवाही जोडप्यांच्या विवाहजीवनापेक्षा जास्त कलहग्रस्त असते असा अनुभव नाही.

ख्रिस्ती धर्माच्या अंधश्रद्धा प्रमाण मानून बहुपत्नीकत्व हा खुनासारखा गुन्हा मानण्याऐवजी पहिल्या पत्नीच्या हितरक्षणासाठी कायद्याने तरतूद करायला हवी. तिची मनापासून दुसऱ्या विवाहाला संमती आहे की नाही याची काळजी घेतली गेली व दुसऱ्या पत्नीमुळे पतीने तिची हेळसांड केल्यास तिला त्याविरुद्ध दाद मागण्याची सोय असली तर बहुपत्नीकत्वामुळे स्त्रियांचे जीवन दु:खी होणार नाही.

पण नेहरूंनी विज्ञाननिष्ठेच्या कितीही गप्पा मारल्या तरी वैज्ञानिक वृत्तीपासून ते फारच दूर होते. विज्ञाननिष्ठा म्हणजे इंग्रजनिष्ठा हे त्यांचे समीकरण होते. बहुपत्नीकत्वामुळे आपल्या समाजातील स्त्रियांवर कोणते प्रसंग गुदरले आहेत याचा शोध घेण्याचा त्यांनी कधीच प्रयत्न केला नाही. एवढेच नव्हे तर त्याविरुद्ध कायदा करताना स्त्रियांना अधिक संरक्षण मिळावे याचीही काळजी केली नाही. या कायद्याप्रमाणे बहुपत्नीकत्वाच्या अपराधाबद्दल तक्रार करण्याचा अधिकार फक्त पहिल्या पत्नीला देण्यात आला आहे, पोलिसांना नव्हे. पण पत्नीला अशा तऱ्हेने तक्रार करून कोणता फायदा होणार? ती जर पतीवरच सर्वस्वी अवलंबून असली तर पति सात



वर्षे खडी फोडायला गेल्यास ती स्वत:च निराधार होणार! तेव्हा ज्या स्त्रिया पतीवर अवलंबून नाहीत त्याच केवळ सूडाच्या भावनेने पतीला सात वर्षे तुरुंगात पाठवायला तयार होतील. या ऐवजी दुसरे लग्न केल्यास पहिल्या पत्नीला पूर्वीच्या स्तरावर जगता येईल अशी तिची व्यवस्था तिच्या नवऱ्याने करून दिली पाहिजे असे प्रावधान केले असते तर पतीशिवाय ज्यांना आधार नाही त्या स्त्रियांचे जास्त कल्याण झाले असते.

माझ्या पाहण्यातले एक उदाहरण असे. एका अमेरिकनपदवीविभूषित स्त्रीने आजकालच्या पद्धतीप्रमाणे पसतीशीनंतर विवाह केला. एका वर्षाच्या आतच तिने पतीविरुद्ध बहुपत्नीकत्वाचा दावा ठोकला. पतीने न्यायाधीशाला चक्क सांगितले की ''माझा दोनच नव्हे तर फिर्यादी धरून तीन स्त्रियांशी संबंध आहे. पण माझे या तिघीपैकी कुणाशीही लग्न झालेले नाही. तेव्हा बहुपत्नीकत्वाच्या कायद्याखाली मी कोणताही गुन्हा केलेला नाही.'' फिर्यादी स्त्रीला आरोपिताशी आपले लग्न झालेले आहे हे सिद्ध करता आले नाही. कारण न्यायाधीश नेहरूप्रणीत कायद्यानुसार विवाहनोंदणीचे प्रमाण मागत होता. परंपरागत हिंदू कायद्याप्रमाणे त्याला जनश्रुतीचे प्रमाण चालत नव्हते. हे जोडपे माझ्याकडे प्रथम आले तेव्हा पतिपत्नी म्हणूनच त्यांनी एकमेकाची ओळख करून दिली होती व पुढेही ते माझ्याकडे अनेक वेळा येऊन गेलेले होते. त्या दोघांच्या ओळखीच्या सर्व लोकांना त्यांनी आपला पतिपत्नी म्हणूनच परिचय करून दिला होता. पण न्यायालयाला या शेकडो लोकांची साक्ष चालत नव्हती. मी त्या स्त्रीला विचारले की ''आजकाल विवाहनोंदणी सक्तीची झाली आहे. मग तुमचा विवाह नोंदविला का गेला नाही?'' यावर तिची उत्तरे उडवाउडवीची होती. म्हणजे पतीला ज्याप्रमाणे आपल्या लग्नाबद्दल लेखी पुरावा नसावा असे वाटत होते तसेच पत्नीलाही वाटत होते कारण असे असल्यास स्वैराचार करणे सोपे जाते. प्रत्यक्षात पतीनेच या स्वातंत्र्याचा फायदा घेतला. नेहरूंच्या कायद्यामुळे ज्या जातीत बहुपत्नीकत्वाची चाल होती त्या जातीत ती बंद झाली नाही. माझ्या शेजारीच बहुपत्नीक कुटूम्बे आहेत.

पत्नीने फिर्याद केल्याशिवाय बहुपतिक पुरुषाविरुद्ध कारवाई होऊ शकत नाही. पण तरी त्याचे दुसरे लग्न अवैध ठरविता येते. म्हणजे नक्की काय होते? पूर्वी लग्न अवैध ठरविले की मुलाच्या वारसाहक्कावर गदा येत असे. आताच्या कायद्याप्रमाणे लग्न अवैध असले तरी त्या लग्नापासून झालेली संतती अवैध ठरत नाही. म्हणजे दुसऱ्या बायकोच्या अपत्यात व पहिल्या बायकोच्या अपत्यात कायदा भेद करीत नाही. दुसरे लग्न अवैध ठरले तरी दुसऱ्या लग्नाच्या संततीची जबाबदारी पतीवर तशीच कायम राहते व अपत्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी त्याच्या आईला स्वत:च्या बायकोसारखे

वागविणे प्राप्तच होते. मुलाची आईपासून ताटातूट करणे भाग असल्यास अपत्य पूर्णपणे कायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही. बेकायदा लग्नाची म्हणून दुसऱ्या बायकोला गोठ्यात ठेवता येत नाही. मग दुसरे लग्न बेकायदा ठरले तरी पहिल्या बायकोने फिर्याद न केल्यास प्रत्यक्षात ते बहुपत्नीकच कुटुंब राहणार ना? दुसऱ्या बायकोच्या अपत्यात व पहिल्या बायकोच्या अपत्यात काही भेद करण्यात येऊ नये असे जर कायद्याला वाटत असेल तर समाजाच्या दृष्टीने एक अपत्य रखेलीचे व दुसरे पत्नीचे असा भेदभाव कायदा कसा करू शकतो? तेव्हा फौजदारी कारवाई केली तर पहिले लग्नही उद्ध्वस्त होते व न केली तर कायदेशीर बहुपत्नीक संसार व बेकायदेशीर बहुपत्नीक संसार यात फरक राहत नाही. एकूण हा कायदा केवळ आमचे कायदे पुरोगामी आहेत असे दाखविण्यासाठी आहे. त्याचा व्यवहारात अनर्थाशिवाय काहीच अर्थ नाही.

## बालविवाहाचा बाऊ

जी गोष्ट बहुपत्नीकत्वाची तीच बालविवाहाची. आपल्याकडे अशी चाल आहे म्हणून इंग्रज नाके मुरडतो हे नेहरूंना बालविवाह नापसंत होण्याचे मुख्य कारण होते. बालविवाहाने अमुक हानी होते याबद्दल वैज्ञानिक पुरावा आहे म्हणून नव्हे. १८ वर्षाच्या आधी मुलगी वयात आलेली नसते असे प्रसारमाध्यमावर धडाकून सांगण्यात येते. श्रोता या नात्याने मी त्यांना पत्र लिहून याबद्दलचा, पुरावा देखील सांगत जावा म्हणून सूचना केली. पण या प्रसारणात काहीही फरक पडला नाही. वयात येण्याचे प्रमाण ऋतुप्राप्ति हे असेल तर १४ व्या वर्षी बहुतेक मुलींना ऋतुप्राप्ति झालेली असते. ऋतुप्राप्ति होणे म्हणजे संभोगास योग्य होणे नव्हे असे म्हणावे तर अमेरिकेत १२ वर्षाच्या मुली स्वेच्छेने संभोग करीत असल्याची शेकडो उदाहरणे आहेत. ज्या मुली स्वेच्छेने संभोग करतात त्या वयात आलेल्या नाहीत हे म्हणणे वेडगळपणाचे नाही काय? मुलगी संभोगास योग्य असली तरी प्रजननास योग्य नसते असे सांगण्यात येते. पण याचा पुरावा दिला जात नाही. केवळ काही डॉक्टरांची व या विषयावरील पुस्तकांची देखील पुरावा नसलेली विधाने उद्धृत केली जातात. प्रजननयोग्यता कोणत्या कसोटीने ठरविली व कोणत्या व किती मोठ्या समूहावर कशा रीतीने संशोधन झाले हे सांगण्यात येत नाही.

चौदाव्या वर्षी गर्भधारणा झाल्याची हजारो उदाहरणे उपलब्ध झाल्यावर अशा गर्भधारणेने खरोखरच अपाय होतो काय याचा वैज्ञानिक काटेकोरपणाने अभ्यास व्हायला पाहिजे. कारण जी इच्छा ज्या वयात एखाद्या जीवयोनीला नैसर्गिकपणे व सार्वत्रिकपणे होते तिचे परिणाम वाईट असण्याचा संभव मुळातच नाही. जीवाला



अहितकारक असलेल्या जन्मसिद्ध प्रवृत्तींचे एकही उदाहरण सापडणार नाही.

किन्सेच्या आकड्याप्रमाणे कामवासना १४ ते ३० या वयात सर्वात अधिक प्रबल असते व याच वयात तिची तृप्ती न होण्यासारख्या वैवाहिक रूढी असतील तर तरुण तरुणीवर कामुक उपासमारीचा प्रसंग येईल हे उघड आहे. द्रव्यार्जन करण्याचे वय येण्यापूर्वी विवाह योग्य नाही हा युक्तिवाद जैविकीवर आधारलेला नाही. समाजात गरीबी आहे म्हणून योग्य आहार परवडत नाही हे योग्य आहार न घेण्याचे समर्थन असू शकत नाही. गरिबी दूर करण्याची निकड त्यावरून सिद्ध होते.

शिवाय ज्या समाजात आजही सर्रास बालविवाह रूढ आहेत तो समाज बालविवाहितांच्या पालनपोषणाची आपल्या दर्जाप्रमाणे सोय करतोच. तेव्हा आर्थिक कारणांच्या आधारे त्यांच्या चालीरीतीवर बंदी घालणे आवश्यक नाही.

लोकसंख्यावाढीला आळा घालण्यासाठी बालविवाहावर बंदी घालणे आवश्यक आहे असाही एक युक्तिवाद आहे. हाही अत्यंत निर्बुद्धपणाचा आहे. सर्वसाधारण स्त्रीला दहा मुले होऊ शकतात असा अनुभव आहे. १४ व्या वर्षी विवाह झाला व संततिनियमनाचा काहीच प्रयत्न केला नाही तरी सर्वसाधारण स्त्रीला १० पेक्षा जास्त मुले होणार नाहीत. अठराव्या वा विसाव्या वर्षी विवाह केला तरी वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत साधारणपणे मुले होत असल्यामुळे प्रौढ विवाह करणाऱ्या स्त्रीला देखील १० मुले होण्यास काही अडचण नाही.

अमेरिकेत मुक्त सहवासाचे तत्त्व मान्य झाल्यापासून १४ ते २० वर्षे वयाच्या आत विवाह प्रचुर प्रमाणात होऊ लागले होते. या विवाहात मुलांची हेळसांड होत होती असे दिसून आले. याचे कारण स्पष्ट आहे. विवाहाची निकड कामपूर्तीसाठी वाटत होती अपत्यप्राप्तीसाठी नाही. अपत्याकडे होणारे दुर्लक्ष टाळायचे असेल तर संततिनियमनाची साधने अधिक कार्यक्षम व संततिनियमनाची शिस्त अधिक काटेकोर व्हायला पाहिजे. बालविवाहावर बंदी हा त्यावर उपाय नव्हे.

बहुपत्नीकत्वाच्या कायद्याप्रमाणेच बालविवाहाचा कायदा देखील कागदावरच आहे. जेथे बालविवाहाची चाल आहे तेथे पूर्वीप्रमाणेच सर्रास बालविवाह एवढेच नव्हे तर सामूहिक बालविवाह सुरू आहेत. तेव्हा याही कायद्याचा हेतू समाजसुधारणा हा नसून परदेशाकडून कौतुक करवून घेणे हाच होता असे म्हणण्यास हरकत नाही.

■ ■ ■

नेहरू आणि नेहरूवाद

# देशी भाषाविरुद्ध जिहाद

यो मे अन्नं, यो मे रसं, वाचं श्रेष्ठां जिघांसति ।
तस्मा इंन्द्रश्च अग्निश्च अस्त्र हिंकारमस्यताम ।

''जो आमचे अन्न, पान व वाणी याचा नाश करू इच्छितो त्याच्यावर हे इन्द्रा तू आपले वज्र चालव.'' -अथर्ववेद

"If I had the powers of a despot, I would to day stop the tuition of our boys and girls through a foreign medium and require all the teachers and professors on pain of dismissal to introduce the change forthwith-It is an evil that needs a summary remedy" ***-Mahatma Gandhi***

''नेहरूंनी संविधानाची भ्रूणहत्या केल्याचे सगळ्यात ठळक व उद्वेगजनक उदाहरण संविधानाच्या भाषाविषयक कलमाचे आहे. ही कलमे केवळ आदेशात्मक नसून बंधनकारक व कालबद्ध आहे.

''संयुक्त भारताच्या राज्याची (union government) भाषा देवनागरी लिपीतील हिंदी राहील. या भाषेतील शब्द मुख्यत: संस्कृत राहतील पण भारतात बोलल्या जाणाऱ्या इतर भाषातून इष्ट ते शब्द तिच्यात घेतले जातील व इंग्रजीच्या जागी हिंदीचा वापर करण्याची ही प्रक्रिया १९६५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल'' असे हे कलम



सांगते.

या कलमातील शब्दयोजना हेतुपूर्वक आहे. कारण राष्ट्रभाषेच्या स्वरूपाबद्दल बराच वाद होता. त्यात एकूण महात्मा गांधीचे व काँग्रेसचे मत हिंदुस्तानी ही राष्ट्रभाषा असावी असे होते. हे मत भाषाविषयक तथ्यावर आधारलेले नसून राजकीय समझोत्याच्या स्वरूपाचे होते. हिंदी ही हिंदूची भाषा आहे म्हणून ती मुसलमानांना मान्य होणार नाही व उर्दू ही मुसलमानांची भाषा आहे म्हणून हिंदूंना मान्य होणार नाही. तेव्हा दोघांनाही मान्य होणारी अशी हिंदीमध्ये प्रचुर फारसी शब्द वापरून सिद्ध होणारी भाषा म्हणजे हिंदुस्तानी. वस्तुत: या भाषेत व उर्दूत काही फरक नाही. कारण हिंदीतच प्रचुर फारसी शब्द वापरले की उर्दू होते. पण उर्दू नागरी लिपीत लिहू नये कारण नागरी ही हिंदूंची लिपी आहे. ती मुसलमानांना मान्य होणार नाही असे ''सेक्युलर'' मत आहे. यावर तोड म्हणून हाताने लिहिण्यासाठी उर्दू व छपाईसाठी नागरी लिपी वापरावी अशी तोड निघाली. या तोडी निघाल्या तेव्हा पाकिस्तान झाले नव्हते व होण्याचा संभवही फारसा नव्हता. पण पाकिस्तान झाल्यावर मुसलमानांशी समझौता करण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता म्हणून हे मत मागे पडले. गोविंद वल्लभ पंत या सारखे काँग्रेस नेतेही म्हणू लागले की, हिंदुस्तानी नावाची कोणतीच भाषा नाही. हिंदी व उर्दू अशा दोन भाषा आहेत. भारताने हिंदीचाच स्वीकार करावा व हिंदीची लिपी फक्त नागरी आहे. ती उर्दू लिपीत लिहिण्याच्या प्रश्नच उद्‌भवत नाही.

वस्तुत: हिंदी व उर्दू या दोन भाषा आहेत हेही भाषाशास्त्रीय सत्य नाही. ग्रायर्सनच्या Linguistic Survey of India मध्ये म्हटले आहे की Urdu is a literary form of Western Hindi म्हणजे उर्दू ही बोलण्याची भाषा नसून केवळ साहित्याची भाषा आहे. ग्रायर्सनच्या वाक्यातील western याचा अर्थ दिल्ली, आग्रा हा प्रदेश. येथे राहणारे लोक हिंदू असोत की मुसलमान असोत ते घरी त्या प्रदेशातली बोलीच बोलतात. या प्रदेशातल्या बोलीला खडी बोली म्हणतात. लेखनासाठी तिच्यात प्रचुर मात्रेने फारसी शब्द मिसळले की ती उर्दू होते व संस्कृत शब्द मिसळले की ती हिंदी होते.

उर्दूचा जन्म औरंगजेबाच्या नंतर झाला. फारसी ही सरकारी भाषा उरली नाही. पण सरकारी भाषेने खड्या बोलीत पुष्कळसे फारसी शब्द रूढ केले होते. ते सरकार दरबाराशी सम्बद्ध असणाऱ्या लोकांच्या बोलण्यात रूढ झाले होते. पण हे सरकारदरबारचे बोलणे घरापर्यंत पोचले नव्हते.

घरगुती बोली जशीच्या तशी साहित्यात वापरण्यास अपुरी असते. कारण तिचा

वापर घरगुती व्यवहारापुरता मर्यादित असल्यामुळे संस्कृत वा फारसी सारख्या साहित्यनिर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या एखाद्या भाषेचा आश्रय करणे आवश्यक असते.

पाकिस्तान झाल्यावर भारताच्या राष्ट्रभोषेने फारसीचा आधार घ्यायचे काही प्रयोजन उरले नाही. मुघलांची भाषा फारसी होती व मुघल हे १५२ वर्षे भारताचे प्रमुख राज्यकर्ते होते. पण त्यांच्या राज्याचा आज मागमूसही नसताना भारताने त्यांच्या भाषेचा आश्रय करण्याचे पारतंत्र्यपूजेव्यतिरिक्त काही कारण नव्हते. शिवाय वेदकालापासून भारतात अखिल भारतीय भाषा म्हणून संस्कृतचाच वापर होत होता. ब्रिटिश कालात देखील शब्दसंपत्तीसाठी संस्कृतचा आश्रय करणाऱ्या हिंदीचाच फारसीचा वापर करणाऱ्या उर्दूपेक्षा जास्त प्रसार होता. दिल्ली आगऱ्याचा प्रदेश, पंजाब व त्याच्या उत्तरेकडील भारत यात हिंदीपेक्षा उर्दूचा प्रसार अधिक होता. पण पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश व राजस्थान या विस्तृत प्रदेशात हिंदीचाच वापर मुख्यत: होत होता. शिवाय हिंदीव्यतिरिक्त इतर प्रचलित देशी भाषा मोठ्या प्रमाणावर संस्कृतचाच आश्रय करीत होत्या. तमिळचा याला अपवाद आहे असे सांगण्यात येते पण हा अपवाद राजकीय हेतूने चळवळ करून सेन तमिळच्या स्वरूपात प्रयत्नपूर्वक घडवून आणण्यात आला होता. तमिळचे प्राचीन ग्रंथ तिरुक्कुरल, शिलप्पाधिकारम, मण्मिकलै वगैरेच्या भाषेत पुष्कळ संस्कृत शब्द आहेत हे त्यांच्या नावावरून देखील दिसून येते. संस्कृतविरोधी तमिळांची नावेच रामस्वामी, करुणानिधि वगैरे होती. त्यामुळे हिंदीने मुख्यत: संस्कृतचाच आश्रय करावा व भारतात प्रचलित असलेल्या इतर भाषाचेही शब्द आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावा असे संविधानात नमूद करण्यात आले आहे.

## देशाचे संविधानकल्पित भाषिक स्वरूप

हिंदी ही भारतीय एकराज्याची भाषा राहील असे मुद्दाम नमूद करण्याचे कारण भारतात हिंदीव्यतिरिक्त कोट्यवधी लोक ज्याचा वापर करतात व ज्याच्यात समृद्ध वाङ्मय आहे अशा निदान सात भाषा आहेत. यांचे प्रदेश देखील संलग आहेत. भाषकांच्या संख्येच्या व क्षमतेच्या बाबतीत फ्रेंच, जर्मन व रशियन या भाषांशी तुल्य असलेल्या या भाषांचा राज्यकारभारात व उच्च शिक्षणात माध्यम म्हणून उपयोग होऊ नये हे न्यायाचे नाही. म्हणून त्यासाठी प्रांत भाषावार करावे व प्रांताच्या भाषा या तेथील मातृभाषाच असाव्यात असे काँग्रेसचे मत होते. काँग्रेसचे प्रांत भाषावारच होते. महाराष्ट्र काँग्रेस कमेटी, गुजराथ काँग्रेस कमेटी वगैरे कमिट्या होत्या. मुंबई इलाखा काँग्रेस



कमिटी व मद्रास इलाखा काँग्रेस कमिटी असा प्रकार नव्हता. त्यामुळे संविधानाने त्या त्या प्रदेशांच्या मागणीनुसार प्रांतांची पुनर्रचना करावी असा सल्ला दिला आहे. ही मागणी अर्थात् भाषेच्या आधारावर प्रांत निर्माण करण्याचीच असणार हे सगळ्यांनी गृहीत धरले होते.

भाषावार प्रांतरचनेबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वेगळे मत होते. साऱ्या भारताची एकच भाषा असावी व त्यामुळे भाषावार प्रांत करू नयेत असे त्यांचे मत होते. म्हणजे मराठी भाषी लोक जेथे राहतात तेथे देखील सारा राज्यकारभार व सारे शिक्षण हिंदीतून व्हावे असा याचा अर्थ झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बहुतेक विचारात म. गांधींच्या विचाराइतका वास्तवतेचा विचार कधीच नव्हता, हे अनेक बाबींप्रमाणे येथेही दिसून आले. १० कोटी लोक जी बोलतात व जी सर्व दृष्टीने सक्षम आहे अशा मराठीला स्वत:च्या प्रदेशात देखील राज्यकारभारात स्थान नसावे हे उघडपणेच अन्याय्य आहे. भारतात प्रांतीय भाषाविशेष सहजगत्या निर्माण झाले आहेत, ते इंग्रजी व मुघली आक्रमणांनी भारतीय राष्ट्रीयत्वाचा नाश करण्यासाठी निर्माण केलेल्या विशेषासारखेच एकत्वाला मारक आहेत असे समजणे हे शरीरात वयपरत्वे नैसर्गिकरीत्या होणारे बदल व अपघात आणि रोग यामुळे होणारे बदल एकाच जातीचे समजण्यासारखे आहे. महाराष्ट्रात मराठी वापरल्याने महाराष्ट्र भारतीय एकत्वापासून दुरावत असेल तर मराठी लोक हे वस्तुत: भारतीय राष्ट्रीयत्वाचे घटक नाहीतच असे म्हणावे लागेल.

भारताच्या इतिहासात भाषेवरून प्रांताप्रांतात भांडणे झाल्याचे एकही उदाहरण नाही. जुन्या काळी राज्यकारभाराची भाषा म्हणून जेत्यांच्या भाषेचा वापर होत असे, पण शिक्षणाची व साहित्याची भाषा उच्च स्तरासाठी संस्कृत व आम जनतेसाठी त्या त्या प्रांतातली भाषाच राहिली आहे. तुलसीदासाचे काव्य हिंदीत व कम्बाचे तमिळमध्ये असल्यामुळे तमिळ व हिंदीभाषी प्रदेशात सांस्कृतिक दुरावा निर्माण झाला नाही. भारतीय भाषा वेगळ्या असल्या तरी सहचारी भाषा आहेत. भारतीय राष्ट्रीयत्वापासून वेगळा असलेला तमिळ राष्ट्रवाद तमिळ भाषेतून निर्माण झाला नसून इंग्रजी भाषेमुळे निर्माण झाला आहे. ''द्रविड'' व इंडो युरोपीय नावाच्या काल्पनिक भाषांच्या आधारे आर्य व द्रविड अशा वेगळ्या लोकांची कल्पना करून मिशनऱ्यांनी ती निर्माण केला आहे. तमिळ व संस्कृत यांचा काही संबंध नाही हे दाखविण्यासाठी तमिळ व्याकरण लिहिणारा काल्डवेल हा मिशनरी होता. तमिळांनी जर मिशनरी प्रचार ऐकला नसता तर तमिळ राष्ट्रवाद कितीही वाढल्याने भारतविरोधी कधीच झाला नसता. तमिळांच्या प्राचीन ग्रंथातली संस्कृतीदेखील वैदिकच आहे. जैन, बौद्ध, भक्ति वगैरे विचारधारा

भारतात प्रबल झाल्या तेव्हा त्या द्रविड समजल्या जाणाऱ्या प्रदेशात देखील प्रबल झाल्या. भारतातील सांस्कृतिक चळवळी भाषापरत्वे बदलल्या नाहीत.

मराठी लोकांना सहज हिंदी येते तसे दक्षिण भारतीय लोकांना येत नाही. त्यांच्याकडून ''तुम्ही इतर प्रांतीयांशी व्यवहार करताना हिंदी वापरा'' अशी अपेक्षा करणे वाजवी आहे पण ''तुम्ही आपल्या प्रदेशात देखील आपल्या मातृभाषा वापरू नका.'' अशी अपेक्षा करणे मुळातच अन्याय्य व अव्यवहार्य देखील आहे. हिंदीचा कधीच स्वीकार न होता इंग्रजीचेच दास्य सदैव नशिबात राहील अशी व्यवस्था करण्यात या मताची हमखास परिणती झाली असती. नेहरूंनी प्रांतीय भाषांच्या विरोधाच्या याच भावनेचा उपयोग इंग्रजीच्या स्थापनेसाठी केला.

हिंदी ही केंद्र सरकारची भाषा आहे व ती आंतरप्रांतीय व्यवहारासाठी आहे असे स्पष्ट करण्यासाठीच संविधानाने तिला संयुक्त भारतीय राज्याची म्हणजे केंद्र सरकारची भाषा असे म्हटले आहे.

## उन्हापेक्षा वाळू जास्त दाहक

नेहरूंना वरीलपैकी कोणतीच गोष्ट मान्य नव्हती. ते भारताचे शेवटचे इंग्रज शासक असल्यामुळे सच्च्या इंग्रजाने जे करायला पाहिजे होते ते करण्याचा त्यांनी चंग बांधला. इंग्रजांनी इंग्रजीला फक्त राज्यकारभाराची व उच्च शिक्षणाची भाषा बनविली. पण तेथेच न थांबता त्यांनी भारतीय भाषांचे उच्चाटनच करायला पाहिजे होते असे या गावठी इंग्रजांचे मत होते. पाळण्यापासून इंग्रजीच सुरू करावे. देशी भाषा या केवळ निरक्षर लोकांच्या तोंडी राहतील, त्यांच्यात कोणतेही लिखित वाङ्मय असणार नाही अशी व्यवस्था करण्याच्या दिशेने नेहरूंनी पावले उचलली.

यासंबंधी पुढील सुभाषित कुणालाही आठवण्यासारखे आहे-

रविरपि न दहति तादृग्यादृग्सन्दहति वालुकानिकर:।
अन्यस्माल्लब्धपदो नीच: प्रायेण दु:सहो भवति ॥

''उन्हापेक्षा उन्हाने तापणारी वाळू जास्त त्रास देते. उच्चापासून पदप्राप्ती झालेला नीच, अधिक तापदायक होतो.''

इंग्रजांचे राज्य स्थापन झाले तेव्हा त्यांना भाषेपेक्षा धर्माचे जास्त महत्त्व वाटत होते. भारताला ख्रिस्ती करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. तिला १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाने सुरुंग लावला. यापुढे इंग्रजांनी भारताला धर्म वा भाषा नष्ट करणे अशा सांस्कृतिक उद्देशांचा त्याग करून आर्थिक व राज्यविस्तारवादी उद्देशावर भर दिला.



नेहरूंनी मात्र कोणत्याही इंग्रजाला शक्य झाले नसते, इतक्या हिरिरीने भारतीय भाषाचे उच्चाटन करण्याचा कार्यक्रम राबविला. एवढेच नव्हे तर त्यात अभूतपूर्व सफलता मिळविली. आज ज्यांना कोणत्याही देशी भाषेचे ज्ञान नाही अशा तीन पिढ्या गेल्या आहेत. बहुतेक सुशिक्षितांना आपल्या संविधानाने १५ वर्षात इंग्रजीचे उच्चाटन करण्याचा आदेश दिला आहे हे माहीतच नसते. एवढेच नव्हे तर ते सांगितल्यावरही मी विनोद करतो आहे वा थापा मारतो आहे असे पुष्कळांना वाटते.

न्यायाधीशांनी देखील पुष्कळ वेळा सरकारी नोकरीसाठी हिंदी येणे आवश्यक आहे असे नियम करण्याचा सरकारला अधिकार नाही असे निवाडे दिले आहेत. मात्र इंग्रजी न येणाऱ्याला सरकारच्या जवळपासही फिरकता येणार नाही याची दक्षता बाळगणे न्यायाधीशांनी असंवैधानिक ठरविले नाही.

यासाठी असे कारण देण्यात येते की, ''हिंदी ही सर्व भारतवासीयांची भाषा नसल्यामुळे हिंदी शिकलेच पाहिजे असा सरकारने आग्रह धरणे, हिंदी भाषीयांनी अहिंदी भाषीयावर आपली भाषा लादण्याचा प्रयत्न करणे व हिंदीभाषी आणि अहिंदीभाषी यांच्यात भेदभाव करणे होय. इंग्रजी ही भारतात कुणाचीच भाषा नसल्यामुळे इंग्रजीचा आग्रह धरण्याने कुणाच्याच विरुद्ध भेदभाव होत नाही.''

याविरुद्ध असे म्हणता येईल की, ''साऱ्या भारतीय भाषा टाकून सरकारचे सामर्थ्य इंग्रजीच्या प्रसारासाठी वापरणे हे साऱ्या राष्ट्राविरुद्ध परकीयांच्या वतीने युद्ध पुकारण्यासारखे आहे. ही पारतंत्र्यपूजा आहे. भारताचा पंतप्रधान भारतातल्याच कोणत्यातरी लोकसमूहाचा असल्यामुळे तो त्या लोकसमूहाच्या वतीने इतराशी भेदभाव करील म्हणून कोणीतरी अभारतीय पंतप्रधानपदासाठी पाकिस्तानातून वा चीनमधून आणावा म्हणजे तो नि:पक्षपाती राहील'' असे म्हणणे देखील न्यायाधीशांना मान्य व्हायला पाहिजे. वस्तुत: भेदभावाचा युक्तिवाद केवळ हिंदीच्याच नव्हे तर स्वराज्याच्याच विरुद्ध आहे. हिंदीच्याऐवजी इंग्रजी वापरले तरी बहुमताच्या आधारावर असलेले स्वराज्य हेच भेदभावपूर्ण आहे. कारण हिंदीभाषी लोकांची भारतात बहुसंख्या आहे व स्वराज्य म्हणजे हिंदीभाषी लोकांची अहिंदीभाषी लोकांवरची सत्ता.

स्वराज्याविरुद्धचा हा युक्तिवाद जिनांनी वापरला होता. ''भारताचे स्वराज्य म्हणजे हिंदूंची अहिंदूवरील सत्ता. ती आम्हाला नको आहे'' हा जिनांचा युक्तिवाद होता.

''परकीय भाषा ही भारताची भाषा कशी होईल?'' याचे उत्तर देताना कधी कधी इंग्रजी ही भारतातील अँग्लो इंडियनांची भाषा असल्यामुळे ती परकीय नाही असे उत्तर

दिले जाते. चीनी युद्धाच्या वेळी भारतात हजारो चीनी आहेत असे दिसून आले होते. तेव्हा चीनी ही देखील भारतीय भाषाच ठरते. सगळेच ज्यू भारत सोडून इझ्राएलमध्ये वसती करण्यास गेले असतील असे नाही. तेव्हा हीब्रू ही देखील भारतीय भाषा ठरते. अशाने भारतीय व अभारतीय असे भाषांचे वर्गीकरण होऊच शकणार नाही.

## भाषिक भांडणांचे जनक नेहरू

हिंदीच्या विरुद्धचे सर्व युक्तिवाद हे स्वातंत्र्याविरुद्धचे युक्तिवाद आहेत हे इंग्रजीभक्तांना मनोमनी माहीत आहे. असे असून ते असे युक्तिवाद करतात याचे कारण ते वस्तुत: स्वराज्याच्याच विरुद्ध आहेत. पण असे उघड म्हणण्याचे अजून त्यांना धैर्य होत नाही. नेहरूंनी स्वतंत्र हा शब्दच संविधानातून काढला, तेव्हा त्यांनीच हे जाहीर केले की इंग्रजापासून स्वातंत्र्य त्यांना कधी अभिप्रेत नव्हतेच.

कधी कधी असे म्हटले जाते की, ''नेहरूंना संविधानाची भाषाविषयक कलमे अमलात आणायची होती पण दक्षिण भारतीय व मुसलमान यांच्या दडपणामुळे त्यांना असे करता आले नाही.''

या म्हणण्यात काडीचेही तथ्य नाही. संविधानसभेत दक्षिण भारतीय व मुसलमान या सर्वांनी हिंदीच्याच बाजूने मत दिले होते. राजाजी हिंदीच्या विरुद्ध गरळ ओकीत पण याची सुरवात नेहरूंनी केली होती. हिंदी ''लादली'' जात आहे हे नेहरूंचे शब्द १९४९ च्या एका जाहीर व्यायानातच आहेत. राजाजींनी यापूर्वी असे म्हटल्याचे ऐकिवात नाही. नेहरूंचे उद्गार असे आहेत:-

"Language ultimately grows from the people-It is seldom that it can be imposed" दम्भाचे याहून उद्वेगजनक उदाहरण सापडणार नाही. इंग्रजांनी भारत जिंकला नसता तर राज्यकारभाराचे व शिक्षणाचे माध्यम म्हणून भारतात इंग्रजींचा वापर कधीच झाला नसता. १८५७ च्या क्रांतिकारकांनी एका भित्तिपत्रात आपल्या तक्रारी नोंदविल्या आहेत. त्यात इंग्रजीची सक्ती ही देखील एक प्रमुख तक्रार आहे. भारतात फारसी व फारसीमिश्रित भाषा यांचा प्रचार झाला कारण भारत जिंकणाऱ्या मुघलांची भाषा फारसी होती. त्यापूर्वीच्या तुर्क घराण्याची भाषा देखील फारसीच होती. पुढे देशी मुघल जो निझाम त्याच्या राज्यात उर्दू ही कुणाचीही भाषा नसून देखील राजभाषा होती. नेहरूंनी स्वत: राजसत्तेचा दंडा वापरूनच इंग्रजीचे प्रस्थ वाढविले. इंग्रजी शिकलो नाही तर आपल्याला नोकऱ्या मिळणार नाहीत या भीतीने मुख्यत: इंग्रजीचा प्रसार झाला. नेहरू कितीही भाबडे मानले



तरी आपण इंग्रजीची पाठ सोडली तर भारतातून इंग्रजीचे उच्चाटन व्हायला एक वर्ष देखील पुरेसे होईल हे त्यांना माहीत नव्हते असे म्हणता येणार नाही. हैदराबादचा शासक निझाम मुसलमान होता. या एकाच कारणास्तव सारी प्रजा हिंदू असलेल्या या संस्थानाची भाषा उर्दू आहे असे नेहरू म्हणत.

१९३७ साली स्थापन झालेल्या मद्रास प्रांतातील कॉंग्रेस सरकारचे राजाजी हे मुख्यमंत्री होते. ते हिंदीच्याविरुद्ध आंदोलन करणाऱ्यांना तुरुंगात टाकीत होते. त्यांनी संविधानसभेत देखील हिंदीच्याच बाजूने मत दिले होते. संविधानसभेने हिंदीचा ठराव केवळ एका निर्णायक मताने पारित केला ही आवई राजाजींनी उठविली असे समजले जात होते. पण राजाजींनी ऑर्गनायझर पत्राला एक पत्र लिहून याचा स्पष्ट इंकार केला होता. ही आवई नेहरूंनी उठविली असली पाहिजे. असे नसेल तर संविधान अमलात आणायची आपली जबाबदारी ओळखून त्यांनी ''हे खोटे आहे'' असा खुलासा करायला पाहिजे होता. हिंदीचा ठराव पारित झाल्यापासून नेहरूंचे एक तरी भाषण असे दाखवावे की ज्यात त्यांनी हिंदीचे समर्थन केले आहे. ते नेहमी हिंदीची टवाळी करीत. ''हिंदीभाषी प्रदेश मागासलेले आहेत हा हिंदीचा पराक्रम आहे. हिंदीच्या वापराने भारत विज्ञानात मागासेल. हिंदी किचकट आहे, ती सोपी झाल्याशिवाय वापरण्याच्या लायकीची नाही. हिंदी ''दंड्यामुळे'' व हिंदी वापरलीच पाहिजे अशा आग्रहामुळे जनमत हिंदीच्या विरुद्ध झाले'' या सर्व नेहरूंनी उडविलेल्या वावड्या आहेत.

''दक्षिण भारतीयांनी मान्य केल्याशिवाय भारत हिंदीचा स्वीकार करणार नाही'' अशी हमी दक्षिण भारतीयांना नेहरूंनी दिली. अशी हमी दक्षिण भारतीयांनी कधी मागितली होती? नंतर नागालोकांना स्वत:च इंग्रजीभाषी ठरवून नागांनी हिंदीचा स्वीकार केल्याशिवाय हिंदीचा वापर केला जाणार नाही अशी पुस्ती नेहरूंनी जोडली.

## गांधी व इंग्रजी

तमिळनाडूमध्ये हिंदी विरोधी चळवळ होती व तिचे निर्माते नेहरू नव्हते हे खरे आहे. पण ही चळवळ केवळ एका गटाची होती. आम जनतेची नव्हती. तसे असते तर हिंदीचे कलम सर्वानुमते पारित होऊच शकले नसते. १९४५ साली म. गांधींनी तमिळनाडूचा दौरा केला. त्यांच्या सभेला अलोट गर्दी होत असे. या अलोट गर्दीपुढे केलेल्या साऱ्या भाषणात गांधी ''इंग्रजीचा मोह'' या विषयावर बोलत व तमिळांनी इंग्रजीचे दास्य झुगारून हिंदीचा स्वीकार करावा म्हणून नि:संदिग्धपणे हिंदीत आवाहन करीत. याबद्दल कोणीही त्यांचा निषेध केला नाही व त्यांचे भाषण ऐकणाऱ्यांच्या गर्दीत

काहीही घट झाली नाही. यानंतर लगेच केंद्राचे गृहमंतत्रिपद स्वीकारल्यावर सरदार पटेल तमिळनाडूत गेले व त्यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, ''ब्रिटिश काळात ज्याप्रमाणे इंग्रजीचा अव्हेर केल्यामुळे मुसलमान माघारले त्याचप्रमाणे स्वतंत्र भारतात हिंदीचा स्वीकार केला नाही तर तमिळ लोक माघारतील.'' हा आमच्यावर हिंदी लादण्याचा प्रयत्न आहे. म्हणून कोणीही कांगावा केला नाही. या काळच्या गुजराथच्या गृहमंत्र्यांनी काही आकडे प्रकाशित केले. त्या अनुसार तमिळनाडूत राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या हिंदी परीक्षा पारित केलेल्याची संख्या बी. ए.च्या संख्येइतकी आहे असे दिसून आले होते. म्हणजे खुद्द तमिळनाडूत इंग्रजी जाणणाऱ्यांची संख्या हिंदी जाणणाऱ्यांच्या संख्येपेक्षा कमी नव्हती. हे सर्व हिंदीचा अभ्यास न केल्याने उपाशी मरण्याची पाळी येत नसतानाच्या काळात झाले. खुद्द मद्रास शहरात ''तमिळ सिनेमापेक्षा हिंदी सिनेमे जास्त चालतात'' अशी ओरड ऐकू येते व सरकारला तमिळ सिनेमे दाखविलेच पाहिजेत म्हणून नियम करावे लागतात. इंग्रजीचा तमिळशी काही संबंध नाही. तमिळची वाक्यरचना व व्याकरण हिंदीसारखेच आहे हे काशीराम शर्मा यांनी ''द्रविड परिवारकी भाषा हिंदी'' या आपल्या पुस्तकात दाखवून दिले आहे. हिंदीविरुद्धच्या चळवळी या मिशनरीप्रेरित चळवळी होत्या. नेहरूंनी आपले वजन हिंदीच्या बाजूने घातले असते तर संविधानाची अंमलबजावणी करणे काहीच कठिण नव्हते.

हिंदीच्या कलमाला सुरवातीपासूनच नेहरूंचा विरोध होता, तमिळांचा वा मुसलमानांचा नव्हे. सुरवातीला हिंदीचा वापर लगेच सुरू व्हावा अशी सूचना होती. पण नेहरूंनी याला पंधरा वर्षे वेळ देण्यात यावा अशी दुरुस्ती करवून घेतली असे गोपाल यांनी स्पष्टच सांगितले आहे. असा पंधरा वर्षे वेळ देण्याची मुळीच जरूर नव्हती हे रविशंकर शुक्लांनी पहिल्या वर्षातच तत्कालीन मध्यप्रदेशात सर्रास मराठी व हिंदीचा वापर सुरू केला होता यावरून स्पष्ट आहे. एक वर्षाची मुदत संपल्यावर त्यांच्याकडे ज्या इंग्रजी फायली गेल्या त्या त्यांनी, ''मी यापुढे इंग्रजी फायली वाचणार नाही'' म्हणून परत केल्या. नेहरूंनी पुढे रविशंकर शुक्लांना डच्चू दिला त्याचे हे एक कारण आहे.

१९६१ साली नेहरूंनी उघडपणेच ''इंग्रजीच्या शिक्षणाचा जास्त प्रचार झाला पाहिजे व शिक्षणाचे माध्यम सर्वत्र इंग्रजीच असले पाहिजे'' असा काँग्रेसमध्ये ठराव आणला. हिंदी ''लादण्यात'' येऊ नये व प्रादेशिक भाषा वापरल्याने प्रादेशिकता फोफावेल असा नेहरूंचा युक्तिवाद होता. इंग्रजीच्या प्रेमाने पारतंत्र्यपूजा फोफावेल याची त्यांना फिकिर वाटली नाही. राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी इंग्रजांनाच परत



बोलवावे असा ठराव नेहरूंनी मांडला नाही. कारण इंग्रज परत आल्याने त्यांना स्वतःचे सिंहासन खाली करावे लागले असते. ते स्वतःला इंग्रज समजत असले तरी जगात दुसरे सगळे त्यांना ''गोबरसंस्कृतीचेच'' समजत असत.

यात नेहरूपेक्षाही भारतातील बुद्धिमंतांचा दोष जास्त आहे. ''राष्ट्रीय एकात्मतेसाठी इंग्रजी'' अशा सारख्या शब्दप्रयोगात इंग्रजीची राष्ट्रीयत्वाशी घातलेली सांगड पाहून त्यांना उद्वेग वाटणे तर सोडाच त्यांनी आपलाही सूर नेहरूंच्या सुरात मिसळला.

नेहरू हिंदीच्या विरुद्ध नसून क्लिष्ट हिंदीच्या विरुद्ध होते. त्यांना सोपी हिंदी पाहिजे होती असे म्हटले जाते. नेहरूंच्या मते सोपी हिंदी म्हणजे रोमन हिंदुस्तानी. रोमन हिंदुस्तानी ही भाषा इंग्रजांनी सैन्यातील शिपायासाठी काढली. शिपायी निरक्षर वर्गातूनच बहुधा येत. पण त्यांना एकदा नोकरीत घेतल्यावर लष्करी शिक्षण द्यावे लागते. शिक्षण कोणत्यातरी भाषेतच द्यावे लागते.

## रोमन हिंदुस्तानी

ही भाषा साहजिकच हिंदी असायला पाहिजे होती. पण शिपायांना हिंदी शिकविण्यात इंग्रजांना असा धोका वाटला की हिंदी शिकलेले जवान केवळ आपल्या नोकरीतील शिक्षणाच्या पुस्तिकाच फक्त वाचणार नाहीत. ते हिंदीचे वाङ्मयही वाचतील व हिंदीचे वाङ्मय वाचणारे शिपायी केवळ मायबाप सरकारचे निष्ठावंत सेवक न राहता त्यांच्या मनात भारतीय राष्ट्रवादाचे वारे खेळू लागतील. त्यामुळे त्यांनी रोमन लिपीचा वापर केला. रोमन लिपीत भारतातील कोणत्याही भाषेचे वाङ्मय नसल्यामुळे रोमन शिकलेले जवान तीतून कोणतीही भारतीय भाषा वाचण्याचा संभव नव्हता. त्यांचे शिक्षण त्यांच्या कामाचे स्वरूप समजाविणाऱ्या पुस्तिका व सरकारी आज्ञापत्रे समजणे एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले.

रोमन हिंदुस्तानीची शब्दावली पुष्कळशी इंग्रजी आहे. कारण सैन्यात वापरले जाणारे सगळे इंग्रजी शब्द त्यात समाविष्ट आहेत व उरलेले शब्द सैन्यात काम करणाऱ्या मुसलमानात प्रचलित असलेल्या उर्दू शब्दांनी भरलेली आहे. ज्यांचे भाषेचे शिक्षण रोमन हिंदुस्तानी पुरतेच मर्यादित आहे, त्यांना उर्दूचे वाङ्मय समजणे देखील शक्य नव्हते. कारण रोमन हिंदुस्तानीतले उर्दू शब्द फक्त सैनिकांत वापरल्या जाणाऱ्या शब्दापुरते मर्यादित होते. ही भाषा शिकणाऱ्यांना संस्कृत शब्द समजणे तर त्याहून कठिण. कारण ब्रिटिशांच्या सैन्याचा संस्कृत व हिंदी यावर बहिष्कारच होता. नेहरूंना

अभिप्रेत असणारे ''सोपे हिंदी'' ते हे. हे हिंदी सैन्यात नोकरी करणारे जवान व जेथले गिऱ्हाईक अभारतीय आहेत अशा होटेलातून वेटरी करणारे यांच्या जीवनास पुरेसे असले तरी त्यात कोणतेही वाङ्मय लिहिणे शक्य नव्हते. या भाषेत स्वातंत्र्य, राष्ट्र वगैरे अर्थाचे शब्द देखील नाहीत.

नेहरूंनी एकदा स्पष्टपणेच रोमन हिंदुस्तानी सैन्याव्यतिरिक्त इतरत्रही वापरण्याचा प्रयत्न व्हावा असे लोकसभेत सुचविले होते. त्यांनी एकदा स्वतःच्या घरच्या कार्यासाठी गांधींना रोमन लिपीत लिहिलेले आमंत्रण पाठविले. गांधींनी त्याबद्दल त्यांची खरड काढली होती.

सुभाषचंद्र बोस देखील रोमन लिपीचे पुरस्कर्ते होते पण ते देशी भाषांच्या उच्चाटनाचे पुरस्कर्ते नव्हते. त्यामुळे नेहरूंच्या रोमन लिपीच्या प्रेमाला दुष्ट हेतुं चिकटविण्याचे कारण नाही हे म्हणणे बरोबर नाही. सुभाष बोस असे म्हणाले तेव्हा ते स्वतंत्र भारताचे पंतप्रधान नव्हते व हिंदीभाषेप्रमाणेच नागरी लिपीलाही मुसलमानांचा विरोध होण्याचा संभव आहे म्हणून एक राजकीय तडजोड या रूपाने त्यांनी रोमनची शिफारस केली. सुभाषचंद्र बोसांनी देखील रोमन नागरीपेक्षा श्रेष्ठ आहे याचे कोणतेच प्रमाण दिले नव्हते. पुढे त्यांनी ''आझाद हिंद'' फौजेत रोमन भाषेतील हिंदी वापरली त्याचेही कारण सैन्यात रोमन हिंदुस्तानीचा वापर आधीच सुरू होता व इंग्रजीचा तत्काल त्याग केल्याबरोबर त्याबद्दल सुरू असणारी भाषाच वापरणे व्यवहार्य होते. आझाद हिंद फौजेत इंग्रजी अजीबात वापरली जात नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे.

वस्तुतः रोमनलिपी नागरीपेक्षा कोणत्याच बाबतीत श्रेष्ठ नाही. ती छपाईसाठी जास्त सोयीची आहे असा एक ग्रह प्रचलित आहे. पण त्याला वस्तुस्थितीचा काहीच आधार नाही. केंद्रीय शिक्षा मंत्रालयाने नागरी व रोमन टंकलेखनावर संशोधन करून आपले निष्कर्ष साऱ्या कार्यालयात पाठविले होते. त्यात नागरीत जो शब्द टंकित करायला सरासरी ४ आघात करावे लागतात तोच रोमनमध्ये करायला ६ आघात करावे लागतात हे दाखवून दिले होते. आघातांच्या संख्येवरच टंकनाची गती अवलंबून असते. आजकाल छपाई संगणकावर टंकित करूनच केली जात असल्यामुळे टंकनावर आधारलेली तथ्ये छपाईला जशीच्या तशी लागू होतात.

रोमन टंकनास जास्त सोयीची आहे हा भ्रम व्यावसायिक टंककर्मींत देखील आढळतो. रोमन टंकनाचा महत्तम वेग नागरीपेक्षा पुष्कळ अधिक आहे हा यासाठी पुरावा म्हणून मांडण्यात येतो. रोमन टंककाचा वेग फक्त रोमन टाइप करण्याऱ्यांच्या टंकनावर आधारलेला असतो. उलट नागरी टंकन करणारे फक्त नागरीचेच टंकन करीत



नाहीत. ते दोन्ही लिपीचे टंकन करीत असतात. एकाच लिपीत सदैव टंकन करणाऱ्यांना त्या लिपीत अधिक कौशल्य संपादन करता येईल हे स्पष्ट आहे.

अचूकतेच्या बाबतीत रोमन नागरीच्या जवळपास देखील येऊ शकत नाही.

## चीनी लिपीचे महत्त्व

दुसरे असे की, रोमनचा महत्तम वेग जगभरातील टंककाच्या कामावर आधारलेला असतो. उलट नागरी फक्त भारतातच टंकित केली जाते. त्यामुळे तिच्या टंककाचा वेग फक्त भारतातील आकड्यावरच आधारलेला असतो. जगातील सर्वोच्चता व केवळ भारतातील सर्वोच्चता यात जगातली सर्वोच्चता जास्त असणार हे उघड आहे.

वस्तुतः रोमनचा आग्रह धरण्यात बहुतेकांचा उद्देश देशी भाषांना अधिक कार्यक्षम लिपी मिळवून देणे हा नाहीच. रोमन लिपीचा वापर सुरू केल्यावर मुद्दाम नागरीचा अभ्यास करून नागरीत उपलब्ध असलेले वाङ्मय वाचण्याचा आटापिटा फारसा कोणी करणार नाही व ते आपोआपच लुप्त होईल. असे ते लुप्त व्हावे असाच रोमनच्या पुरस्काराच्या मागे हेतू असतो.

रोमनचे समर्थक आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ केमाल पाशाचे नाव घेतात. पण रोमन वापरण्यात केमाल पाशाचा एक हेतू तुर्की भाषेचे उपलब्ध वाङ्मय वाचनातून बाद व्हावे व नवीन वाङ्मयातून तुर्कस्थान हा युरोपीय देश आहे असे युरोपला वाटावे असे संस्कार तुर्कांवर घडविता यावेत हा होता. केमाल पाशाला आपल्या जुन्या संस्कृतीची लाज वाटत होती हे त्याने फेजला बंदी घालून हॅटची प्रथा बलपूर्वक चालू केली यावरून उघड आहे. जे तुर्की शब्द रोमनमध्ये लिहिता येत नव्हते ते शब्दच त्याने तुर्कीतून बाद केले.

केमाल पाशा हा आधुनिक तुर्की राष्ट्राचा निर्माता होता असे म्हणतात. पण केमाल पाशामुळे जग ज्याला प्रगती म्हणते त्या तऱ्हेची कोणती प्रगती तुर्कस्थानमध्ये झाली? समृद्धी, सामर्थ्य, ज्ञानविज्ञान व कलाकौशल्य हे साऱ्या जगाने प्रगतीचे मानदंड मानले आहेत. रोमनलिपी व हॅट यामुळे तुर्कस्थानचे या क्षेत्रात कोणते भले झाले?

मिशनरी हे रोमनचे कट्टे पुरस्कर्ते आहेत याचे कारण आता स्पष्ट होईल. हिंदूंच्या भाषा व त्यातील वाङ्मय त्यांना आपल्या भूतकाळाशी घट्ट बांधून ठेवणारे आहे आणि मिशनऱ्यांना तर हेच सनातन बंध तोडायचे आहेत. या भाषा निष्प्रभ करायचा एक मार्ग त्यांची जागा शक्य तितकी इंग्रजीला देणे. त्यांच्या भाषेची लिपीच रोमन केली की त्यांचे

उपलब्ध वाङ्मय आपोआपच प्रचारातून जाईल.

मिशनऱ्यांचे हेतू व नेहरूंचे हेतू एकच होते.

चीननेही हल्ली रोमन लिपीचा स्वीकार केला आहे असे सांगण्यात येते. हे खरे नाही. चीनी लिपीचे उच्चार शिकविण्यासाठी चीनमध्ये रोमनचा उपयोग केला जातो. चीनी पुस्तके रोमनमध्ये छापलेली नसतात. आपल्या सरकारांनी नागरीचा सर्रास उपयोग केला असता तर आज चीनने उच्चार शिकविण्याच्या कामासाठी रोमनचा उपयोग न करता नागरीचाच उपयोग केला असता. कारण उच्चाराच्या अचूकतेबद्दल रोमनच्या तुलनेत नागरीचे श्रेष्ठत्व वादातीत आहे.

चीनी लिपीच्या अक्षमतेबद्दल बऱ्याच गैरसमजुती भारतात प्रचलित आहेत. हुमायून कबीर एकदा लोकसभेत म्हणाले की, "जपान वापरत असलेली लिपी रोमनच्या तुलनेने अक्षम आहे म्हणून जपानचा अमेरिकेने पराभव केला." अशा तऱ्हेची निर्बुद्ध विधाने लोकसभेच्या पीठावरून शिक्षामंत्र्यासारखे जबाबदार लोक करतात हे आंग्लशिक्षितांच्या चिकित्साबुद्धीचा स्तर किती निम्न आहे याचे द्योतक आहे. चीन, जपान व कोरिया या देशांची लिपी एकच आहे. ही लिपी वाचता येण्यास कमीत कमी ३००० चिन्हे शिकावी लागतात हा तिचा दोष सांगण्यात येतो. पण हा दोष नाही. ही तीन हजार चिन्हे ध्वनींची द्योतके नसून शब्दांची द्योतके आहेत. चीन, जपान व कोरिया या देशांच्या भाषेतील शब्द वेगळे असले तरी ते याच चिन्हांनी व्यक्तविले जातात. त्यामुळे जपानी लोक या लिपीत लिहिलेले चीनी पुस्तक चीनी न येताही वाचू शकतात. पण ते हे पुस्तक चीनी भाषेत न वाचता जपानी भाषेत वाचतात. म्हणजे कोरिया, चीन व जपान यांना भाषांतर न करताही एकमेकाचे समग्र वाङ्मय स्वतःच्याच भाषेत उपलब्ध आहे.

गणिताचे उदाहरण दिल्याने ही गोष्ट स्पष्ट होईल. / या चिन्हाचा अर्थ गणितात भागाकार असा आहे. पण हे चिन्ह इंग्रजीत *upon* हिंदीत बटा व मराठीत अंश (तीन चतुर्थांश वगैरे शब्दप्रयोगात) असे वाचले जाते. √ हे चिन्ह इंग्रजीत स्केअर रूट आणि मराठी व संस्कृत यात वर्गमूल असे वाचले जाते. = हे चिन्ह इंग्रजीत ईक्वल टू, मराठी बरोबर, संस्कृतमध्ये सम व हिंदीत बराबर असे वाचतात.

## श्रीमालींना डच्चू व छागलांची स्थापना

गणित वाचण्यासाठी जसे जगातील कोणत्याही देशातील लोकांना ते आपल्या भाषेत लिहावे लागत नाही तसेच जपानी कोरियन व चीनी यांना परस्पराचे ग्रंथ



वाचायला भाषांतराची आवश्यकता नाही. याचे कारण √ = व / ही चिन्हे कोणत्याही ध्वनीची द्योतक नाहीत ती वर्गमूल समता व भागाकार व कल्पनांची द्योतके आहेत. तशीच चीनी लिपीची चिन्हे ध्वनींची द्योतक नसून अर्थाची द्योतक आहेत.

यावरून असे स्पष्ट दिसते की, चीनी लिपीतले पुस्तक, मग ते चीनी भाषेतले असो, कोरियन भाषेतले असो वा जपानी भाषेतले असो ते आपल्याला मराठीत वाचता येईल. केवळ तीन हजार चिन्हे शिकल्यामुळे आपल्याला चीनी, कोरियन व जपानी या देशांचे समग्र वाङ्मय उपलब्ध होऊ शकते. हे वाङ्मय इंग्रजीपेक्षा शतपट अधिक समृद्ध आहे. इंग्रजी भाषा शिकण्यात वेळेचा व पैशाचा अपव्यय करण्यापेक्षा भारत चीनी लिपी नुसती शिकला असता तर त्याची ज्ञानात अधिक प्रगती झाली असती कारण त्याला जपान, चीन व कोरिया या तीन देशांचे सर्व क्षेत्रातील समृद्ध वाङ्मय भाषांतराशिवाय वाचता आले असते. चीनी लिपी ही केवळ एक अडचण आहे ही कल्पना किती हानिकारक आहे हे यावरून स्पष्ट होईल.

असे असता कबीर व छागला या सारख्या नेहरूंच्या शिक्षामंत्र्यांनी रोमनची स्तोत्रे गायिली. इंग्रजीच्या दास्यामुळे इंग्रजीबाहेरील जगाबद्दल भारतात किती घोर अज्ञान निर्माण झाले आहे हे यावरून स्पष्ट होईल.

नेहरूंचे श्रीमाली नावाचे एक शिक्षामंत्री होते. मंत्रिपद धारण केल्यावर त्यांनी "मी आपल्या कार्यकालात साऱ्या देशात देशीभाषाचे माध्यम सर्व स्तरावर सुरू करीन" असे जाहीर केले. बिचारे श्रीमाली! त्यांना एवढेही कळले नाही की देशी भाषांना साऱ्या ज्ञानाचे माध्यम बनविणे तर दूरच त्यांचे अस्तित्वही नेहरूंना बोचत होते. श्रीमालीना लवकरच डच्चू देण्यात आला व त्यांची जागा छागलांना देण्यात आली. छागलांनी आल्याबरोबर इंग्रजीवाचून आपण अनाथ होऊ म्हणून टाहो फोडण्यास सुरूवात केली.

"नेहरूंनी रोमन लिपी, कॉन्व्हेंट शिक्षण व देशी भाषांचे उच्चाटन या उद्देशांचा प्रचार कधीच केला नाही. मग त्यांच्यावर या हेतूंचा आरोप का करावा?" असे विचारणाऱ्यांनी वरील सारख्या नेहरूंच्या कृत्यांचा विचार करावा.

दूरभाषनिदेशिका भारतीय भाषांत नावांची आद्याक्षरे लिहिण्यास नकार देतात. मी आपले नाव या निदेशिकात नी. र. वऱ्हाडपांडे असे नोंदवू शकत नाही. नागरीत देखील मी एन. आर. वऱ्हाडपांडे असेच नोंदवावे अशी सक्ती आहे. भाजीवाल्यांना देखील एक, दोन, तीन माहीत नाही. ते वन, टू, थ्रीतच आपल्या किमती सांगणार! ज्या देशाने जगाला संख्या शिकविल्या त्याला आपल्याच देशात इंग्रजीतून संख्या लिहाव्या

लागतात. ज्या देशात रोमनच्या हजारो वर्षे आधी लिपीचा शोध लागला त्याला रोमन लिपीशिवाय आपण अनाथ होऊ असे वाटू लागले. या आत्मविस्मृतीला म्हणावे स्वराज्य!

नेहरू सोपी भाषा हा शब्दप्रयोग शब्दांच्या संबंधाने वापरीत. सोपे शब्द कशाला म्हणायचे? सोपे यांचा सर्वात सार्वत्रिक अर्थ परिचित असा आहे. परिचितपणा हा शब्दांचा गुणधर्म नाही. तसे असते तर जर्मनांच्या दृष्टीने सारे इंग्रजी शब्द कठिण व इंग्रजांच्या दृष्टीने सारे जर्मन शब्द कठिण ठरतील.

परिचित या अर्थी संस्कृत शब्दापेक्षा उर्दू शब्द जास्त सोपे आहेत ही नेहरूंची एक लोणकढी थाप होती. भारतातल्या साऱ्या प्रमुख भाषांत ३० ते ४० टक्के शब्द संस्कृत आहेत. पंजाब, काश्मीर वगैरे प्रांतात पंजाबी व काश्मीरी भाषांना शिक्षणात काही स्थानच नव्हते. प्राथमिक शिक्षणाची भाषा उर्दूच होती. त्यामुळे उर्दू शब्दांचा जास्त प्रचार होता. पण स्वराज्यानंतर १० वर्षातच या भागात उर्दू लुप्त होण्याच्या मार्गाला लागली. दिल्लीसारख्या ठिकाणी उर्दूत लिहिलेला पत्ता वाचायला उर्दू जाणणाऱ्याचा शोध घ्यावा लागत असे. नेहरू प्रामाणिक असते तर एवढ्यावरून त्यांना ''उर्दूला जनतेत काहीच बूढ नाही, केवळ राज्यकर्त्यांच्या आग्रहावर तिचे अस्तित्व अवलबून आहे'' हे कळायला पाहिजे होते. पण झोपलेल्याला उठविता येते. झोपेचे सोंग घेणाऱ्याला उठविता येत नाही. नेहरूंनी योग्य तो बोध घेण्याऐवजी ''उर्दू बचाव!'' म्हणून नारा दिला. नभोवाणीवर उर्दू बातम्या सुरू केल्या. हिंदीचा वापर करणे हा मुस्लिमांवर जुलूम आहे म्हणून आरडाओरडा केला. अशी ओरड मुसलमानांनी सुरू केली नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे.

## संविधानाच्या भ्रूणहत्येचे कारस्थान

पण याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. खुद्द नेहरूंची कन्या संस्कृतमय हिंदी बोलत असे. आज लोकसभेत होणारे कोणतेही भाषण नेहरूंच्या ''सोप्या'' भाषेत होत नाही. ''जातीय'' वाजपेयी व सुषमा स्वराज यांच्याप्रमाणेच ''सेक्युलर'' चंद्रशेखर व वि. प्र. सिंग देखील संस्कृतनिष्ठ ''कठिण'' हिंदीच बोलतात.

हिंदीला मारण्यासाठी नेहरूंना कोणतीही काठी चालत असे. नेहरूंचे उर्दू भाषेवर प्रेम होते असे म्हटले जाते. पण हे प्रेम फक्त हिंदीला शिव्या देतानाच व्यक्त होत असे. त्यांना उर्दूचे प्रेम असते तर हैदराबाद संस्थानात राज्यकारभार व सारे शिक्षण उर्दूतून होत होते. तो आधार घेऊन निदान हिंदी भाषी प्रांतात हैदराबादमधीलच उर्दूत म्हणजे



''सोप्या'' हिंदीत सारे व्यवहार करण्याची बुद्धी त्यांना झाली असती. पण पोलिस कारवाईनंतर त्यांनी ते टाकाच्या एका फटक्यासरसे बंद केले व इंग्रजी सुरू केले. नेहरूंना फक्त इंग्रजीचे प्रेम होते. उर्दू धरून सर्वच देशी भाषांचा ते द्वेष करीत होते.

''नेहरूंनी संविधानाचे भाषाविषयक कलम निष्प्रभ करण्याचा निर्णय ते पारित झाले तेव्हाच घेतला होता'' असा आरोप डॉ. रघुवीर यांनी उघडपणे केला होता. हे कलम पारित झाले तेव्हा सभागृहाच्या दीर्घेमध्ये डॉ. रघुवीर, नेहरू, आझाद वगैरे मंडळी वार्तालाप करीत असताना मौ. आझाद, डॉ. रघुवीर यांना नेहरूंच्या समक्षच म्हणाले.

''आपने हिंदी पास तो कर ली लेकिन अमल करनेवाले तो हम है आप नहीं.''

म्हणजे राजभाषा हिंदी या बालकाने पहिला स्वर कंठातून काढला तेव्हाच त्याचे नरडे घोटण्याचे कारस्थान त्याच सूतिकागृहात रचले जात होते.

याचा प्रत्यय मलाही आला. १९५० साली मी दिल्ली येथे नोकरीवर रुजू झालो. माझा मुलगा तेव्हा शाळेत जाण्याच्या वयाचा झाला होता. त्याला दिल्लीच्या नूतन मराठी शाळेत घालून मी कार्यालयात आलो व आपल्या सहकाऱ्यांना ती गोष्ट सांगितली तेव्हा ते म्हणाले-

''नूतन मराठी? म्हणजे ती गावठी मुलांची शाळा?'' मला हे ऐकून धक्काच बसला. मी विचारले.

''माझा मुलगा गावठी आहे. मग तुमचा राजबिंडा कोणत्या शाळेत जातो?'' त्यांनी एका कॉन्व्हेंटचे नाव घेतले.

मी म्हटले.

''आता स्वराज्य झाले आहे. अजून मोराची पिसे खोवून आपण मोर आहोत अशी बतावणी करण्याची हौस कशाला? संविधानाने १५ वर्षात केंद्रातून इंग्रजीचे उच्चाटन करण्याचा निर्णय घेतला आहे. भाषावार प्रांत करण्याचाही निर्णय झाला आहे. माझा मुलगा कॉलेजात जायच्या वेळी साऱ्या भारतातून इंग्रजीचे उच्चाटन झालेले असेल. मग स्वभाषा व स्वसंस्कृती यांना पारखे झालेल्या तुमच्या मुलांची काय गती होईल?''

माझे भाषण ऐकून सर्वच हसायला लागले. त्यांनी मला सांगितले.

''तुम्ही फार भाबडे आहात. संविधान लिहिण्यासाठी आहे. अमलात आणण्यासाठी नाही.''

संविधानाच्या भवितव्याबद्दल माझ्या दर्जाचे अधिकारी देखील इतक्या

विश्वासाने बोलत होते. यावरून ते अमलात आणले जाणार नाही याबद्दल त्यांना स्पष्टपणे खुणविण्यात आले होते हे उघड आहे. मी १९४९ सालाच्या शेवटी भारतात आलो. १९५० च्या स्वातंत्र्यदिनी संविधान लागू झाले. त्याच्या एखादे वर्ष आधी ते पारित झाले होते. म्हणजे ते पारित होण्याच्या पूर्वीपासूनच नेहरूंनी संविधानाची भ्रूणहत्या करण्याचा आपला निर्णय केवळ राजकीय मंचावरूनच नव्हे तर सरकारी मंचावरून देखील स्पष्टपणे जाहीर केला होता असे म्हणण्यास हरकत नाही.

मला याचा लवकरच प्रत्यय आला. माझ्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना पटोडी हाऊसमध्ये राहण्यास जागा देण्यात आली होती. माझा मुलगा त्यांच्याबरोबर खेळायला जात असे. माझा मुलगा सोडून कोणीच मातृभाषेत बोलत नसे. ''इंग्रजी बोला नाहीतर मित्रमंडळाला मुका'' अशा पेचात सापडल्यावर चार सहा महिन्यात माझा मुलगाही इंग्रजी बोलू लागला. नेहरूंनी अवघ्या सतरा वर्षाच्या कारकीर्दीत मातृभाषेपासून पूर्णपणे तोडल्या गेलेल्या पिढ्या निर्माण करण्याची करामत कशी केली हे यावरून स्पष्ट व्हावे.

## नखे नरड्यावर खुपसू लागली

भारतातल्या एका सुशिक्षितांच्या वसाहतीत कोणीही देशीभाषा बोलत नाही असे दृश्य इंग्रजांच्या वेळीही मी कधी पाहिले नव्हते. नेहरूप्रणीत स्वराज्याचा प्रारंभ हा असा होता. तो पाहून भारताच्या भवितव्याबद्दल मी निराश झालो व ही निराशा जी वाढत गेली ती कमी होण्याचे आजतागायत चिन्ह नाही.

माझा मुलगा मराठी माध्यमात शिकत होता तरी लवकरच माझ्या लक्षात आले की त्याला एक दोन तीन म्हणता येत नाही. वन टू थ्री शिवाय त्याला आकडे येत नाहीत. चौकशी करता ''मराठी माध्यमात देखील गणित इंग्रजीतूनच शिकविले पाहिजे कारण इंग्रजीशिवाय गणित येऊ शकत नाही'' असा सरकारी आदेश आहे असे कळले. या आदेशाला संविधानाचा आधार आहे असे सांगण्यात आले. संविधान उघडून पाहिले त्यात १, २, ३ हे आकडे लिहिण्याची इंग्रजी पद्धत-ज्याला संविधानात आंतरराष्ट्रीय पद्धत म्हटले आहे - ती अंगीकारावी असे लिहिले आहे, हे आकडे एक दोन तीन असे न वाचता वन टू थ्री असे वाचावे असे लिहिलेले नाही. पण भारताचे संविधान याचा अर्थ नेहरूंचा शब्द असा होता व संख्यांना एक, दोन, तीन अशी नावे देणे हे ''गोबर संस्कृतीचे'' लक्षण आहे. वन टू थ्री म्हटल्याशिवाय गणित येणार नाही असा नेहरूंचा सिद्धांत होता. आमची पाळेमुळेच खणून काढणे हा उद्देश यात स्पष्ट होतो.



नेहरू आपल्या राष्ट्रभंजनाच्या कार्यात इतके सफल झाले की ते उघडपणेच संविधानावर टीका करू लागले. संविधानाला १५ वर्षे पूर्ण होण्याच्या आधी त्यांनी भाषेसंबंधीचे कलम १९६५ नंतर देखील इंग्रजीचा वापर सहकारी भाषा म्हणून करता येईल असे दुरुस्त केले. फक्त इंग्रजीचाच वापर करता येईल, देशी भाषांना मज्जाव राहील असे हे कलम सांगत नाही. पण देशी भाषांचे उच्चाटन करण्याची मनोवृत्ती इतकी सार्वत्रिक झाली आहे की भारतात भारतीय भाषांना स्थान असूच नये असे साऱ्यांनी गृहीत धरले. आज परिस्थिती अशी आहे की न्यायालये देखील सहकारी भाषा याचा अर्थ एकमात्र भाषा असाच करतील व या अर्थाला १९६५ पासूनची परंपरा हा आधार देतील असे मला एका निवृत्त न्यायमूर्तींनी सांगितले. मागासलेले वर्ग म्हणजे मागासलेल्या जाती असा न्यायालयांनी अर्थ केलाच आहे.

''अशी दुरुस्ती करण्याचा निर्णय मी बराच पूर्वी घेतला होता'' असे नेहरूंनी स्पष्टच सांगितले. देशी भाषा हद्दपार करण्याच्या कार्यक्रमाचे नेहरू हेच प्रवर्तक होते. दक्षिण भारतीय या मुसलमान यांचा तथाकथित हिंदीविरोध हे कारण नव्हते.

नेहरूंनी आपल्या इंग्रजीभक्तीला बरेच दिवस वाचा फोडली नव्हती. १९४८ साली मी लंडनमधील इंडिया हाऊसमध्ये नेहरूंचे भाषण ऐकले. तेव्हा कार्यक्रमाचा आरंभ इंग्रजीतून केल्याबद्दल त्यांनी आयोजकांना दोष दिला व स्वत: चार शब्द हिंदीतून बोलून सुरुवात केली. लगेच त्यांनी बाकीचे भाषण इंग्रजीतूनच केले.

याचे कारण स्पष्ट आहे. इंग्रजीचाच वापर भारताची भाषा म्हणून करावा हे त्यावेळी कोणत्याच काँग्रेस पुढाऱ्याला मान्य नव्हते. सरदार पटेलांचे काँग्रेसमध्ये बहुमत होते व लवकरच नेहरूंचा विरोध असताही पटेलांनी पुरस्कृत केलेले टंडनच अध्यक्ष म्हणून निवडून आले, यावरून हे सिद्ध झाले होते. टंडन हिंदीचे खंदे पुरस्कर्ते होते. १९५० साली सरदार वारले व नेहरूंनी आपली नखे बाहेर काढण्यास सुरुवात केली. त्यांनी काँग्रेसमध्ये स्वत:चे बहुमत स्थापन केले व टंडन यांना त्यागपत्र देण्यास भाग पाडले.

इंग्रजीचे पूर्ण उच्चाटन करणे लगेच शक्य नसले तरी लगेच करता येण्यासारख्या अनेक गोष्टी होत्या. उदाहरणार्थ केंद्र सरकारच्या नोकऱ्यासाठी होणाऱ्या परीक्षा हिंदी माध्यमातून घेणे, जे इंग्रजी माध्यमातून परीक्षा देतात त्यांना हिंदी ही भाषा आवश्यक करणे, सुरुवातीला हिंदीत उत्तीर्ण होण्याचीच फक्त अट ठेवून हिंदीचे अंक गुणक्रम ठरविण्यास न वापरण्याची काळजी घेतली तर दक्षिण भारतातील विद्यार्थ्यांना उत्तर भारतातील विद्यार्थ्यांशी हिंदीतून स्पर्धा करण्याची अडचण वाटण्याचे कारण नाही.

हिंदीचा सुरुवातीला वैकल्पिक माध्यम म्हणून व नंतर एकमात्र माध्यम म्हणून उपयोग करणे काहीच कठिण नव्हते.

## पहिला बळी संस्कृत

हिंदीचा वापर केल्यामुळे दक्षिण भारतीयावर अन्याय होईल असा युक्तिवाद नेहरूंच्या प्रचारामुळे सार्वत्रिक झाला. संविधानसभेत असा युक्तिवाद कोणी केला नव्हता.

तमिळनाडू व बंगाल येथे इंग्रजीचा वापर निदान एक शतक आधी सुरू झाल्यामुळे दक्षिण भारतीय व बंगाली यांना फायदा मिळतो हे इतर भारतीयांना अन्यायकारक आहे असा युक्तिवाद इंग्रजीच्या विरुद्ध सहज करता येईल. इंग्रजीमधील नैपुण्यात बंगाल व तमिळनाडू येथील लोक इतर भारतीयांच्या पुढे आहेत हे नाकबूल करता येणार नाही.

हिंदी वापरल्यामुळे काही प्रांतातील विद्यार्थ्यांचे निवडीचे प्रमाण पूर्वीपेक्षा घटते काय याची सांख्यिकीच्या दृष्टीने तपासणी करता आली असती व हे प्रमाण पूर्वीपेक्षा सांख्यिकीच्या भाषेत वस्तुगत्या (significantly) घटले काय याचा निर्णय करता आला असता. असे खरोखर झाले तर त्यावर सांख्यिकीय वा अन्य उपाय करणे सहज शक्य होते. राज्यकारभारात वापरल्या जाणाऱ्या सर्व भाषा केंद्र सरकारच्या परीक्षात वापरण्याची सूचना मुरारजी सरकारच्या वेळी स्वीकारण्यात आली होती. पण या व्यवस्थेतही परीक्षक आपल्या प्रांताच्या विद्यार्थ्यांच्या तर्फेने पक्षपात करतात काय हे तपासण्यासाठी सांख्यिकीचा उपयोग आवश्यकत होता. परीक्षकांना पक्षपातच करायचा असेल तर इंग्रजी माध्यम असले तरी करता येतो हे विद्यापीठाच्या परीक्षात दिसूनच येते. परीक्षकाला परीक्षार्थीचे नाव उत्तरपत्रिकेवर लिहिले नसताही कुणाची उत्तरपत्रिका आहे हे ओळखणे जड जात नाही.

संविधान लागू झाल्याची घोषणा झाली त्या दिवसापासूनच साऱ्या वर्तमानपत्रात इंग्रजीची स्तुतिस्तोत्रे व हिंदीची टवाळी प्राधान्याने प्रकाशित होऊ लागली. नुकताच संविधानाने इंग्रजीच्या उच्चाटनाचा आदेश दिला आहे हे कुणाच्या गावीही नव्हते असे दिसू लागले. शिक्षामंत्री असतानाच मौ. आझाद संस्कृत शब्दावलीची टवाळी करू लागले. संविधानाने संस्कृत शब्दावली वापरण्याचाच आदेश दिला आहे हे त्यांच्या ध्यानात आणून दिल्यावरही ते तसेच बोलत राहिले. इंग्रजीच्या केसालाही धक्का लागला नसताना हिंदीच्या आग्रहामुळे इंग्रजीचा स्तर घसरला आहे असा कांगावा करून त्यांनी



हा स्तर कायम ठेवण्यासाठी इंग्रजीची खास संस्था हैदराबाद येथे काढली. नेहरू स्वतःच The Constitution is not sacrosanct ''संविधान ही पावित्र्यमूर्ती नाही'' अशी घोषणा करते झाले, साऱ्या केंद्र कर्मचाऱ्यांनी हिंदी शिकावे नाहीतर त्यांना सुट्ट्या देण्यात येणार नाहीत असा आदेश होता. तो रद्द करण्यात आला.

नेहरूंचा आधुनिक देशी भाषापेक्षाही संस्कृतवर अधिक डूख होता. मी असे म्हणालो, तेव्हा प्रसिद्ध संस्कृतज्ञ मिराशी म्हणाले, ''हा तुमचा आरोप निराधार आहे, नेहरूंनी Discovery of India मध्ये संस्कृतचा गौरव केला आहे. मी यावर उत्तरलो, "Discovery of India चे नेहरू व पंतप्रधान नेहरू एक नाहीत. नेहरू कार्य करतात यावरून नेहरूंचे विचार समजून घ्या. ते गांधी युगात काय बोलले याने भुलून जाऊ नका.''

नेहरूंनी संस्कृतवर पुढील उपकार केले.

पुष्कळशा शाळांतून फारसे विद्यार्थी नाहीत या सबबीवर संस्कृत अजीबात बंदच करण्यात आले. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना संस्कृत घेताच येणार नाही अशा रीतीने ऐच्छिक विषयांचे विभाजन केले. संस्कृतच्या प्रसारासाठी कोणतीही योजना दिली तर तिच्याबरोबर अरबी व फारसी याच्या प्रसाराचीही योजना दिली पाहिजे असा आग्रह धरण्यात आला. नेहरूंची संस्कृतबद्दलची वृत्ती नरसिंहरावांच्या कारकीर्दीत जगजाहीरच झाली. ''सरकारवर संस्कृत शिकविण्याची जबाबदारी आहे अशी सरकारला समज द्यावी'' या अर्थाची एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. त्यावेळी सरकारी वकिलाने सांगितले की, ''संस्कृतचा प्रसार करण्याची सरकारवर जबाबदारी आहे असे मानल्यास आफ्रिकेतील झुलूच्या भाषेचाही प्रसार करण्याची जबाबदारी आहे असे मानावे लागेल.'' हे नेहरूंचे विचार नसून नरसिंहरावांचे विचार आहे असे कोणी म्हणू धजावेल असे वाटत नाही. कारण नेहरू अधिकारावर आल्यापासून संस्कृतला जी वागणूक मिळाली तिचे स्पष्ट प्रतिबिंब या उद्‌गारात पडले आहे. नेहरूंचे हे मत एखाद्या फायलीवर असण्याची देखील शक्यता आहे.

## ''माझे हिंदी तादजिकिस्तानात समजते''

पण तसे नसले तरी नेहरूंच्या व इंदिरा गांधींच्या सतत संपर्कात आलेल्या नरसिंहरावांना या बाबतीत नेहरूंचे काय धोरण होते हे माहीत नसण्याचा संभव नाही. नेहरूंच्या धोरणाच्या विरुद्ध जाण्याची त्यांची प्राज्ञा नव्हती. नेहरूंची धोरणे त्यांच्या नंतरही सुरू राहिली कारण प्रचाराच्या सर्व माध्यमातून नेहरूंचेच विचार त्यांच्या

मृत्यूनंरतही येत राहिले. माहिती व दूरसंपर्क खाते स्वायत्त झाले पण नेहरूंनी आपल्या विचाराशी मंडळी तेथे पेरली. ती व त्यांचे बौद्धिक वंशज यांच्याच ताब्यात दूरदर्शन व नभोवाणी आहेत. वाजपेयी सरकार आले तेव्हा देखील संपर्क माध्यमांच्या वापर करणाऱ्यांना देशात नेहरूवंशाचेच राज्य सुरू आहे असे वाटत होते. सुषमा स्वराज यांनी दूरवाणीच्या भाषेबद्दल काही करण्याचा प्रयत्न केला तेव्हा हे खाते स्वायत्त आहे म्हणून त्यांना बजावण्यात आले व केवळ एका कर्मचाऱ्याला काढण्यासाठी सरकारला अध्यादेश काढावा लागला. शिक्षणात सर्वत्र नेहरूंचे विचार शिकविले जातात. नेहरूंची सतरा वर्षे, इंदिरा गांधीची जवळ जवळ तेवढीच, राजीव गांधींची त्यात मिळवून जवळ जवळ अर्धा शतक नेहरूवंशाचेच राज्य होते. या अर्ध्या शतकात भारतात नेहरूवाद पूर्ण रूढ झाला आहे. तेव्हा संस्कृत बद्दल सरकारतर्फे सर्वोच्च न्यायालयात जे सांगण्यात आले ते नरसिंहरावांच्या पदरचे असण्याचा संभवच नाही.

नेहरूंच्या संस्कृतविरोधी प्रचाराची फळे स्पष्टच दिसतात. आज संस्कृत हा सत्ताधारी वर्गात व उच्चभ्रूमध्ये टवाळीचा विषय आहे. बोलताना संस्कृत सुभाषिते वापरणे पूर्वी प्रतिष्ठितपणाचे समजले जात होते. आता कोणी संस्कृत सुभाषित म्हटले तर ''ही कोणती भाषा आहे?'' असे विचारले जाते. पूर्वी कीर्तनकार सुरेल वाणीने संस्कृत सुभाषिते म्हणून रसाळ पद्धतीने त्यांचा अर्थ सांगत. त्यामुळे अशिक्षितात देखील संस्कृतची रुची होती. आता कीर्तनकारांनी देखील संस्कृतवर बहिष्कार घातला आहे व तेही इंग्रजी झाडल्याशिवाय आपले हरिभक्तीचा प्रचार करण्याचे कार्य पुरे होत नाही असे समजू लागले आहेत.

संस्कृतची जर ही स्थिती तर हिंदीचे काही विचारूच नका. ''हिंदी प्रांत सगळ्यात मागासले आहेत, हिंदी बोलायला गेले की जीभच मोडते, हिंदीचा वापर सरकारात व शिक्षणात व्हायच्या आधी तिला बरेच सुधारावे लागेल, हिंदीवाले दंड्याने हिंदीचा प्रचार करीत आहेत. हिंदीचे समर्थक संकुचित मनाचे (chauvinistic) आहेत.'' वगैरे नेहरूसूक्ति रोज वर्तमानपत्रात वाचायला मिळत.

काही लोकांचे म्हणणे असे की, नेहरूंचा विरोध हिंदीला नसून ''क्लिष्ट'' हिंदीला होता. हिंदी क्लिष्ट आहे असे म्हणणाऱ्या नेहरूंना डॉ. रघुवीर ''तुमचा व हिंदीचा कितपत परिचय आहे?'' हे विचारत असत. नेहरूंनी हिंदीचे एक तरी पुस्तक समग्र वाचले होते की नाही याची शंकाच आहे. तरी आपल्याला हिंदी समजत नाही हा हिंदीचा दोष आहे अशी बतावणी ते करीत. आपण फार सोपे हिंदी बोलतो अशी त्यांची समजूत होती. पण एकदा रशियातील हिंदीच्या अभ्यासकासमोर ते बोलले तेव्हा त्या



अभ्यासकांनी ''तुम्ही काय बोललात ते आम्हाला समजले नाही'' असे नेहरूंना सांगितले. असे कोणी भारतात म्हटले असते तर नेहरूंनी त्याला आपला बुध्द्यांक तपासून घेण्यास सांगितले असते. पण कम्युनिस्ट रशियातल्या ''पुरोगामी'' व ''आधुनिक'' लोकांसमोर असे बोलायची त्यांची छाती नव्हती. त्यांनी भारतात येऊनच ''हिंदीवाल्यांनी हिंदी क्लिष्ट केली आहे एवढेच नव्हे तर विदेशीयांनीही क्लिष्ट हिंदी हीच खरी हिंदी म्हणून त्यांची दिशाभूल केली आहे'' असा आरोप केला व याला प्रमाण म्हणून ''मी तादजिकिस्तानमध्ये हिंदीत भाषण केले ते तेथल्या लोकांना समजले असे सांगितले. तादजिकिस्तानच्या लोकांना समजते ती सोपी हिंदी, भारताच्या लोकांना ती समजत नसेल तर त्यांची लायकीच गोबरसंस्कृतीची आहे. त्यांना गोमांससंस्कृतीची उच्चता काय कळणार! आपल्याला हिंदी येत नसून आपण हिंदीबद्दल भरमसाट मते देतो याचे भान नेहरूंना नसेलच असे नाही. पण नावडतीचे मीठही अळणी असते. ते हिंदीचा द्वेषच करीत होते. ज्या कुत्र्याला गोळीच घालायची आहे त्याला आधी चार शिव्या हासडल्या तर आपण नाहक हिंसा केल्याची रूखरुख मनाला लागत नाही. शिव्या वस्तुस्थितीवर आधारलेल्या असाव्यात अशी अपेक्षाच नसते.

## हिंदीविरुद्ध मोहीम

चीनकडून मार खालल्यावर घरची म्हातारी जी हिंदी तिच्यावर पराक्रम गाजवून आपल्या मनाचे सांत्वन करण्यासाठी नभोवाणीवरील हिंदीवर धार धरण्यास नेहरू सरसावले. ही हिंदी कशी असली पाहिजे याबद्दल नभोवाणीच्या हिंदी कर्मचाऱ्यांना त्यांनी पाठ दिले. नभोवाणीच्या हिंदी तज्ज्ञांनी नेहरूंच्या सूचनाप्रमाणे हिंदी लिहिण्याचा प्रयत्न केला. असे हिंदी म्हणजे उर्दू आहे हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी हिंदीचे स्वरूप तसेच ठेवून उर्दूची स्वतंत्र प्रक्षेपणे सुरू केली. त्यावर नेहरू म्हणाले, ''मला उर्दूचे व हिंदीचे स्वतंत्र प्रक्षेपण नको आहे. मला ही दोन्ही प्रक्षेपणे थांबवून ''हिंदुस्तानीचे'' एकमात्र प्रक्षेपण पाहिजे आहे. तेव्हा नभोवाणीच्या हिंदीविदांनी सांगितले की, ''आम्ही करीत असलेले उर्दूचे प्रक्षेपण व हिंदुस्तानी यात काही फरक नाही. तेव्हा तेच चालू ठेवावे व एकच प्रक्षेपण ठेवायचे असेल तर हिंदीचे प्रक्षेपण अजीबात बंद करावे असा त्याचा अर्थ होतो.'' बिचारे नभोवाणीचे हिंदीवाले! नेहरूंना नेमके हेच हवे आहे हे काही त्यांना समजले नाही. किंवा समजले असले तरी ''हिंदी बंद करा'' असा स्पष्ट हुकूम त्यांना नेहरूंकडून हवा होता व असा स्पष्ट हुकूम देणे म्हणजे संविधानाला उपासमारीने न मारता त्यावर उघडपणेच कुऱ्हाड चालविण्यासारखे होते.

संविधानातील शब्दयोजना बघता न्यायालयात असा हुकूम टिकला नसता. म्हणून नेहरूंनी असा हुकूम काढला नाही.

मुसलमानांची भाषा उर्दू आहे असा धडधडीत खोटा प्रचार करून नेहरूंनी मुसलमानांना हिंदीच्याविरुद्ध भडकावले. प्रांताच्या मुख्य मंत्र्यांना वारंवार पत्रे लिहून त्यांनी आपल्या प्रांतात उर्दूचा प्रसार करण्यास भाग पाडले. जेथे मुसलमान बहुसंख्य असतील अशा भागात उर्दूचाच प्रादेशिक भाषा म्हणून वापर व्हावा असे फतवे काढले. जेथे मुस्लिम संख्या नगण्य आहे तेथे देखील दुय्यम भाषा म्हणून उर्दूचा वापर व्हावा असे त्यांचे आदेश होते. उर्दूचे जोखड हिंदीला बांधले की हिंदी व उर्दू या दोघांचाचाही वापर कमी होऊन इंग्रजीचा वापर वाढेल ही यात युद्धनीती होती.

हिंदी सोपी करून तिचा त्वरित प्रसार करावा हा नेहरूंचा हेतू नव्हता हे यावरून स्पष्ट आहे. जी बहुसंख्य भारतीयांना समजते अशी भाषा न वापरता मुसलमानांचे भारतीयापासून वेगळेपण जोपासण्यासाठी जिचा जन्म झाला तिचे ढोलके वाजवल्याने हिंदीच्या गाड्याला खीळ बसेल असा नेहरूंचा रास्त अंदाज होता. संविधानाच्या आदेशाप्रमाणे संस्कृतनिष्ठ हिंदीच्या वापराच्या मार्गात शक्य तितके अडथळे आणण्याचा नेहरूंनी प्रयत्न केला नसता तर आज हिंदी साऱ्या भारतात पसरली असती. एवढेच नव्हे तर १०० कोटी लोकांना समजणारी एक भाषा म्हणून भारताच्या बाहेर आग्नेय आशियासारख्या देशातही ती पसरली असती. आग्नेय आशियातील भाषात संस्कृत शब्दच केवळ नव्हे तर संस्कृत शब्दापासून आधुनिक उपकरणासाठी सिद्ध केलेले ''दूरशब्द'' ''वाहनस्तम्ब'' वगैरेसारखे हजारो शब्द प्रचलित आहेत. रशिया, चीन, पश्चिम एशिया येथे देखील हिंदी सिनेमा चालतो. रशियन भाषेत देखील संस्कृतोद्भव शब्द शेकड्याने आहेत. ब्रिटिश काळात देखील ब्रह्म देशात हिंदी किती पसरली होती याचे वर्णन शरच्चंद्र चट्टोपाध्यायांनी केले आहे. हिंदी जगातली सर्वात अधिक पसरलेली भाषा झाल्याने भारताचे जगातील स्थान किती मानाचे राहिले असते! आज भारत हा इंग्रजी जगाच्या कोपऱ्यातला एक दुर्लक्षणीय देश आहे.

पण नेहरूंना हेच हवे होते. भारताचे स्थान जगात उन्नत व्हावे हे त्यांचे ध्येय नसून ''गोबर संस्कृतीच्या'' भारताला उन्नत इंग्रजी गोभक्षक संस्कृतीचे अंग बनविणारा जागतिक पुढारी म्हणून स्वत:ची जागतिक कीर्ति हवी होती.

भारत हे राष्ट्रच नाही त्यामुळे भारताला सर्व भारतीयांना समान अशी भाषा असण्याची जरूर नाही असे नेहरूभक्त म्हणतात. रशिया स्वत:ला बहुराष्ट्रीय देश



म्हणवत असून देखील तेथे सगळ्यांना रशियन शिकविले जाते हे ते सोयीस्कर रीतीने विसरतात.

## प्रांतीय भाषांवर संक्रांत

कोणत्याही उच्चभ्रूचे भाषण असो, वर्तमानपत्रातील लेख असोत, नभोवाणीवरील चर्चा असो वा दूरदर्शनच्या मालिका असोत, त्यात हिंदीची टवाळी असलीच पाहिजे. मला नभोवाणीवर ''इंग्रजीतील संस्कृतोद्भव शब्द'' या विषयावर भाषण देण्यास पाचारण केले होते तेव्हा स्पष्टच सांगण्यात आले की, ''इंग्रजीच्या विरुद्ध बोलणे नभोवाणीच्या धोरणाच्या विरुद्ध आहे.'' स्वाभिमान नावाची मालिका पूर्वी बरीच गाजली. तिच्यात पूजा नावाचे पात्र आहे. ही इंग्रजी न शिकलेली बाळबोध वळणाची मुलगी असते. ती कोणत्याच पुरुषाला नको असते. मग ती इंग्रजी शिकू लागते. साडी टाकून जीन्स घालू लागते. त्यामुळे थोडीफार ''स्मार्ट'' होते.

हिंदीच्या विरुद्ध मुसलमान व दक्षिण भारतीय यांना चिथावून नेहरूंनी ज्या केंद्र सिंहासनावर तिचा संवैधानिक अधिकार आहे त्या सिंहासनाच्या आसपास देखील फिरकू दिले नाही. पण इंग्रजीला हिंदीपेक्षाही दुसरे मोठे आह्वान होते. ते म्हणजे प्रांतीय देशी भाषांचे. भारतामध्ये जगातील प्रगत भाषांच्या तोडीच्या आठ दहा कोटी लोकांच्या निदान सात भाषा आहेत व उरलेल्या निदान अर्धा डझन केव्हाही त्या स्तराला पोचू शकणाऱ्या आहेत. पंजाबमध्ये प्राथमिक शाळात देखील पंजाबी शिकविले जात नव्हते उर्दू शिकविले जात होते. ही सर्व परिस्थिती पालटून उर्दूच्या जागी हिंदी व पंजाबी स्थापन होण्याची चिन्हे दिसू लागली होती. केंद्रात कोणतीही भाषा असली तरी केंद्राचा व्यवहार प्रांतीय भाषांच्या जवळ असलेल्या हिंदीतून व्हावा या मागणीला जोर चढेल हे नेहरू ओळखून होते. परभाषेशिवाय सर्व व्यवहार चांगले चालू शकतात असा अनुभव आल्यावर केंद्रांचा व्यवहार या भाषाहून सर्वथैव भिन्न अशा इंग्रजीतून व्हावा ही गोष्ट प्रांतांना मान्य होणे कठिण होते. शिवाय प्रांतामध्ये सर्वांना हिंदी शिकावे लागते तसेच ज्यांची मातृभाषा हिंदी आहे त्यांनी कोणती तरी प्रांतीय भाषा शिकावी अशी सूचना मान्य करण्यात आली होती. त्याअनुसार भारतातील प्रत्येक भाषा हिंदी प्रांतात देखील पसरल्या असत्या. शिवाय प्रांतात स्थायिक झालेल्या परप्रांतीयांना त्या प्रांताची भाषा शिकावी लागल्याने प्रत्येक प्रांतात त्या प्रांतांची भाषा जाणणारे परप्रांतीय राहिले असते व प्रांताप्रांतांचे भाषिक आदानप्रदान मोठ्या प्रमाणावर होऊन राष्ट्रीय ऐक्य दृढावण्यास

मदत झाली असती. या वातावरणात इंग्रजीचे उच्चाटन होणे क्रमप्राप्त होते. नेहरूंना मुळात राष्ट्रच नसलेल्या भारताचे-म्हणजे हिंदूंचे-ऐक्य ही कपाळशूळ उठविणारी गोष्ट होती. भारतात इंग्रजीला चीनी, जपानी, रशियन, जर्मन वा फ्रेंच यापेक्षा जास्त स्थान असणार नाही या कल्पनेनेही त्यांना शहारे येत होते. तेव्हा भाषावार प्रांतरचनेला सुरुंग लावणे त्यांना अपरिहार्यच झाले.

बऱ्याच काळपर्यंत नेहरूंनी भाषावार प्रांतरचना ही राष्ट्रीय मागणी आहे हे आपल्या गावीच नाही असा आव आणला. असा आव आणणे त्यांना सोपे गेले कारण संविधानात भाषावार प्रांतरचनेचा स्पष्ट शब्दात कालबद्ध आदेश नाही. हे देखील नेहरूंच्या कारवायामुळेच घडून आले. भाषावार प्रांत ही राष्ट्रीय चळवळीची मागणी असल्यामुळे ती संविधानात प्रविष्ट करण्यात यावी अशी मागणी झाली तेव्हा नेहरूंनी तिला विरोध केला व या प्रश्नाचा फेरविचार करण्यासाठी समिती नेमण्यात यावी अशी सूचना केली. ही सूचना करताना "काँग्रेसने भाषावार प्रांताची कल्पना कधीच स्वीकारली नव्हती." असे धडधडीत खोटे विधान नेहरूंनी केले.

संविधानसभेने भाषावार समिती गठित केली व तिचे सभापतित्व नेहरूंकडेच आले. या समितीने सांगितले की देशातील परिस्थिती व्यवस्थित नसल्यामुळे भाषावार प्रांत १० वर्षे पुढे ढकलण्यात यावे. नेहरू समितीच्या शिफारसीमुळे संविधानाचे कलम ३ म्हणते की, भविष्यात केव्हा तरी असे प्रांत करण्यात यावे. संविधानात असा आपल्याला पाहिजे तसा बदल घडवून आणल्यावर नेहरूंनी काँग्रेस कार्यकारिणीवर दबाव आणून भाषावार प्रांतांची मागणी ताणून धरू नये असे मान्य करवून घेतले (गोपाल). त्यांनी हिंदीचे त्यांच्या दृष्टीने असलेले गंडांतर १५ वर्षे पुढे ढकलले होते व आता प्रांतिक भाषांचे "गंडांतर" त्याच पद्धतीने बेमुदत पुढे ढकलवून घेतले. स्वराज्यामध्ये भारतीय भाषांना योग्य ते स्थान देण्याच्या कोणत्याही कार्यक्रमाला नेहरू या एकमात्र व्यक्तीचा विरोध होता हे यावरून दिसून येईल.

देशाची स्थिती unsettled आहे असे म्हणण्यास नेहरूंचा वरील ठराव झाला तेव्हा काहीच आधार नव्हता. हिंदू-मुसलमानांचे दंगे १९४७ ते १९५० या कालाच्या मानानं बरेच शमले होते व परदेशांचा धोकाही पूर्वीपेक्षा वाढला होता असे नाही. देश अस्वस्थ आहे असे खोटे कारण देऊन नेहरूंनी भाषावार प्रांतरचना पुढे ढकलली यावरून त्यांना देशी भाषांच्या हिताचा कोणताही कार्यक्रम हाणून पाडण्यास कोणतेही कारण पुरत असे हे स्पष्ट व्हावे.



## भाषाभाषात दंगे माजविले

नेहरूंना वेड घेऊन पेडगावला जायचे होते. त्यांनी प्रांतीय भाषांचे अस्तित्व आपल्याला माहीत नाही असा आव आणला. पण आंध्र प्रदेशाच्या सीतारामलूंना हे सहन झाले नाही व त्यांनी आंध्रप्रदेश निर्मितीसाठी उपोषण आरंभले. त्यांत त्यांचा मृत्यू झाला व हैदराबादमधील तेलगू भाषिक प्रदेश सोडून बाकीच्या प्रदेशांचा आंध्रप्रदेश निर्माण करण्यात आला. इंग्रजीवाले तेव्हापासून सीमारामलूंच्या उपासाने हे भाषावार प्रांतरचनेचे खूळ निघाले नाहीतर इंग्रजीला सर्व वाट निर्धास्त होती असे म्हणू लागले. भारतीयांना आपल्या राष्ट्रीय निर्णयांचा किती लवकर विसर पडतो याचे हे खेदजनक उदाहरण आहे. भाषावार प्रांतांचे पिल्लू सीतारामलूंच्या उपासाने सोडले नसून ही स्वराज्याच्या चळवळीची एक राष्ट्रीय मागणी होती. भारताच्या साऱ्याच राष्ट्रीय मागण्याची भ्रूणहत्या करणे हे नेहरूंचे जीवनकार्यच होते.

भाषावार प्रांत स्थापन करणे ही नेहरूंची एकमात्र चूक झाली असे राजीव गांधी म्हणाले होते. देशाच्या पंतप्रधानाला देखील आपल्या आजोबांच्या वेळच्या भारताच्या इतिहासाचे किती विपर्यस्त ज्ञान होते हे यावरून दिसून येईल. भाषावार प्रांत ही नेहरूंची कल्पना नव्हती. नेहरूंनी भाषावार प्रांत केले नाहीत. त्यांना ते करायला देशाने भाग पाडले. नेहरूंनी हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी शक्य तितके प्रयत्न केले. पण त्यांना सफलता मिळाली नाही.

आंध्र प्रदेश स्थापन झाल्यावर इतर प्रांतांच्या मागण्या पुढे आल्या. तेव्हा त्यांना केराच्या टोपलीत टाकण्यासाठी नेहरूंनी फाजल अली समिती नेमली. प्रांतांची पुनर्रचना कशी करायची हे या समितीने ठरवायचे होते. वस्तुतः एका भाषेच्या कमीत कमी लोकांना ती भाषा न बोलणाऱ्या लोकांच्या प्रांतात जावे लागेल अशा रीतीने प्रांतांच्या सीमा आखाव्या हे स्पष्ट होते. कोणत्या भाषेचे लोक कुठे राहतात हे माहीतच होते. त्याच्या आधारावर सगळ्यात लहान लोकवस्तीचे मूळ प्रांताशी सलग असलेले खेडे हे एकक ठरवून सीमा आखण्यात याव्या हे तत्त्व सगळ्यांनी गृहीत धरलेले होते. फाजल अली समितीचा घोळ न घालता या पद्धतीने प्रांतरचना केली असती तर कोणतीच भांडणे न होता भाषावार प्रांत सुरळीतपणे झाले असते. पण नेहरूंना ते होऊ द्यायचे नव्हते. या विषयावर भांडणे लावून भाषावार प्रांतरचनेची कल्पनाच मोडीत काढायची हे त्यांचे ध्येय होते.

भाषांच्या आधारावर सलग असलेल्या प्रदेशाचा प्रांत बनवायचा हे तत्त्व धाब्यावर बसविले तर कशा तऱ्हेच्या समस्या निर्माण होतील याचे मुंबई हे ताजे

उदाहरण आहे. मुंबईच्या चारही बाजूने मराठीभाषी प्रदेश आहेत, मुंबईची बव्हंश लोकसंख्या त्या वेळी मराठी भाषी होती. तेव्हा मुंबई महाराष्ट्रात रहावी हे स्वाभाविक होते. पण ''मुंबई मराठी लोकांनी बनविली नसून गुजराथ्यांनी बनविली आहे व ती मराठीभाषी नसून बहुभाषी आहे'', असा आक्रोश करण्यात आला. नगरी कोणी आकारास आणली याचा विचार केला तर कलकत्ता मारवाड्यांना द्यायला पाहिजे एवढेच नव्हे तर सारे आधुनिक भारतच इंग्रजांनी वसविल्यामुळे स्वराज्याची मागणी चुकीची आहे असे ठरते. मुंबई मराठी लोकांना दिली तर गुजराथ्यांचे नुकसान होईल असाही युक्तिवाद करण्यात आला. इंग्रजांनी स्वराज्याच्या विरुद्ध वापरलेला अल्पसंख्यवाद नेहरूंनी इंग्रजीच्या रक्षणासाठी कसा वापरला याचे हे उदाहरण आहे.

गुजराथ्यांच्या हिताचा बहाणा करून नेहरूंनी मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट न करता मुंबई हाच स्वतंत्र प्रांत बनविला. गुजराथ्यांना मराठी बहुसंख्येची भीती वाटत होती असे मानले तरी मुंबईचा स्वतंत्र प्रांत केल्यामुळे ती दूर होणार नव्हती. पण नेहरूंना गुजराथ्यांच्या हितसंबंधांची फिकिर नव्हती, त्यांना प्रांतविभाजनाच्या प्रश्नावर दंगे माजवून भाषावार प्रांतरचनाच रद्द करायची होती. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मुंबईत दंगे माजले. या दंग्यात गुजराथी स्त्रियांवरही अत्याचार झाले असा आरोप होता. दंगे माजल्यावर सगळ्या प्रकारचे लोक आपले उद्दिष्ट साधण्यासाठी त्यात भाग घेतात. असेच दंगे आसाममध्ये बंगाल्यांविरुद्ध माजले. आसामीभाषी प्रदेश बंगालला जोडल्यामुळे ते दंगे माजले. हे दंगे मुंबईच्या दंग्यापेक्षाही भीषण होते असे म्हणतात. बेळगाव कर्नाटकात टाकल्यामुळे उत्पन्न झालेला वाद अजूनही शमलेला नाही.

## गांधींचा गुजराथ व शेवटचा इंग्रज

हाही वाद निष्कारण माजविण्यात आला होता हे लवकरच सिद्ध झाले. कन्नडिगांनी महाजन समितीचा निर्णय आपल्या विरुद्ध गेला तरी स्वीकारण्याचे कबूल केले होते व बेळगावचा प्रश्न खेडे हे एकक मानून सोडविला असता तर तो त्यांना मान्य झाला असता याबद्दल शंका नाही. पण महाजन हे नेहरूंचेच चेले व इंग्रजीसाठी देशी भाषांची अवहेलना करणाऱ्यांपैकी होते. त्यांनी आपला निर्णय देण्याआधी भाषावार प्रांतांचे उद्दिष्ट कसे घातक आहे यावर आपल्या निवाड्याची बरीच पृष्ठे खर्च केली. ''भाषावार प्रांतरचना करावी की नाही?'' याबद्दल त्यांचे मत कुणीच विचारले नव्हते. पण भाषावर प्रांतरचना रद्द करायची असेल तर तिच्या संबंधाने निर्माण झालेली भांडणे कायम ठेवणे आवश्यक होते.



नेहरूंना दंग्यांच्या रूपाने घबाडच सापडले. किंबहुना त्यांनी ते मिळविले. ''भाषावादामुळे पहा कसे दंगे माजतात!'' म्हणून त्यांनी कांगावा करण्यास सुरवात केली. दंगे भाषावादामुळे माजले नसून भाषावार विभाजन न केल्यामुळे माजले. असे दंगे माजवून भाषावार प्रांतरचना उधळून लावावी हाच त्यात उद्देश होता.

संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा ''माझे हृदय वैदर्भीयांसाठी तुटत आहे'' असे उद्‌गार नेहरूंनी काढले. वैदर्भीयांना महाराष्ट्रातच सामील होण्याची कोणीच जबरदस्ती केली नव्हती. विदर्भातील काही लोकांनी वेगळ्या विदर्भाची मागणी केली होती तर दुसऱ्या काही लोकांनी त्याला विरोध केला होता. ही मागणी करणाऱ्यांची संख्या अत्यल्प आहे. अनेक निवडणुकांनी सिद्ध केले आहे. असे असता नेहरूंनी वेगळ्या विदर्भासाठी अश्रू ढाळावे हा संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध वैदर्भीयांना चिथावणी देण्याचाच प्रयत्न ठरतो.

''भाषावार प्रांतरचनेचे पुरस्कर्ते देशात फुटीरपणा माजवीत आहेत व मी भारतीय ऐक्याचा रक्षक आहे'' असा नेहरू आव आणीत होते. भारतीय ऐक्य म्हणजे इंग्रजीचे दास्य असा त्यांचा अर्थ होता. असाच अर्थ करायचा तर इंग्रजी राज्य हे इंग्रजी भाषेपेक्षाही अधिक ऐक्यकारक होते कारण इंग्रजी राज्यात पाकिस्तानही सामील होता. स्वराज्याच्या मागणीने देशाचे विभाजन झाले.

देशात एकराष्ट्रीयत्वाची भावना देशी भाषांनीच जोपासली आहे. इंग्रजीने केवळ दास्य जोपासले. समान राष्ट्रीयत्व म्हणजे समान दास्य अशी नेहरूंची समान राष्ट्रीयत्वाची कल्पना होती.

दंग्यामुळे नेहरूंना भाषावार प्रांतरचनेच्या कफनात खिळे ठोकण्याची वेळ आली आहे असे वाटले व त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा प्रयत्न थांबवून पूर्वीचेच प्रांत कायम ठेवावे असे एक विधेयक लोकसभेत आणले. पण काँगेसचे अध्यक्ष कामराज नादर यांनीच त्याला जबरदस्त विरोध केला. कारण काँग्रेसच्या चाळीस वर्षाच्या चळवळीने या भाषावार प्रांतरचनेचाच पाठपुरावा केला होता व त्यामुळे जागृत झालेल्या भावना शमलेल्या नव्हत्या.

या काळात नेहरूंनी संविधानातले हिंदीविषयक कलम हटविण्याचा प्रयत्न केला असता तर तोही याच कारणास्तव हाणून पाडण्यात आला असता. नेहरू हिंदीबद्दल नुसती चालढकल करीत आहेत, त्यांना हिंदीचे कलम रद्द करायचे नाही अशी लोकांची समजूत होती. हिंदीला हद्दपार करण्याचा उद्देश नेहरूंनी स्पष्टपणे जाहीर करून तसे विधेयक लोकसभेत आणले असते तर तेही हाणून पाडण्यात आले असते यात शंका

नाही.

याच वेळी मुंबईच्या प्रश्नावरून चिंतामणराव देशमुखांनी त्यागपत्र दिले. हे त्यागपत्र त्यांनी केवळ मुंबई स्वतंत्र केली म्हणून दिले. संयुक्त महाराष्ट्र झाला नाही म्हणून दिले नाही. लवकरच देशमुखांनी हा मुद्दा स्पष्ट केला आणि महाराष्ट्र व गुजराथ मिळून होणाऱ्या द्विभाषिक राज्याला आपला पाठिंबा राहील असे जाहीर केले. नेहरूंनी ही कल्पना उचलून धरली व द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना केली.

यामुळे गुजराथी लोक नाराज झाले व महाराष्ट्रात देखील संयुक्त महाराष्ट्राचीच मागणी कायम राहिली. गुजराथी लोकांना मुंबईतील मराठी बहुसंख्येची भीती वाटत होती असे म्हणणाऱ्यांनीच त्यांना मराठी बहुसंख्येच्या द्विभाषिकात लोटले. मुंबईचा महाराष्ट्रात समावेश झाल्याने फक्त मुंबईतील गुजराथ्यांना मराठी बहुसंख्येत रहावे लागले असते. द्विभाषिक मुंबईमुळे साऱ्याच गुजराथी समाजाला मराठी बहुसंख्येखाली राहण्याचा प्रसंग आला.

## समृद्धीकरण म्हणजे इंग्रजीकरण

यावेळी संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना नेहरूवादी विचारीत, ''अहो, तुम्हाला पूर्वी नुसती मुंबईच पाहिजे होती. आता तर सगळा गुजराथच आम्ही तुम्हाला दिला आहे. जास्तीत जास्त भाषिक स्वायत्तता मागणाऱ्या लोकांना ''तुम्ही दुसऱ्या भाषेच्या लोकावर प्रभुत्व गाजवू इच्छिता.'' असा आरोप करणे विकृतमनस्कतेशिवाय शक्य नाही.

आता गुजराथमध्ये भाषिक गुजराथसाठी चळवळ सुरू झाली. नेहरू ती शांत करण्यास गेले तेव्हा त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. नेहरूंना स्वराज्यानंतर पहिल्यांदाच एका जाहीर सभेत लाखो लोक आपल्याला काळे झेंडे दाखवीत आहेत असा अनुभव आला. तेव्हा नेहरू संतापले व त्यांनी ''तुम्ही भारतातून फुटून जाऊ इच्छिता तर जा व आपल्या देशाचा ध्वज म्हणून याच काळ्या झेंड्याचा स्वीकार करा,'' असे सांगितले. आपण ''शेवटचे इंग्रज आहोत,'' व ''भारत हे राष्ट्रच नाही,'' असे म्हणणारा, काश्मीर महाराजा भारतात सामील होण्यास उत्सुक असता काश्मीर भारतात राहू नये म्हणून शेख अब्दुल्लाशी कारस्थाने करणारा, नागांचे धर्मांतर करवून इंग्रजी भाषेला स्वभाषा म्हणून मान्यता देणारा व भारताचा आयकराचा कायदा न मानणारा एक भाग भारतातून वेगळा करणारा माणूस, म. गांधी व सरदार पटेल यांच्या गुजराथला स्वभाषेचा प्रांत असावा अशी राष्ट्राने मान्य केलेली मागणी त्याने



केली म्हणून राष्ट्रवाद शिकवीत होता यासारखा दैवदुर्विलास तो कोणता? गुजराथी लोक साऱ्या देशाने चाळीस वर्षे जोपासलेले भाषिक प्रांतांचे तत्त्व मान्य व्हावे म्हणून आग्रह धरीत होते. ते भारतातून फुटून निघू इच्छीत आहेत असा आरोप करणाऱ्या माणसात प्रामाणिकतेचा लवलेश तरी होता की नाही अशी शंका आल्याशिवाय राहणार नाही.

नेहरू संयुक्त महाराष्ट्र देणार नाहीत म्हणून संयुक्त महाराष्ट्र समिती गठित करण्यात आली. तिने संयुक्त महाराष्ट्राच्या मुद्यावर निवडणुका लढविल्या व २२ काँग्रेस उमेदवारांचा पराभव केला. लोकप्रिय मागणी मान्य केली नाही तर आपल्या लोकप्रियतेचा आधारच जातो अशी भीती वाटून नेहरूंनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य केली.

याप्रमाणे नेहरूंना भाषावार प्रांतरचना भगीरथ प्रयत्न करूनही टाळता आली नाही. पण ते आपल्या मुख्य उद्देशात शंभर टक्के सफल झाले. ''संयुक्त महाराष्ट्र होऊन चाळीस वर्षे झाली तरी मराठी अजून वनवासात आहे'' असा कवि कुसुमाग्रज यांनी विलाप केला. पण त्यांच्या विलापाचे सूर हवेत विरण्याच्या आधीच महाराष्ट्राचे मुख्य प्रधान शरद पवार यांनी मराठीचा वनवास संपविण्याची आपली इच्छा नाही, इंग्रजीवाचून आपण पोरके होऊ असे जाहीर केले. ''इंग्रजीला चिकटून रहा मग शंभर भाषिक प्रांत का घ्याना!'' असाच नेहरूंचा आग्रह होता. तो साऱ्या देशाने मानला. मग भाषिक प्रांत निर्माण करण्याचा खटाटोप कशासाठी? प्रांत होते तसेच राहिले असते तर काही बिघडत नव्हते.

देशी भाषांना शिक्षण व राज्यकारभार यातून हद्दपार करण्याचा नेहरूंचा कार्यक्रम सफल झाला. पण एवढ्यावर त्यांचे समाधान नव्हते. त्यांना देशी भाषांचे अस्तित्वच खुपत होते. ते नाहीसे करणे शक्यच नव्हते. पण त्यांत कोणतेही वाङ्मय निर्माण होणार नाही, जे काही वाङ्मय असेल ते वन्य जमातींच्या वाङ्मयाप्रमाणे केवळ मौखिक राहील व निरक्षरांव्यतिरिक्त त्यांचा वापर कोणीही करणार नाही हा उद्देश सफल होण्यासारखा होता. त्याच मार्गाला नेहरू लागले. त्यांनी देशी भाषा ''समृद्ध'' करण्याचा कार्यक्रम आखला. देशी भाषा समृद्ध करणे म्हणजे त्यांच्यात ८० टक्के इंग्रजी शब्द वापरणे अशी नेहरूंची कल्पना होती. नेहरूंनी आकाशवाणीला अशी भाषा वापरण्याचे आदेश दिले. त्याविरुद्ध आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांनी आपले मत दिले तेव्हा नेहरूंनी प्रसिद्ध मराठी लेखक मामा वरेरकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व तिला आपल्या मताची पुष्टी करण्यास सांगितले. पण या समितीला नेहरूंच्या

उर्दूदैशाबद्दल योग्य कल्पना नव्हती. देशी भाषांचे अज्ञान असल्यामुळे नेहरू इंग्रजी शब्दांनी त्या समृद्ध कराव्या या सद्हेतूने अशी शिफारस करीत आहेत असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी नेहरूंचे गैरसमज दूर होतील अशा बुद्धीने देशी भाषांना इंग्रजी शब्दांची गरज नाही व आहे त्या स्वरूपातच देशी भाषांचे प्रसारण होत रहावे असे आपले मत दिले.

## स्वभाषेवाचून स्वराज्य हा वदतोव्याघात

बिचाऱ्यांना काय माहीत की समितीने आपले मत उचलून धरावे या हेतूने नेहरूंनी ती गठित केली होती. प्रामाणिकपणे तिचा सल्ला मागण्यासाठी नव्हे. नेहरूंनी या समितीचा सल्ला केराच्या टोपलीत फेकला व देशी भाषा ''सोप्या'' करण्याचा आपला कार्यक्रम सुरू ठेवला. १० शब्दांच्या वाक्यात आठ शब्द इंग्रजी असणाऱ्या एका कादंबरीला राज्य सरकारने पारितोषिक देऊन गौरविले. आज देखील देशी भाषात ''क्लीन चिट'', ''मीन व्हाइल'' वगैरे शब्द वापरण्याचा आकाशवाणीचा आग्रह आहे. लवकरच देशी भाषांच्या वाचकांना त्यांचे उपलब्ध वाङ्मय समजणार नाही व मग उरलेले ८० टक्क्यांनी इंग्रजी असलेले देशी वाङ्मय लिहीत न बसता देशी भाषांचा पूर्णपणे त्याग करून इंग्रजीलाच शरण जाण्याची आपली सूचना देशी भाषा स्वीकारतील अशी नेहरूंची अपेक्षा होती.

ब्रिटिशांच्या काळी भारताचा बराच मोठा भूभाग देशी संस्थानात मोडत होता. या संस्थानात राज्य कारभाराच्या भाषा ब्रिटिशांच्या पूर्वी ज्या होत्या त्याच कायम राहिल्या. ''स्वराज्य'' झाल्यावर सर्व संस्थाने शेष भारतात विलीन झाली व तेथेही राज्य कारभाराची भाषा इंग्रजीच झाली.

हायस्कूलपर्यंत बव्हंश विद्यार्थी भौतिकी रसायन वगैरे वैज्ञानिक विषय देखील मातृभाषेत व संस्कृत परिभाषेत शिकत. यात इंग्रजीपेक्षा काही कठिण आहे असे कोणालाच वाटत नव्हते. पण नेहरूंच्या कारकीर्दीत विज्ञान इंग्रजीतच फक्त व्यक्त होऊ शकते हे मत पसरले व बेरीज वजाबाकी शिकण्यास देखील इंग्रजी आवश्यक वाटू लागले.

नेहरूंना देशी भाषांच्या उच्चाटनाच्या आपल्या कार्यक्रमात भरघोस सफलता मिळाली. ज्यांना कोणतीच देशी भाषा येत नाही व त्यामुळे ज्याचे भावविश्व त्यांच्या देशबांधवांच्या भावविश्वापेक्षा अजीबात वेगळे आहे अशा तीन पिढ्या गेल्या आहेत. वीस वर्षे वयाच्या एका बी. कॉम. झालेल्या मराठी मुलीला मी ''धन्य शिवाजी तो



रणगाजी धन्यचि तानाजी । प्रेमे आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी ॥'' या ओळी म्हणून त्यांचा अर्थ काय हे विचारले. तिला अर्थ सांगता आला नाही. त्यानंतर मी तिला शिवाजी कोणाचे नाव आहे असे विचारले तेव्हा तिने आजकाल पाठ्यपुस्तकात शिवाजीबद्दल ज्या चारदोन ओळी असतात त्यातली माहिती सांगितली. पण या नावाबद्दल कोणत्याही भावनेचा तिच्यात लेशही दिसला नाही.

झाले हे चांगलेच झाले. संविधानाची गोष्ट कशाला काढता? संविधान भावनेच्या भरात लिहिले गेले. इंग्रजीशिवाय आपण खरेच अनाथ होऊ, असे वरीलसारख्या विवेचनावर म्हणणारे मला अनेक भेटतात. त्यांना मी विचारतो, संविधान भावनेच्या भरात लिहिले गेले मग स्वराज्याची चळवळ काय भावनेशिवाय झाली? अमुक गोष्ट भावनाधिष्ठित आहे म्हणून चूक म्हटले तर स्वराज्याची चळवळच चूक होती. आपण ब्रिटिशांना परत बोलवावे. वस्तुत: नेहरू माउण्ट बॅटनला बोलवायला गेलेच होते.

स्वभाषेबद्दलचा निर्णय भावनाधिष्ठित आहे व तुमचे इंग्रजीप्रेम ही भावना नाही काय? तुम्हाला तुमच्या मुलांनी डॅडी-मम्मी म्हटल्याने अंगावर मूठभर मास येते ही काय भावना नाही? तुम्हाला आपल्या भाषांची लाज वाटते ही काय भावना नाही? इंग्रजीच्या आकर्षणात भावनेवाचून कोणते कारण आहे? पारतंत्र्यपूजेवाचून इंग्रजीच्या स्वीकाराचे काही कारण असते तर फक्त परतंत्र देशातच परभाषेला प्रतिष्ठा असते असे का? तुर्कांच्या वेळी फारसीला प्रतिष्ठा होती. १३ व्या शतकात दिल्लीची मध्यवर्ती सत्ता तुर्कांच्या हातात गेली व साऱ्या देशात संस्कृतचे महत्त्व जाऊन फारसीचे महत्त्व वाढले. मधुराविजयम् या विजयनगरवरील काव्यात कवयित्री गङ्गादेवी म्हणते -

न तथा कटुघूत्कृताद्व्यथा मे हृदि जीर्णोपवनेषु घूकलोकाद् ।
परिशीलितपारसीकवाग्भ्यो यवनानां भवने यथा शुकेभ्य:॥

''आमच्या बागा सुकल्या आहेत. त्यात घुबडे घूं घू करीत आहेत. पण मला त्याचे एवढे दु:ख वाटत नाही. खरी दु:सह गोष्ट म्हणजे आमचे वैभव हिरावून घेणाऱ्या व आमच्याच महालात राहणाऱ्या परकीयांचे पोपट देखील फारसी बोलत आहेत.''

## खोवलेली पिसे

मुघल हेही तुर्कच होते. त्यांची राज्यभाषा फारसी होती व देशी भाषांना कोणी विचारत नव्हते. पण इंग्रजांनी भारताचे राज्य बळकावले आणि फारसीच्या जागी इंग्रजी सिंहासनावर बसली ''पढे फारसी और बेचे तेल'' अशी फारसीची स्थिती झाली.

तात्पर्य भारतात इंग्रजीचे प्रस्थ माजले याचे कारण इंग्रजी ही संपन्न भाषा होती असे नाही. याच वेळी पॉण्डेचरीमध्ये फ्रेंच व गोव्यामध्ये पोर्तुगीज भाषा सिंहासनस्थ होती. फ्रेंच पॉण्डेचरीपेक्षा व पोर्तुगीज गोव्यापेक्षा शेजारचे इंग्रजी मद्रास व मुंबई अधिक प्रगत होती असा पुरावा नाही. परकीय फ्रेंच व पोर्तुगीज तर सोडाच देशी भाषांचा राज्य कारभारात उपयोग करणाऱ्या हैदराबाद, म्हैसूर, बडोदा वगैरे संस्थानापेक्षा शेजारचे इंग्रजी वापरणारे प्रांत अधिक प्रगत होते असा पुरावा नाही.

खुद्द इंग्लंडवर अनेक शतके फ्रेंचांचे राज्य होते व राज्यभाषा म्हणून फ्रेंचचा प्रयोग होत होता. म. गांधी इंग्लंडमध्ये शिकायला गेले तेव्हा इंग्लंडमध्ये इंग्रजी बोलणे अडाणीपणाचे समजले जात होते व प्रतिष्ठित लोक फ्रेंच बोलत असत. म्हणून गांधींनीही फ्रेंचचे धडे घेण्यास सुरुवात केली होती. पहिल्या सहस्रकात इंग्लंडवर रोमचे राज्य होते व राज्यभाषा लॅटिन होती. त्यावेळी तर इंग्लंडमधील लोकभाषेला कोणतीही प्रतिष्ठा नव्हती. हे लक्षात ठेवले पाहिजे की इंग्रजी व लॅटन यांचा संबंध आधुनिक भारतीय भाषा व संस्कृत यांच्या संबंधासारखा नाही. आधुनिक भारतीय भाषा संस्कृतोद्‌भव आहेत. इंग्रजी लॅटिनोद्‌भव नाही. लॅटिन व इंग्रजीचा संबंध इंग्रजी व देशीभाषा यांच्या संबंधासारखा आहे. तात्पर्य परभाषा व पारतंत्र्य यांचा अतूट संबंध आहे.

गांधीयुगामध्ये ''भारताने आपल्या भिकारड्या भाषा सोडून इंग्रजीचा स्वीकार करावा'' असे म्हणणारा पी. कोदंड राव हा एकच मनुष्य होता. त्यांचे म्हणणे असे की, स्वभाषा व परभाषा असा काही भेद नाही. माणूस काही भाषा घेऊन जन्माला येत नाही. तो जी भाषा वापरेल ती त्याची भाषा. मग आपण आपल्या भाषापेक्षा सर्वतोपरी श्रेष्ठ असे जी इंग्रजी तिचा स्वीकार का करू नये?

कोदंडरावांच्या विवेचनातील या मुद्द्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

स्वभाषा व परभाषा यात भेद नाही तर स्वराज्य आणि परराज्य यात भेद असू शकतो काय? आम्ही जर इंग्रजीचा स्वीकार करू शकतो तर इंग्रजी राज्याचाही स्वीकार करू शकलो असतो. मग कोदंडरावांसारखे लोक स्वभाषांना विरोध करतात तसाच स्वराज्याला विरोध का करीत नव्हते? इंग्रजी देशी भाषांपेक्षा श्रेष्ठ आहे या दाव्याप्रमाणेच इंग्रजी राज्य देशी राज्यापेक्षा श्रेष्ठ होते असा पक्ष मांडला जात नव्हता काय? आज इंग्रजीलाच स्वभाषा मानावे असे म्हणणारे लोक गांधींनी इंग्रजांना ''चले जाव'' म्हटले हा मूर्खपणा होता असे का म्हणत नाहीत? आज भारतात कायदा व सुव्यवस्था यांची जी दुर्दशा आहे व भ्रष्टाचारात भारताचा क्रमांक बराच वरचा आहे तशी ब्रिटिश कालात स्थिती नव्हती. मग इंग्रजांनाच परत बोलवावे व ते येण्यास तयार



नसतील तर चीनी कदाचित एका पायावर तयार होतील, त्यांना भारताचे राज्य का सोपवू नये?

याचे असेच उत्तर आहे की, आमच्या देशाची व्यवस्था करण्यास आम्ही दुसऱ्या कोणास बोलावले तर ती व्यवस्था जास्त चांगली होणार नाही असे नाही. पण आम्हाला त्यामुळे राज्य करण्याची अक्कल कधी येणारच नाही. दुसऱ्याचा हात धरल्याशिवाय आम्ही चाललोच नाही तर आम्हाला स्वतंत्रपणे चालताच येणार नाही. हे पंगुत्व आहे. चालणे शिकताना आम्ही दहा वेळा पडलो तरी पंगु न राहण्यासाठी आम्ही चालणे शिकायलाच पाहिजे. त्याचप्रमाणे आमच्या भाषा समृद्ध नसतील तर त्या समृद्ध करण्याचा प्रयत्न न करता आम्ही इंग्रजी आयती घेऊन शिक्षणात प्रगती करायचे ठरविले तर स्वत:च्या भाषा समृद्ध करण्याची अक्कल आम्हाला कधीच येणार नाही व आमचे बौद्धिक जीवन हा इंग्रजीभाषी राष्ट्रांच्या बौद्धिक जीवनाचा एक प्रतिध्वनी मात्र राहील.

''इंग्रजांच्या आगगाड्या जर आम्हाला चालतात तर त्यांची भाषा का चालत नाही?'' असे राजाजी विचारत असत. याचे उत्तर सरळ आहे. जेथे इंग्रजी राज्य गेले नाही तेथेही आगगाड्या गेल्या. पण देशी भाषांच्याऐवजी इंग्रजी वापरण्याची पद्धती फक्त इंग्रजांनी जिंकलेल्या देशातच पडली. अर्थात परभाषेचा व पारतंत्र्यांचा अतूट संबंध आहे.

## इंग्रज व्हायला गेलो, झालो पिजन

माणूस भाषा घेऊन जन्माला येत नाही म्हणून कोणताही समाज कोणत्याही भाषेला आपली मानू शकतो असे होत नाही. एक मराठी माणूस जन्मल्यापासून इंग्लंडमध्येच राहिला व त्याचे आईबाप घरीदेखील इंग्रजीच बोलत असले तर त्याची भाषा इंग्रजी होईल हे खरे आहे. पण साराच्या सारा महाराष्ट्र इंग्लंडमध्ये जाऊन राहू शकत नाही. तसा तो गेलाच तर महाराष्ट्र इंग्रजीभाषी होण्याऐवजी इंग्लंडच मराठीभाषी होईल.

साऱ्या मानवजातीच्या इतिहासात जितांनी आपला धर्म टाकून जेत्यांचा धर्म, वेषभूषा, चालीरीती वगैरे सर्व बेमालूमपणे स्वीकारल्याची उदाहरणे आहेत. पण जितांची भाषा नाहीशी होऊन त्या जागी जेत्यांची भाषा स्थापित झाल्याचे एकही उदाहरण नाही. आयरिश भाषा फक्त काही लाख लोकांचीच भाषा आहे. आयर्लण्डवर

शेकडो वर्षे इंग्रजांनी राज्य केले व शिक्षणाची आणि राज्य कारभाराची भाषा म्हणून इंग्रजी वापरली. पण आयरिश भाषेच्या ऐवजी इंग्रजी बोलली गेली नाही. ती स्वतंत्र आयर्लण्डची राज्यभाषा झाली व तिच्याच वाङ्मयनिर्मिती होणे कधीच बंद पडले नाही. तुर्कस्तान, इराण, अफणाणिस्तान, पाकिस्तान, बंगलादेश व आग्नेय आशियातील देश यातील सर्व मिळून १०७ कोटी लोकांनी आपला प्राचीन धर्म सोडून इस्लामचा स्वीकार केला. त्यांच्या चालीरीतीही पुष्कळशा इस्लामप्रणीत म्हणजे अरबांसारख्या झाल्या. पण त्या कुणाचीही भाषा अरबी झाली नाही. मुसलमान होण्यापूर्वी त्यांच्या ज्या भाषा होत्या त्याच आजही आहेत. बंगलादेशचे उदाहरण तर आपल्या दृष्टीने अगदी ताजे आहे. बंगलादेश मुसलमान असूनही पाकिस्तान पासून वेगळा झाला तो भाषेच्या प्रश्नावरून.

''महाराष्ट्रात शाळेत पाय ठेवल्यापासून फक्त इंग्रजीच शिकविले तर महाराष्ट्राची भाषा मराठीऐवजी इंग्रजी होऊ शकते'' असे एक मित्र मला म्हणाले. त्यांना मी पिजन इंग्लिशचे उदाहरण दिले. काही आफ्रिकनांनी आपल्या भाषा सोडून इंग्रजीचा स्वीकार

राज्यकारभारच केवळ नव्हे तर अर्थजीवन व कौटुंबिक जीवन देखील सर्वकाळासाठी इंग्रजायत्त राहावे लागेल. ज्याचे सर्व जीवन इंग्रजायत्त आहे ते राष्ट्र स्वतंत्र मानता येईल काय?

यावरून स्पष्ट आहे की, इंग्रजी भाषा इंग्रजांचे साऱ्या क्षेत्रात साऱ्या देशाने प्रभुत्व मानल्याशिवाय स्वतंत्रपणे भारतात जगू शकणार नाही. इंग्रजांच्या इंग्रजीशी सदैव संपर्क ठेवून त्यांच्या भाषेपेक्षा आपली भाषा बदलणार नाही अशी काळजी घेतली नाही व इंग्रजी ही आपलीच भाषा समजून आपण वापरू लागलो तर कालांतराने आपले इंग्रजी इतके बदलेल की ते इंग्रजाला समजणार नाही व इंग्रजांचे इंग्रजी आपल्याला समजणार नाही.

मग इंग्रजांचे ज्ञान आत्मसात करणे, इंग्रजीभाषी जगाशी संपर्क साधणे वगैरे इंग्रजीचे फायदे कुठून होणार? तात्पर्य या देशात इंग्रजी ही परभाषा म्हणूनच राहू शकते. स्वभाषा म्हणून ती वापरली तर इंग्रजीचे मरण अटळ आहे.

स्वभाषा कशाला म्हणावे व परभाषा कशाला म्हणावे याची कसोटी पिजन

उदाहरण आहे काय?

कोदंडरावांनी खालील उत्तरे दिली-

मी भाषा हे ज्ञानाचे साधन समजतो. भाषांचे ज्ञान हे माझ्या दृष्टीने ज्ञान नाही. ज्ञानाचे साधन जी इंग्रजी ती येत असताना मला आणखी भाषा शिकण्यात वेळ घालवायचा नाही. भाषेच्या श्रेष्ठतेचा निकष तिचे अर्थव्यक्तीचे सामर्थ्य. इंग्रजीइतके अर्थव्यक्तीचे सामर्थ्य कोणत्याही देशी भाषेत नाही. साऱ्या जगात इंग्रजीचा प्रसार असल्यामुळे मला इंग्रजीशिवाय दुसरी भाषा शिकण्याची जरूर नाही.

''तुम्हाला इंग्रजीशिवाय जर दुसरी भाषा येत नाही तर इंग्रजीच्या मानाने दुसऱ्या भाषा अर्थव्यक्तीच्या बाबतीत पंगु आहेत हे तुम्हाला कसे कळले? जे इंग्रजी भाषेत व्यक्तच करता येणार नाहीत असे देशी भाषेतले प्रयोग तुमच्या समोर मी ठेवले तर ते इंग्रजीत कसे व्यक्त करता येतील हे तुम्हाला सांगताच येणार नाही. सारांश इंग्रजी देशी भाषेपेक्षा श्रेष्ठ आहे ही तुमची एक अंधश्रद्धा आहे.

जे मराठीभाषी इंग्रजीचे अर्थव्यक्तीचे सामर्थ्य मराठीपेक्षा जास्त आहे असे समजत असतील त्यांच्यासाठी मी पुढील विवेचन करतो. हे विवेचन समजण्याची कोदंडरावात देशी भाषांच्या अज्ञानामुळे पात्रताच नव्हती. ती माझ्या वाचकात आहे.

अर्थव्यक्तीचे साधन म्हणून भाषांची श्रेष्ठता ठरविण्याचे खालील निकष आहेत.

(१) भाषेतील शब्दांची संख्या

(२) अ भाषेतून ब भाषेत वा ब भाषेतून अ भाषेत अनुवाद करताना कोणती भाषा अपुरी पडते?

(३) लाघव म्हणजे थोडक्यात अर्थव्यक्तीचे सामर्थ्य

(४) अचूकपणा. या गुणाचा तर्कशास्त्रात विस्ताराने विचार केला आहे. जगातील कोणतीच भाषा अचूक नाही. म्हणून ती तर्कशास्त्राला फार तोटकी पडते म्हणून तर्कशास्त्रज्ञांनी एक नवीन सांकेतिक भाषा निर्माण केली आहे. कोणतीच नैसर्गिक भाषा या भाषेइतकी अचूक असू शकत नाही. पण एक भाषा दुसऱ्या भाषेपेक्षा जास्त अचूक असू शकते.

(५) लवचीकपणा. अचूक असणे हा तर्कशास्त्रीय भाषेचा गुण आहे. पण नैसर्गिक भाषेत अचूकपणा पाहिजे त्याचप्रमाणे मुद्दामच संदिग्धता ठेवायची असेल तर तसेही करता आले पाहिजे.



## संस्कृतवाचून मराठी व प्राणावाचून कुडी

नारळीकर एकदा म्हणाले की, संस्कृत भाषा अचूक नाही कारण तिच्यात एकाच शब्दप्रयोगाचे निरनिराळे अर्थ होऊ शकतात. पण निरनिराळे अर्थ होऊ शकणे हा भाषेचा दोष नाही. हे निरनिराळे अर्थ त्याच भाषेत निरनिराळे सांगता येत नसले तरच त्याला दोष मानता येईल. पण संस्कृत भाषेवर असा आरोप करता येत नाही. लोकनाथ याचा अर्थ ''लोकांचा नाथ'' किंवा ''लोक ज्याचे नाथ आहेत असा'' अशा दोन प्रकारे करता येतो. संस्कृत भाषेत लोकनाथ हा संदिग्ध शब्द आहे. त्याचप्रमाणे त्याचे दोन वेगळे अर्थ स्पष्ट करणारे विग्रह देखील आहेत.

(५) एकच अर्थ व्यक्त न करता एकाच वेळी दहा अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. वाटेल तेव्हा भाषा मधुर वा कर्कश, थोडकी या अगडबंब करता आली पाहिजे. जगातील वाटेल त्या छंदात रचना करता आली पाहिजे.

याबाबतीत मराठी व इंग्रजीची तुलना केली तर मराठी सर्व बाबतीत श्रेष्ठ आहे असे दाखवून देता येईल. पण यासाठी मुक्तपणे संस्कृतचा आश्रय करणारी मराठी अभिप्रेत आहे. संस्कृतवर बहिष्कार टाकणाऱ्या मराठीला दैनंदिन व्यवहार देखील व्यक्त करता येईल की नाही याची शंका आहे. ''पाणी आण'' असेही म्हणता येणार नाही कारण पाणी हे पानीयचे रूप आहे. ''सैपाक कर'' असे बायकोला सांगता येणार नाही कारण पाक हा या शब्दातील मुख्य अंश संस्कृत आहे. ''अन्न खातो म्हणता येणार नाही'' कारण अन्न हा संस्कृत शब्द आहे. संस्कृतवर बहिष्कार घालून मराठी लिहिण्याचा ''राजा शिवाजी''कर्ते कुंटे यांनी प्रयत्न केला. त्यातले एक उदाहरण असे-

छबुकडा चिमणा करितो गुण, चिमुकले धरिले मग अंगण ॥ यात ''करितो'', ''धरिले'' यातील धातु व गुण आणि अंगण हे शब्द संस्कृत आहेत.

शहरातील भाषापेक्षा खेड्यातील भाषांचा परभाषेशी संपर्क कमी आला. त्यामुळे शहरातील भाषांपेक्षा खेड्यातील भाषांत संस्कृत व संस्कृतोद्भव शब्द जास्त आहेत. शहरातील माणसाचे सर्पण हे खेड्यातील माणसाचे इंधन व शहरातील माणसाचे गवत हे खेड्यातील माणसाचे तण असते.

तेव्हा संस्कृतचे शब्द हे मराठीचेच आहेत असे गृहीत धरूनच मराठीचे सामर्थ्य जोखले पाहिजे. मराठीचे व्याकरण शिकविताना त्यात संस्कृतचीच समासप्रक्रिया शिकवीत असतात. खेड्यातल्या मराठीत देखील तेच समास असतात. जसे ''चटणीभाकर'', ''भाऊभाऊ'' हे दोन्ही द्वंद्व समास आहेत. इंग्रजीत चिल्लीब्रेड व ब्रदर्सब्रदर्स असे समास होत नाहीत. तेव्हा ''मराठीत संस्कृत शब्द यथेच्छ वापरणे जर

चालते तर इंग्रजी शब्द यथेच्छ वापरण्यालाच आक्षेप का असावा?'' हा युक्तिवाद मराठीबद्दलचे घोर अज्ञान दाखवितो. मराठीही शंभर टक्के संस्कृतोद्‌भव भाषा आहे. इंग्रजीचा मराठीशी कोणताच संबंध नाही. संस्कृतशिवाय मराठी अस्तित्वातच नाही व मराठीला नित्य नवीन विचारांचे वाहन करायला सक्षम ठेवायचे असेल तर संस्कृत शब्दसिद्धीचे ज्ञान अत्यावश्यक आहे.

इंग्रजीची शब्दसंपत्ती पाच  लक्ष सांगण्यात येते. संस्कृत धरून मराठीची शब्दसंपत्ती किती आहे याचा अंदाज खालीलप्रमाणे-

काळे यांच्या व्याकरणात संस्कृतचे १४०० मूळ धातु सांगितले आहेत. त्यांना ८० प्रत्यय लागून १४००×८०=११२००० शब्द होतात. यातील दोन वा अधिक शब्द जोडून समास होतात. फक्त दोन शब्दांचेच समास धरले तर [११२०००(११२०००-१)]/२ इतके समास होतात. शब्दांचा क्रम बदलला की समास बदलतो जसे सिद्धहस्त व हस्तसिद्ध. म्हणजे याच्या दुप्पट = १२५४३८८०० इतके समास झाले. ही संख्या १२ कोटींच्या वर आहे. शिवाय २२ उपसर्ग आहेत. नुसत्या १४०० धातूंनी सिद्ध होणाऱ्या ११२००० शब्दांना उपसर्ग लावून झालेले २२×११२०००=२४६४००० व समासांना उपसर्ग लावून झालेले २२×१२५४३८८००=२७५९६५३०० शब्द धरले तर ही संख्या २७६२११७८०० होते. ही २ अब्जाच्या वर जाते. तेव्हा संस्कृतची व तिच्या द्वारे मराठीची शब्दसंपत्ती अक्षरश: अनंत आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

मराठी लेखकांना नेहमी इंग्रजीतून मराठीत भाषांतर करावे लागते. त्यामुळे अमुक अर्थ मराठीत नीट व्यक्त करता येत नाही म्हणून तक्रार केली जाते. पण मराठीतून इंग्रजीत भाषांतर करताना तशीच अडचण पडते हे लक्षात घेतले  जात नाही. इंग्रजीचे मराठी करायला मुख्य अडचण पडते ती ज्या क्षेत्रात मराठीचा वापर केला जात नाही त्या क्षेत्रातील इंग्रजीचे भाषांतर करताना. राज्य कारभार, कायदा, विज्ञान वगैरे क्षेत्रात मराठीला मज्जाव आहे. त्यामुळे या क्षेत्रात मराठीचे शब्दप्रयोग प्रचलित नाहीत. पण हा मराठीचा दोष नाही. या सर्व क्षेत्रात संस्कृतच्या साहाय्याने चांगले शब्दप्रयोग सुचविण्यात आले पण नेहरूंनी त्याविरुद्ध खोटा व विषारी प्रचार करून त्यांना हद्दपार केले. याबाबतीत डॉ. रघुवीर यांचे कार्य चांगले होते. त्यांच्याशी मतभेद असणारे दुसरेही प्रयत्न या क्षेत्रात झाले आहेत. त्यामुळे या क्षेत्रात मराठी तोटकी राहिली नसून स्वत:ची संपत्ती न वापरता ती घाण आहे म्हणून उकिरड्यावर फेकून देण्याचा करंटेपणा देशात आहे ही खरी अडचण आहे.

संस्कृत शब्दसिद्धीची काही उदाहरणे देऊन ती इंग्रजीपेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे



दाखवितो. कायद्याच्या क्षेत्रातील खालील शब्द पहा.

| संस्कृत | ध्वनिसंख्या | इंग्रजी | ध्वनिसंख्या |
|---|---|---|---|
| विधि | २ | Law | १ |
| संविधान | ४ | Constitution | ५ |
| वैध | २ | Legal | ३ |
| संवैधानिक | ५ | Constitutional | ६ |
| विधेयक | ४ | Bill | २ |
| विधापन | ४ | Legislation | ५ |
| एकूण | २१ | एकूण | २२ |

वरील तालिकेवरून लक्षात येई की सारे संस्कृत शब्द एका विधि शब्दापासून शब्दसिद्धीच्या नियमाप्रमाणे सिद्ध झाले आहेत. उलट इंग्रजी शब्द लॉ व कॉन्स्टिट्यूशन या शब्दापासून व बिल हा शब्द कोणत्याही कायद्याशी संबंध असलेल्या शब्दापासून सिद्ध झालेला नाही. ज्याला हा शब्द माहीत नाही पण कायदा या अर्थाचे इतर शब्द माहीत आहेत त्याला त्याचा काय अर्थ आहे याचा तर्क करता येणार नाही. शिवाय इंग्रजी शब्द जास्त लांब आहेत हे शब्दांच्या खाली दिलेल्या एकूण ध्वनिसंख्येवरून दिसून येईल.

आता अचूकतेच्या दृष्टीने पहा. लॉ या शब्दाचा नियम असा अर्थ होतो. गुरुत्वाकर्षणाचा नियम हाही लॉ व बहुपत्नीकत्व हा गुन्हा आहे हाही लॉच. नियम निसर्गाचा आहे की मानवाने घालून दिलेला आहे याचा त्यावरून बोध होत नाही. उलट विधि हा शब्द वि म्हणजे विशेषाने हा उपसर्ग व धा म्हणजे करणे या धातूपासून झाला आहे. विशेषत्वाने केलेला म्हणजे घालून दिलेला नियम असा अर्थ स्पष्ट होतो. उलट निसर्गनियमांना ऋत हा शब्द आहे व दोन्ही नियमांना लागू होणारा नियम हा शब्द आहे. कॉन्स्टियूशन म्हणजे एखाद्या वस्तूचे घटकावयव व त्यांची रचना. जसे विड्याचे कॉन्स्टट्यूशन पान, चुना, काथ व सुपारी यांचे विशिष्ट प्रकाराने मिश्रण हे आहे. याला घटना हा शब्द योग्य आहे. पण कॉन्स्टिट्यूशन हा शब्द या अर्थी वापरण्यात येत नाही. देशाचे कॉन्स्टिट्यूशन त्या देशातील कायद्यांचे घटकावयव काय आहेत हे सांगत नाही. कॉन्स्टिट्यूशन म्हणजे देशातील कोणताही कायदा ज्या तत्त्वांना धरूनच असला पाहिजे ती तत्त्वे. म्हणजे कायद्यांनाही बंधनकारक असलेला मोठा कायदा. हाच नेमका अर्थ संविधान या शब्दाने व्यक्त होतो. सम् या उपसर्गाचा अर्थ मोठे वा समावेशक असा होतो. गीत म्हणजे गाणे व संगीत म्हणजे नृत्य व वाद्य यांनी परिपूर्ण असलेले गीत.

अर्थात संविधान म्हणजे मोठा वा तदन्तर्गत कायद्यापेक्षा अधिक बंधनकारक असा कायदा वा सर्व कायद्यांचा ज्या तत्त्वात संग्रह होऊ शकतो असा कायदा. अर्थात लॉ व कॉन्स्टिट्यूशन या शब्दापासून होणाऱ्या सर्व शब्दापेक्षा संविधान हा शब्द अधिक अचूक आहे. बिल याचा अर्थ विशिष्ट गोष्टींचा लेखी निर्देश असा आहे. यातून जो नियम सरकारने बंधनकारक करावा म्हणून विधिसभेपुढे ठेवला जातो तो असा अर्थ निघत नाहीत. उलट विधेयक या शब्दात "जे नियम कायद्यात रूपांतरित करावयाचे आहेत ते" एवढा सगळा अर्थ त्यातील वि+धा या धातूमुळे व्यक्त होतो.

## कुबेराच्या हाती नरोटी!

आता काही वैज्ञानिक परिभाषेचा विचार करू.

| संस्कृत | ध्वनिसंख्या | इंग्रजी | ध्वनिसंख्या |
|---|---|---|---|
| शून्यलब्धि | ४ | Differential Calculus | १० |
| पूर्णलब्धि | ४ | Integral Calculus | ८ |
| खगोल | ३ | Astronomy | ४ |
| ज्या | १ | Chord | २ |
| त्रिज्या | २ | Radius | ४ |
| एकूण | १४ | एकूण | २६ |

डिफरन्शिअल कॅल्क्युलस या शब्दाने फरकाचे गणित एवढाच अर्थ व्यक्त होतो. पण या अर्थानुसार वजाबाकीला डिफरन्शिअल कॅल्क्युलस म्हणावे लागेल. संस्कृत शब्दाचा अर्थ सप्तमी तत्पुरुष समासाप्रमाणे शून्यातील लब्धि म्हणजे प्राप्ती असा होतो, यात समीकरणातील एका बाजूची संख्या शून्याच्या जवळ जात असता दुसऱ्या बाजूची किती असते हे काढणे हा शून्यलब्धीचा जो मुख्य उद्देश तो व्यक्त होतो. इण्टिग्रल कॅल्क्युलस या शब्दात बेरजेचे गणित एवढाच अर्थ व्यक्त होतो. उलट पूर्णलब्धी या शब्दाने पूर्ण म्हणजे अनंत शून्यकल्प संख्यांची बेरीज असा पूर्णलब्धीच्या गणिताचा अचूक अर्थ व्यक्त होतो. पूर्ण व एकूण यात फरक आहे. वर्गातील एकूण मुले किती हे वर्गातील मुलांची गणना करून ठरविता येते. पण पूर्ण याचा अर्थ इंग्रजीतील पर्फेक्ट या शब्दाने व्यक्त होतो व ज्याला अंत आहे त्याला पर्फेक्ट म्हणता येत नाही. तेव्हा पूर्ण या शब्दात अनंताचे सूचन आहे व पूर्णलब्धीत ज्या घटकांची बेरीज केली जाते ते अनंत असतात. ॲस्ट्रॉनॉमी म्हणजे ताऱ्यांचे शास्त्र असा अर्थ होतो. पण खगोलात केवळ ताऱ्यांचा विचार नसतो. सूर्य, चंद्र, पृथ्वी व ग्रह यांचाही विचार



असतो. या दृष्टीने खगोल म्हणजे आकाशरूपी गोलाचे शास्त्र यात आकाशात जे जे आहे त्यांचे शास्त्र असा अचूक अर्थ व्यक्त होतो. कॉर्ड म्हणजे दोरी. यावरून भूमितीतले कॉर्ड काय आहे याचा बोध होत नाही. पण ज्या म्हणजे धनुष्याची दोरी यावरून वर्तुलातील कोणत्याही दोन बिंदूंना जोडणारी सरळरेषा हा अर्थ अचूकपणे व्यक्त होतो. रेडिअस या शब्दाचा मूळ अर्थ किरण एवढाच आहे. त्यावरून त्रिज्या या भूमितीच्या शब्दाचा बोध व्याख्येशिवाय होत नाही. उलट त्रिज्या हा शब्द आकर्ण ओढलेल्या धनुष्याच्या दोरीचे धनुर्धराच्या बोटापासून जे दोन भाग होतात त्या त्रिकोणाच्या दोन बाजू व तिसरी बाजू म्हणजे धनुष्याचा वक्राकार भाग. वर्तुळाच्या कोणत्याही दोन बिंदूपासून केंद्रापर्यंत जाणाऱ्या रेषा या त्रिज्या असतात हा अर्थ यात स्पष्ट प्रतीत होतो.

ध्वनिसंख्या मोजली तर संस्कृतचे शब्द इंग्रजी शब्दापेक्षा जवळपास ५० टक्के लहान आहेत हे दिसून येते.

अचूकपणा व लाघव याप्रमाणेच लवचीकपणा देखील वरील संस्कृत शब्दांच्या घटनेत सिद्ध होतो. एकाच धातूची ८० प्रत्यय व २२ उपसर्ग लावून १७६० रूपे होतात हे लवचीकपणाचे लक्षण आहे.

आपल्या भाषांचे हे सर्व गुण टिकवायचे असतील तर होता होईल तो संस्कृत शब्दसिद्धीच्या बाहेर न जाण्याची काळजी घेतली पाहिजे म्हणजे १००० धातू शिकून अनंत शब्दावली आपल्या दिमतीस राहील.

भारतीय भाषात नसलेला इंग्रजीचा एक प्रमुख दोष म्हणजे नियमशून्य वाक्प्रचार. याला इंग्रजीत ईडियम म्हणतात. ईडियम म्हणजे म्हण नव्हे. (१. More haste less speed : घाई तेथे दिरंगाई २. What can not be cured must be endured : आलीया भोगासी असावे सादर या म्हणी आहेत. म्हण हे एक सुभाषित असते व त्यात काव्यगुण असतात. ईडियम ही म्हण नसते व तिच्यात काव्यगुण अपेक्षित नसतात. उदाहरणार्थ I will not go back on my word ही ईडियमचा आहे. ज्याला ही ईडियम माहीत नाही त्याला तिचा अर्थ विचारला तर तो बहुधा "मी माझ्या शब्दाकडे परत जाणार नाही," म्हणजे तो शब्द आता रद्द झाला असा अर्थ करील. पण या ईडियमचा अर्थ अगदी उलट म्हणजे, "मी माझा शब्द फिरविणार नाही," असा आहे. ऑन चा असा अर्थ होतो हा इंग्रजीचा नियम नाही. I will not go back on my duty याचा अर्थ, मी आपल्या कामावर परत जाणार नाही असा होतो. मी आपले काम सोडणार नाही असा होत नाही.

He was talking at me याचा अर्थ, तो माझ्याशी बोलत होता असा होत

नाही. त्याचे बोलणे अप्रत्यक्षपणे माझ्यासाठी होते असा अर्थ होतो. पण ॲट या उपसर्गाचा अर्थ अप्रत्यक्षपणे असा होतो असे म्हणता येत नाही. He was looking at me येथे तो माझ्याकडे अप्रत्यक्षपणे पाहत होता असा अर्थ होत नाही. या उदाहरणावरून ईडियमची व्याख्या अशी करता येईल, 'भाषेचा कोश व व्याकरण माहीत असूनही ज्या वाक्याचा अर्थ लागत नाही.' अर्थ लागण्यासाठी तेच वाक्य त्याच संदर्भात पूर्वी अनेकवेळा ऐकलेले असले पाहिजे. असे वाक्य थोडक्यात अर्थ व्यक्त करते हा त्याचा गुण असतो.

हा गुण असला तरी ईडियममुळे इंग्रजी भाषा कठिण झालेली आहे. त्यामुळे तिच्यात नियमशून्यता शिरली आहे.

मराठी, संस्कृत वा हिंदीमध्ये अशा ईडियम्स नाहीत. पण त्यामुळे त्यांची अर्थवाहकता कमी झालेली नाही. I will not go back on my word यातील अर्थ "मी आपला शब्द फिरविणार नाही," यात येतो. He was talking at me याचा अर्थ "त्याच्या बोलण्याचे लक्ष्य मी होतो." याने व्यक्त होऊ शकतो.

तात्पर्य इंग्रजी अर्थव्यक्तीचे साधन म्हणून भारतीय भाषापेक्षा श्रेष्ठ आहे हा कोदंडरावांचा ग्रह अज्ञानजन्य आहे.

इंग्रजी सगळ्या जगाची भाषा आहे. म्हणून कोणतीही इतर विदेशी भाषा इंग्रजीला पर्याय ठरू शकत नाही ही कोदंडरावांची व बहुतेक इंग्रजीभक्तांची समजूत निराधार आहे. आल्मनॅकमध्ये कोणती भाषा बोलणारे किती लोक आहेत याचे आकडे दिले आहेत ते असे-

## काही आकडे

| भाषा | स्वभाषकांची संख्या | शिकून बोलणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| चीनी मॅण्डरिन | ८७ कोटी | उपलब्ध नाही |
| हिंदी | ३६ कोटी | ४८ कोटी |
| इंग्रजी | ३४ कोटी | ५० कोटी |
| स्पॅनिश | ३२ कोटी | उपलब्ध नाही |

भारताच्या सर्व शासकांनी विशेषत: नेहरूंनी हिंदीच्या विरोधात सरकारचे सर्व सामर्थ्य वापरले असताना हिंदी इंग्रजीपेक्षा फक्त दोन कोटींनी कमी आहे. सरकारचे सामर्थ्य तिच्या पाठीशी उभे असते तर तिचा प्रसार किती झाला असता याची कल्पना करता येण्यासारखी आहे.



जगाच्या ६०० कोटी लोकसंख्येपैकी फक्त ५० कोटी लोक इंग्रजी जाणतात. अशा भाषेला जगाची भाषा म्हणणे कितपत युक्त आहे?

ता. ५/३/२००५ च्या हितवादमध्ये जगात हिंदी समजणाऱ्यांची संख्या १०० कोटी आहे व त्यातले २० कोटी अभारतीय आहेत असे सुधारित आकडे दिलेले आहेत. या आकड्याप्रमाणे तर हिंदी इंग्रजीपेक्षा जास्त जागतिक आहे असे ठरते.

इंग्रजीचे वाङ्मय जगातील सर्व भाषांपेक्षा अधिक समृद्ध आहे हा कोदंडरावांचा दुसरा ग्रह देखील अज्ञानमूलक आहे. इंग्रजीत जगातील विज्ञानाचा ४० टक्के भाग उपलब्ध आहे असा दावा सांगण्यात येतो. पण ही गोष्ट दुसऱ्या महायुद्धानंतर घडलेली आहे. त्यापूर्वी फ्रेंच व जर्मन भाषात विज्ञानाचे वाङ्मय अधिक उपलब्ध होते. लवकरच चीनी व रशियन भाषेत ते अधिक राहण्याचा संभव आहे. तात्पर्य जगाच्या शर्यतीत इंग्रजीच नेहमी आघाडीवर राहील असे आपण गृहीत धरू शकत नाही.

दुसरे असे की, परकीय भाषा शिकण्यात विज्ञानाचे ज्ञान मिळविणे हा एकमात्र उद्देश नसतो. विज्ञानाचे विद्यार्थी इतर विषयांच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी असतात. तेव्हा कोणत्या विषयात कोणत्या भाषेचे ज्ञान अधिक आहे याचा विचार करून कोणती परदेशी भाषा शिकणे अधिक फायद्याचे आहे हे प्रत्येकाने वेगळे ठरविले पाहिजे. चीनचे ज्ञान पाहिजे असेल तर इंग्रजीपेक्षा चीनी भाषेचे ज्ञान अधिक आवश्यक आहे. तेव्हा परदेशी भाषा म्हणून इंग्रजीचा समावेश आवश्यक असला तरी फक्त इंग्रजी भाषेचाच समावेश करणे घातक आहे. चीनी, जपानी, रशियन, फ्रेंच, जर्मन व स्पॅनिश यांना विदेशी भाषांच्या शिक्षणात सारखेच स्थान असेल पाहिजे.

इंग्रजीचे अध्ययन स्वभाषा म्हणून न करता परभाषा म्हणूनच केले पाहिजे हे ठरल्यावर शालेय शिक्षणात इंग्रजीला काहीच स्थान असू शकत नाही. ते फक्त विश्वविद्यालयीन शिक्षणातच देणे योग्य आहे. परदेशाशी व्यवहार, विशिष्ट क्षेत्रातील प्रगत ज्ञानाचे संपादन वगैरे उद्देश परभाषा शिकण्याच्या मुळाशी असतात. हे उद्देश कोणती भाषा शिकल्याने सिद्ध होतील हे प्रत्येकाच्या क्षेत्रावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे विशिष्ट ज्ञानाचे संपादन व परदेशाशी व्यवहार फारच थोड्या नागरिकांना करायचा असतो. बव्हंश नागरिक हे तज्ज्ञ नसतात व त्यांचा व्यवहार फक्त स्वदेशाशी निगडित असतो. त्यांच्यावर परदेशी भाषा शिकण्याची सक्ती करणे अन्यायाचे आहे.

सर्वांसाठी शिक्षण व तज्ज्ञासाठी शिक्षण असा शिक्षणात भेद करणे आवश्यक आहे. अमुक ज्ञान देशाच्या हिताचे आहे म्हणून सर्वांनीच ते मिळविले पाहिजे असे ठरत नाही. मोटारी कशा बनवाव्या व कशा दुरुस्त कराव्या हे ज्ञान आवश्यक आहे.. पण

म्हणून शाळेत पाय ठेवल्याबरोबर प्रत्येकाला मोटारी बनविण्याचे शिक्षण द्यावे असे ठरत नाही. मोटारीचे यंत्रज्ञान असलेले काही लोक समाजात असले की ही गरज भागू शकते.

दुसरे असे की, परदेशी भाषा उच्च ज्ञान संपादण्यासाठी व परदेशी व्यवहार करण्यासाठी वापरता येईल एवढ्या स्तरापर्यंत शिकण्याइतकी बुद्धी सगळ्यांनाच असते, असे गृहीत धरणे अज्ञानमूलक आहे. इंग्रजीचे वर्तमानपत्र व ग्रंथ समजण्याइतके इंग्रजी यायला निदान दहा वर्षे दिवसाचा निदान अर्धा वेळ इंग्रजीवर खर्च करणे आवश्यक आहे. हे मॅट्रिकपर्यंत शिकणाऱ्या किती विद्यार्थ्यांना इतके इंग्रजी येते याचा तपास घेतल्यास दिसून येईल. मॅट्रिक पारित केलेल्या पुष्कळांना या स्तराचे इंग्रजी येत नाही. उत्तीर्ण झालेल्याची जर ही दशा जर जे सात वर्षे इंग्रजीवर खपून अनुत्तीर्ण राहतात त्या विद्यार्थ्यांबद्दल काय बोलावे? त्यांचा हा सारा वेळ व पैसा फुकट गेला असे म्हणता येणार नाही काय?

## समान भाषेची आवश्यकता

चित्रकला, संगीत व आकडेमोडीपलीकडचे गणित सगळ्यांनाच येऊ शकत नाही हे पटवून देण्याची गरज आहे असे वाटत नाही. हरिभाऊ आपट्यांसारखे प्रतिभाशाली लोक गणित जमले नाही म्हणून विश्वविद्यालयात प्रवेश करू शकले नाहीत. भाषा वापरल्याशिवाय कोणीच जगू शकत नाही. त्यामुळे मातृभाषेचे ज्ञान बहुतेक सर्वांनाच मिळविता येते. पण दैनंदिन व्यवहाराला लागणारे ज्ञान व साहित्य, समाजविज्ञान इत्यादी क्षेत्रात लागणारे भाषाज्ञान सर्वांच्याच आटोक्यातले नसते. तेव्हा परभाषा आवश्यक करणे हे चित्रकला वा संगीत आवश्यक करण्यासारखेच विवेकशून्य आहे.

सगळ्यांना कोणतीही परकीय भाषा आवश्यक करणे चूक आहे. त्याचप्रमाणे परकीय भाषांचे अध्ययन कोणत्या स्तरापर्यंत कोणी करावे हेही ठरविणे आवश्यक आहे. मॅक्स्मूलरादि पाश्चात्त्य पंडितांना संस्कृत शिकणे आवश्यक वाटले. पण जन्मभर संस्कृतचा अभ्यास करूनही त्यांनी संस्कृत बोलण्याचा वा लिहिण्याचा कधी प्रयत्न केला नाही. कारण संस्कृतच्या ग्रंथात काय लिहिले आहे हे समजून घेऊन त्यावर संशोधन करणे हा त्यांचा उद्देश होता, भारतात जाऊन संस्कृतमध्ये व्याख्याने देणे हा उद्देश नव्हता. याने किती श्रम वाचले व किती मोलाचे संशोधन होऊ शकले! यावरून आपल्या शिक्षाविदांनी बोध घेतला पाहिजे. विज्ञानाच्या भारतीय विद्यार्थ्यांनी इंग्रजीतले विज्ञानाचे ग्रंथ समजतील व त्यांचे भाषांतर स्वभाषात करता येईल इतक्या स्तरापर्यंतच



इंग्रजी शिकावे. इंग्रजी बोलण्याचा व लिहिण्याचा हव्यास धरू नये. असे केले तर एवढ्या स्तरापर्यंतचे इंग्रजी यायला दोनतीन वर्षे पुरावीत. कोठारी आयोगाने इंग्रजीला लायब्ररी लँग्वेज म्हणजे ग्रंथालयभाषा म्हटले त्यात हा अर्थ व्यक्त झाला आहे. इंग्रजी ग्रंथालयांचा उपयोग करता यावा हाच इंग्रजी शिक्षणाचा उद्देश असावा. ते न करता पाळण्यापासून मुलांच्या कानावर इंग्रजीशिवाय काही पडू नये या थरापर्यंत इंग्रजीशरणता स्वीकारण्याचा उद्देश कोणत्याही प्रकारची विज्ञानाची व साहित्याची सेवा हा नाही. मोराची पिसे खोऊन कावळ्याने मोर असल्याची बतावणी करावी त्यातला हा प्रकार आहे. भारतीय व इंग्रज यांच्यात दुभाषाचे काम ज्यांना करायचे आहे त्यांचा इंग्रजी शिकण्यातला उद्देश अगदी वेगळा असणार. भाषांतर ही एक स्वतंत्र कला आहे. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या पुष्कळ लोकांना इंग्रजीत व मराठीत स्वतंत्रपणे व्याख्याने देता येतील पण "इंग्रजीचे एकेक वाक्य घेऊन त्याचे मराठी व तसेच मराठीचे इंग्रजी करा" म्हटले तर फार जड जाईल. संयुक्त राष्ट्रांच्या सभेतील भाषणाचे तत्काल त्या त्या भाषेत भाषांतर करून भाषण करणाऱ्या लोकांना ज्याप्रकारचे द्विभाषिक शिक्षण घ्यावे लागते ते एकाच भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी घेतलेल्या शिक्षणापेक्षा अगदी वेगळे असणार. आपल्या परभाषा शिक्षणात याचा विचारच नाही.

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या देशात दुसरी एक एक गोष्ट आवश्यक आहे. भिन्न प्रांतातले भारतीय भेटले व त्यांना आपसात दुभाषाच्या मदतीशिवाय बोलता आले नाही तर ते दोघेही एकाच राष्ट्राचे घटक आहेत असे कष्टानेच म्हणता येईल. तेव्हा सारे भारतीय एकमेकाशी दैनंदिन व्यवहार करू शकतील इतपत त्यांच्यात एक समान भाषा आवश्यक आहे. अशी भाषा फक्त हिंदीच असू शकते. गेली ५० वर्षे सरकारचे सारे सामर्थ्य इंग्रजीचा प्रसार करण्यावर खर्च झाले आहे. किंबहुना सरकारने इंग्रजीचा प्रसार करण्याशिवाय दुसरे काही केलेच नाही असे म्हणणेही गैर होणार नाही. असे असता इंग्रजीचे उपयुक्त असणारे ज्ञान असणारे भारतात तीन कोटींच्या वर लोक नसावेत. तेव्हा इंग्रजी ही भारताची समान भाषा होऊच शकत नाही. म्हणूनच हिंदीला विरोध करणारे लोक भारत हे राष्ट्रच नाही व म्हणून भारताला समान भाषा असण्याची जरूर नाही असे म्हणू लागले आहेत.

अशा लोकांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व मुंबईपासून गोहत्तीपर्यंत चालणाऱ्या आगगाड्यात किती लोक रोज प्रवास करतात याचे आकडे लक्षात घ्यावे.

या कोट्यवधी लोकांना समान भाषा नसेल तर त्यांच्या व्यवहारात अडचणी येणार नाहीत काय? हिंदीलाच नव्हे तर साऱ्याच स्वभाषांना विरोध करणारे लोक

भारताला राष्ट्रीय भावनांची व स्वावलंबनाची आवश्यकता नाही असे म्हणू लागले आहेत. एकच गोष्ट अशी आहे की ज्याची आवश्यकता नाही असे ते अजून म्हणत नाहीत. ती म्हणजे आर्थिक समृद्धी. पण भारतात एक स्थिर राज्य राहिले नाही, लोक आपसात भांडत असले, त्यांना एकमेकांच्या भावभावना समजत नसल्या, ते प्रत्येक बाबतीत परावलंबी असले तर त्यांना आर्थिक समृद्धी तरी कशी लाभू शकेल?

इंग्रजीच्या स्वेच्छेने स्वीकारलेल्या दास्याने खालील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. (१) भारतीय भाषांविषयींचे सत्य काय आहे याची मुळीच पर्वा न करता आमच्या भाषा नालायक आहेत व कधीच लायक होऊ शकणार नाहीत हे आम्ही सहजपणे स्वीकारले. इंग्रजीचे वास्तविक गुणदोष काय आहेत याचाही कोणताच वस्तुनिष्ठ विचार न करता आम्ही इंग्रजीला श्रेष्ठ मानून इंग्रजीभाषी बनण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात आमच्यात वस्तुनिष्ठ विचार करण्याची शक्ती नाही व आत्महेलनेचे कोणतेही विचार आम्ही सहजपणे शिरोधार्य मानू शकतो. सर्वसाधारण माणूस आपल्याला रोग झाला आहे हे मानायला तयार नसतो. पण आपण निरोगी असावे ही त्याची सर्व जणांना सामान्य असलेली इच्छा जागृत असल्यामुळे आपल्या व्याधीचे योग्य निदान करवून घेण्याचा प्रयत्न तो करीत असतो. याच्या उलट सत्याकडे डोळेझाक करून आत्मघात करण्याची ज्याची वृत्ती आहे असा माणूस निदानाचे प्रयत्न टाळून आपल्याला काही झालेच नाही अशी मनाची समजूत करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याची ही विकृती पराकोटीला गेली असल्याशिवाय तो खरे निदान फार काळ टाळू शकत नाही. पण त्याला तोंड देण्याची त्याच्या मनाची तयारी होते तेव्हा फार उशीर झालेला असतो. यापेक्षाही वेगळ्या प्रकारचा एक माणूस असतो. तो आपल्याला काहीच झाले नसताना देखील आपण रोगीच आहोत असा आग्रह धरून बसतो व त्यामुळे त्याच्यात रोगाची खोटी लक्षणे देखील निर्माण होतात. या मनोवृत्तीला हिपोकॉन्ड्रिया व्याधिचिंता म्हणतात. ही मनोविकृति आहे. याच्यापुढची तिची अवस्था म्हणजे स्वत:च्या रोगाचे भूषण वाटू लागणे. आपण व्याधिग्रस्त आहोत हे आपले वैशिष्ट्य आहे व ते भूषणास्पद आहे असे त्याला वाटू लागते. भारताला या चरमावस्थेची विकृती झाली आहे. नसलेले रोग आपल्याला आहेतच अशी आपण कल्पना करून घेतली आहे पण ही कल्पना चिंतेच्या स्वरूपाची नाही ती आत्मश्लाघेचे स्वरूप धारण करू लागली आहे. आपण स्वभाषांचा त्याग करून इंग्रजीला आपली मानतो ही लाजिरवाणी गोष्ट नसून भूषणास्पद गोष्ट आहे असे आपल्याला वाटू लागले आहे.

लज्जास्पद गोष्टींचे भूषण मानण्याची ही वृत्ती भाषेपुरतीच मर्यादित राहील असा



संभव नव्हता. ज्यांना परभाषेचे दास्य स्वीकारण्यात मानहानी वाटत नाही त्यांना भ्रष्टाचारात मानहानी का वाटावी? भ्रष्टाचार करून गब्बर होणे व पकडले न जाता सहीसलामत राहणे ही चीड येण्यासारखी गोष्ट नसून लोकात मिरवण्यासारखी गोष्ट आहे असे मानण्याची प्रवृत्ती बरीच बोकाळली आहे. हर्षद मेहता ही आमच्या देशात विभूति मानली गेली होती. जघन्य अपराधासाठी सजा पावलेले लोक निवडणुकीत निवडून येतात. पूर्वी देखील सुनांचा छळ होत असे. पण इंग्रजी बोलल्याने आपण आधुनिक झालो असे समजणाऱ्या भारतात हुंडाबळी नावाचा पूर्वी कधीही न घडलेला जघन्य अपराध मोठ्या प्रमाणावर घडू लागला आहे. पूर्वीही व्यभिचार होत असे पण उच्चपदस्थांच्या व्यभिचाराचे कौतुक करण्याची प्रथा नव्हती. विवाहाच्या प्रसंगी समाजासमोर घेतलेली शपथ मोडण्यात जर किंतु वाटत नाही तर लोकसभेत घेतलेली संविधानाचे रक्षण करण्याची व व्यावसायिक नीतिमत्तेच्या शपथा पवित्र मानल्या जातील यांची अपेक्षा कशी करावी?

या प्रकाराला मनोविज्ञानात irradiation म्हणजे परिप्रसरण म्हणतात. तेलाचा एक थेंब पाण्यावर पडला की तो साऱ्या पृष्ठभागावर पसरतो त्याचप्रमाणे एका क्षेत्रातील अनिष्ट प्रवृत्ती दुसऱ्या क्षेत्रात पसरत असतात.

■■■

# नेहरू : व्यक्तित्वमीमांसा

## शिवाजीपेक्षा श्रेष्ठ

भारताचे पंतप्रधान म्हणून नेहरूंनी १७ वर्षे जे केले त्याचे आतापर्यंत विवेचन केले. हे वाचल्यानंतर पुष्कळ वाचकांच्या मनात एक प्रश्न उद्‌भवेल. "नेहरूंनी जे काही केले ते भारताचे जास्तीत जास्त नुकसान कशाने होईल याची योजना ठरवून बुद्धिपुरस्सर केले असे मानल्याशिवाय हे सर्व विवेचन खरे समजता येत नाही. बुद्धिपुरस्सर भारताचे नुकसान करण्याचे नेहरूंना काय कारण? अशा योजना करून नेहरू वागले असले तरी माणसाच्या कोणत्या योजना एवढ्या तंतोतंत सफल होतात? तेव्हा या विवेचनाच्या शक्यतेची संभावना फारच कमी आहे."

संभाव्यतेच्या आधारे अशी टीका करणाऱ्या वाचकांना मी म्हणेन "माझ्या विवेचनात अशी कोणती गोष्ट आहे की जी तत्कालीन वर्तमानपत्रे व नेहरूंवर त्यांना जवळून जाणणाऱ्या व्यक्तींनी लिहिलेले ग्रंथ यांनी सिद्ध होणार नाही? माझे असे आव्हानच आहे की, मी केलेले अमुक विधान वरील आधाराने खोटे ठरते हे माझ्यावर टीका करणाऱ्यांनी सिद्ध करून दाखवावे. नेहरूंच्या व त्यानंतरच्या नेहरूवादी सरकारच्या कारकीर्दीत मी रोज वर्तमानपत्रे वाचत होतो व नभोवाणी ऐकत होतो.



युद्धाच्या काळात मी शत्रुराष्ट्राची नभोवाणी देखील ऐकत होतो. पाकिस्तानची डॉनसारखी वृत्तपत्रे त्यावेळी भारतात सहज मिळत होती. तीही मी हाती पडतील तेव्हा वाचत होतो. मला नेहरूंनी पंतप्रधान या नात्याने जे केले ते माझ्याच चरित्राप्रमाणे स्पष्टपणे आठवते. घडलेल्या घटनांचे निश्चित काल सगळ्यांना माहीत आहेत. त्या कालचे कोणतेही मोठे वर्तमानपत्र उघडले तर माझ्या निवेदनाची पुष्टी होणे मुळीच कठिण जाणार नाही.

"तुम्ही लिहिलेल्या गोष्टी खऱ्या असतील पण तुम्ही फक्त वाईट गोष्टीच निवडून लिहिल्या आहेत. निवडक सत्य व निवडक असत्य यात काही फरक नसतो व या दृष्टीने तुमचे विवेचन असत्य ठरते" असे ज्यांना म्हणायचे असेल त्यांनी मी कोणत्या गोष्टी दडविल्या हे सांगावे. मी फार आभारी होईन. माझ्या देशाचे पंतप्रधान नेहरू यांच्याबद्दल चांगले बोलता यावे अशी मला इच्छा आहे. तसे बोलता आले तर मला आनंदच होईल.

नेहरूंबद्दल निवडून निवडून वाईट गोष्टीच लिहिण्यात माझा काय हेतू असू शकतो? नेहरूंची निंदा करण्याचा मला हव्यास वाटावा असे नेहरूंनी माझे काय घोडे मारले आहे? त्यांना माझे अस्तित्व तरी माहीत होते काय? शिवाय नेहरूंनी माझ्यावर कृपा करण्यासाठी काही केले नसले तरी परदेशात शिकून येणाऱ्या वैज्ञानिकांना उत्तम संधी मिळावी या त्यांच्या धोरणामुळे मला विज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन करण्याची संधी व संसार चालविण्याची चिंता राहणार नाही अशी नोकरी मिळाली. नेहरूंच्या धोरणासारखे धोरण नसणारा दुसरा कुणी राज्यकर्ता असता तर मला एवढी नोकरी मिळायला १०, १५ वर्षे तरी लागली असती. तेव्हा नेहरूंनी माझे काही घोडे मारले म्हणून मी हे पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त झालो हा आरोप बिनबुडाचा आहे.

"नेहरूंची धोरणे एवढी राष्ट्रविघातक होती तर साऱ्या देशाने त्यांना डोक्यावर का घेतले?" असे विचारण्यात येते. हा प्रश्न वस्तुतः मला न विचारता देशालाच विचारला पाहिजे. नेहरूंबद्दल पूज्यभाव असणाऱ्यांना जर हा प्रश्न केला तर ते सांगतील की "देशाला स्वराज्य मिळवून देणाऱ्या काँग्रेसचे व म. गांधींचे ते उत्तराधिकारी होते. त्यांनी श्रीमंतीचे आयुष्य सोडून वर्षानुवर्षे तुरुंगवास सोसला. पंतप्रधान असताना त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली व त्यामुळे भारतालाही जगात मानाचे स्थान मिळाले. त्यांनी पंचवार्षिक योजना करून देशाचे औद्योगीकरण केले. "सेक्युलॅरिझमचा" प्रचार करून देशात ऐक्य स्थापन केले. अखिल भारतावर राज्य करणारा भारतीय नेहरूंच्या पूर्वी कोणी झालाच नाही. यादृष्टीने देशाच्या एका कोपऱ्यात राज्य करणाऱ्या

शिवाजीपेक्षाही ते मोठे होते.''

हे शेवटचे वाक्य काल्पनिक नसून एका नेहरूभक्ताच्या तोंडी मी ऐकले आहे. या न्यायाने शिवाजीपेक्षा श्रेष्ठ असे महात्मे स्वराज्यानंतर या देशात दर पाच वर्षांनी व कधी कधी तर पाच वर्षांचा काल संपायच्या आधीच निर्माण होतात असे म्हणावे लागेल. तात्पर्य शिवाजीच नव्हे तर सम्राट अशोक व संवत्कर्ता विक्रमादित्य यांच्यापेक्षा श्रेष्ठ असे निदान डझन पुरुष तरी स्वराज्यानंतर भारताने निर्माण केले आहेत. या नररत्नांच्या मालिकेत गुजराल व देवेगौडा हे देखील अंतर्भूत आहेत.

## बिचारे सुभाष व तात्या टोपे

तात्या टोपे यांच्या चरित्राच्या प्रकाशनाच्या वेळी भाषण करताना एक नेहरूभक्त म्हणाले, ''ज्या ग्रंथमालेत हा ग्रंथ प्रकाशित होत आहे त्यात नेहरूंचे चरित्र देखील प्रकाशित होणार आहे. अशा ग्रंथमालेत स्थान मिळण्याची वस्तुत: तात्या टोपेंची योग्यता नाही. पण लेखकाने पुस्तक इतके चांगले लिहिले आहे की संपादकांनी त्याला स्थान देण्याचे ठरविले.''

तात्या टोपेपेक्षा नेहरू श्रेष्ठ होते असे म्हणणारे अर्थात ते सुभाषचंद्रापेक्षा श्रेष्ठ होते, असेही म्हणणार. कारण तात्या टोपेप्रमाणेच सुभाष पराजित झाले.उलट नेहरू सिंहासनावरूनच इहलोक सोडून गेले.

नेहरू सत्तेवर आले तेव्हा गांधी जिवंत होते व काँग्रेसमध्ये सरदार पटेलांचे बहुमत होते. या बहुमताचा उपयोग करून पटेलांनी नेहरूंना मान्य नसलेली आपली पुष्कळ धोरणे अमलात आणली. जसे सोमनाथचा जीर्णोद्धार, जुनागड व हैदराबाद यांचे विमोचन आणि पाकिस्तानातून आलेल्या १० लक्ष हिंदू शरणार्थींचे वाजवी काळात पुनर्वसन. पाकिस्तानात गेलेल्या लाखो मुस्लिम शरणार्थींचे पुनर्वसन अजूनही झालेले नाही हे लक्षात घेता पटेलांचे हे कार्य अत्यंत वाखाणण्यासारखे होते. पण हे सर्व पटेलांनी नेहरूंचे गृहमंत्री या नात्याने केले व त्यामुळे त्याचे सर्व श्रेय नेहरूंना मिळाले. नेहरूंचा विरोध न जुमानता सरदारांनी हे केले हे जनतेला कळणे सोपे नव्हते कारण हा विरोध जाहीरपणे झालेला नव्हता.

नेहरूंना मोकळे रान मिळण्याचे एक कारण नेहरूंना तोंड देऊ शकेल अशी लोकप्रियता असलेला कोणी पुढारी नेहरूंच्या कारकीर्दीत भारतात नव्हता. सरदार पटेलांचे काँग्रेसमध्ये बहूमत असले तरी एकूण जनतेत त्यांची लोकप्रियता नेहरूंच्या लोकप्रियतेशी तुलना करण्यासारखी नव्हती. त्यांची लोकप्रियता वाढू लागली तेव्हा ते



इहलोकच सोडून गेले. सुभाषचंद्र बोस तर भारतात येऊच शकले नाहीत. नेहरूंना त्यांच्या तोडीचा कोणी प्रतिस्पर्धीच नसल्यामुळे त्यांचे खरे स्वरूप जनतेसमोर उघड होऊ शकले नाही.

नेहरूंनी बांधलेली प्रचंड धरणे व विज्ञानाच्या टोलेजंग प्रयोगशाळा या नेहरूंच्या कर्तृत्वाच्या डोळ्यात भरण्यासारख्या प्रदर्शनीय वस्तू होत्या. या प्रचंड धरणाने भारताचे दारिद्र्य कमी करण्यात काही मदत होणार नाही व विज्ञानाच्या या प्रासादांनी विज्ञानात कोणतीही भर पडणार नाही हे कळायला वैज्ञानिकांना व अर्थशास्त्रज्ञांना देखील अनेक दशके लागली. मग सामान्य जनांच्या मनावर त्यांनी केलेला परिणाम सखोल होता यात आश्चर्य काय?

नेहरूंच्या योजनांची कुणाचेच भले झाले नाही असे नाही. आंग्लशिक्षित वर्गाचे नेहरूंच्या धोरणाने भले झाले आहे. ब्रिटिशांच्या काळात हा वर्ग बेकारीने गांजलेला होता. दोन-तीन भावाच्या कुटुंबात एखाद्यालाच चांगली नोकरी असे व बाकीचे त्याच्या आश्रयाने जगत. नेहरूंच्या कारकीर्दीत असा प्रकार बराच कमी झाला. त्यामुळे भारतात असलेला एकमात्र शिक्षित वर्ग नेहरूंचा ऋणी होता व जनमत बनविण्याचे त्यांचेच काम असल्यामुळे नेहरूंच्या धोरणांचे वाईट परिणाम जनतेला समजावून सांगण्याचे काम हा वर्ग करील अशी अपेक्षा करता येत नव्हती.

दुसरे असे की यादवीतून नुकत्याच मुक्त झालेल्या चीनच्या तुलनेने तर सोडाच पण नुकत्याच स्वतंत्र झालेल्या दुसऱ्या देशांच्या तुलनेने देखील नेहरूंचे कार्य अत्यंत हीणकस असले तरी मानवी विकासाच्या बाबतीत ते इंग्रजांपेक्षा चांगलेच होते. १९९९ च्या गणराज्य दिवशी भारताच्या राष्ट्रपतींनी सांगितले की ५० वर्षांच्या स्वराज्यानंतर सरासरी आयुर्मान दुप्पट व साक्षरतेचे प्रमाण जवळपास तिप्पट झाले आहे. म्हणजे तळागाळाच्या माणसाची देखील प्रगती झाली. जनतेला दुसऱ्या देशात काय आहे हे कळणे सोपे नसते. उलट स्वत:ची स्थिती सुधारली याचा जनतेला प्रत्यक्ष अनुभव येत असतो. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात देशाचे नुकसान करूनही नेहरू लोकप्रिय राहू शकले.

## हे घ्या आरोपपत्र

ब्रिटिश काळानंतर एकदम लक्षात येण्यासारख्या ज्या आपत्ती देशावर आल्या त्यात भारताच्या सैनिक सामर्थ्याचा ऱ्हास, देशाच्या निरनिराळ्या घटकातील यादवी, कायदा व सुव्यवस्था यांचा बोजवारा, भ्रष्टाचारात विक्रमी वाढ व देशी भाषांची दुर्दशा या प्रमुख आहेत.

यापैकी देशी भाषांचा संकोच होऊन इंग्रजीचे साम्राज्य पसरले हे इष्टच झाले असे आंग्ल शिक्षितांचे व त्यांच्याचमुळे अशिक्षित जनतेचे मत झाले आहे. १८५७ चा उठाव इंग्रजांनी अत्यंत क्रूरतेने मोडून काढल्यावर इंग्रजांचा पराभव करण्याची महत्त्वाकांक्षा हे केवळ स्वप्नरंजन आहे अशी जनतेची खात्री पटली व त्या दिशेने विचार करण्याचा मूर्खपणा सोडून जे आपल्या नशिबातून सुटूच शकत नाही ते फेकून देण्याची हाव धरण्याऐवजी त्याचाच स्वीकार करून आपले भले कसे करून घेता येईल याचा विचार करावा अशी एकूण जनतेची वृत्ती झाली.

त्यावेळी परराज्याबद्दल जे झाले तेच आज स्वभाषेबद्दल झाले आहे. फरक इतकाच की त्यावेळी स्वराज्यासाठी बलिदान दिल्यानंतर व परिस्थितीच्या बलवत्तर प्रतिकूलतेचा अनुभव आल्यावर पारतंत्र्यासमोर गुडघे टेकण्यात आले होते. परभाषापूजेचा देशाने स्वीकार केला तो अशा अगतिकतेने नव्हे, तर स्वराज्याच्या चळवळीचा हयात असलेला जो सर्वश्रेष्ठ अग्रणी तोच स्वत:ला शेवटचा इंग्रज म्हणवू लागला व त्यानेच परभाषापूजेचे पाठ दिले म्हणून! याच काळात केवळ इंग्रजी भाषाच नव्हे तर इंग्रजी राज्याचे देखील पोवाडे लोकप्रिय होऊ लागले. स्वत: मार्क्सने १८५७ च्या युद्धाचे स्वातंत्र्ययुद्ध म्हणून वर्णन केले होते. पण मार्क्सचे गावठी अनुयायी ''सरंजामशाहीची पुन:स्थापना करण्याचा प्रयत्न'' म्हणून या उठावांना नाके मुरडू लागले. मराठेशाही ही लुटारूंची टोळी होती असे प्रतिपादन करणारे ग्रंथ भारत सरकार लिहवून घेऊ लागले. एवढेच नव्हे तर दिघे, आठवले वगैरेंसारखे मराठी संशोधक देखील तीच पोपटपंची करू लागले. इंग्रजी राज्य येण्यापूर्वी भारत हे राष्ट्रच नव्हते असा प्रचार खुद्द पंतप्रधान करू लागले. तात्पर्य स्वभाषेची अवहेलना इतक्यापुरताच स्वभाषांचा संकोच मर्यादित नव्हता, एकूण देशात जी पारतंत्र्यपूजेची लाट उसळली होती, त्याचा तो एक भाग होता. स्वराज्याची मानसिकता व मूल्य इतक्या लवकर देश विसरला त्याअर्थी गांधींनी निर्माण केलेली राष्ट्रीयतेची लाट शिवाजीने निर्माण केलेल्या लाटेपेक्षा फारच क्षीण होती असे कष्टाने म्हणावे लागते.

परभाषेची पूजा देशाने बुद्ध्या स्वीकारली पण कायदा व सुव्यवस्था यांचा बोजवारा देशाने बुद्ध्या घडवून आणलेला नाही. इंग्रजांच्या वेळी एखाद्याने खून केला व तो सापडलाच नाही वा सापडल्यावर फाशी गेला नाही क्वचितच होत असे. पण स्वराज्यात गुन्हे करून पचविणे व मंत्रिपदापर्यंत पोचणे ही आम बात झाली आहे. ज्याच्याजवळ एकदोन लाखाची पुंजी आहे अशा माणसाला पळवून नेणे व त्याच्या मुक्ततेसाठी खंडणी वसूल करणे हा एक संघटित धंदा झालेला आहे. पोलिसांकडे अशा



प्रकाराबद्दल तक्रार केली तर, ''पळविणाऱ्याशी वाटाघाटी करून काय ते आपसात ठरवा,'' असे उत्तर मिळते.

आजच्या तरुणांना ही स्थिती नेहरूंनी निर्माण केलेली आहे हे माहीत असण्याचा संभव नाही. पण जे नेहरूयुगात राहिले आहेत त्यांना हे माहीत असले पाहिजे. तेलंगणा, नागभूमी वगैरेतील बंडखोराशी नेहरू जसे वागले त्यातून हा प्रकार निर्माण झाला आहे. असे असता जनता नेहरूंवर या कारणाने रूष्ट झाली नाही याचे कारण हे असू शकते की नागा व तेलंगणा हे उपद्रव देशाच्या लहानशा भागात सीमित होते व वर्तमानपत्रातील एखाद्या कोपऱ्यात त्यांची जी माहिती असे, त्या व्यतिरिक्त या विशाल देशाचा त्या प्रदेशातील घटनांशी प्रत्यक्ष संबंध आला नाही.

भारताच्या सैनिक सामर्थ्याचा ऱ्हास पहिल्या प्रथम चीनी आक्रमणाच्या वेळी जनतेच्या नजरेस आला. पण चीन्यांनी भारताच्या सीमावर्ती प्रदेशातील काही ओसाड प्रदेश फक्त बळकावला या पलीकडे या आक्रमणात काही भयंकर नव्हते अशी जनतेची समजूत करून देण्यात नेहरू सफल झाले. वर्तमानपत्रात लेखन करणाऱ्यांना देखील चीन्यांनी व्यापलेल्या भारताच्या प्रदेशाची नावे सांगता येत नव्हती.

## पानिपत व चीनी युद्ध

पानिपतचा पराभव महाराष्ट्राच्या जिव्हारी बसला होता व या आपत्तीबद्दलची हळहळ आजच्या वाङ्मयातही ऐकू येते. वस्तुत: चीनी युद्धात २०००० जवानांची कत्तल झाली होती. पानिपतात सारे मराठा सैन्य ६०००० होते. त्यातले २०००० पेक्षा जास्त पडले असतील असा संभव नाही. १० टक्के सैन्य आहत झाले की त्याचा पराभव होतो या हिशेबाने या साठ हजारपैकी २०००० कापले गेले असतील असा संभव नाही. पानिपतावर एक लाख बांगडी पिचली ही अतिशयोक्ती आहे. शिवाय पानिपतच्या रणभूमीवर पराभव झाला असला तरी पेशवा लगेच ४८००० फौज घेऊन पोचला होता व त्यामुळे काबीज केलेली दिल्ली सोडून शत्रू स्वदेशी परतला होता. एकूण पानिपतचा पराभव चीनी युद्धातील पराभवाइतका लाजिरवाणा नव्हता. चीनी युद्धात चीन्यांनी एकपक्षी गोळीबंदी जाहीर केली व ''अमुक अमुक प्रदेशात याल तर खबरदार'' अशी भारताला ताकीद दिली. या शाब्दिक ताकीदीनेच भारताची त्या प्रदेशात पाऊल टाकण्याची छाती झाली नव्हती.

१० टक्के सैन्य गारद झाले की पराभव होतो त्याअर्थी या लढाईत २०००० सैन्य गारद झाले हे म्हणणे अविश्वसनीय आहे हा युक्तिवाद चीनी आक्रमणाला लागू नाही.

कारण या लढाईत शस्त्रास्त्रासह माघार घेणे भारतीय सैन्याला जमले नव्हते. त्याच्या हाती एक गोळी झाडायला पाच मिनिटे लागतील अशा बंदुका होत्या व चीन्यांच्या हाती एकदा चाप दाबल्याने गोळ्यांचा वर्षाव होईल अशा बंदुका होत्या. तेव्हा ही लढाई नसून एकपक्षी कत्तल होती. शिवाय या लढाईची सर्व समकालीन कागदपत्रे उपलब्ध असल्यामुळे २०००० हा हवेतला अंदाज नाही. या लढाईत किती सैनिक गारद झाले हे भारतीय सैन्याला माहीत नाही असे म्हणताच येत नाही.

पानिपतात मराठ्यांशी मोठ्या प्रमाणावर कत्तल झाली असली तरी शत्रूला देखील कायमची जरब बसेल एवढी त्याचीही कत्तल झाली होती. तरी पण पानिपत महाराष्ट्राच्या जिव्हारी बसले. ज्यात भारताकडून पोवाडे गाण्यासारखा कोणताच पराक्रम घडला नाही असा पानिपतपेक्षा शतपट मोठा पराभव चीनी युद्धात झाला होता. पण हा पराभव देशाच्या जिव्हारी बसणे तर दूरच भारतातील सुशिक्षितांना तो फारसा आठवत देखील नाही.

नेहरूंना विरोध करणारे मुख्यत: राष्ट्रीय स्वसंसेवक संघाचे अनुयायी होते. त्यांचा मुख्य मुद्दा नेहरू हिंदुत्वविरोधी आहेत हा होता पण हाच आरोप ते म. गांधीवरही करीत. संघवाद्यांना गांधी व नेहरू यांच्यातील फरक कधी कळलाच नाही. त्यांना एक स्पष्ट गोष्ट कधीच दिसली नाही व ती म्हणजे काँग्रेस गांधींचे वैचारिक नेतृत्व मानीत होती, नेहरूंचे नव्हे. काँग्रेसमध्ये समाजवाद्यांचा जो गट होता, तो काँग्रेसच्या बाहेर पडला. तरी तो म्हणत असे की, ''आम्हाला गांधीवाद नको असला तरी गांधी हवे आहेत, तेच राष्ट्रपिता आहेत.'' गांधी स्वत:ला समाजवादी म्हणवून घेण्यास कधीच तयार नव्हते. तरी सुभाषचंद्र बोसाच्या विरुद्ध काँग्रेसमधील समाजवाद्यांनी गांधींनाच साथ दिली. या समाजवाद्यांपैकी एक गट नेहरूंचे पुढारीपण मानत होता. पण डॉ. लोहियांचा गट नेहरूंचा द्वेष करीत होता याची दोन कारणे होती. हा गट समाजवादी असला तरी कम्युनिस्टांच्या अत्यंत विरोधी होता. कारण कम्युनिस्ट भारतीय राष्ट्रवादाच्याच विरुद्ध होते. समाजवाद्यातले बहुतेक प्रखर राष्ट्रवादी होते. नेहरू काँग्रेसमध्येच असले तरी त्यांच्यात व कम्युनिस्टात फारसा फरक नाही हे लोहिया ओळखून होते. लोहिया नेहरूंचा द्वेष करण्याचे दुसरे कारण नेहरू भारतीय भाषांचे द्वेष्टे व इंग्रजीभक्त होते. लोहियांना इंग्रजी हटवायची होती. सुभाषचंद्र बोसही समाजवादीच होते. पण समाजवादापेक्षाही त्यांचा राष्ट्रवाद प्रखर होता व समाजवादी होणे म्हणजे रशियात पाऊस पडतो आहे म्हणून भारतात छत्री उघडणे त्यांना कधीच मान्य झाले नाही. नेहरूंचा समाजवाद कम्युनिस्टापेक्षा फारसा वेगळा नव्हता. काँग्रेसमधील सारेच



समाजवादी नेहरूंच्या ऐवजी सुभाषचंद्र बोसांचे पुढारीपण मानत कारण ते गांधींप्रमाणे प्राधान्याने राष्ट्रवादी होते. सारांश जवळ जवळ सारेच काँग्रेसजन नेहरूविचारांच्या विरुद्ध होते. पण संघवाद्यांनी गांधी व नेहरू तसेच काँग्रेस व नेहरू यातील भेद न ओळखता दोघांनाही शिव्या दिल्या.

## संघाचे नेहरूप्रेम

पुढे तर गोडसेने गांधींचा खूनच केला. गोडसे हिंदुत्ववादी म्हणजे संघवादीच आहे असा नेहरूंनी प्रचार केल्यामुळे नेहरूंचा विरोध करणारा संघवाद्यांचा मोठा समूह राष्ट्राचे प्रेम गमावून बसला. त्यामुळे नेहरूंना आयतेच एक अभेद्य कवच मिळाले व संघवाद्यांची नेहरूवरील टीका ही राष्ट्रपित्यांचा द्रोह करणारी व म्हणून राष्ट्रविरोधी आहे असे जनतेला वाटले.

यात जनतेची सर्वस्वी चूक होती असे नाही. गोडसेने न्यायालयातील आत्मसमर्थनार्थ देशाच्या फाळणीची जबाबदारी अप्रत्यक्षपणे गांधींवर टाकली व ''मी गांधींना मारले नसते तर हैदराबादवरील कारवाई गांधींनी होऊ दिली नसती,'' असे आपल्या कृत्याचे समर्थन केले. गोडसे संघाचा स्वयंसेवक नसला तरी गांधींविरुद्ध हे दोन्ही आक्षेप संघवाद्यांच्या तोंडी कधी कधी ऐकू येतात. फाळणी व हैदराबादविमोचन या दोन्ही बाबतीतील गांधींवर केलेले दोषारोपण किती निराधार आहे हे जनतेला कळत होते. जुनागडवर कारवाई झाली तेव्हा गांधी तिच्या आड आले नव्हते. पाकिस्तानला मान्यता दिली नसती तर ब्रिटिशांनी मंत्रिमंडळयोजना अमलात आणून देशाची दोन ऐवजी दोनशे शकले केली असती. म. गांधींच्या प्रभावाने सीमाप्रांतात काँग्रेसने मुस्लिम लीगचा पराभव केला होता व म्हणून ब्रिटिशांना पाकिस्तानची मागणी मान्य करणे जड जात होते. गांधींवर धडधडीत खोटे आरोप करणारे संघवादी नेहरूंवर जे आरोप करतात तेही तसेच निराधार असले पाहिजे असे जनतेने गृहीत धरले तर तिचे काही चुकले असे म्हणता येत नाही.

नेहरूंचे परराष्ट्रीय धोरण राष्ट्रघातकी आहे हे चीनी स्वारीच्या वेळी कुणालाही शंका न वाटण्याइतके स्पष्ट झाले. नेमके त्याचवेळी संघाने नेहरूंवर प्रहार न करता ''राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी आपण आपल्या सरकारला पाठिंबा दिला पाहिजे,'' असा विचार करून नेहरूंच्या चीन व तिबेटधोरणाबद्दल राष्ट्रव्यापी प्रचार केला नाही. उलट संघाच्या ऑर्गनायझर पत्राने ''त्याचा महान क्षण "His finest hour" या शीर्षकाखाली संपादकीय लिहून परकीय आक्रमणाला तोंड देण्यास सज्ज झालेला वीर

अशी नेहरूंची प्रतिमा निर्माण केली, यावेळी संसदेत नेहरूंना हटविण्याचा विचार चालला होता. संघाचे संसदेत काहीच बळ नसले तरी नेहरूवाद्यांविरुद्ध राष्ट्रव्यापी आंदोलन छेडणे त्याला शक्य होते. ते संघाने केले नाही.

मी ऑर्गनायझरचे संपादक मलकानी याना माझे पुस्तक दाखविले व ''तुमची वाजपेयीशी जवळीक आहे, त्यांच्या नजरेस माझे पुस्तक आणून द्या'' अशी विनंती केली तेव्हा ते म्हणाले, ''नेहरूंवर टीका करून काही साधणार नाही असे वाजपेयींचे मत आहे.'' मी मलकानींना म्हटले ''असे जर आहे तर, सोनिया गांधींना सोडून वाजपेयींना लोकांनी मते का द्यावीत?'' हा प्रश्न तुम्ही माझ्या वतीने वाजपेयींना विचारा.'' वाजपेयींना नेहरूंबद्दलच नव्हे तर त्यांच्या धोरणाबद्दल देखील आकर्षण आहे त्या अनुसारच त्यांनी पोपला भारतात येण्याचे आमंत्रण दिले व पोपने भारतात येऊन भारताला ख्रिस्ती करण्याचा म्हणजे हिंदू धर्माचे उच्चाटन करण्याचा आपला मनोदय स्पष्ट बोलून दाखविला. लोक आपल्याविरूद्ध सोनियाकडे वळतात याचे एकमात्र कारण त्या नेहरूवंशातल्या आहे हे आहे. याबद्दल वाजपेयी अनभिज्ञ असण्याचा संभव नाही.

वाजपेयींप्रमाणेच नानाजी देशमुखांचे विचार आहेत. त्यांनी नागपूर टाइम्समधील माझा नेहरूविरुद्धचा लेख वाचून नाक मुरडले होते व ''नेहरूंवर टीका करणे देशाच्या हिताचे नाही,'' असे मत व्यक्त केले होते.

नेहरूंची जनमानसातील प्रतिमा पुसून टाकल्याशिवाय राष्ट्रवादाला भारतात काही स्थान असणार नाही हे या मोठ्या नेत्यांच्या लक्षात येत नाही हा मोठा दैवदुर्विलास आहे.

राम मनोहर लोहियांच्या नेहरूंवरील टीकेचा फारसा परिणाम झाला नाही. ''अंग्रेजी हटाव''ची चळवळ करताना नेहरूंनी देशी भाषांच्या विरुद्ध जिहाद पुकारले आहे हे त्यांनी जनतेला समजावून सांगितले नाही. दक्षिण भारतीय, मुसलमान, वगैरेंच्या विरोधामुळे नेहरू इंग्रजीला चिकटून आहेत, अशीच त्याची समजूत होती. नेहरू देशी भाषांचे निर्मूलनच करू इच्छितात हे त्यांनी ओळखले नाही.

## लोहियांचा नेहरूविरोध

लोहियांच्या भाषणातून, संविधानाने इंग्रजीच्या उच्चाटनाचा आदेश दिला असताही देशी भाषांचा ब्रिटिश काळापेक्षाही अधिक संकोच नेहरू काळात का होत आहे याची चर्चा कुठेच नाही.



नेहरू रोज २०००० रुपये खर्च करतात असा लोहियांचा सगळ्यात मोठा आक्षेप होता. हा हिशेब त्यांनी कसा केला हे समजणे कठिण होते. हा खर्च पंतप्रधानांचा खर्च आहे की नेहरूंचा वैयक्तिक खर्च आहे हे त्यांच्या विवेचनात स्पष्ट नव्हते. ''जरूर नसलेले विमानतळ केवळ नेहरूंच्यासाठी बनविण्यात येत आहेत,'' असा त्यांचा एक आरोप होता. या विमानतळांचा तपशील यानी कधी दिला नाही. हे खरे असेल तर त्याची प्रमाणे आजही मिळू शकतील.

बादशाही खर्चाबद्दल जनतेची एक विचित्र दृष्टी आहे. नेहरूंचा खर्च बादशाही आहे असे सांगितले तर सर्वांनाच त्यामुळे दु:ख होत होते असे नाही. पुष्कळशा जनतेला नेहरूंच्या बादशाही खर्चाबद्दल कौतुकच वाटत होते. ''नेहरूंनी जर बादशाही खर्च करू नये तर काय लोहियांनी?'' असाच जनतेचा सवाल होता. कारण नेहरू बादशाही घराण्यातले आहेत हा प्रचार नेहरूंची महान् प्रतिमा निर्माण होण्यास कारणीभूत होता. नेहरूंचे कपडे पॅरिसहून धुवून येतात व ते मदिरेने भरलेल्या टबात आंघोळ करतात असे कौतुकाने सांगितले जात होते.

लोहियांनी नेहरू सरकारविरुद्ध अविश्वास ठराव आणला होता. पण त्यात नेहरूंची धोरणे कशी देशविघातक होती हे दाखवून देण्याचा प्रयत्न देखील केला नाही. असे दाखवून दिल्याने नेहरूवरील अविश्वास ठराव पारित झाला असता असे नाही. पण लोकसभेत नेहरूचे खरे स्वरूप उघड झाले असते तर आज जनतेत त्याच्याबद्दल जे घोर अज्ञान आहे ते राहिले नसते व लोहियाच्या नेहरूविरोधाला निवडणुकामध्ये अधिक सफलता मिळाली असती.

नेहरूंनी योजनाबद्ध रीतीने देशाचे नुकसान केले असा आरोप केला तर ''अशा रीतीने देशाचे बुद्धिपुरस्सर नुकसान करण्यात नेहरूंचा उद्देश काय असू शकतो?'' असा प्रश्न सहजच उद्भवतो. या प्रश्नाचे उत्तर देणे सोपे नाही. आपल्या कृत्याने देशाचे नुकसान होईल हे न कळण्याइतके नेहरू खासच मूर्ख नव्हते. विज्ञानात केंब्रिजची पदवी घेणारा व सफाईदार इंग्रजीत तीन वाचनीय ग्रंथ लिहिणारा पुरुष इतका मूर्ख असूच शकत नाही. नेहरूंच्या लेखनात चांगल्या दर्जाची कवित्वशक्ती प्रतीत होते. त्याच्या लेखनात सुभाषितांची प्रचुरता आहे. त्यातले मला अतिशय आवडणारे एकच उद्धृत करतो.

"If there is a God it will be necessary not to worship him."

सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व सर्वगुणसंपन्न ईश्वराने हे जग निर्माण केले आहे असे म्हटल्याबरोबर ईश्वराला इतक्या वाईट गोष्टीसाठी जबाबदार धरावे लागते की त्याची

पूजा करण्याची कोणालाही इच्छा होणे कठिण आहे. त्यामुळे हे वाक्य अत्यंत यथार्थ आहे.

पण या पुराव्यावरून नेहरू सामान्यापेक्षा जास्त बुद्धिमान् होते हे सिद्ध झाले तरी पंतप्रधानाला ज्या प्रकारची बुद्धिमत्ता लागते त्या प्रकारच्या बुद्धिमत्तेचा त्यांच्या ठायी अभाव होता असे म्हणायला जागा उरते. चांगले इंग्रजी लिहिता येणे हे ज्याला इंग्रजीशिवाय दुसरी भाषा येतच नाही त्याच्या बाबतीत बुद्धिमत्तेचे हमखास लक्षण मानणे कठिण आहे. भाषेशिवाय मानवाचे भागूच शकत नाही व त्यामुळे एका भाषेवर प्रभुत्व असण्याची क्षमता अपवादभूत नाही. नरसिंहरावांसारखे अनेक भाषावरील प्रभुत्व हे अपवादभूत बुद्धिमत्तेचे लक्षण मानता येईल.

नेहरूंच्या ग्रंथांच्या स्वरूपावरूनच नेहरूंच्या मर्यादा स्पष्ट होतात. त्यांचे तिन्ही ग्रंथ ऐतिहासिक घटनांचे वाचनीय कथन करणारे आहेत. या घटना कोणत्याही इतिहासाच्या पुस्तकात सापडणाऱ्या आहेत. नेहरूंनी संशोधन करून शोधून काढलेल्या नाहीत. तसेच त्यात कुठेही वकिलाच्या वा तत्त्वज्ञाच्या युक्तिवादात तर्कशुद्ध विचार करण्याची जी क्षमता आढळते तिचा लवलेशही आढळत नाही.

## नेहरूंचे ग्रंथ

''वाचलेल्या मजकुराचे कंटाळा न येईल अशा रीतीने कथन'' असे नेहरूंच्या ग्रंथाचे स्वरूप आहे. आत्मचरित्रामध्ये देखील तत्कालीन राजकारणाबद्दल वर्तमानपत्रात आलेल्या गोष्टींचे कथन करणाराच पुष्कळसा भाग आहे. आत्मचरित्र मुख्यत: स्वत:च्या आयुष्यातील घटनांच्या आठवणींना वाहिलेले असावे अशी अपेक्षा असते. तसे हे आत्मचरित्र नाही. त्यामुळे त्याचे स्वरूप इतर दोन ग्रंथासारखेच आहे. Glympses of World History मध्ये नेहरूंनी आपल्या मुलीला आंतरराष्ट्रीय चलनाच्या गुंतागुंती समजावून सांगितल्या आहेत, त्या सहज समजण्यासारख्या व मनोरंजक देखील आहेत. पण एवढ्यावरून नेहरूंमध्ये कठिण विषय सोपा करून सांगण्याची हातोटी होती असे अनुमान निघत नाही. कारण हा भाग त्यांनी एखादे सर्वमान्य पुस्तक समोर धरूनच लिहिला असणार. शिवाय त्यांच्या तिन्ही पुस्तकात कठिण विषय स्पष्ट करण्याचा हा एकमात्र प्रयत्न आहे. याच दृष्टीने नेहरूंच्या लिखाणातील सुभाषितांकडे पाहिले तर लहानपणापासून इंग्रजीचे वाचन असल्यामुळे त्या अर्थाची वाक्ये कुठेतरी वाचनात आल्यामुळे त्यांना ही सुभाषिते लिहिता आली असे म्हणण्यास जागा आहे. तात्पर्य नेहरूंच्या ठायी तर्कशुद्ध विचार करण्याची शक्ती व मौलिकता होती असे त्यांच्या



पुस्तकावरून दिसत नाही.

ऐतिहासिक विषयावर पुस्तक लिहिणाऱ्या राजनेतांमध्ये सावरकरांचे नाव प्राधान्याने पुढे येते. त्यांचे ''१८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध'' हे पुस्तक नेहरूंच्या कोणत्याही पुस्तकापेक्षा अधिक रसाळ आहे. शिवाय त्यावर मौलिकतेचा ठसा आहे. १८५७ चा सारा वृत्तांत त्यांनी अर्थात् प्रसिद्ध पुस्तकातूनच घेतला आहे. पण त्याच्या आधारभूत असलेल्या कोणत्याही पुस्तकात १८५७ च्या घटना या एका स्वातंत्र्य युद्धातील स्फूर्तिदायक घटना होत्या असा मनावर ठसा उमटविण्याची शक्ती नाही. हा ठसा उमटविताना सावरकरांनी कोणत्याही काल्पनिक घटना आपल्या पुस्तकात घातलेल्या नाहीत. वर्णिलेल्या प्रत्येक घटनेला कुठेतरी आधार आहे तरी वाचलेल्या वृत्तांताचे पुन:कथन करणारे हे पुस्तक नाही. ती एक नवनिर्मिती आहे, कादंबरी सारखी नवनिर्मिती नसून ऐतिहासिक सत्याचे भावनात्मक आकलन करून देणारी नवनिर्मिती आहे. असे आकलन इतिहासाचे अवास्तवीकरण नसते. स्त्रीपुरुषांच्या संबंधांचे प्रेम या स्वरूपात दर्शन होणे हे अवास्तवीकरण व मैथुन या स्वरूपात दर्शन होणे हे वास्तवदर्शन असा नियम करता येत नाही. हे प्रेम आहे की केवळ शारीरिक मैथुन आहे, हे फक्त त्या प्रसंगाचाच विचार न करता संबंधित युगलाच्या सर्वच परस्पर व्यवहाराचा विचार केला तर विज्ञानपूत रीतीने ठरविता येऊ शकते. १८५७च्या बाबतीत असाच समग्र विचार करून सावरकरांनी त्याचे भावनात्मक असले तरीही वास्तव दर्शन घडविले आहे. अशी नवनिर्मिती करण्यास प्रतिभा लागते. केवळ कथनकौशल्य त्याला पुरेसे नाही. सावरकरांचे पुस्तक वाचताना एका प्रतिभाशाली पुरुषाच्या संपर्कात आपण आहोत याचा प्रत्यय आल्याशिवाय एकही वाचक राहिला नसावा. अशा प्रतिभेचे दर्शन नेहरूंच्या कोणत्याही लिखाणात होत नाही.

नेहरूंची पुस्तके हा त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दलचा एकमात्र पुरावा आहे. त्यांचे विद्यार्थिजीवन साधारण दर्जाचे होते. ते केम्ब्रिज विद्यापीठाच्या परीक्षा कोणत्या वर्गात पार करते झाले याबद्दल उल्लेख सापडलेला नाही. पण तो वर्ग सामान्य असला पाहिजे. नाही तर त्याचा गाजावाजा झाला असता. भारतात १४ व्या वर्षापर्यंत त्यांचे शिक्षण झाले त्यात ते असामान्य असल्याचा प्रत्यय कुणाला आला नव्हता, बुद्धिमत्ता आनुवंशिक असते हे सिद्ध झालेले आहे. नेहरू कुटुंबाचा बुद्धिमत्तेतील आलेख पाहिला तर तो शोचनीय असल्याचे आढळून येईल. मोतीलाल नेहरू बी.ए.च्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाले व मुनसिफची परीक्षा देऊन वकिली करू लागले. त्यांची वकिलीतील घवघवीत सफलता पाहता ते बुद्धिमान् होते असे अनुमान कोणी काढले तर त्यावर

आक्षेप घेता येणार नाही. पण ''हाताला यश आहे,'' अशी कीर्ती झाल्यामुळे रोगोपचारात कोणतीही पदवी नसताना मोठमोठ्या डॉक्टरांपेक्षा शतपट कमाई करणारे रोगोपचारक मी पाहिले आहेत. त्यांचे व्याधित मोठ्या प्रमाणावर बरे होतात असेही प्रमाण सापडले नाही. एखाद्या मूर्तीची जागृत दैवत म्हणून कीर्ती होते तशातलाच हा प्रकार आहे. तेव्हा हे गमक निर्णायक नाही. नेहरूंची बहीण पदवीधर होऊ शकली नाही व मुलगी कोणतीही बहि:शाल परीक्षा पारित करू शकली नाही. तेव्हा आनुवंशिकतेचा विचार केला तर नेहरूंची बुद्धिमत्ता सामान्य होती असे म्हणण्यास वाव आहे.

## शालेय यश व बुद्धिमत्ता

शालेय परीक्षातील सफलता हा बुद्धिमत्तेचा निकष नाही असा ग्रह सार्वत्रिक आहे. केवळ मोतीलाल नेहरूच नव्हे तर आणखीही पुष्कळ वकील वकिलीच्या परीक्षेत फारसे चमकले नाहीत. पण त्यांनी वकिलीत खोऱ्याने पैसे ओढले अशी उदाहरणे दाखविता येतील.

या उदाहरणात चूक ही असते की वकिलीच्या परीक्षेत पहिला वर्ग मिळविणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांपैकी जितके चमकतात तितकेच तिसरा वर्ग मिळविणारेही चमकतात, असे आकडे दाखवून देण्यात येत नाहीत व येणे शक्य नाही. असे आकडे दाखविता आले तरच परीक्षेत चमकण्याचा व धंद्यात चमकण्याचा काही संबंध नाही असे अनुमान काढता येईल.

राजकारणातील सफलतेचा व विद्वत्तेचा संबंध नाही असे अनुमान निदान स्वराज्यपूर्व राजनैतांच्या उदाहरणावरून काढता येत नाही. दादाभाई नौरोजी, रानडे, गोखले, टिळक, राजेंद्रप्रसाद, सुभाषचंद्र बोस व डॉ. आंबेडकर हे हुशार विद्यार्थी होते. गांधी हुशार विद्यार्थी म्हणून गाजले नाहीत तरी मंद विद्यार्थ्यांत देखील त्यांचा समावेश होत नाही.

लो. टिळक गणिताच्या एम. ए. मध्ये दोन वेळा अनुत्तीर्ण झाले व कधीच एम. ए. होऊ शकले नाहीत हे मनोवैज्ञानिकांनी संशोधनासाठी घेण्यासारखे उदाहरण आहे. टिळकांनी बी. ए. व तत्पूर्वीच्या अभ्यासक्रमात हुशार विद्यार्थी म्हणून नाव कमावले होते. टिळकांचे चरित्रकार न. चि. केळकर टिळकांच्या निकट सहवासात आले होते. त्यांनी टिळक एम. ए.मध्ये अनुत्तीर्ण होण्याची कारणे शोधून काढण्याचा प्रयत्न केला नाही ही शोचनीय गोष्ट आहे. मी याचे कारण असे देतो की (१) एम.ए.चा अभ्यास करताना टिळक पोटापाण्याचा उद्योगही करीत होते व त्यामुळे ते पूर्ण वेळाचे विद्यार्थी



नव्हते. (२) टिळकांची अभ्यासाची पद्धत परीक्षेत चमकण्यास अनेक वेळा अडथळा आणीत असे. एखादे गणित सुटले नाही की ते बाकी सर्व कामे विसरून त्याच गणिताच्या मागे लागत व त्यामुळे गणितात देखील इतर भागाकडे त्यांचे लागावे तसे लक्ष लागत नसे. परीक्षेसाठी असे करून चालत नाही. सर्व अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित करावे लागते. तात्पर्य एम.ए. तील अपयशावरून टिळक हुशार विद्यार्थी नव्हते असे अनुमान काढता येत नाही.

परीक्षेत चांगली सफलता मिळविण्यासाठी बुद्धिमत्तेव्यतिरिक्त आणखीही गुण लागतात. त्यातला प्रधान म्हणजे अभ्यासाचे कष्ट करण्याची तयारी, दुसरा बुद्धिमत्तेशी संबंध नसणारा गुण म्हणजे जलद व सुवाच्य अक्षर लिहिण्याची क्षमता. ही नसेल तर सर्व विषय येऊनही वेळेच्या आत तो कागदावर उतरविता येणार नाही. तात्पर्य परीक्षेतील यशात बुद्धिमत्तेव्यतिरिक्त इतरही गुणाचा वाटा असला तरी परीक्षा व बुद्धिमत्ता याचा काही संबंध नाही ही समजूत चुकीची आहे.

क्लाईव्ह व वॉरन हेस्टिंग्स हे ठोंबे होते व आईबापांनी त्यांना फारसे काही भवितव्य नाही असे समजून भारतात कनिष्ठ दर्जाची कारकुनी करण्यास पाठवून दिले होते. ईस्ट इंडिया कंपनीत सर्वात खालच्या दर्जाचा कारकून रायटर म्हणवीत असे. क्लाईव्ह व वॉरन हेस्टिंग्स हे दोघेही रायटर म्हणूनच नोकरीवर लागले तरी ब्रिटिश साम्राज्याचे संस्थापक ठरले हे उदाहरण शालेय सफलता व बुद्धिमत्ता यांचा संबंध नाही असे सिद्ध करण्यासाठी देण्यात येते. पण हे दोघे शाळेत चमकले नाहीत याचे कारण त्यांचे अभ्यासात लक्ष नव्हते हे आहे. ते अभ्यासच करीत नव्हते तर त्यांची बुद्धिमत्ता काय दिवे लावणार? उनाडक्या करण्यात त्यांचा अभ्यासापेक्षा अधिक वेळ जात असे. अत्यंत बुद्धिमान विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष नाही अशी अनेक उदाहरणे मी पाहिली आहेत. माझ्या ओळखीचा एक विद्यार्थी ''शिकून कारकुनी काय करायची! धंद्यात शिरले पाहिजे,'' असे वयाच्या चौदाव्या वर्षापासून घोकत होता. आईबाप ''आधी शिक्षण पुरे कर. मग तुला धंद्यासाठी आम्ही मदत करू,'' असे त्याला सांगत. पण ते त्याला पटले नाही. धंद्यात पैसे गुंतवून आपण आपल्या आईबापांना खोऱ्याने पैसे मिळवून दाखवू व त्यांना गप्प करू या उद्देशाने भांडवल मिळविण्यासाठी त्याने घरीच चोरी केली. धंद्याचा काहीही अनुभव नसताना धंद्यात आपली बुद्धिमत्ता चालते अशी त्याने स्वत:ची समजूत करून घेतली होती. पहिल्याच अनुभवाने आपली समजूत चूक आहे हे त्याला कळून चुकले. त्याचे भांडवल त्याच्या सहकाऱ्यांनी लुबाडले.

## रॉबर्ट क्लाईव्ह व वॉरन हेस्टिंग्स

म्हणजे तो धंद्यात शिरला तेव्हा त्याच्याजवळ भांडवल होते व त्याच्या सहकाऱ्याजवळ अनुभव होता. तो धंद्याबाहेर पडला तेव्हा त्याच्या सहकाऱ्याजवळ भांडवल आले व त्याला अनुभव मिळाला! निरुपायाने तो आईबापांना शरण येऊन अभ्यासात लक्ष घालू लागला. त्याने औद्योगिक रसायनांच्या क्षेत्रात घवघवीत यश मिळविले.

शालेय बुद्धिमत्ता असून देखील अभ्यासात रूचीच नाही असे अनेकदा होते हे यावरून स्पष्ट व्हावे. त्यामुळे शाळेतील अपयश हे नेहमीच कमी बुद्धिमत्तेचे लक्षण असेल असे नाही.

विचारशक्ती हा बुद्धिमत्तेचा एक पैलू आहे. कोणत्याही मुद्यावर साधक बाधक विचार करून योग्य निर्णय घेण्याला विचारशक्ती लागते. अशी विचारशक्ती न्यायाधीशात असावी लागते. पण न्यायाधीशासमोर दोन्ही विरुद्ध पक्षांचे साधक बाधक विचार वकिलाने आयते मांडलेले असतात. ही सोय प्रत्येक क्षेत्रात उपलब्ध नसते. बुद्धिमान् माणसांना सामाजिक व राजकीय समस्यांबद्दल काही मते असतात. तसेच ज्याला इंग्रजीत आयडिऑलॉजी म्हणजे तत्त्वप्रणाली म्हणतात. त्यांची स्वीकार्यता निश्चित करण्यास आवश्यक असलेली साधक-बाधक प्रमाणे आयती समोर ठेवण्यास कोणी वकील उपलब्ध नसतात. त्यांचे मूल्यमापन करण्यास स्वत: अभ्यास करावा लागतो. शिवाय विशिष्ट विचारप्रणालीचे आकर्षण वाटण्यास काही भावनात्मक कारणे देखील असतात. साधारण बुद्धीचे लोक या क्षेत्रात फॅशनच्या प्रभावाखाली असतात. फॅशन म्हणजे रूढी नव्हे. फॅशन रूढीच्या किंचित विरुद्ध असते. पण नवीन समजल्या जाणाऱ्या बऱ्याच व्यक्तींचा तिला पाठिंबा असतो. फॅशनचा स्वीकार करणारा चिकित्सक नसतो. तो रुढीचा विरोध करतो ते तिला विशिष्ट वर्गात विरोध आहे म्हणून व फॅशनचा स्वीकार करतो कारण त्याला त्याच वर्गात स्वीकार्यता हवी असते म्हणून. हाच प्रकार तत्त्वप्रणालीच्या बाबतीत असतो, तत्त्वप्रणालीवर बरेच वाङ्मय उपलब्ध असते. ते वाचून बहुधा कोणी एखादी तत्त्वप्रणाली स्वीकारत नाही. विचार व अभ्यास यापेक्षा विचारप्रणालीच्या स्वीकारात फॅशनचा प्रभाव अधिक असतो.

या क्षेत्रात एक वर्ग असा आहे की त्याला वैज्ञानिक पद्धतीने मूल्यमापन करून काय स्वीकार्य व काय अस्वीकार्य याचा निर्णय करायचा असतो. असे करण्यास अर्थात उच्च दर्जाची वैज्ञानिक बुद्धी व संबंधित विषयाचा अभ्यास पाहिजे. हा वर्ग फार विरळा आहे.



तत्त्वप्रणालीच्या बाबतीत नेहरू हे फॅशनवादी होते. त्यांनी मार्क्सवाद स्वीकारला होता. पण त्यांच्या लेखन/भाषणावरून त्यांचे मार्क्सच्या ग्रंथांचे फारसे वाचन होते असे वाटत नाही. त्यांनी मार्क्सवादाची कुठेही वैज्ञानिक चर्चा केलेली नाही. नेहरू केम्ब्रिजमध्ये होते तेव्हा ते कम्युनिस्ट प्रभावाखाली आले. विसाव्या शतकाचे दुसरे व तिसरे दशक हे कम्युनिझमच्या प्रभावाचे दर्शक होते. तिसऱ्या दशकानंतर हा प्रभाव ओसरला व आता तर खुद्द रशियानेच कम्युनिझम सोडून दिला आहे. नेहरू पंतप्रधान झाले तेव्हा कम्युनिझम नवा उरला नव्हता. पण त्यांचे समकालीन विचारांचे फारसे वाचन नव्हते व आपल्या कम्युनिस्ट विचारांना विरोध करणारे लोक जुनेपुराणे आहेत असे त्यांना वाटे. याबद्दल मसानीनी लोकसभेत त्यांची चांगली कानउघाडणी केली होती. त्यांनी दाखवून दिले की पाश्चात्त्य देशात मार्क्सवादी म्हणविणारे बहुतेक लोक नेहरूंच्या वयाचे आहेत. तरुणांमध्ये मार्क्सवाद प्रिय नाही. तेव्हा जुनेपुराणे कोणी असतील तर ते नेहरूच आहेत. एकूण तत्त्वप्रणालीच्या बाबतीत नेहरू फॅशनवादी होते. या क्षेत्रातही त्यांचे वर्तन बुद्धिमंतासारखे व वैज्ञानिकासारखे नव्हते. उच्च घराण्याचा माणूस प्रतिष्ठेसाठी पदरी कलावंत, विद्वान व ''सरंजामशाही'' काळातील प्रतिष्ठेच्या कल्पनेप्रमाणे ''अंगवस्त्र'' बाळगत असे. त्याचप्रमाणे प्रतिष्ठित जीवनाला तत्त्वप्रणाली देखील आवश्यक आहे असा नेहरूंचा दृष्टिकोन होता. तत्त्वप्रणालीसाठी त्यांचे जीवन नसून त्यांच्या जीवनाची प्रतिष्ठा वाढविणारी तत्त्वप्रणाली हा एक छंद होता. प्रतिष्ठेसाठी तत्त्वप्रणाली स्वीकारली तर जिला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा आहे, अशीच स्वीकारली पाहिजे. शुद्ध वैज्ञानिक चिकित्सा करून जिला काही प्रतिष्ठाच नाही अशी तत्त्वप्रणाली स्वीकारता येत नाही.

## ''तांदूळ नाहीत तर केळी खा''

तत्त्वप्रणाली स्वीकारताना नेहरूंनी वैज्ञानिक काटेकोरपणाचा अवलंब कधीच केला नाही. ही गोष्ट ते सर्वशक्तिमान् राज्यकर्ते नसते तर फारशी अनिष्ट ठरली नसती. पण राज्यकर्ता या नात्याने त्यांना पुष्कळसे निर्णय घ्यावे लागत. हे निर्णय जर वैज्ञानिक काटेकोरपणाचा त्याग करून केवळ फॅशन म्हणून स्वीकारलेल्या तत्त्वप्रणालीवर आधारलेले असतील तर देशाचे अतोनात नुकसान होते. आर्थिक योजना, भारतीय राष्ट्रवादाचे स्वरूप व परराष्ट्रीय धोरण या क्षेत्रातले नेहरूंचे पुष्कळसे निर्णय कम्युनिस्ट दृष्टिकोनाच्या प्रभावाखाली राहून घेतलेले होते. वस्तुस्थितीच्या आधारे निर्णय न घेता एखाद्या पूर्वकल्पित तत्त्वाच्या आधारे घेणाऱ्या व्यक्तीला इंग्रजीत doctrinaire

म्हणजे तत्त्वाळ म्हणतात. तत्त्वप्रणालीतली तत्त्वे मुळातच वैज्ञानिक काटेकोरपणाने संशोधन करून ठरविलेली नसतात. त्यामुळे असे निर्णय चुकण्याचा फार संभव असतो. नेहरूंनी आर्थिक योजना व परराष्ट्रनीती रशियाचे उदाहरण समोर ठेवून आखली. वस्तुस्थितीचा व भारताच्या हिताचा विचार करून नाही. कम्युनिझमच्या तत्त्वाप्रमाणे राष्ट्र ही भांडवलशाही कल्पना आहे. म्हणून नेहरूंनी भारताचे राष्ट्रत्व नाकारले. उलट चीनी राज्यकर्ते कम्युनिस्ट असूनदेखील त्यांनी आपल्या राष्ट्रांच्या हिताचा विचार प्राधान्याने केला. तत्त्वाळ विचार, विशेषत: जेथे व्यावहारिक निर्णय घ्यायचे असतात तेथे बुद्धीच्या निम्नतेचे द्योतक असतात.

कधी कधी तर नेहरूंच्या बुद्धिमत्तेच्या स्तराबद्दल स्तंभित होण्याचा प्रसंग येत असे. भारतात धान्याची कमतरता असते म्हणून ते एकदा उद्‌गारले, ''धान्यच कशाला खायला पाहिजे? धान्य मिळत नसेल तर केळी खावी.'' ''ब्रेड मिळत नाही म्हणून केक खावी,'' या मेरी ॲण्टॉयनेटच्या उद्‌गारासारखेच हे उद्‌गार आहेत. असे मी म्हणालो तेव्हा एक नेहरूभक्त उद्‌गारले, ''तुम्हाला शेतीचे अर्थशास्त्र माहीत नाही. मुख्य अन्न होण्याइतकी सध्या केळी मुबलक वा स्वस्त नाहीत. पण धान्यापेक्षा केळी जास्त मुबलकपणे पिकविणे शक्य आहे असा कृषिशास्त्राचा नवीन शोध आहे!.''

मी शेतीच्या अर्थशास्त्राचा तज्ज्ञ नाही त्यामुळे नेहरूभक्ताचे हे मत निराधारच आहे असे म्हणण्यास धजावलो नाही. पण पुष्कळशा कृषितज्ज्ञांना मी याबद्दल विचारले तेव्हा त्यांनी आपण असे काही वाचले नसल्याचे सांगितले.

एकदा काही खेडी पुराने वाहून गेली तेव्हा नेहरूंनी खेडुतांना सल्ला दिला की, ''त्यांनी आपल्या झोपड्या टेकड्यांवर बांधाव्या.'' अशा टेकड्या खेडुतांना आपल्या शेतीवर रोज सहजपणे जाता येईल इतक्या अंतरावर नसतात. म्हणून मी म्हणालो की, ''खेडुतांनी माथेरान वा महाबळेश्वरमध्ये रहावे व कारमधून शेती करण्यास यावे असा याचा अर्थ होतो.'' तेव्हा एक नेहरूभक्त म्हणाले. ''नेहरूंच्या म्हणण्याचा असा विपर्यास करणे विकृतमनस्कतेचे लक्षण आहे. शेतांच्या जवळपासही उंच जागावर झोपड्या बांधणे शक्य आहे.'' ते कसे काय हे मला अजून कळलेले नाही, कारण मी नेहरूभक्तांना तसा प्रश्न करायच्या आधीच उपस्थित असलेल्या दुसऱ्या एका मित्राने विषयांतर केले. पुढे काही दिवसांनी मी खेड्याच्या भूगोलाबद्दल नेहरूंइतकेच ज्ञान असलेल्या त्या मित्राला त्याच्या म्हणण्याचा खुलासा विचारला तेव्हा त्याने ''नेहरू असे काही म्हणालेच नाहीत; तेव्हा मी अशा तऱ्हेने त्यांच्या म्हणण्याचे समर्थन केले असेल हे शक्यच नाही,'' म्हणून कानावर हात ठेवले!



वरील दोन उदाहरणांवरून नेहरूंना इंग्रजीत ज्याला कॉमनसेन्स म्हणजे व्यवहार बुद्धी म्हणतात ती फारशी नव्हती असे अनुमान निघते. धान्यापेक्षा केळी महाग व दुर्मिळ असतात व शेतांच्या जवळ नेहमी झोपड्या बांधण्यासाठी टेकड्या उपलब्ध नसतात हे सर्वसाधारण माणसाला माहीत असते. नेहमी प्रासादात राहून मोटारीतूनच बाहेर जाणाऱ्या माणसाला या गोष्टी माहीत नसतील हे शक्य आहे. कारण त्याने जगाचा प्रवास केला असला तरी तो श्रीमंती पद्धतीने सामान्य जीवनापासून दूर राहूनच केलेला असतो. पण नेहरूंच्या जागी या बाबतीत अज्ञ असलेला दुसरा कोणीही राज्यकर्ता असता तर त्याने जी गोष्ट आपल्याला माहीतच नाही ती खरी समजून गरिबांना शहाणपणा शिकविण्याचा आव आणला नसता. याबाबतीत त्याला काही करायचे असते तर आपल्या सल्लागारांना आधी सल्ला विचारला असता.

## जवानांना वैमानिक संरक्षण नाकारले

खेड्यातील भूगोल व शेतीचे अर्थशास्त्र याबाबतीत नेहरूच नव्हे तर बंगल्यात राहणारे व खेड्यात केवळ सहलीसाठी जाणारे व आपण जे खातो ते कुठून येते? कसे शिजते? व काय किमतीचे असते? याची ज्यांना चौकशी करावी लागत नाही अशापैकी दुसरा कोणताही उच्च मध्यमवर्गीय माणूस अज्ञ असतो. तेव्हा नेहरूंच्या सामान्यबुद्धीबद्दल तेवढ्यावरून शंका घेणे रास्त होणार नाही. पण ज्या बाबतीत नेहरूंसारख्या राज्यकर्त्याला अज्ञान असण्याचे कारण नाही त्या बाबतीतही नेहरूंचे जे विचार होते ते वरीलसारखेच सामान्यबुद्धीला हरताळ फासणारे होते. ''तिबेटचे उदक चीनच्या हातावर सोडू नका'' असे केवळ सरदार पटेलच नव्हे तर परराष्ट्रसचिवांनी देखील नेहरूंना सांगितले होते. ते त्यांनी ऐकले नाही व ''मला मैत्रीपूर्ण सीमा हव्यात, चीन्यांना तिबेट दिल्यामुळे चीनशी सीमाविवाद होणार नाहीत,'' असे उत्तर दिले. तेव्हा के. पी. एस. मेनन यांनी ''तिबेट व भारत यांच्या सध्या असलेल्या व इंग्रजांनी व तिबेटने मान्य केलेल्या सीमा आधी चीनकडून मान्य करून घ्या. मगच तिबेटमध्ये चीन्यांना येऊ द्या,'' असा सल्ला दिला. तो देखील त्यांनी मानला नाही. चीन्यांना या सीमा मान्य नाहीत हे नेहरूंना माहीत होते. जे वर्तमानपत्रात अनेक वेळा आले ते नेहरूंना माहीत नव्हते हे शक्य नाही. ज्या तहानुसार तिबेटमध्ये भारतीय सेना ठेवल्या गेल्या व तिबेट/भारत सीमा निश्चित झाल्या तो तहच चीन्यांना मान्य नव्हता ही गोष्ट नेहरूंना नक्कीच माहीत होती. तेव्हा तिबेट चीनला दिल्यामुळे सीमाशांती राखली जाणार नसून सीमाविवादाला आमंत्रण मिळेल हे नेहरूंना खरोखरच कळले नाही असे मानले तर

केळी व टेकडीवरील झोपड्या याबद्दलचे त्यांचे उद्‌गार केवळ एका श्रीमंताच्या गरिबांच्या जीवनाबद्दलच्या अज्ञानाचे द्योतक नसून सामान्य बुद्धीच्या अभावाचेच द्योतक होते असे अनुमान टाळणे कठिण होते.

नेहरूंना युद्धाचा कधीच अनुभव नव्हता, त्यांनी युद्धांचा इतिहास वाचला होता आणि तोही सामान्य इतिहासात. युद्धांना वाहिलेल्या इतिहासातून नव्हे. तेवढ्या पुंजीवर ते स्वत:ला युद्धतज्ज्ञ समजू लागले व चीनच्या स्वारीच्या वेळी आपण चीनविरुद्ध विमाने वापरू नयेत कारण तसे केले तर चीनी विमाने आपल्या शहरावर हल्ले करतील असा निर्णय सेनापतींचा सल्ला धुडकावून त्यांनी घेतला. यामुळे जवानांची एरवी झाली नसती एवढ्या मोठ्या प्रमाणावर कत्तल झाली. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की आक्रमक सैन्याचे मुख्य उद्दिष्ट आक्रम्य सैन्याचा पराभव करणे हे असते. ते सोडून हजारो मैल दूर असलेल्या शहरावर बॉम्ब टाकून महागडे बॉम्ब व पेट्रोल खर्च करण्यात काही शहाणपणा नसतो. असे केल्याने काही नागरिक मेले वा काही कारखाने उद्‌ध्वस्त झाले तरी रणांगणावर लढणाऱ्या सैन्याचा पराभव करण्यासाठी त्याचा तत्काल फायदा काहीच नसतो.

दुसरे असे की या लढाईत चीनने विमाने वापरली नाहीत यावरून तिबेटमध्ये हवाई तळ बांधले गेले नव्हते व चीनवरून विमाने आणणे चीन्यांना फायदेशीर व आपण विमाने न वापरल्यामुळे आवश्यक देखील वाटले नाही. चीन विमाने वापरण्याच्या स्थितीत नव्हता याचा आपण फायदा घेऊन विमाने वापरली असती तर चीनी तडाखा बराच सौम्य करता आला असता. असेच मत सेनापतीमध्ये देखील प्रचलित आहे.

नेहरूंचा विमाने न वापरण्याचा निर्णय व त्यामागचे समर्थन निर्बुद्धतेचे प्रमाण होते असे म्हणता येणार नाही काय?

नेहरू अमेरिकेत गेले तेव्हा त्यांचे जे स्वागत झाले ते पंतप्रधान म्हणून झाले हे कुणालाही कळावे अशी अपेक्षा आहे. पण नेहरूंना वाटले की आपण जगाचे शांतिदूत आहोत म्हणून आपले एवढे स्वागत झाले. पुढे पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अली खान यांचे तेवढेच स्वागत झाले तेव्हा नेहरू दु:खित झाले व "जगाचा पुढारी नेहरू व पाकिस्तानचा पंतप्रधान लियाकत यांच्यात अमेरिका भेद करीत नाही," म्हणून विजयलक्ष्मीजवळ आपली व्यथा व्यक्त करते झाले. हे निम्न बुद्धीचे लक्षण आहे असे म्हणण्यास हरकत आहे काय?

चीनला संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व देण्याबद्दल नेहरूंचा आग्रह होता. चीनला संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व मिळाले तर जगात शांती नांदण्यास मदत होईल व भारताला



त्रास देण्याचे चीनचे सामर्थ्य कमी होईल असे नेहरूंचे म्हणणे होते.

## नेहरूंच्या डोक्यातले विसावे शतक

हे म्हणणे चीनला तिबेट दिल्याने भारताच्या सीमा या मित्रामधील सीमा होतील या नेहरूंच्या म्हणण्यासारखेच होते. संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व मिळाल्याने चीनचे सामर्थ्य वाढले की कमी झाले? भारताच्या ताब्यातील हजारो चौरस मैल भूमीवर अधिकार सांगताना चीनने संयुक्त राष्ट्रांची मंजुरी मागितली नव्हती. शिवाय चीनच्या दंडेलीबद्दल संयुक्त राष्ट्राकडे तक्रार करण्याचा भारताचा अधिकार चीन संयुक्त राष्ट्रांचा सदस्य नाही म्हणून नाहीसा होत नव्हता. चीन सदस्य नसताना देखील संयुक्त राष्ट्रांनी चीनने दक्षिण कोरियावर केलेल्या आक्रमणाला विरोध केला होता. चीन या लढाईत शिरल्यामुळे आता संयुक्त राष्ट्रांच्या कोरियामधील सेनांनी परत यावे, चीनी सैन्याचा प्रतिकार करू नये अशी भूमिका घेतली नाही. उलट चीन संयुक्त राष्ट्रांचा सदस्य झाला असता तर त्याला आपला भारताच्या ताब्यात असलेला प्रदेश परत मिळावा म्हणून फिर्याद मांडून त्याला समर्थन मिळविणे अधिक सोपे गेले असते. "आपली भारतावरील सत्ताच समर्थनीय नाही असे ज्या ब्रिटनने कबूल करून भारत सोडला त्याने त्याच भारतातील आपली सत्ता मजबूत करण्यासाठी तिबेटवर आक्रमण करून त्यांच्यावर स्वत:ला सोयीचा तह लादला. तो साम्राज्यशाही तह आहे, तो रद्द व्हावा व चीन व तिबेट यांच्या ब्रिटिशपूर्व सीमा मान्य करण्यात याव्यात," असा दावा चीनने मांडला असता तर आपल्या बाजूने संयुक्त राष्ट्रात बहुमत मिळविणे त्याला अशक्य नव्हते. नेहरू एका मोठ्या वकिलाचे चिरंजीव व स्वत: बॅरिस्टर होते व पंतप्रधान या नात्याने त्यांना ब्रिटिश/चीन संबंधांची माहिती परराष्ट्रखात्याने पुरेपूर दिली होती. तेव्हा अज्ञान हे या धोरणाचे कारण नसून सामान्य बुद्धिमत्तेचा अभाव हे नव्हते तर काय होते?

विसाव्या शतकात एक देश दुसऱ्या देशावर स्वारी करणार नाही अशी नेहरूंची आणखी एक तत्त्वाळ समजूत होती. वस्तुत: ही समजूत विसाव्या शतकाबद्दल नसून दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल असती तर जास्त समर्थनीय वाटली असती. मुसोलिनीने विसाव्या शतकातच अबिसीनियावर नुसती स्वारीच केली नाही तर तो देश आपल्या साम्राज्यातच सामील केला. जपानने चीनवर उघड स्वारी करून त्याचा मांचूरिया हा प्रदेश घशात घातला होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर एक देश दुसऱ्या देशावर स्वारी करणार नाही असे वाटण्याचे कारण दुसऱ्या महायुद्धानंतरची युद्धे आण्विक होणार असल्यामुळे कोणताही

देश अशा युद्धाला आमंत्रण देणार नाही असे नेहरूंना वाटत असेल तर अणुबॉम्बची निर्मिती हा जगावरचा धोका नसून जगच्छान्तीचा अग्रदूत आहे असे त्यांना वाटायला पाहिजे होते. अणुबॉम्बच्या भीतीने राष्ट्रे युद्धे टाळतील या म्हणण्याला काही आधार नव्हता. अमेरिकेजवळ अणुबॉम्ब होता तरीही रशियाने हंगेरीवर व पुढे अफगाणिस्तानवर आक्रमण केले. तेव्हा विसाव्या शतकाबद्दलची नेहरूंची ही अंधश्रद्धा संबंधित तथ्यांच्या अज्ञानामुळे उद्‌भवलेली नव्हती. मग हे सर्व निर्बुद्धतेचेच तांडव नव्हते काय?

विसाव्या शतकात एक देश दुसऱ्या देशावर स्वारी करणार नाही असे नेहरूंना वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे जवळ जवळ सर्वच साम्राज्यवादी देशांनी आपली साम्राज्ये स्वखुशीने सोडून दिली आहेत. साम्राज्याने आर्थिक फायदा होत नाही उलट त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी येऊन पडते व ही जबाबदारी जित राष्ट्रांच्या सहकार्याशिवाय पार पडू शकत नाही. असे सहकार्य मिळणे शक्य नाही ही विचारसरणी या निर्णयाच्या मागे होती. असलेली साम्राज्ये जर बलशाली देश सोडतात तर दुसऱ्या देशावर स्वारी करून त्यावर राज्य स्थापन करण्याचा खटाटोप कोणी कशाला करील? अशी ही विचारसरणी आहे.

या विचारसरणीत पदोपदी हेत्वाभास आहेत. ''साम्राज्यवाद्यांनी हिसकून घेतलेले प्रदेश आम्ही परत मिळवित आहोत दुसऱ्या देशावर आक्रमण करीत नाही.'' अशी चीनची भूमिका होती. हे काम जर तडकाफडकी केले तर त्यातून विश्वयुद्ध भडकण्याचा संभव नाही हेही चीनने ओळखले. हैदराबाद कारवाई देखील पाच दिवसात न आटोपता महिनोगणती लांबली असती तर तीतूनही आंतरराष्ट्रीय कटकटी उद्‌भवू शकल्या असत्या.

## चीनची नक्कल

बलप्रयोग विद्युतगतीने केला तर कोणतीही आंतरराष्ट्रीय समस्या निर्माण न होता आपले ईप्सित साध्य होऊ शकते. विश्वशांती भंगण्याचा संभव नसेल तर कोणीही अशा प्रश्नाला महत्त्व देणार नाही हे चीनने ओळखले, अशी कोणतीही मुद्याची गोष्ट ओळखण्याची नेहरूंत ताकद नव्हती. चीनची नक्कल करून शास्त्रींनीही ६५ साली काश्मीर प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. पण आमचे सैन्य तेवढे सक्षम नाही हे सेनापतींना देखील कळले नाही तर शास्त्रींना कळले नाही यात आश्चर्य नाही. परतंत्र राष्ट्राला स्वतंत्र विचारशक्तीच नसते हे सिद्ध करणारे हे उदाहरण होते.



चीनला तिबेट दिल्याने व संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यत्वाबद्दल त्याचा पाठपुरावा केल्याने चीन आपले उपकार स्मरेल वा त्याने हे उपकार मानले नाहीत तरी भारत आपल्याशी युद्ध न करता मैत्रीने राहू इच्छितो असे चीनला वाटेल व आपली सरहद्द सुरक्षित राहील असा एक विचार तिबेट देण्याच्या मागे असू शकतो.

''नेहरूंच्या शिफारसीमुळे आपल्याला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व मिळेल नाही तर नाही, चीनवर मेहेरबानी म्हणून आपण चीनला तिबेट दान करीत आहोत.'' ही आपली भूमिका चीनला अपमानास्पद वाटते हे नेहरूंच्या लक्षात आले होते. ''आमच्या मैत्रीचे एवढे स्वस्त मूल्यांकन चीनने करावे हे शोचनीय आहे,'' असे उद्‌गार नेहरूंनी काढले होते. मैत्री मोलाची वाटण्यास शत्रुत्व भयप्रद होण्याइतके समर्थ असले पाहिजे. भारत शत्रू असला काय वा मित्र असला काय आपल्याला त्याने काही फरक पडत नाही असेच चीनने भारताचे मूल्यमापन केले होते. जे घडले त्यावरून हे मूल्यमापन बरोबर होते असे सिद्ध झाले. येथे भारवीचे वचन उद्‌धृत करण्यासारखे आहे.

अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषा दरः।

''जो क्रोधशून्य आहे तो शत्रू असला काय वा मित्र असला काय त्यात काहीच दिलासा वा भीती बाळगण्याचे कारण नाही.''

नेहरूंचे चीनबद्दलचे सर्व होरे निर्बुद्धतेचे नव्हते असे म्हणणे जडच जाईल.

नेहरूंच्या बुद्धिमत्तेबद्दल मी निराश झालो ते नेहरू पंतप्रधान होण्याच्या निदान १० वर्षे आधी. १९३७ च्या आसपास ते शुक्रवार तलावाच्या काठावरील अभ्यंकर स्मारकाचे उद्‌घाटन करायला आले होते. त्याप्रसंगी त्यांनी जे भाषण केले ते ऐकून. नेहरू जवळ जवळ कोणतेच वाक्य पूर्ण करीत नव्हते. एक वाक्य पूर्ण होतपर्यंत देखील त्या वाक्यातील विचार त्यांच्या मनात टिकत नव्हता व दुसरा विचार आल्याने दुसऱ्या विचाराशी संबद्ध वाक्य ते बोलत. दोन मिनिटात संपणाऱ्या स्वप्नात परस्पर असंबद्ध असलेली अनेक दृश्ये दिसतात व त्यामुळे एक स्वप्न हे एका प्रसंगाचे दृश्य न वाटता दहा चित्रे फाडून त्यांचे तुकडे यदृच्छया गोळा करून पाहिले तर ज्याप्रमाणे गोंधळ होतो त्याप्रमाणे नेहरूंचे भाषण वाटत होते. त्यात ''अभ्यंकर बहादूर आदमी थे'' हे वाक्य एक दोनदा आले होते. त्यामुळे ते कोणत्या प्रसंगी भाषण करीत आहेत हे समजण्यासारखे होते. पण या वाक्याशिवाय त्यात अभ्यंकरांविषयी आणखी काही नव्हते. अभ्यंकरांशी ज्याचा काहीच संबंध नाही अशी ''जपान यह कर रहा है, मुसोलिनी क्या करता है? हिटलरने यॅव किया'' वगैरे अभ्यंकरांशी तर सोडाच भारतीय राजकारणाशी देखील कोणताही संबंध नसलेली वाक्ये वारंवार ऐकू येत होती.

या भाषणाने नेहरूंच्या बुद्धिमत्तेविषयी माझे जे मत झाले ते पुढच्या अनेक भाषणांनी पक्के केले. पंतप्रधान झाल्यावर नेहरूंनी आपली वाक्ये पुरी न करण्याची व असंबद्ध बोलण्याची सवय पुष्कळशी आटोक्यात आणली, पण तरी काटेकोर व सुसंगत विचार करण्याचे या माणसात सामर्थ्य आहे असे त्यांचे भाषण ऐकून कधीच वाटले नाही.

पंतप्रधानाने एखादी तर्कशुद्ध विचारप्रणाली मांडली पाहिजे अशी अपेक्षा नसते. त्यामुळे या प्रकारची बुद्धिमत्ता कुणात नसेल तरी तो पंतप्रधान होण्यास पूर्ण लायक असू शकतो. पंतप्रधानाला अतीव आवश्यक असलेला बुद्धीचा पैलू म्हणजे समस्या सोडविण्याची शक्ती. ''ब्रिटिश सरकारशी युद्ध करणे स्वप्नात देखील येऊ शकत नाही इतका आपला देश दुबळा आहे, तरी स्वराज्यासाठी संघर्ष केला पाहिजे,'' ही गांधींपुढे समस्या होती व ती त्यांनी सत्याग्रहाचे अभिनव शस्त्र वापरून सोडविली.

## महापुरुषांच्या मनातील नेहरूप्रतिमा

''अहिंसेने कधी स्वराज्य मिळते काय?'' म्हणून सत्याग्रहाची सहज टवाळी करता येऊ शकते. तशी सावरकरांनी आपले सारे साहित्यिक कौशल्य वापरून केली. पण हैदराबादमध्ये त्यांनी पिस्तुलधारी क्रांतिकारक न पाठविता सत्याग्रहीच पाठविले व त्यांच्या टीकेतली हवाच निघून गेली. सत्याग्रहाने इंग्रज देश सोडून पळतील असे गांधींना व त्यांच्या चळवळीत भाग घेणाऱ्यांनाही वाटत नव्हते. पण स्वराज्याच्या भावनेभोवती जागृती करण्याचे काम सत्याग्रहाने केले व हेच गांधींना अपेक्षित होते.

आगऱ्याहून निसटताना शिवाजी महाराजांनी समस्या सोडविण्याच्या बुद्धीचा उच्चांक गाठला पण त्यापेक्षाही मोठी समस्या त्यांनी सोडविली ती ''साऱ्या साधनसंपत्तीने युक्त असणाऱ्या शत्रूशी साधनसंपत्तीच्या बाबतीत सर्वथैव दरिद्री असलेल्या जनतेने कसे लढावे व विजय कसा प्राप्त करावा,'' ही. त्यांचे हे तंत्र त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या १०० वर्षे उपयोगी पडले. अशा तऱ्हेची समस्या सोडविण्याची बुद्धी नेहरूंना मुळीच नव्हती. पंतप्रधानाला अशाच तऱ्हेच्या बुद्धीची मुख्यत: आवश्यकता असते.

कोणत्या व्यक्तीशी कसे वागावे म्हणजे त्याचे वागणे आपल्याला हितावह होईल हे कळण्याची पात्रता हाही बुद्धिमत्तेचा एक प्रकार आहे. त्याला सामाजिक बुद्धिमत्ता म्हणतात. पंतप्रधानाला अशा बुद्धिमत्तेची फारच आवश्यकता आहे. नेहरू लोकप्रिय होते त्या अर्थी त्यांच्यात या प्रकारची बुद्धिमत्ता होती असे म्हणण्यात येते. पण



हे चुकीचे आहे. नेहरूंच्या लोकप्रियतेची मीमांसा सुरवातीलाच केली आहे. नेहरूंना सामाजिक बुद्धिमत्ता होती की नाही याचा विचार करताना त्यांचे भारताबाहेरील महत्त्वाच्या व्यक्तींशी वर्तन कसे होते याचा विचार केला पाहिजे. कारण भारतातल्या कोणत्याही व्यक्तीवर अनुग्रह करण्याचे त्यांना सामर्थ्य होते व त्यामुळे आपल्या भोवती बुभुक्षितांचा तांडा जमविणे मुळीच कठिण नव्हते.

नेहरूंनी ज्यांच्यावर अनुग्रह केला त्यांच्यापैकी पुष्कळांचे त्यांच्याबद्दल चांगले मत नव्हते. यात शेख अब्दुल्ला, मौलाना आझाद व कृष्ण मेनन हे मुख्य आहेत. काश्मीर विलीनीकरणाच्या बाबतीत नेहरूंनी शेख अब्दुल्लाची पुष्कळ मनधरणी केली पण त्याने त्यांचे काही एक ऐकले नाही. त्याच्या नेहरूंशी वागण्याचे मोरे यांनी आपल्या काश्मीरवरील पुस्तकात जे वर्णन केले आहे, त्यावरून त्याला नेहरूबद्दल काही आदर होता असे वाटत नाही. मौलाना आझादांच्या नेहरूबद्दल ज्या आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यात त्यांनी नेहरूंना पुष्कळ चुकांबद्दल जबाबदार धरले आहे व त्यात एकूण कुठेही नेहरूंचा सहवास त्यांना एका थोर पुरुषांचा सहवास वाटत होता असे दाखविणारे उद्‌गार नाहीत. नेहरूंबद्दल चर्चा करताना झाकिर हुसेन एकदा मला म्हणाले की ''नेहरूंकडे जाणारे सर्व काहीतरी घबाड मिळविण्यासाठी जातात, गांधीकडे जाणारे काही त्याग करण्यासाठी जात होते.''

कृष्ण मेनन यांनी ''नेहरूंनी गोवा कारवाईची गुप्त तारीख पोर्तुगीजांना दोनदा कळविली व त्यामुळे तिसऱ्यांदा नेहरूंना न सांगता आम्हाला गोव्यात सैन्य घुसवावे लागले,'' असे लिहिले आहे.

मेननने निवेदिलेल्या या प्रसंगात नेहरूंच्या बुद्धिमत्तेबद्दल देखील पुरावा मिळतो. पोर्तुगीजांना स्वारीची तारीख कळविण्यात नेहरूंचा काय हेतू असू शकतो? ''मेननसारखे वाईट लोक लढाया करतात. नेहरू वस्तुत: शांतिदूत आहेत,'' असा पोर्तुगीजांचा ग्रह व्हावा यापलीकडे दुसरा हेतू संभवत्र नाही. पोर्तुगीजांना स्वारीची तारीख कळवल्याने काय वाटेल याबद्दलचा हा अंदाज सुबुद्ध आहे काय?

या प्रसंगावरून नेहरूंच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारी दुसरी गोष्ट फार दु:खद आहे. पोर्तुगींजांनी आपल्याला बरे म्हणावे यासाठी पाच पन्नास जवानांचा फुकट बळी गेला तर नेहरूंना त्याचे दु:ख नव्हते!

नेहरूभक्त अर्थात या सर्व प्रकाराची संगती ''मेनन हा वाईट व गप्पा मारणारा मनुष्य होता,'' म्हणून लावतील. पण अशा संगतीने नेहरूंना कुणाशी संगत ठेवावी हे कळत नव्हते हे मानावे लागते. परकीयांपैकी फक्त बर्टरॅण्ड रसेलने नेहरूंची मुक्त स्तुती

केली आहे. पण ते नेहरूंचे ग्रंथ वाचून झालेले त्याचे मत होते. सहवासामुळे नव्हे. नेहरू नेहमी चीनचे कम्युनिस्ट शासन व मुसलमान यांची बाजू घेत. बर्टरॅण्ड रसेललाही भारतापेक्षा चीनबद्दल व हिंदूपेक्षा मुसलमानांबद्दल विशेषत: अरबांबद्दल जास्त आदर होता. चीन व मुसलमान यांची बाजू हिंदूपेक्षा जास्त न्याय्य आहे असेच त्याला वाटत होते. याच मताची पुष्टी करणारा व आपल्या बांधवांचे चूक आहे असे उघड सांगणारा नेहरू हा एक न्यायबुद्धीचा पुतळा आहे असे रसेलला वाटले. पण आपले हे मत थोडेसे चुकले आहे असे रसेलला चीनी युद्धाच्या वेळेस वाटले. कारण चीनी सैन्यावर डिव्हिजनकल्प संख्येने हल्ला आधी नेहरूंच्या सैन्यानेच केला होता. त्याने चीनी कम्युनिस्टांना समजुतीच्या गोष्टी सांगण्याऐवजी नेहरूंनाच शांततेचे महत्त्व पटवून देणारे पत्र लिहिले. बर्टरॅण्ड रसेल हा ब्रिटनमधील लॉर्ड घराण्यातला होता व भारत आणि भारतातील गांधींचे स्वातंत्र्यांदोलन याबद्दल त्याला तुच्छताच वाटत होती.

## नेहरूंचे प्रथमदर्शन

त्यातून गांधीचे विचार हे विवेकवादाला पूर्णपणे विरोध करणारे आहेत असे कोणालाही वाटण्यासारखे असल्यामुळे गांधीबद्दल तर त्याला काहीच आदर नव्हता. आपण ज्या विद्यापीठात शिकलो त्यातच शिकलेला नेहरू, गांधी व भारत याबद्दल आपल्या सारख्याच वृत्ती धारण करणारा आहे व तो विवेकवादी आहे असे वाटून रसेल नेहरूंकडे आकृष्ट झाला.

आइन्स्टाइन गांधीकडे आकृष्ट झाला होता. कारण तो भारतीयाप्रमाणेच आक्रमकांच्या छळाला बळी पडलेल्या ज्यू जातीत जन्मलेला होता व त्याला दलित जातींचे दु:ख कळत होते. नेहरूपेक्षा गांधी या दु:खाचे अधिक प्रभावी प्रतिनिधी होते.

नेहरूंशी ज्यांना व्यवहार करावा लागला त्यात रशियाचा सर्वेसर्वा स्टॅलिन, अमेरिकेचे राष्ट्रपती केनेडी, चीनचे पुढारी माओत्से टंग व चौ एन लाय, पाकिस्तानचे राष्ट्रपती जिना व भुट्टो यांचा समावेश होतो. यापैकी स्टॅलिन नेहरूंच्या पत्राची पोच देखील देत नसे. नेहरूंनी आपली बहीण विजयलक्ष्मी हिला रशियामध्ये भारताची राजदूत म्हणून पाठविले तरी स्टॅलिनने तिची कधीच भेट घेतली नाही. केनेडींना नेहरू हे भारताचे पंतप्रधान न वाटता चीनचे दूत वाटले. माओत्से टंग यांना "साम्राज्यवाद्यांचे कुत्रे" या स्वरूपात त्यांचे दर्शन झाले. चौ एन लॉय यांना नेहरू "उद्धट" वाटले. बॅ. जिना त्यांना Peter Pan व Impetuous Pandit म्हणत. यापैकी इम्पेच्युअस पंडितचा अर्थ "उद्धट भटुर्गा" असा होतो. बिचारे नेहरू! त्यांनी व त्यांच्या साऱ्या



कुटुंबाने हिंदूची लज्जास्पद जातकुळी सोडून इंग्रज होण्याचा प्रयत्न केला, पण जिनांना ते भटजीच वाटत राहिले.

पीटर पॅन नावाचा कोणी इतिहासप्रसिद्ध पुरुष झाला नाही. कोशात या शब्दाचा अर्थ स्त्रियांच्या गळ्याभोवती असणारी गोल व पूर्णपणे बंद असणारी कॉलर असा आहे. हा संदर्भ नेहरूंच्या पोषाखातील दक्षतेबद्दल नसावा कारण याबाबतीत जिना त्यांचे गुरु होते. नेहरूंच्या मनाच्या बंदिस्तपणाबद्दल हे उद्‌गार असावे. नेहरू स्वत:च्या स्वार्थावर बेतण्याचा संभव असला तरच आपल्या मतांना मुरड घालीत. चर्चेने एखादा मुद्दा पटला म्हणून नव्हे.

भुट्टो हे पाकिस्तानचे दुसरे राष्ट्रपती. म्हणत की नेहरूपेक्षा नेहरूबद्दलची मिथ्येच जास्त महान् आहेत.

तात्पर्य नेहरूंना ज्यांच्याशी व्यवहार करावा लागला त्यांना ते महान् वाटत नव्हते एवढेच नव्हे तर सर्वसाधारण राज्यकर्त्यांपेक्षा निम्न दर्जाचेच वाटत होते.

संबंधित व्यक्तीवर अनुकूल प्रभाव करणारे नेहरूंचे व्यक्तित्व नव्हते याबद्दल माझा वैयक्तिक अनुभव सांगतो. ते माझे नेहरूंचे प्रथम दर्शन होते. त्यांचे भाषण ऐकायला प्रचंड जनसमुदाय जमला होता. प्रत्येकाच्या तोंडी नेहरूंच्या मोठेपणाचे किस्से होते. एकाने सांगितले नेहरूंचे कपडे पॅरिसहून धुवून येतात. दुसरा म्हणे ते दारूच्या टबात आंघोळ करतात. त्यांची त्वचा एवढी नाजूक आहे की जाड्याभरड्या खादीच्या कपड्यांनी ती सोलून निघते. तिला रेशमाशिवाय कशाची सवय नाही. तरी ते गांधींच्या चळवळीत शिरल्यापासून खादीचे कपडे घालतात.

## माउण्ट बॅटन व राणी एलिझाबेथ

राजवैभवावर लाथ मारून जगाच्या कल्याणासाठी दारुण तपस्येला निघालेला हा सिद्धार्थ गौतमच आहे असे साऱ्यांना वाटत होते. तिसरा म्हणाला, त्यांचे वडील मोतीलाल जेव्हा तुरुंगात होते तेव्हा उत्तरप्रदेशाच्या गव्हर्नरने त्यांच्यासाठी खास स्वत:ची स्कॉच व्हिस्की पाठवली होती. कारण मोतीलाल थेट स्कॉटलॅण्डवरून आपली स्कॉच मागवीत असत.

एक तास झाला, दोन तास झाले तरी नेहरू येण्याचे लक्षण दिसे ना. मी परत जाण्याचा विचार केला पण एवढी गर्दी होती की परत जायला देखील बराच वेळ लागला असता म्हणून थांबलो व शिवाय मधूनमधून नेहरू लवकरच येत आहेत म्हणून घोषणा व्हायच्या.

नेहरू एकदाचे आले. त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी एक विद्यार्थी मंचावर चढला व त्याने आपले पेन नेहरूंना दिले. त्या पेनातून शाईच उतरेना. तेव्हा नेहरूंनी फाडकन त्या विद्यार्थ्याच्या थोबाडीत मारली व त्याची वही फेकून दिली.

## नेहरू व माउण्ट बॅटन

तो विद्यार्थी आपली वही घेऊन खाली उतरला. त्याच्या चेहऱ्यावर क्रोधाचे चिन्ह दिसले नाही. सीमाराम गोएल यांनी लिहिले आहे की आपल्या पाया पडणाऱ्या लोकांना ते बुटाच्या लाथा मारीत.

वरील प्रकार पाहणाऱ्या किती लोकांचे नेहरूबद्दल अनुकूल ग्रह झाले असतील? आपल्याबद्दल आदर व्यक्त केला म्हणून अपरिचित माणसाला थप्पड मारणाऱ्या पुढाऱ्याबद्दल जनतेचा आदर वाढला असेल काय? या प्रकारावरून नेहरूंना सामाजिक व्यवहारातील कुशलता अवगत होती असे म्हणता येईल काय?

थपडा व लाथा मारल्यामुळे काही लोकांच्या मनातील नेहरूबद्दलचा आदर वाढलाच नसेल असे म्हणणे कठिण आहे. गुरूने चोखून फेकलेली उसाची पेरे चोखणारे लोक संतमहात्म्यात वर्णिलेले आहेत. प्रियतमेच्या लाथा खाणाऱ्या शृंगारप्रिय पुरुषांची काव्यात वर्णने आहेत. पण ही प्रवृत्ती अपवादभूत वा प्रणयासारख्या खास प्रसंगी व्यक्त होणारी असते. नेहरू आपल्याला तुच्छ मानतात म्हणूनच भारतीय जनतेला त्यांच्याबद्दल आदर वाटत होता हे अशक्य नाही. पण असे असेल तर या जनतेच्या उत्कर्षाची आशा कशी धरावी?

नेहरू देखणे होते व खादीचे कपडे वापरण्यात देखील नीटनेटकपणाचे त्यांचे भान काटेकोर होते. नेहरूंच्या जनमानसावरील प्रभावाचे हे एक कारण असेल काय? श्रद्धालू लोक विशेषत: आध्यात्मिक बाबतीत श्रद्धालू असलेले लोक सर्व प्रकारच्या बावळटपणाबरोबरच पोशाखातील बावळटपणाचे कौतुक करतात. नटीच्या बाबतीत व काही बाबतीत नटांच्या बाबतीतच वेशभूषा व शारीरिक सौंदर्य ही आकर्षकतेची प्रधान कारणे असतात. पण राजवैभव हे नेहरूबद्दलच्या आकर्षणाचे प्रधान कारण असल्यामुळे त्यांच्या बाबतीत प्रतिष्ठित पोशाखाला प्राधान्य दिले गेले असेल.

नेहरू गोरे व सरळ नाकाचे होते हा त्यांच्या देखणेपणाचा मुख्य गुण होता. भारतात गोरेपणाला फार महत्त्व आहे. कारण गेल्या पाच सहाशे वर्षांच्या इतिहासात भारतावर राज्य करणारे बहुतेक विजेते म्हणते तुर्क, पठाण व इंग्रज गोरे होते. गोरेपणा सोडला तर नेहरूंच्या बांध्यात विशेरू प्रभावी असे काही होते असे वाटत नाही. त्यांच्या



पेक्षा माउण्ट बॅटन किती तरी अधिक देखणे होते. मला कधी कधी वाटते की माउण्ट बॅटन ब्रिटनला परत न जाता, भारताच्या राजकारणाच्या आखाड्यात उतरून पुढारीपणावर त्यांनी आपला दावा सांगितला असता तर ते नेहरूंना बरेच डोईजड ठरू शकले असते. कारण देखणेपणाशिवाय त्यांच्या वक्तित्वाला पराक्रमाची पार्श्वभूमी होती व भारताला स्वराज्य त्यांनी मिळवून दिले असा त्यांना प्रचार करता आला असता. ''भारताचे राज्य सांभाळण्यासाठी नेहरू मला विनंती करायला आले होते,'' असे त्यांना सांगता आले असते. राणी एलिझाबेथ भारतात आली होती तेव्हा तिच्या दर्शनाला नेहरूंपेक्षा जास्त गर्दी जमली होती. शत्रुराष्ट्राची राणी ही तिच्याविषयी कोणाचीही भावना असल्याचे दिसले नाही. अशा जनतेला माउण्ट बॅटन हा राजा मान्य झाला असता. भारतात स्वराज्याची भावना मालवण्याच्या पंथासच लागली होती.

पंतप्रधानाचे काम करण्यास ज्या प्रकारची बुद्धिमत्ता लागते ती नेहरूंच्या ठिकाणी नव्हती असे वर प्रतिपादले आहे. गिलफर्ड या मनोवैज्ञानिकाने १२० प्रकारची बुद्धिमत्ता वर्णिलेली आहे. अधिक संशोधनाने त्यात पुष्कळ भर पडू शकते. हे १२० प्रकार एकमेकापासून स्वतंत्र आहेत, म्हणजे एका प्रकारच्या बुद्धिमत्तेत शिखरावर असलेला दुसऱ्या प्रकारच्या बुद्धिमत्तेत मध्यावर किंवा पायथ्याशी देखील असू शकतो. हे खरे आहे काय हे पाहण्यासाठी या १२० प्रकारच्या बुद्धिमत्तेच्या १२० कसोट्या करून त्या इतक्या शुद्ध करायच्या की एका कसोटीचा दुसऱ्या कसोटीशी संबंध शून्य व्हावा, असा प्रयत्न केला पाहिजे. आतापर्यंत ज्याचे एकमेकाशी संबंध शून्य आहेत अशा जवळपास ७० कसोट्या करण्यात आल्या आहेत. बाकीच्या ५० ही अशाच शुद्ध करता येतील. याचा अर्थ असा होतो की कोणताही माणूस सगळ्याच कसोट्यांवर सामान्यापेक्षा श्रेष्ठ वा कनिष्ठ असेल याची संभाव्यता १२० वेळा फेकलेले नाणे दर वेळी चीत वा पट पडेल यांच्या संभाव्यतेएवढी अत्यल्प आहे.

## माणसांची पारख

तेव्हा सगळ्या प्रकारच्या बुद्धिमत्तेचा विचार केला तर कोणतीही व्यक्ती कोणत्यातरी एका कसोटीवर अत्यंत श्रेष्ठ ठरण्याचा संभव फार मोठा आहे. तेव्हा बुद्धिमत्तेच्या बाबतीत कोणतीही एक मानवी व्यक्ती दुसऱ्या एखाद्या मानवी व्यक्तीपेक्षा बुद्धिमत्तेत सर्वतोपरी श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे असे म्हणणे साधारणत: चूकच असणार.

या १२० कसोट्यांपैकी भाषा व साहित्य यांच्याशी संबंध असलेल्या कसोट्यावर नेहरू साधारणापेक्षा बरेच वर ठरले असते. पण अशा कसोट्या १० पेक्षा

अधिक नाहीत. उरलेल्या ११० वर ते साधारणपेक्षा खाली ठरले असते हे निश्चित. पंतप्रधानाच्या कामाला या ११० कसोट्यांनी मापण्यात येणारी बुद्धिमत्ताच अधिक महत्त्वाची आहे हे लक्षात घेता नेहरू पंतप्रधानाच्या पदासाठी बुद्धिमत्तेच्या दृष्टीने लायक नव्हते असे अनुमान निघते.

राज्यकर्त्यांच्या जीवनात अवश्य असणारा बुद्धिमत्तेचा एक पैलू माणसाची पारख हा आहे. कोणता माणूस आपल्या उपयोगी पडेल व कोण दगा देईल हे ज्याला ओळखता येत नाही तो राजा राजपदाची जबाबदारी कशा तऱ्हेने निभावणार? नेहरूंच्या ठायी माणसाची पारख करण्याचा गुण अजीबात नव्हता. त्यांच्या मर्जीतल्या बहुतेक माणसांनी त्यांना मान खाली घालायला लावले. शेख अब्दुल्लावर नेहरूंची इतकी मर्जी होती की त्यांनी कबूल केल्याशिवाय ते काश्मीरचे विलीनीकरण स्वीकारायला तयार नव्हते. शेख अब्दुल्लाची काश्मीरमध्ये सत्ता रहावी म्हणून काश्मीरच्या ज्या भागात शेख अब्दुल्लाचे वजन नव्हते तो भारतात सामील करण्याचा त्यांनी प्रयत्नच केला नाही. मेहेरचंद महाजनांनी ''काश्मीरला वाचविण्यासाठी ताबडतोब सैन्य पाठवा,'' म्हणून विनंती केली तेव्हा नेहरूंनी त्यांना ''चले जाव'' म्हणून फर्मावले. पण शेख अब्दुल्लांनी तशीच विनंती केली असता ते सैन्य पाठविण्यास राजी झाले, शेख अब्दुल्लाच्या आग्रहावरून नेहरूंनी काश्मीरच्या महाराजाला काश्मीरमध्ये राहण्याची देखील मनाई केली. हे सारे असता शेख अब्दुल्ला नेहरूंना क:पदार्थ मानीत होता. त्याने काश्मीर भारतापासून विभक्त व्हावे म्हणून कारस्थाने केली व नेहरूंनाच त्याला अटक करण्याचा हुकूम द्यावा लागला.

नेहरूंचे दूसरे कृपापात्र एम. ओ. मथाई हे होते. त्यांना कोणतेही संवैधानिक स्थान नव्हते. तरीही ते सरकारी फायलीवर टिप्पणी लिहून नेहरूंना सल्ले देत व हे सल्ले बाकी सर्वांचे सल्ले धुडकावून नेहरू मान्य करीत असत. मथाईला फायलीवर सल्ले देण्याचा काही अधिकार नाही म्हणून उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला तेव्हा मथाईला आपले सल्ले स्वतंत्र कागदावर देण्याचा नेहरूंनी सल्ला दिला. या माणसाला काढणे शेवटी नेहरूंनाच भाग पडले. त्याला भ्रष्टाचार हे कारण होते असे सांगण्यात आले. पण गोपाल म्हणतात की, मथाई हा सीआयएचा हस्तक होता. हकालपट्टी झाल्यावर मथाईनी इंदिरा गांधीला आपल्यापासून गर्भ राहिला होता, नेहरूंना श्रद्धामातापासून मूल झाले व त्याला त्यांनी कुठेतरी आश्रमात पाठविले असे सांगण्यात सुरुवात केली. आपल्या हितकर्त्याच्या उपकारांची अशी फेड करणारा माणूस कोणत्या दर्जाचा होता व त्यांच्याकडे नेहरू आकृष्ट झाले होते याचा विचार दु:सह आहे.



कृष्ण मेनन हे नेहरूंचे तिसरे आवडते होते. नेहरू खेरीज काँग्रेसमध्ये कृष्ण मेननबद्दल कुणाचेच चांगले मत नव्हते व शेवटी त्यांना काढा नाहीतर तुम्हालाच काढू, असे नेहरूंना अंतिमोक्त द्यावे लागले तेव्हा मेननची हकालपट्टी झाली. मेनन आपल्यापेक्षाही जास्त काळ परदेशात राहिल्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय राजकारण समजते असे नेहरूंना वाटत होते. शिवाय इंग्लंडमध्ये मेनन हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. नेहरू तसे नव्हते, त्यामुळे मेननचा त्यांच्यावर वचक होता. मेननने नेहरूंना अंधारात ठेवले नाहीतर त्यांनी योग्य परराष्ट्रीय धोरण अंगीकारले असते, ही समजूत चुकीची आहे. कारण नेहरूंना योग्य सल्ला, योग्य वेळीच अनेकांनी दिला होता. एवढे असतानाही मेननचाच सल्ला नेहरूंना पटत असे याचे कारण त्यांचे स्वत:चेच विचार मेननसारखे होते. नेहरूंचे तिसरे लाडके तेजा होते. त्यांनी एक जहाजकंपनी काढली व तिच्यासाठी त्यांना नेहरूंनी १० लाख रुपये दिले. तेजांना पुढे आर्थिक अपराधाच्या आरोपावर तीन वर्षाचा तुरुंगवास सुनावण्यात आला होता.

## पंतप्रधान नेहरूंचे शिल्पकार : माउण्ट बॅटन

ज्यांची नावे वर्तमानपत्रात खलपुरुष म्हणून गाजली त्यांची नावे वर उल्लेखिली आहेत. पण अशी ज्यांची नावे गाजली नाहीत पण जे नेहरूंच्या बाबतीत खलपुरुषांची भूमिका वठवीतच राहिले असे आणखी किती होते हे सांगता येत नाही. या उदाहरणावरून Man is known by the company he keeps; या प्रसिद्ध म्हणीची आठवण होते. या सर्व व्यक्तींच्या वर्तनाबद्दल बाहेरून दबाव आला म्हणून नेहरूंनी त्यांच्याविरुद्ध कारवाई केली. त्यांना स्वत:ला या व्यक्तींचे स्वरूप माहीतच नव्हते, असे म्हणता येत नाही. शेख अब्दुल्ला काश्मीर भारतापासून विभक्त व्हावे या मताचा होता, हे नेहरूंना त्यानेच स्वत: अनेक वेळा निक्षून सांगितले होते. कृष्ण मेननने तर नेहरूंना व सर्वच राजकीय पुढाऱ्यांना माहीत नाहीं असे काहीच केलेले नव्हते. तेजावर अनुग्रह हा वस्तुत: श्रीमती तेजांच्या सौंदर्यावर अनुग्रह होता असे वर्तमानपत्रे सूचित करीत होती.

नेहरूंच्या मर्जीतील लोकांचा त्यांच्यावर प्रभाव होता असे म्हणता येत नाही. हे लोक आपल्या उपयोगी पडतील असे नेहरूंना वाटल्यामुळे त्यांनी त्यांना जवळ केले. पण नेहरूंवर कोणत्या व्यक्तींचा प्रभाव पडला याचा विचार केला तर महात्मा गांधींचे नाव अर्थातच पुढे येते. पण गांधींचा प्रभाव नेहरू काँग्रेसच्या चळवळीत सामील झाले व गांधींच्या शब्दाबाहेर या चळवळींच्या काळी गेले नाहीत एवढ्यापुरताच मर्यादित

होता. नेहरूंच्या विचारावर गांधींचा काहीच परिणाम झाला नाही.

राजकीय पुढारी या नेहरूंच्या स्वरूपाचे गांधी हे निर्माते होते. पण पंतप्रधान नेहरूंच्या निर्मितीत गांधींचा वाटा जवळ जवळ शून्य होता. या कामात माउण्ट बॅटन दम्पतीचा वाटा सिंहाचा होता. नेहरूंच्या विदेशनीतीवर फक्त माउण्ट बॅटनची छाप नव्हती. नेहरूंचे बाकी सारे पंतप्रधानत्व माउण्टबॅटननिर्मित होते. ''भारतावर राज्य करणारा मी शेवटचा इंग्रज आहे'' असे नेहरू म्हणत. त्यांच्या पंतप्रधानकीला हे वर्णन पूर्णपणे लागू आहे. नेहरूंच्या लेडी माउण्ट बॅटनशी असलेल्या मैत्रीला बरीच प्रसिद्धी देण्यात आली आहे. पण नेहरूंवर लेडी माउण्ट बॅटनपेक्षा माउण्ट बॅटनचा प्रभाव अधिक होता असे म्हटले तरी चालेल. माउण्ट बॅटन भारत सोडून गेल्यावर देखील लेडी माउण्ट बॅटन तीन मूर्तीत राहायला येत असे व चर्चिलने, ''या तुमच्या भेटींचा ब्रिटिश साम्राज्यावर चांगला परिणाम होत नाही,'' असे तिला बजावले होते. येथे साम्राज्यावरील परिणाम याचा अर्थ साम्राज्याच्या इभ्रतीवरील परिणाम अभिप्रेत आहे. राजघराण्यातील एका स्त्रीने एका परकीय शासकाच्या घरात नवरा बरोबर नसताना अतिथी म्हणून जाणे हे शोभण्यासारखे नव्हते. पण लेडी माउण्ट बॅटनच्या बाबतीत पंतप्रधान ॲटली यांचे उद्‌गार लक्षात घेतले तर लेडी माउण्ट बॅटनची नेहरूंशी मैत्री केवळ वैयक्तिक स्वरूपाची नसून तिला राजकीय आयाम होते असे म्हणायला जागा आहे. ॲटलींनी ''लेडी माउण्ट बॅटन भारतीय पुढाऱ्यावर प्रभाव टाकू शकतात,'' असे म्हटल्याचे ''मुलखावेगळा व्हाइसरॉय'' या नावाने साधना मासिकात प्रकाशित झालेल्या माउण्ट बॅटनवरील पुस्तकाच्या परीक्षणात नमूद करण्यात आले आहे. लेडी माउण्ट बॅटननी भारत सोडल्यावरही नेहरूंशी परिचय कायम ठेवला. त्यामुळे नेहरूंच्या पंतप्रधानकीच्या साऱ्या काळात माउण्ट बॅटनचा प्रभाव कायम राहिला. लेडी माउण्ट बॅटनचे नेहरूंवर प्रेम होते, असा निष्कर्ष बहुतेक भारतीय काढतात व त्यांची छाती त्यामुळे वर येते. पण हे संबंध पाश्चात्त्यात ज्या मर्यादेपर्यंत परपुरुषाची मैत्री अनाक्षेपार्ह समजली जाते, त्याच्या पलीकडे गेले होते असे समजण्यास काहीच आधार नाही. लेडी माउण्ट बॅटनचे नेहरूंवर प्रेम नसून ती त्यांना बनवीत होती व यात राजकीय हेतू होते असे अनुमान काढले तर त्याचे खंडन करणे जड जाईल. लेडी माउण्ट बॅटनचे नेहरूंवर प्रेम असते तर मीराबेन ज्याप्रमाणे उघडपणे नवऱ्याला सोडून गांधींच्या आश्रमात येऊन राहिली त्याप्रमाणे लेडी माउण्ट बॅटनला करण्यात कोणताच अडथळा नव्हता. मीराबेनदेखील लेडी माउण्ट बॅटनप्रमाणे एका दर्यासारङ्गाची पत्नी होती. प्रतिष्ठित इंग्रजी समाजात देखील विवाहबाह्य पूर्ण संबंधांचे प्रमाण बरेच असले तरी हे संबंध



साधारणपणे लपून छपून झालेले असतात. संबंध उघडपणे सुरू असूनही सबंध दशकात घटस्फोटात परिणत झाला नाही असे उदाहरण सापडेल असे वाटत नाही.

## नेहरूनीतीची दोन स्फूर्तिस्थाने

स्वराज्य झाल्याबरोबर जवळ जवळ लगेच म. गांधींचा मृत्यू झाला. इतर कोणाला नेहरू आपला पुढारी मानत नव्हते. गांधी जिवंत राहिले असते तरी सुभाष बोसवर जशी त्यांनी धार धरली तशी नेहरूंवर धरली असती तरच नेहरू माउण्ट बॅटनच्या प्रभावातून सुटू शकले असते. कारण भारतीय राजकारणातील नेहरूंचे स्थान गांधीवर अवलंबून होते, माउण्ट बॅटनवर नव्हे. पण गांधींना विरोध करून पंतप्रधानपद टिकविण्याचा प्रसंगच नेहरूंवर कधी आला नाही. पंतप्रधानकीचा जवळ जवळ सर्वच काळ नेहरू माउण्ट बॅटन दम्पतीच्या आहारी होते. त्यांनी ''माझ्याने भारताचे राज्य सांभाळत नाही, तुम्हीच आम्हाला वाचवा'' म्हणून माउण्ट बॅटनचे पाय धरले होते. माउंट बॅटन भारतात राहिले नाहीत तरी नेहरूंचा या दम्पतीशी संबंध कायम होता. नेहरूंच्या द्वारा तेच भारताचे राज्य करीत होते असे म्हणण्यास हरकत नाही.

''मी शेवटचा इंग्रज आहे'' असे नेहरूंना वाटू लागले ते माउण्ट बॅटन दम्पतींनी त्यांना आपल्यातला मानले तेव्हापासूनच. नेहरूंचे अंतर्गत धोरण शेवटच्या इंग्रजाला साजेसेच होते. देशी भाषांचे उच्चाटन करून सर्वत्र इंग्रजीचा वापर होईल अशी व्यवस्था करणे, भारताचे हिंदू हे स्वरूप नाहीसे करणे, त्यासाठी मिशनऱ्यांना उत्तेजन देणे, हिंदूंच्या चालीरीती ख्रिस्ती कायद्याने नियमित करणे, भारतात जाती व धर्म यावर आधारलेल्या ज्या फुटीर शक्ती आहेत त्यांना उत्तेजन देऊन ब्रिटिश राज्य, इंग्रजी भाषा व चालीरीती हाच भारताच्या एकत्वाचा एकमात्र दुवा म्हणून त्याचे संवर्धन करणे व या वृत्तीस अनुकूल असे शिक्षण देण्यासाठी इतिहासादिकांचे पुनर्लेखन करून नव्या पिढ्यांवर तसे संस्कार करणे हा कार्यक्रम नेहरूंनी जोमाने राबविला.

नेहरूंना या कार्यक्रमाचे नीलमुद्रित माउण्ट बॅटनने दिले होते व नेहरू त्याची केवळ अंमलबजावणी करीत होते असा वरील प्रतिपादनाचा अर्थ नाही. वरील सारा कार्यक्रम राबविण्यास ज्या तऱ्हेची मनोवृत्ती लागते ती माउण्ट बॅटन दम्पतीने नेहरूंच्या ठायी निर्माण केली होती. अशी मनोवृत्ती निर्माण झाल्यावर एका लोकप्रिय पंतप्रधानाला त्या अनुसार कार्यक्रम आखणे काय कठिण होते?

या कार्यक्रमाची सुरवात नेहरूंनी संविधानसभेचा पूर्ण स्वातंत्र्याचा पहिला ठराव रद्द करून ''भारत ब्रिटिश साम्राज्यात राहील'' असा जो ठराव केला तेथून झाली. हा

ठराव नेहरूंनी माउण्ट बॅटन यांना इग्लंडमध्ये भेटून आल्यानंतर लगेच मांडला. काश्मीरच्या महाराजाने पाकिस्तानमध्ये जावे म्हणून माउण्ट बॅटन महाराजावर दबाव आणीत होते. महाराजा त्यांना बधले नाहीत. तेव्हा काश्मीरवर झालेल्या पाकिस्तानी हल्लेखोरांच्या स्वारीविरुद्ध मदत पाठविण्याची माउण्ट बॅटन यांनी गव्हर्नर जनरल या नात्याने शक्य तितकी टाळाटाळ केली. काश्मीरचे चित्रळ, उल्झा वगैरे भाग महाराजाची सत्ता झुगारून वेगळे झाले. यात ज्या ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांचा हात होता त्यांना माउण्ट बॅटनची फूस होती अशी त्यावेळी सार्वत्रिक समजूत होती. या गोष्टी कागदपत्रांच्या आधारे सिद्ध करता येत नाहीत, पण पाकिस्तान झाल्यावरही माउण्ट बॅटनच काही काळ भारत व पाकिस्तान या दोन्ही सैन्याचे प्रमुख होते व त्यांच्या फुशीशिवाय या घटना घडणे कठिण होते. भारतीय सैन्य काश्मीरात गेल्यावरही त्याच्यावर सारेच्या सारे काश्मीर न घेण्याबद्दल वरून दबाव येत होता असे त्यावेळी काश्मीरात लढणाऱ्या सेनाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. (मोरेकृत काश्मीर) हा दबावही माउण्ट बॅटनप्रेरितच असला पाहिजे. पुढे माउण्ट बॅटन यांनी काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रापुढे नेण्याचा आग्रह धरला. माउण्ट बॅटन भारतात असेपर्यंत हैदराबादमधील कारवाई त्यांनी होऊ दिली नव्हती.

नेहरूंची विदेशनीती मात्र कम्युनिझमप्रेरितच राहिली. आंतरराष्ट्रीय घडामोडीत शक्य तोवर रशियाची बाजू घेणे हे या नीतीचे सूत्र होते. माउण्ट बॅटन यांनी ही नीती बदलून ती ब्रिटिश नीतीच्या दिशेत आणण्यासाठी नेहरूंवर काही प्रभाव आणण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. पण तसे करण्यात त्यांना काही रसही नव्हता. रशियाविरुद्धच्या शर्यतीत भारताचे साहाय्य अमेरिकेला हवे होते ब्रिटिनला नव्हे.

## मेरे मुर्गीकी टांग

ब्रिटन याबाबतीत भारताचे मन वळविण्याचा काही प्रयत्न करीत नव्हते. माउण्ट बॅटन ब्रिटिश नीतीत आस्था बाळगणारे होते. अमेरिका आपले हित पाहण्यास समर्थ आहे हे ते जाणत होते. शिवाय पाकिस्तान अमेरिकेच्या शिबिरात शिरल्यावर अमेरिकेला रशियाच्या सरहद्दीला शह देण्यासाठी भारताची फारशी गरज उरली नाही.

विदेशनीतीच्या बाबतीत स्वत:ला उघडपणे कम्युनिस्ट म्हणविणारे देश व नेहरूंचा भारत यात नेहरूंचा भारतच, उन्हापेक्षा वाळू जास्त तापते या न्यायाने अधिक रशियाधार्जिणा होता. संयुक्त राष्ट्रामध्ये भारताचे बहुधा रशियाची साथ केली. तिबेटवर एक कम्युनिस्ट देश हक्क सांगतो आहे, म्हणून नेहरूंनी तो सहज मान्य केला. असाच



हक्क जपानने सांगितला असता तर नेहरूंची प्रतिक्रिया प्रखर विरोधाची राहिली असती हे स्पष्ट आहे. पाकिस्तानला काश्मीर मिळू द्यायचे नाही हे नेहरूंचे धोरण पाकिस्तान रशियाविरोधी गोटात गेल्यावर अमलात येऊ लागले. उघडपणे कम्युनिस्ट असलेला कोणताही देश एवढा रशियाधार्जिणा नव्हता. खुद्द चीनने रशियाशी सीमाविवाद उकरून काढला होता. युगोस्लाव्हियाचा टिटो स्टॅलिनला दाद देत नसे. स्टॅलिनला शेवटी ''ट्रॉट्स्कीचे काय झाले हे लक्षात घेऊन माझ्याशी वागा'' अशी टिटोला धमकी द्यावी लागली. पण तीही टिटोने पोकळ ठरविली.

या उदाहरणावरून हिंदू कम्युनिस्ट व इतर कम्युनिस्ट यातला फरक उघड होतो. चीनी व युगोस्लाव्हियाच्या कम्युनिस्टांनी आपल्या राष्ट्राचे कम्युनिझमच्या पायाशी समर्पण केले नाही. मुसलमान कम्युनिस्ट देखील आपला इस्लामी राष्ट्रवाद सोडायला तयार नसतात. हिंदू कम्युनिस्टांमध्ये मात्र कम्युनिझमची तत्त्वे व कम्युनिस्ट राष्ट्रावरील प्रेम यापेक्षा हिंदूंचा, त्यांच्या इतिहासाचा व कल्याणाचा द्वेष याचे प्राधान्य असते.

नेहरूंच्या व्यक्तित्वातील आणखी एक मोठा दोष म्हणजे त्यांनी अनेक भ्रम उराशी बाळगले होते. चुकीच्या समजुती बहुधा साऱ्याच लोकात असतात. पण पुष्कळशा चुकीच्या समजुती दुसऱ्या कुणाचे नुकसान करणाऱ्या नसतात. ''आपली बायको अप्सरा आहे,'' अशी कुणाची समजूत असेल तर तिच्यापासून दुसऱ्या कुणाचे नुकसान होण्याचा संभव नाही. शिवाय बहुतेकांच्या चुकीच्या समजुती अनुभवाने नाहीशा होतात. एखाद्या पुरुषाला आपण स्त्रियाचे हृदयहारक आहोत असा भ्रम असतो. पण थोडा अधिक अनुभव आल्यावर त्याला कळते की अमुक एक युवती आपल्याकडे पाहून प्रसन्न झाली असे आपल्याला वाटले. पण ती सगळ्यांच पुरुषांकडे अशा नजरेने पाहते, असा अनुभव आला की त्याचा भ्रम नाहीसा होण्यास वेळ लागत नाही. एखाद्या पुरुषाला आपले शरीरसामर्थ्य अचाट आहे असे वाटत असले तरी चार दोन पुरुषांनी आपल्याशी हस्तांदोलन केले तेव्हा त्या मुठीच्या मिठीत आपला हात चिरडल्यासारखा वाटत होता असा अनुभव आल्यावर देखील हा भ्रम कायम ठेवणारा विरळा! पण नेहरूंचे भ्रम अत्यंत चिवट होते. सत्याच्या अनुभवाने देखील ते लवकर दूर होत नव्हते. त्यातील एक मोठा भ्रम म्हणजे आपण साऱ्या भारतीय पुढाऱ्यांपेक्षाच नव्हे, तर एकूण जगातील पुढाऱ्यापेक्षा जास्त बुद्धिमान आहोत. दुसऱ्यांच्या बुद्धिमत्तेवर ताशेरे झाडण्याची त्यांना सवय होती. वस्तुस्थिती अशी होती की त्यांच्या समकालीन पुढाऱ्यांमध्ये बुद्धिमत्तेत त्यांचा क्रमांक बराच खाली लागला असता. म. गांधींचे शालेय जीवन नेहरूंच्या शालेय जीवनापेक्षा निकृष्ट होते असे म्हणता येणार नाही. आपले ग्रंथ

विदेशी प्रकाशकाने प्रकाशित करावे असा प्रयत्न गांधींनी कधीच केला नाही. त्यामुळे त्यांचे ग्रंथ विदेशात फार खपले नाहीत पण त्यांचाही प्रसार परदेशात बराच होता. फॉइडने गांधींचे ग्रंथ लक्षपूर्वक वाचले होते. लुई फिशरसारखे अनेक जागतिक कीर्तीचे पत्रकार त्यांच्या लिखाणाशी परिचित होते. त्यांचे आत्मचरित्र हा आत्माविष्काराचा उत्कृष्ट नमुना आहे. त्यांनी टागोरांना लिहिलेली पत्रे उत्कृष्ट साहित्यात गणण्यासारखी आहेत. नटेशनने प्रसिद्ध केलेली त्याची भाषणे व लेख सिद्धहस्त साहित्यिकच निर्मू शकतो. असे असता आपण आपल्या समकालीन पुढाऱ्यांपेक्षा अधिक बुद्धिमान आहोत असे त्यांना कधीच वाटले नाही.

## हा स्किझोफ्रीनिया नव्हता

श्रीनिवास शास्त्रींनी त्यांच्या इंग्रजीच्या चुका काढल्या. तो त्यांना आपला अपमान वाटला नाही. उलट संसदेत एखाद्या सदस्याने नेहरूंच्या इंग्रजीवर टीका केली की, ''तुम्ही काय माझ्या इंग्रजीच्या चुका काढणार. माझे जीवनच इंग्रजीत गेले आहे!'' अशा आविर्भावाने ते खेकसत. "communalism" या शब्दाचा अर्थ एखाद्या लहानशा लोकसमूहाचा अभिमान धरून बाकीच्या राष्ट्रातील लोकांचा द्वेष करणे असा होत नाही असे एकदा सरोजिनी नायडू म्हणाल्या होत्या. सेक्युलॅरिझमचा अर्थ परलोकावर विश्वास नसणे असा होतो, असे अनेक वेळा वर्तमानपत्रात लिहून आले होते. तात्पर्य नेहरू चांगले इंग्रजी लिहीत असले तरी अचूकतेच्या दृष्टीने त्यात दोष काढण्यासारखे पुष्कळच होते.

नेहरूंचा दुसरा भ्रम आपण जगाचे पुढारी आहेत हा होता. गांधींना आपण जगाचे पुढारी आहोत असे वाटण्यास अधिक सबळ कारणे होती. आईन्स्टाईनसारखा अग्रगण्य वैज्ञानिक आपल्या खोलीत त्यांचा फोटो बाळगीत होता. असा कोणी जागतिक कीर्तीचा पुरुष नेहरूंचा फोटो आपल्या खोलीत ठेवीत असल्याचे मी वाचले नाही. तथापि गांधींनी कधीही जगाचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला नाही व जगाच्या पुढारीपणावर दावा सांगितला नाही. लोक भजनी लागल्यामुळे आपल्यात काही आध्यात्मिक शक्ती आहे व ब्रिटिश सरकार तिच्यासमोर नमेल असे त्यांना कधीही वाटले नाही. श्री. मा. गो. वैद्यांसारख्या संघस्वयंसेवकाला देखील वाटते की गांधींनी प्रायोपवेशन केले असते तर पाकिस्तान टळले असते. गांधींना हा भ्रम मुळीच नव्हता. ४२ साली त्यांनी जे उपोषण केले ते मुद्दामच २१ दिवसांचे होते. आमरण उपोषण जाहीर केले तर ब्रिटिश सरकार आपल्याला मरू देईल हे ते जाणून होते. पुणे कराराच्या वेळी



त्यांनी केलेले आमरण उपोषण देखील आंबेडकरांवर दबाव आणण्यासाठी होते. इंग्रज सरकारवर नव्हे. कारण आंबेडकरांना आपल्या प्राणाचे मोल वाटते अशी त्यांची कल्पना होती व ती खरी ठरली. जग गांधींना महात्मा मानीत होते. पण ''मला लोक महात्मा समजत असले तरी मी हाडाचा बनिया आहे,'' असे गांधींनी स्वत:चे यथार्थ वर्णन केले होते.

नेहरूंचे स्वत:च्या ज्ञानाबद्दल विलक्षण भ्रम होते. आपल्याला युद्धशास्त्र समजते असे त्यांना वाटत होते. याचा एकमात्र आधार त्यांनी इतिहास वाचला होता. आपल्याला अर्थशास्त्र समजते म्हणून इतरांचे मत धुडकावून सोन्यापेक्षा महाग लोखंड निर्माण करणाऱ्या लोहनिर्माणी आणि अनुज्ञा व अभ्यनुज्ञा राज्य म्हणजे ''परमिट ॲण्ड लासयसेन्स राज'' सुरू केले. आपल्याला हिंदीला सोपे व समृद्ध कसे करावे हे कळण्याइतपत भारतीय भाषा व भाषाशास्त्र याचे ज्ञान आहे असा आव आणून ते हिंदी कसे लिहावे, इंग्रज़ी परिभाषा आंतरराष्ट्रीय असल्यामुळे तीच वापरणे कसे अत्यावश्यक आहे, याबद्दल पाठ देत. एकदा ते डॉ. रघुवीरांना म्हणाले की, ''मी पहा कसा खेडोपाड्यातल्या लोकांची भाषा बोलतो. तुमच्यासारखे संस्कृतमय क्लिष्ट बोलत नाही.'' त्यावर डॉक्टर रघुवीर यांनी त्यांना सुनावले की, ''माझ्याबरोबर तुम्ही खेड्यात चला व तुम्ही बोलता तशी भाषा कोणत्या खेड्यात बोलतात हे मला ऐकू द्या. उत्तर भारतात देखील खेड्यातील लोक बहुधा ''मै जाता हूं'' असे म्हणत नाहीत. ''जात हू'', जात रहू'' वगैरे डझनावरी अन्य रुपे रघुवीरांनी त्यांना सुनावली. इतक्या ज्ञानसंपन्न माणसाचा सहवास लाभल्यावरही नेहरू स्वत:च्या चुका सुधारण्यास तयार नव्हते. सगळ्या जगातील वैज्ञानिक परिभाषेचा अभ्यास केलेला व १६ भाषांचे ज्ञान असणारा माणूस भाषेबद्दल जे बोलतो ते केवळ मूर्खपणाचे आहे हा दुराग्रह नेहरूंनी कधी सोडलाच नाही.

भारतात फक्त आपल्यालाच जागतिक राजकारण समजते. बाकी सर्व लोक ''गोबरसंस्कृतीचे'' आहेत हा त्यांचा भ्रम ते कॉंग्रेसचे दुय्यम पुढारी असताना देखील होता. ''१८५७ च्या पुढाऱ्यांना राष्ट्रवाद व स्वातंत्र्ययुद्ध वगैरे काय चिजा आहेत हे कळत नव्हते. आपल्या काळाच्या मानाने त्यांची कुवत बरी होती,'' असे उस्तादाने नवशिक्याला शाबासकी द्यावी या थाटाने त्यांनी लिहिले आहे.

नेहरूंची भ्रमशीलता पाहून त्यांना स्किझोफ्रीनिया म्हणजे सत्यच्युती झाली आहे असे मला वाटत असे. पण चीनी आक्रमणाच्या वेळी आपण भ्रमात होतो अशी त्यांनी कबुली दिली तेव्हा हा स्किझोफ्रीनिया नाही हे निश्चित झाले.

## नैतिक अध:पात

कारण स्किझोफ्रीनिया सत्याच्या ज्ञानाने कधीच बरा होत नाही. स्वत:चे योग्य मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असलेले आत्मनिरीक्षण व दुसऱ्यांचे यथार्थ मूल्यमापन व त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करण्याची प्रवृत्ती नेहरूंमध्ये अजीबात नव्हती. कारण स्वत:ला सुकरतेने मिळालेल्या यशामुळे वस्तुस्थितीशी त्यांचा संबंधच तुटला होता.

स्वत:च्या विभूतिमत्वाची खात्री असल्यामुळे प्राकृत जनांना लागू असणारे नियम व निर्बंध आपल्याला लागू नाहीत असे नेहरूंना वाटू लागले. असे एकदा वाटू लागल्यावर सगळ्या प्रकारच्या नीतिमत्तेची राख होण्यास किती उशीर लागणार आहे? त्यांनी विवाहाचे पावित्र्य मानले नाही तसेच संविधानाचे रक्षण करण्याच्या आपल्या प्रतिज्ञेचे पावित्र्य मानले नाही. भ्रष्टाचाराबद्दल त्यांना फारशी चीड नव्हती. ''जनतेने निवडून दिलेल्या पुढाऱ्याच्या नियतीची शंका घेणे योग्य नाही,'' असे ते स्वत:ला प्रिय असलेल्या भ्रष्टाचारी अनुयायांचा पक्ष घेऊन म्हणत. एखाद्या स्त्रीने स्वयंवरात आपल्याला माळ घातली त्यामुळे भोगदासी म्हणून तिला वापरण्याचा आपल्याला अधिकार प्राप्त झाला असे मानणाऱ्या पुरुषाची ही मनोवृत्ती आहे.

ज्यांची प्राणाशी सतत गाठ असते त्या जवानाच्या प्राणाबद्दल नेहरू अत्यंत बेफिकिर होते. निकृष्ट दर्जाची शस्त्रास्त्रे देऊन आपण जवानांना रणांगणावर पाठवीत आहोत म्हणजे त्यांना मृत्युमुखीच लोटत आहोत याची त्यांना कधी खंत वाटली नाही. पं. कुंजरू यांनी जवानांना निकृष्ट दर्जाची शस्त्रास्त्रे देऊन रणांगणावर पाठविणे अत्यंत आक्षेपार्ह आहे असे संसदेत सांगितले होते. आपल्या सैन्याची शस्त्रास्त्रे चीनपेक्षा व पाकिस्तानपेक्षा देखील निकृष्ट आहेत हे नेहरूंना माहीत होते. पण लढाई होण्याचा संभवच नाही म्हणून याचा फारसा बाऊ करण्याची जरूर नाही असे ते उत्तर देत. ''चीनविरुद्ध कारवाई करण्याचे आपल्याजवळ सामर्थ्य नाही. निदान सहा महिने तरी तयारी केली पाहिजे, आताच हल्ला केल्यास जवानांची कत्तल होईल,'' हा सल्ला त्यांनी ऐकला नाही व वीस हजार जवानांची कत्तल घडवून आणली. याबद्दल यांना कधीही अपराधित्वाची भावना जाणवली नाही. चीनी सैन्यावर हल्ला करणे सहा महिन्यांनी लांबणीवर टाकणे व योग्य ती शस्त्रास्त्रे मिळविणे सहज शक्य होते. पण ''मी संसदेला चीन्यांना हाकलून देण्याचे वचन दिले आहे, म्हणून चीनविरुद्धची कारवाई लांबणीवर टाकता येत नाही,'' अशी त्यांनी भूमिका घेतली. लढाईचा प्रसंगच येणार नाही असे वाटत होते म्हणून जवानांच्या सुरक्षिततेची त्यांनी काळजी घेतली नाही हे एरवीचे कारण



या प्रसंगाला लागू नाही. जवानांचे प्राण माझ्या प्रतिष्ठेसाठी आहेत अशीच वृत्ती त्यांनी यावेळी प्रकट केली.

याही वेळी नेहरूंचा दुसरा विशेष जो निर्बुद्धपणा तोही प्रकट झाला. अक्षोहिणीकल्प division scale सैन्याने आपण हल्ला केला तरी चीन आपली खोडकी जिरविण्याच्या जिद्दीने प्रतिप्रहार करणार नाही असे त्यांना वाटत होते.

''नेहरूंनी त्याग केला'', ''त्यांची पत्नीनिष्ठा रामासारखी जाज्वल्य होती,'' ''तरुणपणीच पत्नीचा मृत्यू झाला तरी त्यांनी दुसरे लग्न केले नाही'', ''गर्भश्रीमंत असूनही ते खादीचे जाडे भरडे कपडे घालीत'' असे नेहरूस्तोत्र प्रत्यही ऐकण्यात येते.

वस्तुत: ''त्याग केला'' असे मोतीलाल नेहरूंबद्दल म्हणता येईल कारण त्यांनी लाखांची वकिली निदान काही काळ तरी सोडली व आपला एक वाडा काँग्रेसला दान केला. पण नेहरूंजवळ त्याग करण्यासारखे काही नव्हतेच. त्यांना स्वत:चे उत्पन्नच नव्हते. बिर्ला त्यांना दर वाढदिवशी जितकी वर्षे पूर्ण झाली तितके हजार रुपये देत असे असे वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी दरवर्षी वीस हजाराच्या वर रक्कम मिळणे हे श्रीमंती उत्पन्न आहे. आपला खर्च लेखनावर चालतो असे नेहरू सांगत. पण, लेखनावरील उत्पन्न नेहरू रशियाच्या धोरणांना साथ देणारे आहेत, हे स्पष्ट झाल्यावर म्हणजे निदान १९४० नंतर सुरू झाले असावे.

## लेडी माउण्ट बॅटन

कारण नेहरूंना लेखनावर मिळणारा सारा पैसा रशियाकडून मिळत असे असे एम. ओ. मथाईने लिहिले आहे. तत्पूर्वी बिर्लाचा नजराणा हेच त्यांचे उपजीविकेचे साधन होते. नेहरूंना तुरुंगवास घडला पण तो फारसा दु:खद नव्हता. लेखन, वाचन, मनोरंजन, विश्रांती व भोजन हे सर्व यथासांग मिळत होते. त्याने त्यांचे वजन वाढत असे.

नेहरूंच्या स्त्रीविषयक एकनिष्ठेबद्दल काय सांगावे? तिचे वर्णन खुशवंतसिंग व मथाई यांनी केलेच आहे. नेहरूंना विवाहबाह्य अपत्ये होती असे मथाई सांगतो. कुलदीप नायर यांनी तीन मूर्तींमध्ये चालणाऱ्या मीनाबाजाराचे वर्णन केले आहे. Murderer नावाचा एक खेळ खेळला जाई. यात सुरुवातीला स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज असे. एकदम दिवे विझवले जात व जो पुरुष स्त्रीच्या मिठीत सापडला त्याला बाहेर काढण्यात येत असे. असे करता करता नेहरू हा एकटाच पुरुष त्या खोलीत उरत असे.

या सर्व गोष्टी जनतापक्षाचे सरकार स्थापन होण्याच्या आधी कधीच बाहेर

आल्या नव्हत्या. यावरून नेहरू कुटुंबाची वर्तमानपत्रावर किती जबरदस्त पकड होती याचा अंदाज होतो.

नेहरूंच्या धनविषयक नीतिमत्तेच्या बाबतीत देखील मथाईने गौप्यस्फोट केला आहे. लेखनाच्या नावाने रशियाकडून नेहरूंना पैसे मिळत. लेखनाबद्दल एखाद्या इंग्रजी देशाकडून पैसे न मिळता जेथे लक्षावधी इंग्रजी वाचक असण्याचा संभव नाही व लेखन ही लेखकाची विकाऊ मालमत्ता आहे हे तत्त्वच जिथल्या कायद्याला मान्य नाही अशा देशाकडून लक्षावधी रुपये १५-२० वर्षापूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकाबद्दल नेहरूंना मिळत यावर विश्वास ठेवण्यासाठी कट्टर नेहरूभक्तच पाहिजे. रशियापक्षीय राजनीतीबद्दल नेहरू रशियाकडून पैसे घेत होते ही गोष्ट फारच धक्कादायक आहे. गोपालसारखे नेहरूभक्त यासारख्या प्रकरणावर सारवासारव करताना "मथाई हा अमेरिकेचा हेर होता व रशियाची व नेहरूंची बदनामी करणे हा अशा हेरांचा एक उद्योग होता," असे सांगतात. असे सांगताना दुसऱ्या देशाचे हेर नेहरूंच्या महालात चोवीस तास राहू शकत होते व थेट त्यांच्या कन्येपासून सर्व निकटवर्ती लोकांच्या सहवासात होते यावरून नेहरूंच्या दक्षतेबद्दल फारच निराशाजनक कल्पना होतात हे लक्षात घेत नाहीत.

दुसरी गोष्ट याहून धक्कादायक आहे. १९७७ साली इंदिरा गांधींनी सत्ता जाऊन मुरारजी देसाईंच्या पंतप्रधानत्वाखाली केंद्रात प्रथमच बिनकाँग्रेसचे केवळ नव्हे तर बिननेहरू मंत्रिमंडळ स्थापन झाले. मुरारजींनी काँग्रेस राज्यातील भ्रष्टाचाराची पूर्ण चौकशी करण्याचे वचन दिले. तेव्हा I-C.S दामले यांनी मुरारजींना खालील पत्र लिहिले.

"काँग्रेसच्या काळातील सर्व गैरव्यवहाराची आपण चौकशी करणार असे समजते. या बद्दल खालीलप्रकार आपल्या नजरेस आणू इच्छितो. जपानी सरकारने भारतीय न्यायाधीशांनी युद्धगुन्हेगारांच्या खटल्यामध्ये जपानी आरोपिताबद्दल जी सहानुभूतीची भूमिका घेतली तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सुभाषचंद्र बोसांच्या आझाद हिंद सरकारचे जे काही धन होते ते सर्व भारताला परत करण्याचा निर्णय घेतला होता. त्यापैकी जे धन कागदी कारवाईने परत करता येण्यासारखे होते, ते सर्व भारत सरकारला परत करण्यात आले. पण जवाहिरासारखे काही धन कागदावर वा टपालाने परत करता येत नाही म्हणून जपानी सरकारने अशा धनाचा प्रत्यक्ष ताबा घेण्यासाठी कोणी विश्वासू उच्चपदस्थ पाठवावा अशी नेहरूंना विनंती केली. तेव्हा नेहरूंनी हे जवाहिर घेण्यास मला पाठविले व या जवाहिराच्या पेट्या दुसऱ्या कुणास न



देता मला भेटून समक्ष देण्यात याव्या असा मला आदेश दिला. त्या अनुसार मी हे सारे जवाहिर नेहरूंच्या स्वाधीन केले पण त्यांनी मला त्याची कोणतीही पावती दिली नाही. हे जवाहिर घेतल्याबद्दल मी अनेक ठिकाणी सह्या केल्या आहेत. पण ते मी नेहरूंना दिले याबद्दल माझ्याजवळ कोणतीच पावती नाही. चौकशी सुरू झाल्यावर माझी मानगुट पकडली जाणार हे स्पष्ट आहे. तरी जवाहिराची पेटी कुठे गेली याबद्दल चौकशी करावी ही विनंती." (सारांश)

यावर मुरारजींनी चौकशी केली. ती पेटी राष्ट्रीय संग्रहालयात सापडली पण तिच्यात फुटक्या बटनाशिवाय काही नव्हते.

## युधिष्ठिरावर स्वार्थाचे संस्कार

मुरारजी देसाई यांनी लोकसभेत केलेल्या वक्तव्याच्या आधारे वरील वृत्तांत लिहिला आहे. मुरारजींनी दामले यांना दोषी धरले नाही. नेहरू कामिनीप्रमाणे कनकाच्या बाबतीतही विश्वासार्ह नव्हते असा यापेक्षा मोठा पुरावा तो काय असणार? नेहरूभक्त अर्थात् दामले व मुरारजी यांना खोटारडे ठरविणार!

नेहरूंच्या वर्तनापेक्षाही अधिक दु:खदायक गोष्ट ही आहे की खुद्द पंतप्रधानाने लोकसभेत केलेल्या वक्तव्यानंतर देशात काहीच खळबळ माजली नाही व आज सर्व देश हे पार विसरून गेला आहे.

नेहरू पंतप्रधान असतानाच मुरारजी देसाईंनी पंतप्रधान या नात्याने लोकसभेत सांगितले होते की नेहरूंचे विदेशी बँकेत खाते आहे व याबद्दल त्यांनी सरकारची परवानगी घेतलेली नाही. नेहरूंनी यावर खुलासा केला की, "मला माझ्या पुस्तकाबद्दल परदेशातून पुष्कळ पैसा मिळतो व त्यासाठी परदेशात खाते असणे जरूर आहे." या खुलाशानंतरही लोकसभेने नेहरूंना जाब विचारला नाही की "या कारणास्तव कुणाला परदेशात परवानगीशिवाय खाते उघडता येत असेल तर विदेशाशी व्यापार करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांना परवानगीशिवाय परदेशात खाते उघडण्यास मुक्त द्वार राहील." सुब्रमण्यमस्वामी यांच्या तक्रारीवरून सोनिया गांधी यांच्या विदेशी खात्याबद्दल चौकशी होत आहे, असे सांगण्यात आले होते. अशा चौकशीतून या प्रकरणावर अधिक प्रकाश पडण्याचा संभव आहे.

नेहरूंनी भारताचे फक्त नुकसानच केले हे कबूल करणे जेव्हा अशक्य होते तेव्हा नेहरूभक्त नेहरूंची तुलना युधिष्ठिराशी करतात. "युधिष्ठिराने पांडवांचे फक्त नुकसानच केले. महाभारतात पांडवावर आलेल्या सर्व आपत्ती युधिष्ठिराने जाणूनबुजून ओढवून

आणलेल्या होत्या. तरी पण युधिष्ठिर उदात्त समजला जातो कारण ''नीतिमत्तेच्या रक्षणासाठी केलेले ते दिव्य होते. ''महाभारतातून युधिष्ठिर काढून टाकला तर फक्त गुंडांच्या मारामाऱ्या व्यतिरिक्त महाभारतात काही उरत नाही.'' असे एक महाभारताचे अभ्यासक मला म्हणाले. तसेच नेहरूंमुळे भारताचे जे नुकसान झाले ते स्वार्थाकडे न पाहता नेहरूंनी नीतिमत्तेची चाड बाळगल्यामुळे झाले. ''जातीय प्रतिगाम्यांना'' पटत नसले तरी चीनचा तिबेटवरचा हक्क व पाकिस्तानचा काश्मीरवरचा हक्क न्याय्य आहे. मुसलमानांचा भारतात खरोखरच छळ होतो. त्या बिचाऱ्यांना पाकिस्तान हा छोटासाच देश मिळाला होता तेव्हा त्यापैकी काही भारतात घुसखोरी करून राहायला आले तर काही चुक नव्हते, हिंदू धर्मात टिकविलेच पाहिजे असे काही नाही. त्यामुळे मिशनऱ्यांनी हिंदूंचे धर्मांतर केले तर ती चांगलीच गोष्ट झाली. लोकप्रियतेची पर्वा न करता नेहरूंनी अहिंदूंना न्याय दिला. यात हिंदूंचे नुकसान झाले असेल तरी द्रौपदीवस्त्रहरण व पांडवांचा वनवास या घटनांप्रमाणे आपण त्याकडे पाहिले पाहिजे, असे म्हणणारे लोक भेटले आहेत.

हे लोक एक मुद्याची गोष्ट विसरतात. युधिष्ठिराने स्वत:च्या तत्त्वांचे पालन करण्यासाठी फक्त आपले भाऊ व पत्नी यांना दु:ख दिले नाही. तो स्वत:ही वनवासास गेला व आपल्या भावाप्रमाणे व पत्नीप्रमाणे त्यानेही हाल अपेष्टा भोगल्या. तो जर असे म्हणाला असता की, ''मी सत्याचे पालन करतो पण द्यूताच्या अटीत पुढील सुधारणा करण्यात याव्यात. माझ्याऐवजी पांडवांनी वनवासात जावे, मी दुर्योधनाने दिलेल्या प्रासादात वनवासाची वर्षे घालवीन. द्यूताच्या कराराप्रमाणे द्रौपदीला वनवास सांगितला आहे, म्हणून माझी दुसरी पत्नी देवका हिच्याबरोबर मी हस्तिनापुरात राहीन.'' युधिष्ठिराने याप्रकारे द्यूताच्या अटी सुधारून घेतल्या असत्या तर त्याचे दर्शन नेहरूंसारखे ठरले असते.

नेहरूंनी स्वत:चे नुकसान होईल असे कधी काही केले नाही. कम्युनिस्ट असल्यामुळे वस्तुत: त्यांनी क्रांतिकारक व्हायचे. पण कम्युनिस्ट क्रांतिकारक झाल्याने ते ज्या तऱ्हेचे सुखासीन जीवन जगत होते तसे मुळीच जगता आले नसते. त्यांना मानवेंद्र रॉय व कॉम्रेड डांगे यांचे जीवन जगावे लागले असते. नेहरूंना एकदा पोलिसांच्या हातचा वेताचा मार खावा लागला होता. पण असे दुसऱ्यांदा झाल्याचे ऐकिवात नाही. गोविंद वल्लभ पंताप्रमाणे पोलिसाच्या माराने जन्मभराचे व्यंग बाळगण्याचा वा लाला लजपतरायाप्रमाणे प्राण गमावण्याचा त्यांच्यावर प्रसंग आला नाही. कातडी बचावूनच ते कायदेभंग करीत.



## आत्मभ्रांती

नेहरूंचे शिक्षण लहानपणापासून इंग्रजी वातावरणात झाले. त्यांच्या दाया देखील इंग्रज होत्या असे म्हणतात. पण त्यांच्या आत्मचरित्रात याचा उल्लेख नाही. वयाच्या १४ व्या वर्षापासून ते इंग्लंडमध्येच शिकले व तेथेच राहिले. ते स्वप्नात देखील इंग्रजीतच बोलत. कोणत्याही भारतीय भाषेच्या वाङ्मयाचे त्यांना ज्ञान नव्हते. अर्थात् त्यांचे सर्वच बौद्धिक व भावनिक जग अभारतीय होते. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानामुळे राष्ट्रवादाचे त्यांना सिद्धांतत:च वावडे होते. कम्युनिझम देखील माणसाला स्वार्थाच्या पलीकडे पाहायला लावू शकतो. पण नेहरूंनी गांधींच्या स्वीकाराप्रमाणेच हातचा राखूनच कम्युनिझमचा स्वीकार केला होता.

नेहरूंच्या जीवनात स्वार्थापलीकडे पाहायला लावील अशा कोणत्याच भावनेला अंकुरित व्हायला वाव मिळाला नाही. ते स्वत:ला इंग्रज समजत असल्यामुळे भारतीय स्वराज्याबद्दल त्यांना का आस्था वाटावी? बरे इंग्रज म्हणून वाढल्यामुळे त्यांना इंग्लंडबद्दल देशप्रेम वाटण्याचा संभव नव्हता. कारण भारतात राहणाऱ्या भारतीयाला इंग्रज म्हणून बतावणी करता आली तरी इंग्लंडमध्ये कोणीही आपल्याला इंग्रज समजत नाही याचा सारखाच अनुभव येत असतो. तेव्हा स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, स्वसंस्कृती वगैरे एखाद्या समाजाचे आपण अविभाज्य घटक आहोत याची जाज्वल्य जाणीव करून देणारे कोणतेच भावनिक बंधन नेहरूंना उपलब्ध नव्हते. I am out of place everywhere and at home nowhere हे नेहरूंचे वाक्य प्रसिद्ध आहे. त्यांना भारतात आपण इंग्रज आहोत असे वाटत होते व इंग्लंडमध्ये आपण भारतीय आहोत असे वाटत होते. आपला काही फुटांचा देह, त्यातले मन, आपली बहीण व मुलगी यांच्या पलीकडे नेहरूंना नि:शंकपणे आपले वाटेल असे काहीच नव्हते. त्यामुळे त्यांची सारी धडपड स्वत:ची नव्या युगाचा शांतिदूत म्हणून कीर्ती व्हावी, आपली बहीण मोठ्या नेत्याच्या रूपाने जगात नांदावी व आपली मुलगी आपल्या मागे पंतप्रधान व्हावी यासाठी त्यांची धडपड होती. त्यांच्या जवळ कोणतेही स्वार्थातीत ध्येय नव्हते. मग त्यांच्याकडून चारित्र्याची अपेक्षा कशी करता येईल? दुर्दैवाची गोष्ट ही की नेहरूयुगात नेहरू सारखेच संस्कार झालेल्या दोन पिढ्या उच्चवर्गीयात निर्माण झाल्या आहेत. मग भारताचा भ्रष्टाचारात बराच वरचा क्रमांक आहे यात आश्चर्य ते काय?

ज्याला इंग्रजीत identiry crisis म्हणजे स्वत्वभ्रांती म्हणतात त्यातलाच हा प्रकार आहे. स्वत्वभ्रांती झालेल्या माणसाला कोणत्याच निष्ठा जोपासता येत नाहीत. ''आपली राष्ट्रीयता कोणती हे न सांगता येणे ही काही मोठीशी काळजी करण्यासारखी

गोष्ट नाही. नेहरूसारख्या पुरुषांना राष्ट्रीयता नसते, ते जगाचे नागरिक असतात," असे सांगण्यात येते. पण जो खरोखरी जगाचा नागरिक असतो तो जगातल्या कुठल्याही कोपऱ्याला स्वत:चे घर समजून राहू शकतो. उलट स्वत्वभ्रांती झालेल्या माणसाला जगातला कोणताच कोपरा आपला वाटत नाही. स्वदेशावर प्रेम नसणे म्हणजे जगावर प्रेम असणे नव्हे.

"माझी साऱ्या जगावर निष्ठा आहे हे म्हणणे एका दृष्टीने अर्थशून्य आहे. निष्ठा नेहमी अ वर आहे व ब वर नाही याप्रकारची भावाभावात्मक असते. माझे सगळ्यावर सारखेच प्रेम आहे असे म्हणणाऱ्याचे कुणावरच प्रेम नसते.

नेहरूंच्या पंतप्रधानकीचे वर्णन एका सूत्रात करायचे तर असे म्हणता येईल की-

जगच्छान्तीसाठी झटणारा महापुरुष म्हणून आपली कीर्ती होण्याच्या उद्देशाने देशाचे हित हे मुक्तपणे उधळण्यासारखे भांडवल म्हणून त्याचा उपयोग करणे.

■■■





# आत्मनस्तु कामाय

नेहरूंच्या वागणुकीचे बारकाईने निरीक्षण केले तर एक गोष्ट नजरेतून सुटूच शकत नाही व ती म्हणजे "सर्व काही माझ्यासाठी व माझ्या कुटुंबासाठी आहे." अशी नेहरूंची भूमिका होती. यामुळे त्यांच्या राजकारणाचे उद्दिष्ट भारतात माझ्याशिवाय कोणीही सत्ताधारी नसला पाहिजे व माझ्या पश्चात माझ्या वंशाचे राज्य भारतावर राहिले पाहिजे, हे होते.

सुभाषचंद्र बोस हे नेहरूसारखेच समाजवादी होते. पण नेहरूंनी त्यांच्याविरुद्ध गांधींच्या पारड्यात आपले वजन घातले. सुभाषांनी आझाद हिंद फौज स्थापन केल्यावर त्यांचा मार्ग चुकला आहे, ते भारतात आले तर मी त्यांच्याविरुद्ध लढेन असे नेहरू एका जाहीर सभेत म्हणाले. साऱ्या सभेने त्यांचा एकमुखाने धिक्कार केला. तेव्हा आपल्या तत्त्वाला चिकटून न राहता त्यांनी तत्काल पलटी खाल्ली व आझाद हिंद फौजेच्या सैनिकांवर सुरू असलेल्या अभियोगात त्यांच्या समर्थनासाठी भाग घेतला, आपली तत्त्वप्रणाली टिकविण्यापेक्षा आपले पुढारीपण टिकविणे नेहरूंना नेहमीच अधिक महत्त्वाचे वाटले.

नेहरू व गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाची तुलना केली तर या दोघात काहीच साम्य आढळून येत नाही. गांधींइतक्या विरोधी व्यक्तिमत्त्वाच्या व तत्त्वप्रणालीच्या माणसाला

नेहरूंनी आपला राजकीय नेता मानले ही आश्चर्याची गोष्ट आहे. नेहरू विचाराने कम्युनिस्ट होते व त्यांनी गांधींना कम्युनिस्ट बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण गांधींवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

गांधींची मुळे पूर्णपणे हिंदू होती. नेहरूंच्या बाळपणापासूनच ते हिंदू उरू नयेत असे संस्कार त्यांच्यावर झाले होते. त्यांना गांधींचे बहुतेक राजकीय व आर्थिक विचार अमान्य होते. ४२ ची चळवळ करू नये असे नेहरूंचे मत होते. तरी गांधींनी नेहरूंनाच ४२ च्या आंदोलनाचा ठराव लिहायला लावले.

''भांडवलदार पैशाच्या जोरावर जनतेला आपल्या फायद्यासाठी वश करतात,'' असे कम्युनिझमचे तत्त्व आहे. पण गांधींना लुई फिशरने विचारले की ''बिर्ला व बजाज तुमच्यावर हजारो रुपये खर्च करतात याचा तुमच्या विचारावर परिणाम होत नाही काय?'' तेव्हा गांधींनी उत्तर दिले, ''माझ्या विचारांचा त्यांच्यावर परिणाम झाला आहे म्हणून ते माझ्यावर हजारो रुपये खर्च करतात.'' भांडवलशाही नष्ट केली पाहिजे ही भाषा गांधींच्या तोंडी कधीच ऐकू आली नाही.

असे असता पंतप्रधान होतपर्यंत गांधी हेच नेहरूंचे पुढारी राहिले. याचे कारण स्पष्ट आहे. गांधींना सोडले तर पुढारीपण सोडावे लागेल हे नेहरूंनी ओळखले होते.

अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशाची चीनसारख्या कम्युनिस्ट देशाविरुद्ध मदत घेणे नेहरूंना अमान्य होते व त्यांनी आयसेनहावर व केनेडी यांनी देऊ केलेली मदत नाकारली. पण चीनने तेजपुरपर्यंत मुसंडी मारल्यावर नेहरूंनी काकुळतीने केनेडीला ''आमच्या रक्षणाला धावा हो'' म्हणून प्रार्थना केली. चीनी तेजपूरच्या पुढे आले तर नेहरूंना पंतप्रधानपदावरून काढण्याचा बनाव बनत होता हे नेहरूंना माहीत होते. त्यामुळे जी मदत त्यांना पूर्वी अस्पृश्य वाटत होती, तिलाच कवटाळण्यास ते तयार झाले. तिबेट गेला तर आपले वैयक्तिक नुकसान काहीच नाही. देशाच्या रक्षणाचे भविष्यकाळी नुकसान होईल. पण भारतावरच चीनची स्वारी झाली तर आपल्यावरच शेकेल म्हणून नेहरू आपली प्रिय तत्त्वे पूर्णपणे विसरले.

नेहरूंना कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाबद्दल आकर्षण होते. या तत्त्वज्ञानाचे एक तत्त्व ज्या सर्वसाधारण अर्थी लोकशाही हा शब्द वापरण्यात येतो त्याअर्थी लोकशाही त्यांना मान्यच नव्हती. त्यांना सतत बहुमत मिळाले पण नेहमीच मिळेल असे कोणी सांगू शकत नव्हते. त्यामुळे ''भारतात सर्वजनीन लोकशाही नको, ''अप्रत्यक्ष लोकशाही'' या पर्यायाचा विचार केला पाहिजे,'' असे ते एकदा म्हणाले होते. पण आपली सत्ता जाण्याचा संभव त्यांना कधीच दिसला नाही म्हणून या पर्यायाचा त्यांनी जास्त विचार



केला नाही. विशेषत: १९६२ साली २०००० जवानांचे प्राण व लाखो चौरस किमी भूमी गमावण्याचा विक्रम करूनही त्यांचे स्थान अढळ राहिले, तेव्हा आकाशातल्या ध्रुवासारखेच आपण पंतप्रधानपदावर ध्रुव आहोत याबद्दल ते आश्वस्त झाले.

पण पंतप्रधानपद जाण्याचा धोका जरी नाही तरी ''सगळ्या भारतावर आपलीच अप्रतिहत सत्ता राहणार नाही,'' अशी भीती त्यांच्या मनात निर्माण करणारी एक घटना चीनी आक्रमणाच्या बरीच पूर्वी घडली ती म्हणजे केरलमध्ये काँग्रेसचा पराभव करून कम्युनिस्ट पक्ष निवडून आला. नेहरू कम्युनिस्ट विचारांचे असले तरी त्यांना या घटनेमुळे बराच धक्का बसला. ''कम्युनिझम कितीही चांगला असो, कम्युनिस्ट पक्षाचा जय म्हणजे माझा पराभव, कारण मी कम्युनिस्ट पक्षाचा पुढारी नाही. ज्या पक्षाचा पराभव झाला त्या काँग्रेस पक्षाचा पुढारी आहे.''

नेहरूंनी केरलचे कम्युनिस्ट सरकार बरखास्त करून पुन: निवडणुका घ्याव्या व काँग्रेसला निवडून आणावे या दृष्टीने कारस्थाने सुरू केली. ''केरलचे कम्युनिस्ट सरकार रशियनांच्या ओंजळीने पाणी पीते,'' असा त्यांनी आरोप केला. या आरोपावर रशियन पुढाऱ्यांनी तीव्र आक्षेप घेतला व ''आम्ही केरलात कोणत्याही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रकारे लुडबुड केली नाही,'' असे ठणकावून सांगितले. तेव्हा नेहरूंनी आपला मोहरा बदलला व भारताच्या राष्ट्रपतींचा केरल सरकारने अपमान केला असा आरोप केला. स्वत: नेहरूंनी राजेंद्र प्रसादांना राष्ट्रपतिपदाची तिसरी वारी नाकारताना त्यांच्याविरुद्ध अशोभनीय टीका केली होती हे ते पार विसरले.

कम्युनिस्ट लोक नेहरूंच्या सारखेच ''सेक्युलर'' असले तरी केरलात त्याची मतपेढी मुख्यत: हिंदू आहे व काँग्रेसची मुख्यत: ख्रिस्ती आहे. त्यामुळे ख्रिस्ती शिक्षणसंस्था आपल्या ''सेक्युलर'' संविधानाच्या आधारे जो निरंकुश व्यवहार करू शकतात त्याला आवर घालण्यासाठी केरली सरकारने एक विधेयक आणले. विधेयक विधानसभेवर येण्यापूर्वीच नेहरूंनी त्यावर आक्षेप घेतला व ते सर्वोच्च न्यायालयाकडे मतांसाठी प्रस्तुत केले. सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या फेरफारासकट हे विधेयक पुढे पारित झाले.

कम्युनिस्टांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात केरलातील परकीय मळ्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे वचन दिले होते. नेहरूंनी यावर तीव्र आक्षेप घेतला. यावेळी नेहरूंचे कम्युनिझमचे प्रेम परकीयांची कृपा मिळविण्याच्या व आपल्या सत्तेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्याचा नि:पात करण्याच्या इच्छेपुढे हतप्रभ झाले. आता केरलातील कम्युनिस्ट सरकारचे दिवस भरले असे त्यांनी उघडच म्हटले.

नेहरूंची अशी वागणूक केरलातील कम्युनिस्टांनी अपेक्षिली नव्हती. केरलचे मुख्यमंत्री नम्बुद्रीपाद म्हणाले, ''आम्ही नेहरूंशी मैत्री ठेवण्याचा प्रयत्न केला. पण हे स्पष्ट आहे की नेहरूंना आमची मैत्री नको आहे. नेहरूंच्या मते काँग्रेस हेच राष्ट्र आहे. हा देशाच्या शकलीकरणाचा मार्ग आहे.'' बिचारे नम्बुद्रीपाद! त्यांना वाटले की नेहरूंना देशाच्या एकत्वाबद्दल आस्था आहे. नेहरूंच्या मनात देशाच्या एकत्वाचा एकच अर्थ होता. तो म्हणजे सर्व देशावर नेहरूखेरीज दुसऱ्या कुणाची सत्ता नसणे. जे लोक त्यांना आपला पुढारी मानत नाहीत ते भारतापासून वेगळे झाले तर त्यांना त्याचे दु:ख नव्हते. नागा व काश्मीरचे मुसलमान त्यांचे पुढारीपण मानत नव्हते. पण ते भारतातल्या दुसऱ्या कोणत्याही पक्षाचे पुढारीपण मानत नव्हते. त्यामुळे भारतातल्या नेहरूंच्या स्थानाला धोका पोहचविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नव्हते. भारताच्या संविधानानुसार झालेल्या निवडणुकीत बहुमताने निवडून आलेल्या पक्षाची व पुढाऱ्याची सत्ता त्यांना नको होती. कारण जे बहुमत आज एका प्रांतात झाले ते उद्या इतरत्र देखील होण्याचा संभव होता.

केरल काँग्रेसने पाठविलेल्या प्रतिवृत्तांच्या आधारे नेहरूंनी आरोप केला की ''केरल सरकार खुनांना उत्तेजन देत आहे व कम्युनिस्टांच्या बाजूने पक्षपात करीत आहे.'' काँग्रेसच्या राज्यात जणू काँग्रेस व इतर पक्ष यांना समानतेने वागविण्यात येत होते! स्वराज्यापूर्वी कफल्लक असलेले व काँग्रेस राज्यात करोडपती झालेले काँग्रेसपक्षाव्यतिरिक्त इतर पक्षातील लोक किती आहेत?

काँग्रेसने नेमलेल्या केरलच्या गव्हर्नराने प्रतिवृत्त दिले की ''केरल सरकार काँग्रेसप्रणीत मजूर संघाच्या विरुद्ध कम्युनिस्टप्रणीत मजूर संघाची शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे.'' काँग्रेस राज्यात काँग्रेस आपल्या समर्थकांचे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत नव्हती काय?

याच सुमारास नेहरूंनी आपली लोकशाहीची अभिनव कल्पना मांडली. ते म्हणाले की, ''लोकशाही म्हणजे मतदान व पक्षाधिष्ठित सरकारे ही कल्पना फारच संकुचित आहे.'' एकूण लोकशाहीची ''विशाल'' कल्पना म्हणजे नेहरू व त्यांचे वंशज यांच्या हाती सदासर्वकाल सत्ता राहणे.

गोपाल लिहितात की, ''केरल काँग्रेसला मध्यावधी निवडणुका घेण्याची मागणी करा असा सल्ला गुप्तपणे देण्यात आला. सरकार जर बहुमतात आहे तर मध्यावधी निवडणुकांचे प्रयोजन काय? असे प्रयोजन निर्माण करण्यासाठी एक ''विमोचन समर समिति'' नेमण्यात आली व तिने साऱ्या प्रांतात सरकारच्या विरुद्ध आंदोलन सुरू केले.

या चळवळीच्या भक्कमतेबद्दल केरलाबाहेरच्या वृत्तपत्रात फारच अतिरंजित



वर्णने देण्यात आली. पण नम्बुद्रीपादांनी या चळवळीचे वर्णन ''कॅथलिक व नायर यांची चळवळ'' असे केले. हे लक्षात ठेवले पाहिजे की केरलचा कम्युनिस्ट पक्ष मुख्यत: हिंदूंच्या व काँग्रेस मुख्यत: ख्रिस्तांच्या मतावर अवलंबून आहे. यामुळेच यावेळी सावरकरांनी केरलच्या कम्युनिस्ट सरकारच्या बाजूने फतवा काढला होता.

ठरल्याप्रमाणेच या चळवळीच्या मागणीचे निमित्त करून केरल सरकार बरखास्त करण्यात आले. नंतर झालेल्या निवडणुकात काँग्रेस निवडून आली व निदान नेहरूंच्या हयातीत भारतात त्यानंतर कधीच कुठेही नेहरूंना पुढारी न मानणारे सरकार अस्तित्वात आले नाही. भारतात नेहरूंनंतरही सगळ्याच बाबतीत नेहरूनीती सुरू राहिली तशीच याबाबतीत देखील राहिली. काही तरी कारण काढून प्रतिपक्षाची सरकारे बरखास्त करणे हा पायंडाच पडला.

स्वत:च्या हयातीतच नव्हे तर नंतरही भारताची सत्ता आपल्याच वंशजाच्या हाती रहावी असा नेहरूंचा आग्रह होता. त्यांनी इंदिरा गांधींना राजकारणात पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू केला. याची सुरुवात इंदिराला काँग्रेस अध्यक्ष बनविण्यापासून झाली. ''इंदिराला अध्यक्ष बनवावे'' अशी सूचना त्यांनीच केली. इंदिराची प्रकृती बरी नसते असा एका सदस्याने भीत भीत आक्षेप घेतला तेव्हा नेहरूंनी त्याला गप्प बसविले.

नेहरूंच्या नंतर पंतप्रधानपदावर दावा सांगणारे मुरारजी देसाई, स. का. पाटील व अतुल्य घोष हे तिघे काँग्रेसमध्ये प्रबल होते. ते इंदिरा गांधींच्या आड येऊ नयेत म्हणून नेहरूंनी ''सर्व कार्यक्षम लोक सरकारातच शिरू पाहतात. त्यामुळे काँग्रेसला कार्यकर्त्यांची वाण पडत आहे,'' अशी तक्रार करणे सुरू केले. कामराज हे त्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी काँग्रेस पक्षाला मजबूत करण्यासाठी वरील तिघांची जरूर आहे असे सांगितले व या तिघांचे त्यागपत्र नेहरूंनी स्वीकारले.

स्वराज्यानंतर पक्षापेक्षा सरकारचे महत्त्व वाढले व सरकारात नसलेला पुढारी जनतेच्या नजरेपासून आपोआपच दूर होऊ लागला. नेहरू जेव्हा आजारी पडले तेव्हा स्वत:चे काम करण्यासाठी त्यांनी लाल बहादूर शास्त्री यांची नेमणूक केली व त्यांनी ''माझ्याने हे काम होत नाही, तुम्ही इंदिरालाच हे काम सांगा'' असे म्हणावे असे नेहरू त्यांना अस्पष्टपणे सुचवीत होते. पण शास्त्रींनी वेड पांघरले व ''नाही नाही, तुमची कृपा असेल तर माझ्याने काय होणार नाही?'' असे म्हणायला सुरुवात केली. तेव्हा नेहरूंनी हळूहळू त्यांच्याकडे फायली पाठविणे बंद केले. यावरून तरी शास्त्री समजतील अशी नेहरूंची अटकळ होती पण शास्त्रींनी आपली बतावणी सोडलीच नाही.

इतक्यात नेहरू अनपेक्षितपणे वारले व ''पंतप्रधान कोणी व्हावे?'' या बाबतीत

काँग्रेस गोटात हालचाली सुरू झाल्या. कामराज हे काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते स्वत: पंतप्रधान होऊ शकत नव्हते. कारण हिंदी वा इंग्रजी यापैकी कोणत्याच भाषेत त्यांना एखादे वाक्यदेखील समजत नव्हते. मग बोलता येणे तर दूरच. तरी त्यांना सत्ता हातात ठेवायची होती. त्यामुळे मुरारजी, पाटील व घोष यांच्यापैकी कोणीच त्यांना चालण्यासारखा नव्हता. हे सारे आग्रही व स्वयंप्रज्ञ होते. ज्या शास्त्रींना नेहरूंनी आपले काम सोपविले होते त्यांची प्रतिमा "तोंडावरची माशीही न हलू देणारा एक अप्रभावी माणूस" अशी होती. नेहरूंचेही असेच मत असल्यामुळे त्यांनी "हा माणूस इंदिरास भारी होणार नाही," असा अंदाज करून शास्त्रींना आपले काम सांगितले होते. कामराजलाही शास्त्री याच कारणास्तव पसंत होते व "तेच पंतप्रधान व्हावे अशी नेहरूंची इच्छा होती," असे त्यावेळी सहज म्हणता आले. त्यामुळे शास्त्री निर्विरोध पंतप्रधान झाले.

पण ते १८ महिन्यातच वारले. पुन: पंतप्रधानाच्या निवडीचा प्रश्न उद्भवला.

इंदिरा गांधींची त्यावेळची प्रतिमा एक "गुंगी गुडिया" म्हणून होती. त्यांच्या त्या काळापर्यंतच्या चरित्रावरून ती एक निर्बुद्ध स्त्री आहे, अशीच सगळ्यांची धारणा होती. त्यामुळे तिला पंतप्रधान केले तर ती आपले उपकार स्मरून आपल्या ताब्यात राहील म्हणजे भारताचे राज्यच आपल्या ताब्यात राहील असा कामराजांनी विचार केला व इंदिरा गांधींना निवडून आणले.

इंदिरा गांधींच्या पंतप्रधानपदाचे मूल्यमापन इंदिरा गांधीवरील प्रकरणात केले आहे. त्यावरून दिसून येईल की तीही कारकीर्द तंतोतंत नेहरूवादावर चालत होती व तिने भारताचे सर्वतोपरी नुकसानच झाले.

नेहरूंनी धरलेला वंशसत्तेचा आग्रह त्यांच्या इतर आग्रहाप्रमाणेच देशघातक ठरला.

■ ■ ■





# महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू

गोडसेवरील मराठी नाटकाबद्दल बोलताना एक मित्र म्हणाले-

'गांधींचा खून करणाऱ्याचे, गुणगान करणाऱ्यांचा मला खून करावासा वाटतो?' मी विचारले.

'खून शरीराचा की तत्त्वांचा?'

'मी समजलो नाही'-ते म्हणाले.

गोडसेने गांधींच्या शरीराचा खून केला. नसता केला तरी गांधींचे शरीर अमर होणार होते असे नाही. पण या खुनामुळे गांधींचे विचार जनतेला अमान्य झाले नाहीत. गांधींच्या तत्त्वाबद्दलच ज्या कृत्यामुळे अनादर निर्माण होता त्या कृत्याला मी ती तत्त्वे आदरणीय आहेत असे गृहीत धरून, गांधींच्या तत्त्वांचा खून म्हणतो. गोडसेने असा खून केला नाही. असा खून दुसऱ्या एका व्यक्तीने केला. या व्यक्तीमुळे गांधींच्या विचारांचे व मूल्यांचे भारतातून अजीबात उच्चाटन झाले आहे. पण या व्यक्तीची गांधींचा उत्तराधिकारी म्हणून पूजा होत आहे.

'तुम्ही कुणाबद्दल बोलत आहात?'

'हे तुम्हाला स्पष्ट सांगावे लागते हे दुर्दैव आहे. जवाहरलाल नेहरूंबद्दल मी बोलत आहे. भारताचे राज्य नेहरूंच्या तत्त्वावर चालले आहे, गांधींच्या नव्हे!'

'अहो, पण गांधींची व नेहरूंची तत्त्वे यात फरक काय आहे?'

हे ज्या देशात सांगावे लागते त्या देशाला काही भवितव्य असू शकते काय?'

## देशी भाषांविरुद्ध जिहाद!

मी एकेक मुद्दा घेतो.

इंग्रजी भाषेचे भारतातून उच्चाटन झाले पाहिजे असा गांधींचा आग्रह होता. माझ्याशी इंग्रजीत बोलू नका व मला इंग्रजीत पत्रे लिहू नका असे ते खडसावीत असत. माझी व गांधींशी १९४१ साली मुलाखत झाली. मी त्यांना लिहिलेले पत्र इंग्रजीत का होते म्हणून त्यांनी खडसावून विचारले. मुलांना मातृभाषा सोडून इतर भाषेत शिक्षण देणे हा गुन्हा करण्यात यावा असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

मातृभाषेबद्दल गांधींचा आग्रह असला तरी भारत हे एक राष्ट्र म्हणावयाचे आणि दोन भारतीय एकत्र आले तर त्यांना एकमेकांशी सहज बोलता येईल अशी भाषाही नसावी याचे गांधींना वैषम्य वाटत असे. अशी भाषा प्रचारात आणायची असेल तर हिंदीचाच आश्रय केला पाहिजे. दुसरी कोणतीही भाषा या कामी उपयोगास येणार नाही अस गांधींचे ठाम मत होते म्हणून त्यांनी हिंदीचा हिरिरीने प्रचार केला.

गांधीच्या वेळी बहुतेक हिंदू विद्यार्थी मॅट्रिकच्या परीक्षेसाठी तीन वर्षे संस्कृत शिकत.

हे ज्ञान रामायण/महाभारतासारखे सोपे संस्कृत समजण्यास व संस्कृत सुभाषितांचा आस्वाद घेण्यास उपयुक्त असे. शिवाय कीर्तनाचा प्रसार बराच होता व त्यामुळे सोपे संस्कृत समजणे शाळेत न शिकताही शक्य होते. संस्कृतची गोडी लागण्यास तर ते शालेय शिक्षणापेक्षाही अधिक उपयुक्त होते. पण गांधींना संस्कृतचा एवढा प्रसार पुरेसा वाटत नव्हता. हा प्रसार अनेक पटींनी वाढला पाहिजे असे ते अनेक वेळा म्हणाले आहेत.

या उलट नेहरूंचा आचार होता. त्यांनी सगळ्याच आधी संस्कृतवर आपला मोर्चा वळविला. पंचवीस पेक्षा कमी विद्यार्थी आहेत या सबबीवर कित्येक शाळांतून संस्कृत काढूनच टाकले. संस्कृतचे अंक क्रम ठरविताना विचारात घेऊ नये असा नियम केला. विज्ञानाचा कोणताही विषय घेणाऱ्याला संस्कृत घेताच येऊ नये अशा रीतीने अभ्यासक्रम आखला. संस्कृतच्या संवर्धनासाठी कोणतीही योजना प्रस्तुत केली तर तिच्याबरोबर अरबी/फारसीच्या संवर्धनासाठी एखादी योजना प्रस्तुत केल्याशिवाय तिचा विचार होणार नाही असा पायंडा पाडला. राजस्थानमधील एका भाषणात



कालिदास हा काही फार मोठा कवी नाही असे उद्गार काढले. मुळातून कालिदास वाचण्याइतके संस्कृत नेहरूंना येत नव्हते हे लक्षात ठेवले पाहिजे.

या वृत्तीचा परिणाम होऊन संस्कृतची टवाळी करणे ही एक फॅशन झाली. नेहरूयुगात कीर्तनकारांनीदेखील संस्कृतवर बहिष्कार घातला व इंग्रजी झाडल्याशिवाय हरिभक्तीचे पुण्य मिळणार नाही असे त्यांना वाटू लागले. मराठी कालिकांजवळ न चुकता संस्कृत श्लोक छापवनू घेऊ शकेल असा कर्मचारी नसतो. त्यामुळे 'हे श्लोक वगैरे बाजूला ठेवा' असे संपादक लेखकांना सांगतात.

केंद्र सरकारची भाषा हिंदी असावी व हा बदल १९६५ च्या आत करण्यात यावा असा संविधानाचा आदेश आहे. असे असता नेहरूंनी मुसलमान व दाक्षिणात्य यांना हिंदीच्याविरुद्ध चिथावले. सतत इंग्रजीचे स्तोत्रे गायिली. एवढेच नव्हे तर देशी भाषांचे भारतातून उच्चाटन करण्याचाच प्रयत्न केला. इंग्रजी शब्दांचा प्रचुर वापर व रोमन लिपी या स्वरूपात देशी भाषा लिहाव्या असा नेहरूंनी प्रचार केला. देशी भाषात प्रचलित असलेले संख्यावाचक शब्द न वापरता सगळ्यांनी इंग्रजीचे शब्द वापरावे असे आदेश काढले. यातील उद्देश स्पष्ट आहे अशा स्वरूपात देशी भाषा वापरण्यापेक्षा सरळ इंग्रजीच वापरावे असे पुढील पिढीला वाटू लागले. देशी भाषा सर्व जनतेच्या तोंडातून काढून तेथे इंग्रजी कोंबणे केवळ अशक्य आहे. पण जे मराठी वापरतात ते पूर्ण निरक्षर असावे. देशी भाषात मुळी वाङ्मयच असू नये. राज्यकारभारातून व शिक्षणातून देशी भाषांचे समूळ उच्चाटन केल्याने त्या रानटी टोळ्यांच्या भाषेसारख्या केवळ बोली म्हणून उरतील. सारी सत्ता आणि ज्ञान कॉन्व्हेंट सदृश शिक्षण घेतलेल्यांच्या हाती राहील असे नेहरूंच्या स्वप्नातले भारताचे भाषिक चित्र होते.

'ही फारच अतिशयोक्ती आहे' -मित्र म्हणाला.

'यात अतिशयोक्ती नाही. नेहरूंनी पंतप्रधान झाल्यावर एकदा तरी हिंदी व देशी भाषा यांचा पुरस्कार केला आहे काय? त्यांना 'क्लिष्ट' हिंदी नको होती. त्याऐवजी 'सोप्या' हिंदुस्तानीचा म्हणजे उर्दूचा त्यांनी पुरस्कार केला हे खोटे आहे. हैदराबाद विमोचनानंतर त्यांनी पहिले काम कोणते केले असेल तर हैदराबाद संस्थानातील शिक्षणाचे व राज्य कारभाराचे उर्दू माध्यम बंद करून इंग्रजीचा वापर सुरू करणे, इंग्रजांच्या वेळी देशी संस्थानांमध्ये देशी भाषा या राज्य कारभाराच्या भाषा होत्या. संस्थाने विलीन केल्यावर संस्थानातही इंग्रजी सुरू झाले.

आमच्या मुलांना व नातवांना कोणतीच देशी भाषा वाचता येत नाही. देशी भाषांच्या उच्चाटनाच्या दिशेने नेहरूंनी फार मोठे यश मिळविले आहे.

मातृभाषेला भारतीयांच्या जीवनात जास्तीत जास्त स्थान असावे म्हणून गांधींनी भाषावार प्रांतरचनेची कल्पना काढली. गांधींच्या वेळी काँग्रेसचे प्रांत भाषावारच होते. नेहरूंनी भाषावार प्रांतरचनेला जबरदस्त विरोध केला. ती टाळण्यासाठी प्रांताप्रांतांना एकमेकाविरुद्ध उठवून भाषिक दंगे घडवून आणले. नेहरूंच्या विरोधाला न जुमानता भाषावार प्रांत झालेच. पण देशी भाषांना शिक्षणातून व राज्य कारभारातून पुरेपूर हद्दपार करण्याचे नेहरूंचे उद्दिष्ट जवळपास पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र झाला पण मराठी वनवासात आहे असे कुसुमाग्रज म्हणाले तेव्हा मराठीचा वनवास संपविण्याची आपली इच्छा नाही असे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी सांगितले.

'देशी भाषांचा आग्रह धरून देशाच्या प्रगतीला खीळ घालणे बरोबर आहे काय?' आमचे मित्र विचारते झाले. त्यावर मी उत्तरलो स्वभाषांचा त्याग केल्याने प्रगती झाल्याचे एकही उदाहरण नाही. आज चीन, जपान यांच्या मानाने तर सोडाच पण भारतापेक्षा पुष्कळ पटीने अधिक स्वभाषेचा वापर करणारी श्रीलंका भारतापेक्षा पुष्कळच प्रगत आहे असे संयुक्त राष्ट्रांचे आकडे सांगतात.

## हिंदू-मुस्लिम समस्या

'बरे भाषा सोडून आणखी कोणत्या बाबतीत नेहरूंनी गांधीचे हनन केले?' मित्रांचा दुसरा प्रश्न.

आपण हिंदू/मुस्लिम प्रश्न घेऊ. या बाबतीत गांधी नेहरूसारखेच होते. त्यांनीच मुस्लिम 'तुष्टीकरणा'चा पायंडा पाडला. त्यांनी खिलाफतीची चळवळ केली. त्यामुळे पाकिस्तानी मनोवृत्ती बळावल्या व देशाची फाळणी झाली असा प्रचार करण्यात येतो. या प्रचारात सत्याचा अंश देखील नाही. खिलाफत चळवळीच्या वेळी जे दंगे झाले ते गांधींमुळे झाले असे म्हणणे हा कृतघ्नपणा आहे. इंग्रजांच्या विरुद्ध उभे राहिल्याने दंडे पडतात. तेव्हा जिहादचा मोर्चा निरुपद्रवी हिंदूंकडे वळवून त्यांच्या कत्तली कराव्या असे मोपल्यांना वाटले. गांधींनी त्यांना ब्रिटिशाकडून मार दवविला त्यामुळेच मुसलमानांनी हिंदूंच्या कत्तली केल्या असे म्हणायचे असेल तर नानासाहेब पेशव्यांनी मुसलमानांना इंग्रजांच्या विरुद्ध उठविले तेव्हा मुसलमानांनी हिंदूंच्या कत्तली का केल्या नाहीत? गांधींनी देखील १९३० साली सर्वच देशबांधवांबरोबर मुसलमानांनाही स्वातंत्र्य संग्रामात सहकार्य करण्याचे आवाहन केले. तेव्हा हजारो मुसलमान 'भारत माता की जय' म्हणत तुरुंगात गेले. त्यांनी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या. मुसलमानांच्या मनात इतक्या मोठ्या प्रमाणावर भारतीय स्वातंत्र्याबद्दल उत्साह निर्माण करण्याचे काम



नानासाहेब पेशव्यांनंतर गांधींनीच केले.

पाकिस्ताननिर्मितीचे खापर गांधींच्या डोक्यावर फोडण्यात येते. याचे कारण गांधी नसून १९४६ साली ब्रिटिशांनी पाकिस्तान निर्मितीबद्दल व एकूणच भारताच्या स्वातंत्र्याच्या स्वरूपाबद्दल जनतेचा कौल घेण्यासाठी निवडणुका करविल्या व त्यात फार मोठ्या प्रमाणावर भारतीय मुसलमानांनी पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला हे आहे. पण या निवडणुकीत देखील सीमाप्रांतामध्ये गांधींचे नेतृत्व स्वीकारलेल्या काँग्रेसने मुस्लिम लीगचा पराभव करून आपले मंत्रिमंडळ स्थापन केले होते. ब्रिटिशांना पाकिस्तानिर्मितीबद्दल जो संशय वाटत होता तो याचमुळे. नाही तर पाकिस्तान पुष्कळच आधी झाले असते. पुढे ब्रिटिशांनी 'पाकिस्तान नको असेल तर ब्रिटिश मंत्रिमंडळाची योजना घ्या' असा पर्याय मांडला. या पर्यायात देशाचे दोन नव्हे तर दोनशे तुकडे होण्याचा संभव होता. म्हणून गांधींनी पाकिस्तानला मान्यता दिली. पुढे काश्मीरमध्ये अधिकृत व अनधिकृत पाकिस्तानी फौजा घुसल्या तेव्हा भारतीय फौजा काश्मीरात पाठवून पाकिस्तानला थोपविण्याचा सल्ला गांधींनीच दिला. काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्राकडे नेऊ नये असे गांधींचे मत होते. एकूण देशाचे तुकडे करण्यास कारणीभूत होण्याचा गांधींवर करण्यात येणारा आरोप सर्वथैव निराधार आहे.

नेहरूंनी गांधींचे मुस्लिम धोरण पुढे चालविले असे म्हणणाऱ्यांनी पुढील गोष्टी ध्यानात आणाव्या.

नेहरूंनी भारतावर राज्य करणारे तुर्क, अफगाण, मुघल हे 'राष्ट्रीय राज्यकर्ते' होते व शिवाजी हा बंडखोर होता असा सुरुवातीपासून प्रचार केला. मुस्लिम समाज हा हिंदू समाजाहून विभक्त आहे, त्याची भाषा वेगळी आहे व कायदेही वेगळे असले पाहिजेत म्हणून समान नागरी कायद्याला व हिंदीला विरोध केला. काश्मीरच्या महाराजाला तो हिंदू होता या एकाच गुन्ह्याखातर नेहमी शिव्या दिल्या व त्यामुळे भारतात सामील होण्यास तो कचरू लागला. सामील झाल्यावरही तो सामीलनामा नेहरूंनी अमान्य केला व शेवटचा निर्णय जनमताने घेण्यात यावा असे सांगितले. महाराजा भारतात सामील झाल्याबद्दल जगात कुणीही निषेध केला नव्हता. पाकिस्तानने देखील नाही. असे असता स्वत:च काश्मीरमध्ये जनमत घेण्यात यावे म्हणून संयुक्त राष्ट्राकडे नेहरूंनी विनंती केली. काश्मीरला ३७० कलम लावून ते भारतात कधीच विलीन होणार नाही यांची व्यवस्था केली. प्रत्येक दंग्यांच्या वेळी हिंदूंच दंगे करतात व बिचारे मुसलमान मार खातात असा प्रचार करून मुसलमानांना दंगे करण्यास प्रोत्साहन दिले. दंग्यात आगळिक मुसलमानच करतात असे सांगणारी २३ प्रतिवृत्ते नेहरूंनी

प्रकाशित होऊ दिली नाहीत. याचा परिणाम असा झाला की ब्रिटिशांच्या वेळी पाकिस्तानसहित असलेल्या भारतात वर्षाला २६ हिंदूमुस्लिम दंगे होत असत ते नेहरूंच्या कारकीर्दीत ब्रिटिश भारताच्या दोन तृतीयांश राहिलेल्या भारतात ९० होऊ लागले. पूर्वी मुसलमानांनी हिंदूंची मंदिरे पाडून मशिदी बांधल्या असतील तरी ती मंदिरे हिंदूंनी परत मागणे हे कृत्य अत्यंत निंद्य आहे असा प्रचार केला व अयोध्येसारखे प्रश्न निर्माण केले. त्यांनी या प्रश्नावर मुसलमानांशी वाटाघाटी करण्यात पुढाकार घेतला असता तर हा प्रश्न सहज सुटू शकला असता. आजही मुसलमान या प्रश्नावर वाटाघाटी करण्यास तयार आहेत हे अलीकडील घटनांवरून दिसून येते.

गांधींनी वर वर्णन केलेल्यांपैकी कोणतेही कृत्य केले नाही. यंग इंडियातील एका लेखात मुसलमानच दंग्यात पुढाकार घेतात असा त्यांनी स्पष्ट आरोप केला होता. शहा यांनी लिहिलेल्या शिवाजीच्या गुजराथी पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांनी शिवाजीचा गौरव केला आहे. शिवाजीला त्यांनी 'चुकीच्या मार्गाने गेलेला देशभक्त' म्हटले असा नेहमी प्रचार केला जातो. पण मुळातले वाक्य असे आहे. 'अहिंसेच्या मार्गाने जाणे शक्य असून देखील शिवाजी हिंसेच्या मार्गाने गेला असेल तर माझ्या तत्त्वाप्रमाणे त्याला मार्गच्युत देशभक्त म्हणणे भाग पडेल,' अशा देशभक्तात त्यांनी गॅरीबॉल्डी व वॉशिंग्टन यांचे देखील नाव घेतले आहे.

मुसलमान भारतीय राष्ट्रीयत्वात सामील व्हावे म्हणून गांधी त्यांची मनधरणी करीत होते तर नेहरू त्यांनी हिंदूंशी भांडणे करावी व स्वत:ला मुघलादि आक्रमकांचे वंशज मानावे म्हणून चिथावण्या देत होते हा गांधी व नेहरू यांच्या मुस्लिम धोरणातला फरक आहे.

हिंदू-मुसलमानात भांडणे लावण्यात नेहरूंचा उद्देश 'हिंदू हे राक्षस आहेत. मी नसतो तर त्यांनी मुसलमानांना खाऊन टाकले असते,' अशी स्वत:ची प्रतिमा मुस्लिम देशात निर्माण करणे हा होता. असे केल्याने मुस्लिम देश आपल्याला इस्लामरक्षक म्हणून मान्यता देतील असे त्यांना वाटत होते.

१९४० पर्यंत मुसलमानांच्या पुष्कळशा जमातींना हिंदू कायदा लागू होता. हिंदू मुसलमानांना समान नागरी कायदा लागू करण्याचा संविधानाचा आदेश आहे. असे असतानाही नेहरूंनी हिंदूसाठी वेगळा कायदा केला. मुसलमानांना भारतीय संसदेने पारित केलेला कायदा लागू केला तर मुस्लिम देश नाराज होतील असे नेहरूंनी दुर्गादास यांना सांगितले. म्हणजे मुस्लिम देशात आपली प्रतिमा काय असेल याची नेहरूंना मुख्यत: चिंता होती, भारताच्या हिताची नव्हती.



## अर्थकारण

आर्थिक क्षेत्राचा विचार केला तरी गांधी व नेहरू यांच्यामधला जमीन अस्मानचा फरक स्पष्ट होतो. स्वराज्य झाल्यावर लगेच गांधींनी नेहरूंना एक पत्र लिहून देशाच्या आर्थिक पुनर्घटनेबद्दल आपले विचार कळविले. त्यात मुख्य मुद्दा हा होता की, खेडी हे विकासाचे केंद्र असावे. कारण बहुतांश जनता खेड्यांमध्ये राहते. खेड्यामध्येच शेतीशी संबंधित असे उद्योगधंदे काढावे म्हणजे खेड्यातील लोकांना उद्योग शोधण्यासाठी शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. शिवाय शक्य तितके आपल्याला उपलब्ध असलेल्या साधनावरच अवलंबून रहावे म्हणजे आपण परकीयांचे मिंधे होणार नाही.

नेहरूंनी स्वत:च्या पद्धतीप्रमाणे हे विचार कुजके आहेत. नागरीकरण हे विकासाचे लक्षण आहे. मोठे उद्योगधंदे वाढविले पाहिजेत. आर्थिक योजना करताना साधनांचा विचार करण्याची जरूर नाही. देशाच्या आर्थिक विकासाच्या योजना करणे म्हणजे बनिया एखादे दुकान उघडताना जो व्यय व लाभ यांचा विचार करतो तसा विचार करणे नव्हे वगैरे विचार गांधींना सुनावले. हे सर्व मुद्दे नेहरूंच्या गांधींना दिलेल्या उत्तरातच आहेत असे नाही. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या भाषणात व त्यांच्या प्रेरणेने आखलेल्या योजनात ते स्पष्ट आहेत. नेहरूंचे हे विचार बहुधा लेनिन व स्टॅलिन यांच्या विचारांची पोपटपंची होती. रशिया हा मोठा विकसित देश आहे अशी नेहरूंची इतर अज्ञ भारतीयांप्रमाणेच समजूत होती.

परिणामत: भाकरा नांगल, पोलादाचा कारखाना वगैरेसारख्या योजना आखताना त्यांच्यावर खर्च किती होईल व त्याच्यापासून होणारा लाभ त्या खर्चापेक्षा जास्त असेल की नाही याचा विचार करण्यात आला नाही. आमच्या पोलादांच्या कारखान्यातील लोखंड सोन्यापेक्षा जास्त महाग म्हणून कारखान्यातच पडून राहू लागले. खेड्यातील लोक मोठ्या प्रमाणावर बेकार होऊन शहराकडे धाव घेऊ लागले व या साऱ्या शहरांना बकाल वस्त्यांचे स्वरूप आले. उघड्यावर घाण करण्याची पद्धत मुंबईसारख्या शहरात राजरोस दिसू लागली. परिणामत: नेहरूंच्या योजनामुळे १९४७ साली जो भारत मानवी विकासात जगातील देशात ३२ व्या क्रमांकावर होता तो नेहरूंच्या व नेहरूवादी सरकारांच्या कारकीर्दीत १४६ पर्यंत खाली घसरला. वाजपेयींच्या पूर्वी भारताचा क्रमांक पाकिस्तानच्याही खाली होता. बांगलादेश देखील बालमृत्यूंच्या बाबतीत भारतापेक्षा चांगल्या स्थितीत होता. नेहरू अधिकारावर आले तेव्हा भारताजवळ हजारो कोटी पौंडांची गंगाजळी होती. ती नेहरूंच्या योजनांनी नुसती

उधळली गेली. भारतात ३० टक्के लोक दरिद्रीरेषेखाली आले.

## विदेशनीती

नेहरूंची विदेशनीती गांधींच्या विचारांना कितपत धरून होती याचा विचार जरा कठिण आहे कारण, गांधींची विदेशनीती हा शब्दप्रयोग बरोबर नाही. गांधी हे कधीच भारताचे शासक नव्हते. ते प्रचलित शासकाविरुद्ध आंदोलन करणारे एक राजकीय नेते होते.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात नेहरू हे देखील राज्यकर्ते नव्हते. तरी पण आपण विदेशनीती आचरू शकतो असे त्यांना वाटे. ते दरवर्षी कॉंग्रेसच्या अधिवेशनात विदेशनीतीसंबंधी ठराव आणीत. स्पेनचे सरकार हिटलर व मुसोलिनी या फॅसिस्टाविरुद्ध व चीन, जपान या फॅसिस्ट राष्ट्राविरुद्ध लढत असल्यामुळे आपण त्यांना मदत केली पाहिजे असे विदेशनीतीबद्दलचे ठराव आणीत असत. कॉंग्रेसच्या हाती जर राज्य नाही तर कॉंग्रेस स्पेन व चीन यांना कशी मदत करणार? तर गव्हाची काही पोती पाठवून वा चार दोन डॉक्टर सैनिकांना औषधपाणी करायला पाठवून! गांधीसह कॉंग्रेसच्या सर्व पुढाऱ्यांना हा प्रकार बालिश वाटत होता. म्हणून नेहरूंच्या तोंडी न लागता ते नेहरूंचे सर्व प्रस्ताव वादाशिवाय पास करीत. कारण असले ठराव असून नसल्यासारखेच असतात. स्पेनला पोती व चीनला डॉक्टर पाठविण्याचे काम कॉंग्रेसच्या नावाने नेहरूच करणार! स्पेनला गव्हाची पोती पाठवण्याला वा चीनला डॉक्टर पाठविण्याला हिटलर मुसोलिनी वा जपान यांची हरकत नव्हती.

नेहरू स्वत:ला विदेशनीतीचे तज्ज्ञ समजत. त्यांच्या विदेशनीतीचे सूत्र कम्युनिस्ट देशांचा पाठपुरावा करणे हे होते. कारण नेहरू स्वत: कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य नसलेले कम्युनिस्ट होते. याबद्दल ज्यांना शंका असेल त्यांनी 'नेहरूवादांचे मूळ व विकास' हा सीताराम गोएल यांचा ग्रंथ वाचावा.

या उलट गांधींचे म्हणणे होते की, कॉंग्रेसने भारतीय स्वातंत्र्याला पाठिंबा मिळविण्यासाठी परदेशात प्रचार करणे देखील बंद करावे. आपल्याच देशात स्वातंत्र्याची मागणी फार प्रभावी नसल्यास आमच्या स्वातंत्र्यास पाठिंबा द्या म्हणून कोणत्या तोंडाने आपण इतरांना सांगायचे? इथे स्वातंत्र्याची चळवळ उग्र रूप धारण करील तेव्हा इतर देश तिकडे आपोआप लक्ष देतील. आपली चळवळ बलशाली करणे हेच आपले मुख्य लक्ष्य असले पाहिजे.

१९४२ साली ब्रिटिशांविरुद्ध निर्णायक उठाव करण्याचे गांधींनी ठरविले तेव्हा



नेहरू म्हणाले, 'आपण असा उठाव करू नये. कारण यावेळी रशिया हा ब्रिटिनचा मित्र आहे व ब्रिटिनविरुद्ध चळवळ करणे म्हणजे रशियाविरुद्ध चळवळ करणे होय.' गांधी व इतर सर्व कॉंग्रेस पुढाऱ्यांचे म्हणणे होते की रशिया स्वत:चे हित जोपासण्यास समर्थ आहे. आपण भारताचे हितसंबंध जपावे.

स्वराज्यानंतर म. गांधी अवघे सहा महिने जिवंत होते. या सहा महिन्यात विदेशनीतीचा कोणताही मुद्दा उपस्थित झाला नव्हता. पण ते मुद्दे उपस्थित झाले असते तर गांधींनी काय मत दिले असते हे स्पष्ट कळू शकते. गांधी सोडून इतर सर्व कॉंग्रेस पुढाऱ्यांचे जे मत होते तेच गांधींचे मत होते. हे मत सरदार पटेल यांच्या धोरणात व्यक्त झाले होते. हे प्रसंग असे. पाकिस्तानचे पंतप्रधान १९५० साली काश्मीरसंबंधी वाटाघाटी करायला आले होते तेव्हा नेहरूंनी काश्मीर पाकिस्तानला देऊन टाकायचे ठरविले होते असे नेहरूंचे स्तोत्रवजा चरित्र लिहिणारे गोपाल सांगतात. नेहरूंचा विचार बदलला कारण पाकिस्तानने अमेरिकेच्या कम्युनिस्टाविरोधी व्यूहात शिरून अमेरिकेकडून भरपूर सैनिक मदत घ्यायचे ठरविले. तेव्हा कम्युनिस्टांचा शत्रू तो आपला शत्रू म्हणून नेहरूंनी काश्मीरचे उदक पाकिस्तानच्या हातावर सोडण्याचा विचार रद्द केला. भारताचे हित हा नेहरूंच्या परराष्ट्रनीतीचा हेतू नसून कम्युनिस्ट देशांचे हित हा हेतू होता.

पुढे चीनच्या हातावर तिबेटचे उदक सोडणे, चीनला गुपचुप अक्साईचिन देऊन टाकणे वगैरे नेहरूंच्या कृत्यांचा उद्देशही कम्युनिस्ट चळवळीचा पाठपुरावा हेच होते.

'इंडोनेशियावर जपानने कब्जा करण्यापूर्वी तेथे आमचे राज्य होते' म्हणून इंडोनेशिया आपल्याला परत केला पाहिजे असे डच म्हणाले होते. त्यावर नेहरूंचे म्हणणे असे होते की इण्डोनेसियन लोक हे डच नाहीत. त्यामुळे 'तुमचे राज्य तेथे असले तरी तो साम्राज्यवाद आहे. आम्ही स्वराज्यवादी, साम्राज्यवाद मानत नाही. पण चीन जेव्हा म्हणाला की तिबेटवर इंग्रजी सत्ता होण्याच्या पूर्वी तिबेट आमचा होता म्हणून तो आम्हाला देऊन टाका.' तेव्हा नेहरू चीनला म्हणाले नाहीत की 'तिबेटी लोक हे चीनी नाहीत. तेव्हा कधीकाळी तुमची सत्ता तिबेटवर असली तरी ती आम्हाला मान्य नाही. आम्हाला तिबेटचा स्वयंनिर्णयाचा अधिकार मान्य आहे. डच व चीनी यांच्यात असा फरक करण्याचे कारण चीन कम्युनिस्ट झाला होता व नेहरूंच्या मते कम्युनिस्ट देशाचे आक्रमण हे आक्रमण नसून विमोचन असते. तिबेटची मागणी चीनसारख्या कम्युनिस्ट देशाकडून न येता जपानसारख्या फॅसिस्ट देशाकडून आली असती तर नेहरूंनी जे केले त्यापेक्षा वेगळेच वर्तन केले असते. शेवटी कम्युनिस्टांचाच जय होणार आहे व आपण

कम्युनिस्ट चळवळीचा फायदा करून दिला तर कम्युनिस्ट इतिहासात आपले नाव अजरामर होईल असे नेहरूंचे स्वप्न होते.

गांधी व नेहरू यातील मूलभूत फरक त्यांच्या भारताविषयींच्या दृष्टिकोनातून स्पष्ट दिसतो. नेहरू राजकारणाकडे आकृष्ट झाले ते कम्युनिझममुळे, भारताच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेमुळे नव्हे. पण विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात भारतातील कम्युनिझम भारतीय राष्ट्रीयत्वाच्या विरोधात उभा राहिला नव्हता. ब्रिटनची सत्ता साम्राज्यवादी आहे व कम्युनिझम साम्राज्यविरोधी आहे म्हणून भारतीय कम्युनिस्ट त्या काळी स्वराज्यवादीच होते. नेहरू काँग्रेस चळवळीत आपण सामील का झालो हे सांगताना ही चळवळ कम्युनिस्ट चळवळीला पोषक आहे असे कारण आपल्या आत्मचरित्रात देतात.

नेहरूंचा भारतीय राष्ट्रवादाबद्दलचा उत्साह माउंण्टबॅटन पतिपत्नींच्या सहवासात येतपर्यंत टिकला. त्यांच्या सहवासात आल्यावर त्यांना भारतीयत्वाचा हळूहळू द्वेष वाटू लागला. भारतावर राज्य करणारा मी शेवटचा इंग्रज आहे असे ते गॅल्ब्रेथला म्हणाले. या एका वाक्याने नेहरूंच्या सर्व धोरणांचा उलगडा होतो. भारताची हिंदू ही ओळख नष्ट करून त्याला इंग्रज बनविणे हे नेहरूंच्या पंतप्रधानी अवताराचे उद्दिष्ट होते. ख्रिस्ती धर्माबद्दल खुद्द इंग्रजांनाच फारसा उत्साह नसल्यामुळे भारताचे इंग्रजीकरण म्हणजे ख्रिस्तीकरण हे जे समीकरण १९ व्या शतकात होते ते नेहरूंचे नव्हते. भारतीय राष्ट्रीयत्व असे काही नाही ते मी आता घडविणार आहे म्हणजे माझ्या कल्पनेतला नवीन भारत इंग्रजीभाषी व डेलीवर्कर या ब्रिटनमधील कम्युनिस्ट मुखपत्राच्या दृष्टिकोनातले कम्युनिस्ट राष्ट्र राहील हे उद्दिष्ट त्यांनी डोळ्यासमोर ठेवले होते.

असे करण्यास हिंदुत्व हा सगळ्यात मोठा अडथळा आहे म्हणून नेहरूंनी हिंदुत्वावर डूख धरला. हिंदूंच्या चालीरीती व मुख्यत: भाषा नष्ट केल्या पाहिजेत हे त्यांनी उद्दिष्ट ठेवले. भाषा नष्ट न करता आल्या तरी त्यांना निष्प्रभ करता येईल व सुशिक्षितांची व सत्ताधीशांची एकमात्र भाषा म्हणून इंग्रजीचे महत्त्व वाढविले की भारत हा इंग्रजी देश होऊ शकेल.

■ ■ ■





# नेहरूनंतरचा नेहरूवाद

## लालबहादूर शास्त्री

नेहरू जिवंत असतानाच त्यांनी आपले पुष्कळसे काम लाल बहादूर शास्त्री यांच्यावर सोपविले होते. त्यामुळे काँग्रेसने नेहरूनंतर लगेच लालबहादूर शास्त्रींना पंतप्रधान केले. शास्त्री नेहरूवादी नव्हते अशी सार्वत्रिक समजूत आहे. याचे कारण असे की पाकिस्तानशी असलेले वाद कायमचे मिटविण्यासाठी त्यांनी पाकिस्तानविरुद्ध लष्करी कारवाई केली. अशी कारवाई नेहरूंनी कधीच केली नसती अशी साधार समजूत आहे. पण असे करण्यात आपण नेहरूंच्या तत्त्वाविरुद्ध काही करीत आहोत असे शास्त्रींना वाटले नाही. कारण काश्मीरवर हल्ला झाला तर तो हल्ला भारतावर झालेला आहे असे समजण्यात येऊन त्या अनुसार कारवाई करण्यात येईल असे नेहरूंनी लोकसभेत सांगितले होते. शास्त्रींनी शेख अब्दुल्लाला पकडले तसे नेहरूंनी देखील पकडले होते. अयुब खानने कच्छच्या भागात भारतावर आक्रमण केले त्यावेळी आमच्यावर असे आक्रमण झाले तर आम्ही वाटेल त्या स्थानाहून पाकिस्तानवर हल्ला करू असे शास्त्री त्याच वेळी म्हणाले होते. काश्मीरवर हल्ला झाला तर भारतावरच हल्ला झाला असे गृहीत धरून पाकिस्तानविरुद्ध कारवाई केली जाईल असे नेहरू म्हणाले होते. पण त्यांनी

खरोखरच असे केले असते असे मला वाटत नाही. शास्त्रींना तसे वाटत नव्हते.

शास्त्रींनी लाहोरवर हल्ला करण्यास जनरल चौधरींना अनुमती दिली होती तरी त्यांची इतर अनेक कृत्ये ते पक्के नेहरूवादी होते हेच सुचवितात. त्यांना काश्मीरची कटकट कायम ठेवणारे ३७० कलम सहज रद्द करता आले असते. पण त्यांनी तसे केले नाही. कारण हे कलम हे नेहरूंचे खास अपत्य होते.

शास्त्री पक्के नेहरूवादी होते असे दाखविणारे त्यांचे एक कृत्य म्हणजे श्रीलंकेशी त्यांनी भारतमूल श्रीलंकावासीयांबद्दल केलेला करार. या करारानुसार त्यांनी श्रीलंकेत १०० वर्षापूर्वी गेलेल्या भारतीयांना परत भारतात घेण्याचे कबूल केले. वस्तुत: श्रीलंकेतले इतरही रहिवासी मूलत: भारतवासी आहेत. पण श्रीलंकेतील सत्ताधारी वर्ग मुख्यत: बिहारातून आलेला आहे व तो तमिळांना विदेशी समजतो. शंभर वर्षापूर्वी भारतातून श्रीलंकेत वसलेले लोक वस्तुत: लंकावासीच आहेत व त्यांना काढून देण्याचा श्रीलंकेच्या सरकारला काही अधिकार नाही. भारतात शंभर वर्षापूर्वी आलेल्या लोकांना तर सोडाच, पाकिस्तानातून आलेल्या घुसखोरांना देखील परत पाकिस्तानात पाठविले पाहिजे असे शास्त्रींच्या मनात कधी आले होते काय? जगातल्या केवळ निर्वासितांनाच नव्हे तर घुसखोरांना देखील पोसण्याचा मक्ता भारताने घेतला आहे. भारतीयांना मात्र भारताच्या बाहेर कोठेही आसरा असण्याची जरूर नाही असे नेहरूप्रमाणेच शास्त्रीचेही मत होते. स्वातंत्र्यापूर्वी एकदा सर्व देशांनी हाकललेल्या ज्यू लोकांना भारतात वसवावे अशी सूचना नेहरूंनी केली होती. पण जनरल करिअप्पा आस्ट्रेलिया भारताचे उच्चायुक्त म्हणून गेले असता त्यांनी ''ऑस्ट्रेलियासारखे देश विस्तृत भूभाग व तोटकी लोकसंख्या असताना देखील अति लोकसंख्या व त्या मानाने कमी प्रदेश असलेल्या भारतीयांना आपल्या देशात वसू देण्यास नाखूष आहेत ही गोष्ट शोचनीय आहे,'' असे मत व्यक्त केल्याबद्दल त्यांना नेहरूंनी परत बोलावले.

## भुशाची दुर्गा

शास्त्रीनंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. त्या नेहरूंपेक्षा वेगळ्या वागतील अशी अपेक्षाच नव्हती. पण त्यांच्या कारकीर्दीत एक घटना अशी घडली की ज्या संघाला नेस्तनाबूत करण्याचा इंदिरा गांधींनी प्रयत्न केला, त्या संघाचे प्रमुख देखील त्या घटनेने इतके भारावून गेलेले आहेत की इंदिरा गांधी या वाजपेयींपेक्षा श्रेष्ठ अशा पंतप्रधान होत्या असे ते बोलून गेले. याचा अर्थ असा होतो की संघाने आपल्या अस्तित्वाने देशाचे जेवढे भले केले त्यापेक्षा या घटनेने देशाचे इतके मोठे भले केले की



कित्येक संघ तिच्यावरून ओवाळून टाकावे. ही एवढी लोकोत्तर घटना कोणती होती म्हणाल तर बंगलादेश युद्ध. या युद्धात भारताने पूर्व पाकिस्तानचा पराभव केला ही एक फारच मोठी उपलब्धी आहे असे मत संघात प्रचलित आहे. त्यामुळे या घटनेची चर्चा करणे आवश्यक आहे.

## या घटना अशा

भारतीय फौजांनी हल्लीचा बंगलादेश म्हणजे पूर्वीचा पूर्व पाकिस्तान व्यापला व पाकिस्तानची ९०००० फौज कैद केली. पण लगेच भारतीय फौज काढून घेण्यात आली व पाकिस्तानपासून स्वतंत्र असा बंगलादेश मान्य करण्यात आला. पाकिस्तानशी झालेल्या तहात हे ९०००० कैदी सोडण्यात आले. पाकिस्तानने छांब काबीज केला तो मात्र अजून पाकिस्तानकडेच आहे.

या युद्धात भारताने काय मिळविले? पाकिस्तानचा जिंकलेला सर्वच प्रदेश सोडण्यात आला. काश्मीरमध्ये दोन्ही फौजांची ताजी स्थिती कायम ठेवण्यात आली. यात भारताकडे आलेला प्रदेश भारताच्या काश्मीरवर ताबा मिळविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा नव्हता. उलट भारत व काश्मीर यांना जोडणारा जो एक निमुळता पट्टा आहे त्यातील मोक्याचा छांब प्रदेश भारताला सोडावा लागला. त्याचे रक्षण करण्यासाठी भारताने ५०००० सैन्य उतरविले होते. म्हणजे पश्चिम आघाडीवर पाकिस्तानने ५०००० भारतीय सैन्याचा पराभव केला.

ही लढाई पश्चिम पाकिस्तानातून आलेले शरणार्थी परत पाकिस्तानात पाठविण्यासाठी व यापुढे तेथून कोणतेही शरणार्थी येऊ नयेत म्हणून लढली गेली असे अधिकृतरीत्या सांगण्यात आले होते. एकूण ८५ लाख हिंदू मार्च ते नोव्हेंबर १९७१ या कालात आले. ते सर्व लढाई जिंकल्यानंतर परत पाठविण्यात आले असे सांगण्यात आले. पण या ८५ लक्षांपैकी निदान तीस लक्ष बंगलादेशात पोचले नाहीत असे या प्रकरणाचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या लेखकांचे म्हणणे आहे. (Organizer ८/५/२००५) हिंदू शरणार्थी सुखासुखी पाकिस्तानात परत जाण्यास तयार होणार नाहीत हे लक्षात घेता या संख्येवर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. चंद्रपूरच्या आसमंतात तेथील शिबिरात राहिलेले बंगलादेशी हिंदू कायमची वस्ती करून राहिलेले सहज दिसतात. तेव्हा आलेले शरणार्थी परत जावेत हा युद्धाचा मुख्य उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही. शरणार्थी पुढे येणे बंद व्हावे हा उद्देश तर सफल होणे दूरच : उलट शीतांशु गुहा या लेखकाने सांगितले आहे की, उरलेले २ कोटी हिंदू देखील

हळूहळू भारतात हाकलले जात आहेत. (My People Uprooted by Tathagata Ray (Organizer ८/५/२००५)) शरणार्थींबरोबरच मुसलमान घुसखोर येणे नेहरूकाळातच सुरू झाले होते ते आता कोटींच्या संख्येने येऊ लागले आहेत.

तात्पर्य या विजयामुळे पाकिस्तानला भारताची जरब बसेल असे काही घडले नाही. पूर्व पाकिस्तानमध्ये पाकिस्तानी फौजेचा पराभव केला ही गोष्ट सुखावह असली तरी या लढाईत भारताचे सैनिक श्रेष्ठत्व पश्चिम आघाडी लक्षात घेता सिद्ध झालेले नाही. पाकिस्तान या युद्धात आपला पराभव झाल्याची खंत बाळगतो कारण या युद्धाने पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. पण या तुकड्यातला कोणताही तुकडा भारताला मिळाला नाही. बरे ज्या बंगलादेशासाठी भारतीय जवानांनी प्राण दिले तो बांगलादेश तरी भारताला आपला मित्र मानतो काय? बंगलादेश मुक्त झाल्यावर काही काळ जेमतेम 'सेक्युलर' होता. पण लगेच त्याने आपले मुस्लिम राज्य असल्याचे जाहीर केले व हिंदूंची हकालपट्टी करणे सुरूच ठेवले एवढेच नव्हे तर कोट्यवधी मुसलमान घुसखोर भारतात पाठवले. चीनशी सैनिक तह केला. पूर्वी पाकिस्तानचे फारच थोडे सैन्य पूर्व पाकिस्तानात असे व पूर्व पाकिस्तान भारताला सैनिक धोका निर्माण करण्याच्या परिस्थितीत कधीच नव्हता. पण आता चीनच्या मदतीने बंगलादेश पाकिस्तान इतकाच प्रबल झाला आहे. म्हणजे आता पूर्व व पश्चिम या दोन्ही सरहद्दीवर प्रबल शत्रुराष्ट्रे राज्य करीत आहेत.

मग हजारो जवानांचे प्राण व कोट्यवधी रुपये खर्चून भारताने काय मिळविले? पूर्व पाकिस्तानचा पराभव केल्याबद्दल आत्मसंतुष्टता! पण ही आत्मसंतुष्टता छांबच्या रणक्षेत्रातील पराभवाचे अज्ञान वा त्याकडे बुद्धिपुरस्सर डोळेझाक यावर आधारलेली आहे हे लक्षात घेतले की नाहीशी व्हायला वेळ लागत नाही.

श्री. मा. गो. वैद्य हे संघाचे एक प्रमुख नेते बंगलादेशयुद्धाने भारताचा काहीच फायदा झाला नाही याचे स्पष्टीकरण असे देतात की, आपण पराभूत झालो या भावनेने पाकिस्तानी दु:खित होऊ नयेत अशी इंदिरा गांधी काळजी घेत होत्या. इंदिरा गांधी केवढ्या कनवाळू होत्या याचा अनुभव वैद्यांना आणिबाणीच्या वेळी आलाच होता. अर्थात नेहरूप्रमाणेच त्यांचा कनवाळूपणा शत्रूसाठी राखून ठेवलेला होता असे मानले पाहिजे. पण शत्रूबद्दल एवढा कळवळा होता तर रशियाची मदत घेऊन त्याला हरवण्याचा खटाटोप तरी कशाला केला? बंगलादेश हातचा गेला व ९०००० फौज कैद झाली यामुळे पाकिस्तानी दु:खित झाले नाहीत काय?

सिमला कराराच्या बोलण्यात सुरवातीला रशियन मुत्सद्यांनी लक्ष घातले नव्हते



म्हणून बोलणी पुढे सरकत नव्हती. रशियन मुत्सद्यांनी दडपण आणल्यामुळे ती लवकर संपली असे त्यावेळी वृत्त होते. लढाईच्या सूत्राप्रमाणेच तहाची सूत्रे देखील रशियाच हलवीत होता. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. सैनिक सहाय्य देणाऱ्या शक्तीचा तहाच्या व्यवहारात हात असतोच.

बरे हे युद्ध जिंकल्यानंतर 'कनवाळू' इंदिरा गांधींनी तहाच्या वाटाघाटीची सर्व सूत्रे वैद्यांच्या हाती दिली असती तर वैद्यांनी काय केले असते? ''काश्मीरवरचा आपला हक्क सोडा. सर्व हिंदू शरणार्थी व मुस्लिम घुसखोर परत घ्या नाहीतर....?''

या नाहीतरच्या पुढे वैद्य म्हणाले असते, ''आम्ही तुमचे ९०००० कैदी परत करणार नाही.'' आपण क्षणभर गृहीत धरू की ''कैदी परत न करण्याचा आग्रह सोडा,'' असा रशियाचा आदेश आला नसता. तरी काय? पाकिस्तान म्हणाले असते, ''ठेवा हे ९०००० पाहुणे तुम्हीच. त्यांना तुम्हाला जिनीव्हा कराराप्रमाणे वागवावे लागेल व तसे तुम्ही करता की नाही हे पाहण्यासाठी संयुक्त राष्ट्रे वेळोवेळी आपले पर्यवेक्षक पाठवतील. तुम्ही या अति महत्त्वाच्या अतिथींना खुशाल वाटेल तितके दिवस पोसत बसा.''

तात्पर्य या युद्धानंतर पाकिस्तानला बाध्य करण्यास समर्थ असे काहीच आमच्या हाती लागले नव्हते. वैद्य म्हणतील, मी पाकिस्तानकडून हिसकलेला भाग त्यांना परत केला नसता. असे म्हणण्यात रशियाच्या मदतीशिवाय आम्ही हे युद्ध जेवढे जिंकले तेवढे जिंकू शकलो असतो असे गृहीत धरले आहे. विश्वकोशासारख्या सरकारी प्रकाशनाने देखील स्पष्ट म्हटले आहे की, या युद्धात रशियाने शस्त्रास्त्रांचा अखंड पुरवठा केल्यामुळे हे युद्ध जिंकता आले. शस्त्रास्त्रांच्या अखंड पुरवठ्या बरोबरच चीनने हस्तक्षेप करू नये म्हणून चीनला तंबी फक्त रशियाच देऊ शकत होता व त्या शिवाय हे युद्ध जिंकता आले नसते. रशियाच्या अंदाजाप्रमाणे हे युद्ध १० दिवसात संपायला पाहिजे होते. पण ते संपले नाही. तेव्हा रशियन सेनापती दिल्लीत ठाण मांडून बसले. त्यांनी काय केले हे जाहीर झालेले नाही. पण युद्ध १० नाही तर तेरा दिवसात संपावे असा प्रयत्न करायलाच ते आले होते यात संशय नाही. युद्ध लवकर संपविण्यास आवश्यक असलेली मदत त्यांनी केली असली पाहिजे यात संशय नाही. युद्धाच्या शेवटच्या दिवसात अमेरिकन आण्विक युद्धनौका बंगलादेशजवळ पोचली होती. तिच्यावर काटशह म्हणून रशियाने देखील आपली त्या तोडीची युद्धनौका तेथे नेली. भारताला पश्चिम पाकिस्तानमधील चढाईपासून रोकणे हा अमेरिकन युद्धनौका पाठविण्याचा उद्देश होता असे निक्सन कागदपत्रात विधान आहे. (हितवाद ९/५/२००५) ही नौका

सिंधुसागरात न पाठवता बंगालच्या उपसागरात पाठविण्याचा हेतू काय? मला वाटते ९०००० कैद्यांना परत पाकिस्तानात घेऊन जाण्यासाठी ही नौका आली होती पण हे कैदी समुद्रकाठापर्यंत पोचूच शकले नाहीत म्हणून ही योजना बारगळली. अमेरिकन युद्धनौका आपल्या मदतीस येत आहे असे पाकिस्तानी शिपायांचे संभाषण भारतीय दूरसंपर्काने टिपले होते.

तात्पर्य चीन व अमेरिका यांना रोकण्याचे काम रशियाने केले व शिवाय अत्यावश्यक शस्त्रास्त्रे व माहिती पुरविली. मग अशा परिस्थितीत आम्ही काय करावे हे सांगण्याचा तुम्हाला अधिकार नाही,'' असे वैद्य म्हणू शकले असते काय? युद्ध जिंकून काहीच निष्पन्न झाले नाही. याचे कारण इंदिरा गांधींच्या कल्पित उदारतेत शोधण्याचे काही कारण नाही. वस्तुत: आम्ही युद्ध जिंकले असे म्हणण्यासारखे जेत्याचे कोणतेच सामर्थ्य आम्हाला प्राप्त झाले नव्हते. शत्रूचे तोंड उघडण्यासाठी त्याचे नाक दाबावे हा प्रयोग करण्यास शत्रूचे नाक आमच्या हातात आलेच नव्हते.

या सगळ्या युद्धाचा बोलविता धनी रशिया होता हे उघड आहे. पंतप्रधान झाल्यावर इंदिरा गांधींनी कामराजला डावलून रशियाच्या प्रतिनिधींना आपला सल्लागार बनविले होते. हे कामराजच्या मताच्या विरुद्ध त्यांनी रशियाच्या सल्ल्यावरून रुपयाचे अवमूल्यन करण्यास अनुमती दिली यावरून स्पष्ट आहे. ताश्कंद कराराने रशियाला भारत व पाक यांच्यात सलोखा नांदविण्याचे काम करण्याचा अधिकार मिळाला होताच. शिवाय आपल्याशी वैर केल्याने पाकिस्तानचे नुकसानच होणार आहे हे पाकिस्तानला दाखवून देण्याची संधी रशियाला हवी होती. त्यामुळे हिंदू व स्वतंत्र बंगलादेशवादी मुसलमान असे दोन्ही मिळून एक कोटी शरणार्थींचा लोंढा आला तेव्हा रशियन मुत्सद्यांनी याविरुद्ध कारवाई करण्याची सूचना इंदिरा गांधींना दिली असली पाहिजे. ज्या स्त्रीला तीन कोटी घुसखोर भारतात आल्याने काहीच बिघडत नाही असे वाटत होते तिला एक कोटी शरणार्थी आले म्हणून युद्ध करण्याची बुद्धी होईल याचा संभव नगण्य आहे.

रशियाने याह्याखानांना पत्र लिहून पूर्व पाकिस्तानचे पुढारी मुजीबुर रहमान यांच्याशी समझौता करण्यास सांगितले होते. यावर याह्याखानांनी ''हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे,'' असे म्हटल्यावर रशियाने आपल्या उत्तरात ''याचे परिणाम गंभीर होतील,'' असे लिहिले. ''पाकिस्तानला युद्धाला तोंड द्यावे लागेल,'' असा याचा अर्थ होता. म्हणजे युद्धाचा प्रवर्तक कोण?

युद्ध जिंकण्यासाठी आवश्यक ती माहिती रशियाने पुरविली हे पाकिस्तानची



गाझी ही पाणबुडी समुद्राची योग्य माहिती नसल्यामुळे बुडाली व आमची कोणतीच पाणबुडी तशी बुडाली नाही यावरून स्पष्ट आहे. समुद्राची परिस्थिती कळण्यास त्याची सतत पाहणी करावी लागते तशी पाहणी रशिया करीत असे व तिचे तपशील त्याच्या ज़वळ होते. ते आम्हाला उपलब्ध करून देण्यात आले. पाकिस्तानला असे तपशील कोणी उपलब्ध करून दिले नाहीत. पश्चिम पाकिस्तानला हात न लावता बंगलादेशच्या प्रश्न सोडविण्यास अमेरिकेची देखील संमती होती. ''पूर्व पाकिस्तानातील पाकिस्तानी फौजेने जास्त आढेवेढे न घेता शरण जावे,'' असा अमेरिकेने सल्ला दिला होता असे निक्सन कागदपत्रात नमूद आहे. ताश्कंद करार देखील अमेरिकेच्या सम्मतीने झाला होता. तसे नसते तर ''भारताचा मित्र रशिया भारत व पाकिस्तान यांच्या भांडणात नि:पक्षपाती राहणार नाही म्हणून पाकिस्तानने ताश्कंदला जाऊ नये,'' असा अमेरिकेने पाकिस्तानला सल्ला दिला असता. ताश्कंद कराराला अमेरिकेची संमती होती व ताश्कंद कराराचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी रशियाने घेतली होती. त्यामुळे भारत/पाक भांडणात बोलण्याचा अधिकार रशियाला प्राप्त झाला होता. रशियाने पश्चिम पाकिस्तानच्या अभंगतेची हमी अमेरिकेला दिली होती. अर्थात भारत पश्चिम पाकिस्तान काबीज करील असे काही रशियाने घडू दिले नसते. मग भारत पश्चिम पाकिस्तानचा निर्णायक पराभव करू शकेल हे कसे शक्य होते?

हे युद्ध घडवून आणण्यात रशियाचा हेतू काय होता हे युद्धविरामानंतर लगेच उघड झाले. रशियाने पाकिस्तानपुढे असा प्रस्ताव मांडला की, ''भारताने जसा आमच्याशी सैनिक तह केला आहे, तसाच तुम्ही करावा म्हणजे भारताचे जसे आम्ही कल्याण केले तसेच तुमचेही होईल.'' हा प्रस्ताव पाकिस्तानने मान्य केला असता तर अमेरिकेने त्याला आपल्या सैनिक व्यूहातून काढून दिले असते. हे युद्ध घडवून आणण्यात रशियाचा हाच उद्देश होता. युद्धातील घटनांनी अमेरिका आपल्याला भारतापासून वाचवू शकेल याबद्दल पाकिस्तानच्या मनात शंका उत्पन्न होण्याचा संभव होता व त्यामुळे अमेरिकेशी दोस्ती करण्यात आपला काय फायदा आहे याचा पुनर्विचार पाकिस्तानात सुरू झाला असता. या उद्देशाच्या पूर्तीसाठी रशियाने इंदिरा गांधींचा वापर केला. अमेरिकेशी दोस्ती करून आपच्याशी वैर संपादणे पाकिस्तानला महागात पडणारे आहे याचे प्रात्यक्षिक रशियाने करून दाखविले. व ते साधल्यावर इंदिरा गांधींचा त्याला काही उपयोग नव्हता म्हणून भारताचा पंतप्रधान जणू अस्तित्वातच नाही अशा आविर्भावाने सिमला करार घडवून आणला.

यानंतर रशियाचे धोरण अधिक आक्रमक झाले व त्याने अफगाणिस्तानवर

कब्जा केला. पाकिस्तानचा नाश करण्याचा देखील रशियाचा हेतू होता हे पुढील घटनेवरून सिद्ध होते.

मुरारजी सरकार पडल्यावर इंदिरा गांधी पुन: पंतप्रधान झाल्या. तेव्हा रशियन मुत्सद्दी त्यांच्या भेटीस आले. त्यावेळी मुरारजी देसाईंनी खालील जाहीर निवेदन केले.

"रशियन मुत्सद्दी मला एका सापळ्यात गुंतविण्याचा प्रयत्न करीत होते. मी पंतप्रधान असताना त्यांनी माझ्यासमोर असा प्रस्ताव मांडला होता की, रशियाच्या सर्व तऱ्हेच्या मदतीने भारताने पाकिस्तान नष्ट करावे व सिंध आणि पंजाब हे प्रांत स्वत: ठेवून सीमाप्रांत व बलूचीस्तान रशियाला द्यावा. मी हा प्रस्ताव साफ नाकारला. म्हणून आता ते इंदिरा गांधींच्या मार्फत आपला कार्यभाग साधू इच्छीत आहेत."

रशियाचा प्रस्ताव नाकारण्याचे कारण मुरारजींनी सांगितले नाही पण ते त्याच्या विचारपद्धतीवरून स्पष्ट आहे. पाकिस्तानचा नाश केल्याने हिंदू-मुस्लिम प्रश्न सुटणार नाही. कारण सिंध व पाकिस्तानी पंजाब भारतात आल्यामुळे भारतातील मुसलमानांची संख्या दुप्पट होऊन भारताचे राज्य सुरळीत चालणे देखील कठिण होईल. मुरारजींनी हा प्रस्ताव नाकारण्याचे दुसरे कारणही स्पष्ट आहे. ही योजना सफल होण्यासाठी एका आठवड्यात पाकिस्तान हस्तगत झाले पाहिजे. नाहीतर युद्ध लांबून चीन व अमेरिका पाकिस्तानच्या बाजूने युद्धात उतरणार यात शंका नव्हती. नुकतेच अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटने प्रकाशित केलेल्या जुन्या कागदपत्रात असा उल्लेख आहे की, "१९७१ च्या युद्धात भारताने पश्चिम पाकिस्तान नष्ट करण्याच्या प्रयत्न केला म्हणून जर चीन पाकिस्तानच्या मदतीस गेला व या कारणासाठी रशियाने त्यावर आक्रमण केले तर अमेरिका चीनच्या मदतीला येईल." असे अमेरिकन अध्यक्ष निक्सन यांनी चीनला कळविले होते. ७१ च्या मर्यादित युद्धातच जर अमेरिका पश्चिम पाकिस्तानच्या रक्षणाबद्दल एवढी जागरूक होती तर पश्चिम पाकिस्तान नष्ट करण्यासाठी भारताने त्यावर चढाई केली असती तर चीन व अमेरिका यांच्या संयुक्त सामर्थ्याला त्याला तोंड द्यावे लागले असते हे निश्चित.

मुरारजींनी हा गौप्यस्फोट केल्यावर अर्थात रशियाची योजना बारगळली. गुप्तता हीच अशा योजनांच्या सफलतेची मुख्य आवश्यकता असते. तीच मुरारजींनी अशक्य केल्यावर योजनेचे वाटोळे होणार हे स्पष्ट होते.

मुरारजींच्या या गौप्यस्फोटाने पाकिस्तानचे सर्वेसर्वा झिया उल हे मुरारजींवर इतके खुश झाले की त्यांनी पाकिस्तानचा सर्वोच्च बहुमान "निशाणे पाकिस्तान" मुरारजींना दिला.



१९७७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधी पडल्या नसत्या तर १९७१ च्या युद्धाचा हा पुढचा अंक खेळला गेला असता. तो यशस्वी होण्याचा संभव कमी होता. अपेशी झाल्यास भारतावर अमेरिका व चीन या दुहेरी आपत्ती कोसळल्या असत्या. यशस्वी झाल्यासही त्यामुळे भारतातील 'सेक्युलर' प्रवाहांना अधिकच बळकटी मिळून भारतात आजच्या इतके सुद्धा ऐक्य राहण्याचा संभव नव्हता. मुस्लिम समस्या सोडविणे म्हणजे भारतीय मुस्लिमांना भारतीय राष्ट्रीयत्वात आत्मसात करणे, पाकिस्तानी मुसलमानांवर राज्य केल्याने हा प्रश्न सुटणारा नाही.

मुरारजींच्या गौप्यस्फोटावरून १९७१ हे युद्ध रशियाच्या प्रेरणेने झाले याबद्दल शंका उरू नये. ताश्कंद व बंगलादेशयुद्ध यांनी पाकिस्तानला रशिया आपले हितसंबंध जोपासूनच भारताशी मैत्री करतो हे कळून यायला पाहिजे होते. ते कळून आले नाही व पाकिस्तान हा अमेरिकेशी झालेल्या कोणत्याही युद्धात अमेरिकेचा तळ होणार हे निश्चित होते. एका आठवड्यात पाकिस्तानचा घास गिळता आला तर अमेरिका तो ओकायला लावणार नाही असे अफगाणिस्तानच्या अनुभवावरून रशियाचे मत झाले होते. इंदिरा गांधी ऐवजी दुसरा पंतप्रधान आपले म्हणणे ऐकणार नाही हे ओळखून इंदिरा गांधींचे बहुमत नाहीसे झाले तेव्हा रशियाने कम्युनिस्टांच्या मदतीने ते टिकवून धरले. मुरारजींच्या विरुद्ध कम्युनिस्ट एकजूट झाले होते याचे कारणही रशियाचा प्रभाव हे स्पष्ट आहे. इंदिरा गांधींचे कोणतेच निर्णय त्यांचे स्वत:चे नव्हते तेव्हा आपल्यावर एवढे उपकार करणाऱ्या रशियाचा प्रस्ताव त्यांनी धुडकावून लावला नसता.

इंदिरा गांधी ७७ च्या पराभवानंतर पुन: सत्तेवर आल्या. त्यावेळी त्यांनी केलेल्या वक्तव्यावरून ७१ चे युद्ध त्यांनी योजलेले नव्हते याबद्दल कुणाला शंका वाटायला नको. बंगला देशातून मोठ्या संख्येने घुसखोर येतात याविरुद्ध आसाम प्रांतात मोठी चळवळ झाली होती तिच्यावर इंदिरा गांधींनी "घुसखोर आल्याने काय बिघडते?" असा सवाल केला होता. ज्या स्त्रीला कोट्यवधी संख्येने घुसखोर आलेले चालतात ती काही लाख हिंदू निर्वासित आले म्हणून युद्धाचा आंतरराष्ट्रीय व्यूह रचील काय?

दुसरे असे की पूर्व पाकिस्तानातून आलेले हिंदू शरणार्थी परत जावेत व पुढे शरणार्थी येणे कायमचे बंद व्हावे हा इंदिरा गांधींचा एवढा मोठा व्यूह रचण्यात उद्देश असता तर त्यांनी ३० लाख शरणार्थी परत गेले नाहीत व नवे शरणार्थी येणे बंद झाले नाही याबद्दल काहीच खंत कशी बाळगली नाही?

रशियाची मदत घेऊन पाकिस्तान नष्ट करण्यास नेहरू तयार झाले असते असे काही लोक समजतात. कारण नेहरू कम्युनिस्ट विचारांचे होते. पण नेहरूंच्या विचारात

कम्युनिझमचे स्थान दुय्यम होते. त्यांच्या पंतप्रधानकीचे ध्येय जगाचे पुढारी होणे हे होते. रशियाच्या एका मित्र राष्ट्राचा प्रमुख हे स्थान त्यांना क्षुद्र वाटत होते.

## लोकशाहीचा खग्रास

इंदिरा गांधी ज्याबद्दल प्रसिद्ध आहेत असे त्यांचे दुसरे कृत्य म्हणजे आणिबाणी. नेहरूंनी आणिबाणी लावली असती काय? व नसती तर इंदिरा गांधींचे हे कृत्य नेहरूवादास धरून नव्हते असे म्हणता येईल काय?

नेहरू व इंदिरा गांधी यांच्या स्वभावधर्मावर प्रकाश टाकण्यासाठी ही चर्चा आवश्यक आहे. पण ती तर्कात्मक असणार. अमुक परिस्थितीत आपण कसे वागू हे आपल्यालाच निश्चित सांगता येत नाही तर दुसरी एखादी व्यक्ती कशी वागली असती हे निश्चितपणे सांगणे कठिण असणारच. पण याचा अंदाज बांधणे अशक्य नाही. इंदिरा गांधींचे निर्णय त्यांचे स्वत:चे नसत उलट नेहरूंचे निर्णय त्यांचे स्वत:चेच असत. इंदिरा गांधींना आणिबाणी लावण्यास ज्या संजय गांधीने प्रवृत्त केले, त्याचा स्वभाव या बाबतीत नेहरूसारखाच होता. भारताची सत्ता नेहमी आपल्या व आपल्या वंशाच्या ताब्यात राहिली पाहिजे असा संजय गांधीप्रमाणेच नेहरूंचा निर्धार होता. केरलचे सरकार आपल्या ताब्यातल्या लोकांचे सरकार नाही म्हणून नेहरूंनी बरखास्त केले. सरदार पटेलांच्या वेळी कदाचित आपल्या हाती नेहमीच सत्ता राहणार नाही असे नेहरूंना वाटत होते. कारण सरदार पटेलांचे काँग्रेसमध्ये बहुमत होते. तसेच ''आपली धोरणे देशाच्या इतर सर्व पुढाऱ्यापेक्षा वेगळी आहेत. संघाची धोरणे भारतीय जनतेच्या आकांक्षांच्या अधिक जवळ आहेत व त्यामुळे संघवाले काँग्रेसवाल्यांना आपल्यापेक्षा जास्त जवळचे वाटतात. भारताची सत्ता आपल्या हयातीतच संघाचे सहप्रवासी काँग्रेसजन वा खुद्द संघवालेच बळकावतील,'' अशी भीती नेहरूंनी एकदा वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यासमोर व्यक्त केली होती. ''उद्या कम्युनिस्ट सत्तेवर येतील,'' असे एक सरकारी उच्चाधिकारी म्हणाला तेव्हा नेहरूंनी ही शक्यता धुडकावून लावली व संघवाले सत्तेवर येतील असे भाकित वर्तविले होते (गोपाल). पण संघ असो की कम्युनिस्ट असोत एवढेच नव्हे तर काँग्रेसचा दुसरा कोणताही पुढारी असो तो सत्तेवर आला तर आपण भारतात रहायचे नाही असे विचार नेहरूंच्या डोक्यात घोळत होते असे डॉ. ना. भा. खरे म्हणत. डॉ. खरे नेहरूंचे निंदक होते म्हणून त्यांचे म्हणणे विश्वासार्ह नाही असे म्हणणे शक्य आहे. पण त्यांचा नेहरूंच्या निकटवर्ती लोकांशी व खुद्द नेहरूंशी परिचय होता व त्यामुळे ते जे म्हणत ते निराधार मानूनच चालले पाहिजे असा आग्रह



समर्थनीय होणार नाही. डॉ. खरे यांनी गांधीबद्दल गरळ ओकले पण त्यात कोणतीही कपोलकल्पित घटना वर्णिलेली नाही. सत्ताहीन झाल्यावर नेहरूंना भारतात रहावेसे वाटले नसते असे मानणे केवळ हवेत बोलण्यासारखे नाही. स्वित्झरलँडमध्ये राहण्याचे त्यांचे विचार सुरू होते व आझाद हिंद फौजेचे जवाहिर ताब्यात घेणे वगैरे त्यांची कृत्ये याच उद्देशाने केलेली होती असा अंदाज बांधता येतो.

सत्तेशिवाय केवळ विरोधी पक्षाच्या भूमिकेत राहायचे नाही अशीच नेहरूंप्रमाणेच इंदिरा गांधींचीही वृत्ती होती व त्यामुळे आणिबाणी घोषित करण्याचा निर्णय नेहरूंना शोभण्यासारखाच होता.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जगमोहन सिन्हा यांनी इंदिरा गांधींनी निवडणुकीच्या कामासाठी सरकारी नोकराचा उपयोग केला म्हणून त्यांना सहा वर्षासाठी निवडणुकीला उभे राहण्यास बंदी केली. तेव्हा इंदिरा गांधींनी राष्ट्रपतींच्या करवी आणिबाणी जाहीर करून संविधान स्थगित करविले व साऱ्या विरोधी पक्षीयांना तुरुंगात टाकले. त्यानंतर विरोधीपक्ष नसलेल्या संसदेत आपल्याला पाहिजे तसे बदल संविधानात करवून घेतले व या बदललेल्या संविधानानुसार सर्वोच्च न्यायालयाने सिन्हा यांचा निकाल फिरविला.

नेहरूंनीही साऱ्या राष्ट्राचे मनोगत ज्या संविधानात व्यक्त झाले होते त्यात चाळीस दुरुस्त्या करून राष्ट्रवादी संविधानाचे नेहरूवादी संविधानात रुपांतर केले होते.

आणिबाणीत संजय गांधीचेच सरकार होते असे म्हटल्यास चालेल. संजय गांधीमध्ये नेहरू कुटुंबात कुणातही नसलेली एक वृत्ती होती व ती म्हणजे मुसलमानांचे फाजील लाड करायचे नाहीत. त्यांनी कोणते मुसलमान संततिनियमनाला विरोध करीत आहेत याची चौकशी सुरू केली व अवैध इमारती पाडताना इमारती मुसलमानांच्या की हिंदूंच्या याचा विचार केला नाही. ही वागणूक नेहरूकुटुंब सत्तासीन असताना आपल्याला मिळेल अशी मुसलमानांची अपेक्षा नव्हती व त्यांनी तिला कडवेपणाने विरोध केला. तेव्हा तुर्कमान गेटवरील कुप्रसिद्ध गोळीबार झाला व अनेक मुसलमान मारले गेले. लोकांना जबरदस्ती पकडून त्यांना संततिरोधक शस्त्रक्रिया करण्यास भाग पाडल्याचे प्रकारही झाले. संपांना बंदी करण्यात आली. खाजगी संभाषणात देखील सरकारवर टीका कोण करतो यावर पाळत ठेवून त्याला शासन करण्यात येऊ लागले. सरकारवर टीका करण्याच्या आरोपावरून शेकडो सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्त वा बडतर्फ करण्यात आले. वर्तमानपत्रे सरकारच्या विरुद्ध फारसे लिहू नयेत म्हणून त्यांच्यावर कडक निगराणी ठेवण्यात आली. अनेक राजकीय प्रतिस्पर्ध्यांना

न्यायासनाच्या हुकुमाशिवाय तुरूंगात डांबण्यात आले. एकूण नेहरूंनी संघावर जशी धार धरली होती तशीच इंदिरा गांधींनी संघावरच केवळ नव्हे, सर्वच विरोधी पक्षांवर धरली.

आपल्या सर्व कृत्यांना जनतेचा पाठिंबा आहे हे दाखविण्यासाठी लाखो लोकांचे मोर्चे व सभा आयोजित करणे आवश्यक होते. त्यासाठी शाळा/कॉलेजांनी आपले सर्व विद्यार्थी पाठवावे म्हणून त्यांच्या प्रमुखांना दूरभाषकावरून आज्ञा पाठविल्या जाऊ लागल्या.

नेहरूंनी आणिबाणीसारखा निर्णय कधीच घेतला नसता कारण ते हाडाचे लोकतंत्री होते असा समज सार्वत्रिक आहे. ''नेहरूंनीच आपल्याला लोकशाही दिली'' असे लालकृष्ण अडवाणी नुकतेच म्हणाले. यात काडीचेही तथ्य नाही. स्टॅलिनला आदरणीय मानणारा माणूस लोकशाहीवर निष्ठा ठेवूच शकत नाही. भारतीय जनतेबद्दल नेहरूंना किती तुच्छता वाटत होती हे पाहायचे असेल तर त्यांनी याबद्दल कृष्ण मेननला लिहिलेले पत्र वाचावे. हे पत्र गोपाल यांच्या पुस्तकात दिलेले आहे. ''भारतात थेट लोकशाही नसावी, मतदानाचा अधिकार लोकमताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काही थोड्या लोकासच असावा,'' असे विचार त्यांच्या डोक्यात घोळत होते. पण आपण आहे त्या संविधानाखालीही सहज निवडून येऊ शकतो असे दिसून आल्यावर त्यांनी त्या दिशेने काही केले नाही. हिंदुत्ववादी लोक कधीच निवडून येऊ नयेत म्हणून त्यांनी संविधानात पुष्कळच तरतुदी केल्या. पण जे मुस्लिम अलगाववादाला लागू न होता फक्त हिंदुत्ववाद्यांना लागू होईल असे प्रावधान करणे अशक्य असल्यामुळे हिंदुत्ववाद्यांना जनतेचा कौल घेणे वैधानिक दृष्ट्या अशक्य करणे त्यांना जमले नाही.

पण निवडून आल्याशिवाय सत्तेवर राहण्यासाठी सैन्य ताब्यात असणे आवश्यक असते. ते एखाद्या सेनाधिकाऱ्याने प्रासादक्रांति केली तरच त्याच्या ताब्यात राहू शकते. इंदिरा गांधींच्या ताब्यात सैन्याने का रहावे? बंगलादेशात मुजीबूर रहमानचा खून झाला. तसाच आपलाही होईल अशी इंदिरा गांधींना भीती वाटू लागली. सेनाधिकाऱ्याशिवाय दुसऱ्या कुणाला लोकमताचा पाठिंबा नसताना राज्य करणे कठिण होईल असे दिसून येऊ लागले.

वरील तथ्यांच्या आधारे विचार करून इंदिरा गांधींनी निवडणुका घेण्याचे ठरविले व हेरखात्याला लोकमताचा अंदाज घेण्यास सांगितले. या अंदाजाप्रमाणे इंदिरा गांधींना भरघोस यश मिळणार अशी लक्षणे होती. इंदिरा गांधींनी १९७७ साली निवडणुका जाहीर केल्या व त्यांत त्यांचा दारुण पराभव झाला. त्या स्वत: पराभूत झाल्या इतकेच नव्हे तर उत्तर भारतात काँग्रेसचा एकही उमेदवार निवडून आला नाही.



लोकशाहीत जनमत गृहीत धरता येणार नाही ही नेहरूंची भीती इंदिरा गांधींच्या वेळी खरी ठरली.

इंदिरा गांधींच्या पराभवानंतर अनेक पक्षांनी मिळून स्थापन केलेल्या एका जनतापक्षाचे सरकार मुरारजी देसाईंच्या पंतप्रधानत्वाखाली स्थापित झाले. या सरकारात चरणसिंग हे नेहरूविरोधी होते. मुरारजी गांधींच्या काँग्रेसचे निष्ठावंत सदस्य, राष्ट्रभाषा हिंदीचा अभिमान बाळगणारे व नेहरूप्रणीत सेक्युलॅरिझमचा विरोध करणारे होते. वाजपेयी संघवादी होते. बाकीचे समाजवादी पण परराष्ट्रीय धोरणात नेहरूविरोधी होते. या पक्षातील राजनारायण, मधु लिमये वगैरे सदस्य नेहरूंच्या भाषिक धोरणांच्या विरोधी व संविधानाच्या आदेशानुसार इंग्रजीचे उच्चाटन झाले पाहिजे या मताचे होते. हे सरकार टिकले असते तर विदेश नीतीत इष्ट तो बदल, आर्थिक क्षेत्रात अधिक व्यवहारी धोरण व देशी भाषांना उत्तेजन या नेहरूवादाच्या विरुद्ध गोष्टी घडण्याची आशा होती.

या अनुसार मुरारजींनी सारा भारत ही एक बाजारपेठ करण्याचे तत्त्व अमलात आणून कृषिनिर्मित पदार्थाच्या किमती खाली आणल्या. विदेशी धोरणात वाजपेयींनी इस्राइलशी व चीनशी अधिक चांगले संबंध व संयुक्त राष्ट्रांची हिंदीला मान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला. मुरारजींनी फायलीवर सर्रास हिंदीमध्ये काम करणे सुरू केले. चौकशी समित्या नेमून इंदिरा काळात झालेली अनेक कृष्णकृत्ये बाहेर काढण्याच्या प्रयत्न सुरू झाला.

पण मुरारजींची बहुवंश शक्ती आपली खुर्ची टिकविण्याच्या अयशस्वी प्रयत्नात खर्च झाली. चरणसिंगांनी पंतप्रधान होण्यासाठी भांडण केले व मुरारजी सरकार कोसळले. इंदिरा गांधीशिवाय कोणी राज्य करू शकत नाही असा या प्रकारावरून जनतेने बोध घेऊन पुनश्च इंदिरा गांधींना निवडून दिले.

## हिंदू असणे हाच गुन्हा

या काळात इंदिरा गांधींनी नेहरूंची कन्या नेहरूपेक्षा सवाई सेक्युलर आहे हे दाखवून दिले. या करामतीबद्दल विजयकुमार मलहोत्रा यांनी प्रमुख वर्तमानपत्रात जानेवारी १९९१ मध्ये ''भारतात हिंदू असणे हा गुन्हा आहे काय?'' (Is it a crime to be a Hindu in India) या शीर्षकाचे लेख लिहून या 'सेक्युलर' पराक्रमावर प्रकाश टाकला आहे. या लेखात वर्णिलेले काही प्रकार नेहरूंच्या काळातच घडले पण इंदिरा गांधींच्या काळात त्यांचे स्वरूप अधिक जाचक आहे.

सेक्युलर इंडियात अहिंदू संस्थांना स्वत:च्या धर्माचा प्रसार करण्यासाठी

सरकारच्या अधिकारपासून मुक्त अशा संस्था काढण्याचा अधिकार आहे, तसा तो हिंदूंना नाही. कोणत्याही संस्थेला सरकारची कशाही प्रकारची मदत मिळत असेल तर ती हिंदू धर्माचे शिक्षण देऊ शकत नाही. एवढेच नव्हे. तिला आपली इमारत वा अंगण देखील कोणत्याही हिंदू कार्यक्रमासाठी वापरले जाणार नाही हे बंधन पाळावे लागते. सरकारी अनुदान मिळविणाऱ्या शाळेच्या अंगणात कीर्तन होऊ शकत नाही. हिंदू संस्थांना इतक्या जाचक निर्बंधाखाली काम करावे लागते की त्यापैकी राम कृष्ण आश्रम व आर्यसमाज यांनी या जाचातून सुटण्यासाठी आपण हिंदू नाही असे जाहीर केले होते. एकूण मुघलांनी जसा हिंदू धर्म नष्ट करण्यासाठी जिझिया लादला होता तसाच नेहरूंनी अल्पसंख्यांचे अधिकार या नावाचा जिझिया हिंदूंवर लादला होता. सरकारी अनुदानावर चालणाऱ्या संस्था अहिंदू धर्माचे शिक्षण देऊ शकतात, कमी अंक मिळालेल्या अहिंदूला जास्त अंक मिळविणाऱ्या हिंदूंना दूर सारून प्रवेश देऊ शकतात, त्यांना शिक्षकांच्या व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आपल्या मर्जीनुसार करता येतात व हिंदूंना घेतले जाणार नाही असे राजरोस सांगता येते. हिंदू संस्थांना मात्र शिक्षण खात्याच्या सम्मतीशिवाय काहीही करता येत नाही. दिल्ली विद्यापीठात जे नियम हिंदू कॉलेज, आर्यसमाज कॉलेज व रामजस कॉलेज यांना लागू आहेत ते सेंट स्टीफन्स कॉलेजला लागू नाहीत.

Queen Mary's College ने ख्रिस्ती प्रिन्सिपल पाहिजे अशी जाहिरात दिली. यावर शिक्षा खात्याने सुचविले की, ''कॉलेजने कुणालाही घ्यावे पण जाहिरातीतच स्पष्टपणे हिंदूंना घेतले जाणार नाही असे म्हणू नये.'' कॉलेजने हे ऐकले नाही व न्यायाधीशांनी कॉलेजची बाजू उचलून धरली. ''या कॉलेजांचे बहुसंख्य विद्यार्थी हिंदू आहेत. मग हे कॉलेज ख्रिश्चन कसे?'' हा सरकारचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला नाही. कारण ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्ती धर्माच्या प्रचारासाठी काढलेली संस्था ख्रिस्ती ठरते मग तिथे हिंदूंची बहुसंख्या असेल तर गैर ख्रिस्त्यांमध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यास हे वातावरण अधिकच पोषक आहे. म्हणून अशा कॉलेजचे ख्रिस्ती स्वरूप जपणे हे सेक्युलॅरिझमचे इतिकर्तव्यच आहे.

डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव हे शिक्षामंत्री झाले तेव्हा त्यांनी माझ्या कारकीर्दीत मी अलीगढ कॉलेजचा उपकुलपती हिंदू व हिंदू विद्यापीठाचा मुसलमान होईल अशी व्यवस्था करीन असे जाहीर केले तेव्हा मुस्लिमांनी त्याविरुद्ध ओरड केली. ''सरकारच्या पैशाने चाललेले विद्यापीठ मुस्लिम कसे असू शकते?'' या शिक्षामंत्र्यांच्या सवालाला उत्तर देण्यासाठी सरकारने कायदाच बदलला व अलीगड



सरकारी पैशावर चालत असले तरी ते मुस्लिम आहे हे निश्चित केले.

जम्मू-काश्मीरचे सारे शिक्षण भारत सरकारच्या खर्चाने चालते. तेथे एक डॉक्टर निर्माण करण्यासाठी सरकार एक लाख रुपये खर्च करते.

काश्मीरमध्ये सारेच मुसलमान मागासवर्गात समाविष्ट केलेले आहेत. अर्थात मागासवर्गासाठी राखून ठेवलेल्या जागा देखील त्यांनाच मिळतात. काश्मीरच्या हिंदूंना काश्मीरमध्ये आयुर्विज्ञानाच्या शिक्षणात प्रवेश मिळणे कठिण जाते. कारण मुक्त जागासाठीच फक्त त्यांचे अर्ज विचारात घेतले जातात. उलट मुसलमानांना राखीव व मुक्त या दोन्ही जागासाठी प्रवेश मिळविता येतो. काश्मीरी हिंदूंना इतर प्रांतात देखील आयुर्विज्ञानासाठी प्रवेश मिळू शकत नाही. कारण ''ज्या प्रांतात आयुर्विज्ञानाच्या शिक्षणाची सोय आहे अशा प्रांतातील विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये,'' असे काही प्रांतात नियम आहेत.

अहिंदूसाठी सरकारी खर्चाने स्पर्धा परीक्षांसाठी वर्ग सुरू करण्यात आले. यात अहिंदूंना मोफत शिक्षण व हिंदूंना जवळपास फिरकण्यासही मज्जाव आहे. (पंतप्रधानांचा खास आदेश ११/५/८३) याच आदेशात अल्पसंख्यांना मोठ्या प्रमाणावर तांत्रिक शिक्षणात प्रवेश देण्यात यावा असे बजावले आहे. न जाणो अल्पसंख्यांना खास शिक्षण देऊनही ते जातीय लोकांपुढे टिकले नाहीत तर?

१९८४-८५ मध्ये सरकारने आठ मोठ्या शहरामध्ये खास अल्पसंख्यांसाठी बहुविध तांत्रिकीच्या संस्था काढल्या. यात दर वर्षी निदान ५० अल्पसंख्यांक विद्यार्थी घेतलेच पाहिजेत असा निर्बंध आहे. न जाणो प्रवेशस्पर्धामध्ये कोणताच अल्पसंख्यक स्पर्धालु उत्तीर्ण झाला नाही तर? सरकारने लोकसभेला सांगितले की, या खास संस्थात देखील अल्पसंख्य स्पर्धेत कमी पडू नयेत म्हणून २१ कॉलेजात त्यांच्यासाठी खास वर्ग चालविण्यात येत आहेत व यावर सरकारचे ३० लक्ष रुपये खर्च होत आहेत.

१९८३ साली पंतप्रधानांनी खास आदेश काढून मुसलमानांना मोठ्या संख्येने नोकऱ्यात प्रवेश देण्यात यावा असे मंत्र्याला बजावले.

अल्पसंख्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी एक अल्पसंख्य आयोग आहे व गृह आणि शिक्षा मंत्रालयात अल्पसंख्य कक्ष आहेत.

रिझर्व्ह बँकेने बँकांना आदेश दिले आहेत की, अल्पसंख्यांना त्वरित कर्जे देण्यात यावीत. हिंदूंना गहाण ठेवल्याशिवाय कर्ज देऊ नये. अल्पसंख्यांकडून कर्जासाठी गहाण मागू नये.

१९७१ च्या युद्धाच्या आधारे इंदिरा गांधी हिंदुत्वनिष्ठा होत्या असा निष्कर्ष काढणाऱ्यांनी वरील कृत्याचा विचार करावा.

## भ्रष्टाचार

भ्रष्टाचाराच्या बाबतीत नेहरू सोवळे नव्हते हे पूर्वी दाखविलेच आहे. त्यांची कन्या या बाबतीत सवाई होती असा जयप्रकाश नारायण आरोप करीत. या सर्व प्रकारांची जनता सरकार चौकशी करणार होते पण अशी चौकशी सुरू होण्याच्या आधीच ते सरकार पडले. ज्या एका प्रकरणाची चौकशी सुरू झाली होती ते नगरवाला प्रकरण आहे. याचा वर्तमानपत्रात आलेला वृत्तांत असा-

स्टेट बँकेच्या मलहोत्रा नावाच्या एका रोकड्याला एक दूरभाष आला. ''मी इंदिरा गांधी बोलते आहे. अमुक ठिकाणी मी आपला माणूस पाठविते. त्याला ६० लाख रुपयांची रोकड द्यावी.'' मलहोत्रांनी ताबडतोब बँकेतून रोकड काढली व ठरलेल्या स्थळी वाट पाहणाऱ्या नगरवाला नावाच्या इसमाला ती दिली. ती दिल्यावर रक्कम इंदिरा गांधींना मिळाली याची खात्री करून घेण्यासाठी मलहोत्रा इंदिरा गांधींना भेटले व ''रक्कम मिळाली का?'' म्हणून विचारू लागले. तेव्हा इंदिरा गांधींनी ''कोणती रक्कम?'' म्हणून विचारले. हा प्रश्न ऐकताच मलहोत्रा घाबरला व त्याने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी नगरवालाला पकडले व त्याच्यावर खटला भरला. काही वर्तमानपत्रात अशी माहिती आली होती की इंदिरा गांधी या प्रकारे पैसे मागवितात हे नगरवालाला माहीत होते. त्याची एक इटालियन मैत्रीण होती. तिला इंदिरा गांधींचा आवाज काढून फोन करायला नगरवालाने सांगितले व पैसे मिळविले.

खटल्याचा निकाल चोवीस तासात लागून नगरवालाला सजा झाली. तो तुरूंगात असतानाच आपले बयाण बदलून अपील करून इच्छितो अशी बातमी आली होती पण लवकरच संशयास्पद रीतीने त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणात इंदिरा गांधींचा हात नव्हता व हे साठ लाख इंदिरा गांधींचे नव्हते असे चौकशी समितीने मत दिले. मुरारजी देसाईंनी हे पैसे इंदिरा गांधींचे असल्याशिवाय मलहोत्रा फोन आल्याबरोबर ते देणार नाही असे सांगितले. मलहोत्राने सांगितले की फोन इंदिरा गांधीचा आहे याबद्दल मला संशय नव्हता व मी काही न विचारता पैसे काढले व त्यांचा हिशेब कसा करायचा हे इंदिरा गांधीच सांगतील असे समजून त्यांच्याकडे गेलो.

मलहोत्राला बँकेने बडतर्फ केले पण त्याला लगेच दुसरी नोकरी मिळाली.

या प्रकरणातील परिस्थितीचा पुरावा पूर्णपणे इंदिरा गांधींच्या विरुद्ध आहे. मलहोत्राला अशा तऱ्हेचा फोन पहिल्यांदाच आला असता तर त्याने परत इंदिरा-गांधींना फोन करून फोन त्यांचाच होता की नाही याची खात्री करून घेतली असती व कोणत्या



खात्यातून पैसे काढायचे हे विचारले असते. बँकेचा रोकड्या एवढेही करणार नाही, यावर विश्वास ठेवणे कठिण आहे. अर्थात असे नेहमीच होत होते हे खरे मानले पाहिजे. आता पैसे कोणत्या खात्यातून घेतले असा प्रश्न उद्‌भवतो. याचे संभाव्य उत्तर असे की हे पैसे खात्याशिवाय बँकेत ठेवण्यास इंदिरा गांधींनी आपला विश्वासू सहायक मलहोत्रा याला दिले होते. पैसे बँकेच्या कोणत्याही खात्यात नसल्यामुळे बँकेतले पैसे कमी झाले आहेत असे कुणाला वाटण्याचा संभवच नव्हता. हे पैसे इंदिरा गांधी पंतप्रधान असेपर्यंत वा मलहोत्रा वा त्याच्यासारखाच अन्य कुणी रोकड्या असला तरच इंदिरा गांधींना मिळण्यासारखे होते. सत्ता गेल्यावर फक्त काही लाख रुपये जाणार हे सर्वात क्षुद्र नुकसान होते. नाहीतरी ते पैसे इंदिरा गांधींच्या कायदेशीर मालकीचे नसणारच. ते गेले तर गेले.

''हा तर्क निर्बुद्ध आहे व नगरवाला खोटेच बोलत होता आणि त्याचा खटला चोवीस तासात निकालात निघाला यात इंदिरा गांधींचा काही हात नाही. खातेदारांना ठरल्या ठिकाणी रोकड पोचविण्याची व्यवस्था बँक करीत असते,'' असे म्हणणारे वित्तसचिवांच्या दर्जाचे लोक मला भेटले आहेत. तेव्हा वाचकांनीच आपल्या बुद्धीने निर्णय घ्यावा.

## शीखांचे शिरकाण

इंदिरा गांधींच्या मृत्यूला कारणीभूत झालेला शेवटचा प्रसंग शीखांच्या सुवर्ण मंदिरावरील कारवाईचा आहे. या प्रकरणात देखील नेहरूंचे सर्व स्वभावविशेष इंदिरा गांधींच्या वागण्यात स्पष्ट दिसून आले. भिंद्रनवालेच्या अनुयायांनी ''आम्हाला स्वतंत्र शीख राज्य म्हणजे खालिस्तान पाहिजे,'' अशी मागणी केली व पंजाबात दहशतवादास प्रारंभ केला. या दहशतवादाचे नेतृत्व एकच नव्हते. दहशतवाद्यांच्या अनेक टोळ्या होत्या व त्यांचे आपसात वैर होते. त्यामुळे खालिस्तानी दहशतवादात शीखेतरांपेक्षा शीखांचेच बळी जास्त पडले. पण तरी मुले पळविणे, खंडण्या मागणे, उठल्याबसल्या हत्या करणे हे प्रकार राजरोस सुरू झाले व आज पंजाबात किती मारले गेले याच चर्चेच्या वार्ता वर्तमानपत्रात प्रमुखत्वाने झळकत होत्या. ''भिंद्रनवालेचा खून करून हे प्रकरण मिटवावे असे इंदिरा गांधींनी ठरविले होते, पण पोलिसदलातील काही शीखांनी भिंद्रनवालेला आतल्या बातम्या पुरविल्यामुळे हे कारस्थान फसले.'' असे इंदिरा गांधींच्या निकट असलेल्या एका राजनैताने मला सांगितले. हे खरे असेल तर इंदिरा गांधींचे राजकीय आकलन व नैतिकता यावर दु:खद प्रकाश पडतो. एका भिंद्रनवालेला

मारल्यामुळे खालिस्तानी दहशतवाद मिटणार नव्हता. दहशतवाद्यांना तोच एकमात्र पुढारी नव्हता. दुसरे असे की देशद्रोहाबद्दल देशद्रोह्याला न्यायप्रक्रियेनुसार फाशी देण्याची ज्या सरकारची हिम्मत नाही त्याची प्रतिष्ठा कितपत असणार?

सांगोवांगीच्या गोष्टीवर विश्वास ठेवू नये हे खरे आहे. पण इंदिरा गांधींच्या निकटवर्ती असलेल्या महत्त्वाच्या राजनैतात इंदिरा गांधींची काय प्रतिमा होती हे अशा गोष्टी खोट्या असल्या तरी त्यावरून दिसून येते.

दुसरे असे की नेहरूंनी काश्मीर, नागालँड वगैरेंच्या विभक्ततेच्या मागणीला जे उत्तेजन दिले व तेलंगणाच्या बंडाच्या बाबतीत जी सहानुभूतिपर वृत्ती बाळगली तीच खालिस्तानच नव्हे तर नक्षलवाद, जनतायुद्धगण (People's War Group) बिहारातील अनेकविध सेना व हरण करून खंडण्या वसूल करण्याचे प्रकार वगैरे उत्पातांची जननी होती. हे आमच्या देशातील कुणाच बुद्धिमंताला कळत नाही. मग नेहरूंच्या कन्येला कळायला पाहिजे होते अशी अपेक्षा करता येत नाही. नेहरूपेक्षा वेगळा विचार करण्याची इंदिरात क्षमताच नव्हती.

भिंद्रनवालेचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. याबाबतीत सैनिक वर्तुळात असे सांगितले जाते की, ज. सिन्हा यांना डावलून इंदिरा गांधींनी अरूण वैद्य यांना सेनापती नेमले कारण अरुण वैद्य आसाम व भिंद्रनवाले याच्याविरुद्ध सरळ सैनिक कारवाई करावी या मताचे होते. उलट ज. सिन्हा यांच्या मते फारसा शस्त्रप्रयोग न करता भिंद्रनवाले व त्याची टोळी यांना सुवर्ण मंदिराच्या बाहेर काढून सजा देणे शक्य होते. पण इंदिरा गांधींना काही तरी रोमांचक करण्याची हौस होती. त्यामुळे त्यांनी अरुण वैद्य व ज. सुंदरजी यांची योजना उचलून धरली. या योजनेप्रमाणे सैन्याने सुवर्णमंदिरावर सरळ हल्ला करायचा होता. तसा हल्ला करण्यास जवान सुवर्ण मंदिरात घुसू लागले तेव्हा त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव झाला व ४०० जवान ठार झाले. एकूण भिंद्रनवाले जवळ कोणती शस्त्रे व अन्य युद्धसामग्री आहे याचे आमच्या सैन्याला काहीच ज्ञान नव्हते व अशी सामग्री सुवर्ण मंदिरात जमविण्याचे काम बिनधोकपणे चालू देण्याइतके सरकार गाफिल होते.

सैनिक विजयाचा निवडणुकात लाभ करून घेणे ही गोवामुक्तीचा मेननच्या विजयासाठी लाभ करून घेण्यात प्रकट झालेली नेहरूंची वृत्ती इंदिरातही होती. त्यामुळे सुवर्णमंदिर हा जणू शत्रूचा बालेकिल्ला आहे असे समजून त्यावर हल्ला करण्याची सुंदरजींची कल्पना त्यांना मान्य झाली व तोफा डागून मंदिर उद्ध्वस्त करण्यात आले. यामुळे काही शीख सैनिक बिथरले व सैन्य सोडून पळून गेले. ''त्यांच्यावर सैनिक



कायद्याप्रमाणे कारवाई करू,'' अशी जनरल वैद्यांनी जरब दिली असताना त्यांना ती अमलात आणता आली नाही कारण सैन्यात देखील देशहितासाठी सैन्याच्या कायद्याप्रमाणे चालणे इंदिरा गांधींना पसंत नव्हते. अशा कृत्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. खुद्द इंदिरा गांधींच्या शीख रक्षकानेच त्यांना गोळी घातली. ''आपल्या निकट शीख रक्षक ठेवू नका,'' असा त्यांना सल्ला देण्यात आला होता पण तो त्यांनी धुडकावून लावला याबद्दल इंदिरा गांधीचे कौतुक होते. ''आपल्याच लोकांवर संशय घेणे ही नीतिमत्ता नव्हे,'' असे सुभाषित वापरले जाते. पण संशय न घेणे हा सद्गुण मानता येत नाही. उलट संशयास कारण असताना संशय न घेणे निराधार संशय घेण्याइतकेच निंदनीय आहे. इंदिरा गांधींना आपले शीख रक्षक आपला खून करणार नाहीत याबद्दल खात्री होती. रक्षकाने त्यांच्यावर बंदूक रोखली तेव्हा देखील, ''अरे काय करतोस?'' असे त्यांनी विचारले. ''वाचवा'' म्हणून हाक देणे, पालथे पडणे, आडोसा घेणे यापैकी काहीच त्यांना सुचले नाही. रक्षक बंदूक रोखून नुसतीच भीती दाखवीत आहे असे त्यांना वाटले की काय?

एकूण सेक्युलॅरिझम, स्वतःच्या कुटुंबात सत्ता ठेवण्याचा आग्रह, भ्रष्टाचार, देशाच्या हिताबद्दल संपूर्ण उदासीनता व माणसाची पारख नसणे हे सर्व पित्याचे गुण इंदिरा गांधींत होते व त्यांची कारकीर्द ही पिताश्रींच्या कारकीर्दीची नक्कल होती.

## राजीव गांधी व श्रीलंकेतील ओम्फस

इंदिरा गांधींचा खून झाल्यावर राजीव गांधी पंतप्रधान झाले. लगेच इंदिरा गांधींचा खुनी शीख असल्यामुळे शीखविरोधी दंगे उसळले. या दंग्यांचे सूत्रसंचालन उच्चपदस्थ काँग्रेसजनांनी केले व घरे दाखवून दाखवून शीखांची कत्तल केली असा आरोप आहे व त्याची चौकशी अजून सुरू आहे. चौकशी सुरु करण्यास राजीव गांधींनी नकार दिला होता व नकाराचे कारण हे दिले की, ''अशा चौकशीने शीखांचीच बदनामी होईल. जेव्हा मोठा वृक्ष पडतो तेव्हा धरणी हलणारच!'' राजीव गांधींचा दृष्टांत सर्वथैव चूक आहे. झाड पडल्याने पृथ्वी कापत नाही. पृथ्वी कापल्याने मात्र झाड पडते. राजीव गांधी आपल्या आजोबाप्रमाणे साहित्यिक नव्हते. म्हणून अशा वाक्याकडे दुर्लक्ष्य केले तरी त्यांच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट आहे. चौकशीसमिती इंदिरा गांधींच्या खुनाबद्दल शीखांनाच जबाबदार धरणार. खुनी लोकांना मारले तर फारसे काही बिघडत नाही!! हे विचार फारच धक्कादायक आहेत. आईच्या मरणाचे दुःख ताजे असल्यामुळे राजीव गांधी न्याय-अन्याय पाहण्याच्या मनःस्थितीत नव्हते म्हणून असे उद्गार क्षम्य मानले

तरी ते राज्यकर्त्याला शोभण्यासारखे नाहीत. एका शीखाने खून केला म्हणून सर्वच शीखांचा द्वेष करणारा राष्ट्रैक्य कसे साधू शकेल? काही शीखांनी खालिस्तानच्या नावाने देशद्रोह केला पण त्यांचा नायनाट देखील शीखांनीच केला ना?

राजीव गांधी नेहरूवाद सोडतील अशी अपेक्षा नव्हतीच. कॉन्व्हेण्टसदृश शाळात झालेले शिक्षण व नेहरू कुटुंबाचा वारसा! या वारशात शालेय बुद्धिमत्तेचे दारिद्र्य होतेच. शिवाय विदेशी पत्नीचा प्रभाव.. तिच्या प्रभावाने राजीव गांधी ख्रिस्ती झाले होते, यावरून नेहरू कुटुंबातील वंशपरंपरागत देशाभिमानशून्यता व हिंदुद्वेष स्पष्ट होतो. डॉ. केतकर यांनी जर्मन पत्नी केली होती. पण केतकर तिच्या प्रभावाने ख्रिस्ती होण्याऐवजी तिलाच त्यांनी हिंदू करून घेतले. ती मराठी शिकली व पतीचे काम तिने त्यांच्या निधनानंतर चालू ठेवले.

राजीव गांधींनी आपण हिंदू असल्याबद्दल न्यायालयाचा कौल घेतला होता. कारण त्याशिवाय नेहरूंचा वारसा त्यांना मिळणार नव्हता. त्यांचा नवज्योत विधि झाला नसल्यामुळे ते पारसी नाहीत असा न्यायालयाने निर्णय दिला व आई व आजोबा हिंदू असल्यामुळे ते हिंदू आहेत असा निष्कर्ष काढण्यास वाव ठेवला. पण राजीव गांधी काश्मीरात गेले असताना त्यांच्या उपस्थितीत झालेल्या एका जाहीर सभेत शेख अब्दुल्ला यांनी भारताचे हिंदू शासक काश्मीरला छळत आहेत असा आक्रोश केला, तेव्हा राजीव गांधी उठून ''मी हिंदू नाही'' असे काकुळतीने सांगू लागले (मोरे यांचे काश्मीर) मुलांना एका ख्रिस्ती शाळेत प्रवेश मिळवून देताना त्यांनी आपण ख्रिस्ती असल्याचे जाहीर केले होते असा ऑर्गनायझर पत्राने आरोप केला होता. त्याचा कुणी प्रतिवाद केल्याचे ऐकिवात नाही. राजीव गांधी इतके महान सेक्युलर होते की, ते काँग्रेसप्रमुख असताना ''निवडून आलो तर आम्ही ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास मदत करू,'' असे ईशान्य भारतातील काँग्रेसने एका निवडणुकीत वचन दिले होते!

राजीव गांधींचे दुसरे गाजलेले सेक्युलर कृत्य म्हणजे शहा बानो प्रकरण. ''आम्ही तुमचे कायदे वेगळे ठेवू,'' असे संविधानविरोधी वचन देऊन कोणत्याही पक्षाने मुसलमानांची मते मिळविण्याचा प्रयत्न करू नये असे राजकीय पक्षांनी ठरविले होते. पण आपल्या वचनाला हरताळ फासून राजीव गांधींनी हे कृत्य केले. शहा बानो नावाच्या एका मुस्लिम स्त्रीला तिच्या नवऱ्याने मुस्लिम पद्धतीने घटस्फोट देऊन मुलासकट निराधार अवस्थेत घरातून बाहेर काढले. तेव्हा न्यायालयांनी भारतीय दंडसंहितेनुसार त्या नवऱ्याने त्या स्त्रीला पोटगी दिली पाहिजे असा निर्णय दिला. राजीव गांधींनी हा कायदा मुसलमानांना लागू नाही अशी पुस्ती या कायद्याला जोडून त्या स्त्रीची



पोटगी हिरवून घेतली.

राजीव गांधींचे भारताच्या इतिहासाचे ज्ञान एवढे अफाट होते की, ''इब्राहिम खान गार्दी हा शिवाजीचा सेनापती होता'' व ''रामराज्यात हिंदू-मुसलमान गुण्यागोविंदाने नांदत होते,'' असे ते बोलत.

राजीव व संजीव ही जोडी व्रात्यपणासाठी इतकी प्रसिद्ध होती की, पोलिसांनी गैरवर्तनाबद्दल कुणा विद्यार्थ्याला अटक केल्याची बातमी आली की नेहरू इंदिराला "I hope they are not your brats" असे विचारीत.

एवंगुणविशिष्ट राजीवपासून देशाने फारसे काही अपेक्षिण्यासारखे नव्हते. राजीव गांधींनी आल्याबरोबर पंजाब व आसाम येथील मुख्यमंत्र्याशी करार केला. हे करार या प्रांतातील बंडाळी शमविण्यास उपयुक्त होतील असे नेहरूभक्त म्हणाले होते. पण मुख्यमंत्र्याशी करार केल्यामुळे बंडाळ्या शमतील असे समजणे म्हणजे ते मुख्यमंत्रीच बंडाळ्या करीत होते असे समजण्यासारखे आहे. अपेक्षेप्रमाणेच बंडाळ्या तशाच चालू राहिल्या. पंजाबच्या मुख्य मंत्र्यांचा तर अतिरेक्यांनी खूनच केला.

श्रीलंकेत बंड करणाऱ्या तमिळांना भारतातून मदत मिळते हे राजीव गांधींच्या कारकीर्दीत गुप्त राहू शकले नाही. कोणत्या तरी सरकारची मदत असल्याशिवाय तमिळ नागरिक एका प्रस्थापित सरकारविरुद्ध लढू शकतील हे शक्य नाही. श्रीलंकेने भारताची या बाबतीतली भूमिका जगजाहीर व्हावी म्हणून राजीव गांधींना तमिळ बंडखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी सैन्य पाठविण्याची विनंती केली. राजीव गांधींनी ती मान्य केली. अशी विनंती मान्य करण्याआधी भारताने श्रीलंकेकडून हा प्रश्न ते कसा सोडविणार. तमिळांच्या न्याय्य मागण्या मान्य करणार की नाही व भारताला सैनिक मदत मागितली आहे त्या अर्थी हा प्रश्न सोडविण्यासाठी भारताच्या म्हणण्याला काही मान दिला जाणार आहे की नाही वगैरे कोणत्याच गोष्टीची निश्चिती करून घेतली नाही. स्वत: श्रीलंकेने ''वाचवा'' म्हणून भारताला हाक दिल्यावर तमिळांचा प्रश्न आपल्या मताप्रमाणे सोडवून घेण्याची चांगली संधी भारताला लाभली होती. पण नेहरूंप्रमाणेच राजीव गांधी देखील एका देशाने आपल्याला मदतीसाठी हाक दिली यावरून आपली आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळली यातच खुष होते. भारताच्या समस्या सोडविण्यात त्यांना काही रस नव्हता. नेहरूप्रमाणेच ''तुमची तमिळ समस्या सोडविण्यासाठी साऱ्या तमिळांना भारतात परत पाठवून द्या,'' असे शास्त्री व नेहरूंप्रमाणे म्हणण्यास देखील ते तयार झाले असते. पण तमिळांनी हे ऐकायला पाहिजे ना! ते तर आपल्या हक्कासाठी रणांगणावर उतरले होते! राजीव गांधींच्या सांगण्यावरून ते काय आपला लढा सोडून भारतात पळून

जायला तयार होणार होते? तात्पर्य राजीव गांधींनी श्रीलंकेत सैन्य पाठविण्याचा जो निर्णय घेतला त्यामागे कोणताच विचार नव्हता.

एक मात्र दिसते की भारतीय सैन्याला तमिळ सेनेचा नाश करण्यासाठी मोकळे सोडायचे नाही असे त्यांनी ठरविले होते. "प्रभाकरनला पकडू नका," वगैरेसारखे आदेश आम्हाला आहेत असे एका सैनिक अधिकाऱ्याने मला सांगितले. तमिळांचा बंदोबस्त करण्याचीही भारतीय सैन्यात ताकद नव्हती असे मला वाटत नाही. पण राजीव गांधींच्या धरसोडीमुळे ते ईर्ष्येने लढाई न करता थातुरमातुर करीत राहिले. काही हजार जवान नाहक प्राणास मुकले. जवानांच्या प्राणांची तर नेहरू कुटुंबीयांच्या दृष्टीने काहीच किंमत नव्हती. शेवटी "तुमच्याने काही होत नाही, तुम्ही आमच्या देशातून निघून जा," असे श्रीलंकेने भारतीय सैन्याला बजावले. हा सर्व अपमान, अपकीर्ती व जीवहानी भारतीय सैन्याच्या कपाळी केवळ राजीव गांधींमुळे आली.

बरे तमिळांना "तुम्ही तुमचे पाहून घ्या," "आम्हाला मध्ये ओढू नका," असे म्हणायलाही राजीव गांधी तयार नव्हते. तमिळ सेनेची एक मोठी अडचण ही आहे की, सैन्याची जमवाजमव व राखण करायला त्याच्या जवळ कायमचा तळ नाही. श्रीलंकेतील जिंकलेला प्रदेश हाच त्यांचा तळ. पण तो फार असुरक्षित आहे. त्यावर श्रीलंकेच्या सैन्याचा केव्हाही हल्ला होऊ शकतो. यामुळे तमिळांनी भारताच्या आग्नेयकडील माले नावाचे एक बेट काबीज केले. पण भारताच्या दुर्दैवाने या बेटाचे राज्य एका मुसलमान शासकाच्या हातात होते. राजीव गांधींना नेहरू खाक्या प्रमाणे तमिळापेक्षा मुसलमान आपले वाटत होते. त्यामुळे त्यांनी कारण नसता या बेटावर सैन्य पाठवून तेथून तमिळांना हाकलून लावले.

राजीव गांधींच्या या साऱ्या कृत्याचे पर्यवसान त्यांच्या खुनात झाले. इंदिरा गांधींप्रमाणेच सुरक्षेच्या सूचना त्यांनी मानल्या नाहीत व ते गर्दीत मिसळले. एका तमिळ स्त्रीने स्वतःच्या शरीरात बॉम्ब लपवून त्यांना उडवून दिले. यानंतर इंदिरा गांधींच्या खुनानंतर जसे शीखविरोधी दंगे उसळले तसे तमिळ विरोधी दंगे उसळले नाहीत. याचे कारण राजीव गांधींचे उत्तराधिकारी सरकार नेहरूवंशीय नव्हते हे असू शकेल. दंगे झाले नाहीत तरी राजीव गांधींच्या हत्येनंतर झालेल्या मतदानात काँग्रेसला जास्त मते मिळाल्याचे दिसून आले.

भारतीय सुरक्षेला धोका पोचविण्याचे नेहरूंचे काम राजीव गांधींनी सुरू ठेवले होते. जनरल कॅण्डेथ यांनी कारगिल क्षेत्रातून सियाचिनवर हल्ला करण्याची योजना पाकिस्तानी आखतो आहे, ती हाणून पाडण्यासाठी ५०००० फूट उंचीवरून शत्रूच्या



हालचाली टिपू शकणारे विमान वापरावे असे राजीव गांधींना सुचविले. पण असे करण्यास पाकिस्तानच्या वायुसीमेचा भंग करावा लागेल म्हणून राजीव गांधींनी परवानगी नाकारली. तेव्हा वायुसेनेने एक क्लृप्ति योजली. पाकिस्तान हद्दीत शिरून त्यांनी "आमचे विमान भरकटले आहे. त्यामुळे आम्ही तुमच्या हद्दीत उतरत आहोत" असे पाकिस्तानला कळविले व पाकिस्तानमध्ये विमान उतरविले. उतरण्याच्या आधी आपले फोटो घेण्याचे काम त्यांनी उरकून घेतले. ही माहिती पुढे सियाचिनच्या लढाईत उपयोगी पडली.

भारताला शत्रूपासून स्वतःचे रक्षण करण्याच्या आधी नेहरूवंशीयांकडून आपले रक्षण कसे करावे लागत होते याचे एक उदाहरण आहे.

संजय गांधी जिवंत असताना राजीव गांधी राजकारणापासून अलिप्त होते व त्यामुळे त्यांना "स्वच्छ" अशी पदवी देण्यात आली होती. पण ते राजकारणात शिरले व हे चित्र पालटले. त्यांच्या कारकीर्दीत बोफोर्स व पाणबुड्या प्रकरणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होता. यापैकी बोफोर्स प्रकरणात राजीव गांधींना दोषी मानण्यासारखे काही सापडले नाही असे हल्ली न्यायालयाने सांगितले आहे. या प्रकरणात गुंतलेले क्वात्रोची साक्ष देण्याला भारतात येण्यास तयार नाहीत व विदेशी न्यायालयांनी त्यांना भारतात पाठविण्यास नकार दिला आहे. तेव्हा या प्रकरणाचा थांग अजून लागलेला नाही. पाणबुड्या प्रकरणाचे काय झाले हे अज्ञात आहे. हल्ली सोनिया गांधींच्या नावे स्विस बँकेत ३७५० कोटी डॉलर आहेत असे केजीबीने प्रकाशित केले होते. हे खाते अर्थात् सोनिया गांधींच्या नावे नेहरूपरंपरेनेच आले असले पाहिजे. कारण नेहरूंचे परदेशात खाते होते असे वित्तमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले होते. सुब्रह्मण्यम् स्वामीने याबाबतीत केलेली तक्रार भारत सरकारच्या विचाराधीन आहे असे सांगण्यात आले आहे. पण तिच्या प्रगतीबद्दल अवाक्षरही ऐकू येत नाही.

## वि. प्र. सिंग व मंडलचे अग्निकांड

राजीव गांधींच्या पंतप्रधानकीच्या पहिल्या वारी नंतर त्यांना पूर्ण बहुमत मिळाले नाही म्हणून त्यांनी सरकार बनविण्याचे नाकारले. तेव्हा वि. प्र. सिंग हे भाजपाच्या बाहेरच्या पाठिंब्याने पंतप्रधान झाले. त्यांची कारकीर्द मंडल आयोगाचे अग्निकांड, काश्मीरमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जगमोहन यांच्या मार्गात अडथळे आणणे व अडवाणींना अटक याबद्दल प्रसिद्ध आहे. मंडल आयोग वि. प्र. सिंग पंतप्रधान होण्याच्या बराच आधी प्रस्तुत करण्यात आला होता. पण तो पूर्वी

कोणत्याही पंतप्रधानाला अमलात आणावासा वाटला नाही. कारण राखीव नोकऱ्यांचे तत्त्व या आयोगाच्या शिफारसींनी इतक्या टोकाला नेले आहे की सरकारी नोकऱ्या मिळण्यासाठी जात हाच एकमात्र आधार त्याने मानला आहे. पण मागासलेल्या जाती कोणत्या हे ठरवताना जाती या आरक्षणाच्या तत्त्वाचे हसे करण्याचा या आयोगाचा हेतू होता असे वाटायला लागते. कारण ब्राह्मण पुढारलेले आहेत हे पूर्वीच्या आरक्षणवाद्यांचे गृहीतकृत्य त्याने धि:कारले आहे व ब्राह्मणातही मागासलेले वर्ग मानले आहेत. पूर्वी मानलेल्या काही जातीच न मानता त्यांची संख्या इतकी वाढविली आहे की जातिवार आरक्षणाने प्रत्येक जातीच्या वाट्याला येणाऱ्या नोकऱ्यांची संख्या नगण्य ठरावी. फोड नाहीसा करायचा असेल तर तो सुकविण्याचे औषध देण्याऐवजी तो पिकवून मोठा करावा म्हणजे आपोआप फुटतो अशी या आयोगाची नीती होती की काय असा संशय येतो. पण आरक्षणवाद्यांच्या हे लक्षात आलेले दिसत नाही. प्रत्येक जातीतच मागासलेले वर्ग आहेत असे कबूल करून सगळ्या जातीमध्ये आरक्षण पोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यात मोकळ्या जागा फारच थोड्या उरणार आहेत. त्यामुळे खाजगी नोकऱ्यातही आरक्षण पोचविण्याचा आपला विचार आहे असे वि.प्र. सिंग यांनी जाहीर केले.

यामुळे नोकरीवर अवलंबून असलेल्या वर्गात फारच खळबळ उडाली व काही तरुणांनी स्वत:ला जाळून घेतले. थोड्याच दिवसात खाजगी उद्योजकांशी देखील संघर्ष उद्भवणे अपरिहार्य होते कारण त्यांनी कोणाला नोकरी द्यावी हे ठरवण्याचा देखील अधिकार त्यांना नसेल तर ते खाजगी उद्योग आहेत असे म्हणण्यातच अर्थ उरत नाही. न्यायालयांनी याबाबतीत उद्योजकांची बाजू उचलून धरली असती. पुष्कळसे उद्योग नुकसानीत येऊन बंद देखील पडले असते व बेकारी वाढली असती. सध्याच तर येथील मजूरविषयक कायदे उद्योगधंद्यांना मारक असल्यामुळे भारतात उद्योग उघडायला परकीय भांडवलदार नाखूष असतात. महाराष्ट्रातील उद्योजकांनी आरक्षण लागू केले तर महाराष्ट्र सोडून जाण्याची धमकी दिली आहे. आजकाल भांडवलाचे स्वागत करायला इतर देश देखील तयार आहेत. त्यामुळे उद्योजक देश देखील सोडून जाऊ शकतात. त्यालाही निर्बंध घालणे आज आर्थिक उदारीकरणासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढत असताना कितपत शक्य होईल हा प्रश्नच आहे. एकूण हे धोरण देशाला कंगाल करणारे होते व त्याचा सर्वच क्षेत्रात कसून विरोध झाला असता.

मागासलेल्या वर्गांची मते या धोरणामुळे आपल्याला मिळतील असे वि. प्र. सिंगांना वाटत होते पण आपल्या मागासलेपणात वाटा मागणाऱ्यांची संख्या वाढणे या वर्गानाही पसंत पडणे शक्य नव्हते. एकूण नेहरूंनी सुरू केलेले आरक्षण वाढविण्याचे धोरण वि. प्र. सिंग यांनी अमलात आणले व त्यामुळे हे नेहरूवादापासून दूर जातील अशी आशा करण्याची सोय उरली नाही.

काश्मीरमध्ये हिंदूंवर किती अत्याचार होतात हे प्रसिद्धच आहे. श्री जगमोहन जेव्हा काश्मीरचे गव्हर्नर नेमले तेव्हा त्यांनी या गोष्टींना आळा घालण्याचा प्रयत्न केला. त्यांना वि. प्र. सिंगांनी परत बोलावले याबद्दल ज्यांच्या पाठिंब्याने ते पंतप्रधान झाले त्या भाजपाचा त्यांनी रोष ओढवून घेतला. जगमोहनला पाठिंबा न देता त्यांना परत बोलावणे हे कृत्य नेहरूवादात चपखलपणे बसणारे होते.

भाजपाचा रोष विकोपाला नेणारे भाजपाध्यक्ष अडवाणी यांना अटक करण्याचे कृत्य सिंग यांनी लवकरच केले. अडवाणींनी रामजन्मभूमीच्या आंदोलनासाठी रथयात्रा काढली होती. ही यात्रा बिहारमध्ये पोचताच त्यांना अटक करण्यात आली. हे कृत्य थेट नेहरूवादी होते. ज्याच्या पाठिंब्यावर राज्य करायचे त्यांच्याच नेत्याला अटक केल्यावर सिंगांची सत्ता कायम राहील हे शक्यच नव्हते. त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव पारित झाला.

अडवाणींना अटक केल्याने आपली सत्ता तात्पुरती जाईल पण मुस्लिम मतदार आपल्यावर खुष होऊन निवडणुकीत आपल्याला भरघोस यश मिळेल असे सिंगांचे गणित होते. मुस्लिम मतदारांना आपल्याकडे ओढण्याची साऱ्या पक्षात इतकी चढाओढ आहे की त्यांच्यात विभागलेली मुस्लिम मते संख्येने अत्यंत क्षुद्र होऊन त्यांचे काही महत्त्वच उरणार नाही. अजूनही मुस्लिम नाखूष झाल्यामुळे आपण हरलो असा अनेक पक्ष जो कांगावा करतात तो कितपत खरा आहे याचे सांख्यिक अध्ययन झालेले नाही. भाजपाला देखील काही मुस्लिम मते मिळतात. वाजपेयींचा लखनौचा मतदारसंघ मुस्लिमबहुल आहे. केरलमध्ये तर मुस्लिम लीग आपले उमेदवार स्वतंत्रपणेच उभे करते. इतर ठळक पक्ष दहाच्या वर आहेत. मुस्लिम एकगठ्ठा मतदान करतात ही समजूत सांख्यिक अध्ययनावर आधारलेली नाही. मुस्लिम मते कशी विभागली जातात यांचे विश्लेषण केले तर राजकारणातील पुष्कळशा आपत्ती दूर होतील.

सिंग सरकार पडल्यानंतर जी निवडणूक झाली, तिच्या प्रचाराच्या वेळीच राजीव गांधींचा खून झाला.

## रामजन्मभूमीचे महाभारत

राजीव गांधींनंतर सोनिया गांधींना आमंत्रण देऊन नेहरूवंशाचे राज्य सुरू

ठेवण्याचा प्रयत्न झाला. पण सोनिया गांधींनी नकार दिला. याचे कारण राजीव गांधींचा खून करणारे आपल्यालाही सोडणार नाहीत अशी त्यांना भीती वाटली हे असू शकते. दुसरे कारण असल्यास माझ्या कल्पनाशक्तीच्या ते बाहेरचे आहे. पण सोनियांची ही भीती अनाठायी होती. इंदिरा गांधींना शीखाने मारले पण राजीव गांधींना मारण्याचा प्रयत्न कोणत्याही शीखाने केला नाही. तसेच राजीव गांधींवर तमिळांचा राग होता म्हणून सोनियावरही असला पाहिजे हा दूरान्वय आहे. सोनिया गांधी द्रमुकशी कोणत्याही प्रकारे संबंध ठेवण्यास एके काळी तयार नव्हत्या. कारण तमिळ राष्ट्रवाद मानणारा तो पक्ष आहे. पण द्रमुकने भारतात लिट्टेसारखे पराक्रम करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. तेव्हा तमिळांबद्दलच्या सोनियांच्या प्रतिक्रियेवरून त्यांच्या राजकीय आकलनाबद्दल फारसे अनुकूल मत होऊ शकत नाही.

नरसिंहराव हे त्यांच्या पूर्वीच्या सर्व पंतप्रधानापेक्षा विद्वान व बुद्धिमान होते. निदान अर्धा डझन भाषात ते अस्खलित होते अशी त्यांची कीर्ती आहे, ते संस्कृतप्रेमी होत असेही डॉ. जिचकार यांनी मला सांगितले. त्यांनी ययाती वगैरे मराठी कादंबऱ्यांची तेलगू भाषांतरे केली आहेत. त्यांना स्वत:ची विचारशक्ती होती असे मला वाटत होते व यामुळे ते नेहरूवादापेक्षा काही नवी वाट काढतील अशी अपेक्षा होती.

पण माझी घोर निराशा झाली. त्यांनी जिथे नेहरूवादापासून फारकत घेतली, तिथे स्वत:च्या बुद्धीने घेतली नसून आंतरराष्ट्रीय दबावामुळे घेतली. हे क्षेत्र आर्थिक आहे. नेहरूंच्या काळचा समाजवाद अजीबात रद्द ठरून खुल्या अर्थव्यवस्थेचा त्यांनी पुरस्कार केला. कारण त्याशिवाय कोणतीही आंतरराष्ट्रीय मदत मिळणे शक्य नव्हते.

नरसिंहरावांनी अर्थकारणात नेहरूवादाचा त्याग केला पण जेथे आंतरराष्ट्रीय दबाव नव्हता त्यासर्व बाबतीत ते सवाई नेहरू ठरले. ते संस्कृतप्रेमी आहेत हे साफ खोटे ठरले. त्यांच्यात काळात सर्वोच्च न्यायालयात सरकारला आपल्या संस्कृतचा प्रसार करण्याच्या दायित्वाची जाणीव करून द्यावी म्हणून याचिका दाखल झाली तेव्हा नरसिंहरावांच्या सरकारतर्फे विचारण्यात आले की, संस्कृत शिकविण्याची भारत सरकारवर जबाबदारी आहे असे मानले तर झुलुसारख्या काही टोळ्यांची भाषा शिकविण्याची का नाही? हे खास नेहरूवादी विचार आहेत. नेहरूंच्या संस्कृतविषयक धोरणाचे त्यात प्रतिबिंब पडले आहे. जो लहानपणापासूनच भारतीय राष्ट्रीयत्वापासून दूर केला गेला नाही अशा कोणत्याही भारतीयाच्या डोक्यात संस्कृत शिकविणे म्हणजे झुलूंची भाषा शिकविणे होय हा विचार येणार नाही.

सेक्युलॅरिझमच्या बाबतीत नरसिंहराव पुरेपूर नेहरूवादी होते. रामसेवकावर



गोळीबार झाल्यामुळे भाजपाला उत्तर प्रदेशच्या निवडणुकात प्रचंड बहुमत मिळाले व रामजन्मभूमीच्या चळवळीने उग्रता धारण केली. राजीव गांधींच्या म्हणजेच केंद्र सरकारच्या अनुमतीने राममंदिराच्या बांधकामाचा शिलान्यास झाला होता. यावर मुसलमानांनी आक्षेप घेतला नव्हता व उत्तर प्रदेश सरकारला शिलान्यासाच्या जागी बांधकाम करू दिले असते तर मुसलमान क्षुब्ध होण्याचा काही संभव नव्हता. बाबरी ढाचा पाडण्याचा उत्तर प्रदेश सरकारचा इरादा नव्हता. ज्याच्या सावल्यातच तो ढाचा बुडून जाईल असे भव्य मंदिर आसपास झाल्यावर त्या ढाच्याचे महत्त्व आपोआपच कमी झाले असते व राममंदिराचा प्रश्न सुटला असता.

पण कोणताही प्रश्न सोडविणे हा नेहरूवादाचा उद्देशच नव्हता. मुसलमानांना हिंदूंच्या विरुद्ध भडकाविणे हेच तर मुळी नेहरूवादाचे सार आहे.

नरसिंहरावांनी या बांधकामास आक्षेप घेतला व मुस्लिम आणि हिंदू यांचे या संबंधातील प्रतिनिधी बोलावून त्यांचे वाद श्रवण करण्यास सुरूवात केली. राजीव गांधींनी शिलान्यास मान्य केला तेव्हा असे काही वाद नव्हते. पण नसलेले वाद निर्माण करणे सत्ताधाऱ्यास सोपे असते, दिलजमाई घडवून आणणे कठिण असते. शिलान्यासाच्या जागी देखील कुठलेही बांधकाम करण्यास नरसिंहरावांनी हरकत घेतली मग त्या जागी ठरल्या दिवशी लाखो लोकांनी जमून काय करावे?

हात हलवीत परत जावे असे नरसिंहरावांचे म्हणणे.

नरसिंहरावांना जर हेच म्हणायचे होते तर त्यांनी लाखो लोक शिलान्यासाच्या स्थळी जमविण्यासच बंदी घालायला पाहिजे होती. त्यांनी तसेही केले नाही. सहजासहजी लाखो लोक जमू दिले. भावनांनी उद्दीप्त असे लाखो लोक जमल्यावर ते काहीच न करता परत जातील अशी अपेक्षा करता येईल काय? ते काही करू लागल्यास त्यांना परावृत्त करण्यासाठी गोळीबार करण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. पण कोणत्याही लोकशाही सरकारला तेथे जालियनवाला बाग करणे शक्य नव्हते. नरसिंहरावांना हे कळत नव्हते असे नाही. पण ते नेहरूनीतीत पक्के मुरलेले होते. लाखो लोक भावनेने अनावर होऊन त्यांनी बाबरी ढाच्याचा विध्वंस केला तर नरसिंहरावांना ते हवेच होते. त्यांनी विध्वंस केला की ''जातीयवादी'' लोकांना शिव्या देत ऊर बडवायचे. म्हणजे बाबरी ढाचाही पडतो व दंगे माजून भाजपाही मुसलमानांप्रमाणे हिंदूत देखील बदनाम होतो. कारण दंगे हिंदू वा मुसलमान कोणत्याच सर्वसामान्य नागरिकाला नको असतात.

सोमनाथ बांधले तेव्हा मुसलमानात कोणतीही हालचाल झाली नव्हती.

रामजन्मभूमीत मूर्ती ठेवण्यात आली व न्यायालयाने तिच्या पूजेची परवानगी दिली तेव्हाही मुसलमानात पाल देखील चुकचुकली नव्हती. मग आताच एवढा गाजावाजा का झाला?

तो मुसलमानांनी केला नसून नरसिंहरावांनी करविला हे स्पष्ट आहे. रामजन्मभूमीच्या ठिकाणचे मंदिर बाबराने पाडलेच नाही असे पूर्वी कोणी म्हणत नव्हते. वाजीद अली शहापासून रामजन्मभूमीचा वाद सुरू होता. पण कोणीही मुसलमानाने मंदिर पाडून मशीद बांधली हे म्हणणे खोटे आहे असे म्हटले नाही. ते आताच असे म्हटले कारण त्यांचा बोलविता धनी सत्तासीन असलेला हिंदू सेक्युलॅरिस्ट होता. फ्रँक गॉइटर नावाचा एक फ्रेंच लेखक इंडियन एक्सप्रेसमध्ये लिहितो.

''अयोध्येमध्ये घडलेल्या ज्या प्रसंगाचा गाजावाजा करण्यात येतो त्यात एकही माणूस मारला गेला नाही. इतकेच नव्हे तर कुणाला खरचटले देखील नाही. एक पडकी इमारत जमीनदोस्त झाली. तिचा जगभर गाजावाजा करण्यात आला. उलट मुंबईमधील दाऊद इब्राहीमवर ज्याचा आरोप आहे त्या बॉम्बस्फोटात चारशे माणसांचे प्राण गेले. पण आज जगात तर सोडाच भारतात तरी किती लोकांना त्याची माहिती आहे?''

याचे कारण स्पष्ट आहे. सारी प्रसारमाध्यमे सेक्युलॅरिस्टांच्या हातात आहेत.

नरसिंहरावांना अपेक्षित घटना घडली. बाबरी ढाचा जमीनदोस्त झाला. तेथे मंदिराचा एक शिलालेख देखील मिळाला. पण नरसिंहरावांनी काय केले? दूरदर्शनवर ''जातीयवाद्यांनी मशीद पाडली हो'' म्हणून ऊर बडविले. अपेक्षेप्रमाणे हिंदू-मुस्लिम दंगे झाले. त्यात ज्या मुसलमानांना पोलिसांचा प्रसाद मिळाला त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली. ज्या पोलिस अधिकाऱ्यांनी देवळे पाडण्यासाठी चालून येणाऱ्या मुसलमानांना रोखले त्यांच्या बदल्या करण्यात आल्या. हिंदूंची डझनावारी देवळे पाडली गेली असे गृहमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले पण हे कोणत्याच हिंदूला आठवत नाही. कारण कोठेही जाड छापात त्यांच्या शीर्षपंक्ती झळकल्या नाहीत.

नरसिंहरावांनी एक विधेयक पारित करून घेतले. या विधेयकानुसार प्रार्थनास्थळाची १९४७ पूर्वीची स्थिती बदलण्याचा प्रयत्न करणे हा गुन्हा ठरविण्यात आला. एकाही मुसलमानाने अशी मागणी केली नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे. या विधेयकाने मुसलमानांना हिंदूंची देवळे पाडण्याचा कायदेशीर अधिकार आहे असेच जणू मान्य केले आहे. आज जर एखाद्या मुसलमानाने हिंदूंचे देऊळ पाडले व सर्वोच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला की ''१९४७ सालापूर्वी जे कृत्य कायदेशीर होते ते आज मात्र बेकायदेशीर आहे हे म्हणणे शुद्ध अरेरावीचे आहे. त्याला कोणताही



पटण्यासारखा आधार नाही. म्हणून अशी तारीख घालणे असंवैधानिक ठरवावे तर त्यावर न्यायालयाजवळ संयुक्तिक उत्तर आहे काय? मुसलमानांना देवळे पाडण्याचा नेहमीच अधिकार आहे हेच या विधेयकाने मान्य केले नाही काय?

एकूण नरसिंहराव शंभर नंबरी सेक्युलर व नेहरूभक्त होते.

पाच वर्षे पुरी होण्याच्या आधीच नरसिंहरावांचे लोकसभेतील बहुमत गेले पण त्यांनी कोट्यवधी रुपयांची लाच देऊन आपले सरकार वाचविले असे नंतर सिद्ध झाले. ते सजेपासून तांत्रिक मुद्यावर वाचले.

नरसिंहरावांचे सरकार गेल्यावर ज्या निवडणुका झाल्या त्यात भाजपा इतर सर्व पक्षाहून जास्त जागा घेऊन निवडून आला. पण इतर सर्व पक्षांनी एक सेक्युलर आघाडी निर्माण केल्याने त्यांचे रीतसर सरकार बनू शकले नाही. या सेक्युलर आघाडीत मुस्लिम लीग होती यावरून ''नेहरूवादी सेक्युलॅरिझमचा धर्मनिरपेक्षतेची काय संबंध आहे?'' असे मात्र कुणी विचारले नाही.

पुन: निवडणुका झाल्या, त्यात भाजपाचे रीतसर सरकार बनू शकले पण ते तेरा महिनेच टिकले. पुन: निवडणुका झाल्या त्यात मात्र इतर काही मित्र मिळविण्यात यश येऊन वाजपेयींचे सरकार झाले व ते पाच वर्षे टिकले. हे भाजपा सरकार नसले तरी भाजपा हाच त्यात प्रमुख पक्ष होता. पण नेहरूवाद नष्ट करण्यास जी पावले उचलणे आवश्यक आहे त्यातली बहुतेक या सरकारातील मित्र पक्षांना नामंजूर होती. त्यामुळे इंग्रजी हटविणे, ३७० कलम रद्द करणे, समान नागरी कायदा अमलात आणणे, हिंदू-मुसलमानांना एकच शिक्षण देणे, आपले व हिंदूंचे पूर्वज एकच होते ही जाणीव मुसलमानात निर्मिणे, हिंदू व मुसलमान यांच्या साऱ्या वसत्या सरमिसळ करणे, त्यांच्या पोषाखात व चालीरीतीत दिसण्यासारख काही फरक असू नयेत म्हणून प्रयत्न करणे व त्यासाठी धर्मग्रंथांचा आधार न घेता मुसलमानांत देखील असलेल्या जातीत असलेल्या रूढींचा आधार घेणे, वगैरे नेहरूवादाचे उच्चाटन करण्यास आवश्यक अशा गोष्टी करणे शक्य नव्हते. तरी पण या सरकारच्या काही उपलब्धी वाखाणण्यासारख्या आहेत.

त्यापैकी पहिली म्हणजे अनेक पक्षांचे सरकार पाच वर्षे टिकविणे. मला ही गोष्ट शक्य होईल असे वाटले नव्हते. नेहमीच कोणत्या तरी एका पक्षाचे बहुमत होईल हे शक्यच नाही. त्यामुळे भारतात लोकशाही टिकायची असेल तर अनेक पक्षीय सरकारे चालली पाहिजेत. कितीही मतभेद असले तरी सगळ्या पक्षाच्या युतीला मान्य होणारे कोणते तरी कार्यक्रम असतातच. ते अमलात आणण्यासाठी संमिश्र सरकारे काम करू शकतात. केंद्रामध्ये प्रथम असा प्रयोग वाजपेयींनी करून दाखविला व भारतात

लोकशाही टिकू शकते हे कृतीने सिद्ध केले. दुसरे म्हणजे या सरकारच्या कोणत्याही मंत्र्यावर भ्रष्टाचाराचा आरोप आला नाही. फर्नांडिसचे याबाबतीत नाव घेतले जाते पण त्यांच्यावरील आरोप पोलिसांनी वा कोर्टाने ठेवलेला नाही. तहलका नावाच्या बदनामीकारक बातम्या गोळा करून पैसे मिळविणाऱ्या एक कंपूने केलेला तो आरोप आहे. त्यातही त्याच्या पक्षातील एका कार्यकर्त्याने पैसे घेतले असा आरोप आहे. ते पैसे कशासाठी घेतले व ते घेतल्यामुळे सरकारचे व देशाचे काही नुकसान झाले काय याबद्दल हे आरोप मूक आहेत. अडवाणींनी आरोप आल्याबरोबर लोकसभेच्या सदस्यत्वाचे त्यागपत्र दिले होते व आरोप दूर झाल्यावरच पुन: ते स्वीकारले.

या सरकारची तिसरी उपलब्धी म्हणजे अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता केलेला अणुस्फोट. हा अत्यंत गुप्ततेने करण्यात आला. या देशाचे कोणतेही रहस्य एका व्हिस्कीच्या बाटलीने विकत घेता येते अशी ज्याची बदनामी होती त्याने अमेरिकेच्या हेरांना देखील झुकांडी दिली ही अभिमानाने सांगण्यासारखी गोष्ट आहे.

वाजपेयींचे एक कृत्य मात्र अनाकलनीय आहे. त्यांनी पोपला भारतभेटीचे आमंत्रण दिले व पोपने भारतात येऊन आपल्याला हिंदू धर्माचे उच्चाटन करायचे आहे असे साऱ्यांच्या नाकावर टिच्चून सांगितले. वाजपेयींना नेहरूबद्दल फार आदर आहे व म्हणून नेहरूंचे अनुकरण करणे हा या कृत्याच्या मागचा उद्देश असू शकतो.

आता पुन: सोनिया गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सरकार आले आहे. त्याने अपेक्षेप्रमाणेच शिक्षणातील भगवीकरण म्हणजे राष्ट्रीयीकरण रद्द करणे, सावरकरांची अंदमानमधील स्मारके नष्ट करणे वगैरेसारखी कृत्ये सुरू करून आपले नाव राखले आहे.

■■■